2632

केसरींतील निवडक निबंध

2632

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 2633

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(ठाणें जिल्हा वाचनालय) वाचनालय/संदर्भ
2632




REFBK-0022583

आर्यभूषण मुद्रणालय

केसरींतील निवडक निबंध

दुसरें पुस्तक



संपादक:

गोपाळ गणेश आगरकर, एम्. ए.

REFBK-0022583

मूल्य रुपये दोन

१९४०

पहिली आवृत्ति १८८८

दुसरी आवृत्ति १९४०

मुद्रक व प्रकाशक

श्री. विठ्ठल हरि बर्वे,

आर्यभूषण मुद्रणालय

९१५।१ भांबुर्डा पेठ, पुणें नं. ४.

पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना

'**केसरीतील निवडक निबंध**' पुस्तकरूपानें छापण्यास जेव्हां आम्हीं निश्चय केला, तेव्हांच त्यांचे दोन भाग करावे लागतील, असें आम्हांस वाटलें होतें; व म्हणूनच पहिला भाग छापतांना दुसरा भाग त्याच्या इतका मनोरंजक व बोधपर होईल अशा प्रकारें निबंधांची वांटणी दोहींत करून टाकण्याची व्यवस्था केली होती. पण पहिला भाग लोकर बाहेर पडला नाहीं तोंच त्याला इतक्या मागण्या येतील, व दुसरा भाग लोकर काढण्याविषयीं वाचकांकडून पत्रें येऊं लागतील, असें वाटलें नव्हतें. **केसरी** पत्र निघाल्यापासून लोकांत वाचनाची गोडी किती वाढली आहे, व अगदीं स्वल्प किंमतींत प्रत्येक आठवड्यास मनोरंजक व बोधपर किती मजकूर वाचण्यास मिळत आहे, याबद्दल अभिप्राय देण्याचा अधिकार आम्हांस नाहीं, हें आम्ही कबूल करतों. तथापि ज्या अर्थीं 'निवडक निबंधांच्या' पहिल्या भागाचा खप इतक्या झपाट्यानें होत आहे, व तसाच दुसऱ्या भागाचाही होईल, अशीं चिन्हें दिसत आहेत, त्या अर्थीं **केसरी**कडून जी थोडीबहुत सेवा घडत आहे ती वाचकजनांस अत्यंत मान्य होत आहे, व नानाप्रकारच्या विषयांवर अधिक वाचण्यासारखा निबंधसंग्रह दुसऱ्या कोणत्याही दोन पुस्तकांत सांपडण्यासारखा नाहीं, असें स्पष्ट दिसतें. व हें खरें असेल तर आम्हीं जें स्वल्प देशकृत्य आरंभिलें आहे त्यापासून आमचा मूळ हेतु थोडाबहुत पूर्ण होत आहे, हें पाहून आम्हांस समाधान मानण्यास हरकत दिसत नाहीं.

या दोन्ही भागांत मिळून १८८६ अखेरपर्यंत **केसरी**त आलेल्या 'निवडक निबंधांची' सारखी वांटणी केली आहे त्यामुळें हा दुसरा भाग पहिल्या भागाइतकाच वाचनीय झाला आहे. पुस्तकांचा सांचा, पृष्ठसंख्या व छपाई हीं व त्यांची किंमत यांचा विचार केला असतां हीं पुस्तकें फायद्यासाठीं काढलेलीं नाहींत, अशी कोणाची खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं. **केसरी**चे जे वर्गणीदार नाहींत किंवा असूनही ज्यांस त्यांतील निबंध अटपसर रीतीनें आपणाजवळ असावे असें वाटत असेल, त्यांच्यासाठीं हे 'निवडक निबंध' फिरून छापले आहेत. हे त्यांच्या हातांत पडून जर त्यांचा कांहीं फायदा झाला तर इतक्या स्वल्प किंमतींत हीं पुस्तकें काढण्यांत आम्हांस जो त्रास पडला आहे, त्याबद्दल आम्हांस बिलकुल वाईट वाटणार नाहीं इतकेंच नाहीं, तर वाचनाची अभिरुचि वाढत जाऊन ह्या पुस्तकांची प्रस्तुत आवृत्ति लवकर खपल्यास, त्यांची पुढली आवृत्ति याहीपेक्षां कमी किंमतींत काढण्यास व 'निवडक निबंधांचा' तिसरा भाग प्रसिद्ध करण्यास बरीच उमेद येईल.

दुसऱ्या आवृत्तीचे प्रास्ताविक दोन शब्द

केसरींतील निवडक निबंध–दुसरें पुस्तक याची पहिली आवृत्ति मुद्रित होऊन ५२ वर्षें झाल्यावर यंदा दुसरी आवृत्ति छापण्याचा सुयोग आला, याचें कारण म्हणजे मुंबई विद्यापीठानें आपल्या परीक्षांस वरील पुस्तक नेमलें हें होय. केसरींतील निवडक निबंधांच्या पहिल्या पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढण्याचा सुयोग सन १९३७ सालीं म्हणजे पहिल्या आवृत्तीनंतर ५० वर्षांनीं आला होता. हें पुस्तक नागपूर विद्यापीठानेंही आपल्या अभ्यासक्रमांत नेमलेलें होतें. केसरींतील लेखांनीं ५० वर्षांपूर्वी महाराष्ट्रांत किती खळबळ उडवून दिली होती याचा इतिहास अजूनही ताजा असल्यानें त्याबद्दल कांहीं विशेष लिहिलें पाहिजे असें नाहीं. त्या काळीं केसरींतील लेखांनीं वाचकांच्या मनोवृत्ति थरारून जात आणि अशा तेजस्वी लेखांचें पुस्तक नवीन पिढीच्या विद्यार्थ्यांच्या हातीं देण्यांत मुंबई विद्यापीठाच्या मराठी पुस्तकमंडळाच्या सभासदांनीं जें औचित्य दाखविलें आहे, त्याबद्दल त्यांचें कोणीही मनःपूर्वक अभिनंदनच करील.


आर्यभूषण मुद्रणालय, पुणें ४ }
दिनांक ५–११–१९४० } **प्रकाशक**

अनुक्रमणिका.

विषय.	पृष्ठें.
ज्ञान	१
अप्रतिबंधव्यापार आणि उत्तेजन	११
बहिष्कार	२१
आमच्या देशांतील सभा व मंडळ्या	२५
समाइकीनें उभारलेल्या भांडवलाचे कारखाने	४५
राजसत्तेची उत्पत्ति आणि अभिवृद्धि	५१
जूट	५७
मनुष्याचें सामाजिक कर्तव्य	६७
मुत्सद्दी व योद्धा ...	७२
राष्ट्रीय स्थितीशीं लोकांच्या रीतीभातींचा संबंध ...	७८
मनुष्यजातीची पूर्णावस्था	८२
स्वदेशाभिमान ...	८९
इंग्रजांच्या कोणत्या गोष्टी अनुकरणीय आहेत! ...	१००
नेटिव लोकांस इंग्रजांसारखें धाडस कधीं येईल! ...	१०४
बालविवाहापेक्षां सतीच बरी!	१०८
देशोन्नति	११२
मुलाचें लग्न करणें हें बापाचें कर्तव्य आहे काय! ...	१२१
चैन	१२४
स्त्रीदास्यविमोचन ...	१२७
तंबाखू	१३३
चिमाबाईचें एमाबाईशीं सख्य होणार कसें? ...	१३७
आम्हा मनुष्यांस पाहिजे काय व तें मिळेल कशानें ...	१४४
सांप्रतच्या धामधुमीवर मि० कुंटे यांचें मजेचें चऱ्हाट ...	१५०
एक वृद्ध पोलिटिकल आत्याबाई	१५५
कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे	१६०
व्यायाम	१६७
परभाषेंतील शब्दांची योजना	१७०
देशभाषीय ग्रंथसंग्रहाची आवश्यकता ...	१७३
उद्योगवृद्धि	१८८
निजामास राज्याभिषेक ...	२०१
ज्वालामुखी पर्वत ...	२०६
मुंबईइलाख्याचें कलाकौशल्य	२११
शास्त्र व बायबल ...	२१४
ललितकलांच्या उद्धारार्थ यत्न— चित्रकला	२१७
प्रसिद्धीकरण	२२२
ब्रह्मदेश	२२६
शिल्पशाळा	२३४
करविषयीं प्रथम संक्षिप्त विचार	२४०

विषय	पृष्ठें
करासंबंधीं कित्येक गमतीचे प्रश्न	२४३
पाऊस	२४६
मि० ब्राईट यांचे हिंदुस्थाना-विषयीं विचार	२४९
शास्त्राभ्यास	२५४
स्वातंत्र्य	२५९
रा० ब० केरो लक्ष्मण छत्रे कैलासवासी झाले ...	२६२
आधीं कोण ? राजकीय कीं सामाजिक ? ...	२६९
आधीं कोण ? राजकीय कीं सामाजिक ? उत्तरार्ध ...	२७३
ज्याचा त्याचा ब्राह्मणांवर कटाक्ष !	२७७
भारतीय शास्त्रकलांचें पुनरुज्जीवन	२८३
हिंदुस्थानचें कलाकौशल्य	२८७
आमचीं धर्मकृत्यें व रीतीभाती	२९२
राज्यतृष्णा ...	२९७
जनरल गॉर्डन ...	३००
सभास्थापन ...	३०६
संतति व संपत्ति ...	३०९

केसरींतील निवडक निबंध



दुसरें पुस्तक

ज्ञान

रंगानें काळे, दिसण्यांत कुरूप, स्वभावानें दुष्ट, नीतीस अपरिचित, व बुद्धीनें मंद असे निग्रो जातीचे लोक सर्वांच्या पाहण्यांत आलेच असतील. या निग्रोहूनही विशेष रानटी जातीचे लोक कित्येक अप्रसिद्ध बेटांत आहेत, असें पुनः पुनः पृथ्वी-पर्यटन करणाऱ्या शोधक प्रवाशांच्या लेखांवरून समजतें. उत्तर अमेरिकेंतील तांबडे इंडियन, सैबेरिया देशांतील खुजे व निःशक्त सैबेरियन, आरबस्थानांतील फिरते धन-गर, हिंदुस्थानांतील गोंड वगैरे मूळचे रहिवाशी, रशियाच्या अमलांत आलेल्या मध्यआशियांतील मोंगलाच्या निरनिराळ्या जाति, रशियाच्या दक्षिणेचे कोसॅक्स वगैरे दुसऱ्या प्रतीचे लोक, नीग्रोपेक्षां पुष्कळ सुधारलेले आहेत हें खरें; पण यांच्यांत व नीग्रोंत जितकें अंतर आहे, त्याहून फारच अधिक अंतर यांच्यांत व सुधारलेल्या अलीकडील युरोपिअन लोकांत आहे. तेजःपुंज शरीरें, मनोहर आकृति, सौम्य स्वभाव, स्थिर नीति व कुशाग्रबुद्धि ज्यांच्यापैकीं पुष्कळांच्या ठायीं वसत आहे असे अर्वाचीन युरोपिअन, एशियाटिक, किंवा अमेरिकन लोक कोणीकडे आणि आफ्रि-केच्या किनाऱ्यावर उन्हांत तळणारे, किंवा उत्तरभूशिराच्या आसपास बर्फाच्या झोंपडयांत रेन्डियरच्या मांसावर व कातडयावर आयुष्य कंठणारे लोक कोणीकडे ! या लोकांत व अलीकडील सुधारलेल्या लोकांत जमनिअस्मानाचें अंतर आहे, ही गोष्ट निर्विवाद आहे. यांत हें अंतर कशानें पडलें, व तें कमी कशानें होत जाईल, हें या निबंधांत थोडक्यांत दाखविण्याचा इरादा आहे.

मनुष्यांमध्यें ज्ञानाचा जसजसा प्रसार होत जातो तसतशी त्यांची रानटी स्थिति सुटत जाऊन त्यांस उन्नतावस्था प्राप्त होते. जीं राष्ट्रें सध्यां आपणांस सुधारलेलीं असें म्हणवून घेत आहेत तीं एकदां नीग्रो लोकांच्या किंवा त्यांहूनही रानटी

लोकांच्या स्थितींत असावीत, असें अनेक प्रमाणांवरून सिद्ध करतां येण्याजोगें आहे, व पुष्कळांनीं तें केलेंही आहे. ज्ञानाचा प्रसार होऊन रानटी स्थिति सुटत चालल्यानें, व उन्नतावस्था येऊं लागल्यानें, मनुष्यमात्राच्या सुखाची वृद्धि होत जाते किंवा नाहीं हा प्रश्न क्षणभर वादग्रस्त आहे असें जरी मानलें, तरी त्यावरून ज्ञानाचा प्रसार करण्याविषयीं परिश्रम करूं नये असें होत नाहीं. ज्ञानवृद्धि करण्यापासून मनुष्यमात्रास कोणत्याही प्रकारचा फायदा न होता तर ती करण्याकडे त्याची प्रवृत्ति कधींच झाली नसती. ती एकसारखी होत आहे, व दिवसेंदिवस क्षीण न होतां अधिकच वाढत जात आहे, यावरून तसें करण्यांत मनुष्यमात्रास कांहीं फायदा होत आहे, हें स्पष्ट दिसतें. जड वस्तूप्रमाणें सुखदुःखाची मापानें मोजणी करतां येती तर सर्व स्थितींत सुख व दुःख सारखें आहे असें प्रतिपादणाऱ्यांचें तोंड तेव्हांच बंद करतां येतें. ती करतां येत नाहीं म्हणून त्यांना निरुत्तर करणें जरी कठिण झालें आहे, तरी येवढें खरें आहे कीं ज्यांस आम्ही सुधारलेलीं राष्ट्रें म्हणतों, त्यांपैकीं कोणासही नीग्रो लोकांच्या स्थितींत पुनः जाण्याची इच्छा नाहीं इतकेंच नाहीं, तर प्रस्तुत जी सुधारणा त्यांस प्राप्त झाली आहे तिची वृद्धि करण्याची उत्कंठा त्यांना लागली आहे, व ही उत्कंठा दूर करण्यास त्यांना ज्ञानाशिवाय दुसरें साधन दिसत नाहीं.

सुखाची प्राप्ति आणि दुःखाचा परिहार यांत समग्र जीवकोटि सर्वकाळ चर झालेली दिसते. नश्वर ऐहिक वस्तूंचा कंटाळा करणारा योगी देखील सुखाच्या पाठीमागें लागलेला असतो. साधारण प्रापंचिकांत आणि त्याच्यांत भेद इतकाच कीं प्रापंचिकाप्रमाणें ऐहिक सुखांनीं त्याचें समाधान होत नाहीं. त्याची महत्त्वाकांक्षा प्रापंचिकापेक्षां बलवत्तर असल्यामुळें तो ऐहिक सुखांहून भिन्न अशा अविनाशी सुखांच्या प्राप्तीसाठीं आत्मसंयमन करीत असतो. कोटी मनुष्यांपैकीं नव्याण्णव लक्ष नव्याण्णव हजार नऊशें नव्याण्णव मनुष्यांना ऐहिक सुखांचा पाठलाग सोडून योग्यांच्या अविनाशी सुखांमागें लागवत नाहीं, यामुळें हा सारा प्रपंच वाढत चालला आहे. तथापि अशा स्थितींतही एक गोष्ट निरंतर लक्षांत ठेविली पाहिजे ती ही कीं, जरी योगी आणि प्रापंचिक यांचीं सुखें भिन्न जातींचीं आहेत, तरी तीं संपादण्याचें दोघांचें साधन एकच आहे. तें साधन ज्ञान होय. प्रस्तुत निबंधांत ज्ञानप्रसारामुळें प्रापंचिकांच्या सुखांची वृद्धि कशी होत चालली आहे, हें विशेष स्पष्ट केलें पाहिजे.

मनुष्यास जो सुखानुभव होतो, तो सारा त्याच्या मनाच्या द्वारें होतो, म्हणून सारीं सुखें मानसिक सुखें आहेत असें तत्त्वदृष्ट्या म्हटलें पाहिजे. तथापि निबंधाच्या सोईसाठीं त्यांचे दोन तीन स्थूल भाग करण्यास कांहीं हरकत नाहीं. साधारणपणें विचार करतां असें दिसून येईल कीं प्रत्येक मनुष्य शारीरिक, सामाजिक, किंवा शुद्ध मानासिक या सुखांच्या तीन वर्गांपैकीं एकाच्या, दोहोंच्या किंवा सान्यांच्या पाठीमागें लागलेला असतो. या तीनही प्रकारच्या सुखांची आजपर्यंत त्याला जी जोड झाली आहे ती त्याच्या ज्ञानामुळें झाली आहे, व पुढें तींत भर पडणें किंवा न पडणें हेंही त्याच्या ज्ञानावरच अवलंबून आहे हें स्वल्प विचाराअंतीं ध्यानांत येणार आहे.

रानटी लोक शिकारीवर उपजीविका करितात. थंडीवान्यापासून शरीराचें रक्षण करण्यास उपजीविकेसाठीं मारलेल्या जनावरांच्या कातड्यांशिवाय त्यांच्यापाशीं दुसरें कांहीं नसतें. सूर्याचा प्रखर ताप दुःसह होतो तेव्हां वृक्षांच्या छायेशिवाय त्यांना दुसरा आश्रय नसतो. पर्वतांच्या गुहांशिवाय पर्जन्यधारांपासून आपलें संरक्षण करून घेण्यास त्यांस दुसरें कांहीं सांपडत नाहीं. एखादेवेळीं भूक लागली असून सावज सांपडलें नाहीं कीं उपाशीं मरण्याची पाळी. रानटी लोकांच्या असल्या कष्टमय स्थितीहून आमची स्थिति किती निराळी झाली आहे! सुधारलेल्या देशांत मांसाहार करण्याची रूढि आहे हो गोष्ट निराळी; पण उपजीविकेसाठीं प्राणिहत्या अशी करावयाची नाहीं असा जरी सर्व सुधारलेल्या राष्ट्रांनीं निश्चय केला तरी संकटावांचून उपजीविका चालविण्यापुरतें धान्य उत्पन्न करण्याची कला आम्हांस अवगत झाली आहे. इतकेंही करून धान्याची थोडी तूट आल्यास त्याच्या भरतीस घालण्यासारखीं शेंकडों प्रकारचीं फळें, मुळें, व कांदे आहेत. मनुष्यांच्या चरितार्थास उपयोगी पडत असलेल्या वनस्पतींच्या नांवांची यादी, आणि त्यांच्या लागवडीविषयीं थोडथोडी माहिती, यांचा एकाद्या पुस्तकांत संग्रह केला, तर तें निदान वेबस्टरच्या कोशाहून मोठें होईल यांत संशय नाहीं! याचप्रमाणें शीतोष्णापासून आपला बचाव करण्यासारखीं हजारों साधनें सुधारलेल्या मनुष्यांच्या हस्तगत झालीं आहेत. व्याधीला उतार पाडणाऱ्या वैद्यशास्त्राचें पाऊल प्रतिवर्षी एकसारखें पुढें पडत आहे, व औषधींचा संग्रह वाढत आहे. सारांश, रानटी लोकांना ज्या शारीरिक सुखांचा उपभोग कधींही मिळावयाचा नाहीं, तीं सुधारलेल्या समाजांतील कनिष्ठ वर्गातल्या प्रत्येक व्यक्तीच्या नित्योपभोगांत असतात. उच्च वर्गातील लोकांस सर्व आवश्यक गोष्टींची अनुकूलता असून जीं सुखें रानटी

लोकांच्या स्वप्नांत सुद्धां कधीं यावयाचीं नाहींत तीं ते प्रतिदिवशीं सेवितात. पदार्थांच्या धर्मांचा अभ्यास रात्रंदिवस चालला असल्यामुळें प्रतिवर्षी नवीन शोध होत आहेत, व त्या मानानें सुखाची वृद्धि होत आहे. ज्यानें वाफेची शक्ति मनुष्यांच्या कामीं लावितां येईल असें शोधून काढिलें त्यानें त्यांच्यावर केवढे उपकार केले ! ज्याला विद्युत्प्रवाहास संदेशवाहक करण्याची युक्ति सुचली त्यानें मनुष्यमात्रास सदैव ऋणी केलें नाहीं काय ? याचप्रमाणें भूगर्भ, रसायन, ज्योतिष, वैद्यक वगैरे शास्त्रांतील प्रत्येक महत्त्वाच्या शोधानें मनुष्यांच्या सुखांत जी भर पाडिली आहे तिचें यथार्थ परिमाण कोणाच्यानें होणार आहे ? तसेंच पुढें जी पडणार असेल तिचें बिनचुक अनुमान आज कोण करूं शकेल ? इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, युनायटेडस्टेट्स् वगैरे प्रमुख देशांत सुखांत जी बहुविधता आणि सुगमता आली आहे, ती खरोखरीच चकित करण्यासारखी आहे. असें असूनही त्या व इतर देशांतील लोक ती वाढविण्याच्या आणि सुलभ करण्याच्या शोधांत निमग्न झाले आहेत. हा त्यांचा व्यवसाय अव्याहत चालला तर कांहीं वर्षांनीं सुधारलेल्या देशांतील कोणत्याही व्यक्तीस शरीराचें संरक्षण उत्तम रीतीनें होण्यास अवश्य लागणाऱ्या सर्व वस्तु स्वल्प आयासानें मिळूं लागतील इतकेंच नाहीं, तर ऐषआरामाच्याही अनेक वस्तु अत्यंत सुसाध्य होतील, असा बळकट संभव आहे.

येथपर्यंत मनुष्यांच्या शारीरिक सुखाचा विचार झाला. याहीपेक्षां विशेष महत्त्वाचा विचार त्यांच्या सामाजिक स्थितीचा होय. रानटी स्थितींत मनुष्यांचा एकमेकांशीं जो व्यवहार चालतो त्यांत आणि सुधारलेल्या स्थितींतील त्यांच्या व्यवहारांत जमीन-अस्मानाचें अंतर असतें. रानटी स्थितींत मनुष्य आपल्या सुखाची मात्र पर्वा करतो. आपलें सुख साधण्यासाठीं कोणास कितीही पीडा करावी लागली तरी ती करण्यास तो तयार असतो. दोनप्रहरच्या सुमारास भूक लागली, व अमक्यापाशीं कांहीं मांस आहे असें दिसलें किंवा ठाऊक असलें, तर तो तें त्याच्यापासून हिसकावून घेण्यास मागेंपुढें पहावयाचा नाहीं. अशा स्थितींत "बळी तो कान पिळी" हा न्याय सर्वत्र जारीनें अमलांत असतो. कलत्र, पुत्र, कन्या इत्यादि संबंध त्या स्थितींत ठाऊक नसतात. एखादे वेळीं कांहीं सांथ येऊन पारधीच्या जनावरांचा फडशा झाला तर एकमेकांस आपलें भक्ष्य करण्यास त्यांना वाईट वाटत नाहीं. कांहीं रानटी लोक अशा स्थितींत म्हातारे पुरुष आणि बायका यांचा पाठलाग करून त्यांस पकडतात, आणि जनावरांप्रमाणें फाडून खातात ! अशा स्थितींत

लढाईस उभें राहणें, जखमा करणें, जीव घेणें–याची कोणासही भीति वाटत नाहीं. तथापि कालांतरानें असल्या शोचनीय स्थितींतूनही मनुष्यें बाहेर पडतात, व प्रथम त्यांना कुटुंबाची कल्पना येऊं लागते. एकदां कुटुंब बनलें कीं त्यांत राजा, प्रजा, हुकूम, ताबेदारी, आई, बाप, मुलगा, मालकी, वारस इत्यादि संबंधांचा उद्भव होऊन त्यांचें ज्ञान होऊं लागतें. पुढें कुटुंबांचा विस्तार होतां होतां जात उत्पन्न होते. कुटुंब-व्यवस्थेच्या नियमांपैकीं कांहीं नियम टाकून देऊन, व कांहींत थोडाबहुत फेरफार करून, ते जातीला लावण्यांत येतात; जातींचें पुढें खेडें होतें, व खेड्यांतून शहर निपजतें. ग्रीक लोकांच्या विद्वत्तेचा, नीतिविचारांचा, व राज्यपद्धतींचा रोमन लोकांच्या द्वारें अलीकडील युरोपीय राष्ट्रांच्या आचारांवर व विचारांवर जरी पुष्कळ परिणाम झाला आहे, तरी या लोकांची राज्य ही कल्पना शहराच्या बाहेर कधीं फारशी गेली नाहीं हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. ॲथीनिअन्स, स्पार्टन्स, थीबन्स या प्रसिद्ध ग्रीक लोकांपैकीं प्रत्येकास ॲथेन्स, स्पार्टा, थीब्स–या शहरांबाहेर आपलें कांहीं नाहीं, असें नेहमीं वाटत असे. तथापि कालगतीनें ही कल्पनाही लयास जाऊन रोमन लोकांच्या वेळीं राष्ट्राची कल्पना उत्पन्न होऊन दृढ झाली. अलीकडे अनेक राष्ट्रें अन्योन्यांच्या कल्याणपाशानें सदैव एकत्र बद्ध करण्याच्या कल्पना निघूं लागल्या आहेत, व एका जर्मन इतिहासकारानें असें भाकीत करून ठेविलें आहे कीं, कालांतरानें प्रत्येक खंड एकेक राष्ट्र बनणार आहे, व या सर्व खण्डराष्ट्रांत अज्ञातपूर्व अशी मैत्री, परोपकारबुद्धि, संपत्ति, ज्ञान आणि नीति यांचा प्रसार होणार आहे. रानटी स्थितींत ज्या 'स्व'ची येवढी प्रतिष्ठा वाटत असते, त्याची मातब्बरी हळूंहळूं कमी होऊन त्यावरील प्रेमाचा कांहीं भाग प्रथम कुटुंबांतील आप्तांस, व पुढें जातिबांधवांस, ग्रामबांधवांस, देशबांधवांस, व अखेरीस सर्व मनुष्यजातीस अर्पावा, असें वाटूं लागतें. कांहीं सानुकंप तत्त्ववेत्त्यांच्या प्रेम-विषयांत समग्र मनुष्यजातीचासा काय पण साऱ्या जीवसृष्टीचासुद्धां समावेश होतो! कुटुंब, जात, खेडें, शहर, व राष्ट्र यांच्या प्रथमावस्थेंत समाजाच्या अवयवांच्या अन्योन्यसंबंधांत पराकाष्ठेचें काठिण्य असतें. गृहपति, जात्यग्रणी, ग्रामाधिकारी, नगरनायक, व राष्ट्राधिपति हे आपआपल्या ताब्यांतील प्रजेवर अतिशय सक्तीचा अंमल करितात. अखंड स्वातंत्र्याचा अनुभव त्यांना मात्र मिळत असतो. पारतंत्र्याचें सारें दुःख आज्ञांकितांच्या कपाळीं येतें. तथापि रानटी स्थितींतील सततसंगरावस्थेपेक्षां ही अवस्था शेंकडोंपट बरी. कुटुंबांतील

प्रधानपुरुषानें इतरांवर, व राजानें प्रजेवर, कितीही जुलूम केला, तरी एकंदरीनें समाजावयवांस अशा स्थितींत रानटी स्थितीपेक्षां अधिक सुखोपभोग होतो. या स्थितींत कांहीं काल लोटल्यावर या अनियंत्रित एकाधिकाराच्या कडकपणास कांहीं उतार पडूं लागतो. कुटुंबांत बायकोस व वयांत आलेल्या मुलांस, आणि राज्यांत मोठमोठ्या घराण्यांस कांहीं हक्क मिळूं लागतात, व हळूंहळूं घरांतील कर्त्या पुरुषाच्या आणि राष्ट्रांतील राजाच्या, अप्रतिहत सत्तेस त्यांच्या वजनाचा आळा पडूं लागतो. कुटुंबांत कुटुंबसंरक्षणाचा भार कर्त्या पुरुषाच्या डोकीवर पडत असल्यामुळें राजसत्तेप्रमाणें त्याची सत्ता अगदीं संपुष्टांत येऊं शकत नाहीं, व ती येणेंही इष्ट नाहीं. कारण साधें कुटुंब आणि राज्यकुटुंब यांत एक जबरदस्त भेद आहे; तो हा कीं साध्या कुटुंबांतील प्रजा अल्पवयस्क आणि अज्ञान असते. राज्यकुटुंबांची तशी गोष्ट नाहीं. राजाला वयांत आलेल्या समजूतदार लोकांवर अम्मल करावयाचा असतो; त्यामुळें त्याच्याकडून त्याच्या अधिकाराचा फारच दुरुपयोग झाला तर त्याबद्दल त्याला प्रायश्चित्त भोगावें लागतें. बहुतेक देशांतील राजांनीं आपल्या अधिकाराचा दुरुपयोग केल्यामुळें कांहीं देशांत राजांचे अधिकार अतिशय मर्यादित केले आहेत, व कांहीं देशांनीं तर एकसत्तात्मक राज्यपद्धति मुळींच टाकून देऊन तिच्याऐवजीं बहुसत्तात्मक किंवा लोकसत्तात्मक राज्यपद्धति स्थापिली आहे. सारांश, समाज सुव्यवस्थित चालण्यास पुरें इतकें पारतंत्र्य ठेवून बाकी होईल तितकें स्वातंत्र्य त्यांतील प्रत्येक व्यक्तीस अनुभवूं द्यावयाचें असा मानवी सुधारणेचा स्पष्ट कल आहे; व या कलामुळें कुटुंबांत व राज्यांत प्रेम आणि सौजन्य यांची वृद्धि होत आहे. सध्यां सुशिक्षित आईबापें मुलावर जी प्रीति करितात, सध्यां समाजावयवांत अन्योन्याविषयीं जी कळकळ दृष्टीस पडते, सुधारलेल्या राष्ट्रांतील प्रजेस सध्यां ज्या राजकीय हक्कांचा उपभोग घेतां येत आहे,—ती प्रीति, ती कळकळ, व ते हक्क अस्तित्वांत येण्यास मनुष्यांच्या ज्ञानवृद्धीहून दुसरें कांहीं कारण आहे, असें कोणी म्हणूं शकेल काय ? एकदां जवळच्या आप्तांस किंवा शेजाऱ्यांस ठार मारणें, किंवा फाडून खाणें मनुष्यास अवघड वाटत नसे ! आतां पोटच्या पोरास सुद्धां तीव्र शब्दांचा प्रहार करवत नाहीं । पूर्वी अपराध्यास ज्याचा तो मनमानेल तो दंड करीत असे, व त्याच्यापासून होणाऱ्या बऱ्यावाईट परिणामांचें फळ भोगण्यास तयार असे. आतां क्षुल्लक अपराधाबद्दल देखील कोणी कोणास स्वतः दंडीत नाहीं. तंटा तोडून घेण्यासाठीं सरकारनें नेमिलेल्या तिऱ्हाईत न्यायाधिशाकडे जाण्याची चाल सर्वत्र पडत

चालली आहे. परद्रव्याचा अपहार करण्याची बुद्धि, अविश्वास, दीर्घद्वेष, क्रौर्य, निष्कारण निंदा, मात्सर्य, कलहरति वगैरे समाजविघातक दुर्गुणांचा लोप झपाट्यानें होत चालल्यामुळें, प्रत्येकास शांतीचा आणि सुखाचा अधिकाधिक उपभोग मिळूं लागला आहे. हा सारा प्रताप ज्ञानाचा नव्हे तर कशाचा ?

आतांपर्यंत ज्ञानापासून होणाऱ्या शारीरिक व सामाजिक सुखाचें दिग्दर्शन केलें. या दोहोंपेक्षांही श्रेष्ठतर असा सुखांचा आणखी एक वर्ग राहिला आहे, तो कोणता म्हणाल, तर मानसिक सुखांचा. या सुखांपुढें वरील सुखें अगदीं तुच्छ आहेत. इतकें खरें आहे कीं या सुखांची गोडी मनुष्यास सहसा लागत नाहीं. पण जर त्याच्या सुदैवानें त्याला ती एकदां लागली, तर त्याच्यासारखा त्रिभुवनांत सुखी प्राणी मिळावयाचाच नाहीं. पृथ्वीवर ज्ञानाशिवाय अशी दुसरी कोणतीही वस्तु नाहीं, कीं जिचा कंटाळा न येतां, किंवा जिच्यापासून शरीरास किंवा मनास कोणताही व्याधि न जडतां, जिच्यायोगानें वृत्ति आमरण आनंदमय राहूं शकेल. जे पुरुष ज्ञानसंपादनांत निमग्न झालेले असतात, त्यांसच या अमोलिक सुखाचा निरंतर लाभ होतो. अलेक्झान्डर, सीझर, नेपोलियन, तैमूरलंग, झांजिझखान इत्यादि जगत्प्रसिद्ध शूरांना ज्या सुखाचा अनुभव कधीं झाला नाहीं; तुर्कस्थान, इराण, चीन, हिंदुस्थान इत्यादि विस्तृत देशांच्या बादशहांस अमर्याद सत्तेपासून किंवा अगणित द्रव्यापासून जें सुख कधींही प्राप्त झालें नाहीं; रमणीय उद्यानें व विशाल मंदिरें यांत जें सांपडावयाचें नाहीं; जें सुवासांत, सुग्रासांत किंवा अत्यंत रूपवती स्त्रियांच्या सहवासांत नाहीं; जें दानानें दुणावतें; वार्धक्यानें ज्याची वृद्धि होते; अतिसेवनानें ज्याचा वीट न येतां अधिक क्षुत्क्षोभास जें कारण होतें, तें सुख विद्वानास मात्र प्राप्त होतें. लक्ष्मी आणि सरस्वती यांचा नित्य कलह आहे. लक्ष्मीच्या आराधकांची संख्या अतिशय मोठी. सरस्वतीचा भक्तसमूह अत्यंत मर्यादित. सरस्वतीहून लक्ष्मी प्रसन्न करून घेणें विशेष सुलभ. सरस्वतीच्या प्रसादापेक्षां लक्ष्मीच्या प्रसादाचें बाह्य स्वरूप अतिशय मोहक. सामान्यतः सरस्वतीपूजकांपेक्षां लक्ष्मीपूजकांस जगांत विशेष मान. असें असतां, एकंदरीनें लक्ष्मीपेक्षां सरस्वती जगाची विशेष उपकर्त्री झाली आहे, असें सुविचाराअंतीं कोणासही दिसून येईल. विश्वाच्या विशाल स्वरूपाच्या विचारांत जो गढून गेला, व ज्याला ही पृथ्वी एखाद्या क्षुल्लक वारुळाप्रमाणें दिसूं लागली, त्याला तीवरील कांहीं मुंग्यांस दुसऱ्यापेक्षां दाणे दोन दाणे अधिक सांपडले, किंवा कांहींस मुळींच न सांपडल्यामुळें रिकामें फिरावें लागलें, म्हणून खेद

होणार आहे काय ? इराणची बादशाही पादाक्रांत करून डरायसाच्या सिंहासनावर पाय ठेवतांना वीरशिरोमणी अलेक्झान्डरास जो आनंद झाला असेल, त्यापेक्षां अखिलपरमाण्वंतरगत गुरुत्वाकर्षणधर्म शोधून काढतांना न्यूटनास कमी आनंद झाला असेल, असें आम्हांस वाटत नाहीं. सीझर, फ्रेडरिक् धी ग्रेट, नेपोलिअन वगैरे अतुलप्रतापी नरसिंहांनीं जे विजयध्वज लाविले, त्यांहून साक्रेटीस, गौतमबुद्ध, शंकराचार्य, ख्रिस्त वगैरे नरपुंगवांचे विजयध्वज विशेष स्पृहणीय, विशेष कल्याणकारक, व विशेष चिरस्थाई आहेत, असें आमचें मत आहे. शूर किंवा धनाढ्य पुरुष स्वतःचें किंवा फारच झालें, तर आपल्या देशाचें कल्याण चिंतितो, ज्ञानी पुरुषाला समग्र वसुंधरा स्वकीय कुटुंबवत् वाटत असून त्याच्या ज्ञानाचा फायदा सर्व मनुष्यतेस होतो. ज्योतिष्यांनीं, पदार्थवेत्त्यांनीं, राज्यशास्त्रकर्त्यांनीं, व तार्किकांनीं केलेल्या शोधांचा प्रसार पृथ्वीच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत होऊन त्यापासून होणाऱ्या फायद्याचे भागीदार थोड्या कालांत सर्व राष्ट्रें होतात; व अशा रीतीनें आपल्या हातून जगाचें कल्याण होत आहे, असें मानण्याचा अधिकार ज्यांना प्राप्त झाला असेल, त्यांच्या मनास होणाऱ्या समाधानाची खरी थोरवी, आणि त्याचें खरें स्वरूप कोण सांगूं शकेल ? द्रव्य, स्त्री, भूमि इत्यादिकांच्या प्राप्तीसाठीं अहर्निश अश्रांत परिश्रम करणाऱ्याच्या मनास जसें स्वास्थ्य असत नाहीं, त्याप्रमाणें एखादा बिकट शास्त्रीय प्रश्न सोडविण्यांत व्यग्र झालेल्याच्या मनासही स्वास्थ्य असत नाहीं. पण पहिल्याच्या आणि दुसऱ्याच्या अस्वास्थ्यांत विलक्षण अंतर असतें. पहिल्याच्या अस्वास्थ्यांत कधीं भीति, कधीं मत्सर, कधीं दुर्लौकिक, या दुष्ट मनोविकारांचें मिश्रण असतें. विद्वानाचें अस्वास्थ्य या विकृतींपासून अत्यंत निर्लेप असतें. ऐहिक वस्तूंस अविनाशी मानून त्यांवर अमर्याद प्रेम ठेवणाऱ्या अज्ञान प्रापंचिकास त्यांचा वियोग झाला असतां अनन्वित दुःख होतें. विद्वानास अशा वस्तूंचा संयोग आणि वियोग अपायकारक होत नाहीं; कारण त्यांच्या क्षणभंगुरत्वाविषयीं त्याची खात्री झाली असल्यामुळें, तो त्यांच्याविषयीं उदासीन असतो. गुरेंराखी गुरें हाकतात, पंतोजी मुलांस धाकांत ठेवतात, व जुलमी राजे प्रजेस आज्ञेंत ठेवितात. पण चाबकानें, काठीनें, किंवा तरवारीनें अंमल चालविण्यांत मनुष्यास फारसें भूषण आहे, असें नाहीं. ज्यानें आपल्या बुद्धिसामर्थ्यानें व साधुत्वानें जगास वश केलें, तो खरा शास्ता; व त्याचा अंमल खरोखर भूषणावह होय. तसेंच अंमल करणाऱ्यांस जें समाधान होतें, व जें मोठेपण वाटतें, तें ज्या तऱ्हेच्या प्रकृतींवर अंमल करावयाचा

असेल त्यांच्या योग्यतेप्रमाणें कमी अधिक होतें. दुर्बुद्ध जनावरांवर, अज्ञान मुलांवर व भित्र्या प्रजेवर अंमल करणाराची थोरवी काय, व त्यांना समाधान कसलें होणार? कॉमटी, मिल्ल, शंकराचार्य यांसारख्या पंडितांनीं राज्यविषयक, नीतिविषयक, व धर्मविषयक वादांत मिळविलेला जय, आणि व्यवहारज्ञ, शास्त्रज्ञ, व धर्मज्ञ यांच्या मनांवर बसविलेला अंमल यांस मात्र जय आणि अंमल हीं नांवें यथार्थ आहेत. पण या सर्व पराक्रमांहून ज्ञानाचा आणखी एक पराक्रम आहे, त्यापुढें बाकीचे सारे निस्तेज दिसूं लागतात. ज्ञानाच्या योगानें मनुष्यास मृत्यूचें भय नाहींसें होतें. अज्ञान मनुष्यास प्रत्येक बाह्य वस्तु अविनाशी वाटत असून तिजवर त्याचें उत्कट प्रेम जडलेलें असतें. यामुळें तिचा आणि त्याचा वियोग झाला, तर त्याला पराकाष्ठेचें दुःख होतें. कोणत्याही वस्तूच्या वियोगापासून होणारें दुःख त्या वस्तूवर असलेल्या प्रेमाच्या मानानें होतें. धनलोभ्यास पैसा बुडाला असतां, भार्यारतास भार्येचा वियोग झाला असतां, पुत्रवत्सलास पुत्रास मृत्यु आला असतां, अत्यंत दुःख होतें. पण ज्याला या सर्व वस्तु विनाशी आहेत, असें ज्ञान झालें आहे, त्याला त्यांच्या वियोगापासून इतका खेद होत नाहीं. ज्याला आरंभ व वृद्धि आहे, त्याचा केव्हां तरी ऱ्हास झालाच पाहिजे, हें तत्त्व ज्याच्या मनांत पूर्णपणें खिळलें असेल, त्याला आप्तांच्या मरणाचेंचसें काय, पण स्वतःच्या मरणाचें सुद्धां भय वाटेनासें होईल. फुटणारें केव्हां तरी फुटणार, जळणारें जळणार, मोडणारें मोडणार, व मरणारें मरणार. मृत्तिकेचा घट फुटला म्हणून ज्याप्रमाणें शोक करीत बसणें नीट नाहीं, त्याप्रमाणें पंचमहाभूतांपासून निर्माण झालेला देह फिरून पंचतत्त्वास मिळाला, म्हणून शोक करण्यांत अर्थ नाहीं. ज्याप्रमाणें तेल सरलें, कीं दिवा मालवलाच पाहिजे, त्याप्रमाणें ज्या कारणांच्या संयोगानें जीवित्वास आरंभ होऊन त्याचें वर्धन होत असतें, त्यांचा वियोग झाला कीं देहावसान झालेंच पाहिजे. ज्याच्या अंतःकरणांत कार्यकारणांचा अन्योन्य संबंध नीट बिंबून गेला, त्याला मृत्यूची फारशी भीति वाटावयाची नाहीं. हा संबंध समजण्यास ज्ञानाशिवाय दुसरें साधन नाहीं.

याशिवाय ज्ञानाचें आणखी एक असाधारण सामर्थ्य आहे, तें हें, कीं त्याच्या योगानें मनुष्यास एक प्रकारचें अमरत्व प्राप्त होतें. व्यासवाल्मीकि, मनुयाज्ञवल्क्य, बुद्धशंकराचार्य, ख्रिस्तसाक्रेटीस हे ज्ञानवान सत्पुरुष होऊन गेल्यास अनेक वर्षे लोटलीं; पण त्यांच्या नांवाचा विसर जगास अजून पडला नाहीं, व पुढेंही, पडेल असें वाटत नाहीं. कीर्तिरूपानें हे निरंतर राहणार. जुने ग्रीक लोक गेले; पण होमर,

डिमॉस्थेनीस, आणि ॲरिस्टॉटल हे अद्यापि आहेत. जुने रोमन लोक गेले; पण व्हर्जिल, सिसरो आणि जस्टीनिअन हे अद्यापि आहेत. पृथ्वीतलावर मनुष्याची उत्पत्ति झाली, त्याच वेळीं ज्ञाननदी उगमस्थानीं अतिसूक्ष्मरूपानें आविर्भूत झाली. तेव्हांपासून आतांपर्यंत तिचें पात्र ठिकठिकाणचे प्रवाह त्यांत येऊन मिळाल्यामुळें वाढत चाललें आहे, व त्यांत प्रत्येकाच्या विशिष्ट वर्णाची कांति मधून मधून स्पष्टपणें दृग्गोचर होत असल्यामुळें, त्याला अत्यंत स्पृहणीय वैचित्र्य व रमणीयत्व आलें आहे. कालांतरानें या ज्ञाननदीस महानदत्व प्राप्त होऊन ती अनंतसहस्रमुखांनीं सुखोदधीस जाऊन मिळेल, अशी विचारशील मनांस भावना होते.

[वर्ष ७, अंक १८,१९,२०.]

अप्रतिबंध व्यापार आणि उत्तेजन

१८८० चे डिसेंबर महिन्याच्या २९ व्या तारखेस लांक्यास्टर येथील व्यापाऱ्यांनीं तेथून हिंदुस्थानांत येणाऱ्या मालावरील जकात उठविण्यासाठीं आपल्या वतीनें बोलणें लावण्याकरितां, हिंदुस्थानचे सेक्रेटरी लार्ड हार्टिंगटन यांजकडे कांहीं मंडळीस पाठविलें होतें. मागें लार्ड सालिसबरी व क्रानब्रूक हिंदुस्थानचे सेक्रेटरी असतांना या व्यापाऱ्यांनीं असेंच बोलणें लावून, आपले माजी व्हाइसरॉय लार्ड लिटन यांजकडून जाड्या कपेड्यावरील जकात उठवून घेतली. ही लांक्याश्टियन व्यापाऱ्यांची खटपट किती वर्णनीय आहे बरें ? अशी खटपट करणें आमच्या व्यापाऱ्यांना फारच अवश्य आहे. देशी व्यापाराला उत्तेजन देण्यासाठीं कैलासवासी गणेश वासुदेव जोशी यांनीं आपल्या वयाच्या उत्तरार्धांत जी मेहनत केली, ती फार वंद्य होती. देशी कपडे वापरल्यानें देशी व्यापाराला एक प्रकारें उत्तेजन मिळून तो भरभराटीस येण्याचा संभव आहे; पण येवढ्यानेंच आपला इष्टहेतु खात्रीनें तडीस जाईल असें नाहीं. पूर्वी आयातजायात जकातीच्या संबंधानें अमेरिका खंडांत खूप तंटे झाले, व इंग्रज लोकांचें तेथील राज्य नष्ट होण्यास, व अमेरिकन लोकांना स्वातंत्र्य मिळण्यास, तेच बऱ्याच अंशीं कारण झाले. भांडण सुरू झाल्यावर इंग्रजी कपडे न वापरण्याचा, व इंग्रजी कोणताही माल विकत न घेण्याचा त्यांनीं निश्चय केला; व एकदां बोस्टन येथील लोकांनीं इंग्लंडाहून आलेलीं चहाचीं जहाजेंच्या जहाजें बुडवून टाकलीं !! या इतिहासप्रसिद्ध गोष्टी जाणणें फार महत्त्वाचें आहे, व त्यांची माहिती आम्ही आपल्या वाचकांस प्रसंगविशेषीं सवडीनुसार देऊं. आज अप्रतिबंध व्यापार म्हणजे काय, यासंबंधानें लिहिण्याचा आमचा विचार आहे. हा अर्थशास्त्रांतला विषय आहे, व व्यापारासंबंधानें फार उपयोगाचा आहे. यासाठीं आमचे वाचक इकडे विशेष लक्ष देतील अशी आशा आहे.

प्रथम अप्रतिबंध व्यापार म्हणजे काय हें सांगावयाचें. अप्रतिबंध या शब्दाचा अर्थ उघडच आहे, कीं एकाद्या मनुष्याला, किंवा राष्ट्राला, हवा तो जिन्नस, पाहिजे त्या देशांतून, पाहिजे त्या देशांत, व्यापारासाठीं नेण्यास, आणण्यास, व विकण्यास—कोणत्याही प्रकारचा अटकाव नसला, म्हणजे अप्रतिबंध व्यापार होतो. पुष्कळ जिनसांच्या संबंधानें देशांतल्या देशांत जसा अप्रतिबंध व्यापार चालतो,तसा निरनिराळ्या देशांत

किंवा द्वीपांत देखील चालतो. फ्रान्स देशांतील कित्येक जिन्नस जकात वगैरे न देतां इंग्लंडांत विकले जातात, व कित्येक इंग्रजी जिन्नस अशाच रीतीनें फ्रान्स-देशांत विकले जातात, व असें केल्यानें दोनही देशांचा फायदा होतो. ज्या देशांत जो माल थोड्या कष्टानें, थोड्या पैशानें, व थोड्या वेळांत उत्पन्न होतो, तोच माल उत्पन्न करण्याकडे त्या देशाचें भांडवल गुंतून रहातें. तोच माल दुसऱ्या देशांत उत्पन्न करण्याची खटपट केली, तर फार नुकसान होतें. जसें सुतारानें लोहारकाम केलें, तर त्यास कांहीं एक फायदा होणार नाहीं, त्याप्रमाणेंच देशा-देशाच्या संबंधाचा विचार आहे. इंग्लंडांतील लोक नारळ किंवा कापूस उत्पन्न करून हिंदुस्थानांत विकण्यास आणतील, तर त्यांचें केवढें नुकसान होईल ! येथें कृत्रिम बर्फ करून आम्हीं इंग्लंडांत विकण्यास नेल्यास, आमचीही तीच दशा होईल. सारांश, ज्या देशांत जो माल थोड्या आयासानें व खर्चानें उत्पन्न होतो, तो त्याच देशांत उत्पन्न होऊन, सदर्हूप्रमाणें दुसऱ्या देशांत थोड्या आयासानें व उत्पन्न होणाऱ्या मालाशीं बदल झाला तर दोनही देशांचा नफा होतो. कधीं कधीं तर असें होतें कीं, दोनही जिनसा फार जरूरीच्या म्हणजे जीवरक्षणास अत्यावश्य असतात. अशा वेळीं अशा प्रकारची अदलाबदल, तर उभयपक्षांस फारच हितावह असते. असें होण्याचें कारण श्रमविभाग हें होय. ज्यास जें काम झेंपेल, तें त्यानें उचलल्यानें, जसें तें बरोबर उठेल तसाच प्रकार मालाच्या उत्पन्नाचा होय. इंग्लंडांतील कित्येक बडे व हौशी लोक आपल्या बागांत कांचेचीं घरें करून त्यांत नारळीचीं झाडें लावितात, व त्यांचें पोषण होण्यासाठीं चोहोंकडून वाफ ठेवितात !! अशा तऱ्हेनें उत्पन्न केलेला पदार्थ हौसेनें टेबलावर मांडून ठेवून, ज्याला त्याला दाखविण्याच्या मात्र उपयोगी. व्यापारांत त्याचा कवडीचा देखील उपयोग नाहीं. तर अशा प्रकारें ज्या ठिकाणच्या त्या ठिकाणीं जिनसा उत्पन्न होऊन, मग अदलाबदल झाल्यानें जो व्यापार होतो, व जो व्यापार चालला असतां त्यावर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जकाती वगैरे कांहीं एक पडत नाहींत, तो अप्रतिबंध व्यापार म्हणावयाचा. हा विचार करीत असतां, छोटेखानी रस्त्यावरील जकाती हिशेबांत धरावयाच्या नाहींत. दुसऱ्या देशांतील माल आपल्या देशांत येऊं नये, थोडा बहुत आलाच तर तो आणून विकणारास फार फायदा होऊं द्यावयाचा नाहीं, अशा बुद्धीनें ठेविलेली जी आयातजकात ती या अप्रतिबंध व्यापाराला मोठी बाधक होते. आतां कोणी असें म्हणतील, कीं असा प्रतिबंध केल्यापासून फळ काय, व असा प्रतिबंध

चालेल काय ? याचें उत्तर असें कीं, अशा प्रतिबंधाचें फळ नुकसान. ही व असा प्रतिबंध फार वेळ टिकत नाहीं. हेंही खरें, तथापि अज्ञानामुळें प्रत्येक देशास असें वाटत असतें कीं, आपला माल दुसऱ्या देशांत फार खपावा, व तेथला आपल्याकडे थोडा यावा. असें समजूं कीं, लोखंडाच्या चारशें मणांबरोबर गव्हांचीं चारशें पोतीं आहेत. गहूं हिंदुस्थानांतून इंग्लंडास जातात, व लोखंड इंग्लंडाहून हिंदुस्थानांत येतें. आणखी असें समजूं कीं, लोखंडाच्या एका मणाला पांच रुपये पडतात, तितकेच रुपये गव्हाच्या एका पोत्याला पडतात. या मानानें चारशें पोत्यांचा हिशेब केला तर दोन हजार रुपयांची देवघेव होते, हें स्पष्टच आहे. आतां आम्ही लोखंडावर दरमणीं एक रुपया जकात बसविली, व ती जकात देऊनही इंग्लंडानें जर आम्हांला पूर्वीच्या किंमतीनें आपले मण विकले, तर आमच्या दोन हजार रुपयांच्या किंमतीच्या गव्हांच्या चारशें पोत्यांबद्दल दोन हजार रुपयांच्या किंमतीचें चारशें मण लोखंड मिळून, शिवाय जकातीबद्दल चारशें रुपये मिळाले, म्हणजे आमच्या दोन हजारांबद्दल आम्हांला दोन हजार चारशें रुपये मिळाले. ही जकात आम्हीं ठेविली नसती, तर इंग्लंडला या चारशें रुपयांबद्दल आणखी ऐशी पोतीं मिळालीं असतीं. किंवा गव्हांची गरज नसल्यास ते रुपये दुसऱ्या कामास लावण्यास सांपडले असते. वरील तऱ्हेनें अदलाबदल झाल्यानें आमचा फायदा झाला, व नुकसानीचा सर्व बोजा इंग्लंडावर पडला. बरें असें नुकसान सोसून इंग्लंड हिंदुस्थानाशीं व्यापार करील काय ? होय, कांहीं प्रसंगीं करील; गव्हांच्या चारशें पोत्यांशिवाय इंग्लंडाचें चालत नसल्यास, किंवा दुसरीकडे मिळत असलीं तरी, येथल्यापेक्षां महाग पडत असल्यास, इंग्लंड तीं आम्हांपाशींच खरेदी करील. पण असा धंदा कोठवर चालणार ? जोंपर्यंत इंग्लंडाला तितकीं पोतीं पाहिजेतच, किंवा दुसरीकडे स्वस्त दरानें तीं मिळत नाहींत तोंपर्यंत. हा विचार करितांना असेंही धरिलें आहे कीं, इंग्लंडाच्याच लोखंडाची आम्हांला परवा नाहीं. इंग्लंडानें आम्हांस तें दिलें नाहीं, तर तें आम्हांला दुसरीकडे तितक्याच दरानें मिळणार आहे. पण आतां अशी जर कल्पना केली कीं, हें लोखंड आम्हांस दुसरीकडे मिळत नाहीं, किंवा त्याच्याशिवाय आमचें चालत नाहीं, तर इंग्लंडलाही आमच्याप्रमाणेंच जकात बसवितां येईल. व दोघांनीं एकमेकांवर जकाती बसवून जिन्नस महाग केल्यानें कोणाचाच नफा न होतां, भांडवल अडून राहिल्यामुळें दोघांचेंही नुकसान होतें; या करितां अशा स्थितींत अप्रतिबंध व्यापार असणें हेंच फार चांगलें. असें जरी आहे

तरी देशाचा विचार करीत असतां, केवळ व्यापाराकडेच दृष्टि ठेवून चालत नाहीं. आणखी पुष्कळ दुसऱ्या गोष्टी डोळ्यांपुढें ठेवाव्या लागतात. पुनः एखादे वेळेस असें होईल कीं, आज जो जिन्नस आमच्या देशांत फार आयासानें आणि खर्चानें उत्पन्न होत असेल, तोच कांहीं युक्तीनें दुसऱ्या देशांपेक्षां देखील थोड्या आयासानें व थोड्या खर्चांत उत्पन्न करतां येण्याचीं चांगलीं चिन्हें दिसत असतील; अन्नें खरोखर असलें तर अप्रतिबंध व्यापार कधीं कधीं देशाच्या नुकसानाला कारण होतो. अशा स्थितींत परक्या देशांतून येणाऱ्या मालावर खूप जकात ठेवल्यानें घरच्या मालास उत्तेजन मिळतें. तें उत्तेजन म्हणजे काय, तें केव्हां व किती द्यावें ? तें दिल्यानें नुकसान कोणाचें होतें ? व्यापारदृष्ट्या नुकसान होत असतां कोणत्या जिनसा आपल्या आपण उत्पन्न कराव्या, व असें करण्याचा काय परिणाम होतो ? अप्रतिबंध व्यापार चालण्यास कोणत्या गोष्टी अवश्य आहेत ? वगैरे प्रश्नांचा विचार पुढल्या निबंधांत करूं.

आम्हीं अप्रतिबंध व्यापार म्हणजे काय हें सांगितलें; आज उत्तेजन म्हणजे काय ? तें केव्हां द्यावें ? तें दिल्यानें काय होतें ? व कोणत्या वस्तूंच्या संबंधानें अप्रतिबंध व्यापार चालूं देणें ठीक नाहीं, वगैरे गोष्टींची थोडक्यांत फोड करण्याचा आमचा विचार आहे. आपल्या देशाच्या संबंधानेंच पहातां असें लक्षांत येईल कीं, येथील शेतकरी लोकांची जी इतकी वाईट स्थिति झाली आहे, तिला कारण आमच्या देशांत शेतकीखेरीज इतर धंदे जसे चालावे तसे चालत नाहींत. बहुतेक गरीब लोक शेतकीचा धंदा करितात. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी वगैरे युरोपांतील राष्ट्रांत इतर धंदे करणाऱ्या लोकांपेक्षां शेतकीचा धंदा करणाऱ्या लोकांची संख्या फार कमी आहे; त्यामुळें सर्व प्रकारच्या मजूरदारांस सरासरीनें वेतन सारखें मिळतें इतकेंच नाहीं, तर निरनिराळ्या धंद्यांत मजूर लोकांची संख्या वाढून गेली असल्यामुळें, एकाच धंद्यांत गर्दी होत नाहीं; व 'काम थोडें आणि तें करणारे फार' असें झाल्यानें चढाओढीमुळें जसा मजुरीचा भाव अगदीं उतरून जातो, तसें होत नाहीं. पण आमच्या येथील कांहीं विलक्षणच तऱ्हा!! जो उठणार तो शेतकी करणार ! सुतार, लोहार, वगैरे कांहीं कामगार, कांहीं सरकारी नोकर, कांहीं सावकार, व फार थोडे इतर धंदा करणारे, यांखेरीज इतर सर्व शेतकरी!! अशानें आमचा निभाव लागणार कसा ? बिघा दोन बिघे शेतांत दोन तीन कुळवाडी व त्यांचीं बायकापोरें

इतक्यांस काम कोठून सांपडणार ? त्या विघ्यांच्या उत्पन्नावर इतक्या माणसांचा गुजारा कसा होणार ? व जनावरांचें जतन कसें निभणार ? एकदां मळणी होऊन धान्य घरीं आल्यावर खरीपाचीं विकें करणारांनीं पुनः पेरणीच्या दिवसांपर्यंत काय करावें ? सगळ्या कामाची झंगड काय ती लागणीच्या आणि काढणीच्या वेळेस. राखण, भांगलण वगैरे क्षुल्लक कामांस फार मनुष्यांची अवश्यकता आहे असें नाहीं. यावरून वाचकांच्या इतकें लक्षांत येईल कीं, आपल्या शेतकऱ्यांपैकीं बहुतेकांना वर्षांतून शेतांत फार झालें तर चांगलें काम चार किंवा ५ महिने सांपडतें. बाकीच्या महिन्यांत पदरमोड करून रहावें लागतें. ही बागाईत करणारांची गोष्ट नव्हे, येवढेंही पण लक्षांत ठेविलें पाहिजे. कापूस निघून मुंबईत गिरण्यांचें काम झपाट्यानें चालू झालें म्हणजे इलाख्यांतील निरनिराळ्या जिल्ह्यांतील लाखों लोक पोट भरण्याकरितां मुंबईस जातात, हें पुष्कळांना माहीत असेलच. यावरूनच हें सिद्ध होतें, कीं या लोकांना आपापल्या घरीं कांहीं एक काम नाहीं म्हणून परक्या ठिकाणीं रोजगारासाठीं जावें लागतें. हें तर एक असूंच द्या. पण कित्येक ठिकाणीं अशी वाईट स्थिति आहे कीं, सारा फार वाढल्यामुळें तो शेतीवर न फिटतां कर्ज काढून द्यावा लागतो, व मुंबईसारख्या शहरीं जाऊन दोन पैसे मिळवून तें कर्ज फेडावें लागतें !! अशा प्रकारची शेतकी काय कामाची ? शेतकऱ्यांची वाईट स्थिति होण्यास कित्येक ठिकाणीं सारा अति जबर झाला आहे, व तो वसूल करण्याची तऱ्हाही फार जारीची आहे हें खरें, तथापि मुख्य कारण आमच्या मतें शेतकीकडे पाहिजे आहेत त्यापेक्षां अधिक लोक आहेत हें होय. तर मग आतां याला उपाय काय करावा ? दुसरे धंदे काढावे हाच. पण हे निघतात कसे व चालतात कसे याचा विचार केला पाहिजे. आधीं आमच्या लोकांत व्यापारानिमित्त मोठमोठे भाग एके ठिकाणीं करून भांडवल उभारण्याची चाल नाहीं म्हणा, किंवा माहिती नाहीं म्हणा, किंवा भरंवसा नाहीं म्हणा. असो, कशी तरी खटपट करून एखादा धंदा सुरू करण्यापुरतें भांडवल जमा झालें तरी तो धंदा पुढें सतत चालणार कसा ? समजा, उद्यां कांहीं मंडळीनें दोन चार लाख रुपये गोळा करून पुण्यांत एक सूत काढून कापड विणण्याची गिरणी काढली. आतां तिचें काम सुरळीत चालण्यास विघ्नें किती आहेत तीं पहा. प्रथम गिरणीचें यंत्र इंग्लंडाहून आणावयाचें; तें आणून मांडण्यास, जोडण्यास, मोडण्यास, नीटनेटकें करण्यास, व नित्य त्यावर देखरेख ठेवण्यास पुष्कळ पगाराचा कोणी वाकबगार युरोपियनच ठेवला पाहिजे. पुनः गिरणींत हलक्या कामावर मनुष्यें लावायाचीं त्यांना तें काम

चांगलें माहीत नाहीं, तीं तयार होईपर्यंत पुष्कळ नुकसान यावयाचें, कापड वाईट निघावयाचें, व त्यामुळें तोटा होण्याचा बळकट संभव. असलें कापड घेणार कोण व धंदा चालणार कसा ? येथेंच कापूस पिकतो हें खरें, मजुरी कमी पडते हेंही खरें, लोकही उद्योगी असून कांहीं दिवसांनीं हुशार होतील हें खरें, तरी आज त्यांच्या हातून सुबक कापड निघणार कसें, व बाहेरून येणाऱ्या सफाईदार कापडाशीं त्याच्यानें टक्कर मारवणार कशी ? कापसाचा व्यापार कांहीं दिवसांनीं चांगल्या भरभराटीस येण्याचीं बळकट चिन्हें दिसत असलीं, तरी आज होणारें नुकसान कोणीं सोसावें ? व बाहेरून येणारा सवंग व सफाईदार कपडा टाकून, घरचा खरा पण महाग आणि वेढब कपडा घेतो कोण ? बाहेर देशांतील बारीक कपडा स्वस्त दरानें मिळत असतां घरच्या गिरण्यांस उत्तेजन देण्यासाठीं जे त्यांतच काढलेला ओबडधोबड व महाग कपडा घेऊन वापरतील ते मोठे देशाभिमानी, तसेंच शहाणे, व दूरदृष्टि खरे, व अशा प्रकारची हिंमत आणि अशा प्रकारचा आपलेपणा लोकांत उत्पन्न करण्याविषयीं ज्या कैलासवासी गणेश वासुदेव जोशांनीं आमरण खटपट केली, व आपल्या शब्दाप्रमाणें आपलें वर्तनही ज्यांनीं ठेविलें, ते खरोखरीच धन्य. पण असे लोक किती सांपडणार ? थोडक्यांत गुळगुळीत मिळणारें कापड सोडून जाडाभरडा देशी कपडा वापरण्यास निघणारे असे या दुर्भाग्य आर्यावर्तांत निःसीम देशाभिमानी किती निघणार आहेत ? बरें, असें केल्यानें देशाचें हित होतें असें तरी किती जणांस कळत आहे किंवा कळणार आहे ? जोशीबोवांचा उद्योग जरी स्तुत्य होता, तरी त्याच मार्गानें शेवटास जाणारा नव्हता, व गेलाही नाहीं. व अशा रीतीनें कोणत्याही धंद्यास साधारणतः उत्तेजन मिळूं शकत नाहीं. त्याला उत्तेजन देण्याचा मार्ग निराळाच आहे. अशी कल्पना करा कीं, इंग्लंडचा जाडी मांजरपाट दरवारास येथें दोन आणेप्रमाणें पडतो, व येथें तयार केलेला तसल्याच जातीचा मांजरपाट दरवारास अडीच आणे प्रमाणें पडतो, तर हिंदुस्थानांत तो दोन आण्यांप्रमाणें पडूं लागेपर्यंत, इंग्लंडचा कपडा येथें मुळींच विकला न जाण्यास काय उपाय करावा ? कपडा एकाच जातीचा पण किंमतींत अर्ध्या आण्याची तफावत. याला साधा उपाय एकच आहे. इंग्लंडचा कपडा वारीं पावणेतीन आणे येथें जर पडूं लागला तर तो कोणी घेणार नाहीं. पण हें कशानें होईल ? इंग्लंडांतून हिंदुस्थानच्या बंदरांत त्याचीं जहाजें भरून आलीं कीं त्यावर खूप जकात ठेविल्यानें !! इतकी जकात ठेविली पाहिजे कीं, इंग्लंडच्या व्यापाऱ्यास निवळ नुकसान करून घेतल्याशिवाय पावणे-

तीन, निदान अडीच, आण्यांखालीं तर तो विकतांच येऊं नये. पण अशी जकात ठेवणें सरकारच्या हातांत!! हिंदुस्थानांत कापडाच्या गिरण्यांचा फैलाव करणें खरोखरीच सरकारच्या मनांत असतें, व लांक्यास्टर आणि मांचेस्टर येथील धनिक व्यापाऱ्यांच्या धनांत भर टाकण्यापेक्षां गरीब हिंदू व्यापाऱ्यांची अधिक कळकळ असती, तर हिंदुस्थान देशांत गिरण्यांचे कारखाने कधींच स्थापन झाले असते.

मागें असें सांगण्यांत आलेंच आहे कीं, जर एका देशांतला माल दुसऱ्या देशांत जाऊन तेथील मालास बाजारांतून हुसकावून देत असेल, तर तसें न होण्यास उत्तम उपाय म्हटला म्हणजे बाहेरून येणाऱ्या मालावर जबर जकात ठेवायाची, व तो अगदीं महाग करून टाकावयाचा. या जकातीनें दोन प्रकारचा नफा होतो. एकतर सरकारी तिजोरींत थोड्या श्रमानें पुष्कळ पैसा येतो. व दुसरा नफा असा कीं, बाहेरील माल येण्याचें बंद झाल्यानें देशांतील मजुरांस कामकाज मिळून त्यांचा निर्वाह चालतो. इतकेंच नाहीं, तर ते आपआपल्या कामांत निष्णात झाले म्हणजे देशांतल्या देशांत लागणारा माल ते तेव्हांच उत्पन्न करून टाकितात, व त्यापेक्षां अधिक निघालेला माल परदेशांशीं व्यापार करण्याच्या कामीं उपयोगी पडतो. व असें झाल्यानें असें करणाऱ्या देशाचें हित होतें इतकेंच नाहीं, तर बाकीच्या सर्व देशांचेंही हित होतें. अलीकडे इंग्लंडांत प्रसिद्ध अर्थशास्त्रवेत्ते म्हणजे प्रोफेसर फासेट साहेब यांनीं या शास्त्रावर फार परिश्रम केले आहेत, व त्यावर नांवाजण्यासारखे एक दोन ग्रंथही लिहिले आहेत. यांची पत्नीही यांच्याप्रमाणेंच विदुषी आहे. तिनें साधारण प्रतीच्या वाचकांकरितां अर्थशास्त्राचें पुस्तक लिहिलें आहे. मि० फासेट यांस हिंदुस्थानचा मोठा अभिमान व कळवळा आहे, हें आमच्या सर्व वाचकांस माहीत असेलच. हिंदुस्थानची जमा, हिंदुस्थानचा खर्च, येथील व्यापार, कर, लोकस्थिति–यांविषयीं त्यांना खडान्‌खडा ठाऊक आहे. असें जरी आहे, तरी अर्थशास्त्राच्या संबंधानें एका बाबतींत त्यांचा जो हट्ट आहे तो ते कांहीं केल्यानें सोडीत नाहींत. तो हट्ट प्रस्तुत प्रश्नाच्या संबंधानें आहे. मि० फासेट यांचें असें मत आहे कीं, सर्व राष्ट्रांमध्यें नेहमीं अप्रतिबंध व्यापार चालावा. ज्या दोन देशांत अप्रतिबंध व्यापार चालत नाहीं, त्या दोहोंचेंही एकसारखें नुकसान होतें. बाहेरून येणाऱ्या मालावर जकात ठेवून किंवा दुसऱ्या कोणत्याही तऱ्हेनें घरच्या मालास उत्तेजन देणें हें अहितकारक होय. अप्रतिबंध व्यापारानेंच इंग्लंड श्रीमंत झालें. घरच्या

मालास उत्तेजन देणें बंद केल्यामुळेंच विलायतसरकार युरोपांतील बाकीच्या सरकारांची ब्यांक होऊन बसलें आहे. या मतांचें प्रतिपादन ते फार दिवस करीत आले आहेत, व या प्रश्नावरच त्यांनीं एक निराळा ग्रंथ लिहिला आहे. त्याचें नांव "फ्रीट्रेड आणि प्रोटेक्शन" म्हणजे "अप्रतिबंध व्यापार आणि उत्तेजन" असें आहे. थोड्या वर्षांपूर्वी इंग्लंडांत मि. मिल्ल या नांवाचा फार विचारी, फारच प्रसिद्ध ग्रंथकार होऊन गेला. त्यानेंही अर्थशास्त्रावर एक सर्वोत्कृष्ट ग्रंथ लिहिला आहे, त्यांत या प्रश्नाच्या संबंधानें लिहीत असतां असें लिहिलें आहे कीं, जर एका देशांत दुसऱ्या देशापेक्षां एकादा जिन्नस उत्पन्न करण्याचीं साधनें स्वस्त आणि विपुल असलीं, पण त्या दुसऱ्या देशांत तो जिन्नस फार पूर्वीपासून उत्पन्न होत असल्यामुळें, किंवा त्या देशांतील लोकच पहिल्या देशांतील लोकांपेक्षां सुधारणेच्या कामांत पुढें असल्यामुळें, जेथें तो अधिक स्वस्त रीतीनें उत्पन्न व्हावा तेथें होत नाहीं असें असेल, त्यावेळेस नीट विचार करून व मागेंपुढें पाहून, व कांहीं दिवस उत्तेजन दिलें असतां बाहेरून येणाऱ्या मालापेक्षां घरीं तो स्वस्त पडेल इतकेंच नाहीं, तर दुसऱ्या देशास तितक्याच दरानें विकतां येईल असें नीट रीतीनें ठरवून बेधडक उत्तेजन द्यावें, जसजसे लोक तयार होत जातील, व माल चांगला निघत जाईल, तसतसें उत्तेजन काढून घ्यावें; आणि अगदीं बाहेरच्या मालासारखा माल निघूं लागला कीं तें अगदीं बंद करावें, असे मि. मिल्ल साहेबांचे विचार आहेत.

अर्थशास्त्राच्या संबंधानें मि. फासेट साहेबांचे बहुतेक विचार मि. मिल्ल साहेबांसारखेच आहेत, पण या उत्तेजनाच्या बाबतींत मात्र त्यांचें तेढें पडलें आहे, तें कांहीं केल्यानें सुटत नाहीं. या शास्त्रावर लिहिणाऱ्या पुष्कळ अमेरिकन ग्रंथकारांनीं असें स्पष्ट म्हणून ठेविलें आहे कीं, या संबंधानें मि. मिल्ल यांचे विचार अगदीं बरोबर आहेत, व मि. फासेट यांचा व्यर्थ दुराग्रह आहे. हें त्यांनीं उगीच शब्दपांडित्यानें स्थापिलें आहे असें नाहीं. अमेरिकेंतील व्यापाराचे हिशेबाचे खर्डे नीट तपासून पाहून त्यावरून उत्तेजन देणें बरोबर दिसल्यावरून ते मि. फासेट यांस हट्टी असें म्हणतात. देशाला श्रीमंती येण्याला पुष्कळ कारणें असतात. अप्रतिबंध व्यापार सुरू केल्यानें इंग्लंड देश श्रीमंत झाला, व उत्तेजन देत बसल्यानें युरोपांतील बाकीचे देश इंग्लंडापेक्षां गरीब राहिले, हें मि. फासेट यांचें म्हणणें अगदीं एकतर्फी आहे. सगळ्या इंग्लंडाच्या भोंवतीं समुद्रकिनारा असल्यामुळें इंग्लंडचीं जहाजें युरोपांतील इतर देशांपेक्षां पुष्कळ असून चांगलीं आहेत. हिंदुस्थान देश इंग्लंडाच्या

ताब्यांत असल्यामुळें इंग्लंडास प्रतिवर्षी जो फायदा होत आहे, तसा आतां दुसऱ्या कोणत्याही देशास होत नाहीं. अलीकडे कोणत्याही देशाची भरभराटी होण्यास यांत्रिकशक्ति पुष्कळ अंशीं कारण होते. व या यांत्रिकशक्तीचे जीवनभूत जे दोन पदार्थ लोखंड आणि कोळसे त्यांच्या विपुल खाणी इंग्लंडांत आहेत. याप्रमाणें इंग्लंडच्या अभ्युदयाला अनेक कारणें आहेत. मि. फासेट यांचें आतां काय म्हणणें असेल तें असो. पण थोड्या वर्षांपूर्वी इंग्लंडानें स्पेनाच्या लोंकरीवर आणि फ्रान्साच्या दारूवर जबर जकात ठेविली होती इतकेंच नाहीं तर पदरचे पैसे भरून हेच पदार्थ इंग्लिश लोक मुद्दलांत तोटा करून घेऊन इंग्लंडांत उत्पन्न करीत असत; आतां मात्र मांचेस्टर आणि लांक्यास्टर येथील व्यापाऱ्यांची तुंबडी भरण्याकरितां अप्रतिबंध व्यापाराच्या आणि उत्तेजनाच्या सव्वा सव्वा हात गप्पा आमच्यापुढें मारीत आहेत. युरोपांतील कोणत्याही देशांत बाहेरून येणाऱ्या मालावर जकाती नाहींत असें नाहीं. घरच्या कामगारांस उत्तेजन देण्यासाठीं किंवा सरकारी तिजोरी भरून काढण्यासाठीं अमेरिकेंत, फ्रान्सांत, जर्मनींत व इतर देशांत बाहेरून येणाऱ्या मालावर जकाती अद्यापि आहेत, व इंग्लंडांतही त्या अगदीं पिटाळून लाविल्या आहेत असें नाहीं. इंग्रज लोक आमच्या कल्याणाची इच्छा करितात, व तें करण्याचें त्यांच्या ताब्यांत असल्यामुळें त्यांच्यानें होईल तितकें तें करितात ही गोष्ट अनिर्विवाद आहे. पण एक लोक दुसऱ्या लोकांस जिंकून त्यांवर राज्य करीत असतां त्यांच्या हातून त्या लोकांचें जितकें चांगलें होण्याचा संभव आहे तितकेंच करूं शकतील. मनुष्यस्वभावाचें अगदीं उल्लंघन करणें हें, इंग्रेज काय आणि मुसलमान काय, कोणाच्याच हातून होणें नाहीं. हिंदुस्थानांत शेतकीच्या कामावर असावे त्यांपेक्षां फाजील लोक आहेत, त्यांना तिकडून काढून दुसऱ्या उद्योगास लाविलें पाहिजे; ते उद्योग नीट चालून त्यांत घातलेलें भांडवल बुडूं नये यासाठीं येथील कापसाच्या गिरण्यांस उत्तेजन देणें हें अवश्य आहे ही गोष्ट एकाद्या दहा वर्षांच्या पोरास देखील समजून सांगितली तर कळण्याजोगी आहे. पण आपमतलबामुळें बुद्धीला जें मांद्य येतें तें कशानें दूर होणार ? असाच मतलब साधण्यासाठीं लार्ड लिटन साहेबांनीं मागें जाड कपड्यावरील जकात उठविली, व तसें करून सरकारी जमा कमी करून घेतली तिचा बोजा नवीन कररूपानें हिंदुस्थानच्या टाळक्यावर बसला, व इंग्लंडचें कापड स्वस्त झाल्यामुळें मुंबईच्या कित्येक गिरण्या ठार बुडाल्या व त्यांत काम करणारे शेंकडों लोक अन्नास मुकले. हें अप्रतिबंध

व्यापाराचें फळ!! असलेंच फळ आम्हांस आणखी भोगण्यास लावण्याच्या हेतूनें आमचें कल्याण चिंतणाऱ्या ल्यांक्यास्ट्रिअन व्यापाऱ्यांनीं त्यांच्या कापडावरील जकात उठविण्याच्या संबंधानें बोलणें लावण्यासाठीं लार्ड हार्टिंगटन यांजकडे कांहीं मंडळीस पाठविलें होतें. या परोपकाराचें फळ आम्हांस आणखी किती भोगावें लागणार हें कळत नाहीं. आणखी एक खेप या विषयाकडे देणें जरूर दिसल्यावरून आज येथेंच पुरे करितों.

[वर्ष १, अंक ४, ५, १६.]

बहिष्कार



या शब्दाचा सामान्य अर्थ सर्वांस माहीत आहेच. सर्व लोकांच्या रिवाजाविरुद्ध कोणीं वर्तन केल्यास त्याला लोकांतून काढून टाकण्याची रीत फार पुरातन काळापासून सुरू आहे. एखादा कुजका पदार्थ जसा आपण टाकून देतों, तद्वतच लोकांनीं आपल्या मंडळींतून दुर्वर्तन करणाऱ्यास घालविलें पाहिजे. " समानशीलं व्यसनेषु सख्यं " या न्यायानें दोन विरुद्ध वस्तूंचा कधींही समागम व्हावयाचा नाहीं. त्या दोन निरनिराळ्याच ठेविल्या पाहिजेत. नाहींतर एकही सुरळीत चालणार नाहीं व हाच विचार मनांत आणून आपल्या शास्त्रकर्त्यांनीं कित्येक पातकांस सदर शिक्षा सांगितली आहे. इंग्लिश ग्रंथकारांनीं शिक्षेचे दैविक, लौकिक, व राजकीय असे जे त्रिविध भेद सांगितले आहेत, त्यांतील मधल्यांत याचा अंतर्भाव होतो. यास जें धर्माचें रूप आलें आहे तें केवळ आनुषंगिक होय. आपल्यांत धर्म व कायदा यांचें धर्मग्रंथांतून एकाच ठिकाणीं विवेचन झाल्याकारणानें आपली अशी समजूत झाली आहे. धर्मशास्त्राचें कोणतेंही पुस्तक घ्या, त्यांत मौंजीबंधनादिसंस्कारही यावयाचे, व त्यांचे बरोबर राजानें प्रजेस कसें वागवावें हेंही पण सांगितलें असतें. एकादशीचा उपास मोडल्यास प्रायश्चित्त, व चोरी केल्यास दंड हे एकेच ठिकाणीं गोंवले असतात. हल्लीं जसें लोकांच्या व राजाच्या हक्कांचें फारखत होऊन प्रत्येकाच्या हक्कांचें नियमन झालें आहे, तसा प्रकार पूर्वी नसून राजा म्हणजे देवाचा अंश, व प्रजा म्हणजे त्याचीं लेंकरें, असें समजत असत. " स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः " हाच प्रकार पूर्वीचे ग्रंथांतून आढळतो व अद्यापिही सरकार आपलें मायबाप होय अशा तऱ्हेचे उद्गार ऐकूं येतात ! अशा स्थितींत शिक्षेचें त्रिविधत्व कोणाच्याही मनांत येणार नाहीं. खरेंच आहे; रामचंद्र राजासारखा राज्यकर्ता असल्यावर ' माम्माचार्टा ' किंवा ' हेबस कार्पस ' कशास पाहिजे. पण अशी स्थिति सदोदित कोठून आणणार ? खुद्द रामचंद्रासही " ते हि नो दिवसाः गताः " असा अनुभव मिळाला, मग आपली काय कथा !

असो; तर ज्याप्रमाणें राज्यकर्त्यांत अंतर पडलें आहे, त्याचप्रमाणें पूर्वीचे राजनीतींतही फेरफार झाले पाहिजेत; " राजा कालस्य कारणम् ". भांडून घेतल्याखेरीज आतां कांहीं एक मिळणार नाहीं. अशा वेळेस लौकिक व राजकीय कामाचा

व शिक्षेचा निरनिराळा भेद होणें अवश्य होय. व तसें हल्लीं होतहीं चाललें आहे. आतां परधर्मी लोक या देशावर राज्य करूं लागल्यापासून आमचे धर्मसंबंधीं तंटे त्यांजकडे जाण्याचा संभवच राहिला नाहीं, व अशानें जरी पेशवाईतील रामशास्त्री-बुवाप्रमाणेंच आतां कलेक्टर व जज्ज यांचा अधिकार आहे, तथापि आपण अजून लग्न नोंदवीत नाहीं, किंवा घटस्फोटांचें याज्ञिकत्व करण्यास जज्ज साहेबांस निमंत्रणही करीत नाहीं ! सरकारास या कार्यांत मुळींच बोलतां येत नसल्याकारणानें, त्यास तें आमच्याकडे ठेवणें भाग पडलें आहे, व त्यासंबंधानें जे जे तंटे उपस्थित होतील त्यांचा निकालही आपणच केला पाहिजे. व निकाल झाल्यावर तो अमलांत आणण्यास शिक्षाही आपणच केली पाहिजे; यावरून एवढें ध्यानांत येईल कीं पूर्वीचे राजे सधर्मी असल्याकारणानें धर्म व व्यवहार संबंधानें जो त्यांजकडे अधिकार होता, तो परधर्मी राजे झाल्याबरोबर निराळा करावा लागला. व धर्मसंबंधीं अधिकार व निर्णय लोकांकडे, व इतर व्यवहारनिर्णय राजाकडे असा सहजच विभाग झाला. शिक्षेचाही प्रकार त्याजप्रमाणेंच होय. संस्कृत ग्रंथांत बहिष्कार शब्दाचा प्रयोग राजानें अपराध्यास नगराबाहेर घालविणें या अर्थीही केलेला आढळतो; पण आतां जेव्हां वर लिहिलेला अधिकारविभाग झाला, तेव्हां राजानें व्यावहारिक अपराधाबद्दल केलेल्या बहिष्कारास ' काळेंपाणी ' असें नूतन नांव मिळालें, व बहिष्कार शब्दाचा उपयोग धर्मप्रकरणीं होऊं लागला. वस्तुतः पाहतां बहिष्कार व काळेंपाणी यांत कांहीं एक भेद नाहीं. एक लोकरुत व दुसरा राजरुत एवढा यांत विशेष आहे. राजा ज्याप्रमाणें एखाद्यास हद्दपार करितो, त्याचप्रमाणें आपण धर्मविरुद्ध वर्तन करणारास बहिष्रुत करितों. तिकडे ज्याप्रमाणें दंड होतो, त्याचप्रमाणें इकडे प्रायश्चित्त घ्यावें लागतें. सारांश, एका देहांतशासनाखेरीज आपणांस राजाप्रमाणेंच शिक्षा करण्याचा सर्व अधिकार आहे. भेद इतकाच, कीं एक व्यवहारपरीक्षक व दुसरा धर्मपरीक्षक.

येथपर्यंत या शब्दाचे अर्थसंकोचाची, व तदनुसार लोक व राजा यांच्या अधिकारविभागाची हकीकत झाली; आतां यांच्या बलाबलाविषयीं थोडासा विचार करावयाचा. एका आंग्लभोम महा पंडितानें असें लिहिलें आहे कीं, राजकीयशिक्षेपेक्षां लौकिकशिक्षेचें आपणांस भय जास्त असतें, व राजकीयशिक्षा लौकिकशिक्षेस अनुसरून नसल्यास तीपासून कधींही फायदा होणार नाहीं. फार काय पण राजकीय शिक्षा लोकमतावरच अवलंबून असते. आपण जर उद्यां तुरुंगांत जाणें ही शिक्षा

असें मानिलें नाहीं तर राजकीय शिक्षेचा उपयोग काय होणार ? लोक आनंदानेंच तुरुंगांत जातील. याचा प्रत्यय घेण्यास फार लांब जावयास नको. गेल्या दुष्काळांत तुरुंगांत जाणें ही शिक्षा असें कितीकांस वाटलें ? आज सरकारनें पुनर्विवाह सशास्त्र आहे व त्याजपासून झालेली संततीही विभागार्ह आहे असा कायदा केला आहे, तरी आजपर्यंत किती पुनर्विवाह झाले आहेत ? राजाज्ञेचा प्रभाव लोकमतावर कधींच पडत नाहीं, व जोंपर्यंत कायदा व धर्म यांचें एकमत आहे, तोंपर्यंत दोहोंत जीव आहे. हे परस्पर विरुद्ध असले तर प्राबल्य धर्माचें म्हणजे आपलेकडे लौकिकशिक्षेचेंच असतें.

वर बहिष्कार म्हणजे काय, व त्यास हल्लींचा अर्थ कशानें प्राप्त झाला, यांचें विवेचन केलें आहे, व तसेंच परकी लोकांचें राज्य या देशांत झाल्यापासून पूर्वी जसा सर्व अपराधांचा अंतर्भाव धर्मांत होत असे, तसा न होतां धर्म व राजकीय प्रकरणें हीं निरनिराळीं होऊन धर्मसंबंधीं अपराधांबद्दल प्रायश्चित्त किंवा बहिष्काररूपी लौकिकशिक्षेचा, आणि राजकीय अपराधाबद्दल दंड, कैद, काळेंपाणी, फाशी वगैरे राजकीय शिक्षेचा, कसा उपयोग होऊं लागला, व राजकीय शिक्षेपेक्षां लौकिकशिक्षेची किती मातबरी आहे हेंही पण सांगितलें आहे. आतां हा जो लोकांचे हातांत येवढी जबर शिक्षा देण्याचा अधिकार आहे, त्याचा कोणत्या तऱ्हेनें उपयोग करितां येईल याविषयीं विवेचन करावयाचें.

जुन्या लोकांचे इतिहासावरून एक असा स्पष्ट सिद्धांत करितां येतो कीं, हल्लीं जें शिक्षेचें त्रिविधत्व आढळतें हें पूर्वापार नव्हे, तर कालेंकरून जसजशी सुधारणा होत चालली तसतसेच शिक्षेचे प्रकार होत गेले. फार प्राचीन काळीं जेव्हां राजास सर्व अधिकार असत, तेव्हां असली कांहीं भानगड नव्हती. आपल्याकडेही त्याप्रमाणेंच असे. शूद्रानें वेदपठण केलें असतां शिक्षा राजानेंच द्यावी, चोरासही त्यानेंच दंड करावा. असो, पण उत्तरोत्तर धर्माची सर्वव्यापकता जसजशी कमी होत गेली, तसतसा धर्माध्यक्षांचा अधिकारही काढून घ्यावा लागला, व तो राजाकडे न जातां लोकांकडे आला. अशा तऱ्हेनें राजा, धर्माध्यक्ष व लोक असे तीन निरनिराळे विभाग होऊन त्याप्रमाणेंच शिक्षेचेंही झालें. इंग्लंडांत पूर्वी पाद्री लोकांचा हात ज्यांत त्यांत असे; म्हणजे जातकादि संस्कारापासून तों अगदीं वारसाची निवडानिवड होईपर्यंत. पण पुढें विद्येचा प्रसार अधिकाधिक होऊन त्यांतील बहुतेक अधिकार दिवाणी कोडतास प्राप्त झाले.

कांहीं देशांत तर पाद्री साहेबांकडे आतां कांहीं एक उरलें नाहीं. म्हणजे लग्नें सुद्धां जमिनीच्या देवघेवीप्रमाणें राजिस्टर करतात; व हाच प्रकार उत्तरोत्तर इकडेही घडून येण्याचीं चिन्हें दृष्टीस पडूं लागलीं आहेत. पूर्वीचा प्रकार म्हटला म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें " निषेकाद्याः स्मशानांतास्तेषां वै मंत्रतः क्रियाः" हा होय. पण या षोडश संस्कारांपैकीं हल्लीं आपण कितीसे पाळतों ? लग्न मुंज, खेरीज करून बाकी बहुतेक नाहींसे झाले म्हटल्यास चालेल, व जे राहिले आहेत त्यांची सुद्धां कालेंकरून तीच व्यवस्था होण्याचा रंग दिसत आहे. आणि इतिहासावरून पाहतां या धर्मसंस्काराच्या ऱ्हासाची प्रवृत्ति बंद करणें प्रायः दुरापास्तच होय. एकदां लोकांचे मनाचा कल कळल्यावर त्याचा प्रतिरोध करणारानें "क ईप्सितार्थस्थिरनिश्चयं मनः पयश्च निम्नाभिमुखं प्रतीपयेत् " या कालिदासोक्तीचें मनन करून मग आपल्या कार्यास लागणें उचित होय !

येवढ्यावरून इतकें लक्षांत येण्याजोगें आहे कीं, इतर राष्ट्रांप्रमाणेंच आपल्या राष्ट्राची या कलियुगांत धर्मविमुखता दृष्टीस पडूं लागली आहे, व हिचा प्रतिरोध करणेंही कठिण आहे. तर अशा वेळेस राजकीय व धार्मिक शिक्षांचें फारखत होतांना ज्याप्रमाणें बहिष्काराचें काळेंपाणी हें राजकीय रूपांतर झालें त्याप्रमाणेंच आतां व्यावहारिक रूपांतर होण्याचे वेळीं आपले हातांत जो शिक्षा देण्याचा अधिकार आहे तो घालवूं न देण्याविषयीं आपण जपलें पाहिजे. व अशीच गोष्ट इतर राष्ट्रांतही घडून आली आहे. या बहिष्काराचें व्यावहारिक रूपांतर हल्लीं जो ऐर्लंडांत दंगा चालला आहे त्यांत दृष्टीस पडतें. ल्यांडलीग म्हणून जी सभा आहे, त्या सभेनें पुष्कळ जमीनदार लोकांस बहिष्कृत केलें आहे. तर अशाच तऱ्हेनें जर या वेळेस आपल्याकडे बहिष्काराचें रूपांतर होईल तर त्यापासून पुष्कळ फायदा होईल. दारू पिणारास बहिष्कृत करावें आणि भांग, गांजा, अफू यथास्थित सुरू राखावी काय ? अशा लोकांसही कां बहिष्कृत करूं नये ? धर्माची सबब इतर सर्व बाबतींत जर इतकी जारीनें सुरू नाहीं तर येथें मात्र तिचा एवढा प्रभाव कां ? एकदां बहिष्कारास व्यावहारिक शिक्षेचें पुरें रूप मिळाल्यास त्यापासून आपणास किती उपयोग करून घेतां येईल ? आज ज्या हजारों गोष्टी धर्माविरुद्ध नसतांही आपल्या नुकसानीस कारण होतात त्यांचा चांगला बंदोबस्त करितां येईल व असें करणें म्हणजे फारसें कठिण आहेसें नाहीं. बहिष्कारास राजकीयरूप तर प्राप्त झालेंच; मग त्यास व्यावहारिक कां देऊं नये हें आम्हांस समजत नाहीं.

[वर्ष १, अंक ७, ११.]

आमच्या देशांतील सभा व मंडळ्या

या देशांत इंग्रेजी विद्येचा फैलाव होऊं लागून आमच्या पाश्चात्य राज्यकर्त्यांची थोरवी जेव्हां आमच्या लक्षांत येऊं लागली, तेव्हांपासून त्यांच्या कृतीचें अनुकरण करण्याची इच्छा आम्हांमध्यें साहजिकच उद्भवली. या अनुकरणाचेंच फळ आमच्या देशांत आज पांचपन्नास वर्षांत ज्या सभा व मंडळ्या उत्पन्न झाल्या त्या होत. कलकत्त्यास राजा राममोहनरायानें काढलेल्या ब्रह्मसमाजापासून तों परवां निघून इतक्यांतच निरुष्ट दशेस येऊन ठेपलेल्या येथील क्रीडाभुवनापर्यंत कोणत्याही लौकिक कृत्याचें मूळ पाहिलें तरी तें वरीलच आढळेल. अनुकरण हें मनुष्यस्वभावाच्या नैसर्गिक प्रवृत्तींपैकींच एक असल्यामुळें, वरील प्रकार पाश्चात्यांच्या समागमानें इकडे उत्पन्न झाले यांत कांहीं नवल नाहीं. तसेंच वरील सभादिकांपासून जितकें व्हावें तितकें कार्य जरी अद्याप झालें नाहीं व होत नाहीं, तरी इतक्या कल्पना लोकांच्या मनांत नव्या ठसल्या इतका तरी निदान त्यांजपासून उपयोग झाला असें म्हणणें भाग आहे. लौकिकसंबंधानें बहुधा कोणत्याही संबंधाची हालचाल आजपर्यंत जी मुळींच होत नसे ती स्थिति जाऊन लोकांस आज इतकें जरी कळूं लागलें, कीं आपणास एकंदर देशाच्या संबंधानें कांहीं उद्योग करणें अवश्य आहे, नुसती आपली व आपल्या कुटुंबाच्या निर्वाहाची तजवीज केली म्हणजे कृतकृत्यता झाली असें नाहीं, तरी थोडें नाहीं. वरील औदासिन्याची स्थिति ही आमच्या देशास आज शेंकडों वर्षें खिळलेली आहे असें म्हटलें असतां चालेल; तेव्हां ही बधिरता मोडून मूळचा जो रुधिराभिसरण व्यापार तो पूर्ववत् आमच्या राष्ट्ररूप शरीरांत चालू झाला असतां लहानसान कार्य झालें असें नाहीं !

त्यांतून गेल्या दशकांत म्हणजे १८७० पासून १८८० पावेतों पुष्कळ नव्या गोष्टी सुरू झाल्या, व लोकांत देशाहिताच्या संबंधानें बऱ्याच प्रकारची चळवळ सुरू झाली. सार्वजनिक सभा, वक्तृत्वोत्तेजक सभा, स्वदेशी दुकानें, लवाद कोर्टें, वगैरे कित्येक प्रकार पूर्वी नसलेले उदयास आले, किंवा निदान कित्येकांचा उत्कर्ष तरी वरील दशकांत विशेष झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं. महाराष्ट्र भाषेच्या संबंधानें तर वरील काळांत पुष्कळच सुधारणा झाली यांत संशय नाहीं. पत्रें, मासिक पुस्तकें, ग्रंथ–यांची दिवसेंदिवस रेलचेल उडत चालली आहे. आतां हें खरें आहे

कीं, आज पांचपंचवीस वर्षांत इकडे जितका इंग्रेजी विद्येचा फैलावा झाला त्याच्या मानानें पाहतां, व आमच्या लोकांच्या आंगच्या बुद्धिमत्तेचा व कर्तृत्वाचा विचार करतां, आजला एकंदर देशाचें जितकें पाऊल पुढें पडायला पाहिजे होतें तितकें अजून मुळींच पडलें नाहीं. तसेंच पुनर्विवाह, स्वदेशी व्यापार वगैरे प्रचंड उद्योगापासून तों मासिक भोजनें, क्रीडाभुवन, या छोट्याछोट्यानीं उद्योगांपर्यंत पाहतां 'तेरड्याचा रंग तीन दिवस,' 'सरड्याची धांव कुंपणापर्यंत,' आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः' या वचनांचीच वारंवार उजळणी होते! तरी ज्या अर्थी ही परद्वीपची सुधारणा आमच्या देशांत नुकतीच संचार करूं लागली आहे, त्याअर्थी पहिले पहिले प्रयत्न कितीही निष्फल झाले तरी त्यांकडे विशेष कडक नजर पुरवितां येत नाहीं.

तर या खेपेस आम्ही या विषयाचें विवेचन करणार आहों कीं, आमच्या देशांत आजपर्यंत सभा, मंडळ्या, समाज, वगैरे अनेक प्रकारच्या उद्योगांची उभारणी झाली असतां व बहुधा दरवर्षी कांहींना कांहीं तरी नवा आरंभ होत असतां, आमची लवकरच मजल खचते, व लोकोपहास्यतेला बहुधा कारण होतें, असें कां व्हावें? इतर देशांतून जर पर्वतप्राय उद्योग शेंकडों वर्षे निभतात तर येथेंच त्यांस मरगळ कां यावी? विलायतेंत पांचपन्नास व्यापाऱ्यांनीं मिळून एक कंपनी काढावी, आणि शेंदोनशें वर्षांत तिनें असें राज्य कमवावें कीं, त्यांचा स्वतःचा देश त्याच्या पासंगालाही पुराया नाहीं, ही केवढी अजब गोष्ट आहे? तशाच दुसऱ्या कांहीं मंडळ्या निघाव्या आणि त्यांनीं साऱ्या भरतखंडास लोहशृंखलांनीं जखडून टाकून नलराजाच्या रथाच्या वेगानें त्यावरून आपले अपूर्व रथ धांवडावे आणि डोंगराला न मोजतां, दऱ्याला न जुमानतां, मोठमोठ्या नद्यांची पर्वा न बाळगतां, खुशाल कोट्यावधि रुपये नासून देशाच्या या टोंकापासून तों त्या टोंकापर्यंत सारखा हमरस्ता करून द्यावा, हें तरी काय गौडबंगाल आहे बरें! पण तेंच आमच्या देशाकडे वळा, आणि येथली एक एक मौज पहा. फक्त जेवणाचें काम; महिन्यांतून एकदा पांचपंचवीस मंडळीनें एके ठिकाणीं जमावयाचें, आणि सहा आणे वर्गणी देऊन सहभोजनाचा सोहळाच करावयाचा; पण तें सुद्धां आमच्या मंडळीस झेंपलें नाहीं! दहाबाराद्दा आर्यजननीच्या नांवानें मासिक निवृत्ति झाली असेल कीं नसेल कोण जाणे!--आटपला कारखाना! ही तरी कांहीं वर्षांमागची हकीकत-नुकती ताजी हकीकत पाहिजे असल्यास क्रीडाभुवनाची आहे. आमच्या दूरदूरच्या वाचकां-

पर्यंत वरील भुवनाची कदाचित् अद्याप वार्ताही गेली नसेल, यास्तव त्यांच्या माहितीकरितां येथें इतकें कळविणें अवश्य आहे कीं, येथील पुढारी मंडळीनें शहरांतल्या शहरांतच एक बरीच मोठी जागा भाड्यानें घेऊन ती कांहीं दिवस खपून नीटनेटकी केली, आणि गेल्या जानुआरीच्या पहिल्या तारखेस तेथें क्रीडाभुवनाची स्थापना मोठ्या समारंभानें झाली. पण आमच्या लोकांची गंमत पहा काय आहे कीं, विचाऱ्या क्रीडाभुवनास बहुधा पहिल्या आठवड्यांतच कुलूप पडलें ! अत्तरगुलाबाला व अध्यक्षांच्या व्याख्यानाला गाडीघोड्यांनिशीं येवढी बडी मंडळी प्रथम दिवशीं जुळली असतां, बहुधा दुसऱ्याच दिवसापासून क्रीडाभुवन शुक्ल झालें. हल्लीं तर तें अजीच माजी पडल्यासारखें झालें आहे. मग सन १८८२ च्या पहिल्या तारखेस त्या विचाऱ्याची कोणाला कळकळ येऊन हिरावोंगेतल्या रिफार्म असोसिएशन्प्रमाणें त्यानें आपल्या वाढदिवशीं पुनः डोकें उचललें तर कोण जाणें !

तर या खेपेला या महत्त्वाच्या विषयाचा आम्हीं उपन्यास केला आहे. या आर्यभूमींत सभादिक लौकिक रुत्यें रुजत कां नाहींत, किंवा रुजलींच तर ती लवकरच कां वठतात, या गोष्टीचा विचार करणें आज फार जरूर आहे. तर आजपर्यंतच्या अनुभवावरून वरील विषयावर जीं आमचीं मतें होऊन बसलीं आहेत तीं पुढील अंकापासून लोकांस सादर करूं.

मागील अंकांत जी आम्हीं दिलगिरीची गोष्ट दाखल केली, कीं आमच्या देशांत कोणतेंही लौकिक रुत्य आरंभलें आणि तें चार दिवस बोभाट्याशिवाय सुरळीत चाललें असें प्रायः आढळत नाहीं, हिचें पहिलें मोठें कारण आम्हांस हें वाटतें कीं, पाश्चात्यांची नवी सुधारणा अद्याप आमच्यामध्यें चांगलीशी मुरली नाहीं. इंग्रज लोकांचीं एक एक बडीं रुत्यें पाहून त्यांचें आम्ही अनुकरण करतों खरें, पण हें अनुकरण पुष्कळ अंशीं लहान मुलें जशीं मोठाल्या माणसाचें अनुकरण करतात त्यासारखेंच होय. म्हणजे मुलेंही मोठाले भोजनसमारंभ पाहून भातुकल्यांनीं खेळतात, किंवा मदनव्यापाराची कल्पनाही नसतां बाहुला व बाहुली यांचें लग्न लावून देतात, त्याप्रमाणेंच लोककल्याणार्थ आरंभलेल्या मोठमोठ्या रुत्यांची येथें स्थिति होय. इंग्लंडांत मोठमोठ्या बडे लोकांपासून तों यःकश्चित मजुरापर्यंत सर्वांस लोकांचे हक्क म्हणजे काय हें कळतें आहे, तेव्हां तेथें पार्लमेंट सभा आहेत व त्यांचे सभासद् निवडतांना तिकडे मोठी गडबड उडून जाते हें ठीकच आहे. पण इकडे पाहावें

तों अगदीं प्राचीन काळापासून राजा म्हणजे ईश्वराचा अंश, 'राजा हरति सर्वं तत्र का परिदेवना' (राजाच जर सर्वस्व हरण करूं लागला तर मग कोणाकडे रडत जावें?) या कल्पना मनूच्या कारकीर्दीपासून तों थेट आजपर्यंत सर्वांच्या हृदयांत खिळून राहिलेल्या आहेत. मग अशा स्थितींत येथें शंभर सार्वजनिक सभा झाल्या म्हणून त्यांचें काय तेज पडणार? विलायतेंतील वधूवरें विवाहग्रंथि पडतांच मधुमास भोगण्यास कोठें तरी रमणीय स्थलीं जाण्यास निघतात, म्हणून इकडच्याही दहा वर्षांच्या नवऱ्यानें पांच वर्षांच्या नवरीस हातीं धरून तोच सोहळा भोगण्याचा जर आव घातला, तर 'जयपाळां'तील नायिकेसारखाच अत्यंत हास्यास्पद प्रकार होणार नाहीं काय? तर याप्रमाणेंच येथें कोठले तरी मुखत्यार गल्लीकुचींतून धरून आणून त्यांच्याकडून मारूनमुटकून सार्वजानिक सभेचें सभासदत्व करावयाचें हा प्रकार कसा यशालाभाला यावा?

धर्मप्रकरणींही आज चाळीसपन्नास वर्षांत बरीच गडबड उडून राहिलेली आहे. पण हिचाही प्रकार वरच्यासारखाच! राजा राममोहनरायाची काय स्थिति असेल ती असो; पण अलीकडे तर आमच्या पाहण्यांत जी तऱ्हा येत आहे, तिजवरून विचार करतां आमची नवीन भक्तमंडळीही कितीशी धर्मनिष्ठ असेल याची आम्हांस फार शंका आहे! जेवढे म्हणून नवीन समाजांचे अनुयायी आहेत, तेवढे सर्व केवळ दांभिक आहेत असें आम्ही म्हणत नाहीं; पण आमची येवढी खात्री आहे कीं; ज्या लूथरप्रभृति मंडळीचा आव आमचे धर्मसुधारणेच्छु घालतात, त्यांच्या अंगीं जो आवेश संचरलेला होता त्यापैकीं एक सहस्रांश सुद्धां वरील सामाजिकांत आढळत नाहीं. हल्लींच्या कालांत धर्मसुधारणेचा डौल घालणें हें फार सोपें झालें आहे; मागें युरोपांत कोणी नवीन मताचा स्थापक निघाला कीं, त्यास जाळून टाकण्याचा सपाटा चालू असे. तसें हल्लीं तिकडे सुद्धां नाहीं. मिल्लसारखे अधर्मी, किंबहुना बाडलॉ, बेसंट बाई, यांसारखी स्पष्टवक्ती नास्तिक मंडळी, यांस हल्लीं काडीइतका उपद्रव करण्याचेंही कोणास सामर्थ्य नाहीं. त्यांतून इकडे तर काय, कोणाचाच जोडा कोणाच्या पायांत नाहीं, मग हवीं तशीं मतें प्रगट केलीं, किंवा हवें तसें आचरण केलें, म्हणून कोणाची आडकाठी आहे? पण इतकी हल्लीं सोय झाली असतांही बाबू केशवचंद्र सेन हे मूर्तिपूजकास कन्यादान करितात, येथील एक समाजाध्यक्ष आम्हीं आजपर्यंत समाजांत उपदेश केला तो सारा व्यर्थ, असें बेधडक आपल्या श्रोत्यांस सांगून मोकळे होतात, इत्यादि प्रकार नजरेस येतात. यांतील बीज अर्थात

हेंच कीं हा धर्मावेशाचा उमाळा केवळ अंतःकरणांतला नाहीं; तर प्रायः लोक-स्थितीच्या उद्देशानेंच हीं प्रकरणें उपस्थित झालीं आहेत.

राजकारण व धर्म या दोहोंच्या संबंधानें वर जें सांगितलें तेंच बहुधा इतर सर्व प्रकरणांसही लागू आहे. अगोदर एकंदर देशाच्या कल्याणार्थ झटणें हें भूषणप्रद होय, किंबहुना प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्यकर्म होय, ही कल्पनाही सर्वांच्या मनांत अजून चांगलीशी रुजली नाहीं. परदेशांतील झाड आणून आपल्या जमिनींत लावलें असतां तें तेथें रुजण्यास व वाढण्यास जसा अवकाश लागतो, त्यासारखीच परकीय आचारविचारांची गोष्ट असते. तर युरोपाशीं या देशाचें जास्त दळणदळण पडेतों-पर्यंत किंवा त्याच्या ग्रंथावरून त्यांचें स्वरूप आपल्या मनांत पूर्णपणें बिंबे तोंपर्यंत हल्ली जी लोककल्याणाच्या कामांची दुर्दशा आढळते तीच दृष्टीस पडायाची. स्वदेशाच्या प्रीत्यर्थ तनमनधन अर्पण करणें हें किती थोरपणाचें काम आहे, केवळ स्वोदरपूरणार्थ परिश्रम करून जन्मभर आपली व आपल्या बायका-पोरांची भर करणें यापेक्षां आपल्या असंख्य बंधूंच्या कल्याणार्थ देह झिजवणें व जगांत नांव करणें, यापासून किती अधिक समाधान आहे, वगैरे मतें आमच्या लोकांत ज्याप्रमाणें अधिकाधिक दृढ होत जातील त्याच मानानें आमच्या सर्व उद्योगांसही विशेष यश येत जाईल हें उघड आहे.

आमच्या देशांतील सार्वजनिक उद्योग यथास्थित न चालण्याचें दुसरें एक मोठें कारण असें आहे कीं, ते प्रथमतःच नीट विचार करून उपस्थित केलेले नसतात. घराचा पाया कच्चा ठेवून मोठी टोलेजंग इमारत उठवली असतां ती ढासळली म्हणून जसें आश्चर्य वाटण्यास कारण नाहीं, त्याप्रमाणेंच आपण केलेला संकल्प जर अगोदर नीट नसला तर तो सिद्धीस तरी कसा जाईल ? कोणतेंही कार्य उपस्थित करणें झालें तर तें अगोदर स्वतः होण्यासारखें असलें पाहिजे; करणारी मंडळी त्याच्या सिद्धीविषयीं समर्थ असली पाहिजे, व उपायांचीही अशी योजना पाहिजे कीं, त्यांच्या योगेंकरून वरील कार्य साध्य व्हावें. कर्ता, कर्म व करण ही त्रिपुटी वरच्याप्रमाणें जुळली असतां सहसा असिद्धी होण्याचें भय उरणार नाहीं. पण वरील गोष्टीकडे आमच्या देशांत विशेष लक्ष दिलेलें फार करून आढळत नाहीं. चार होळीचे होळकर मिळून एखाद्या मोठ्या कार्यास आरंभ करतात, आणि त्यांत खरा झटणारा बहुधा थोडाच असल्यामुळें लवकरच सारा डोलारा खालीं येतो. मग

' आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः ' हें आपलें एक वचन ज्याला त्याला म्हणायला आहेच, किंवा आमच्या देशाचें नशीबच खोटें असें म्हणूनही पुनः औदासिन्य पतकरण्यास मोकळीक आहेच !

वरील सिद्धांताच्या उदाहरणार्थ आम्ही येथील दोन तीन मंडळ्या घेतों. त्यांवरून आम्हीं वर दाखविलेला दोष व्यक्त होईल.

सन १८७१ सालीं येथें ' डेक्कन कॉलेज क्लब ' म्हणून एक मंडळी निघाली. माजी विष्णु परशुराम रानडे हे वरील मंडळीचे उत्पादक म्हटलें असतां चालतील. रानडे हे चांगले विद्वान् असून मंडळीचे चाहते होते. वास्तव त्यांनीं प्रथमतः ही कल्पना काढली कीं, पुण्यांत इंग्रेजी विद्येचें पीठ स्थापन झाल्यापासून जी जी मंडळी त्यांत पैदा होत गेली त्या सर्वांत आपल्या मूळ ठिकाणचा अभिमान असावा, म्हणून दर मे महिन्यांत आयती मंडळी पुण्यांत जमतेच, तर एक दोन दिवस त्यांनीं वरील निमित्तानें उत्साह करावा. सर्वांनीं परस्परांस भेटून खेळ खेळण्यांत, भाषणांत वगैरे कालक्रमणा करावी, आणि भोजन व उपाहार करावा. आतां ही कल्पना जर वस्तुतः पाहिली तर ती उत्कृष्ट होय हें कोणीही कबूल करील. आपल्या जन्मभूमीचें दर्शन झालें असतां संतोष होणें हें जसें साहजिक आहे, त्याप्रमाणेंच जेथें आपला विद्याभ्यास झाला, त्या स्थलाचें दर्शनही अभिमानजनक व आल्हादजनक होय, हें उघड आहे. तेव्हां वरील उद्देशानें सदरील ' क्लब 'ची स्थापना होऊन तो आज दहा वर्षें सतत चालला आहे. आतां त्याची आजपर्यंतची जर हालहवाल पाहिली, तर गुजराथ्यांचें जसें ज्ञातिभोजन होतें, किंवा मुलींची भातुकली होते, त्याचप्रमाणें पांचपन्नास मंडळी दरसालीं एकत्र जमून एक दिवस मौजेनें घालवितात, व पुष्कळांच्या एके ठिकाणीं भेटी होऊन सह भोजनाचा थाट घडतो, येवढें खरें आहे; पण यापलीकडे गेल्या दशकांत वरील मंडळीपासून कांहींएक निष्पन्न झालें नाहीं. पहिल्या पहिल्यानें विद्वत्समाज मोठा जमला असल्यामुळें सदरील ' क्लब ' हा केवळ भोजनार्थ नसून त्यांत कांहीं व्याख्यानांचा, निबंधांचा, वगैरे अनेक प्रकार होतील असा सुमार दिसत होता; व कित्येकांनीं ग्रीक लोकांतील ' ऑलिंपिक् गेम्स ' वगैरे सार्वजनिक उत्सवांचेंही साम्य वरील मंडळीस दिलें. तसेंच पहिलीं चारपांच वर्षें निबंध नेमण्यांत व त्यांविषयीं वाटाघाट होण्यांत जात असत, व एकदां कोणीं निबंध लिहून पाठविला असतां त्यास बक्षीस देण्यांतही आलें. पण अलीकडे पाहावें तों निवळ जेवणावरच बहुधा

बस्तान येऊन बसलेलें आहे. बाहेरून जी मंडळी येते त्यांची वरील ' क्लब 'च्या योगानें येवढी बरीक खाशी सोय झाली आहे खरी, कीं एका दीड रुपयांत चमचमीत वनभोजन घडून अनायासें सर्वांच्या गांठी पडतात; इतक्या मंडळीकडे क्षेमसमाचारार्थ पृथक् पृथक् जाण्याचें अगत्य पडत नाहीं; व या सोईमुळेंच अलीकडे ' क्लब ' बरा चालला आहे व पुढेंही चालेलसा सुमार दिसतो. बाकी चवथ्या पांचव्या वर्षी ह्याची मजल पुष्कळच खचत खचत येऊन तो एकदोन वर्षांत बुडतो कीं काय असाही धाक वाटायाला लागला होता !

आतां वरील भोजनमंडळीविषयीं विचार केला असतां ती एक मजलसीची मंडळी आहे येवढ्या संबंधानें पाहतां तींत कांहीं गैर नाहीं. पांचपन्नास मंडळीनें वर्षाच्या कांठीं एकदां हिराबागेसारख्या रमणीय जाग्यांत मिळून एक दिवस आनंदांत घालवावा ही गोष्ट कांहीं वाईट नाहीं. पण मंडळीचा मूळचा जो उद्देश कीं सर्व मंडळीचा स्नेह वृद्धिंगत व्हावा, व त्यांचें बंधुप्रेम जागृत रहावें, तो बरीक आजपर्यंत कितीसा सिद्धीस गेला असेल तो असो ! पहिल्यापासून शेवटपर्यंत जों पहावें तों वरील 'क्लब' मध्यें सतरा कोंडाळीं दृष्टीस पडतात; आणि खेळण्याच्या वेळेस, जेवणाच्या वेळेस, पानसुपारीच्या वेळेस, शेवटल्या सभेच्या वेळेस, जो तो आपल्या कोंडाळ्यांत असतो. इतकें मात्र नाहीं म्हणायाला होतें, कीं खालची जी मंडळी असते तीस वरील बडच्या मंडळीची तोंडओळख होते, कीं अमुक अमुक रावसाहेब किंवा अमुक अमुक रावबहादूर म्हणतात ते हे. बाकी आंतली स्थिति पाहिली तर जुन्या बुधवारच्या वाड्यांत शिकलेल्या वृद्ध कपींस अलीकडील मंडळी टारगी वाटत असेल, व अलीकडील तरुण बांडांच्या मनांतही आमच्या प्राचीन बंधूंविषयीं कितीशी भक्ति किंवा प्रेम वाटत असेल हेंही सांगायाला नकोच !

गेल्या खेपेस आम्हीं ' डेक्कन् कॉलेज् क्लब् ' ची थोडीशी हकीकत आमच्या वाचकांस कळविली. आतां त्याच्यासारखीच दुसरी एक मासिक मंडळी येथें जमत असे तिजविषयीं कांहीं लिहितों.

वरील ' क्लब ' मध्यें माजी बुधवारच्या वाड्यांतील शाळेंत, पूना कॉलेजांत, व डेक्कन कॉलेजांत ज्या लोकांनीं विद्याभ्यास केला त्यांसच तेवढी येण्यास मुभा आहे, इतर कोणीही त्यांत येऊं शकत नाहीं, यास्तव इतर मंडळीमध्येंही ही सहभोजनाची

तऱ्हा सुरू असावी, या उद्देशानें वरील मासिक भोजन सुरू झालें. कोठें तरी बागेंत वगैरे पांचपन्नास मंडळींनें एके ठिकाणीं जेवणाकरितां जमावें, व नंतर लोककल्याणाच्या कामांची तींत सहज चर्चा होऊन पुष्कळ लोकांचें दळणवळण विशेषतः पडावें, हा वरील मंडळीचा उद्देश होता. वर्गणी दरमहा साहा आणे ठेविली होती. सदरील मंडळी प्रथमतः कांहीं महिनेपावेतों येथें बुधवारांत खासगीवाल्यांच्या बागेंत जमत होती, व शेवटीं शेवटीं मोदींच्या गणपतीच्या देवळांत जमत असे. हा खुलासा येथें करण्याचें कारण येवढेंच आहे कीं, जरी वरील मंडळी सुमारें सातआठ महिने टिकली होती, तरी येथल्या पुष्कळ लोकांसही तिची वार्ता बिलकुल ठाऊक नाहीं!

वरील मासिक मंडळींत 'डेक्कन कॉलेज क्लब्' प्रमाणेंच पहिल्या एक दोन खेपेस पानसुपारी झाल्यानंतर देशकल्याणाच्या बऱ्याच गोष्टी निघाल्या. त्यांत विशेषेंकरून दरएक आळींतल्या लोकांनीं एकेक सभा करावी, व अनाथप्रेतांचा अंत्यविधि वगैरे सार्वजनिक कामें करावीं, असें ठरलें. पण मौज काय कीं, बहुधा तिसऱ्या चौथ्या खेपेपासून देशहिताच्या गोष्टी कोणीकडेच राहून सहा आण्यांचा ऐवज काढून घेण्याच्या पलीकडे भोक्त्या मंडळींचें लक्ष जाईनासेंच झालें. आमच्या विद्यालयबंधूंपैकीं कित्येकजण जसे केवळ भोजनबंधु बनून अत्तरगुलाब झाल्याबरोबर अंमळ दिवस कलला कीं हळूहळू घराची वाट सुधारतात, पुढील सभादिक कार्यें केवळ गौण अशी त्यांची समजूत असते, त्याप्रमाणेंच वरील मंडळीचाही प्रकार दृष्टीस पडूं लागला. जेवण व गप्पा झाल्या कीं कृतकार्य झालों असें त्यांस वाटे. असें होतां होतां वरील सभा केव्हां लयास गेली तीही समजण्यांत आली नाहीं!

वरच्या दोहींप्रमाणेंच तिसरें अगदीं अलीकडचें उदाहरण 'क्रीडाभुवन' हेंच होय. हें निकृष्ट स्थितीला येऊन इतक्यांतच पोंचलें आहे असें आह्मीं पूर्वी लिहिलें होतें; पण वरील लेख आह्मीं गैरसमजानें लिहिला असें आतां आह्मांस कळतें. इंग्रजी पाडव्याला सदरील भुवनाची जरी प्राणप्रतिष्ठा झाली, तरी तें पुनः चांगलें दुरुस्त झाल्यावर त्याची आणखी जारीनें सुरुवात होणार आहे असें आह्मांस 'शोधका' च्या सांगण्यावरून समजतें. देव करो आणि आमचा लेख खोटा ठरून 'क्रीडाभुवन' सुरळीत चालो, येवढीच आमची इच्छा आहे!

आम्हीं वर जीं तीन मंडळ्यांचीं उदाहरणें घेतलीं तीं मुद्दाम अगदीं सोप्यांतलीं घेतलीं आहेत. सार्वजनिक सभा, पुनर्विवाहोत्तेजक सभा, ब्रह्मसमाज, स्वदेशी मालाच्या खपास उत्तेजन देणारी मंडळी; कौशल्यशिक्षक मंडळी; अशा बडद्या बडद्या प्रकर-

णांच्या खोल पाण्यांत आम्ही शिरलों नाहीं. नुसतें जेवण, खेळणें हीं दोन तरी अगदीं विन भानगडीचीं व सहज होण्यासारखीं कामें आहेत कीं नाहींत ? मग हींही ज्या अर्थी आमच्या हातून चांगलींशीं वहिवाटत नाहींत, त्याअर्थी आमच्या अंगांत कांहींच कुवत उरली नाहीं असें म्हटलें पाहिजे. ज्या महाराष्ट्रवासी लोकांचा 'नऊ लाख घोडा' दिल्ली अटकेपर्यंत नुकता गेल्या शतकांत गर्जत होता; ते आज कुचकामाचे होऊन गेले काय ?

कोणतेंही काम नीट चालेनासें झालें म्हणजे अर्थातच त्यांत कांहीं तरी दोष उत्पन्न झालेला आहे, किंवा तो मूळचाच आहे असें म्हणणें अवश्य आहे. जसें मनुष्य अन्न खाईनासें झालें, त्यास ग्लानि वाटूं लागली, वगैरे प्रकार दृष्टोत्पत्तीस आले असतां आंतील सूत्र कांहीं तरी बिघडलें आहे असें अनुमानच करावें लागतें, त्याप्रमाणेंच सर्व व्यापारांची गोष्ट होय. कोणतेंही कार्य यथास्थित व्हावयाचें म्हटलें म्हणजे त्याची व्यवस्था नीट चालणें अवश्य होय. या व्यवस्थेचें एखादें अंग जरी बिघडलें तरी त्याच्या योगानें एकंदर कार्यास थोडाबहुत तरी व्याघात घडणारच ! तर आतां वरील तीन कार्यें सुयंत्र चालण्यास कोणकोणत्या गोष्टींची आडकाठी आहे याचा येथें विचार केला पाहिजे.

वरील रोगनिदान करण्याचें काम जें आम्हीं अंगावर घेतलें आहे त्यास लागण्याच्यापूर्वी एका गोष्टीबद्दल आमच्या वाचकांस व विशेषतः आमच्या देशांतील सभांच्या व मंडळ्यांच्या पुरस्कर्त्यांस एक सूचना करून ठेवणें जरूर आहे. ती ही कीं, वैद्यास जशी स्पष्टोक्तीची परवानगी असते त्याप्रमाणेंच ती आम्हांस असली पाहिजे. हांजी हांजी करणारा वैद्य जसा रोग्याचा शत्रु होय, त्याप्रमाणेंच खुषामत करणारीं व दोषाविष्करणास भिणारीं वर्तमानपत्रेंही देशास परम अहितकारकच होत असें आम्ही समजतों. जो खरा देशहितेच्छु असेल त्यानें ' भीड भिकेची बहीण ' ही बिलकुल धरतां उपयोगी नाहीं. त्यास जे जे दोष जेथें जेथें दिसतील ते ते सर्व स्पष्टपणें सांगितलेच पाहिजेत. लोकांनीं त्याबद्दल कितीही हाकाटी केली तरी आपल्या कर्तव्यास जागून तिजकडे त्यानें अगदीं दुर्लक्ष केलें पाहिजे. तर प्रस्तुत पत्राच्या प्रसिद्धिपत्रकांत नमूद केलेल्या प्रतिज्ञेस अनुसरून वरील स्पष्ट विवरण करण्यास आम्ही लागणार. तें ज्यांस रुचणार नाहीं त्यांनीं आमच्या तर्फेनें महाकवि भारवीचें सर्वप्रसिद्ध वचन ध्यानांत आणावें. तें हें:-

हितं मनोहारिच दुर्लभं वचः

आतां मागें तीन ज्या मंडळ्या आम्हीं उदाहरणार्थ घेतल्या त्या नीट न चालण्याचीं कारणें जीं आमच्या दृष्टोपत्तीस येतात त्यांचें येथें उद्घाटन करतों.

'डेक्कन कॉलेजक्लब्' ही मंडळी मध्यें मध्यें मोडकळीस जी येत चालली होती तिचें एक मोठें कारण हें होय कीं, तींत फक्त जेवणाखेरीज दुसरें कांहीं होत नाहीं. सदरील आक्षेप हा न येणाऱ्या मंडळींपैकीं ज्याच्या त्याच्या तोंडून ऐकूं येतो. "तेथें जाऊन नुसता पुख्खा मारायाचा येवढेंच कीं नाहीं; मग तेवढ्याकरतां एक सबंध दिवस मोडा, व दीड रुपया खर्चा, यांत काय हाशील आहे!"—ही कोटी आजपर्यंत कितीक मंडळींनीं लढवून दीड रुपया वांचविण्याची युक्ति केली आहे. आतां एका तऱ्हेनें पाहतां वरील आक्षेप बरोबर आहे, व एका तऱ्हेनें पाहतां नाहीं. बरोबर असा आहे कीं, जेथें येवढा विद्वत्समाज जमतो तेथें केवळ आहारविहाराखेरीज तिसरी गोष्ट होऊंच नये हा चमत्कार नाहीं काय? युरोपांत जेथें चारचौघे विद्वान् एके ठिकाणीं झाले तेथें भाषणाचा प्रकार, व्याख्यानाचा प्रकार, नवीन शोध वगैरे, हें कांहीं ना कांहीं तरी आढळायाचेंच. उदाहरणार्थ जॉन्सन्चा 'क्लब्' घ्या. पण आमच्या 'क्लब्' मध्यें गेल्या दहा समारंभांत हजर असलेल्या मनुष्यास गैरहजर असणाऱ्याच्याहून एक अमुक गोष्ट विशेष समजली आहे असें सांगतां येईल काय? तर या रीतीनें पाहतां उलट पक्षाची बाजू साजरी होण्यासारखी आहे. आतां दुसऱ्या पक्षीं पाहतां असेंही म्हणतां येईल कीं, वरील निबंधादि प्रकार जरी वरील 'क्लब्'-मध्यें झाले नाहींत, तरी केवळ त्याच्याचकरतां मंडळीनें आडून बसून सदरील मंडळीला मोडता घालावा हें कांहीं बरोबर नाहीं. कां कीं, पूर्वी एके ठिकाणीं असलेल्या मंडळीचा वर्षाच्या काठीं एकदां एके ठिकाणीं मिळण्याचा जर योग येतो आहे, तर वरच्यासारखा कांहीं तरी अडथळा घालून त्यास व्याघात करणें हें माणुसकीला शोभत नाहीं. आणि त्यांतून निबंधांकरितां तटलेल्या मंडळीनें स्वतःच त्या निबंधांची खटपट कां करूं नये? ज्यांनीं 'क्लब्' काढला त्यांनींच निबंध पुरविण्याचाही मक्ता घेतला पाहिजे असें कांहीं नाहीं. तितकी ज्यांस धमक असेल किंवा हौस असेल त्यांनीं वरील उणीव भरून काढली असतां कांहीं गैरवाजवी प्रकार होणार आहे असें नाहीं. पण ही गोष्ट इतकी उघड असतांही लोभानें म्हणा, अगर कुरेंबाजपणानें म्हणा, पुष्कळ मंडळी आजपर्यंत 'क्लब' पासून अलग राहिलेली आहे.

तेव्हां सदरील मंडळी काढणारांनीं पहिल्यापासूनच जर तिचें भावी स्वरूप प्रसिद्ध केलें असतें, कीं ही जेवणाकरितां व दोन दिवस करमणूक करण्याकरतांच काढलेली

आहे, तर वरील बखेडा मोडला असता असें आम्हांस वाटतें. ज्यास वरील उद्वेश पतकरले असते तो 'क्लब्' मध्यें सामील झाला असता. इतर मंडळीस रिकामे आक्षेप काढण्यास अवकाश न सांपडता. हल्लीं तरी सदरील मंडळीचें स्वरूप वरच्या वेताचेंच झाल्यामुळें तिचा आतां पहिल्यापेक्षां अधिक जम बसलासा दिसत आहे.

मागें सांगितलेल्या मासिक भोजनाच्या मंडळीस तरी हेंच लागूं पडतें. आळो-आळीस सभा करायाच्या, आणि यंव करायाचें त्यंव करायाचें, हें पोकळ पांडित्य सोडून देऊन आम्ही दर महिन्याला निवळ जेवणाकरितां अमक्या अमक्या ठिकाणीं जमणार येवढीच प्रतिज्ञा करून जर वरील मंडळी स्वस्थ राहती, तर ती लयास जाण्यास विशेष कारण होतें असें आम्हांस वाटत नाहीं. कां कीं, आमच्या जुन्या वसंतपूजा, वनभोजनें वगैरे प्रकार जर आज अनादिसिद्ध चालत आहेत, तर नव्याच मंडळ्यांनीं काय पाप केलें आहे ? पण आमची नवीन मंडळी पहिल्या-प्रथमच मोठें ओझें उचलायला बघते त्यामुळें हें नाहीं आणि तें नाहीं असा प्रकार होतो !

वरील दोन मंडळ्यांचें बस्तान नीट न जमण्याचें दुसरेंही एक मोठें कारण असें आहे कीं, त्यांचें प्रमाण वेतानें धरायाचें टाकून फार अवाढव्य धरलेलें होतें. वार्षिक समाजास जी डेक्कन् कॉलेजची मंडळी घ्यावयाची तींत अगदीं बुधवार वाड्यांतील मंडळीपासून आरंभ केल्यानें अत्यंत वृद्ध मनुष्याची व नव्या नवरीची जशी सांगड घालून यावी त्यासारखाच प्रकार होतो. केली सवरलेली व पूर्ववयींचा हुरूप निघून जाऊन थंडी झालेली मंडळी कोणीकडे, आणि युनिवर्सिटींत प्रविष्ट मात्र होऊन नुकती कवची फोडून बाहेर पडलेली मंडळी कोणीकडे ? त्याप्रमाणेंच माजी मासिक समाजांतही ज्यांची स्थितिरीति व अभिरुचि ही अगदीं भिन्न अशा मंडळीचा समावेश करून पुष्कळ मंडळी जुळविली होती. असें झाल्यानें समाजांचा मुख्य हेतु कितपत सिद्धीस जातो याविषयीं मागें लिहिलेंच आहे. तर यापेक्षां कांहीं निवडक मंडळी घेऊनच जर वरच्यासारख्या मंडळ्या होतील तर त्यांपासून इष्ट हेतु चांगल्या प्रकारें सिद्धीस जाईल असें आम्हांस वाटतें.

आमच्या नुकत्या स्थापलेल्या 'क्रीडाभुवना' चे ठिकाणीं तरी हाच मोठा दोष आहे. त्यांत ज्यांनीं कधीं जन्मांत ब्याट आणि बॉल् हातीं धरला नाहीं अशा बड्या धेंडांचा व छोटेखानी मंडळीचा संयोग होणार. मग खेळ जुळावा कसा ? ज्या त्या

बड्या खिल्लाडूस दुसऱ्यास पाहून संकोच वाटणार, व धाकटीं पोरें आपला नेभळेपणा पाहून हांसतील म्हणून त्यांस लाज वाटणार. युरोपियन लोक केवढाले ही अगडबंब झाले तरी त्यांस नेहेमींच्या सरावामुळें वरच्यासारखी पंचाईत येऊन पडत नाहीं. पण आमच्याकडची मंडळी म्हटली म्हणजे नुसती रपेट ती सुद्धां ज्यांस गाड्यांशिवाय व्हावयाची नाहीं, अशा प्रकारची ! मग असले गडी क्रीडाभुवनांगणीं खेळावयास सज्ज होऊन टोला मारण्यास अवसान घेऊं लागले असतां प्रेक्षकांनीं हसूं दाबून डोळे मिटून धरावे तरच त्यांची निभावणूक ? पण हो; आमचे 'शोधक' महाराज वरील गोष्टींतही कदाचित् आम्हांस मोडून काढतील, यास्तव कांहीं दिवस वाट पाहून बड्या मंडळींचें अवसान अगोदर प्रत्यक्ष पाहावें आणि मग त्यांच्या रामटोल्यावर टीका करावी हेंच बरें ! यास्तव लेखणी पुसून तूर्त नळकंड्यांत टाकून देतों.

येथवर आमच्या देशांतील तीन मंडळ्या उदाहरणार्थ घेऊन त्यांच्या संबंधानें प्रस्तुत विषयाचें विवेचन केलें. व त्या नीट न चालण्याचीं कांहीं कारणें दर्शविलीं. आतां सामान्यतः पाहतां आणखीही कांहीं कारणें जीं एतद्देशीय सभांच्या अपकर्षास कारणभूत होत असतात त्याविषयीं कांहीं विवरण करून हा विषय आटपतों.

संस्कृतांतील एक प्रसिद्ध म्हण आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहित असेलच; ती ही कीं, " समानशीले व्यसनेषु सख्यं (ज्यांचे स्वभाव सारखे व उद्योग सारखे त्यांचें सख्य) " या वचनाचें चांगलें स्मरण ठेवून जर आमचे लोक सभादिक उद्योग करूं लागतील तर त्यांत त्यांस अधिक यश येईल यांत संशय नाहीं. सभा किंवा मंडळी म्हणजे लोकांचा एकोपा, व एकोपा जर होणें आहे तर ज्या द्रव्यांचें एकीकरण करायाचें आहे ती योग्यता तरी त्यांच्या ठिकाणीं पाहिजे. पाणी आणि तेल कितीही एके ठिकाणीं ढवळलीं तरी तीं एकवटतील काय ? किंवा दारू आणि विस्तव यांस एकीच्या माहात्म्यावर मोठें व्याख्यान देऊन एके ठिकाणीं राहण्याविषयीं त्यांची प्रार्थना केली तर तें होणार आहे काय ? तर केवळ लोककल्याणावर नजर देऊन लोक एकत्र होतील व एका जुटीनें काम करतील ही व्यर्थ आशा सोडून देऊन ज्या लोकांचे स्वभाव, अभिरुचि, वयें, शिक्षा वगैरे एकसारखीं आहेत, त्यांचे समाज प्रथमतः

जुळले पाहिजेत, म्हणजे एकाचें तोंड दक्षिणेकडे व दुसऱ्याचें उत्तरेकडे ही जी बजबजपुरी माजते ती माजणार नाहीं. वरील साम्य मंडळींच्या सभासदांस असल्यापासून दुसरीही एक मोठी गोष्ट साध्य असते कीं, सर्वांस सर्वांशीं मोकळेपणानें वागायला सांपडतें. नाहीं तर हल्लीं पीडा काय होत असते, कीं एक सभासद मोठे सरकारी हुद्देदार, तर दुसरा त्यांच्या हाताखालचा हलका नोकर असायचा; किंवा अमुक अमुक मोठे जहागिरदार किंवा सावकार असले, तर त्यांच्या शेजारचा मनुष्य कोणी कफल्लक असायचा ! हें विलक्षण प्रकारचें वैचित्र्य असल्यानें सगळेच सभासद आपापल्या ठिकाणीं अडचणलेले होऊन राहतात. वाघाच्या पिंजऱ्यांत जशी शेळी कोंडायाची किंवा कोवळ्या वधूवरांच्या पदराला गांठ देऊन दोघांस एकत्र जखडून टाकायाचें; त्यासारखी स्थिति ! वरिष्ठ अंमलदारास वाटणार कीं हा तर आमचा असिस्टंट किंवा सबार्डिनेट आहे, तेव्हां आम्हीं एखाद्या गोष्टीची सूचना केली तर तिला यानें आडवें येतां कामा नये; छोट्याशा आफिसरालाही मनांतल्या मनांत वाटणार, कीं आपल्या यजमानांशीं जर आपल्याला दिवस काढणें आहेत तर आपले स्वतंत्र विचार तोंपर्यंत आपल्याला तादृश बाहेर काढतां नये; न जाणों खावंदांचा आपल्यावर घुस्सा होईल ! जहागीरदार व सावकार हे मनांत घमंड बाळगणार, कीं आम्ही अमक्या अमक्या प्रतीचे सरदार, किंवा आमच्या पेढीवर दररोज हजारों रुपयांचा खळखळाट होत असतो; आणि हा दुसरा सभासद काय यःकश्चित्, यास दररोज मध्यान्हींची भ्रांत ! हा दुसरा तरी वरील कारणास्तवच आपल्या ठिकाणीं विचकून असतो !

तर आमच्या सभांत वरील समानत्वाचा विचार न राखल्यानें वर सांगितलेल्या ज्या शेंकडों पंचायती होत असतात त्या 'समानशील व्यसन' त्वाचा नियम राखला असतां एकदम नाहींतशा होणार आहेत. अमुक उंच व अमुक निंच हा भिन्नभाव नाहींसा झाला असतां हवें त्यास हवें तें बोलण्याची व आपले विचार स्पष्टपणें प्रगट करण्याची अडचण उरणार नाहीं.

आतां हें खरें आहे कीं, कोणी मोठा असला आणि कोणी लहान असला म्हणजे त्यांची जूट जमणारच नाहीं असें कांहीं नाहीं. दोघांनींही जर आपापलें कर्तव्य लक्षांत आणून एकमेकांशीं वागणूक केली, तर अधिकारानें, श्रीमंतीनें, किंवा विद्वत्तेनें ज्यांच्यांत अतिशय अंतर आहे असे दोघे मनुष्यही एकोप्यानें सहज राहूं शकतील. तसाच आपला एरवीं परस्पर कांहींही संबंध असला तरी सर्व कामांत तो संबंध

मनांत वागवला पाहिजे असें नाहीं, हेंही थोर समजुतीच्या मनुष्याच्या तेव्हांच लक्षांत येणारें आहे. पण सध्यां जर आमची स्थिति पाहिली तर असें सामान्यतः आढळून येईल कीं, आमच्यामध्यें देशहिताच्या गप्पा मारायला जरी पुष्कळ लोक शिकले आहेत, व असें वागावें, तसें वागावें वगैरे चांगल्या समजुतीच्या गोष्टी जरी सांगणारे अनेक आढळतील, तरी केवळ प्रांजलपणानें एखाद्या कार्याला झटणारी मंडळी फारच थोडी निघेल. लोकसमाजांत आपला दर्जा व आपली विद्वत्ता खुशाल गुंडाळून ठेवण्यास राजी असे लोक क्वचितच सांपडतील. आपण अमक्या संबंधानें मोठे आहों, तेव्हां आमचा मानमरातब यथास्थितपणें लोकांनीं ठेवला पाहिजे, आमचा शब्द कधीं खालीं पडतां कामा नये, एखादें हलकेंसलकें काम दिलें तर आम्ही बिलकूल पतकरणार नाहीं, वगैरे अयोग्य कल्पना ज्यांच्या कधीं मनांतही येत नाहींत, अशी निष्प्रांजल मंडळी आमच्यांत किती असेल ती असो ! तेव्हां एकंदर सांगायाचें काय कीं, जोंपर्यंत वरील कुत्सित भाव आमच्या लोकांच्या मनांतून समूळ गेले नाहींत, व लोककल्याणाचें खरें स्वरूप लोकांचे ठायीं चांगलें बिंबलें जाणार नाहीं, तोंपर्यंत थोडक्याच व सारख्या दर्जाच्या मंडळींनें एखादें कार्य उचलून तें सिद्धीस नेण्यास झटावें हें फार चांगलें. लहानथोरांची सरोबरीनें भेसळ करून कांहीं तरी दुल्ला उभा करावा, आणि एकंदर गप्पागोंधळ करून द्यावा हें कांहीं बरें नव्हे. अशा बाराभाईंच्या रामरगाड्यांत कोणतेंच काम कधीं नीटपणें तडीस जावयाचें नाहीं. तर हीं बाजारबुणगीं नाहींशीं होऊन कवायतीच्या पलटणी जेव्हां आमच्या देशांत एक एक तयार होतील तेव्हां चोहोंकडे फत्तेच फत्ते होऊन जाईल यांत संशय नाहीं !

वरील सभांच्या व मंडळ्यांच्या अपकर्षाचीं इतर जीं अनेक कारणें सामान्यतः चोहोंकडे आढळतात, त्यांचाही येथें स्पष्टपणें उल्लेख केला पाहिजे. हीं कारणें अविश्वास, आपमतलब, मत्सर, कपटभाव वगैरे होत. पोटांत रोग झाला असतां तो निघाल्याखेरीज जशी शरिराची वाढ कधीं होत नसते, त्याप्रमाणेंच वरील कुत्सित वृत्ति जोंपर्यंत सभाजनांच्या ठायीं वास करताहेत तोंपर्यंत सभांचें व मंडळ्यांचें कामही हळूहळू आढळतें त्याप्रमाणेंच रडतकढत चालणार हे उघड आहे. प्रकृति हुशार राहण्यास मन जसें सदोदित खुलास राहणें अवश्य आहे, त्याप्रमाणें सभेचें काम चोख रीतीनें वहिवाटण्यास तिचे सर्व अवयव निर्दोष व विकाररहित असले पाहिजेत हें स्पष्ट आहे.

वरील चिकित्सा आम्हीं आरंभली आहे ही गोष्ट अगदीं अपूर्व असल्यामुळें आम्हांस मोठा धाक वाटतो. आमच्या साध्याभोळ्या पुष्कळ वाचकांस प्रस्तुत विवेचनावरून बहुधा असा अचंबा वाटणार आहे कीं, येवढी बडी बडी मंडळी जी आजपर्यंत इतके उद्योग करायला निघालेली आहे, तिच्या ठायीं वर सांगितलेल्या दुष्ट मनोवृत्ति असतील तरी कशा ? चार चार, पांच पांच, परीक्षा झालेली मंडळी, साऱ्या देशांचे इतिहास ज्यांनीं पालथे घातलेले, मॉरल् फिलॉसफी (सदसद्विवेचनशास्त्र) या विषयांत जे प्रसार झालेले, अशा लोकांच्या ठायीं लोककल्याणाचीं तत्त्वें म्हटलीं म्हणजे कशीं सदोदित जागृत असावीं, व कुत्सित वृत्तींपासून तर त्यांचें मन कसें निष्कलंक व सोज्वल राहिलेलें असावें ! याप्रमाणें बाहेरून पाहणाराच्या मनाचा ग्रह होणार आहे हें उघड आहे. पण अशा भ्रांत मनुष्यानें ' रासेलस ' मधल्या वक्त्या पंडिताची किंवा ' इसापनीतीं ' तील खोकड आणि बोका यांची गोष्ट अंमळ ध्यानांत आणावी म्हणजे झालें. तसें केलें असतां कोणाचीही खात्री होईल कीं, चांगल्या गोष्टी ठाऊक असणें किंवा त्यांचें सुरस रीतीनें प्रतिपादन करतां येणें हें एक निराळें, आणि त्या आचरणद्वारां अमलांत आणणें हें एक निराळें. पुराणिकबोवांनीं चार महिने विचाऱ्या वांग्यांचा वाग्द्वारा निषेध केला असतांही त्यांचें जिव्हालौल्य जसें त्यांस भोजनसमयीं अनावर झालें, व ' पुराणांतलीं वांगीं पुराणांत ' हा सर्वप्रसिद्ध शास्त्रार्थ आयत्या वेळेस काढून त्यांनीं आपली सोडवणूक मुकाट्यानें करून घेतली, त्याप्रमाणेंच समयीं एखादा मोठा डल्ला मारायला सांपडतो आहे तर कानांवर हात ठेवून कक्षाप्रदेश आकाशगोचर करायाला किंवा दिवाळें वाजवून आपली कीर्ति उज्वलित करायाला एका क्षणाचाही विलंब न करणारी आमच्यामध्यें मंडळी नाहींशी नाहीं !

तर आतां वरील वृत्तींच्या विवरणास लागतों. त्यांत प्रथमतः आदिरिपु लोभ. लोभास वरील स्थान देण्याचें कारण प्रसिद्धच आहे,—' लोभमूलानि पापानि ! '

या दुष्ट मनोवृत्तीचा प्रादुर्भाव आमच्या देशांतील मंडळ्यांतून अनेक तऱ्हांनीं दृष्टीस पडतो. त्यांत पहिली तऱ्हा ही कीं, पदरास दमडीचा खार न लावतां नुसतीं तोंडानें जेवढी देशहिताची बडबड होईल किंवा शुष्क कारभार करतां येतील तितके करायाचे. आर्यजननीचा महिमा यथेच्छ गावा, देशाची हलाखी हवी तितकी वर्णन करावी, वर्णन करतांना मोठा गहिंवर दाखवावा, पाहिजे तितके नाटकी आविर्भाव लोकांस दाखवावे;—पण हें सर्व कोठपर्यंत ? थैलीशीं येऊन बेतली नाहीं तोंपर्यंत ! दर

माहिन्याला हजारों रुपये आर्यजननीच्या खजिन्यांतून खाजगी थैलींत कां उतरतना; त्यांतला परत म्हणून सहसा छदामही असा अनाठायीं जावयाचा नाहीं ! एरवीं इंग्रजी कलालाला, किंवा डायमंड–बूटवाल्याला जितका अधिक पैसा जाईल तितका चांगला; किंवा डायरेक्टरसाहेब अगर गव्हर्नरसाहेब सभास्थान सुशोभित करताहेत तर अशा पर्वकाळींही जितक्या ओंझळी दक्षिणा टाकावी तितकी चित्रगुप्ताच्या दप्तरांत दाखल होणार; पण खरोखरच ज्यांत लोकोपयोगाचें काम होणार आहे, व शेंकडों-जणांच्या निर्वाहाची वगैरे तजवीज होणार आहे, असा जर एखादा नवा उद्योग कोणीं काढला, तर तो मरेना; त्याला कोणी अनुकूल व्हावयाचें नाहीं ! जन्मभर दगदग करून व दररोज काबाडकष्ट करून जी जोड करावयाची ती आपण व आपल्या बायकांपोरांनीं जर भोगली नाहीं तर मग काय राहिलें ? साऱ्या देशाचें आपण काय घेतलें आहे ? त्यांतून उद्यां जर सारा हिंदुस्थान रसातळास गेला तर जाईना; आज आहे तोंवर तर घ्या चैन उडवून, उद्यांचें कोणीं पाहिलें आहे ? आप मरा और जग डुबा !–सध्यां आमच्या देशांतली स्थिति पाहिली तर शंभरांतली नव्याण्णव मंडळी वरच्या तऱ्हेची आहे. युरोपांत आपल्या देशाकरतां प्राण खर्ची घालणारी जितकी मंडळी सांपडेल तितकी इकडे चार पैसे उचलून देणारी सुद्धां सांपडणार नाहीं. आणि त्यांतून वरच्याइतकें औदार्य तरी खालच्या प्रतीच्या साध्या-भोळ्या अडाणी लोकांत जितपत आढळेल, त्याचा दशांशही वरच्या खाशा मंडळींत फार करून आढळणार नाहीं ! इंग्रेजींत एक म्हण आहे कीं, "The nearer the church, the farther from God." (जितकें जितकें भजनालयाच्या सान्निध, तितकें तितकें भक्तीपासून दूर !) तेव्हां लोककल्याणाचा वेदांत ज्यांच्या शतशः कानांवरून गेलेला, व शतशः ज्यांनीं त्याचा स्वतःही इतरांस उपदेश केलेला, अशा वाक्पटूंच्या हृदयावर त्याचा ठसा कितीसा उमटलेला राहणार ?

मागील खेपेस लोभाचें एक स्वरूप सांगण्यांत आलें, कीं ज्यापासून देशहिताच्या कामाला फार अडचणी येतात. आतां त्याहूनही विशेष प्रत्यूहकारक व अश्लाघ्य असा दुसरा प्रकार सांगतों.

स्वहितपरता हा मनुष्यस्वभावांत एक मोठा गुण असल्यामुळें द्रव्यलोभ हा बहु-तेक मनुष्यांत अत्यंत प्रबळ आढळतो यांत कांहीं नवल नाहीं. वास्तव असें असल्या-

मुळें लोककल्याणाच्या कामाला साक्षात् द्रव्यद्वारा साहाय्य करणारे फार थोडे आढळतात हें सहजच आहे. आतां नुसता प्रलाप मात्र करून हातांतून कांहीं न सुटणें हें जरी निंदेस व हास्यास पात्र आहे, तरी याबद्दल कोणा व्यक्तीस विशेष दोष ठेवतां येत नाहीं; कां कीं ज्याची त्याची आपल्या पैशावर मालकी असल्यामुळें त्याचा व्यय करणें न करणें हें त्याच्या खुषीवर आहे. पण पुष्कळजणांचे ठायीं वरील मनोविकार हा येवढ्याच रूपानें आविर्भूत होऊन राहात नाहीं. तर एखाद्या कामांत आपण पडलों असतां जो रास्त वांटा असेल त्यापेक्षां जास्ती मिळण्याविषयीं आशा करणें, किंवहुना परप्रतारणा करून अभिलाषबुद्धि धरणें, हे प्रकारही आमच्या देशांत पुष्कळ आढळतात. कोणतीही सभा व मंडळी उपस्थित होवो, तींत प्रतिष्ठेचा वांटा किंवा पैशाचा वांटा यांच्या संबंधानें स्पर्धा उत्पन्न झाली नाहीं असा बहुधा थोडाच प्रकार आढळेल. कोणत्याही मंडळींत सभासद् होणें तें केवळ लोकहिताच्या इच्छेनें होणें, किंवा चिटणिशी अगर खजिनदारी पतकरणें ती प्रतिष्ठालोभाशिवाय किंवा द्रव्याशेखेरीज पतकरणें, या गोष्टी आमच्या देशांत फार विरळा आढळतील. मुळींच आढळणार नाहींत असें आमचें म्हणणें नाहीं, पण इतकी लोककल्याणाची खरी कळकळही फारच क्वचित् आढळणारी आहे यांत बिलकुल संशय नाहीं. एरवींचा प्रकार म्हटला म्हणजे हाच, कीं ज्यांस लोकांच्या पुढें पुढें करायाला पाहिजे किंवा आपलें नांव वर्तमानपत्रांतून वगैरे प्रसिद्ध व्हावें ही ज्यांस भारी हौस, ती मंडळी वरील कामांत नेहेमीं झटून पडायाची. मग असल्या अयोग्य इच्छा मनांत धरून जी मंडळी देशकल्याणाचीं कामें अंगावर घेणार, तिच्या ठायीं स्पर्धा, लोभ, मत्सर वगैरे दुष्ट मनोवृत्ति क्रमाक्रमानें उदयास येतात यांत नवल कसचें ? चारचौघांनीं जें कार्य आरंभिलें तें चांगलें फलद्रूप जर व्हावयाचें तर तें किती दृढनिश्चयानें व जुटीनें शेवटास नेलें पाहिजे ! पण आमच्या मंडळ्यांतून वरील गोष्टीची प्रायः वार्ताही नको. अगोदर जुटीचें काम व्हावयाचें नाहीं; आणि त्यांतून यदाकदाचित् झालेंच तर फार काळ गेला नाहीं तों लागलीच सभाजनांत फूट पडायाला लागायाची ! एकानें म्हणावें मला काम जास्ती पडतें, तेव्हां मला अधिक वांटा द्याल तर मी तुम्हांमध्यें राहीन, नाहीं तर मला जरूर नाहीं; दुसरा म्हणणार कीं अमुक अमुक गोष्टींत तुम्हीं माझें ऐकलें नाहीं तेव्हां हें आपणास खपायाचें नाहीं;—याप्रमाणें थोड्या थोडक्या कालांतच एका कार्यांत अनेक फांटे फुटतात ! पण या फांटे फोडणारांत येवढी समजूत फारच थोड्यांचे

ठायीं आढळते कीं जो मुख्य उद्देश मनांत धरून या अमक्या अमक्या कार्यांत आपण पडलों आहों तो जोंपर्यंत बिघडत नाहीं तोंपर्यंत अवांतर बारीकसारीक गोष्टी आपण कशाला मनांत आणा ? अमक्याला इतका इतका अंश ज्यास्त मिळाला. आणि आपणाला थोडा कमी मिळाला म्हणून त्यांत काय येवढी बाबत बुडाली ? किंवा अमक्या अमक्यानें अमक्या अमक्या गोष्टींत आपला हेका चालविला तर चालवीना ! मुख्य कार्यास जोंपर्यंत व्याघात होत नाहीं तोंपर्यंत येवढ्याशा तेवढ्याशाकरितां तंटाबखेडा करणें बरोबर नाहीं. जो आपणास खरा देशाहितेच्छु म्हणवीत असेल, व ' पिंडे पिंडे मतिर्भिन्ना ' हें तत्त्व ज्यास चांगलें माहीत असेल, त्यानें अनेक प्रसंगीं वरच्यासारखे अनेक विचार मनांत आणणें जरूर आहे हें कोणासही सांगायाला नको ! पण वरील समजुतीची आवश्यकता आणि तिचें वास्तव्य हीं बहुधा आमच्या देशांत व्यस्त प्रमाणांतच आहेत, हें इकडील कांहीं सभांची हालहवाल ज्यानें लक्षांत आणली असेल त्याच्या ध्यानांत आल्यावांचून राहणार नाहीं.

येथवर वरील विषयाच्या संबंधानें आम्हांस जे कांहीं विचार आमच्या देशबंधूंस कळविण्यासारखे वाटले, ते त्यांस सादर केले. आतां प्रस्तुतसारख्या विवेचनाच्या संबंधानें लोकांचे प्रसंगवशात् जे कांहीं विलक्षण ग्रह होतात, त्यांच्या संबंधानें थोडेंसें लिहून हा विषय आटोपतों.

आमच्या देशांत सध्यां एक चमत्कारिक दुफळी झालेली आहे. वांसपंचवांस वर्षांपूर्वी वरील दुफळी म्हटली म्हणजे जुने व धर्मभोळे लोक व अलीकडील विद्वान् मंडळी अशा प्रकारची होती. हल्लीं ती स्थिति पालटून गेली आहे. मागें ज्या ठिकाणीं जुनी मंडळी होती तेथें आतां आमच्या संबंधानें जी जुनी मंडळी, म्हणजे अव्वल सुधारणेंतले पुढारी लोक, ते झाले आहेत. तेव्हां या मंडळीनें आजपर्यंत काय काय कृत्यें केलीं, व त्यांत गुणदोषांचे भाग कोणकोणते आहेत, यांविषयीं हल्लींच्या नवीन मंडळीची चर्चा चालू आहे. आतां ही खरोखरी पाहतां आमच्या नवीन सुधारणावाल्यांस विशेष दुःसह होऊं नये; कां कीं, एक तर त्यांनीं जो चर्चेचा कित्ता घालून दिला, तोच आम्हीं पुढें चालविला आहे, व शिवाय पूर्वीच्या लोकांस बरें-वाईट म्हणण्याचा अधिकार जसा आमच्या मागच्या मंडळीनें खुशाल घेतला, तसाच तो आम्हांस घेण्यास प्रत्यवाय कोणता ? पण ही गोष्ट येवढी उघड असतां मनुष्य-

स्वभावास खिळलेला जो स्वाभिमान त्याच्या प्राबल्यास्तव पुष्कळ पंडितमन्य जनांस चांगलीशी दिसत नाहीं असें वाटतें. त्यांचा ग्रह असा झालासा वाटतो कीं, आम्हीं आजपर्यंत दुसऱ्याचें दोषाविष्करण केले तें सर्व ठीक होतें; पण आमच्यावर तोच प्रयोग होण्यास आम्ही अगदीं पात्र नाहीं. आमच्या करणीस नांवें ठेवण्यास कोणासही अधिकार नाहीं.

वरील असमंजसपणाच्या उक्ति केवळ अशाच रीतीनें कोणी बोलण्यांत आणीत नाहीं हें खरें; तरी एकंदरींत पहातां हाच मतलब आमच्या आजपर्यंतच्या पुढारी मंडळींच्या वागणुकीवरून नजरेस येतो. त्यांवर रास्त रीतीनें येणारा दोषही कबूल करण्यास त्यांस मोठी पंचाईत पडते; तो कांहीं तरी लटपट करून आपणांवर येऊं न देण्याविषयीं त्यांची उत्सुकता आढळते; किंवा निदान मत्सर, अनुभवशून्यता वगैरे गोष्टींचा आरोप तरी आपल्या प्रतिपक्ष्यावर करून ते आपलें समाधान करूं पाहतात ! हा सर्व प्रकार आम्हांस फार अश्लाघ्यतेचा वाटतो. शहाणपणाचा प्रवाह आपल्यापर्यंतच काय तो येऊन येथें जान्हवीप्रमाणें गुप्त झाला ही समजूत अगोदर किती बरें कोती आहे ! त्याचप्रमाणें आपण जो अधिकार आपल्या पूर्वीच्या मंडळींवर चालवला त्याविषयीं आपल्या पुढल्या मंडळीस मात्र मनाई करणें ही तरी केवढी कुत्सित दृष्टि ! तसेंच आपण जें जन्मभर दोषाविष्करण केलें तेवढें मात्र सर्व केवळ लोकहितार्थ, आणि आतां जो कोणी वरील व्रत चालवील तो मात्र तसें करण्यानें खोडसाळ ठरणार, हा तरी केवढा अन्याय आहे ! !

तर येथें सरतेशेवटीं या आमच्या पत्रांतील लेखांच्या संबंधानें आम्ही पुनः सर्वांस स्पष्टपणें सांगून ठेवतों कीं, सर्व विषयांवर आमचीं जीं जीं मतें विचार करतां करतां ठरलीं आहेत तीं तीं जशींचीं तशीं प्रांजलपणें व निर्भीडपणें येथें नमूद करण्याचा आमचा दृढसंकल्प आहे. तीं मनुष्याच्या प्रमादपात्रत्वास्तव कधीं कधीं चुकीचींही असतील, नाहींतशीं नाहीं; पण सत्यनिष्ठेहून अन्य ज्या कुत्सित मनोवृत्ति त्यापासून त्यांचा उद्भव मात्र कधींही असणार नाहीं याविषयीं आमची आम्हांला खात्री आहे. कोणाची हांजीहांजी करून " भूमौ निपत्य वदनोदरदर्शनं च " इत्यादि प्रकार जसा ' केसरी ' च्या स्वभावास सर्वथा विरुद्ध, त्याप्रमाणेंच आडून घाला घालण्याचें घातुकत्व व भीरुत्व हेंही होय. तर वरील निंद्य मनोवृत्तींची संभावनाही आमच्या वाचकांनीं करूं नये. लोकांस सर्व विषयांच्या संबंधानें यथार्थ ज्ञान व्हावें व त्यांस आपले योग्य अधिकार नीट समजावे हा उद्देश सिद्धीस नेण्यास स्पष्टोक्तीशिवाय दुसरा मार्ग

नाहीं. हें कसें लिहावें, तें कसें लिहावें, या वाक्यानें सरकारची खप्पा मर्जी होईल, तें अक्षर अमक्या अमक्याला बोंचेल, या भीतीनें जो आपलीं खरीं मतें बाहेर काढण्यास भिईल त्याच्या हातून वरील हेतु कधींही चांगल्या रीतीनें सिद्धीस जाणार नाहीं. तर याच पूर्वसंकल्पास अनुसरून आमच्या देशांतील सभा व मंडळ्या यांचे संबंधानें आमच्या जें जें दृष्टोत्पत्तीस आलें तें तें आम्हीं सर्वांस जाहीर केलें. त्यांत सत्यनिरूपणाखेरीज आमचा दुसरा कोणताही हेतु नाहीं. यास्तव सदरील सभांचा अभिमान धरणाऱ्या मंडळींस जरी आमचे विचार न रुचले, तरी ते यथार्थ आहेत कीं अयथार्थ आहेत, याविषयीं त्यांनीं अवश्य विचार केला पाहिजे. केवळ वृथाभिमानानें जर ते सदरील मंडळ्यांतल्या दोषांवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करतील तर ते कधींही निघावयाचे नाहींत; व दोष न निघाल्यानें सभांची व्यवस्था आजपर्यंत चालली आहे तशीच पुढेंही चालेल. असें झालें असतां काय परिणाम होईल तोही सांगायाला नकोच, कीं सभांपासून अपेक्षित जें लोकहित तेंही अर्थातच त्यांपासून सिद्ध होणार नाहीं.

तर हा उपसंहार करून आम्ही आपली लेखणी खालीं ठेवतों.

[वर्ष १ अंक १२।१३।१४।१५।१६।१७।१८।१९।२०.]

समाइकीनें उभारलेल्या भांडवलाचे कारखाने

पाश्चिमात्य लोकांचा व आपला जसजसा दिवसानुदिवस जास्त निकट संबंध येऊं लागला तसतसें, त्यांच्या राजकारस्थानांत, व्यापारांत व गृहस्थितींत काय काय गोष्टी आपण घेण्यासारख्या आहेत, ह्यांचें ज्ञान आम्हांस होऊं लागलें व तदनुसार आमच्या राजकारस्थानप्रकरणीं विचारांत व कृतींत, तसाच गृहस्थितीसंबंधींही विचारांत बराच फरक पडला व अजूनही पडेल. परंतु अद्याप व्यापारासंबंधीं आम्हीं त्यांची कांहींच शैली उचलली नाहीं हें पाहून वाईट वाटतें. इंग्लंड देश आजं येवढ्या योग्यतेस चढला तो केवळ व्यापाराचे जोरावर. इंग्लंड देश जो धनकनकसंपन्न झाला तोही त्याच जोरावर. इंग्लंडांत प्रजापक्ष जोरावर आहे याचेंही कारण व्यापारच. अमेरिकेंत हल्लीं प्रजासत्ताक राज्य आहे, व अमेरिकेचा दरारा ही मोठा आहे, यासही कारण व्यापार. एकंदरींत देशोन्नतीस व्यापार कारणीभूत आहे असें म्हणण्यास आम्हांस काडीइतकी देखील शंका वाटत नाहीं. तर ज्याप्रमाणें राजकारस्थान, गृहस्थिति वगैरेमध्यें सुधारणेचा झपाटा चालला आहे, त्याचप्रमाणें आमचा व्यापार उर्जित दशेस आणण्याची खटपट सुरू झाली तर डोमकावळ्याप्रमाणें पिसें लावून जे लोक आज मोठा डौल मारीत आहेत, त्यांस 'चें चें' करीत लावण्यास फारसा उशीर लागणार नाहीं. विलायतेहून येणाऱ्या कापडावरील जकात कमी होऊं लागली कीं, आमचे कारखानदारांचें धाबें गडाडलेंच. विलायतेहून एखादी नवी कंपनी आली कीं आमचे मंडळींनीं घेतलाच तोंडावरून पदर! ही स्थिति मोडण्यास फार काल लागणार नाहीं. कित्येक लोकांचें मत आहे कीं, व्यापार वाढवा, व्यापारांत सुधारणा करा, कच्चा माल विलायतेंत जाऊंच देऊं नका; या सगळ्या गप्पा सांगतां येतात; पण या सर्व गोष्टींस तत्त्वमासि लागते, तिची वाट काय हें कोणी सांगत नाहीं. इतर लोकांचें कांहींही म्हणणें असो, आमची पक्की खातरी आहे कीं या व्यावहारिक ब्रह्माकरितां जितकें अडून पडलें आहे त्यापेक्षां व्यापाराकरितां भांडवल कसें तयार करावें व तयार झालें असतां त्याचा योग्य विनिमय कसा करावा, घातलेल्या भांडवलापासून जास्त फायदा कसा करून घ्यावा, वगैरे गोष्टींचें अज्ञान आम्हां लोकांमध्यें आहे. व यामुळेंच व्यापारास मागें ओढ आहे. विलायत वगैरे ठिकाणीं पैसा उमाप आहे ही गोष्ट तर खचीत; परंतु त्याची व्यापार

करण्याची जी हतोटी आहे ती फारच विलक्षण. याच संबंधानें थोडे दिवसांपूर्वी 'नाइन्टीन्थ सेन्चुरी' नांवाचे मासिक पुस्तकांत एक निबंध आला आहे, त्यांतील सूचना फारच ग्राह्य व प्रस्तुतचे आमचे स्थितीस फारच अनुकूल अशा आहेत. आम्हांमध्यें दोन गोष्टींची मोठी उणीव असते. एक भांडवल. दुसरी परस्परांवर विश्वास. या दोनही अडचणी दूर होण्यास दोन सुलभ उपाय आहेत ते हे कीं, कारखान्यांत काम करणारे लोकांची प्राप्ति कारखान्याचे नफानुकसानीवर अवलंबून ठेवावी; व कारखाना उभारण्यास लागणारे भाडवलांत कारखान्यांतील प्रत्येक मनुष्याचा भाग असावा किंवा दुसरा उपाय हा कीं, भांडवलाशीं मजुरदारीचा संबंध न ठेवतां त्यांचे ठरलेले मजुरीपेक्षां दरसाल त्यांस नफ्यांपैकीं त्यांचे कामाचे किंवा पगाराचे मानानें त्यांस मेहेरबानी म्हणून जास्त बक्षीस मिळावें. येवढेंच सांगून या विषयाचें स्वरूप बराबर लक्षांत येणार नाहीं, म्हणून प्रथमचे उपायाबद्दल थोडीशी जास्त माहिती सांगतों. एका कारखान्यांत शंभर माणसें कामास लागतात व तो कारखाना उभारण्यास दहा हजारांचें भांडवल लागतें, अशी आपण कल्पना करूं. तर ह्या दहा हजार रुपयांचे हजार भाग करावे. त्यांपैकीं दोनशेंपर्यंत भाग मजूर लोकांकरितां, तीनशें भाग वरिष्ठ लोकांकरितां, व राहिलेले पांचशें भाग कारखान्याचे उत्पादकांकरितां म्हणून राखून ठेवावे. कारखान्यांत जो मजूर ठेवावयाचा त्यानें निदान एक भाग तरी घेतलाच पाहिजे किंवा आपले भागापुरती हमी तरी दिली पाहिजे. त्याचप्रमाणें वरिष्ठ लोकांची व्यवस्था. ज्या मजूरदारांस आपल्या भागांचे रुपये भरण्याबद्दल पैसे मिळणार नाहींत, परंतु जे त्या रकमेबद्दल हमी देतील, त्यांचे पैसे कारखान्याचे उत्पादकांनीं घालावे. याबद्दल त्यांस काय मोबदला मिळावयाचा वगैरेबद्दल नफ्याची वांटणी कशी करावी यांत निकाल होईल. याप्रमाणें भाग काढून भांडवल उभारल्यावर धंदा सुरू झाला म्हणजे कारखान्याचे नफानुकसानीबद्दल अंशतः तरी कळकळ प्रत्येकास लागेल; व अशी कळकळ प्रत्येकास लागली म्हणजे तीन प्रकारचा फायदा होईल. प्रथम, नफानुकसानी, सर्वांची प्राप्ति व काळजी यांवर अवलंबून राहिल्यामुळें, मजूरदार लोक कळकळीनें काम करितात, व त्यामुळें काम जास्त होतें. याचे प्रतीतीकरितां फार फार लांब जाणें नलगे. घराची एखादी भिंत बांधणें झालें किंवा घराचीं कौलें शाकारणें झालें तर मक्त्यानें दिलेलें काम जास्त लवकर होतें. कित्येक अशी शंका घेतील कीं, जास्त जलदीनें झालेलें काम त्याच प्रमाणानें वाईट होतें. हें कांहीं अंशीं खरें आहे;

परंतु वरील कारखान्याची जी गोष्ट आहे तिला मात्र हें म्हणणें लागू पडत नाहीं. कारण कारखान्यांत झालेलें काम चांगलें नसेल, तर कामास खो बसेल, याची कळकळ कामगारांस राहते. यामुळें काम जास्ती तर होतेंच, पण तें चांगलें सुद्धां होतें. दुसरा फायदा हा कीं, देखरेखीकरितां एकदोन कांहींतरी मनुष्यें लागतात तीं लागत नाहींत; कारण एक खेळला तर त्यापासून होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी सर्वांवर येत असल्यामुळें सर्वांची नजर एकमेकांवर असते. तिसरा फायदा हा कीं, मालमसाल्याची नासधूस होत नाहीं. कारण मालाची नासधूस म्हणजे स्वतःचा नफा बुडविण्यासारखें होतें. याप्रमाणें तीन प्रकारचे फायदे आहेत. या नियमाप्रमाणें भांडवल उभारून शेकडों कारखाने इंग्लंड, फ्रान्स, व अमेरिका या ठिकाणीं चालू आहेत. याच रीतीनें भांडवल उभारल्यास परस्पर विश्वास कसा वाढतो, याची थोडक्यांत माहिती सांगतों. अशा मंडळ्यांबद्दल हिशेब वगैरे बद्दलचे सरकारी कायदेकानू कडक आहेत, त्यामुळें हिशेब वेळचेवेळीं ठेवावे लागल्यामुळें ते चोख राहतात. एकाच मनुष्याकडे कोणतेही प्रकारचें एक काम पुरें राहत नसल्यामुळें एकट्यास लबाडी करतां येत नाहीं, व पांचचारजणांनीं मिळून केलेली लबाडी फार दिवस गुप्त राहत नाहीं. एकाच मनुष्याकडे एक काम पुरें राहत नाहीं. येवढें म्हणून समज चांगलासा होणार नाहीं. म्हणून त्याबद्दल एक उदाहरण देतों. एका मनुष्याचें काम, त्यानें मालाची नुस्ती किंमत ठरवावी. दुसऱ्यानें त्याबद्दल बिल करावें; तिसऱ्यानें रुपये द्यावे, व चवथ्यानें पावती घ्यावी. कारखाना बंद करण्याचेपूर्वी एका मनुष्यानें त्या सगळ्यांचीं टिपणें एकदम गोळा करावीं व मेळ घ्यावा. गेले दुष्काळांत होळकर सरकारांनीं इंदुरांत दाण्याचीं दुकानें घातलीं होतीं त्यावेळेस अशाच प्रकारची व्यवस्था केली होती, म्हणून ऐकतों. दाणे घालणारानें किंमत ओरडून सांगावी, कारकुनानें टांचण करावें, खजीनदारानें पैसे घ्यावे, व चवथ्या मनुष्यानें रुपये, अधेल्या, पावल्या व चवल्या यांबद्दल निराळ्या दोऱ्यास प्रत्येक वेळीं निरनिराळी गांठ मारावी. संध्याकाळचे सुमारास महाराजांकडून अलगसी एक मनुष्य येई, आणि शिलकेची पेटी, कारकुनाचें टांचण, व गांठीच्या दोऱ्या घेऊन जाई व मेळ घाली. यामुळें लबाडी व चूक अगदीं झाली नाहीं. या रीतीनें माणसें थोडीं जास्त लागतात, पण काम बिनचूक व चोख होतें. आम्हीं सांगितल्याप्रकारचे कारखान्यास माणसांची तूट पडणार नाहींच.

मागील अंकीं या कारखान्याच्या प्रथम दोन रूपांचें थोडेंसें वर्णन करून पहिल्या स्वरूपाबद्दल साधारण माहिती दिली. त्याप्रमाणें दुसऱ्या प्रकाराबद्दल आज थोडीशी माहिती देऊन नंतर कच्च्या हकीकतीकडे जाऊं. या कारखान्याचें दुसरें रूप म्हणजे नेहमीं सारखीच रोजमुऱ्याची व्यवस्था असून सालअखेरीस नफ्यापैकीं बक्षिसादाखल म्हणून थोडे पैसे जास्त देण्याचे तजविजींनें चालविलेले कारखाने हें होय. हल्लीं आपले देशांत जो उदीम चालू आहे, त्या उदीमांत ही पद्धति कोठेंही आढळांत येत नाहीं. म्हणजे मजुरी करणारे कामगारांस त्यांच्या मेहनतीबद्दल नक्त नेमणूक ठरवून दिलेली असते. त्यापेक्षां पगार वाढल्याखेरीज जास्त पैसे देण्याची चाल नसते. पगार वाढविण्याचें साधन दरसाल नसतें. कारण धंद्यास कांहीं वेळ आलेली तेजी सारखी रहाण्याचा संभव कमी असल्यामुळें पगाराचें मान वाढविण्यास मालक रास्तच कांकू करतो, व पगार वाढला तर मालकासमोर पुढें पुढें करणारांचा मात्र पगार वाढतो. यामुळें थोडेच दिवसांत हलक्या दराचे कामकरी लोकांत अतृप्ति उत्पन्न होऊन मजूर लोक फार दिवस एकाच ठिकाणीं टिकत नाहींत, किंवा कारखान्यांत आल्याबरोबर यजमानाची मेहेरनजर आपणावर व्हावी म्हणून ज्या उत्साहानें ते लोक काम करीत असतात तो उत्साह रहात नाहीं, व काम अलगरजीपणानें होऊं लागतें. यामुळें कारखाना जसंजसा जुना होत जातो, तसतसा नफा वाढत जात नाहीं; यामुळें दहापांच वर्षांनींच कारखाने मोडकळीस येतात किंवा त्यांचें रुटुखंटू करणारें रूप तरी बदलत नाहीं, आणि कारखाने घालणाराचा हुरूप नाहींसा होतो, व एकंदर व्यापारास तेजी दिसेनाशी होते. ह्या सर्व अडचणी वर सांगितलेल्या नव्या पद्धतीनें दूर होतात. कारण मेहेनतीबद्दल रोजमुरा मिळून नफ्यापैकीं कांहीं भाग सालअखेरीस पदरीं पडण्याची कळकळ असल्यामुळें, कारखान्याचा नफा करण्याकडे सर्व लोकांचा एक दिल लागतो. असें होऊन उत्साहबुद्धि प्रज्वलित राहते, व ज्याचे त्याचे मेहेनतीचें चीज त्याचे त्याचे श्रमावर आहे अशी प्रत्येकाच्या अंतःकरणांत बुद्धि उत्पन्न होऊन एकंदर कारखाना जारीनें चालतो.

आतां मजूर किंवा हलक्या दर्जाचे लोक यांची स्थिति सुधारल्याखेरीज देशाची स्थिति सुधारत नाहीं, असें जें कित्येकांचें म्हणणें आहे त्यांत कितपत तथ्य आहे त्याचा विचार केला म्हणजे देशोन्नतीचे बिकट प्रश्नाचा उलगडा सहज होईल. देश सधन असो, किंवा निर्धन असो, जित असो, किंवा अजित असो, सुधारलेला असो, किंवा रानटी असो, लोकसंख्येचे मानानें हलक्या दर्जाचे म्हणजे काबाडकष्ट

करून निर्वाह करणारे लोकांची संख्या जास्त असावयाचीच. याकरितां या समाजाची स्थिति जोंपर्यंत सुधारली नाहीं, तोंपर्यंत देशस्थिति सुधारली असें कधींही म्हणतां येणार नाहीं. म्हणून या लोकांची स्थिति सुधारण्यास सुधारणेच्छूंनीं पहिली खटपट चालविली पाहिजे. मितव्यय, विद्येचा प्रसार, आरोग्यशास्त्रज्ञान, वगैरे सुधारणेचीं मुख्य साधनें असल्यामुळें, यांचा प्रसार लोकांत कसा होईल इकडे आमच्या बहुतेक बडया पंडितांचें लक्ष लागलेलें दृष्टीस येतें. इतर कित्येक गोष्टींप्रमाणें या प्रकरणांतही आमचा व या बडया मंडळींचा मतभेद आहे. तो असा. एखाद्या झाडावर बसलेल्या पक्ष्यास गोळी घालून तिच्या जोरानें तो उंच उडविला, तर तो उंच गेला असें म्हणण्यास प्रत्यवाय बिलकुल नाहीं. त्याप्रमाणेंच आपले पंख पसरून हातपाय हालवून एखादा पक्षी वर गेला, तर त्या कृतीसही उंच जाणेंच म्हटलें पाहिजे. दोन्ही निरनिराळ्या कृति असून त्यांचे निरनिराळे व्यापार घडून हवेंत उंच जाण्याची एकच क्रिया घडली खरी, परंतु दोन्ही उंच जाण्यांत जमीनअस्मानाची तफावत आहे, हें सांगणें नको. तद्वतच रावबहादुरी सुधारणा करण्याचे पद्धतींत व आमचे सुधारणा करण्याचे पद्धतींत विद्यावृद्धीची जरूरी ज्यांस वाटत नाहीं, किंवा विद्यावृद्धीपासून होणारे फायदे ज्यास आज समजत नाहींत, मुलाबाळांस लहानपणापासून नेहेमीं उंचदार कपडे घातल्यापासून किंवा कदान्न घातल्यापासून होणारे नफानुकसानीचबद्दल ज्यांस अनुमान करतां येत नाहीं, मूर्तिपूजेपासून किंवा एकेश्वरी मतापासून जे भावी स्थितीस अपाय किंवा उपाय होणार त्यांचा ज्यांस नीट तर्कसुद्धां आज करवत नाहीं, अशा लोकांस त्यांचेच हिताकरितां म्हणून विद्यावृद्धीकडे लावण्यासाठीं किंवा आरोग्यशास्त्रांतील ठरावांचें उल्लंघन होऊं नये म्हणून, किंवा धर्मतत्त्वाची चांगली उमज पाडून त्यांचीं मनें विकसित व्हावीं या हेतूनें, सुरू केलेल्या खटपटी त्या त्या कामाचे पुरस्कर्त्यांबरोबरच लयास जातात. हा रावबहादुरी प्रकार झाला. आमचा प्रकार यापासून भिन्न आहे. आमचें सदैव असें म्हणणें आहे, कीं सुधारणेस लागणाऱ्या साधनांची ज्यांची त्यांस अवश्यकता वाटूं लागली पाहिजे, व अशी अवश्यकता वाढविण्याचें काम आम्हीं उत्तम बजावलें तर रावबहादुरी पद्धतीनें झालेली पन्नास वर्षांची सुधारणा आम्ही किंवा आमचे मतानुयायी लोक पांच वर्षांत करतील. याबद्दल आपणांजवळ पुरावाही आहे. अजमासें पन्नास वर्षें झालीं, अमेरिकेमध्यें एक चानिंग नांवाचा गृहस्थ होता; त्याचे सर्व परिश्रम या सुधारणेच्या कामाकडे लागलेले असत. तो या रावबहादुरी मताचाच होता. त्यानें खूप झटापट्या

खाल्ल्या, परंतु विशीबाविशीही गुण दृष्टीस पडेना. याचे महत्कार्याकडे दुसऱ्या एका देशभक्ताचें चित्त लागलें होतें. त्याचें म्हणणें कीं आमच्या राजश्रीची सर्व खटपट योग्य खरी, परंतु मोठ्या मेहनतीनें लोकांत उत्पन्न केलेला उत्साह टिकावा कसा? पहावें तों फलाणें मत प्रतिपादन करणाऱ्याबरोबर त्याचा व त्याचे अनुयायी लोकांचा अंत!! असे खटपटी लोकांचा पुरवठा सारखा होणार कसा? व हें सुधारणेचें तारूं पुढें ढकलावें कसें? या खटपटींत तो होता. अखेरीस त्याचा कीस काढकाढून त्यानें निर्णय ठरविला, कीं याची गुरुकिल्ली थोडी आहे. हपिसांत साहेबांना मळका पोषाक आवडत नाहीं म्हणून स्वच्छ कपडे घालणारास स्वच्छ कपड्यांची हौसच लावून दिली म्हणजे झालें. विद्या शिका, विद्या शिका अशा हाका मारून या वेड्या गोळ्यांचे मागें लागण्यापेक्षां विद्येची गरजच यांस न पडेल असें केलें तर बस. असें ठरवून मोठ्या प्रयासानें त्यानें एक कोटी शोधून काढली ती अशी, कीं निरनिराळ्या धंद्यांचा परस्पर संबंध अशा रीतीनें बदलावा कीं, बदललेल्या संबंधाचीं स्वाभाविक फळें म्हणजे विद्येची जरूरी, आरोग्यशास्त्रज्ञानाची अवश्यकता, मितव्ययबुद्धि, धर्माचें ऐक्य व देशप्रीतीची अभिरुचि, वगैरे आपोआप उत्पन्न व्हावींत. असा ठराव करून त्यानें या सर्व गोष्टींचा मेळ 'प्राप्तीच्या वांटणीवर' आणून बसविला. हें औषध इतकें लागूं पडलें, कीं याचे अंगच्या दीपनपाचनशक्तीचें फळ आजची अमेरिका व फ्रान्स हीं होत. या एका खुबीनें सर्व देशास आळा घालून देश सुधारणेच्या कूटप्रश्नांचा उलगडा ताबडतोब करून टाकला. त्याचेच धर्तीवर आमचे पुढें असलेल्या प्रश्नाचाही उलगडा होत असल्यामुळें आम्ही 'प्राप्तीचे वांटणीवर' घुसलों. येथपर्यंत समाइकीनें उभारलेल्या भांडवलाचे कारखान्यांचे दोन्ही रूपांचें थोडक्यांत निरूपण झालें. एखादे वेळीं प्राप्तीच्या वांटणीबद्दल लिहूं.

2403

राजसत्तेची उत्पत्ति आणि अभिवृद्धि

कोणत्याही मनुष्याच्या शरिरांत एखाद्या मोठ्या रोगानें ठाणें दिलें कीं, शुष्क कारणावरून पडसें, खोकला, अग्निमांद्य वगैरे हलक्या प्रतीचे आजार तेव्हांच उपजतात आणि फार पीडा देऊं लागतात. कितीही जपा, हवीं तशीं पथ्यें करा, बरें म्हणून कांहीं वाटावयाचें नाहीं, व कांहीं केलें तरी अंगीं लागत नाहीं. पण तीच प्रकृति रोगविरहित असली तर पडशाखोकल्यास कोणी जुमानीत देखील नाहीं. कित्येक तर उलटें कुपथ्य देखील करितात. हा मनुष्यशारीरकाचा नियम राज्यशारीरकाला पुष्कळ अंशीं लागतो. राष्ट्र केवढेंही अफाट असो, लोक सुधारणेच्या कळसास जाऊन पोहोंचलेले असोत, संपत्ति तेथें पाणी भरीत असो, जर "परवशता तिखट सुरी" त्याच्या काळजाला लागली असली, तर त्याचा तक्वा तेव्हांच नाहींसा होतो, व तें तेव्हांच फिक्कें पडतें. अगोदर कोणतेंही मोठें कृत्य आरंभण्यास चोहोंकडून बाहेरचे आणि घरचे अडथळे येऊं लागतात, व मोठ्या मारामारीनें असें महत्कृत्य तडीस नेलें तरी त्याचें चीज होत नाहीं. घरचा कर्ता पुरुष गेला म्हणजे घराणें जसें तेव्हांच बसतें, तसें ज्याचें स्वातंत्र्य नष्ट झालें आहे, असा देश अल्पकाळांत सर्व प्रकारें ऱ्हासास पावतो. जगाच्या इतिहासांत या दुःखकारक सत्याचीं अनेक उदाहरणें आहेत. सुधारणा दोन प्रकारांनीं होते. रानटी स्थितीपासून टक्केटोणपे खात खात हळू हळू योग्यतेस चढणें, हा एक सुधारणेचा प्रकार. दुसरा प्रकार तिसऱ्या लोकांनीं ती घशांत कोंबणें. हें बाहेरचें उसनें अन्न चांगलें असलें तरी खाण्याची व जिरवण्याची संवय नसल्यामुळें तें पचत नाहीं. एका देशांतील सुधारणेचें कलम दुसऱ्या देशांतील झाडावर चांगलें लागलें असें फार क्वचित् होतें. बहुतेक वेळां दोघांचा एक जीव न होतां गांठ बनते. व तिच्या योगानें कलम तर सडून जातेंच; पण कलम जडवीत असतां मूळ झाडाची फार आपदा झाल्यानें त्याची पूर्वीची नैसर्गिक झपाट्याची वाढ खुंटते, इतकेंच नाहीं, तर कधीं कधीं त्याचा अगदीं खराटा होतो. बरोबरीचा प्रकार अगदीं आलाहिदा होय. संसारांत या गोष्टीचे दाखले महामूर सांपडतात. समवयस्क, समानशील, समानपदवी, समानरूप अशा पतिसमागमानें तरुणीच्या अंगावर मुसमुसणारी ऐन ज्वानींतली कांति कोणीकडे, व बिजवर वधूवर त्याच्या हट्टामुळें आलेला आकालिक चोपट व निस्तेज परिपक्वपणा

कोणीकडे. मिल्लसाहेबांनीं एके ठिकाणीं असें स्पष्ट म्हणून दाखविलें आहे कीं, एका सुधारलेल्या राष्ट्रानें दुसऱ्या अर्धवट रानटी किंवा सुधारलेल्या राष्ट्रास जिंकून तेथील लोकांवर आपले सुधारलेले कायदे आणि रीति लादल्यानें त्या राष्ट्राच्या स्वाभाविक तरतरीचा व शौर्याचा नाश झाल्यामुळें, त्याच्यावर विकलत्व येऊन एकंदरींत त्याची फार हानि होते. अठराव्या शतकाच्या सुमारास बर्क म्हणून एक ऐरिशमन इंग्लंडांत प्रख्यात राजकीय वक्ता होऊन गेला, त्याचें नेहमीं असें म्हणणें असे कीं, राज्यव्यवस्था झाडाप्रमाणें वाढत जाते; चोहोंकडून आणिलेल्या चुन्यादगडानें ती घराप्रमाणें पाहिजे तेव्हां व हवी तेथें बांधतां येत नाहीं. तात्पर्य, सार्वजनिक सुधारणा होण्यास स्थित्यनुकूलता पाहिजे. कारणांचा योग्य योग जमल्याशिवाय कार्याची निष्पत्ति कांहीं केलें तरी व्हावयाची नाहीं. आतां कारणांचा योग्य योग घडवून आणणें कांहीं अंशीं बाह्य वस्तूंवर अवलंबून असतें व कांहीं अंशीं आपल्याच स्वाधीन असतें. या बाह्यान्तर कारणांचा संयोग झाला कीं, कार्योत्पत्तीस अवकाश लागत नाहीं; इंग्रजी अमलानें या देशांत जो सुधारणेचा प्रकार चालला आहे तो असाच सुरू राहिल्यानें त्याच्या योगानें फारसें चांगलें होईल असें वाटत नाहीं. धातूच्या पत्र्यावर मातीचा थर चढविल्याप्रमाणें होत आहे. कॉलेजांतील कित्येक पढीव ग्राज्वेट किंवा डिग्रीवाले मिल्लकामटीप्रभृति तत्त्ववेत्त्यांच्या अनुपमेय विचाररसांचें आधाशासारखें प्राशन करून कॉलेजाला सोडचिट्टी देऊन जगांत आल्यावर मागेंपुढें न पाहतां, व आपल्या देशस्थितीचा विचार न करितां, नाहीं नाहीं ते विचार लोकांस अकालीं सांगूं लागतात, व लोकांस न रुचेल अशा रीतीचें सुधारलेलें वर्तन ठेवितात, यामुळें त्यांच्या सांगण्याचें आणि करण्याचें कांहीं वजन पडत नाहीं. ज्या गोष्टींचा आगापिछा लोकांस मुळींच माहीत नाहीं, अशा गोष्टींचें प्रतिपादन केल्यानें त्यांस काय होय? कोणत्याही विषयाची धारणा होण्यास त्यासंबंधीं, निदान त्याच्या आसपासची तरी, थोडीबहुत माहिती पाहिजे. अशी माहिती नसल्यामुळें मंडळ्या आणि सभा यांच्या स्थापकाबरोबरच त्यांचाही शेवट होतो यांत नवल तें कोणतें? चंद्राच्या वक्तृत्वोत्तेजक सभेचा पहिला विषय "मुख्त्यार सभे" चा आहे. आमच्या लोकांना "सरकार" म्हणजे काय, हें सुद्धां बरोबर कळत नाहीं. अशा लोकांपुढें रिप्रेझेंटेटिव्ह गव्हर्नमेंट म्हणजे मुख्त्यार सभेच्याद्वारें राज्यकारभार, या विषयाची चर्चा केल्यानें कांहीं फायदा होईल असें आम्हांस वाटत नाहीं. ज्याविषयीं हिंदु लोकांना मुळींच माहिती नाहीं, असा एखादा विषय असेल तर तो राजसत्तेचा उगम कोठून

होतो, तिची अभिवृद्धि कशानें होते, कोणत्या बाबतींत तिचा हुकूम पाळावा व कोणतींत पाळूं नये, वगैरे गोष्टींचें केवळ अज्ञान हा होय. सरकार हा काय पदार्थ आहे, याचा उत्पादक कोण, याचा रक्षणकर्ता कोण, हें कोणाचें रक्षण करतें, या बागुलबोवास किती भ्यावें, याजवर उलटून केव्हां पडावें, वगैरे प्रश्नांचें उत्तर थोड्यांसच देतां येईल. संपादनीय वस्तूंत पहिल्या प्रतीची संपादनीय वस्तु ज्ञान होय; व ज्ञानांत देखील राज्यशास्त्राचें ज्ञान असणें हें फार अवश्यक. घर विकावें लागलें तरी किंवा वार लावून मुलगा शाळेंत जात असून रुपयाभर फी देण्यास त्याला सामर्थ्य नसलें तरी, दोनचारशें रुपये कर्ज काढून त्याचें लग्न झालेंच पाहिजे. कोणी अडपता दडपता नसला म्हणजे मूर्ख लोकांच्या खुळेपणाचें पीक चांगलें समजतें. नाहाण आल्याशिवाय मुलींचीं लग्नें करूं नयेत असा अकबर बादशहानें केलेला कायदा मान खालीं घालून चटसाऱ्या लोकांनीं ऐकिला. पेनाच्या सपाट्यासरशीं दयावंत बेंटिंगसाहेबांनीं पतिमरणांत स्त्रीहत्त्या बंद केली. जर्मनी वगैरे देशांत अमुक एक वय झाल्याशिवाय लग्नेंच होऊं देत नाहींत. सारांश, आमच्या देशांत मूर्खपणाचा जो प्रसार होत चालला आहे, त्याला कारण कोणी आटपता नाहीं म्हणून. वर्तमानपत्रकर्त्यांनीं कितीही रड गायली म्हणून हट्टी व मूर्ख लोकांची कशी समजूत पडणार? पण स्वतःची राजसत्ता नाहीं, जें सरकार आहे तें अशा कामांत मन घालीत नाहीं; तेव्हां दादापुता करूनच लोकांचीं मनें वळविलीं पाहिजेत. ज्या कोणास चांगल्या मतांचा प्रसार करणें असेल त्यांनीं आपला सर्व राग आपल्याशींच गिळून टाकून लोकांचा तिरस्कार न करितां, त्यांच्यापुढें त्या मतांचें नित्य प्रतिपादन केलें पाहिजे. लोकांस सोडून देऊन अरण्यांत तर रडत बसावयाचें नाहींना ? सत्ता हातीं नसल्यामुळें पुष्कळ काळ लागेल; एखादे वेळेस फार मेहनत करूनही ती अगदीं व्यर्थ जाईल; पण याला काय उपाय ? ज्यांच्या हातांत सत्ता नाहीं, पण शहाणपण आहे, आणि लोकांचें चांगलें व्हावें याबद्दल खरी कळकळ आहे, त्यांनीं धिमेपणाचा अंगीकार करून हातून होईल तितकी खटपट करावी. या विषयाच्या संबंधानें आणखी पुष्कळ लिहावयाचें आहे तें पुढल्या अंकांत लिहूं.

मागें या विषयाच्या संबंधानें उपोद्घात मात्र केला आहे. आज थोडाबहुत थेट विषयांत प्रवेश करण्याचा आमचा इरादा आहे. हा विषय जसा गहन तसा विस्तृ-

तही आहे, हें मागें सुचविलेंच आहे. तरी यासंबंधानें वाचकांस आमचें येवढेंच सांगणें आहे कीं, त्यांनीं न कंटाळतां या विषयावर येणाऱ्या निबंधाकडे विशेष लक्ष द्यावें, व कोणास कांहीं शंका आल्यास, किंवा आमच्या मतांविरुद्ध कोणाचीं मतें पडल्यास, त्यांनीं तीं पत्रद्वारां आम्हांस कळविण्याची मेहेरबानी करावी.

आतां प्रथम राजसत्ता म्हणजे काय व ती आली कोठून, या प्रश्नाचा निर्णय करावयाचा. कारण राजसत्ता या शब्दाचें स्वरूप नीट कळल्याशिवाय सरकार या शब्दाची खरी कल्पना यावयाची नाहीं. एखादा तांत्रिक विचार करणारा असें म्हणेल कीं, " राजसत्ता " या शब्दाचा अर्थ आणि व्युत्पत्ति करण्याची तुम्हांस इतकी पंचाईत कशासाठीं पडली आहे ? राजाची जी सत्ता ती " राजसत्ता. " हा षष्ठितत्पुरुष समास. या सामासिक शब्दाचा अर्थ राजाची शक्ति किंवा अधिकार हा होय. पण आम्हांला व्याकरणासंबंधीं शंका कधींच आली नव्हती. " राजाची जी सत्ता ती राजसत्ता " येवढें सांगून उलगडा होत नाहीं. राजसत्तेची उत्पत्तिच कशी झाली, या प्रश्नाचा निर्णय करावयाचा आहे. राजाला राजपद कसें मिळालें, राजा आणि प्रजा हा भेदाभेद पृथ्वींत कसा झाला, हा प्रश्न सोडवावयाचा आहे.

या बिकट प्रश्नाला अनेक तत्त्वशोधकांनीं अनेक उत्तरें दिलीं आहेत, व त्या सर्वांचा एकमेकांशीं मेळ पडतो असें नाहीं. कोणी असें म्हणतात कीं, राजा ईश्वराचा अंश. या उत्तरानें आमचें तरी बिलकूल समाधान होत नाहीं. ज्या मनुष्यांत ईश्वराचा अंश असतो, त्याला विशेष तें काय असतें ! कोणताही मनुष्य राजा होऊं शकेल. तो राजा झाल्यावर त्याच्यांत ईश्वराचा अंश आला या म्हणण्यांत काय अर्थ आहे ! आम्ही सगळेच ईश्वराचीं लेंकरें; यासाठीं आम्हां सर्वांत ईश्वर अंशरूपानें आहे; यास्तव ईश्वराचा अंश अमक्याच व्यक्तिमात्रांत आहे, हें म्हणणें खोटें आहे. राजा ईश्वराचा अंश आहे, या म्हणण्याचा कदाचित् असा अर्थ करितां येईल कीं, ईश्वराप्रमाणें राजास आपण मान दिला पाहिजे. ईश्वराच्या आज्ञेप्रमाणें राजाज्ञेचें उल्लंघन करितां कामा नये.

दुसरें असें म्हणतात कीं, राजा ईश्वराचा अंश वगैरे हें मत अगदीं पोरकट आणि खोटें आहे. ईश्वरानें ही जड सृष्टि एकदां निर्माण करून टाकिली व तिला कांहीं अनादिसिद्ध नियम घालून दिले आहेत. त्या नियमांप्रमाणें सृष्टियंत्र चाललें आहे. ईश्वर त्याच्याशीं कधींही ढवळाढवळ करीत नाहीं. आतांशा सृष्टीची जी एकसारखी

उत्तरोत्तर सुधारणा होत चालली आहे, तीवरून विचार करितां असें अनुमान होतें कीं, जीं राष्ट्रें आजतारखेस सुधारणेचे कळसास जाऊन पोहोंचल्यासारखीं दिसतात, तींच एकदा पराकाष्ठेच्या रानटी स्थितींत होतीं, त्यांत सदा लढाई सुरू असे; कोणाचें कोणाशीं पटत नसे; व बळी तो कान पिळी, हा कायदा जिकडेतिकडे जारीनें अमलांत असे. ज्याला जें वाटेल तें त्यानें करावें. अशा स्थितींत जो कोणी शूर, दांडगा, युक्तिवान असेल त्यानें इतरांचा पाडाव करून त्यांवर आपलें वर्चस्व बसविलें असेल. एकाद्या दांडगेश्वरानें कांहीं मित्रमंडळी एकत्र गोळा करून आसपासच्या लोकांस जिंकून टाकल्यामुळें, राजसत्तेस आरंभ झाला असावा असें कित्येकांचें म्हणणें आहे. पृथ्वीची आद्यस्थिति भांडण्याची आणि तंट्याचो; या तंट्यांत जो पुढें सरसावला तो राजा झाला. याप्रमाणें राजसत्तेच्या उत्पत्तीची पीठिका कित्येक लावून देतात.

दुसरे तत्त्वशोधक म्हणतात कीं, वरील पीठिका बरोबर नाहीं. त्यांच्या मतें राजसत्तेच्या उत्पत्तीचें कारण निराळेंच आहे. संपादिलेल्या वस्तूचा ज्याचा त्यास उपभोग घेण्यास सांपडावा, व दुसऱ्यांनीं हल्ला करून ती बळकावूं नये, ही इच्छा मनुष्यमात्रास अगदीं स्वाभाविक आहे. पृथ्वीवर फार दिवसांपूर्वी अगदीं थोडी वस्ती होती. कोणी कोणावर अवलंबून नसे. बहुतेक लोक शिकार करून आपला निर्वाह करीत असत. घरदार वगैरे कोणाला कांहींएक नसे. पण उत्तरोत्तर लोकसंख्या जसजशी वाढत चालली, व नुसत्या शिकारीवर पोट भागेनासें झालें, तसतशीं निराळीं घराणीं एकमेकांजवळ येऊं लागलीं इतकेंच नाहीं, तर अन्नासाठीं एकमेकांवर हल्ला करूं लागलीं. कोणीं शिकार करून मांस साठवून ठेविलें असल्यास तेंच पळवावें; कोणाजवळ दुभतीं जनावरें असल्यास तींच पळवून न्यावीं; ओबडधोबड शेत करून कोणीं कांहीं धान्य पिकविलें असल्यास तेंच कापून न्यावें असा क्रम सुरू झाला; व त्यामुळें आपआपसांत मारामाऱ्या आणि लढाया होऊं लागल्या कोणाला कशाचा भरंवसा नाहींसा झाला. ही आपली वस्तु; ही उद्यां आपली आपल्याकडे राहील किंवा नाहीं, याची शंका पडूं लागली. ही झोटिंगपादशाही मोडून टाकावी म्हणून सर्वांनीं एक सभा भरविली व तींत असें ठरविलें कीं, परस्परांमधील तंटे तोडण्यासाठीं एक तिऱ्हाईत नेमावा व तो सांगेल त्याप्रमाणें सगळ्यांनीं वागावें. जो या तिऱ्हाइताचा हुकूम मोडील त्यास बाकीच्यांनीं ठोकून काढावें. कोणीही खासगी रीतीनें वैर साधूं नये. कांहीं आगळिक झाल्यास या तिऱ्हाइतास ती कळ-

वावी व दंड करणें तो यानें करावा. याचा हुकूम पाळला जावा, यासाठीं सर्वांनीं याला साहाय्य करावें. ही सभा कधीं कोणीं भरविली होती या गोष्टीची ऐतिहासिक माहिती आम्हांस देतां न आली तरी अशी सार्वजनिक सभा मागें खचित झाली असावी असें या पक्षाचे तत्त्वशोधक म्हणतात. सर्वांनुमतें नेमलेला हा तिन्हाईत. हाच पुढें राजा झाला. याची सत्ता ती राजसत्ता. राजसत्तेच्या उत्पत्तीबद्दल अशा प्रकारची कोणी हकीकत देतात.

[वर्ष १. अंक १४।१८.]

जूट

अन्यैःसह विरोधे तु वयं पंचाधिकं शतम् ।
अन्योन्यसंविरोधे तु वयं पंच च ते शतम् ॥

जूट हा शब्द पुष्कळ वेळां उपयोग करण्यांत जरी येत नाहीं, तथापि हा पुष्कळ लोकांस माहीत असेल. कारण कालगतीच्या फेऱ्यांत सांपडल्यामुळें आमच्या लोकांतील व्यक्तीभूत व समाजभूत अवश्य गुणांचा लोप झाला असतांही, त्या गुणांचीं नांवें आम्ही अद्याप विसरलों नाहीं; व अशी स्थिति येण्याचा झोंक जरी हल्लीं दिसतो, तथापि तिचें आगमन लवकर होत नाहीं असें म्हणतां येईल. आतां वरील दशा टाळण्याचें मनांत आणलें तर हें काम मोठें दुस्तर आहे असें नाहीं. परंतु भित्रेपणा, अवसानघातकीपणा, मोठमोठ्या देशांतील शहाण्या लोकांनीं व निस्पृही साधूंनीं निंदिलेला अष्पलपोटेपणा, काम, मद, मत्सर इत्यादि विषयांनीं आमच्यापैकीं बहुतेकांचें मन अगदीं जख्ख, खिळून टाकल्यामुळें त्यांना जागचें हालतां येत नाहीं इतकेंच नव्हे, तर जागच्या जागीं हूं कां चूं सुद्धां करतां येत नाहीं. मग त्यांस मोकळेपणानें इतर स्तुत्य व पूज्य व आपल्यास व इतरांस सुखावह असे गुण सांठविण्यास कोठून येणार ? नाहीं, उघडच. खरोखर पाहतां मनाचे व्यापार चालावेत तसे चालत नाहींत. ज्या मनांत स्वतंत्रतेचे झरे फुटावेत तेथें परतंत्रतेचा बांध येऊन बसला. जेथें स्वाभिमान जाज्वल्य असावा, तेथें आत्मनिंदेचें दडपण पडलें. जेथें देशभक्तीचा सदैव उदय असावा, त्या ठिकाणीं देशविटंबनेचे मेघसमुच्चय येतात. जेथें लोककल्याणाचे झेंडे फडफडावे, तेथें स्वार्थपरतेचा झंझावात दृष्टीस पडतो. तेव्हां मनाची अशी दशा उडाल्यावर त्यापासून उत्पन्न होणाऱ्या कृति कोणत्या प्रकारच्या असतील ह्याची कोणीही कल्पना करील. आमच्या मनाचे जे उमदे गुण त्यांचा अस्त झाल्यामुळेंच हल्लींची स्थिति आमच्या लोकांस प्राप्त झाली आहे. ह्या अस्तजन्य अंधारांत आम्ही नेहमीं ठेंचा खातों, कधीं कधीं कोलमांडून तोंडघशीं पडतों, कधीं चुकून किंवा जाणून लोकांस पाडतों, आपल्या आपल्यांतच झोंबाझोंबी करतों; आपला कोण, परका कोण, याची मुष्कील पडते; आपल्या शत्रूला मित्र मानून कवटाळतों, व मित्राला शत्रुवत् झुगारतों; खरें असून खोटें वाटतें; आपलें परक्यादाखल लेखतों; रुपेरी बिडी तोडयाप्रमाणें लटकावतों; साव आला

असतां चोर म्हणून ओरडतों; चोरास घरांत जागा देतों; अशा भयंकर अंधारांत जर एखादा बारकासा पण तेजःपुंज असा प्रशस्त–सद्गुणांचा प्रकाश चमकला तर मग पुसूंच नये ! आमची दृष्टि दिपून जाऊन पूर्वीपेक्षां जास्त काळोख भासतो; व मति गुंग होते. चाचपत चाचपत सांपडलेला मार्गही हुकून जातो. ही अवस्था ज्या मनुष्यास भासमान होत नाहीं, तो मनुष्य असून पशु समजला पाहिजे. अशी दैना जरी प्राप्त झाली आहे तरी आम्हास दिलेल्या स्मरणशक्तीच्या कृपेनें आमचे गत किंवा, निदान दुरावलेले, जे सद्गुण त्यांचा विसर पडला नाहीं. हल्लीं धैर्य जरी नाहीं तरी तें काय हें सांगतां येईल; आपल्या पोळीवर तूप जरी भराभर ओढतों, तरी परोपकार काय आहे हें आम्ही विसरलों नाहीं; नेहमीं दुसऱ्यावर अवलंबून राहण्याची जरी संवय झाली आहे, तत्रापि स्वावलंबन हा शब्द ओळखीचासा वाटतो; हांजी हांजी करतांना जन्म गेला, तरी वाजवी वर्तणूक परकीशी वाटूं लागली नाहीं. परतंत्रता जरी आमच्या हाडास खिळून गेली आहे, तत्रापि स्वतंत्रता हा शब्द उच्चारल्यावर जी सुखाची उकळी फुटावयाची ती कमी होत नाहीं. जुनें सर्व धाब्यावर जरी बसवितों, तरी त्यांतील कांहीं कांहीं चांगलें असें समजतों. त्याप्रमाणेंच एकी जरी नाहीं, तथापि ऐकून तरी ठाऊक आहे. देशाभिमान जरी आढळत नाहीं, तत्रापि खरा देशाभिमान म्हणजे काय हें समजण्याकरितां मोलस्वर्थचा कोश अद्याप शोंधावा लागत नाहीं. तर या रीतीनें जरी असावे ते गुण नाहींत, किंवा असले तर कोठें कळत न कळत, तत्रापि त्यांची कल्पना करितां येते; व ते काय, किती मोलाचे वगैरे समजतें. अशाच गुणांपैकीं वरील द्व्यक्षरी शब्द जूट हा होय. हा शब्द योजण्यासारखी जागा जरी आढळांत येत नाहीं, तथापि घरांतील माणसांची जूट म्हणजे काय, आळीची जूट म्हणजे काय, पेठेची जूट म्हणजे काय, गांवाची जूट म्हणजे काय, त्याप्रमाणेंच शहराची, जिल्ह्याची, इलाख्याची, देशाची जूट जी म्हणतात ती कशी असते व किती सुखावह व किती उपयोगी आहे हें आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस माहीत असेलच. याकरितां जूट ह्या छोटेखानी साध्या शब्दाची व्याख्या लांबलचक वाक्यांत संस्कृत किंवा जोडाक्षरी शब्दांनीं देण्याची अवश्यकता दिसत नाहीं. आम्ही जिला जूट म्हणतों ती एखाद्या हलकट कामाकरितां अविचारी लोकांची टोळी नव्हे. स्वस्थता नाहींशी करून टाकून उगीच पुंडावा माजविणाऱ्यांची टोळी ती आमच्या 'जूट' या शब्दांत येत नाहीं. आपआपसांत तंटे वाढविण्याकरितां गावगुण्ड लोकांचें ऐकमत्य त्याचा आमच्या जुटीशीं तादृश संबंध

नाहीं. उगीच चिटणिसांची किंवा अध्यक्षांची जागा पटकावण्याच्या उद्देशानें मारूनमुटकून आणलेल्या लोकांच्या जुटीपासून आम्ही म्हणतों ती जूट फार निराळी आहे. आपली पोकळ वाक्शक्ति दाखविण्याकरितां मारामारीनें जमलेली मंडळी आमच्या जुटींत मुळींच येत नाहीं. आम्हांसच खरें तत्त्व काय तें कळलें अशी फुकट फुशारकी मारण्याकरितां जमलेला मेळा आमच्या जुटीच्या कांहीं अंतरावर आहे. खऱ्या मनानें, कळवळ्यानें, अंग मोडून देशकल्याण, विद्यावृद्धि, कलावृद्धि वगैरे स्तुत्य उद्योगांत झटणाऱ्यांचा जो एकदिल त्याला आमच्या मतें, 'जूट' म्हणणें रास्त दिसतें व आम्ही ह्या शब्दाचा अर्थ वरील समजतों.

गेल्या निबंधांत जी जूट सांगितली, ती फायदेशीर आहे, असें कोणीहि विचारी मनुष्य कबूल करील. कित्येक मात्र याला नांवें ठेवतील. असे लोक कोणते म्हणाल तर कुटिलनीतींतील निष्णात झालेले मंत्री. हे 'जूट' व 'तट' हे शब्द समानार्थी समजतात. कारण उघडच आहे, कीं मनुष्यें एकमेकाला धरून एकदिलानें चाललीं म्हणजे ह्या मंत्र्यांचा मंत्र लटपटतो. ह्यांच्या कृतींत, बोलण्यांत किंवा लिहिण्यांत यत्किंचित् काळेंबेरें दिसलें कीं, क्षणांत त्याची माहिती लोकांस होऊन चुकते; भावी अनिष्ट गोष्टींचा ते विचार करितात, त्यांची शाहानिशा करितात; एकमेकांचा सल्ला घेतात आणि नेटानें विरोध करण्यास मागेंपुढें पहात नाहींत. पण तेच चार चहूंकडे झाले म्हणजे एकाची दाद दुसऱ्याला लागत नाहीं; ज्याचा पायपोस त्याच्या पायांत नसतो; परस्परांची गांठ पडणें निश्चित नसतें; मसलत मिळण्याची मारामार पडते; व वेळ पडली असतां विरोधही असंभाव्य होऊन बसतो. मनुष्य कितीही हुशार, धूर्त व विद्वान् असो, जर का पाठबळ नसलें, तर पंगूवत् त्याला जागचे जागीं बसावें लागतें. पण जेथें जूट म्हणून आहे, तेथें चमत्कार हा कीं, अगदीं यःकश्चित् मनुष्यास सुद्धां भरींत भर पडून उपयोग झाल्याविना रहात नाहीं. ह्यावरून स्पष्ट काय होतें कीं, ज्यास म्हणून ईश्वरानें अक्कल दिली आहे, तो असें म्हणणार नाहीं कीं, मला सार्वजनिक काम करणें झालें तर मी आपला एकटाच करीन. असें जर तो म्हणेल तर हें त्याचें धनमदांतलें बरळणें, किंवा उत्तान विलसित आहे, ही अज्ञानांधकारांतील भ्रांति आहे, विद्वत्तेची ही ऐट आहे, किंवा अहंपणाचा हा तोरा आहे, असें म्हणणें भाग पडेल.

आतां जुटींतील मंडळींपैकीं कोणी तरी पुढारीपणाचें जूं आपल्या खांद्यावर घेतलें पाहिजे. त्याच्या शिरावर जबाबदारी मोठी असते. तो जर आमच्या हल्लींच्या पुढारी म्हणविणाऱ्या लोकांसारखा असला तर फत्ते कधींहि व्हावयाची नाहीं. तो मनाचा धीट असला पाहिजे. देशाचें मी सदैव कल्याण इच्छितों व मी जाणूनबुजून कधींही त्याच्या अपायास कारण झालों नाहीं, एवढ्यावरच त्याचें समाधान होतां कामा नये. अशी तोंडानें वल्गना करणारी मंडळी आमच्या महाराष्ट्रांत थोडी का आहे ? त्यांस वाटतें कीं, लोकांचें कल्याण कोणतें व अकल्याण कोणतें, एवढें एखादे वेळीं सांगून दिलें म्हणजे आपण कृतकृत्य झालों. आम्हांला याहून जास्त खटपट करण्याची हो काय जरूर ? आमच्या म्हणण्याप्रमाणें लोक वागले व त्यांत त्यांचें कल्याण झालें तर आम्हांस फुशारकी मारावयास ठीक पडेलच. बरें, यदा-कदाचित् त्यांत त्यांची प्रतारणा झाली, तरी आमच्या पदरास खार मुळींच लागत नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्यांच्या वर्तनांत कांहीं तरी अविचार झाला असेल असें म्हणण्यास आम्ही पुनः तयारच. तर अशा लोकांसारखा जुटीचा पुढारी नसावा. शिवाय त्याच्या बोलण्यांत व वागणुकींत कांहीं विसंवाद असूं नये. हल्लीं ज्यांचें बोलणें एकीकडे व कृति भलतीकडे, असे लोक पुष्कळ सांपडतात. बोलण्याच्या किंवा लिहिण्याच्या भरांत हवें तसें बोलून जाऊन पुढें आचरण पाहिलें तर ' पुराणांतील वांगीं पुराणांत ' ह्या म्हणीप्रमाणें प्रकार दिसतो. सांगतांना सांगावयाचें कीं, लोकांनीं आपला पैसा व्यापारवृद्धि करण्याकडे लावावा; परंतु पहिल्या तारखेस या बोवाजींची बहुकष्टार्जित रक्कम खजिन्याची दिशा धरते. एकमेकांकरितां झटावें, तुम्हांस असें वीस वेळां करण्यास देखील फारशी हरकत नाहीं म्हणून सांगावयाचें, पण प्रसंग आला असतां माझा उपयोग तुम्हांला फार होईल असें वाटत नाहीं म्हणून प्रशान्तमुद्रेनें सांगावयाचें. तर सांगणें हेंच कीं, अशी स्थिति वरील पुढारी मनुष्याची नसावी. त्यानें असा निश्चय मनांत दृढतर करून ठेविला पाहिजे, कीं सत्य व रास्त जें आहे तें मी लोकांच्या मनांत पूर्णपणें बिंबविण्यास झटेन, इतकेंच नाहीं, तर तें प्राप्त करून घेण्याकरितां सदासर्वकाळ कायावाचामनेंकरून झटेन. त्यांत कमलालया चपला आपला परित्याग करील, खुशाल करो; आपल्या स्वतःचे हाल होतील, खुशाल होवोत; आपणास सुख दुरावेल, खुशाल दुरावो; फार तर काय, पण प्राणावर जरी येऊन बेतली तरी ते वेंचण्यास मागें म्हणून घेणार नाहीं. त्यानें आपल्या जुटींतील लोकांस आपणासारखें समजलें पाहिजे. त्यांपैकीं स्तुत्य

कामांत झटत असतां, जर एखाद्यावर बाजू आली तर ह्यानें मदत केली पाहिजे. त्याचें सुख तें आपलें सुख, त्याचा अपमान तो आपला अपमान, त्याचें नुकसान तें आपलें नुकसान व त्याचा फायदा तो आपला फायदा असें विचारसामर्थ्य झालें पाहिजे. असा पुढारी मनुष्य व त्याप्रमाणेंच एक दिलानें झटणाऱ्या लोकांची जूट जर असेल तर राजकीय कामांत काय, सामाजिक कामांत काय, धर्मसंबंधी कामांत काय हवें तें होणार आहे. आमची पक्की खातरी आहे कीं, जुटींतले लोक मोठमोठालीं कामें थोड्या श्रमानें थोड्या वेळांत हवीं तशीं उठवून देतील; हिंदुस्थान अमेरिका बनवतील व आपल्या कर्तबगारीनें इंग्लंडला देखील माना तुकावयाला लावतील. हा सर्वोत्तम व भारतवर्षीयांस अत्यानंददायी दिवस उगवेपर्यंत तरी निदान अधिकारगर्वानें फुगलेल्या साहेबांच्या रुत्यांवर जुटीचा बराच दाब बसेल व मन मानेल तसें वागणाऱ्या लोकांस आपणांवर कोणी तरी सव्वाशेर आहेत असें वाटेल, व हिंदुस्थान पाश्चात्यांस 'निर्वीरमुर्वीतलं' असें दिसणार नाहीं, व आमच्याही लतकोडगे लोकांस समजेल कीं आपली नुसती "जो हुकूम" म्हणण्याची जुक्ती व्यर्थ होते.

गेल्या निबंधांत सांगितल्याप्रमाणें खरा पुढारी व खरी जूट असली म्हणजे थोडक्या वेळांत फार आयास न पडतां आपल्यास स्वतंत्रतामंडित देशाचें जूं घेतां येईल. सात आठ मुंग्या एकवट प्रयत्नानें किती मोठा साखरेचा खडा हां हां म्हणतां आपल्या राहण्याचे जागीं नेतात, हें वाचकांस अवगत असेलच. तर त्यांच्या चिमुकल्या शरीरापेक्षां मोठें ओझें त्या वाहतात, हें लक्षांत आलें म्हणजे आपल्याला जें कांहीं आजमित्तीला असंभाव्य दिसत आहे, तें थोडे दिवसांत संभवनीय होईल, हेंही लक्षांत येईल. मग आमचें राजनीतिनैपुण्य व बुद्धिविशदत्व हीं आम्हांस मुद्दाम दाखविण्याची जरूर पडणार नाहीं. मनाचा थोरपणा व दूरवर दृष्टि हीं न सांगतांच लोकांस कळतील, व आमची विचारशक्ति, कलमबहादरी व धैर्य हीं आपोआप समजलीं जातील. शिवाय; हिंदु म्हणजे तृणभक्षण न करणारे दोन पायांचे पशु अशी जी कित्येक पाश्चात्यांची समजूत झाली आहे, ती जाऊन आपल्या बरोबरीचे, किंबहुना काडीभर जास्त, असे हे भारतवर्षीय लोक मनुष्यच आहेत, अशी त्यांची पक्की खात्री होईल. परंतु ही सुधारणा व भूषणास्पद जूट जर नसली, तर देशाचे किती हाल होतात, लोकांतील पाणी किती कमी होतें, ते दुर्बळ किती होतात, त्यांची दैना कशी होते, व्यापाराची किती दुर्दशा उडते व जनसमूहाचें सुख किती लयास जातें,

हें आमच्या देशांतील लोकांस तरी निदान सांगावयाला नको. वरील स्थिति आम्ही आज बरींच वर्षें अनुभवीत आहों. आपली, आपल्या देशाची, व आपल्या राजांची पूर्वीची स्थिति व आतांची स्थिति पाहिली असतां अक्कल गुंग होते; काय करावें तें कांहीं वेळ सुचत नाहीं व अंतःकरणांत दुःखाचे उमाळे आल्याशिवाय रहात नाहींत; व ज्याला अंतःकरण म्हणून आहे, व ज्याला आपल्या मनोवृत्तीचें यत्किंचित् तरी ज्ञान आहे, त्याची अशी स्थिति झाल्यावांचून राहणार नाहीं. पहा ज्याच्या संपत्तीचा महिमा दिगंतरीं जाऊन पुष्कळ द्रव्यलोभी लोकांच्या तोंडाला पाणी सुटलें, तो देश कोणीकडे व हल्लींचा कंगाल देश कोणीकडे! पूर्वी हजारों स्वाऱ्या करून कोट्यावधि धन येथून बाहेर जात असतां आमच्या देशास काडीभरही पर्वा नव्हती, ती वेळ कोणीकडे, व दुष्काळाचें किंचित् चिन्ह दिसतांच किंवा कराची वार्ता कानीं पडतांच ह्या देशाच्या तोंडचें पाणीं पळतें, अशी हल्लींची वेळ कोणीकडे! हिरेजडित सोन्यारुप्याचीं सिंहासनें कोणीकडे व हल्लींच्या आमच्या राजांच्या मश्रूच्या भिकारी गाद्या कोणीकडे! गतकाळचें आमचें कलाकौशल्य व चलाखी पाहून फिरंगी व आंग्लभौम लोकांस दरारा पडून बिचाऱ्यांस प्राच्यपटप्रतिबंधक कायदा करण्याची पाळी आली, तो लौकिक कोणीकडे व हल्लीं आम्ही ज्ञानकलाचापल्यहीन आहोंत, अशी अष्टदिशाप्रसृत द्वाही कोणीकडे! ज्यांना परदेशीय लोक फार सन्मान देत असत, असे आमचे पूर्वज आम्हांला हल्लीं धक्काबुक्की, अर्धचंद्रप्रदान व लत्ताप्रहारादि उपचारयुक्त जो सन्मान मिळतो, तो पाहून काय म्हणत असतील! ज्यांना टोपीवाल्यांनीं भेटीच्या वेळीं बहुमान केला, त्यांस आपले नातू पणतू दीनवत् बुटाचे जागीं हातपाय जोडून उभे राहिलेले पाहून किती वाईट वाटत असेल बरें! ज्या राजेलोकांपुढें जातांना रुमालांनीं हात बांधावे लागत व हल्लीं पूर्ण पवित्र दैवत होऊन बसलेला बूट राजवाड्याबाहेर काढून टाकावा लागे, त्यांनीं (आमच्या धर्माप्रमाणें) विमानारूढ होऊन आपले वंशज कसा काय कारभार पाहताहेत हें अवलोकन करण्याकरितां पृथक् पृथक् राज्याकडे जर विमानाचें सुकाणूं फिरविलें तर त्यांच्या नजरेस काय पडेल बरें! आपल्याला जे बहुमान देत असत, तेच टोपीवाले आपल्या वंशजांचा हवातसा उपमर्द करीत आहेत, असें त्यांस नाहीं का दिसणार? व ही स्थिति पाहून ते नाहीं का चडफडणार? काय थोरवी पूर्वीच्या राजांची व किती नीचावस्था हल्लींच्यांची! केवढा धाक त्यांचा व किती भेकडपणा त्यांच्या संततीचा! त्यांचे जे दोस्त व हस्तक ते हल्लीं त्यांच्या मुलाबाळांचे अधिराजे व धनी होऊन

बसले आहेत. हे जें सांगतील तें आधुनिक राजांनीं शिरसा मानिलें पाहिजे. हे जेव्हां हुकूम करतील तेव्हां विलंब न लावतां त्याप्रमाणें त्यांनीं वागलें पाहिजे. नाहीं तर आलीच दंडाची थैली ! ह्यांच्याशीं बाकून राहिलें कीं कधींना कधीं तरी तसें वागणारास मद्रपूर दिसणार! ह्यांनीं दुर्बळ राजास सबळ्याच्या मिषानें हुकूम करावयाचे कीं चला अमकीकडे किंवा भरदुष्काळ असतां चला आमच्या दिल्लीच्या बड्या तमाशाला परिवारासमवेत ! असा हुकूम झाला कीं त्यांनीं निमूटपणें कूच केलाच पाहिजे. हे कसेही वागले तरी त्यांत त्यांनीं आपला सन्मान झाला असें झकमारीत समजलें पाहिजे. हे बोलतील तो त्यांच्या राज्यांत कायदा व करतील ती पूर्वदिशा, व मनीं जी कल्पना येईल तें सत्य म्हटलें पाहिजे. ह्यांनीं महत्प्रयत्नांनीं आणलेल्या शारीरशास्त्रसनत्कुमारांनीं प्रकृतीची केलेली परीक्षा बिनचूक असावयाची, निदान सोळा आणे ठरावयाची व औषधी अमोघ असावयाच्या व त्या कामांत कोणी ब्र काढिला कीं तो ठरला बदमाष आणि थोड्या वेळांत त्याची उचलबांगडी व्हावयाचीच ! तर अशी आमच्या राजांची स्थिति होण्यास,आमच्या विपत्तीचा पाय पुढें सरकण्यास, परदेशीयांचा सर्वस्वीं पगडा बसण्यास व इतर सर्व अरिष्टांस कारण आमच्यांत जुटीचा व स्वाभिमानाचा अभाव हें होय. इंग्रजांकडे त्यांचा कांहीं दोष नाहीं. मऊ सांपडलें म्हणजे कोपरानें खणण्याचा मनुष्याचा धर्मच आहे. त्यांत त्यांनीं ज्यास्त काय केलें ? यांनीं विद्या दिली, हा केवढा उपकार केला बरें ? ह्यांचा न्यायीपणाही पण आम्हांस चांगलाच श्रुत आहे. ह्यांच्यांतील सुधारणा तर आमच्या डोळ्यांसमोर नेहमीं उभी आहे. ह्यांचें दयालुत्व, मुत्सद्दीपणा, परकल्याण व दक्षता हीं आपण त्यांच्या व आमच्या इतिहासांत वाचीत आहोंत. ज्या अकलेनें त्यांनीं इंग्लंड सुधारलें, तीच अक्कल येथील सुधारणेंत ते लढवीत असतांही उपयोग होत नाहीं, हा दोष आमचा होय. सारांश, दाब नसला म्हणजे कोणताही विद्वान् मनुष्य, कोणताही शहाणा मनुष्य व कोणताही सुशील मनुष्य बहकल्याशिवाय राहणार नाहीं. त्यांत अधिकार मिळाल्यावर तर पुसूंच नये. चांगले शहाणेसुरते राजे पण लोकांचा धाकवचका नसल्यामुळें तेच प्रजेस पीडादायक झाल्याचीं उदाहरणें आपल्यास थोडीं सांपडतील, का ? तर हा दाब विद्वत्तेनें बसणारा नव्हे. तो नुसत्या वाक्पांडित्यानें किंवा सोंगानें बसणारा नव्हे, तो लट्टालट्टीनें बसणारा नव्हे, तर फक्त स्वदेशभक्तिजन्य जुटीनेंच बसेल, हें कोणीही कबूल करील.

———

अन्यैःसह विरोधे तु वयं पंचाधिकं शतम् ।
अन्योन्यसंविरोधे तु वयं पंच च ते शतम् ॥

मागें सांगितल्याप्रमाणें मोठमोठ्या राजांवर दाब जो बसावयाचा तो जुटीच्या योगानें बसतो इतकेंच नव्हे, तर देशास व लोकांस सुखावह असे कायदेकानु करण्यास, त्यांचे वाजवी हक्क जुने असतील तर चालू ठेवण्यास व नवे सुरू करण्यास जुटीसारखें दुसरें उत्तम साधन नाहीं. पहा इंग्लंडचा विजयी वुइलिअम् यानें देश काबीज होतांच तेथें स्वस्थता करून हळू हळू नॉर्मन लोक हुद्याच्या कामावर नेमण्यास आरंभ केला. मध्यें जातां जातां एवढें म्हटल्याशिवाय राहवत नाहीं कीं, बहुतेक रानटी स्थितींतील राजांचें पराजित प्रजेशीं जें वर्तन, तेंच वर्तन सुधारणेच्या शिखरास जाऊन पोहोंचलेल्या लोकांचें आम्हां जिंकिलेल्या लोकांशीं दृष्टीस पडतें. चा आमचे म्हणण्यास हल्लीं दरवर्षी नवे, अल्पवयी, अनुभवशून्य, अशा गोऱ्या बांडांचीं जहाजें भरून येतात, ही गोष्ट प्रमाण देईल. तेव्हां हें स्पष्ट आहे कीं, मनुष्यें सुशिक्षित असोत किंवा नसोत, त्यांच्यांत सुधारणा असो किंवा ते अगदीं रानटी असोत, जयापजयजन्य मनोविकार हे त्यांच्यांत उत्पन्न झाल्याविना राहत नाहींत. आतां विद्या, कला, सुधारणा वगैरेंचा थोडाबहुत अम्मल त्यांच्या मनावर बसेल, तत्रापि तो वरकांतीच बसावयाचा. असो; त्यावेळेस इंग्लंडचे लोकांनीं ही स्थिति पहातांच त्यांचे पाठीमागें लागण्यास सुरवात केली, व त्यानें कितीही कडक कायदे व ठराव केले तत्रापि हुद्याच्या जागा आपणांस मिळत तोंपर्यंत त्यांनीं त्यांस चैन म्हणून पडूं दिलें नाहीं. शाबास इंग्रज बहादरांची ! हा त्यांचा हेतु सिद्धीस जाण्यास मूळ जूट ही होय. तसेंच पुढें जानसाहेब. हे असे खंबीर असत कीं, ह्यांनीं कांहीं वेळपर्यंत सकल युरोपियनवंदितचरणयुगुल असा जो ईश्वरभूत पोप, त्यास सुद्धां मीठ घातलें नाहीं. परंतु त्याच्या आंग्लभौम प्रजेनें अजूनही ज्याचें नांव चालत आहे, अशी एक महासनद त्याजपासून मिळविली. ह्या कामांत जुटीसारखें दुसरें त्यांच्या कोणतेंही उपयोगीं पडलें नाहीं. राजानें सरासरी समजूत पाडण्याचा घाट घातला व तोही जेव्हां फसला, तेव्हां सदर सनदेवर सही करतों म्हणून त्यानें लोकांस अभिवचन दिलें. परंतु हल्लीं जशी आम्हांस शेंकडोशें अभिवचनें मिळतात व मिळत असतांनाच तीं मोडण्यास आरंभ होतो, तद्वत् त्यानें केलें, व जसें येथें म्युनिसिपालिटीचा हक्क आज देऊं, उद्यां देऊं विचार चालू आहे, वगैरे लपंडाव चालतात तोच मासला तो उठवूं लागला. परंतु तेथील त्यावेळचे लोक तसे फसणारे नव्हते. त्यांनीं कृतसंकल्प

न सोडतां व आपण पुढें झालों असतां आपली चाकरी जाईल, किंवा राजाची मर्जी गरम होईल, हा निंद्य विचार मनांत न आणितां व प्राणाचीही देशाचे कल्याणाकरितां परवा न बाळगतां, धैर्यानें समय पाहून त्यास निश्चून सांगितलें कीं, सनदेवर सही झालीच पाहिजे. एवढा मोठा राजा, परंतु बिचारा करतो काय ? पुढारी लोकांची जूट, आत्मनिरपेक्षा, व दृढनिश्चय पाहून त्यास मुकाट्यानें सही करणें भाग पडलें. इंग्रज लोक जसे त्या वेळेस होते, तसेच पुढें राहिले. इंग्लंडवर इलिझाबेतच्या राज्यांत अहंपणानें भरलेल्या फिलिपच्या अजिंक्य आरमाराची जी कडेकोट तयारी तिची फजिती उडविण्याचे कामीं मदत व्यापारी लोकांची स्वाभिमानजन्य जुटीनेंच मिळाली. त्यांची जूट पहिल्या चार्लसचे राज्यांत पुनः नेहमींच्याच तेजानें चमकूं लागली व परिणाम काय ? तर राजाचा पराजय ! सर्वांत मोठी इतिहासप्रसिद्ध गोष्ट १६८८ सालची राज्यक्रांति ही होय. ह्यावेळीं तरी जुटीचाच प्रभाव ! नाहींतर भलतेंच्या भलतेंच झालें असतें. लोकांत त्याच वेळेस धर्मसंबंधीं तंटे चालू असून, कधीं कधीं प्राणावरही येऊन बेते. परंतु राज्यप्रकरणीं ते सर्व आपसांतील तंटे गिळून टाकून त्यांनीं जुटीनें काम चालविलें, व त्यांस त्याप्रमाणें फायदाही झाला इंग्रजांत ही मोठी खुबी आहे कीं घरांतील तंटे घरांत; देशाच्या व सार्वजनिक कामांत सर्व एक. आमच्या इकडे नजर फेंकली तर त्याच्या उलट प्रकार !! आणि विशेष आश्चर्य-व-खेदकारक हें कीं, आधुनिक पाश्चात्य ज्ञानमंडित लोकांतही तो आढळतो. यांनीं इतर गोष्टींत जरी सुधारणा केल्या, तत्रापि हा दुर्गुण जशाचा तसाच कायम ठेविला आहे. मग कांहीं तरी पूर्वीचें शिलक असावें म्हणून त्यास हात लावला नाहीं कीं काय, कोण जाणे ! पण तेंसेही एकवेळ म्हणतां येईल, परंतु हा दुर्गुण वैदिक व पौराणिक वेळीं फारसा दृष्टीस पडत नाहीं. ह्या निबंधाच्या शिरोलेखालगत जो श्लोक आहे, तो कोठचा आहे, हें वाचकांस बहुतकरून कळलें असेलच. जर कित्येकांस संशय असेल तर आम्ही त्यांस सांगतों कीं, हा अलीकडच्या ग्रंथांतील नव्हे, हा स्वतः आधुनिक विद्वानांनीं पाश्चात्यांचा आमचे भार्षेत आणिलेला नव्हे, व ह्याचा पवित्र शास्त्राशीं कांहींएक संबंध नाहीं; तर हा श्रीमद्भागवतांतून घेतलेला आहे. ह्यावरून निष्पन्न काय होतें कीं, हा सकलदुःखमूलक दुर्गुण फार पुरातन काळापासून आलेला नाहीं; व जसा फार दिवसांचा वृक्ष उपटून टाकण्यास महायास लागत नाहींत, त्याप्रमाणेंच ह्या दुर्गुणाचें समुन्मूलन करण्यास मोठे प्रयत्न पाहिजेत असें नाहीं. हा कांटा काढला असतां देशाचा सर्व रोग जाईल, असा

आमचा समज आहे. ह्यानें आमच्या जुटीचा बराच जोर कमी केला आहे; हा जेथें तेथें सर्पाप्रमाणें दंश करतो; आमच्यांत व आमचे दयाळू राजे ह्यांच्यांत जे प्रकार दिसतात, त्यांस हा दुर्गुण कारण होतो. हा असला कीं काम शेवटास जावयाचें नाहींच. तर आमच्या देशहितेच्छु लोकांनीं ह्याविषयीं खबरदारी ठेविली पाहिजे. असो; जुटीच्या योगानें आणखी एक सदैव स्मर्तीत राहणारें महत्कृत्य तडीस गेलें आहे. तें कृत्य अमेरिकेची दास्यमुक्ति. अमेरिकेचा कांहीं भाग, ज्यास संयुक्त संस्थानें म्हणतात, तो तिसऱ्या जार्जाच्या कारकीर्दीत तेथील लोकांनीं स्वतंत्र करून घेतला. ही स्वतंत्रता त्यांस नुसत्या वाक्पांडित्यानें व पोकळ शब्दांच्या बारानें मिळाली नाहीं. हिच्याबद्दल स्वार्थदक्ष इंग्रज व स्वतंत्रतेच्छु अमेरिकन, ह्यांमध्यें मोठा संग्राम झाला. त्यांत अमेरिकन लोकांचें धैर्य, शौर्य, शक्ति इत्यादि गुण तर दृष्टीस पडलेच; परंतु स्वाभिमान, जूट व आरंभिलेलें कार्य तडीस नेण्याचा निश्चय, हींही जगजाहीर झालीं. सदर्हूप्रमाणें सर्व युरोपियन राष्ट्रांच्या जुटीनें नेपोलियनास एका क्षणांत रावाचा रंक करून सोडलें! तर अशीं जगविख्यात व अचाट कामें करण्यास जुटीचा इतका उपयोग असतां व तो आमच्या लोकांस सध्या तरी निदान ज्ञात असतां, तिज-विषयीं प्रीति, व उत्साह हीं नसावीं, हें आश्चर्य किंवा आमचें दुर्भाग्य नव्हे काय! दुर्भाग्यच यांत संशय नाहीं. तर आमचे तैलबुद्धि लोक अशा गोष्टी ऐकून व वाचून सुवर्णकाराच्या लोहधमनीप्रमाणें पुनः जसेच्यातसे कसे राहिले असते ? पण कित्येकांस अजून अशी शंका असेल कीं, ज्यांत हजारों धर्म व हजारों पंथ आहेत, व जो जातिभेदानें खिळून टाकिला आहे, ज्यांत हजारों तऱ्हेच्या स्वभावांचे लोक आहेत व रशिया खेरीजकरून बाकीच्या सर्व यूरोपखंडाइतकी जागा ज्यानें व्यापिली आहे, त्या आमचे हिंदुस्थानांत जूट व्हावी, हें जरा असंभवनीय आहे. गोष्ट खरी आहे. बंगाल्यांतील लोकांचा नेभळेपणा, मारवाड्यांचा कवडीचुंबकपणा, गुजराथ्यांची वाणिज्यवृत्ति, मराठ्यांची शिपाईगिरी व मद्रासी लोकांचा मिळमिळितपणा पाहून सरुद्धर्शनीं वरील शंका येणारी आहे. परंतु चांगल्या विचाराअंतीं जूट याचा अर्थ नीट मनन करून वर जी जूट इतिहासांतून दिसते, ती कशी आहे हें ध्यानांत ठेविलें असतां व जुटीचीं साधक बाधक कारणें लक्षांत आणिलीं असतां संशयनिवृत्ति होईल.

[वर्ष २, अंक ३०।३१।३३।३६.]

मनुष्याचें सामाजिक कर्तव्य

जगाच्या नित्य घडामोडींचा थोडासा विचार केला तरी आपणांस असें दिसून येईल कीं, जगाच्या आरंभापासून तों आजमितीपावेतों मनुष्यमात्राच्या उद्योगाची प्रवृत्ति जेणेंकरून आपल्या सुखाची वृद्धि होईल, तिकडेच आहे; व यावरून पहातां मनुष्यांनीं आपली स्वेच्छाचारी वृत्ति सोडून समाजरचनेचें अवलंबन करण्यांतही त्यांचा हाच उद्देश असावा; आणि वस्तुतः पहातां जसजसा हा समाज वृद्धिंगत होत जाईल, तसतसें मनुष्याचें सुखही वाढलें पाहिजे. ग्रीस देशाच्या इतिहासावरून असें कळून येतें कीं, तेथील लोकांनीं मूळची स्वेच्छाचारी वृत्ति सोडून शहराची स्थापना केली होती; आणि यद्यपि या पलीकडे त्यांचा पल्ला पोंचला नाहीं व समग्र राष्ट्राच्या भलाफापासून काय फायदे आहेत, याची कल्पना त्यांस कधीं झाली नाहीं, तथापि येवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, जोंपर्यंत त्यांनीं समाजाच्या खऱ्या नियमास अनुसरून आपली बंधुप्रीति सोडली नाहीं, ज्या शेजारच्यांस मदत करण्याचा त्यांनीं करार केला होता, त्यांच्याशीं विश्वासघात केला नाहीं व लोभास बळी पडून कपट-मत्सरादि दुष्ट मनोविकारांस आपल्या हृदयांत जागा दिली नाहीं, तोंपर्यंत ग्रीस-देशाचें नांव सर्व दुनियेवर गाजत होतें. अशाच प्रकारचीं उदाहरणें इतर देशांच्या इतिहासांतूनही देतां येतात. आणि अशा प्रकारच्या इतिहासाच्या अभ्यासापासून लोकांनीं येवढाच धडा शिकावयाचा कीं, समाजरचनेचा मुख्य उद्देश हा कीं, सर्वांनीं बरोबरीचें नातें राखून एकमेकांस प्रसंगोपात मदत करून सर्व समाजास जेणेंकरून सुख होईल, अशा रीतीनें आपली वर्तणूक ठेवावी. हा उद्देश ज्या वेळेस सिद्धीस जात नाहीं, असें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस येईल, ज्या वेळीं समाजांतील कांहीं लोक प्रबळ होऊन इतरांवर जुलूम करूं लागतील, ज्या वेळीं स्वतंत्रतारूप सूर्य-बिंबावर अन्यायाधपटलें येऊं लागतील, किंबहुना तें खग्रास होऊन जिकडेतिकडे परवशतेचा भयाण अंधःकार पडण्याची भीति असेल, त्यावेळीं तेथेंच चांचपडत न बसतां आपले सर्व इतर उद्योग क्षणभर एका बाजूस सारून मोठ्या नेटानें श्रम करून त्या प्रबळ झालेल्या मदांधांची शेंडी धरून त्यांस खालीं वांकविणें हेंच समाजांतील प्रत्येक व्यक्तिमात्राचें कर्तव्यकर्म होय. आतां यावरून समाजांतील सर्व लोकांची स्थिति सर्वतोपरी तंतोतंत सारखी ठेवण्याविषयीं सर्वांनीं झटावें, असा या लिहि-

ण्याचा रोख आहे, असें मात्र कोणी समजूं नये. एक तर समाजांत सर्वतोपरी सारखेपणा असणें असंभाव्य आहे, व दुसरें, मनुष्य श्रीमंत किंवा गरीब असणें, हें त्याच्या उद्योगावर अवलंबून आहे. मग एखादा मनुष्य आपला उद्योग, दृढनिश्चय व बुद्धि यांच्या प्रभावानें जर श्रीमान् झाला तर त्यास आपला आळस, दृढनिश्चयाची कमतरता, व अकलेची उणीव, यांमुळें दरिद्रदशेंत असणाऱ्या समाजाच्या इतर व्यक्तींनीं लुबाडून आपल्या पदवीस आणावें, हें अत्यंत अश्लाघ्य होय. असें करणें हें, हल्लीं बालविवाहाच्या चालीमुळें लहान नवरा व मोठी बायको यांचा जोडा जमला असतां मुलीस यौवनावस्था प्राप्त होऊन मुलाची फजिती न व्हावी, एतदर्थ मुलीचें मीठ तोडणें, तिला पोटभर खाऊंही न घालणें व जेणेंकरून ती मोठी न होईल, अशाविषयीं हरएक उपाय योजणें जितकें न्यायाचें व समंजसपणाचें आहे, तितकेंच न्यायाचें व समंजसपणाचें होईल. तर अशा प्रकारच्या उद्योगानें झालेल्या श्रीमान् लोकांनीं आपल्या संपत्तीचा यथेच्छ उपभोग घ्यावा, हेंच योग्य आहे. पण तेच श्रीमान् लोक आपल्या संपत्तीच्या जोरावर समाजांतील इतर लोकांवर जुलूम करतील व त्यांनीं अमुकच नियमान्वयें वागावें, असें त्यांच्या सल्ल्यावांचून ठरवून त्यांस तसें वागविण्याविषयीं अन्यायानें सक्ति करतील, तर मात्र त्यांनीं आपल्या न्यायार्जित संपत्तीच्या मर्यादेचें उल्लंघन केलें असें समजावें व तेव्हांपासून त्यांस समाजाचे शत्रु लेखावें. ह्याच मार्गाचें अवलंबन प्रथम समाजस्थापनेपासून जर मनुष्यमात्रांनीं केलें असतें, तर इतिहासांत नमूद केलेलीं जुलमी राजांचीं चरित्रें आम्हांस आज कां वाचावीं लागलीं असतीं ? नानाप्रकारच्या राज्यव्यवस्था कां उद्भवल्या असत्या ? राजद्रोहासारख्या गुन्ह्यास कायद्यांत जागा कां मिळाली असती ? नुकती १८ व्या शतकापर्यंत मोठमोठ्या सुधारलेल्या देशांत चालत असलेली मनुष्यास गुलाम करून विकण्याची हृदयद्रावक पद्धत—कीं जीविषयीं नुसतें वर्णन वाचूनही पाषाणहृदयास सुद्धां पाझर फुटतात—तीच पद्धत सुरू करून मनुष्यांनीं आपल्या माणुसकीस कलंक लावून कां घेतला असता ? तर हीं सर्व आपल्या कर्तव्यकर्मांचीं हयगय केल्याचीं फलें आपण भोगीत आहों; व हा आपणच होऊन आपल्या पायांवर धोंडा मारून घेतला आहे. आपलें स्वतंत्रतारूप धन ज्या दुसऱ्यांनीं हरण केलें, त्यांस योग्य वेळींच शिक्षा केली असती, तर जगताच्या बहुतेक भागावर दृष्टीस पडणारी अत्यंत शोचनीय व नीच अवस्था मनुष्यजातीस कधींही प्राप्त झाली नसती; व आज हे उद्गार निघण्यास मुख्य कारण जो हिंदुस्थान

देश त्यासही आज–सर्व जगांत सुवर्णभूमि म्हणून प्रसिद्ध असतां–अन्नान्नगत होऊन लाजिरवाण्या तोंडानें दुसऱ्यास याचना करण्याचाही प्रसंग कधीं आला नसता. परंतु आपलें कर्तव्य बजाविलें नाहीं याचें कारण इतकेंच कीं आमचें कर्तव्यकर्म, आमची बंधुप्रीति, आमचा देशाभिमान हीं सर्व आमच्या धर्मानें घेरून टाकलीं; आमच्या घराबाहेर कांहीं कां होईना, आमची आपली स्नानसंध्या अंतरली नाहीं व आम्हांस गोमुखींत हात घालून जप करण्यास सांपडलें म्हणजे झालों आम्ही कृतार्थ! आतां स्नानसंध्या किंवा जपजाप्य करणें वेडेपणाचें आहे, असा मुळींच या लिहिण्याचा उद्देश नाहीं. ज्यास जशी योग्य वाटेल तशी त्यानें ईश्वराराधना खुशाल करावी. परंतु "सर्वनाशे समुत्पन्नेऽर्धं त्यजति पण्डितः" हा न्याय तरी आम्हीं ध्यानांत धरावयाचा होता. आपल्या आंगवस्त्रांनीं पेट घेतला असतां तीं राखण्याच्या भरीस पडून जर कोणी आपल्या शरिराचा नाश करून घेईल, तर त्याच्या शहाणपणास आपण काय म्हणूं! आणि आम्हीं तरी याहून वेगळें काय केलें? क्षणभर आपला वेदघोष टळेल या भीतीनें आम्हीं मुसलमानांस खुशाल आमच्या देशांत येऊं दिलें व सरतेशेवटीं "होतां मुसलमान कीं कापूं मान" या द्वादशाक्षरी मंत्राचा घोष मात्र सर्व हिंदुस्थानभर केला. पुढें शिवाजीसारखा मोहरा निपजून त्यानें आमची गतस्वतंत्रता पुनः मिळविली. मग तरी आम्हीं सावध असावें? परंतु नाहींच! आमचें मोठें भूषण काय तर मनुष्याचें मुख्य कर्तव्य जें स्वतंत्रतारक्षण, त्याविषयीं आमचें पुरें औदासिन्य! पोर्चुगीज आले व त्यांनीं आमच्या देशांत ठाणीं बसविलीं; डच लोकांनीं येथें येऊन उलाढाल केली; फ्रेंच अ.ले; इंग्रज आले; येईनात बापडे! आमचें काय वेचतें! आम्हीं समाजरचना नांवाला मात्र केली, परंतु आमच्या शेजाऱ्याचें रक्षण करण्याचें कर्तव्यकर्म आम्ही विसरलों व तेणेंकरून आम्हीं आपली स्वतंत्रता मात्र गमाविली. आणि उघडच आहे कीं, जर एखादा मनुष्य आपल्या शेजाऱ्याच्या घरास आग लागली असतां त्यांत माझें काय जातें म्हणून तें विझविण्यास मदत करणार नाहीं व तें तसेंच जळत ठेवील, तर अर्थातच अशा करण्यानें तो आपल्या घराचीही राखरांगोळी करून घेईल. आणि अशा प्रकारें बंधुप्रीतीविषयीं आमचे लोक स्वतः उदासीन आहेत. येवढेंच नाहीं, तर दुसरा एखादा आपल्या कर्तव्यास स्मरून जर कांहीं हातपाय हालवील, तर तेंही त्यांस खपत नाहीं. ते म्हणतात "अहो, यांना फुकाची उठाठेव सांगितली होती कोणीं? लष्करच्या भाकरी भाजण्यावांचून यांचें कांहीं अडलें होतें? आम्ही आधींच सांगत होतों कीं, हें असेंच होणार! कां, आलें कीं नाहीं प्रत्ययाला"?

पण त्या वेड्यांना असें कळत नाहीं कीं याची लाज कोणाला, फसले त्यांना, कीं ज्यांनीं त्यांना फसविलें त्यांना ? असो; आतां वरती जें मुसलमान, इंग्रज व फ्रेंच यांविषयीं सांगितलें, त्यावर कोणी असा प्रश्न करील कीं, यांत हिंदु लोकांचा अपराध कोणता ? तुम्हींच वरती सांगितलें कीं, जसजसा समाज वृद्धिंगत होतो, तसतसें मनुष्याचें सुख वाढतें; मग इंग्रज, फ्रेंच, हिंदु, मुसलमान अशीं चार राष्ट्रें मिळून जर एक मोठा समाज केला, तर हल्लींपेक्षां चौपट सुखी आम्हीं असावें ? हो, असावें हें उघडच आहे; पण केव्हां ? समाजस्थापना सर्वानुमतें झाली असेल तेव्हां. जे नियम समाजानें पाळावयाचे, ते करतांना सर्वांची संमति घेतली असेल तेव्हां. नाहीं तर समाजांतील कांहीं लोकांनीं आपल्याच मर्जीप्रमाणें वाटेल ते नियम करून, ते जर इतरांवर लादले व तद्विरुद्ध आचरण झाल्यास जर त्यांस कायदा मोडल्याबद्दल शिक्षा झाली, तर मग खरा तो समाजच नव्हे व त्यापासून सुखाची इच्छा करणें म्हणजे भर उन्हाळ्यांत ऐन दोन प्रहरीं फोपाट्यांतून अनवाणीं चालत असतां शीतल आम्रच्छायेंत स्वस्थ पडल्यानें मिळणाऱ्या गारव्याची इच्छा करण्यासारखेंच होय. खऱ्या समाजांत अमुक मनुष्य गोरा असून इंग्रज आहे, म्हणून त्यास कलेक्टर नेमावें व अमुक मनुष्य काळा असून हिंदु आहे, म्हणून यानें पट्टे ? वाला व्हावें, हें चालावयाचें नाहीं व चालू देऊंही नये. कलेक्टरी किंवा पट्टेवाली ही जातिवर्णावर अवलंबून नाहीं, तर योग्यतेवर अवलंबून आहे; व अशा प्रकरणीं विचार करतांना गोड गोड आश्वासनावर विश्वास न ठेवतां वस्तुस्थिति काय आहे इकडे समाजानें नजर पोंचविली पाहिजे. पक्षपात झाला कीं, तो जुलूम समजून त्यांचा प्रतिकार करणें हें प्रत्येक व्यक्तिमात्राचें कर्तव्यकर्म आहे. पण इतक्या खोल दरबारांत कशाला शिरा ! ज्या गोष्टीचा आमच्याशीं अगदीं निकट संबंध आहे, तेथेंही आमचें तितकेंच औदासिन्य ! याच शहरांत पर्वतीच्या वाटेवर कालवा आहे हें सर्वत्रांस ठाऊक आहे. पण ज्यावेळेस हा कालवा बांधला, त्यावेळेस एकानें तरी सरकारास असें विचारावयाचें होतें कीं " आपण कालवा बांधतां ही प्रजेच्या कल्याणाचीच बाब आहे, सर्व ठीक आहे; पण त्यानें आमची पर्वतीची वाट बंद होते, याची वाट काय ! " विचारतो कोण ! नाहीं वाट तर नाहीं गेले पर्वतीला. तसेंच म्युनिसिपालिट्या ह्या काय आहेत ? जसें आपण घराची झाडलोट करण्यास एखादा गडी ठेवून देतों, त्याप्रमाणें शहराची व्यवस्था ठेवण्यासाठीं नेमलेल्या मंडळ्या ह्या; ह्यांनीं आमच्या हितासाठीं झटावें, पण हें कळतें आहे कोणाला ! पुष्कळांची

तर अजून अशी समजूत आहे कीं, म्युनिसिपालिटी म्हणजे सरकारच; व ज्या थोड्या लोकांस खरें काय हें माहीत आहे, त्यांचें औदासिन्य. तेव्हां आम्ही शेव्या झाल्यावर तिनें वाघ व्हावें, यांत नवल तें कोणतें ? आपण आपल्या चाकरास कह्यांत न वागवितां त्यास हवें तसें वागूं दिलें व तो जर शिरजोर होऊन बसला, तर त्यांत दोष कोणाकडे ? असो, या सर्वांचें कारण म्हणून इतकेंच कीं, आमचीं नैसर्गिक स्वतंत्रता आम्ही विसरलों व संक्यीनें आम्हांत भिनून गेलेल्या गुलामगिरीसच आम्ही नैसर्गिक समजून कवटाळतों. ही स्थिति तर आम्हीं सोडून दिली पाहिजे. या आमच्या औदासिन्याचें फळ आम्हीच भोगून राहतों असें नाहीं, तर पुढें होणाऱ्या संततीसही दुःख देण्यांत आपण भागीदार होत आहों. तर हें ध्यानांत आणून ज्याप्रमाणें आपलें प्रिय बालक हरपलें असतां आई अगदीं भांबावून जाते व पुनः तें दृष्टीस पडेपर्यंत कावरीबावरी होऊन चोहोंकडे त्याचा शोध करीत असते व तिचें चित्त ठिकाणीं नसतें, त्याप्रमाणें समाजांतील प्रत्येक व्यक्तिमात्रानें, मग तो श्रीमान् असो किंवा दरिद्री असो, ब्राह्मण असो किंवा शूद्र असो, सरकारी नोकर असो किंवा व्यापारी असो, वैद्य असो किंवा वकील असो, कोणीही असो, आपलें गेलेलें वजन फिरून मिळून ज्या अटींवर प्रथम समाजस्थापना झाली आहे, त्या अटी फिरून अमलांत येईपर्यंत अव्याहत श्रम करावे हेंच प्रस्तुत मनुष्याचें सामाजिक कर्तव्य होय.

[वर्ष २, अंक ३२.]

मुत्सद्दी व योद्धा

आज आपणांस या विषयाचें महत्त्व किती आहे, हें कोणास सांगावयास नको. आपल्या देशाच्या निरुद्योगावस्थेकडे जरा लक्ष फेंकलें असतां, परकीय राष्ट्रें आपणांस काय म्हणतात, याचा विचार केला असतां व आपण होतों कोण व झालों काय, हें मनांत आणलें असतां, प्रत्येक समंजस मनुष्यास या विषयाचें महत्त्व सहज कळणार आहे. हा विषय फार गहन आहे व याचा पूर्णपणें ऊहापोह करण्यास फार खोल विचार केला पाहिजे. आज या विषयाचा सरसकट विचार करावयाचा नाहीं; फक्त मुत्सद्दी व योद्धा यांच्या व्याख्या देऊन, ह्या दोहोंपैकीं आपल्या देशास खरा फायदा कोणापासून आहे व जास्त अवश्यकता कोणाची आहे, हें सांगावयाचें. प्रथमतः योद्ध्याविषयीं विचार करूं.

आजमित्तीस आमच्यामध्यें जरी लढाऊ पुरुषाचें नांवही नाहीं तथापि आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस 'लढाऊ' म्हणजे काय व कोणास म्हणावें हें बहुतकरून पुराणावरून, दंतकथांवरून व मराठे व पेशवे यांच्या इतिहासावरून माहीत असेल. उगीच एखाद्या खडकाळ मुलखांत दहापांच हजार काळे लोकांस बळी देऊन मोठमोठे पोकळ किताब मिळविणारास आमच्यानें "योद्धा" म्हणवत नाहीं. जो मनुष्य खरोखर आपल्या देशावर परचक्राचा घाला आला असतां अंग मोडून मोठ्या शौर्यानें, हौसेनें व आपलें शीर हातावर घेऊन शत्रूवर चाल करून जातो व जो परकी राष्ट्रांवर मोठमोठ्या स्वाऱ्या करून देशांचे देश कार्बीज करतो, त्यासच आमचे मतें योद्धा म्हणावें. अशा प्रकाराचे योद्धे शिवाजी, पहिले बाजीराव, बापू गोखले वगैरे बरेच होऊन गेले.

ज्याप्रमाणें शरीरास हातपाय त्याप्रमाणें देशास योद्धे, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. जसे हातपायांवांचून शरीराचे बरेच व्यापार बंद पडतात, मनुष्यास सर्वस्वीं लोकांवर अवलंबून राहावें लागतें; त्याचे सर्व व्यवहार लोकांनीं करावे लागतात; तशीच स्थिति देशाची आहे. देश परराष्ट्राच्या ताब्यांत जातो; तो अनेक संकटांच्या तडाक्यांत सांपडतो, तेथें अनेक दंगे उद्भवतात; व्यापारधंदे सुरळीत चालत नाहींत; जिकडे तिकडे शांतता नाहींशी होते व शांततेच्या लोपामुळें कलाकौशल्याचा ऱ्हास होतो; दुसरे देश आपणाला नामर्द म्हणतात; लोकांची उमेद खचते; व सर्व लोक

चायके बनून जातात असें म्हणण्यास कांहीं चिंता नाहीं. देशांत जर एक योद्धा असेल तर फारच थोड्या वेळांत त्याचा कित्ता घेऊन हजारों वीर उत्पन्न होतात, व परचक्र आलें असतां देशाची अब्रू राखतात. अशा योद्ध्यांची खरोखर अवश्यकता आम्हांस मराठे व पेशवे यांच्या वेळेस होती. कारण त्यावेळेस आम्हांसच शत्रूपासून आमचें व आमच्या मालमत्तेचें संरक्षण करावें लागत असे. आम्हांस तेव्हां दुसरे देश काबीज करण्याची बरींच हौस असे. आतां आमच्या दयाळु इंग्रज सरकारानें मेहेरबानी करून आमचें सर्व प्रकारें संरक्षण करण्याचा पत्कर घेतला आहे; व आम्हींही फार राजनिष्ठ असल्यामुळें स्वसंतोषानें दुसरे देश जिंकण्याचा वगैरे सर्व वाईट नाद सोडून दिला; तेव्हां अशा पुरुषांची आम्हांस जरूर नाहीं. कदाचित् वासुदेव बळवंत, होन्या कोळी, रामभट वगैरे अप्रयोजक लोकांनीं उगीच आवडंबर मांडलें तर तें मोडून टाकण्याकडे, फारच झालें तर आमच्या थोर, न्यायी, सत्याभिमानी इंग्रज सरकारास, ' शास्त्रीय सीमा ' कायम करण्याच्या हेतूनें किंवा रशियन सरकारापासून आमचा बचाव करण्याच्या हेतूनें, दुष्ट व रानटी आफगाण लोकांचीं हाडें मोडून टाकण्यास मदत करण्याकडे, त्यांची जरूर लागणार. परंतु आमचें सरकार फार धूर्त व समंजस असल्यामुळें असले दुर्घट प्रसंग त्याजवर फारच विरळा येणार. आले तरी कढीभाताला किंवा तूपरोटीला प्राधान्य कोठून मिळणार ? तेव्हां सांप्रतच्या स्थितीकडे लक्ष दिलें असतां आमच्या देशास योद्ध्यांची कांहीं जरूर दिसत नाहीं.

दुसरें असें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, आमच्या देशांत योद्धे निपजण्याची आशा व संभवही नाहीं. कारण इंग्रज सरकारचें मन जर विनाकारण आमच्या लोकांविषयीं शुद्ध नाहीं तर आमचे लोकांस संकटपरंपरा सोसण्याची व जीवचे जीव खर्ची घालण्याची कशी उमेद येईल ? आणि जेथें पहावें तेथें आमच्या दयाळू सरकारची आमच्याविषयीं पराकाष्ठेची सुतवत्सल काळजी. वास्तविकच आहे. जर आपल्या लोकांना चांगलेंसें ज्ञान अजून प्राप्त झालें नाहीं, अवघड गोष्टी कशा निभावून न्याव्यात वगैरे विषयांची जर माहिती नाहीं, तर हत्यारांचा कायदा, वर्तमानपत्रांचा कायदा (आतां हा कायदा आमच्या परम महात्मे व्हाइसरायसाहेबांच्या अनुग्रहानें ' कैलासवासी ' झाला, तेव्हां त्याच्या पाठीमागें कै० किंवा ' मयत ' असे शब्द योजावे लागतील), व असे दुसरे कायदे पसार करणें हें, ज्या सरकारचें वर्तन—

प्रजानां विनयाधानाद्रक्षणाद्भरणादपि ।
स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः ॥

या कालिदासींच उक्तींत सांगितल्याप्रमाणें केवल सुतवात्सल्यप्रेरित आहे त्याला अगदीं उचितच आहे. कारण न जाणों आम्हांला बंदूक बाळगण्याची मुभा दिली व एकादे वेळेस शिकारीला गेलों असतां वाघाला गोळी न लागतां स्वतांच्या अंगावर येऊन पडली तर काय करावें ? अशीं घातुक हत्यारें आमच्या हातीं सध्यां उपयोगी नाहींत. तीं त्यांचीं ते वापरूं जाणत. तसेंच व्हालंटीयर कोरमध्यें शिरण्यास मनाई काय ती आम्हांसच, व ती आमच्याच फायद्याकरितां. कारण लढाईचें कारण नसतां उगीच लढाईची माहिती करून घेण्यांत काय तात्पर्य ? इतकेंहि असून जरी कदाचित् पलटणींत शिरून अफगाणिस्थानासारख्या लढाईत आमच्यापैकीं कांहींनीं तरवार गाजविली, तरी नांव होणार वरील बडद्या साहेबांचें ! मोठमोठीं इनामें, झकझकीत पदकें, पगाराची बढती वगैरे सर्वच त्यांच्या वांट्यास ! फार झालें व एखाद्यानें फाजीलपणा करून पुष्कळच कीर्ति करून घेतली, तर त्यास एक पोकळ किताब झोंकून दिला कीं बस. हे कोण तर म्हणाले " सबाल्टर्न ऑफ धी आर्मी " (सैन्याचे सेवक) ! अशी स्थिति असतांना तरवार गाजविण्याची स्फूर्ति तरी आम्हांस कशी होणार ! अर्थातच नाहीं. तेव्हां आजच्या घटकेस " द्राक्षें आंबट " ह्या म्हणीप्रमाणें तरी योद्ध्यांची आम्हांस जरूरच नाहीं असें म्हणणें फार प्रशस्त दिसतें.

मागील खेपेस कालमानाला अनुसरून योद्ध्यांविषयीं आम्हीं आपले विचार प्रकट केले. आतां मुत्सद्यांविषयीं विचार करूं. मुत्सद्दी हा शब्द फार व्यापक आहे, तेव्हां याची व्याख्या नीटपणें व थोडक्यांत देणें अवघड आहे असें वाटल्यावरून ती आम्हीं देण्याच्या खटपटींत पडत नाहीं. विषयप्रतिपादनावरून त्या शब्दाचा अर्थ काय आहे हें वाचकांस कळेलच.

जसें मानवी प्राण्यास डोकें, तसाच देशास मुत्सद्दी. एखाद्या मनुष्याच्या डोक्यावर मोठा आघात झाला असतां त्याची जशी स्थिति होते तशीच मुत्सद्यभावरूप आघातानें देशाची स्थिति होते. डोकें बिघडलें असतां मनुष्यास वेड लागतें, तो हवातसा बहकण्यास लागतो, त्याची नानातऱ्हेनें लोक हेलना करतात, त्याचे पाहिजे तसे हाल करतात, व कधीं कधीं तर प्राच्यमान्य धन्वंतरीच्या हातून चाबकांचे

तडाके त्यास सोसावे लागतात ! हा प्रकार आमच्या वाचकांनीं पुष्कळ वेळां ऐकला व पाहिला असेलच; परंतु ज्यांना वरील अवस्थेची कल्पना करवत नसेल, त्यांनीं वेड्यांच्या इस्पितळांत जाऊन आपल्या डोळ्याचें पारणें फेडून घ्यावें. सदर्हूप्रमाणेंच देशाची अवस्था होते. पहा, नानाफडणविसाच्या मागें आपल्या देशाची काय स्थिति झाली ! इतिहासावरून असें कळतें कीं, जोंपर्यंत नाना जीवंत होते, तोंपर्यंत त्यांच्या दराऱ्यामुळें ताम्रमुखी लोकांचा आमचे राज्यांत काडीमात्र सुद्धां शिरकाव झाला नाहीं. कां तर तो खरा मुत्सद्दी होता. त्यानें ह्यांच्या कावेबाजीपणास आपला कावेबाजीपणा लढवून त्यांची डाळ आपले राज्यांत किंचित् सुद्धां शिजूं दिली नाहीं; आपल्या शहाणपणाच्या जोरावर आपल्या देशाची स्वतंत्रता रक्षण केली. परंतु त्यांचा अस्त होतांच त्यांच्यामागें ह्या महाराष्ट्रदेशाची दशा कांहीं वेळपर्यंत फारच शोचनीय झाली. जें तें परतंत्रतामय होऊन गेलें. आमच्या वाडवडिलांनीं आपले प्राण खर्ची घालून मिळविलेले देश व संपत्तिही थोड्या वेळांत त्यांच्या नातूपणतूंच्या हातून नाहींशी झाली. देशांत चोहोंकडे हालचाल होऊन गेली. परंतु आमचें सरकार फार शहाणें व समंजस असल्यामुळें बाकीचे प्रकार त्यावेळेस घडून आले नाहींत. पळपुट्या बाजीची गादी जातांच साहेबांची खुर्ची तेथें येऊन थडकली, व त्यांनीं आपल्या राजनीतिज्ञानानें व तज्जन्य अनुभवानें जिकडे तिकडे शांतता केली. लोकांस आश्वासन दिलें. तुमचे हक्क व मालमत्ता संरक्षण करूं व तुमच्यांत शांतता व सुख वाढवूं अशा थापा मारून त्यांचीं मनें आपल्याकडे वळवून घेतलीं. पुष्कळांस देणग्या व इनामें दिलीं, परंतु सर्व सामसूम झालें अशी खात्री झाल्यावर, व आमच्यांत कांहीं पाणी नाहीं असा समज होतांच, " हम् साब और तुम नौकर " असे प्रकार कोठें कोठें दिसूं लागले. कारण कांहीं लोकांस असें वाटूं लागलें कीं हिंदु हे पुच्छविषाणहीन पशु आहेत, व आम्हीच काय तीं माणसें ! व अजूनही असा समज कांहीं ठिकाणीं आढळेल; परंतु तो लवकरच दूर होईल अशी आमची खात्री आहे. हा सर्व प्रकार मुत्सद्द्यांच्या अभावामुळें घडून आला. ह्यांत आमच्या बिचाऱ्या दयाळू राज्यकर्त्यांचा कांहीं अपराध नाहीं. असें होणें स्वाभाविकच आहे.

दुसरें असें कीं राष्ट्ररूप जहाजाचा मुत्सद्दी हा सुकाणूवाला होय असें म्हणण्यास कांहीं चिंता नाहीं. तो जर अडाणी व अदूरदर्शी असेल तर त्याचें जहाज वादळाच्या तडाक्यांत सांपडेल, व एका क्षणांत खडकावर आदळून त्याचे तुकडे होऊन जातील. तोच मासला देशाचा दृष्टीस पडतो. जर राजाचे कारभारी

व इतर मंत्री वरील मुकाणूंवाल्याप्रमाणें असतील तर मग देशाची स्थिति काय विचारावी! प्रजा नाखुष होते; राज्यांत अनेक तंटे व बंडें होतात, व तीं मोडण्याच्या मिषानें महामतलबी परकीय लोक आपला हात शिरकावयास लागतात; आणि अशा प्रसंगीं अकुशल मंत्रिमंडळास काय करावें हें न सुचल्यामुळें बाहेरील लोकांस आपल्या कामांत मदतनीस करणें भाग पडतें, व सहजच कांहीं काळानें ते त्यांच्या हस्तगत होतात; व असें झाल्यानें तेल ना तूप, हातीं धुपाटणें, ह्या म्हणीप्रमाणें मंत्रिमंडळाची स्थिति होते. खरोखर म्हटलें असतां थोड्याशा वाऱ्याच्या झुळकेवरून किंवा विस्तीर्ण आकाशाच्या एखाद्या भागीं आलेल्या छोट्याशा ढगावरून नावाडी जसा वादळाचें संधान ओळखितो, त्याप्रमाणें यत्किंचित् कुरकुर किंवा अस्वस्थता दृष्टीस पडतांच, दूरदर्शी मुत्सद्यानें झोटिंगशाही उत्पन्न करणारीं बंडें वगैरेचें धोरण बांधून तत्प्रतिकारार्थ झटलें पाहिजे. तेव्हां मुत्सद्दी तिडतिड्या स्वभावाचे, चंचल बुद्धीचे, स्वार्थपरायण, तारतम्यज्ञानशून्य, कुटिल, अनयनिष्णात, हलक्या कानाचे, भित्र्या स्वभावाचे, लोकद्वेष्टे, भडभडे, अल्पमति, अदूरदर्शी असे नसावेत, असें कोणीहि कबूल करील; तर त्यांच्यांत वरच्या उलट गुण असून ते पुनः फार शांत, दृढनिश्चयाचे, मोठ्या मनाचे व स्वप्रजाहितेच्छु असे असले पाहिजेत; व वास्तविक पाहतां प्रथम निर्दिष्ट गुण न बाळगणारे व इतर स्तुत्य गुण धारण करणारे लोक फारच थोडे सांपडतील. असा मुत्सद्दी असला म्हणजे काय होणार नाहीं? योद्ध्यापेक्षां मुत्सद्याची योग्यता कांकणभर ज्यास्त आहे, असें बराच विचार केला असतां कळून येईल. योद्धा तरवारीच्या जोरानें लोकांचीं शरीरें, मालमत्ता इत्यादि बाह्यवस्तु काबीज करील; परंतु सर्वांत अतिमहत्त्वाचे जे मनाचे व्यापार, त्यांस आकलन करण्याची शक्ति मुत्सद्यासच आहे, आणि ते व्यापार हस्तगत करणें फार कठिण आहे हें सांगणें नकोच. लोकांचीं मनें वळवून जें काम होतें तें त्यांस मारूनमुटकून होत नाहीं; व मारहाण करून भीतीनें केलेल्या कामास शाश्वती कधींच असत नाहीं. यावरून मुत्सद्दी आपल्या अकलेनें जें करतो तें योद्ध्याच्या शौर्यानें होत नाहीं. ह्यास प्रमाण हेंच कीं जर आमच्या इंग्रजबहादरांनीं फक्त आपल्या शौर्याच्या झोंकावर राज्य संपादूं असें म्हटलें असतें तर त्यांच्यानें तें कधींही सिद्धीस नेववलें नसतें, व जरी कदाचित् त्यांनीं तें संपादन केलें असतें, तरी तें इतके दिवस राहिलें नसतें, हें व्यक्तच आहे. तेव्हां आमच्या सरकारास इतक्या उत्कर्षास चेण्यास फक्त त्यांचा राज्यकारस्थानीपणाच कारण आहे असें म्हणण्यास फारशी हरकत नाहीं. सर्व राज्यांची

उलाढाल होण्यास लोकांतील नाखुषी व कुरकुर हीं कारणभूत आहेत. परंतु लोकांस आशा लावून त्यांची सध्यांची कुरकुर मोडण्याचे कामांत, व फार ओरड केली तर एखादा भाकरीचा तुकडा अंगावर फेंकून देण्यांत, आमच्या राजेबहादरांचा हातखंडा आहे, हें प्रत्येक व्यक्तिमात्रानें लक्षांत ठेवलें पाहिजे. ते कायद्याच्या योगानें, किंवा कायद्याचें स्वरूप तरी देऊन, ज्या गोष्टी करतात, त्या अक्षौहिणी सैन्यानें देखील होणार नाहींत. तेव्हां सध्यां आमच्या लोकांचें कल्याण होण्यास आमचे लोक व सरकार यांच्यामधील मध्यस्थ जे मुत्सद्दी ते फार चांगले पाहिजेत. कारण, आजपर्यंत आमच्या सरकारच्या छोट्या व बड्या कायद्यांच्या टांकसाळींतून जीं कायद्यांचीं लहान मोठीं नाणीं बाहेर पडतात, त्यांत आमचे लोकांचें मत बहुतकरून घेत नाहींतच, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. पण ते घेतात असें जरी म्हटलें, तरी खुबी अशी ठेविली आहे कीं, म्हटली गोष्ट करण्यास नेटिवास आडकाठी करतां येऊं नये. कदाचित् आमच्या सरकारास असें वाटत असेल कीं, अद्यापपर्यंत हिंदु लोकांना आपलें कल्याण कशांत आहे, हें समजतच नाहीं, व आम्ही करतों हें सर्व त्यांच्या कल्याणाचेंच आहे. परंतु हा समज खोटा आहे. आम्हांस वाईट कायद्यांपासून फार जुलूम होतो हें कळतें. पण करावें काय ? आमच्यांत आमची दाद लावणारीं चांगलीं माणसें नाहींत. आणि आमच्यावर जुलूम होत आहे हें वंदा आनरेबल मेकालेसाहेबांनीं बोलून सुद्धां दाखविलें. आपलीं खरीं गाऱ्हाणीं काय आहेत, हें नुक्तेंसें कुठें आपल्या लोकांना कळूं लागलें आहे. इतक्या दिवसांच्या गाढ निद्रेंतून अम्मळ डोळे उघडून पाहण्याची मनीषा आम्हांला होऊं लागली आहे, परंतु सार्वलौकिक मत म्हणून जो एक नियामक अद्भूत उपाय आहे–ज्याला जुलुमी राजे व अहंपणाचा तोरा बाळगणारे मंत्रीही भितात–तशाच प्रकारचें मत आपल्यामध्यें अजून उत्पन्न होऊं लागलें नाहीं. या गोष्टीला चांगले मुत्सद्दीच देशांत असले पाहिजेत.

[वर्ष २. अंक ३२।३४.]

राष्ट्रीय स्थितीशीं लोकांच्या रीतीभातींचा संबंध

देशाचें बाह्य किंवा जड स्वरूप, त्यांतील कायदे, व तेथील लोकांच्या रीतिभाती या तिहींनीं राष्ट्रीय स्थिति निश्चित होते. प्रश्न येवढाच आहे कीं, अमुक एक राष्ट्रीय स्थिति येण्याला या तिहींपैकीं कोणती गोष्ट विशेष कारण होते. तीन-चार कारणें मिळून त्यांपासून एका कार्याची उत्पत्ति झाली असली किंवा होत असली म्हणजे त्या कारणसमूहापैकीं विशेष बलवत्तर किंवा प्रधान कारण कोणतें, याचा निश्चय करणें कठीण पडतें. प्रधान कारणाचा शोध लावण्यास मनुष्याच्या अंगीं बुद्धीची समता, कुशाग्रता आणि विवेक हे गुण असावे लागतात. हे तीन गुण सारख्या प्रमाणानें नसले तर बुद्धीचे सिद्धांत एकदेशीय होतात; व अशा प्रकारचा प्रमाद आजपर्यंत अनेक इतिहासकारांच्या हातून झाला आहे. 'एकसत्ताक' जुलुमी राजसत्तेचा लय होऊन 'अनेकसत्ताक' किंवा 'लोकसत्ताक' राज्यसत्ता स्थापित होण्यास आदि किंवा प्रधान कारण देशाचें जड स्वरूप होय, असें कित्येक इतिहासकारांचें दृढ मत आहे. कित्येक इतिहासकारांनीं असें लिहून ठेवलें आहे कीं, देशांत चांगले कायदे चालू केल्यानें राष्ट्रीय स्थिति हवी तशी सहज करतां येणार आहे. सारांश काय कीं, राष्ट्रीय स्थितीचीं नियामक म्हणून जीं तीन कारणें वर दर्शविलीं आहेत, त्यांपैकीं पहिल्याकडे किंवा दुसऱ्याकडे, अथवा फारच झालें तर दोहोंकडे बहुतेक इतिहासकारांनीं व राज्यशास्त्रकारांनीं प्रधानत्व दिलें आहे. त्यांचें म्हणणें बरोबर नाहीं, असें नाहीं; पण तें सर्वांशीं बरोबर आहे असें आमच्यानें म्हणवत नाहीं. आमच्या मतें या प्रकारच्या इतिहासकारांनीं तिसऱ्या कारणाला म्हणजे लोकांच्या रीतिभातींना जितकें महत्त्व द्यावयाला पाहिजे होतें, तितकें दिलें नाहीं. थोड्याशा बारकाईनें विचार केला तर असें कळून येईल कीं, देशाचें बाह्य स्वरूप किंवा त्यांतील कायदे या दोहोंपेक्षां तेथील लोकांच्या रीतिभाती याच त्याची राष्ट्रीय स्थिति निश्चित करण्यास विशेष रीतीनें कारण होतात. या सिद्धांताचें उदाहरणांनीं स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करूं.

ग्रीस, इतली, स्विट्झरलंड, इंग्लंड, वगैरे देशांच्या इतिहासांचें सामान्य अवलोकन करून कित्येक इतिहासकारांनीं असें मत देऊन ठेविलें आहे कीं, 'लोकसत्ताक' राज्याची स्थापना होण्यास देश डोंगराळ असला पाहिजे. ज्या देशांत सुपीक

जमीन फारशी नसते, व राज्यांतील लोकांना पोटासाठीं कष्ट करावे लागतात, अशा देशांतील सर्वच लोकांस श्रम करणें आवश्यक असल्यामुळें त्यांच्यांत समता उत्पन्न होते, व त्यांस स्वातंत्र्याचें संगोपन होण्यास 'प्रजासत्ताक' राज्यपद्धति अत्यंत अनुकूल असल्यामुळें अशा देशांत त्या राज्यपद्धतीची स्थापना होते. आतां हा सिद्धांत खरा असेल तर ज्या देशांत म्हणण्यासारखे डोंगर नाहींत किंवा जेथील लोकांस पोटासाठीं फारसे कष्ट करावे लागत नाहींत, अशा देशांत 'लोकसत्ताका'ची स्थापनाच होऊं नये. पण तसें होत नाहीं. फ्रान्स व युनायटेड स्टेट्स यांसारख्या सुपीक देशांत 'प्रजासत्ताक' राज्यें नांदत असल्याचीं उदाहरणें आमच्या डोळ्यांपुढें आहेत. तसेंच रशिया, सैबिरिआ, अफगाणिस्थान, व महाराष्ट्र हे डोंगराळ देश असून यांत प्रजासत्ताकें नाहींत. यावरून येवढें लक्ष्यांत येईल कीं, प्रजासत्ताक किंवा लोकसत्ताक राष्ट्रीय स्थिति येण्यास देशाचें बाह्य किंवा जड स्वरूप केवळ पुरे आहे असें नाहीं.

आतां अमुक एक प्रकारचे कायदे असल्यानें अमुक राष्ट्रीय स्थिति येते, असेंही सिद्ध करतां येत नाहीं. मेक्सिको देशांत युनायटेड्-स्टेट्सचे कायदे अक्षरशः उठवून दिलेले आहेत, पण त्या देशाच्या स्थितींत जमीनअस्मानाचें अंतर आहे. उत्तर अमेरिकेप्रमाणें दक्षिण अमेरिका सुपीक आहे; उत्तर अमेरिकेप्रमाणें दक्षिण अमेरिकेंतही युरोपांतील लोकांनीं राज्यें स्थापिलीं आहेत, व उत्तर अमेरिकेप्रमाणें त्यांचाही युरोपाशीं म्हणण्यासारखा संबंध नाहीं; असें असतां उत्तर अमेरिका दक्षिण अमेरिकेपेक्षां राष्ट्रीय संबंधानें सुखी कां या प्रश्नाचा नीट विचार केला म्हणजे असें लक्षांत येतें कीं, अमुक एक प्रकारचे कायदे चालू केल्यानें अमुक एक प्रकारची राष्ट्रीय स्थिति आलीच पाहिजे, हें म्हणणें कांहीं बरोबर नाहीं. केवळ कायद्यांच्याच संबंधानें विचार करावयाचा असेल तर जर्मनी आणि रशिया या देशांतील कायदे युरोपांतील इतर देशांतील कायद्यांपेक्षां चांगले असूनही त्या देशांत लोकसत्ताकांची स्थापना कां झाली नाहीं? किंवा फ्रेंच लोक सगळ्या ब्रह्माडांतल्या चांगल्या चांगल्या कायद्यांचें एकीकरण करून आपल्या देशांत त्यांची स्थापना करण्याचा अहोरात्र प्रयत्न करीत असतां फ्रान्स देशाची राष्ट्रीय स्थिति अजून अस्थिर कशासाठीं? इंग्लंड देशांतील कायद्यांची स्थिति इतकी स्पृहणीय व वर्णनीय कशामुळें झाली, वगैरे प्रश्नांचा जो नीट रीतीनें विचार करील, त्याच्या असें लक्षांत येईल कीं, देशाचें बाह्य स्वरूप आणि तेथील कायदे, हीं राष्ट्रीय

स्थितीचीं नियामक आद्य कारणें नव्हेत, तर यांहून भिन्न असें कांहीं तरी निराळें कारण असलें पाहिजे, व तें आमच्या मतें लोकांच्या रीतिभाती होत. या दृष्टीनें पाहतां 'रीतिभाती' या शब्दाचा केवळ लौकिकार्थ घेऊन उपयोग नाहीं. 'रीतिभाती' या शब्दानें आम्ही पुष्कळच व्यापक अर्थ समजतों. देशाचें बाह्य स्वरूप आणि तेथील कायदे यांखेरीज लोकांच्या वर्तनाचीं जितकीं नियामक कारणें, त्या सर्वांचा 'रीतिभाती' या शब्दांत समावेश होतो. धर्मसंबंधीं लोकांचे विचार आणि तत्प्रणीत वर्णन, शास्त्रकलांसंबंधानें झालेला विद्याप्रसार व त्याच्या अनुरोधानें पडलेले लोकाचार, तसेंच लहानापासून थोरापर्यंत हरएक विषयाच्या संबंधानें निरनिराळ्या लोकांच्या मनांत बसून गेलेलीं मतें व तदनुसार होणारें त्यांचें वर्तन–या सर्वांचा आम्ही 'रीतिभातीं'त समावेश करितों. अमुक एक प्रकारचें देशाचें बाह्य स्वरूप असल्यानें किंवा अमुक एक प्रकारचे कायदे असल्यानें, अमुक प्रकारची राष्ट्रीय स्थिति त्या देशांत असेल किंवा कालांतरानें ती त्याला येईलच येईल, असा सिद्धांत करणें चूक आहे असें आम्हांस वाटतें, परंतु अमुक एक प्रकारचे लोकांचे आचार आणि विचार असले म्हणजे अमुक प्रकारच्या लोकांच्या रीतिभाती असल्या तर त्यांच्या देशाला अमुक प्रकारची राष्ट्रीय स्थिति पुढें मागें खचित येईल, असा सिद्धांत घालण्यांत फारसा प्रत्यवाय येईल असें वाटत नाहीं. आतां येवढें खरें आहे कीं, देशाचें बाह्य स्वरूप आणि तेथील कायदे यांच्या योगानें त्यांतील लोकांच्या रीतिभातींत पुष्कळ फेरफार होतात; पण त्याबरोबरच हेंही खरें आहे कीं, लोकांच्या रीतिभातींमुळें त्यांच्या देशाच्या बाह्य स्वरूपांत फारसा फरक झाला नाहीं तरी त्यांच्या कायद्यांत बळकट फेरफार झालेच पाहिजेत. रीतिभातीमुळें देशाच्या बाह्य स्वरूपांत जे फेरफार होतात, ते देखील केवळ क्षुल्लक असतात असें नाहीं. एखादें बेट समुद्रांत ओढून आणून खंडाच्या मध्यभागीं ठेवणें, किंवा अटलांटिक महासागरासारख्या सागरांत भर टाकून त्याचें खंड करणें, असल्या अमानुष व अशक्य गोष्टी कसल्याही रीतिभाती असल्या तरी त्यांच्यानें घडायाच्या नाहींत; बाकी मानवी परिश्रमानें ओसाड रानांचीं रम्य उद्यानें व भिकार खेड्यांचीं टोलेजंग शहरें होण्यास कांहीं हरकत नाहीं. वेळेनुसार पर्वतांच्या जागीं सपाट मैदानें, मारवाडासारख्या निर्जल प्रदेशांत जहाजें चालण्यासारख्या कृत्रिम नद्या, आणि संयोगभूमीच्या जागीं सामुद्रधुनी करण्यास मनुष्याची छाती होण्यास कांहीं हरकत नाहीं. तात्पर्य काय कीं, लोकांच्या 'रीतिभाती' ह्व्या तशा असल्यानें

त्यांच्याकडून आचंबा वाटण्यासारखीं कृत्यें होतील यांत कांहीं संशय नाहीं. फार दूर कशाला, आपल्या येथील देशस्थ, कोंकणस्थ किंवा मारवाडी यांच्या रीतिभातींचा क्षणभर विचार करा म्हणजे झालें. देशस्थ आणि कोंकणस्थ एका देशांत राहणारे, एका धर्माचे, समान आचारविचारांचे असे असतां त्यांच्या कृतींत केवढें अंतर दिसून येतें ? देशस्थांच्या डोळ्यांपुढें कोंकणस्थ लोक शेंकडों वर्षें असतां त्यांच्या आंगीं जे कांहीं गुण आहेत त्यांचें देशस्थांच्यानें अनुकरण करवत नाहीं, व कोंकणस्थांना देशस्थांच्या गुणांचें अनुकरण करवत नाहीं, ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. कोंकणस्थ लोक पोटासाठीं परिश्रम करून उदयाला येतात असें म्हणावें तर दोन प्रहरची ज्यांना पंचाईत असे देशस्थ या देशांत आज काल थोडेथोडके आहेत असें नाहीं. तर मग या दोन जातींच्या वर्तनांत येवढें मोठें अंतर पडण्याचें कारण काय ? अर्थात् त्यांच्या रीतिभाती ह्या होत.

[वर्ष ३, अंक २१]

मनुष्यजातीची पूर्णावस्था

जगाच्या प्राचीन व अर्वाचीन इतिहासावर थोडी नजर टाकली असतां, मनुष्य-जातीची पूर्णावस्था कोणती, ह्याविषयीं भिन्नकालीं भिन्न मतें होतीं, हें सहज लक्षांत येईल; व हीं अशीं मतें होण्यास त्या त्या वेळची सामाजिक व राजकीय स्थिति कारण होती, असेंही दिसून येतें. प्रत्येक देशांत कोणत्या तरी रीतीनें प्राचीन काळापासून जातिभेद हा प्रत्येकाच्या धंद्यापासून उत्पन्न झाला; कोठें धर्मसंबंधानें किंवा राजकीय संबंधानें लोकांची उच्चनीच स्थिति होऊन, जातिभेद उत्पन्न झाला. याप्रमाणें निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या रूपानें जातिभेद उत्पन्न झाला, व त्याचें अस्तित्व कोठें समूळ नाहींसें झालेलें अद्यापिही दिसत नाहीं, तथापि हल्लीं या जाति-भेदाचें प्राबल्य युरोप व अमेरिका या खंडांतील बहुतेक देशांत पुष्कळ कमी झालें आहे. आतां जातिभेद जों जों कमी होत आहे, तों तों मनुष्यामध्यें अधिकाधिक समानता वाढत चालली आहे, हें स्पष्टच आहे. परंतु ज्या ठिकाणीं अद्यापि जाति-भेदाचें फार प्राबल्य आहे, (उदाहरणार्थ आमचाच देश) तेथें मनुष्यामध्यें समानता कोणत्याही प्रकारें दिसून येत नाहीं. जो ज्या जातींत निपजतो, त्याचे मनांत व आचरणांत आपणांमध्यें एक प्रकारची श्रेष्ठता आहे किंवा नीचता आहे, हा विचार सर्वत्र दिसून येतो आणि त्याचा समूळ उच्छेद करणें विचारवंतासही फार दुर्घट आहे.

आतां जेथें मनुष्याची पदवी व महत्त्व हीं केवळ त्याच्या जन्मावरच अवलंबून असतात, आणि जेथें हीं केवळ त्याच्या उद्योगावर व गुणांवर अवलंबून असतात, अशा दोन समाजांच्या स्थिति घेऊन त्यांमध्यें मनुष्यजातीच्या पूर्णावस्थेबद्दल काय मत आहे, हें पाहिलें असतां आपणांस जमीनअस्मानाचा फरक दिसून येईल. व अशा मतांचा समाजावर केवढा परिणाम साहजिक घडून येत आहे हेंही आपल्या लक्षांत येईल.

आमच्या सांप्रतच्या सामाजिक स्थितीचें आपण विचारपूर्वक अवलोकन केलें असतां आपणांस असें दिसून येईल कीं, प्रत्येकास असें वाटतें कीं, आपणांस अमुक एक धंदेच करितां येतील, व त्यांतूनच आपण एक पसंत केला पाहिजे. कोणी ब्राह्मण असल्यास त्यास वाटतें कीं, जेथें बुद्धीचें व स्वच्छतेचें काम असतें,

तेथेंच आपल्या निर्वाहाची सोय करावी; मग प्राप्ति कितीही अल्प असली तरी चालेल. अशा प्रकारचे धंदे सोडून केवळ हमालीचें किंवा कांहीं प्रकारें अमंगळ काम पत्करून आपली प्राप्ति वाढवावी, ही गोष्ट सहसा त्याच्या मनांत येत नाहीं. याचप्रमाणें मारवाडी, शूद्र, अतिशूद्र इत्यादिकांची स्थिति. आपले जे ठराविक धंदे आहेत, ते सोडून, प्राप्तीच्या, सन्मानाच्या, किंवा कीर्तीच्या, कोणत्याही लालुचीनें मनुष्याचें मन दुसऱ्या धंद्याकडे वळत नाहीं. व जेथें जातिभेद फार प्रबळ, तेथें तर ही स्थिति परिपूर्णपणें दिसून येते. उलट जेथें जातिभेदाचें प्राबल्य कमी होत चाललें आहे, तेथें ही स्थिति पुष्कळ कमी होत चालली आहे. आणि जोंपर्यंत मनुष्यांस परस्परांमध्यें ऐहिक स्थितींत समानता वाटत नाहीं, तोंपर्यंत ही स्थिति कांहींशी तरी कायम रहाणारच.

आतां जातिभेदावर ज्यांची खरी श्रद्धा आहे, अशा लोकांस मनुष्यजातीची पूर्णावस्था कोणती म्हणून प्रश्न केल्यास, ते काय उत्तर देतात ? त्यांस वाटत असतें कीं, ह्या पूर्णावस्थेचा काळ मागेंच होऊन गेला; निदान त्यांच्या मतें सांप्रतच्या व्यावहारिक रूढीचें जींत पूर्ण अनुसरण होईल तीच पूर्णावस्था होय. आतां जगाच्या अनिवार क्रमामुळें ज्याअर्थी असें दिसून येतें कीं, कोणतीही रूढि बदलल्यावांचून फार दिवस टिकत नाहीं, व ज्याअर्थी आधुनिक सर्व व्यवहार व राजनीति यांवरून असें दिसतें कीं, मनुष्यजातीचा कल सर्वसाधारण समानतेकडे आहे; त्याअर्थी वरील लोकांस वाटतें कीं, दिवसानुदिवस मनुष्यजाति भ्रंश पावत आहे, व म्हणन आपली हीच स्थिति उत्कृष्ट; हींहून पुढें सुधारणा होण्याची व पूर्णावस्था येण्याची सर्व आशा व्यर्थ आहे. हा विचार ज्यांच्या मनांत बळकट बिंबला आहे व याप्रमाणेंच ज्यांचें नित्यशः आचरण चाललें आहे, असे लोक आम्हांमध्यें किती तरी सांपडतील ! इंग्रजी विद्येमुळें हल्लीं बहुधा घरोघर नवी पिढी व जुनी पिढी बनली आहे; परंतु जुन्या पिढीच्या मनांत पुढील ऱ्हासकाळाची कल्पना इतकी भरून गेली आहे कीं, ते आपण जरी स्वधर्माचें यथेष्ट अनुवर्तन करितात, तथापि नव्या पिढीच्या तरुणांस आपणाप्रमाणें वागविण्याचें स्वाधीन असूनही, तसें करीत नाहींत. राज्यरीतींतही हाच प्रकार दिसून येतो. आपण आहों हीच स्थिति उत्कृष्ट, याप्रमाणें पुढील लोक वागतील तर पुरे आहे, ही कल्पना मनांत धरूनच कीं काय आमच्या मन्वादि नीतिकारांनीं आपल्या भावि प्रजेस आपल्या समजुतीप्रमाणें सर्व आचरणाचे नियम घालून दिले; सर्वांचे हक्क ठरविले. सर्व अपराधांचें शिक्षाप्रमाणही

दिलें, व पुढें लोकांस पुनः राजनीति व आचार ह्यांचा विचारच करावयास नको, इतकी त्यांनीं आपणांकडून तयारी करून ठेविली! आमच्या सामान्य व्यवहारांतही अशाच प्रकारची वागणूक दिसून येते. पिढ्यांच्या पिढ्या एकच धंदा केलेले किती लोक आम्हांत सांपडतील! आम्हांमध्यें प्रत्येक मातापितरास बहुधा वाटत असतें कीं, सर्व प्रकारें आपणांप्रमाणें आपल्या संततीनें कालक्रमण करावें! देशांत स्थित्यंतर केवढें झालें आहे, ह्याचें त्यांस मुळींच कांहीं वाटत नाहीं. तसेंच रूढीप्रमाणें सर्वथा चालणें आमच्या लोकांस किती अवश्य व हितकर वाटतें हें आमच्या घरें बांधण्याच्या तऱ्हेंत, आमच्या पेहरावांत, व आमच्या हरएक कामांत दिसून येतें असें म्हणण्यास चिंता नाहीं.

याप्रमाणें जेथें जातिभेदावर विशेष श्रद्धा आहे तेथें ही स्थिति फार उत्तम व पुढें सर्व भ्रष्टता माजणार, पूर्णावस्थेची व सुखाची स्थिति मागें गेली व ती पुनः येण्याचा संभव कमी, इत्यादि विचारांचें अत्यंत प्राबल्य होतें. याप्रमाणें एका स्थितीचें वर्णन झालें. दुसऱ्या स्थितीचें पुढील अंकांत येईल.

मागील निबंधांत जातिभेदापासून आमच्या समाजाची व आमच्या मनाची कशी स्थिति झाली आहे याचें थोडक्यांत वर्णन केलें. त्यावरून वाचकांच्या असें लक्षांत येऊन चुकलें असेल कीं ज्या वेळीं जातिभेद आम्हांमध्यें फार प्रबळ होता, त्यावेळीं म्हणजे गेल्या दोन तीन हजार वर्षांत, आमच्या समाजांत चळवळ किंवा ज्यास हल्लीं आपण सुधारणा म्हणतों, हा प्रकार मुळींच नव्हता. आमच्या पूर्वजांनीं प्राचीन नीतिशास्त्रकारांच्या कार्यांचें पूर्णपणें अनुकरण केलें; त्यांनीं आचार व रूढि यांचा कधींहि अवमान केला नाहीं; व जेथें जेथें प्राचीन लोकांनीं आपलीं मतें व निर्णय दिले आहेत तेथें तेथें त्यांनीं बहुधा अधिक विचारही केला नाहीं. राज्यकारणीं आमच्या देशांत पुष्कळ उलाढाली झाल्या व त्यांचा समाजावर बराच परिणाम झाला; परंतु आचारविचारांत व विचारपद्धतींत इतका थोडा पालट झाला आहे कीं युरोपियन लोकांस मोठें आश्चर्य वाटतें. परंतु जर आपण जातिभेदादि आपल्या धर्मप्रणीत व्यवस्थांकडे लक्ष दिलें तर वरील गोष्ट साहजिकच भासेल. आतां या प्रकारच्या समाजस्थैर्यानें आमचें किती नुकसान झालें आहे व त्यामुळेंच आपण युरोपियन राष्ट्राच्या किती मागें राहिलों आहों ह्याचें विवेचन पुढें करूं. प्रथम युरोपियन राष्ट्रांत समाजाची काय स्थिति आहे हें पाहूं.

युरोपियन राष्ट्रांमध्यें प्राचीन काळीं दोन मोठीं प्रबळ राष्ट्रें होऊन गेलीं; एक ग्रीसचें व दुसरें रोमचें. या दोनही राष्ट्रांत आरंभीं आमच्या प्रमाणेंच एक पौराणिक धर्म होता व देवांची संख्याही आमच्यापेक्षां फारशी लहान नव्हती. परंतु या त्यांच्या धर्मानें जातिभेदासारखा कोणताही भेद मानिला नाहीं; व जरी त्यांचे देव पुष्कळ वेळां पक्षपात करितांना दिसत, तथापि त्यांनीं मनुष्यांमध्यें जन्मतः कोणताही भेद मानिला असें दिसत नाहीं. राज्यकारणीं पाहिलें असतांही अशीच स्थिति दिसून येते. वरील दोनही राष्ट्रांत प्रथम एकसत्ताक राज्यें होतीं, व तीं थोडा वेळ टिकून त्यांच्या जागीं लोकसत्ताक राज्यें झालीं. या दोनही कारणांमुळें वरील दोन राष्ट्रांमध्यें सर्व लोकांत समानता उत्पन्न झाली. प्रत्येकास वाटे कीं आपण जन्मतः कोणाहूनही कमी योग्यतेचे नाहीं. आपले सर्व सामाजिक व राज्यप्रकरणीं हक्क दुसऱ्यांच्या बरोबरीचे आहेत, व नीचश्रेष्ठ हा भेद केवळ प्रत्येकाच्या गुणावर अवलंबून राहतो, व श्रेष्ठ स्थिति ही प्रयत्नसाध्य आहे. ह्या सर्व साधारण समानतेचे तत्त्वास वरील राष्ट्रांत ख्रिस्ती धर्माची जेव्हां प्रवृत्ति झाली त्यावेळीं पुनः बळकटी आली; व तेव्हांपासून सर्व युरोपियन व अमेरिकन ख्रिस्ती राष्ट्रांत, जन्मतः सर्व सारखे, हा विश्वास सर्वांच्या अंतःकरणांत खिळून गेला आहे.

हें सर्व साम्यतेचें तत्त्व युरोपीय राष्ट्रांमध्यें कोणच्या प्रकारें लोकांच्या बहुतेक सर्व चळवळीस, सुधारणेस व उन्नतीस कारण झालें हें आतां पाहूं. रोमच्या अति विस्तृत राज्याचा जेव्हां रानटी लोकांनीं विध्वंस केला, त्यावेळीं सर्वत्र अज्ञान पसरलें व पूर्वीच्या रोम व ग्रीस या राष्ट्रांचे इतिहासही लोक विसरले. मग राज्यक्रांतीमुळें व अज्ञानामुळें लोकांत जातिभेद व देवभोळेपणा उत्पन्न झाला. परंतु ते फार दिवस टिकण्याचा संभवच नव्हता. पूर्वीच्या रोमन व ग्रीक भाषांचें अध्ययन सुरू जेव्हां झालें व त्यामुळें पूर्वीच्या राज्यनीतीवर व धर्मतत्त्वावर जेव्हां प्रकाश पडला, त्यावेळीं लोकांची विचारसरणी एकदम बदलून लोकांच्या मनांत सर्वांच्या साम्यतेचे विचार एकदम जागृत झाले. असें होतांच धर्मसंबंधीं पोपाच्या महात्म्याचा विचारवंत लोकांस वीट येऊन, लुथरसारखे लोक पुढें आले व त्यांनीं जीविताचीही परवा न बाळगून धर्माची सुधारणा केली. पुढें जातिभेद काय तो राजेलोक व बडेलोक हे मात्र आपणांमध्यें व इतर लोकांत मानीत असत. परंतु लोकांत ज्ञानवृद्धि जसजशी होऊं लागली तसतसा हाही भेद त्यांस

असह्य होत चालला. तेव्हां व्हालटेअर व रूसो असे लोक पुढें सरसावून त्यांनीं वरच्या प्रकारच्या जातिभेदाचा सर्व लोकांमध्यें अत्यंत द्वेष उत्पन्न केला; व त्या-योगानें फ्रान्समध्यें मोठा प्रचंड दंगा उत्पन्न होऊन, लोकांनीं फ्रान्सच्या राज-कुलाचा अगदीं बींमोड केला; जे आपणांस बडेलोक समजत असत अशा बहुतेकांचा त्यांनीं गिलोटीन नामक यंत्रानें शिरच्छेद केला. व ज्या ज्या राष्ट्रांत वरील दोन लोकांचें प्राबल्य होतें त्यांमध्यें मोठी दहशत पाडिली, आणि लोकसत्ताक राज्याचा पाया घातला. त्यावेळीं फ्रेंच लोकांची या मानवी साम्यतेच्या तत्त्वावर इतकी श्रद्धा बसली होती कीं, त्यांस कोणताही देश राजे लोकांच्या व धर्माध्यक्षाच्या प्राबल्या-खालीं सुखी होणार नाहीं म्हणून वाटत होतें, व त्याप्रमाणें होईल तर सर्व भूमंडळा-वरून या लोकांचीं पाळेंमुळें खणून टाकून लोकसत्ताक राज्याची स्थापना करावी असा त्यांचा निर्धार झाला होता. आतां ही गोष्ट त्यांच्या हातून झाली नाहीं यांत मोठें आश्चर्य नाहीं; परंतु त्या दिवसापासून सर्व युरोपियन राष्ट्रांची लोकसत्ताक राज्याकडे प्रवृत्ति आहे; ही गोष्ट वरील फ्रेंच लोकांच्या धामधुमींचाच कांहीं अंशीं परिणाम आहे. हल्लीं युरोपियन व अमेरिकन लोकांमध्यें मनुष्यांत जितकी साम्यबुद्धि आहे तितकी जगांत नसेल. तीमुळें धर्मांत व राज्यकारस्थानांत पुष्कळ सुधारणा झाली व लोकांस आपले हक्क कळूं लागले, हें वरील लेखावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल.

आतां सामाजिक स्थितीवर या साम्यबुद्धीचा काय परिणाम झाला तें सांगितलें पाहिजे.

जेथें जातिभेदावर मनुष्यांची श्रद्धा असते तेथें स्वभावतःच लोकांस वाटत असतें कीं, ज्या स्थितींत आपण जन्मलों तीच स्थिति आपली पूर्णावस्था; तींहून श्रेष्ठतेस येणें अगदीं अशक्य, इ० ही स्थिति मागील अंकांत वर्णन केली आहे. जेथें मनु-ष्यांस जन्मतः सर्वांमध्यें साम्य वाटत असतें, तेथें ह्याहून फार भिन्न स्थिति असते. कोणासही आपण आहों हींच आपली पूर्णावस्था भासत नाहीं. आपणांमध्यें व आपल्या स्थितीमध्यें पुष्कळ सुधारणा होण्यास अद्याप जागा आहे, असें प्रत्येकास वाटतें; व त्यास ती करण्यास पुष्कळ उमेद असते. अशा समाजांत, आपले पूर्वज आपणांहून शहाणे व श्रेष्ठ होते हा समज बहुधा नाहींसा होतो; उलट आपणच

त्यांहून पुष्कळ अंशीं शहाणे असा लोकांचा समज होतो; व पुढील पिढ्या उत्तरोत्तर अधिकाधिक शहाण्या व श्रेष्ठ निपजतील अशी त्यांची खात्री असते; व या शहाणपणाची व श्रेष्ठत्वाची पूर्णावस्था केव्हां होईल ह्याची त्यांस कल्पनाच करितां येत नाहीं. अशी त्यांची समजूत होण्याचें मुख्य कारण असें कीं त्यांस वाटतें कीं ज्ञान हें अनुभवानें प्राप्त होतें. प्रत्येक पिढी आपला अनुभव मागील लोकांच्या अनुभवास मिळवीत असते, व त्यामुळें, ती त्या लोकांहून अधिक शहाणी साहजिकच होते. जे लोक दोन तीन हजार वर्षांपूर्वी जन्मले त्यांना सर्व प्रकारें आपणांहून कमी अनुभव असला पाहिजे, व त्या मानानें त्यांचे विचार कोते व त्यांचीं सुखसाधनें कमी असलीं पाहिजेत. मुलांच्या बुद्धीपेक्षां वृद्धांच्या बुद्धीस आपण अधिक मान देतों; याचें कारण मुलांचा अनुभव कमी व वृद्धांचा अधिक; एकानें जगाच्या रहाटीचा अनुभव दहापांच वर्षें घेतला असतो; व दुसऱ्यानें पन्नाससाठ वर्षें घेतला असतो. तसेंच जे लोक या पिढींत जन्मले आहेत व ज्यांनीं सांप्रतच्या विद्येचें व ज्ञानाचें परिसेवन केलें आहे ते दोन हजार वर्षांपूर्वी जन्मलेल्या मोठ्या विद्वानांहून वृद्ध होत; त्यांच्याशीं तुलना केली असतां प्राचीन लोक केवळ सृष्टिक्रमांतील बालकें समजलीं पाहिजेत. ह्या समजुतीला जगाच्या, व मुख्यत्वेंकरून यूरोपाच्या इतिहासानें, दृढता येते. पहा कीं हल्लींचें युरोप गेल्या शतकाच्या युरोपापेक्षां शहाणें आहे. हल्लीं युरोपांत ज्या नानाविध कला चालल्या आहेत त्यांचा शतांशही गेल्या शतकांत नव्हता. वाफेच्या व विजेच्या योगानें हल्लीं मनुष्यजातीस जी मदत चालली आहे व मनुष्यांचीं सुखसाधनें वाढत आहेत, तीं अंशतःही त्या वेळीं नव्हतीं. अठराव्या शतकाच्या मागें आणखी एक शतक गेलें, तर त्या वेळीं धर्मसंबंधीं व राज्यकारस्थानासंबंधीं लोकांचे विचार आपणांस फारच कोते होतेसे भासतील. परस्परप्रीति लोकांच्या हृदयांत त्या वेळीं फारच थोडी वागत होती; व सृष्टिशास्त्राची त्या वेळीं लोकांस क्वचितच अभिरुचि होती. त्याच्याही मागें आणखी दोनचार शतकें गेलें तर उत्तरोत्तर आपणांस निकृष्टावस्थाच दिसून यईल. त्या वेळीं, हल्लीं जें ज्ञानप्रसाराचें मोठें साधन, म्हणजे मुद्रणकला ही लोकांस अवगत नव्हती. लेखनवाचनादि साधारण गोष्टी त्या वेळीं हजारांत एखाद्यास येत होत्या. देवभोळेपणा तर इतका माजला होता कीं, त्या वेळच्या पोपांनीं नुसत्या भाकडकथा सांगून लाखों रुपये लोकांपासून उपटावे, व राजे लोकांसही धर्मभीतीनें बर्फात उघडें उभें करावें.

याप्रमाणें ज्या ज्या राष्ट्रांचा खरा इतिहास उपलब्ध आहे, तेथें तेथें ऐतिहासिक काळांत तरी मनुष्य उत्तरोत्तर सुधारणा पावत आहे असें स्पष्ट दिसून येतें; व युरोपियन समाजांत वरतीं सांगितलेली समजूत दृढ होत आहे. या समजुतीनें त्यांचे सुधारणेकडे सदोदित प्रयत्न चालले आहेत. सर्व शास्त्रांत नवीन शोध सुरू आहेत. सर्व कलांत नवीन युक्त्या काढून मानवी श्रमाची अवश्यकता कमी करून भौतिक शक्तींचा उपयोग करण्याची खटपट सुरू आहे. रीतिभाती, पोषाख, घरबांधणी, राज्यकारस्थान वगैरे कोणत्याही गोष्टींत स्थैर्य व तटस्थता आपणांस आढळणार नाहींत. निरंतर उत्तरोत्तर सुधारणा व उत्कर्ष यांवर त्यांची दृष्टि लागली आहे; आपण पूर्णावस्थेला आलों किंवा सर्व ज्ञानसंपादनाची व सुधारणेची सीमा होऊन कधीं तरी आपण मानवी ऐहिक पूर्णावस्थेस येऊं, हें बहुधा अशक्य वाटतें. या त्यांच्या समजुतीनें युरोपियन व अमेरिकन लोकांमध्यें किती परिश्रम, किती उद्योग, किती धाडस, किती घडामोड सुरू आहे, ह्याची प्रत्यक्ष पाहिल्यावांचून आमच्यानें कल्पनाही करवत नाहीं; त्यांच्या प्रकाशांत आमचे डोळे अगदीं दिपून जातात, व आमची शोचनीय स्थिति पाहून आम्हांस खिन्नता येते.

[वर्ष २, अंक ४२।४३।४४.]

स्वदेशाभिमान

मुसलमान राजे ज्या वेळीं हिंदुस्थानवर राज्य करीत होते, त्या वेळीं हिंदु लोकांचा धर्मसंबंधानें पुष्कळ छळ होत असल्यानें, व हिंदु लोकांत स्वधर्मश्रद्धा विशेष प्रबळ असल्यानें त्यांमध्यें स्वदेशाभिमान उत्पन्न न होतां स्वधर्माभिमान उत्पन्न झाला. असा स्वधर्माभिमान हिंदु लोकांत गेल्या दोन अडीच हजार वर्षांपासून वागत होता असें म्हणण्यास चिंता नाहीं, कारण बौद्ध धर्माची प्रवृत्ति झाल्यापासून हिंदुस्थानांत सर्वत्र धर्मविवाद सुरू झाला. या धर्मविवादामुळें लोकांचें चित्त राजकारणांतून निघून, व ऐहिक सुखास विमुख होऊन, परमार्थाकडे लागलें. पुढें हिंदुधर्माचें देशांत वर्चस्व होत आहे, इतक्यांत मुसलमान लोकांच्या स्वाऱ्या सुरू होऊन त्यांनीं हा देश लवकरच काबीज केला, व मुसलमान बादशहांच्या कारकीर्दीत हिंदुधर्माचा जितका छळ झाला, तितका पूर्वी कधींच झाला नव्हता. या कारणामुळें पूर्वीपासून प्रबळ होत आलेली स्वधर्माभिमानबुद्धि यावेळीं अत्यंत वृद्धि पावली, व तिच्याच प्राबल्यानें आम्हीं महाराष्ट्रीयांनीं आपल्या प्रांतांत प्रथम स्वराज्याची स्थापना केली. परंतु ज्या लोकांनीं आपल्या धर्माचा अत्यंत उपहास व छळ केला, त्यांचें देशांतून समूळ उच्छेदन केल्यावांचून कृतकृत्यता नाहीं, असे सर्वांच्या मनांत विचार वागत असल्यानें, स्वराज्यस्थापन झाल्यावर त्याच्या बळकटीस व उत्कर्षास लागणारी शांतता मराठे लोकांस कधींच मिळाली नाहीं, व त्यामुळें धर्माभिमान अनवश्यक झाल्यावर त्याचें प्राबल्य कमी कमी होत जाऊन, त्याच्या जागीं स्वराज्यसुखाच्या अनुभवानें उत्पन्न होणारी जी स्वदेशाभिमानबुद्धि तिचा आम्हांत त्या काळीं मुळींच प्रादुर्भाव झाला नाहीं. हल्लीं आम्हांमध्यें स्वदेशाभिमानबुद्धि थोडी थोडी संचार करूं लागली आहे; व तिचा उद्भव होण्याचें कारण इंग्रजी राज्य व इंग्रजी विद्या हीं होत. इंग्रजी विद्येनें प्राचीन व अर्वाचीन इतिहासाचें आम्हांस साधारण ज्ञान करून दिलें, प्राचीन ग्रीक व रोमन लोकांच्या स्वदेशाभिमानाचीं फळें आमच्या दृष्टीस पाडिलीं, व हाच स्वदेशाभिमान त्यांच्या अंतःकरणांत जेव्हां वागेनासा झाला, त्यावेळीं पारतंत्र्यादि अनेक दुःखांचा त्यांवर अंमल बसून ते किती अज्ञान व देवभोळे झाले, हेंही आमच्या नजरेस आणिलें. इंग्रजी राज्यानें आमच्या राज्यव्यवहारांत अशा स्वदेशाभिमानाची आम्हांस आवश्यकता भासविली; कारण सर्वत्र शांतता राखून, धर्मसंबंधांत उदा-

सीन राहून, व आमच्या लोकांच्या अज्ञानाच्या सहाय्यानें, आम्हांवर कायदेशीर रीतीनेंच जो सतत जुलूम मांडिला आहे, आम्हांस आतां परचक्राची भीति वाटत नाहीं, आमचा स्वधर्माभिमान व्यर्थ आहे, परंतु हा सततचा जुलूम मात्र असह्य झाला आहे. जिकडे पहावें तिकडे दारिद्र्य दिसतें; आमचें पारतंत्र्य व दास्यत्व तर इतकें वाढलें आहे कीं, दगड, माती, लांकूड इत्यादि पदार्थ वर्ज करून बाकीं आमच्या उपजीवनास, शरीरसंरक्षणास व सुखास लागणाऱ्या हरएक लहानमोठ्या पदार्थांकरितां आम्हांस परराष्ट्रीयांवर अवलंबून रहावें लागतें. याप्रमाणें सर्वसामान्य दारिद्र्य व पारतंत्र्य आम्हांत वागूं लागल्यानें, आम्ही परस्परांचे साहजिकच व्यसनबंधु बनलों आहोंत, व आपणांवरोबर आम्हांस सर्वांचीच काळजी वाटते. व अशी स्थिति उत्पन्न झाली असतां तीसच स्वदेशाभिमान म्हणावयाचा.

आतां वरतीं सांगितल्या प्रकारचा स्वदेशाभिमान सर्वत्रांत वागतो असें मात्र समजूं नये. ज्यांवर इंग्रजी विद्येचे थोडेबहुत परिणाम झाले आहेत, व इंग्रजी राज्यरीतीचीं व्यंगें ज्यांच्या नजरेस येऊं शकतात, त्यांस मात्र वरील विचार लागूं आहेत; व यावरूनच स्वदेशाभिमान हा आमच्या आंगचा स्वाभाविक गुण नव्हे, तर तो केवळ कृत्रिम आहे, असें सिद्ध होतें. हा गुण आमच्या आंगीं साहजिकपणें वागत असता, तर तो सज्ञान व अज्ञान या दोहोंमध्येंहि सारखाच सांपडता. प्राचीन ग्रीक व रोमन लोकांमध्यें तो साहजिक होता; त्यामुळें दोन ग्रीक राष्ट्रांमध्यें मोठा द्वेषभाव असला तरी, परचक्राच्या वेळीं तीं एकत्र होण्यास क्षणाचाही विलंब लागत नसे. स्वदेशाकरितां देहत्याग करणें यासारखा अजरामर कीर्तीचा दुसरा मार्गच नाहीं, अशी त्यांची पूर्ण निष्ठा होती. व स्वदेशहानि होत असतांही परराष्ट्राच्या सेवेस राहणें, किंवा त्यास वश होणें यासारखी लज्जास्पद गोष्ट दुसरी कोणतीही त्यांस भासत नव्हती. आमच्या इतिहासांत याहून किती भिन्न प्रकार आढळतो, हें कोणास सांगावयास नको. स्वदेशाभिमानामुळें त्या लोकांत ज्या ज्या गोष्टींचा पूर्ण अभाव होता त्या त्या गोष्टी स्वदेशाभिमानाच्या अभावानें आमच्या देशांत मोठ्या उत्कर्षास पावलेल्या आमच्या इतिहासांत दिसतात. याप्रमाणें आमचा स्वदेशाभिमान कृत्रिम आहे, व तो अद्यापि रावापासून रंकापर्यंत जाऊन पोंचला नाहीं, व त्याचा प्रसार किंवा आकुंचन इंग्रजी विद्येच्या व जुलमाच्या प्रसारावर किंवा आकुंचनावर सदोदित अवलंबून राहील; व इंग्रजी विद्येच्या प्रसारानें दुसरें कांहीं हित होत नाहीं असें जरी समजलें, तथापि सर्वसामान्य निकृष्ट स्थितीचें मनुष्यास ज्ञान होऊन,

व त्याच्या मनांत सर्वसाधारण अनुकंपा जागृत होऊन, स्वदेशाभिमानाचें केवळ बीजारोपण होईल, तर इंग्रजी विद्येपासून आपणांस पुष्कळ लाभ झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं.

प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंत ज्यांचा समग्र इतिहास उपलब्ध आहे, अशा राष्ट्रांच्या सामाजिक स्थितीकडे पाहिलें असतां आपल्या असें दृष्टीस पडतें कीं भिन्नभिन्न काळीं मनुष्यांचीं, आपलीं कर्तव्यकर्मे कोणतीं याबद्दल भिन्न-भिन्न मतें होतीं. कोणत्याही एका काळांतील लोक घ्या, त्यांस असें वाटतें कीं प्रत्येकाचें कर्तव्यकर्म अगदीं निश्चित आहे, व त्यांत कालांतरानें भेद होणार नाहीं. परंतु तो काळ गेल्यावर, दुसऱ्या काळच्या लोकांचीं कर्तव्यकर्मांबद्दल मतें पाहिलीं असतां तीं पूर्वीच्या लोकांहून पुष्कळ प्रकारांनीं भिन्न आहेत असें सहज दिसून येतें. याप्रमाणें मानवी कर्तव्यकर्मांत कालांतरानें निरंतर भेद पडत आहे असें इतिहासावरून सिद्ध होतें, तथापि हा भेद केव्हां व कसा उत्पन्न होतो, हें कोणाच्याही लक्षांत येत नाहीं, व त्यामुळें धर्मांतरानें कर्तव्यकर्मांबद्दल विचार जेथें एकाएकीं बदल पावले नाहींत, तेथील लोकांस असें वाटत असतें कीं, पुरातन काळीं एकदां कर्तव्यकर्मे ठरलीं आहेत तींच आम्ही अद्याप अनुसरीत आहोंत, व तींच पुढेंही कायम राहिलीं पाहिजेत. हिंदु, मुसलमान व आशियाखंडांतील इतर लोकांत तर हे विचार फारच प्रबळ आहेत; व युरोपांतील अत्यंत सुधारलेल्या देशांत मात्र त्यांचें प्राबल्य कमी आहे; व तें कमी होण्याचें कारण आधुनिक विद्याप्रसार हें होय.

आम्हां हिंदुलोकांस वाटतें कीं अति पुरातन जो वेदप्रणीत धर्म तोच आम्ही अद्याप पाळीत आहों व तोच पाळणें हें आपलें सर्वथा कर्तव्यकर्म आहे. परंतु वास्तविक पाहिलें असतां, इंग्रजी राज्य स्थापन होण्यापूर्वीच प्राचीन आर्य धर्माहून आमचा आधुनिक व्यावहारिक धर्म इतका बदललेला होता कीं, प्राचीन काळचा कोणी धार्मिक मनुष्य जर आज पृथ्वीवर पुनः अवतरला, तर तो आम्हांतील अत्यंत धर्मनिष्ठासही धर्मभ्रष्टच ठरवील. याप्रमाणें धर्मसंबंधांत व इतर सर्व कर्तव्यकर्मांत फेर पडत जाणें हें अगदीं साहजिक व अनिवार्य आहे; व तो फेर होण्याचीं कारणें अर्वाचीन युरोपीय तत्त्ववेत्त्यांनीं शोधून काढिलीं आहेत.

सर्व प्रकारच्या सृष्टिव्यापारांत, व विशेषेंकरून मानवी स्थितींत, असा एक साधारण नियम दिसून येतो कीं, मनुष्य किंवा समाज कोणत्याही काळीं ज्या अनेक बाह्योपाधींनीं वेष्टित असेल, त्या उपाधींसच वश होऊन, व त्यांसच अनुकूल असें वागून, आपलें परम हित ज्या मार्गानें साधलें जाईल तोच मार्ग, आचरणांत स्वीकारितो, व आपलीं कर्तव्यकर्मेंही त्या मार्गास जितकीं जुळवून घेतां येतील तितकीं जुळवून घेतो. वरतीं सांगितलेल्या प्रकारचा भेद आचरणांत व कर्तव्यकर्मांत एकदम उत्पन्न होत नाहीं; तो नित्यशः थोडाथोडा होत जातो, व तो झालेला कधीं कधीं स्वतः मनुष्यासही माहीत नसतो, व पुढें एक दोन पिढ्यांत हा बदल पावलेला आचारच पूर्वापार चालत आलेल्या आचाराप्रमाणें भासूं लागतो.

वरील नियम पुढील विवरणावरून विशेष स्पष्ट होईल. वरतीं ज्यांस बाह्योपाधि ही संज्ञा दिली, त्या नाना प्रकारच्या आहेत. राज्यक्रांति होऊन परराष्ट्रीयांचें किंवा अन्य जातीयांचें देशावर वर्चस्व होणें; धर्मक्रांति होऊन पूर्व श्रद्धांचा लोप होऊन त्या जागीं नवीन श्रद्धा उत्पन्न होणें; शास्त्रीय ज्ञानाचा निरंतर प्रसार होत जाऊन पूर्वीच्या अज्ञानमूलक समजुती दूर होत जाणें; किंवा विद्यावृद्धीनें मनुष्याची विचारशक्ति उज्ज्वलित होणें; भौतिक संपत्तीचा उपयोग करितां येऊन, तिच्या विपुलतेनें अत्यंत समृद्ध दशेस येणें; किंवा दारिद्र्य स्थिति असह्य होऊन, उद्योगवृद्धीची बळकट इच्छा उत्पन्न होणें; या व अशाच दुसऱ्या अनेक गोष्टी समाजामध्यें नित्यशः घडत असतात, व त्यांचा परिणाम समाजावर प्रत्यहीं होत असतो. या उपाधींमुळें आज जी गोष्ट आपणांस सुख देते, व जो आचार आपणांस पूर्णपणें हितकारक वाटतो, तो तितक्याच अंशांनीं दुसरे दिवशीं कदाचित् भासत नाहीं. असें झाल्यानें आपणांस एक प्रकारची चटपट लागते, व तो आचार लोकरूढीस्तव जरी आपण आचरिला, तथापि पूर्वीप्रमाणें आपणांस श्रद्धा किंवा उत्साह रहात नाहीं. परंतु या उपाधि सर्वांवरच सारखा अंमल चालवीत असल्यानें, व सर्वांचेही विचारांवर बहुधा सारखाच परिणाम करीत असल्यानें, परस्परांस परस्परांचीं अंतःकरणें कळूं लागतांच बहुधा लोकरूढि बदलण्यास आरंभ होतो, व सर्वांच्या परम हितास जो मार्ग उचित तोच बहुधा रूढिरूपानें पुढें प्रवृत्त होतो, व एकदोन पिढ्या याप्रमाणें गेल्यावर इतिहासादि पूर्वस्मारक साधनें जेथें नाहींत, तेथें वर सांगितल्या प्रकारच्या नवीन मार्गासच प्राचीनत्व प्राप्त होतें.

मुसलमानी राज्य हिंदुस्थानांत झाल्यापासून तों पेशवाई बुडेपर्यंत आमच्या आचारविचारांत व कर्तव्यकर्मांत किती बदल झाला, हें हिंदुस्थानच्या इतिहासाचें ज्यानें मनापासून मनन केलें असेल त्याच्या सहज लक्षांत येईल. जे प्राण कंठगत झाले असतांहि यवनी शब्दांचा उच्चार करावयाचे नाहींत त्यांच्या भाषेंत यवनी शब्दांचें इतकें प्राचुर्य झालें कीं अगदीं साधारण व्यवहारांतही त्यावांचून चालेनासें झालें. ज्यांनीं सदासर्वकाळ शूद्रसंसर्गापासून दूर राहून वेदघोषानें आपली वाचा शुद्ध ठेवायाची, त्यांस कधीं यवनांच्या सेवेंत राहण्याचें, व कधीं राज्यपदारूढ होऊन संग्राम करण्याचें कांहींच वाटेनासें झालें. इतकेंच नव्हे; तर हिंदुधर्मांतील कांहीं प्रसिद्ध देवतांचा लोप होऊन, वरील काळांत इतक्या प्राकृत देवांची खालच्या वर्णांत प्रवृत्ति झाली कीं बुद्धिवान् व कल्पक ब्राह्मणांसही तितक्यांचीं पुराणें लिहिणें अशक्य झालें, व त्यामुळें या प्राकृत देवतांचा ब्राह्मणांवर फारसा अंमल बसला नाहीं. वरील काळांत आमच्या रीतीभातींतही पुष्कळच फेरफार झाले, व ते सर्व सांगत बसल्यास हा लेख फारच वाढेल.

हल्लीं इंग्रजी राज्यांत जे आमच्या आचारविचारांत फेरफार होत आहेत, त्यांचें गतवर्षांच्या केसरीच्या अंकांत वर्णन केलेंच आहे. आतां मुसलमानी राज्य स्थापन झाल्यापासून आजपावेतों जे आमच्या आचारविचारांत व कर्तव्यताबुद्धींत फेरफार झाले आहेत त्या सर्वांचा त्यांच्या कारणांशीं मेळ घातला असतां, विचारी मनुष्याच्या मनाची खात्री होईल कीं, हे सर्व फेरफार वरील नियमांस अनुसरून झाले आहेत व होत आहेत. व ज्याअर्थीं वरतीं सांगितल्या प्रकारच्या उपाधि अनिवार्य आहेत त्याअर्थीं कालांतराप्रमाणें प्रत्येक देशाचे धर्मसंबंधीं व व्यवहारसंबंधीं आचार व कर्तव्यताबुद्धि हीं बदलत गेलींच पाहिजेत. तीं न बदलूं देणें हें मनुष्यशक्तीच्या बाहेर आहे; परंतु तीं बदलल्यानें समाजाचा वास्तविक लाभच असतो; कारण कीं अनुपयुक्त व अहितकर रूढींचा लोप होऊन प्रसंग विशेषीं ज्या रूढि समाजाच्या परमहितास कारण होतात, त्यांची समाजांत प्रवृत्ति होते.

मागील अंकांत कर्तव्यताबुद्धीमध्यें कालगतीनें कसा भेद पडत जातो, व तो भेद कोणत्या साधारण नियमास अनुसरून पडतो, हें दाखविलें. आजच्या अंकांत त्याच विषयाचा विशेष विचार करणें आहे. सामान्यतः पहातां प्रत्येक मनुष्यास आपलें कर्तव्यकर्म काय हें लौकिकाचारावरून, आपल्या कुटुंबाच्या आख्यायिके-

वरून, व स्वजातीच्या नियमांवरून कळतें. कोणासही बहुधा आपलें कर्तव्य काय, हें स्वबुद्धीनें व स्वविचारानें ठरविण्याची गरज नसते. शिवाय, लौकिकाचार व स्वजातिनियम कांहीं ठिकाणीं अत्यंत असमंजसपणाचे जरी असले, तथापि मनुष्य जर त्यांतच जन्मला असेल, बालपणापासून जर त्यांसच परिचित झाला असेल, व लोकमतानें जर त्यांसच प्रशस्तता आली असेल, तर तेच आचार व नियम असमंजसपणाचे असूनही आपणां बहुतेकांस स्वाभाविकच वाटतात, व त्यांचें प्रसंगीं अनुकरण न केल्यास आपण केवळ लोकांत उपहास पावतों इतकेंच नव्हे, तर कधीं कधीं स्वतःसच चुकल्यासारखें वाटतें. ह्या गोष्टीचा प्रत्येक विचारी मनुष्यास अनुभव असेलच. याप्रमाणें कोणत्याही कालीं कर्तव्यें निश्चित असतात इतकेंच नव्हे, तर लोकरूढीनें तीं अवश्यक कर्तव्येंही भासत असतात.

याप्रमाणें सामान्य स्थिति होय. परंतु मागें सांगितलेल्या उपाधि ज्यावेळीं आपला अंमल चालवूं लागतात, तेव्हां वरील स्थितींत हळू हळू बदल होण्यास आरंभ होतो. या उपाधींनीं, एक तर लौकिकाचार व्यक्तिमात्रास अपकारक आहेत असें दृष्टोत्पत्तीस येतें; अथवा ते केवळ विचारी मनुष्यास असमंजस भासतात; परंतु व्यवहारांत ते सर्वत्र अपकारक असत नाहींत. आतां अपकारक व असमंजस अशा दोन प्रकारच्या आचारांपैकीं, अपकारक आचार फारच लवकर बदलून जातात; परंतु केवळ असमंजस असतील त्यांस बदलण्यास मात्र फार काळ लागतो; व सुधारणा करणारांनीं हा भेद विशेष लक्षांत ठेविला पाहिजे; नाहीं पेक्षां त्यांचे पुष्कळ श्रम व्यर्थ जाणार आहेत.

उदाहरणार्थ, आमची शुचिर्भूतता व विधवाविवाहप्रतिषेध, हीं दोन घेऊं. इंग्रजी राज्याची आमच्या महाराष्ट्रांत जेव्हां प्रथम स्थापना झाली त्या वेळीं युरोपियन लोकांचा स्पर्श झाला असतां ब्राह्मणांस स्नान करावेंसें वाटें. युरोपांतून येणारे पुष्कळ व्यापाराचे पदार्थ अशुद्ध म्हणून त्यांचा आम्ही स्वीकार करीत नव्हतों. साखर शुद्ध करितांना हाडांच्या कोळशांचा उपयोग करितात अशी अज्ञान ब्राह्मणांस कर्णोपकर्णीं वार्ता कळतांच, पुष्कळांनीं तीस अशुद्ध ठरविलें, व थोडक्याच वर्षांपूर्वी रबर, वगैरे आंग्लभौमरुतीच्या पदार्थांच्या संबंधानें अनेक मिथ्या ग्रह लोकांत होते. आगगाडीच्या वंगणास कांहीं अवध्य प्राण्यांच्या चरबीचा उपयोग करितात, व या गाडींत श्रेष्ठनीच वर्णाच्या लोकांस एकत्र बसावें लागतें, या

कारणांवरून काशीयात्रादि पुण्यप्रवासांत बैलगाडीनें किंवा पायानें जाणारे लोक कांहीं वर्षांमागें होते. परंतु या सर्व ग्रहांचा किती थोड्या काळांत लोप झाला आहे, व त्यांच्या कर्तव्यतेबद्दल आम्हांस आतां बिलकूल शंकाही उरली नाहीं. या गोष्टीचा विचार केला असतां अपकारक आचारांत भेद पडणें किती सहज आहे, याबद्दल वाचकांची खात्री होईल. वरील ग्रह कोणत्या प्रकारें अपकारक आहेत हें येथें सांगण्याची गरज नाहीं.

आतां विधवाविवाहप्रतिषेधाचा विचार केला असतां, हा प्रतिषेध असमंजसपणाचा आहे, हें पेशवाईतही कांहीं विचारी मनुष्यांच्या लक्षांत आलें असावें. परंतु सांप्रत काळीं धर्मप्राबल्यास थोडी उतारकळा लागल्यानें पुष्कळ विचारी लोकांस हा असमंजसपणा भासूं लागला आहे. वरतीं ज्या मिथ्या ग्रहांचा लोप झालेला दाखविला आहे, त्यांच्या खंडनार्थ अलीकडील सुधारणेच्छु लोकांस ग्रामण्यें करण्याचा, शास्त्राधार शोधण्याचा, आपलें विपुल वक्तृत्व ओतण्याचा, वर्तमानपत्रांत धामधूम करण्याचा, प्रसंग कधींच आला नाहीं. परंतु विधवाविवाहमंडनार्थ वरील सर्व उपायांची योजना होऊन चुकली आहे इतकेंच नव्हे, तर बालविधवांची व गतपत्नीकांची सांगड घालून देण्याकरितां, व त्यांस समाजाचा त्रास न होतां स्वतंत्र उपजीविका मिळावी म्हणून प्रयत्न करणारे, त्यांत मोठा उत्साह मानणारे, व आपल्या मंदिरांत व वार्तापत्रिकेंत, या वधूवरांस ऐहिक व पारमार्थिक सुखाचा लाभ होवो म्हणून प्रार्थना करणारे लोकही सध्यां बरेच आहेत. परंतु या सर्व श्रमाचें साफल्य मात्र दिसत नाहीं. असली सुवार्ता कानीं पडण्याचा प्रसंग वर्षसहा महिन्यांतून एकवारही येत नाहीं.

या सर्व गोष्टींचें कारण काय असावें ? हेंच कीं विधवाविवाहप्रतिषेधापासून व्यक्तिमात्रास होणारे अपकार अद्याप आम्हांस भासूं लागले नाहींत. हा प्रतिषेध स्त्रियांस अपकारक आहे. त्यांस मात्र आधुनिक सानुकंप कवींनीं वर्णिलेली शोचनीय स्थिति कधीं कधीं जन्मभर सहन करावी लागते; व शरीरप्रकृतीच्या व मदनबाधेच्या वश होऊन त्यांच्या हातून अमानुष साहसेंही घडतात. परंतु आज आम्हांमध्यें शेंकडों वर्षें चालत आलेला जो पतिव्रताधर्म त्याचे परिणाम कदाचित् स्त्रियांचे मनावर उपजतच होत असतील; बाल्यापासून तदनुसार शिक्षा मिळून त्यांस अनुकूल अशीच त्यांच्या मनाची प्रवृत्ति बनलेली असते; हतभाग्यतेनें वैधव्यप्रसंग

आल्यास तो अनिवार समजून त्यास तयार झालें पाहिजे, हें लोकरूढीवरून व नित्यक्रमावरून त्यांच्या अंतःकरणांत बिंबलेलें असतें; व प्रथमारंभीं वैधव्यदुःखें इतकीं घोर असतात कीं, त्यांची संभाव्यता ओळखणें, व त्याबद्दल विचार करणें, हें आमच्या कोमल मनाच्या व धार्मिक अबलाजनाच्या हातून होत नाहीं. अशा स्थितींत या प्रतिषेधाचा अपकारक स्वभाव आमच्या स्त्रियांच्या जितका ध्यानांत यावा तितका येत नाहीं; व वैधव्यदशा प्राप्त झाल्यावर पूर्वसंस्कार तसेच कायम असल्यानें, लोकरूढीचें प्रबळ भय असल्यानें, व त्यांच्या त्या स्थितींत ज्यांचा सहवास त्यांस घडतो, व ज्यांशीं त्यांचा बाल्यापासून स्नेह जडलेला असतो, त्यांचें या पुनर्विवाहासारख्या कृत्यास अनुमोदन नसल्यानें, वैधव्यदशेचीं सहस्र दुःखें भोगणें बरें, परंतु लोकाचाराविरुद्ध वर्तन करून बहिष्कृत होणें व पूर्वीच्या सर्व बंधुवर्गास मुकणें-ही स्थिति नको, असें त्यांस वाटतें. अशी त्यांची स्थिति असते कीं नाहीं हें ज्या मातापितरांनीं पुनर्विवाहाचा त्यांस सल्ला दिला असेल, त्यांस विचारिलें असतां खात्री होईल.

या सर्व विवेचनावरून असें सिद्ध होतें कीं विधवाविवाहप्रतिनिषेध जरी असमंजसपणाचा आहे, तथापि तो ज्यांस अपकारक आहे त्यांस, त्यांच्या स्थितींत तसा वाटत नाहीं. पुनर्विवाहाची पद्धति सुरू होत नाहीं, याबद्दल पुरुषांस दोष देणें, किंवा ती सुरू करण्याबद्दल त्यांस उपदेश करणें, ह्या दोनही गोष्टी सयुक्तिक दिसत नाहींत. ही असमंजस रूढि प्रचारांतून घालविण्यास, स्त्रियांची विचारशक्ति वाढली पाहिजे; त्यांस आपले हक्क व आपलें हित हीं स्पष्टपणें कळलीं पाहिजेत; व त्यांच्या अंगीं विशेष दूरदृष्टि आली पाहिजे. इतक्या गोष्टी घडून आल्यास, वरील प्रतिषेधानें होणारें नुकसान त्यांच्या नजरेस येईल व हा प्रतिषेध आपोआप मागें पडून पुनर्विवाहास सशास्त्रता येईल.

याप्रमाणें लोकांच्या कर्तव्यताबुद्धींत जो निरंतर भेद होत असतो, तो त्यांच्या बाह्योपाधींचा व स्वहितबुद्धीचा परिणाम असतो. कोणताही आचार केवळ असमंजस भासून फारसा उपयोग नाहीं; तो अहितकारक आहे, किंवा तो सोडल्यास आपलें पुष्कळ हित आहे असें व्यक्तिमात्रास वाटलें पाहिजे. मग पूर्वीची कर्तव्यताबुद्धि व धर्मश्रद्धा मागें पडून, तो आचार नाहींसा होण्यास अवकाश लागत नाहीं. म्हणून कोणत्याही एका प्रकारची सुधारणा करण्याचे पूर्वी, लोकांचें प्रत्यक्ष होणारें नुकसान त्यांस भासविलें पाहिजे, किंवा त्या सुधारणेचे फायदे तरी लोकांच्या उत्तम

नजरेस आले पाहिजेत; लोकांस त्यांच्या आचाराची केवळ असमंजसता दाखवून तादृश उपयोग नाहीं.

गेल्या दोन निबंधांत कर्तव्यकर्मासंबंधानें विचार केला; त्यांत असें दाखविलें कीं सर्व देशांत कालांतराप्रमाणें कर्तव्यकर्मांत फरक पडत जातो आणि जेथें चालू कर्तव्यकर्में लोकांच्या स्वहिताच्या आड येतात, तेथें त्या कर्तव्यांत फरक पडण्यास फार काळ लागत नाहीं; परंतु जेथें कांहीं विचारी लोकांस कोणतींही कर्तव्यकर्में असमंजस किंवा अप्रयोजक भासत असतात, परंतु त्यांपासून व्यावहारिक तोटे म्हणण्यासारखे नसतात, किंवा असल्यास ते लोकांच्या ध्यानांत येत नाहींत, तेथें मात्र हा फरक पडण्यास फार काळ लागतो. या निबंधांत धर्म व रूढि यांचा परस्परांशीं कोणच्या प्रकारचा संबंध असतो, व तो पूर्णपणें जाणणें सुधारणेच्छु जनांस किती अवश्यक आहे, या विषयाचा विचार करण्याचा आमचा उद्देश आहे.

सांप्रत काळीं कोणत्याही देशाची स्थिति पाहिली असतां, आपल्या असें सहज लक्षांत येईल कीं, कांहीं विशेष विचारी व तत्त्वज्ञानी खेरीज करून बाकी सर्व लोकांत स्वाभाविकपणें स्वार्थ साधून परमार्थाचा लाभ करून घ्यावा अशी बुद्धि वागत असते. बहुतकरून स्वार्थावर नजर विशेष; परंतु हा स्वार्थ परमार्थबुद्धीस अगदींच लोपवूं शकत नाहीं. आतां परमार्थ साधण्याचा, बहुतेकांच्या मतें, मुख्य उपाय म्हटला म्हणजे धर्मानुसरण हा होय. परंतु स्वार्थसाधनाच्या निरंतर चिंतेनें धर्मतत्त्वाचा स्वतः विचार करण्यास फारच थोड्यांस फुरसत सांपडते. शिवाय धर्म हा इतका वादग्रस्त विषय आहे, त्याचीं अगदीं मूलतत्त्वें इतकीं गहन व अप्रमेय आहेत, व तत्संबंधीं विचारांत मनुष्याच्या मनोवृत्तींचा त्याच्या विचारशक्तिवर इतका परिणाम होतो कीं, बहुधा कोणीही स्वतंत्रपणें धर्मविषयावर विचार करूं लागला असतां, त्याचीं मतें सर्वांस मान्य होण्याचा फारच थोडा संभव असतो. याप्रमाणें धर्मतत्त्वांचा विचार करण्यास प्रथम कोणास फावत नाहीं, व तशांतून इकडे कोणीं आपल्या बुद्धीचा व्यय केलाच तर त्यास निश्चयात्मक कोणतीही गोष्ट कळण्याची पंचाईत. या दोन गोष्टींमुळें धर्माच्या बाबतींत लोक जितके परतंत्रपणें वागण्यास राजी असतात, तितके ते दुसऱ्या कोणत्याही कामीं नसतील असें आम्हांस वाटतें.

कोणत्याही धर्माच्या संस्थापनेचा इतिहास पाहिला असतां, हीच गोष्ट आपल्या दृष्टीस पडते. कोणीं व्यक्तिमात्रानें आपण ईश्वरी अंश आहों किंवा आपणांस ईश्वरी प्रसाद झाला आहे, अशी लोकांची खात्री करून देण्याचा प्रयत्न केल्यास, त्यास बहुधा लोकांत मान्यता मिळण्यास अवकाश लागत नाहीं; कारण, स्वतः विचार करण्याचे श्रम न पडतां, ईश्वरी ज्ञानाचा व धर्मतत्त्वनिश्चयाचा एखादा उपाय सांपडल्य स तो सर्वांस इष्टच असतो; व या बाबतींत कोणासही आपल्या पारतंत्र्याचें फारसें वाटत नाहीं, आणि याप्रमाणें सर्व देशाचा देश व्यक्तिमात्राच्या भजनीं लागतो, व त्याचे उद्धार धर्मतत्त्वें होऊन बसतात.

असो. सांप्रत काळीं धर्मसंबंधानें परतंत्र राहण्याचें लोकांस इष्ट वाटत असल्यानें धर्माच्या काय आज्ञा आहेत व परमार्थ कोणत्या आचारांनीं साधेल, हें समजावून देण्याचें काम लोकांनीं दोहोंवर सोंपवून दिलें आहे; एक रूढि व दुसरा धर्मगुरु. पहा कीं, कोणतीही गोष्ट रूढ असल्यावर तिच्या धर्ममूलकतेचा आम्हांस कधीं संशयच येत नाहीं. आम्हां हिंदुलोकांत तरी आज असे अनेक आचार सांपडतील कीं, त्यांस धर्मग्रंथांत आधार सांपडणें बहुधा अशक्य आहे, किंवा धर्माज्ञा कदाचित् त्या आचारांच्या उलट असतील; परंतु रूढिप्राबल्यानें त्यांस 'श्रुतिस्मृतिपुराणोक्त' ही संज्ञा लागण्यास मुळींच अडचण नसते; आणि ज्यांस संस्कृताचा कधीं गंधही नाहीं, असे लोकही या आचारांस वेदांत आधार आहे, असें निर्भयपणें सांगण्यास मागेंपुढें पहात नाहींत. तशांत कोणीं रूढीविरुद्ध आधार काढलाच, तर धर्मग्रंथ व पंथ आम्हांत इतके अगणित आहेत कीं, उलट आधार काढणें फारसें दुर्घट नाहीं. शिवाय, धर्म व परमार्थ या दोन बाबतींत इतकें पारतंत्र्य वास करीत आहे कीं, ज्यांनीं ज्यांनीं या दोन विषयांवर ग्रंथ किंवा काव्य रचिलें, ते सर्व, व जे कोणी त्या ग्रंथांचा अर्थ लावण्याचें अंगीकारितील ते सर्व, आम्हांस विश्वसनीय व प्रमाण भासतात; मात्र त्यांचे ग्रंथ रूढीस अनुकूल असले पाहिजेत. याप्रमाणें सांप्रतकाळीं धर्म हा केवळ रूढीच्या स्वाधीन झाला आहे, व आम्हांतील धर्मगुरूही तिलाच अनुकूल असे वागतात; कारण त्यांचें माहात्म्य रूढीवरच अवलंबून आहे. लोकांचा आपली रूढि धर्मसिद्ध आहे, असा पक्का भरंवसा आहे, व रूढि मोडल्यास मात्र परमार्थ साध्य नाहीं, अशी त्यांची पूर्ण श्रद्धा आहे. त्यामुळें जेव्हां देशसुधारक कोणत्याही रूढीस दोष देतात, त्या वेळीं लोक त्यांस धर्मभ्रष्ट ठरवितात; व त्यांनीं

धर्माधार काढिल्यास 'यद्यपि शुद्धं लोकविरुद्धं नाचरणीयं' इत्यादि वाक्यांनीं त्यांस अडवितात; व देशसुधारणेच्या कामीं वरच्यापेक्षां कोणताही मार्ग अंगीकारिल्यास, सुधारकांस सारखींच अडचण पडते. ज्यांस पंडित दयानंदसरस्वती यांचा महाराष्ट्रांत झालेला छळ माहीत असेल, किंवा प्रार्थनासमाजाचा नित्य चाललेला उपहास ज्यांच्या कानीं पडत असेल, किंवा 'न्हाणवली' च्या लेखानें आमच्या कांहीं वाचकांचा जो केसरीवर अकारण क्षोभ झाला, तो ज्यांच्या ध्यानांत असेल, त्यांस वरील गोष्टीच्या प्रत्ययार्थ अधिक उदाहरणें देण्याचें कारण नाहीं. हें रूढीचें माहात्म्य सुधारकांनीं किती दृढपणें आपल्या लक्षांत बाळगिलें पाहिजे हें सांगावयास नको. जर हें माहात्म्य लक्षांत न आणितां त्यांनीं लोकसुधारणेचे प्रयास आरंभिले, तर ते बहुधा निष्फळ होतील यांत संशय नाहीं; व असे प्रयास कदाचित् कमी समजुतीच्या लोकांचे दुराग्रह अधिकच बळकट करितात, व कोठें कोठें कुटुंबस्वास्थ्यांत बिघाड आणितात. या गोष्टींवरून सुधारकांचें काम किती दूरदृष्टीचें व विचाराचें आहे; हें सहज ध्यानांत येईल.

[वर्ष ४, अंक २।३।४।५.]

इंग्रजांच्या कोणत्या गोष्टी अनुकरणीय आहेत ?


हरएक गोष्ट जी आपण पाहतों, तिचें अनुकरण करण्याकडे आपली प्रवृत्ति होते, हें स्वाभाविकच आहे. अगदीं तान्हें मूल जरी घेतलें, तरी तें देखील आपलीं आईबापें व इतर नातलग जें जें करितात, तें तें हुबेहूब करण्याची खटपट करितें; मग मोठे झालेल्यांची गोष्ट कशास पाहिजे ? लहान मुलांचे खेळ जर क्षणभर पहात उभे राहिलों, तर तेव्हांच आपल्या असें लक्षांत येईल कीं, ते एकूणएक अनुरुतीचेच व्यापार होत. मुलींचा भातुकलीचा खेळ किंवा बाहुलाबाहुलीचा खेळ व मुलांचा गाडीघोड्याचा खेळ किंवा शाळा चालविण्याचा फार्स हीं व यांसारखीं पुष्कळ दुसरीं रूत्यें वरील गोष्टींचीं प्रत्यक्ष प्रमाणें होत. फार काय, मुलें जें प्रथम बोलूं लागतात, त्याचें देखील तत्त्व अनुकरणेच्छा हेंच आहे. आतां मुलांचें जें अनुकरण असतें, त्यांत आवडनिवड कांहींच नसते. एखादी गोष्ट चांगली असली काय अगर वाईट असली काय, मुलें सर्वांचेंच अनुकरण करूं इच्छितात. थोराची अशी गोष्ट नाहीं. त्यांस वयपरत्वें ज्ञान व अनुभव अधिक मिळाल्यानें ते प्रथम आपल्या मतें बऱ्यावाईटाची निवडानिवड करितात व नंतर जी चांगली गोष्ट ठरेल, ती ते करूं लागतात. आतां ही निवडानिवड मात्र व्हावी तशी सदोदित होत नाहीं, यामुळें कधींकधीं थोर लोक निंद्य गोष्टींचें अनुकरण करून अगदीं वाईट छंदास लागतात व वडिलार्जित नांवालौकिकास बट्टा आणतात. केव्हां केव्हां तर असेंही होतें कीं, " महाजनो येन गतः स पंथाः " या वचनावर दृष्टि देऊन अनेक लोक, किंबहुना राष्ट्रच्या राष्ट्र, एखाद्या पापाचरणाकडे वळून जमनिदोस्त ह्राणाच्या रंगांत येतें. ह्याचा प्रत्यय पाहण्यास फार लांब जाणें नको. ज्याला आपल्या ह्या हिंदुस्थानच्या स्थितींत कसकसा बदल होत गेला व जात आहे, हें पुरतेपणीं माहित आहे, त्याला सहज दिसून येईल कीं, इंग्रजांनीं जेव्हां आमच्या देशांत पाऊल टाकलें तेव्हांच्या व आतांच्या आमच्या आचरणांत महदन्तर पडलें आहे; व आम्ही इतक्या निरुष्टावस्थेस येऊन पोचलों आहों कीं, आमचा देश म्हणजे आतां पुनरपि सुस्थितीस येईल असें आम्हांस बिलकुल वाटत नाहीं. नळ, नील, जांबुवंतादिक इंग्रज वीर जसजसे इकडे येऊं लागले, व आपला पराक्रम दाखवूं लागले, तसतसे आमचे लोक त्यांच्या अलौकिक गुणांस भुलून जाऊन, त्यांच्यांतील अदृष्टपूर्व वाईट

गोष्टींचेंही गुणांबरोबर अनुकरण करण्याविषयीं प्रवृत्त झाले. ते इकडे आल्याबरोबर त्यांची टापटीप, चलाखी, त्यांचा पेहराव, त्यांचा मिताहार वगैरे गोष्टी पाहून आमच्या लोकांचे नेत्र अगदीं दिपून गेले. कचेरींत काम करणें तें अतित्वरेनें पण चोख व अपूर्व धर्तीवर करावयाचें, त्यांची वागणूक सर्वत्र व सर्व प्रसंगीं एकसारखी शांत रीतीची असावयाची, पेहराव साधा मग तो राव असो वा रंक असो, त्यांत नेभळेपणा अगदीं असावयाचा नाहीं, खाणेंपिणें अगदीं बेताबाताचें व मनुष्य तरतरीत राहील अशा प्रकारचें, या व असल्या दुसऱ्या चांगल्या गोष्टींनीं आमचीं मनें अगदीं वेडावून जाऊन आम्हांस त्या सर्वांचें अनुकरण करण्याची इच्छा झाली. एक एक गोष्ट जशी आम्हांस साधायला लागली, तसतशी आमची इच्छा उत्कट होऊं लागून इतकी जोरावली कीं, इंग्रजांचें जें जें म्हणून पहावें–मग तें आमच्या रीतरिवाजाप्रमाणें असो अगर नसो, आमच्या धर्मास संमत असो वा नसो, किंवा या ह्वेस चालो वा न चालो तें आपलें आम्हीं बिनधोक उचलावयाचेंच. अशानें आमच्यांत उघडच अधर्माचरण व अविचार हीं अतोनात मातलीं. बूट, स्टाकण्या व इजारी यांचा इतका प्रघात माजला आहे कीं, भर उन्हाळ्यांत देखील–व तेंही ऐन दुपारीं–आमचे लोक त्यांचा मोठ्या प्रेमानें आदर करून शहरांतल्या शहरांत सोंगासारखे इकडून तिकडे हिंडत असतात. इंग्रजांत तरतरी असते हें पाहून आम्हीं मिताहाराकडे जें वळावयाचें तें सोडून दिलें, व त्या कार्याला भलतेंच कारण लावून त्यांच्याप्रमाणें आम्ही सुरापान करूं लागलों. चहाकाफीचे भक्त बनलों व मांसाहाराची खोड लावून घेतली. बरें त्यांत तरी आमचे लोक नियमित असावेत, पण तें देखील नाहीं. उगीच नादानादानें दारूचे पेले झोंकून वाटेनें बरळत व झगडत जाऊन झोकांडे खातां खातां कित्येक प्रतिष्ठित मंडळी गटारांत पडून लोळत असतांना आपण नित्यशः पाहतों. यांत त्यांस काय सुख वाटतें कोणास ठाऊक ? इंग्रज लोक सुरापान कां करतात, हें पुरतेपणीं कळलें असूनही आमचेकडे त्याचा केवळ चैनबाजीदाखल उपयोग होत आहे, हें आम्हांस किती लाजिरवाणें आहे बरें ! असो; या विषयावर आम्हीं आपले विचार स्वतंत्र लेख लिहून कळविलेच आहेत. याजकरितां इतकेंच सांगतों कीं, असल्या वेड्या फंदांत न पडतां आमच्या लोकांनीं आपल्या राज्यकर्त्यांचे जे खरे गुण आहेत, तेवढे मात्र घ्यावेत, म्हणजे आज जे आमचे अनेकरीत्या तोटे होत आहेत, ते होणार नाहींत व तेणेंकरून देशस्थिति बरीच सुधारेल. चहाकाफीचें खूळ तर सर्वत्र सारखें पसरलें आहे व त्यांत अनुकरणाची इतकी कमाल झाली

आहे कीं, जर कोणी संध्याकाळीं ६ वाजतां चहा घेऊं लागला, तर त्यास चहा-भक्तानें असें सांगावें कीं, बाबा, इंग्रज लोकांची चहाची ही वेळ नव्हे, तो तिसऱ्या प्रहरींच घेतला पाहिजे. असले प्रकार आमच्या ऐकण्यांत बरेच वेळां आले असून, त्यांचा वेडगळपणाही आम्हांस पुरता कळून आला आहे. आतां त्यांत औषधिक गुण काय असेल तो असो. आम्हांला तरी निदान तो माहीत नाहीं. तेव्हां त्यांच्या रीतिभातींचें व स्वभावाचें किंवा प्रकृतीचें खरें इंगित काय तें समजल्याखेरीज, केवळ ते करितात म्हणूनच आपण एखादी गोष्ट करावी, हें किती बरें निंद्य होय ? असो; एकंदरींत काय कीं, एखादी गोष्ट इंग्रजांच्या ठायीं जरी अवश्यक अथवा गुणावह असली, तरी ती आपल्या ठिकाणीं जर तशी नसेल, तर तिचें अनुकरण कधींही करावयास लागूं नये. आमच्या मतें ह्या अनुकरणप्रचारास दुसरें एक असें कारण आहे कीं, आमचे लोक इंग्रजांवर इतके खुष झाले होते कीं, त्यांची हव्या त्या मार्गानें मर्जी संपादण्याची त्यांस इच्छा झाली, व ती तृप्त करण्यास त्यांच्या हरएक गोष्टींचें अनुकरण करून त्यांच्यांत व आपल्यांत कांहीं अंतर नाहीं, असें दाखविण्याशिवाय त्यांस अन्य मार्ग दिसेना. असो, झाल्या गोष्टीस इलाज नाहीं; परंतु आतां चापुडें तरी आमच्या लोकांनीं सावधगिरीनें व विचारानें वागावें म्हणजे झालें. आमच्या राज्यकर्त्यांच्या ठिकाणीं असे अनेक गुण आहेत कीं, त्यांचें अनुकरण आम्हीं होतां होईल तितकें करून केलेंच पाहिजे. ते सगळे बारीक सारीकसुद्धां सांगत बसण्यांत अर्थ नाहीं; फक्त मुख्य मुख्य सांगून आटपतों. त्यांचा सर्वोत्तम गुण म्हटला म्हणजे त्यांच्यांतील एकी हा होय. त्यांच्यांत आमच्यासारखा जाति-भेदादि प्रकार नाहीं असें नाहीं. तथापि प्रसंग पडल्यास त्यांच्यांत जूट होण्यास मुळींच वेळ लागत नाहीं. परवांपर्यंत सर्वत्र गाजत राहिलेलें इल्बर्ट बिल जेव्हां प्रथम बाहेर आलें, तेव्हांपासून तों तें पास होऊन आक्ट होईपर्यंत, साहेबलोकांत कसा एकच कल्होळ माजला होता ? जणूं काय त्यांनीं मुद्दाम होऊनच कट केला होता काय असें भासे. हेंच कशाला ? उर्गीच सहज जर साहेब लोकांची टोळी चालली असली व तींतील एकानें समोरून येणाऱ्या हिंदूंच्या टोळींतील एखाद्या मनुष्याची कुचाळी केली असली, तर उभयतांत भांडण होतें, व त्यावेळीं त्यांच्या तर्फेकडील एकूणएक असामी दुसऱ्या टोळीवर अगदीं तुटून पडतो. परंतु आमच्या हिंदूंच्या टोळींतील फार तर एखादा दुसरा गब्रू शेवटपर्यंत टिकला म्हणजे अगदीं पराकाष्ठा झाली! तर मग हा जो त्यांच्यांतील उत्तम गुण, त्याच्याच अनुरुतीविषयीं सतत झटावें

म्हणजे आपण खरोखर मोठाच जय मिळविला असें होईल. त्या लोकांची नियमित वेळ साधण्याची जी खुबी आहे, तीही अनुकरणीय होय; पण हें मुद्दाम करायला पाहिजे असें नाहीं. त्यांच्यासारखे आपण जेव्हां उद्योगी होऊं, तेव्हां हा नियमितपणा आपोआपच आमच्यांत येईल. त्यांच्या तरतरीचें व चलाखीचें मुख्य बीज पाहूं गेल्यास असेंच दिसतें कीं, त्यांच्यांत नियमितपणा व व्यापृता हीं अगदीं जागृत आहेत. त्यांस परम जिज्ञासा असते, आमच्यांत तिचें वारेंही नाहीं म्हटलें असतां चालेल. त्या लोकांत शोधकता फार असल्यामुळें विलायतेंत सुधारणा खूप सपाट्यानें चालली आहे. तेव्हां त्यांचे जे हे मुख्य गुण, त्यांचें यथावत् अनुकरण केल्यास व वर सांगितल्या प्रकारचें दुरनुकरण टाकून दिल्यास, आमची जी कांहीं थोडीबहुत मंडळी देशोन्नतीकरितां आज रात्रंदिवस मनोभावानें खपत आहेत, त्यांच्या यत्नांस लवकर यश येईल असें आम्ही खातरीपूर्वक सांगतों.

[वर्ष ४, अंक २१.]



नेटिव्ह लोकांस इंग्रजांसारखें धाडस कधीं येईल ?

"ज्याचें कर्म त्याच्या बरोबर" अशी जी वडिलोपार्जित म्हण आली आहे, ती फार खरी आहे. ज्याप्रमाणें व्यक्तिमात्राची स्थिति त्याच्या करामतीवर अवलंबून असते, त्याप्रमाणेंच सगळ्या राष्ट्राची गति. ऱ्हास होणें, वैभवास चढणें, दारिद्र्यानें पीडून जाणें, दरारा असणें, अन्नान्नदशा होणें, हीं स्थित्यंतरें ज्या कारणानें एका मनुष्यावर येतात, त्याच कारणानें साधारणतः राष्ट्रावर येतात. घरांत तंटे होतात, तसेच राष्ट्रांत होतात. पूर्वी जसा घरांत एकाचा अंमल असून सर्वजण निमूटपणें त्याचें ऐकत असत, त्याप्रमाणेंच राष्ट्रांत राजाज्ञा सर्वप्रमाण असे. आतां घरांत जसें कोणाशीं कोणाचें न पटतां ज्याला त्याला आपलेंच निराळें कुटुंब स्थापावेंसें वाटतें, त्याप्रमाणेंच राष्ट्रांत ज्याला त्याला आपण म्हणतों तें चालावें, आपल्या करण्यास किंवा बोलण्यास कोणताही प्रत्यवाय असूं नये, असें मत होत चाललें आहे. सारांश, राष्ट्र हें एक मोठें घराणें होय, आणि राष्ट्राचें सुख घराण्याच्या सुखाप्रमाणें त्यांतील मनुष्यांच्या कर्तबगारीवर अवलंबून असतें. आमच्या देशावर मुसलमान लोकांनीं स्वाऱ्या केल्या व धर्मसंबंधानें आम्हांस अतोनात गांजिलें हें कशामुळें ? आमच्याच वेडेपणामुळें. विद्वत्ता, कलाकौशल्य, वेदांतविचार यांबद्दल जी भरतभूमि एकदां सर्व पृथ्वीवर गर्जत होती व जिच्यांत सोन्याच्या भिंती आहेत असा लौकिक झाला होता, तो कशानें? आमच्याच परिश्रमानें. बरें, पुढें आमचें ऐश्वर्य नष्ट होण्याचें काय कारण? आम्हीच. इंग्रज लोक अति नीच स्थितीपासून सांप्रतच्या भरभराटीस आले, याला कारण त्यांच्याच मनाचा व मनगटाचा जोर, याखेरीज दुसरें कांहीं नाहीं. तुम्हांला विद्या पाहिजे ? तर मग श्रम करा; धन पाहिजे ? श्रम करा; स्वातंत्र्य पाहिजे ? श्रम करा. विद्या, स्वातंत्र्य, धन व इतर सर्व चांगल्यावाईट वस्तूंचा जनक श्रम होय. केवढेंसें इंग्लंड ! ! पण त्याच्या कर्तृत्वाचा केवढा परिणाम ! आज पृथ्वीच्या सहाव्या हिश्शावर इंग्रजांची सत्ता आहे, व राज्यावर सूर्य न मावळणें हेंच जर कोणाच्या मोठेपणाचें दर्शक असेल तर तसें इंग्रजांच्याच राज्यावर घडत आहे. "दैवं प्रधानमिति कापुरुषा वदन्ति" हें आपल्या पूर्वजांचें म्हणणें अगदीं सत्य आहे. हा माझ्या बापाचा कूप असें गाणें गात बसून उद्योगशून्य राहणाऱ्या रडव्या मनुष्याला खाऱ्या पाण्याचे घुटके जन्मभर घेत पडलें

पाहिजे. आमच्या लोकांच्या हातून अलीकडे कांहींएक मोठें काम होत नाहीं, याचें कारण त्यांनीं स्वावलंबन अगदीं सोडिलें. विद्या पाहिजे ! लागले सरकारच्या पाठीमागें. व्यापार चालत नाहीं, केली सरकारला अर्जी. पण कोणी असा विचार करीत नाहीं कीं, सरकार म्हणजे आहे तरी काय ? का सरकारच्या खजिन्यांत आकाशांतून द्रव्याची धार लागली आहे म्हणून ज्याची त्याची मनीषा सरकार पूर्ण करील ? व्हावें तरी कसें ? परद्वीपस्थ लोकांचा अंमल असल्यामुळें द्रव्यदृष्ट्या प्रतिवर्षी आम्ही कोट्यावधि रुपयांस बुडत आहों, असें रडत बसून काय होणार ? परद्वीपस्थांच्या अंमलानें जो नफा होत आहे तो कोणासच दिसत नाहीं; आमच्या देशांतून वीस कोटी रुपये इंग्लंडास जातात, आम्ही गरीब होत चाललों आहों, व्यापार करण्यास आमच्याजवळ भांडवल नाहींसें झालें, अशा रीतीनें बडबडत सुटण्यांत काय हंशील आहे ? ही २० कोटींची खळी उद्योगाशिवाय कशी भरून येईल ? थोड्या वर्षांपूर्वी जर्मनी आणि फ्रान्स या देशांचें जें तुंबळ रण झालें, त्यामुळें फ्रान्स देश अगदीं जेरीस आला; नुसत्या खण्डणीबद्दल एक अब्ज रुपये त्यास देण्याचें कबूल करावें लागलें; या रुपयांची फेड कित्येक वर्षांच्या हप्तेबंदीनें व्हावयाची होती. पण त्या ताकददार लोकांनीं ती रक्कम एकदोन वर्षांत उभी केली, व ती जर्मनीस देऊन ते ऋणमुक्त झाले; यामुळें युरोपांतील सर्व देश तोंडांत बोटें घालून राहिले !! कोणास वाटलें कीं, फ्रान्स अगदीं निर्धन झाला असावा, पण फ्रान्स देशाचा उद्योग आणि काटकसर कोणीकडे आणि लोकांचीं अनुमानें कोणीकडे ? सारांश, कोणत्याही प्रकारें तुमचें नुकसान होत असो, तें न होऊं देण्याबद्दल निश्चय करा आणि उद्योगास लागा म्हणजे उद्योगासारखा दाता नाहीं. कल्पवृक्षानें देखील त्याच्यापुढें घमेंडी मारूं नये. आम्ही चोहोंकडून जखडलों आहों खरे, पण यांतून सुटका होणार कशानें ? आमच्या खटपटीनें. घरांत जसा आयव्ययाचा नेहमीं जमाखर्च ठेवावा लागतो, त्याप्रमाणें राष्ट्रानेंही तो ठेविला पाहिजे. उत्पन्न आणि खर्च यांचा हिशेब प्रत्येकाच्या डोळ्यासमोर पाहिजे. जो तो विचारतो कीं, हिंदुस्थानास संपत्ति कशानें येईल ! याला उत्तर येवढेंच कीं, ज्यानें त्यानें स्वतः श्रीमंत होण्याची तजवीज करावी म्हणजे हिंदुस्थान श्रीमंत होईल. हिंदुस्थानांत पूर्वी लोकसंख्या कमी होती, परकी राजे असले तरी ते येथेंच रहात असल्यामुळें पैसा बाहेर जात नसे, जमीन आतांपेक्षां सुपीक असे, अशा अनेक कारणांनीं लोकांस फार दगदग न करितां पोटभर खायला मिळत असे. पण आतां ते दिवस गेले. पैशाचा

लोट बाहेर चालला, जमीन नीरस झाली व दुसऱ्या देशांतील कारागीर लोकांनीं शेतीखेरीज दुसरे धंदे बुडविले. अशा पेंचांतून सुटायाचें असेल तर व्यापाराखेरीज दुसरा तरणोपाय नाहीं. केवळ शेतकीपासून होणाऱ्या उत्पन्नांतून अविच्छिन्न वीस-पंचवीस कोटींची वार्षिक खंडणी देऊन बाकीच्यावर वीसबावीस कोटी प्रजेचा चांगला चरितार्थ चालणें अशक्य आहे. दिवसेंदिवस प्रजा वाढत चालली आहे. त्याप्रमाणेंच जमीन वाढत जाती तर ठीक होतें. मग सर्वांनीं शेतकीचा धंदा करणें चाललें असतें. पण जमीन आहे तेवढीच. खाणारीं तोंडें मात्र भूमिति-श्रेढीनें वाढत चाललीं आहेत !! जर जमीन अधिक होत नाहीं, तर तींत काम करणारे लोकही अधिक होऊन फायदा नाहीं. सुमारें शंभर वर्षांपूर्वी जमिनींत काम करणारे जेवढे लोक होते, तेवढेच आतांही बस आहेत. पण तसें चाललें आहे कोठें ? जो तो जमिनींत डोकें खुपसणार !! दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे ती अशी कीं, जमीन जरी जेवढीच्या तेवढीच राहते, तरी बाकीच्या धंद्यांना अंत नाहीं. जसजशी मनुष्यांची बुद्धि फांकत जाईल, तसतसे अधिकाधिक आणि निरनिराळे धंदे निघत जातील. इतकें खरें आहे कीं, लोकसंख्येचें मान खाण्याच्या पदार्थांच्या उत्पन्नावर अवलंबून राहील. मासे, मांस आणि धान्य या तीन द्रव्यांनीं जेवढ्यांचें पोषण होण्याजोगें असेल, तितकीच संख्या या पृथ्वीवर राहील, व ती सीमा येऊन ठेपेपर्यंतच सध्यांचा वाढीचा क्रम चालेल. तथापि असा काळ येण्यास शेंकडों वर्षें गेलीं पाहिजेत. आतां असें झालें आहे कीं, जेथें एक मनुष्य पाहिजे तेथें दहा गुंतून राहिले आहेत; व दुसरे सर्व धंदे परकी लोकांनीं बळकाविले आहेत. यासाठीं आज असें झालें पाहिजे कीं, आमच्या लोकांनीं पराकाष्ठेच्या काटकसरीनें राहण्यास शिकून नित्यप्राप्तीचा कांहीं वांटा दररोज मागें टाकला पाहिजे, लहान लहान भांडवलें एकत्र करून मोठमोठे व्यापार करणाऱ्या मंडळ्या निघाल्या पाहिजेत. जे जिन्नस आमच्या देशांत थोड्या खर्चानें आणि थोड्या मेहनतीनें उत्पन्न होणारे आहेत, त्यांचे टोलेजंग कारखाने सर्व देशभर पसरून तसले जिन्नस परक्या देशांतून येथें येतां कामा नये इतकेंच नाहीं, तर असले जिन्नस या देशांतून परक्या देशांत विक्रीसाठीं गेले पाहिजेत. हल्लीं बेळगांवपासून गोव्यापर्यंत एक आगगाडी काढण्याचा विचार चालला आहे; पण ती काढण्यास भांडवल कोठून येणार ? अर्थात् इंग्लंडांतून !! आगगाड्या, तारायंत्रें, मोठमोठे पूल, रस्ते, कालवे, तलाव वगैरे आपल्याच भांडवलानें करणाऱ्या मंडळ्या हिंदुस्थानांत निघणें

अशक्य आहे काय ? देव्हाऱ्यांतल्या देवापासून परसाकडेच्या तपेलीपर्यंत लागणारी प्रत्येक वस्तु परकी लोकांनीं उत्पन्न करण्याचा मक्ता घेतला तर आमच्या कारागिरांनीं हातपाय बांधून घेऊन अन्नासाठीं तडफडत मरावें काय ? असें कांहीं उपयोगी नाहीं. प्रथम काटकसर व शिल्लक पाडणें, मग छोट्या शिलकी एकत्र करून बेडें भांडवल उभारणें व पुढें व्यापार काढणें, हा क्रम चालला पाहिजे. आतां असें होण्यास काय उपाय केले पाहिजेत हें पुढें लिहूं.

[वर्ष १, अंक ७.]

———

बालविवाहापेक्षां सतीच बरी !

आपल्यांत म्हण आहे: "एक घाव तीन तुकडे." ही म्हण बऱ्याच अनुभवावर बसविलेली आहे. सुखदुःखाच्या संबंधानें मनुष्याच्या मनाचे जे साधारण कल आहेत, त्यांची ही दर्शक होय. सर्व वस्तूंत प्राणिमात्रास जीव हा पराकाष्ठेचा प्यारा खरा, तथापि तोच जर निरंतर यातनांनीं परिवेष्टित असेल, तर त्याचा प्यारेपणा टिकाव धरील कीं नाहीं याचा संशय वाटतो. ज्याप्रमाणें एकादा अवयव कुजून गेला असला, व सर्व शरिराच्या सतत अस्वस्थतेला कारण होत असला, म्हणजे तो समूळ कापून टाकणें बरें वाटतें, त्याप्रमाणें अनंत मनोव्याधींनीं व शरीरव्याधींनीं हा जीवात्मा घेरून गेला, व त्यांतून पार पडण्याचा कांहीं एक संभव राहिला नाहीं, म्हणजे आपणांस असें वाटूं लागतें कीं, हें वरील कवच पंचत्वाप्रत मिळून जाऊन आंतील जीवतत्त्व नाहींसें होईल, व त्याबरोबर यातनांचा अंत होईल तर फार बरें. दुसरें असें; मरण हें कोणास चुकवितां येत नाहीं; कधींना कधीं तरी त्याच्या वश आपणांस झालेंच पाहिजे. ही गोष्ट ज्यांच्या मनावर बिंबली आहे, व जे थोडे विचारी आहेत, त्यांना असें वाटतें कीं, क्षणोक्षणीं नाना तऱ्हेचीं दुःखें भोगीत आयुष्य कंठण्यापेक्षां एकदम डोळेझांक होऊन त्या सर्वांवर पडदा पडेल तर फार बरें. पुष्कळ दिवस जगण्याचा लोभ असणें फारच स्वाभाविक आहे; पण त्यालाही कांहीं सीमा आहे; नाहीं असें नाहीं. असो, या वरील विचारांत जर तथ्य असेल व तें आहे असें आम्हांस वाटतें; तर बालविवाहापासून होणाऱ्या अनंत विपत्तींचा विचार करितां, आपल्यामध्यें पूर्वी सती जाण्याचा जो दुष्ट व अमानुष प्रघात प्रचारांत असे, तोच एक परी बरा असें म्हणण्यास फारशी हरकत येईल असें वाटत नाहीं. आतां या एकुणिसाव्या शतकांत जिकडे तिकडे सुधारणेचें पीक माजलें असतां, अशा प्रकारच्या थोर चालीस बरें म्हणणें म्हणजे, लिहिणारावर असमंजसपणाचा, अडाणीपणाचा, व मूर्खत्वाचा कांहीं अंशीं आक्षेप येतो खरा; तथापि बालविवाहापासून होणाऱ्या अनर्थांची, व सहगमनापासून होणाऱ्या अनर्थांची बेरीज करून ती विचाराच्या ताज्यांत तोलली, तर पहिल्या बेरजेचें पारडें खचित खालीं बसेल असें वाटतें. एकदां जबरदस्त वायु होऊन, किंवा अपघात होऊन तत्काल प्राण जावा, तशी सतीची गोष्ट असे. पण बालविवाहापासून होणाऱ्या विपत्तींची तशी गोष्ट नाहीं. ज्याप्रमाणें एकाद्या

वृक्षाला किडा लागून त्यांतील सत्त्वगुणांचा हळूं हळूं लोप होतो, व वरून दिसण्यांत जरी त्यांत विशेष फेरफार झाला आहे असें दिसत नाहीं; तरी वेळ येऊन ठेपली म्हणजे अकस्मात् धाडकन् तो कोसळून पडतो, त्याप्रमाणें या बालविवाहाची स्थिति होय. हा आमच्या देशास तीव्र क्षय रोग लागलेला आहे. यानें आमच्या स्वातंत्र्याचा, शरीरशक्तीचा, उमेदीचा, हिंमतीचा, धाडसाचा, व अभिमानाचा अगदीं उच्छेद करून टाकिला आहे, आणि हें आम्हांस कळत असून, पूर्वापार चालत आलेल्या लोकाचाररूपी बागुलबोवाची आम्हांस अशी बळकट धास्ती पडून गेली आहे कीं, त्याचा मात्र उच्छेद करण्याची आमची छाती होत नाहीं. किंवा असें असेल काय कीं, राष्ट्र एकदां हतवीर्य होऊन परवश झालें, म्हणजे कोणतीच सुधारणा करण्याची हिम्मत त्याला राहूं नये ? हा प्रकार कसाही असो, पण आमच्या राष्ट्रास या अविचारनिद्रेनें असें तीव्र ग्रासून टाकिलें आहे कीं, तींतून त्यास कसें जागृत करावें, अशी आज मोठी पंचाईत पडली आहे. त्याच्या कानांशीं पुष्कळ हाका आजपर्यंत पुष्कळांनीं मारल्या पण त्याचें घोरणें अजून संपत नाहीं. आतां चिमटेच घेण्याचा क्रम सुरू केला पाहिजे. बालविवाहामुळें आमच्यामधलि सद्गुणांचा ऱ्हास झाला आहे इतकेंच नाहीं पण नाहीं नाहीं त्या दुर्गुणांनीं आम्हांत जें ठाणें दिलें आहे, त्याबद्दल आम्हांस कांहींच वाटत नाहीं, हें किती शोचनीय होय ! या हास्यास्पद चालीमुळें सर्व सुधारलेल्या देशांत आमचें हसें होऊन गेलें आहे. देशांत वाईट चालींचें अस्तित्व असणें, हें त्या देशाच्या रानटीपणाचें मोठें दर्शक होय. या घोर चालींची जर एकसारखी माळ सांपडली तर, तींवरून त्या राष्ट्राच्या रानटी नीतीचा इतिहास लिहिणें फारसें कठिण पडणार नाहीं. सहगमनाचीच गोष्ट घ्या. या प्रचाराचा नीट विचार केला असतां अनेक गोष्टी लक्षांत येतात. ज्या पुराण हिंदुधर्माला कित्येक अर्वाचीन नीतितत्त्ववेत्तेही माना डोलावितात, तो परमपूज्य हिंदुधर्म, ही अमानुष चाल ज्यावेळेस पडली, त्यावेळेस अगदीं लयास गेला असावा व ज्यानें या घोर चालीस शाश्वता आणिली, अशा एका राक्षसी धर्माचें त्यावेळेस प्राबल्य झालें असावें असें स्पष्ट सिद्ध होतें. दुसरें असें सिद्ध होतें कीं, पुरुषांच्या पोकळ भुलथापांला भुलून जाऊन ज्या स्त्रिया आनंदानें आपणांस जाळून घेत, त्यांच्यांतून विचारानें अगदीं पळ काढिला असावा, व नाकांत वेसण घालून ज्याप्रमाणें बुद्धिहीन जनावरास पाहिजे तसें फिरवितां येतें, त्याप्रमाणें त्या आपली पुरुषाकडून पाहिजे तशी वागणूक करून घेत असाव्या; व अद्यापिही स्त्री-

पुरुषांतील या प्रकारच्या संबंधांत फारसा फरक पडला आहे असें आम्हांस वाटत नाहीं. आणखी अशी गोष्ट लक्षांत येते कीं, स्त्रियांविषयीं पुरुषांची मत्सरबुद्धि इतकी तीव्र असावी कीं नवरा जीवंत असतां त्याच्याशीं तिनें दगलबाजी न करावी यासाठीं योजिलेले उपाय कांहीं बस नाहींत, तर त्याच्या पाठीमागें त्या दगलबाजीचा मुळींच संभव राहूं नये म्हणून तिचा या जगांतून मुळींच मागमूस नाहींसा करून टाकावा, असें त्या काळच्या नीतिशास्त्रवाल्यांनीं ठरवून टाकिलें असावें. याला म्हणावें शास्त्रकार आणि धर्माधिकारी!! तांत्रिक नीतीचें संगोपन करण्यासाठीं, जिचा वृत्तांत ऐकिला असतां सहृदय हृदयांच्या अंतःकरणाचें विदारण होणार अशा अनीतीचा प्रघात घालणाऱ्या आप्पलपोट्या व दीर्घमत्सरी शास्त्रकारांस, आज आम्हांत वास करणारी भूतदया शुद्ध राक्षस म्हणविण्यास भाग पाडते. अशीं अनुमानें करीत बसलों तर तीं कधींच संपणार नाहींत. बालविवाहाच्या संबंधानें असेंच म्हणतां येईल. पूर्वीची स्वयंवराची चाल कोणीकडे, व आतांच्या भावलाभावलीचें परपाणिग्रहण कोणीकडे? आणि अशा वयांत झालेल्या मुलींना, बलहीनपतिद्वारा विषयतृष्णा शांत न झाल्यामुळें, अनेकवेळां मनोविकारांच्या अनावर झपाट्यांत सांपडून, खरोखरींच परपाणिग्रहण करावें लागतें, या गोष्टीवर व्यर्थ झांकण घालण्यांत काय हंशील आहे? तेंही असो. पांचपासून पंधरा वर्षांच्या आंत जितकीं पोरें मरतात, त्यांपेक्षां पंधराच्या पुढें फारच कमी मरतात; अशी ह्याही वैद्यशास्त्र सर्व पृथ्वीवर फिरवीत असतां, पांचपासून बारा वर्षांच्या बालविधवा पाहण्याचा ज्या लोकांचा हट्ट, त्यांना ही ह्याही काय होय? या अनुत्पादक वर्गापैकीं, या चतुर्थाश्रमाचा आश्रय करणारांपैकीं घरटीं निदान एकेक असामी तरी पाहिजेच! त्याशिवाय घराला आणि गांवाला शोभा कोठून येणार? वर आम्हीं या विधवावर्गास अनुत्पादक वर्गांत गोंविलें आहे, पण इतक्यांतच आमची चूक आम्हांस कबूल केली पाहिजे. या विधवा अनुत्पादक असल्या तर विजयालक्ष्मीसारख्या तारांगना या नीतिपूर्ण भरतखंडांत कोठून निपजल्या? दहाबारा वर्षांच्या आंत वैधव्य येऊन राजरोस पतिसुखोपभोगाच्या अपरिचितत्वामुळें वयांत आल्यावर सृष्टिक्रमानुसारानें विषयवासना उच्छृंखल झाली असतां तिचें शमन करण्यासाठीं हव्या त्या परपुरुषाचें सेवन करावें, व या गुप्तसभाग्याच्या निंद्य फलाचा नाश होण्यासाठीं गर्भपात आणि शिशुवध या अपराधांचा प्रघात जारीनें सुरू असावा, हें देशाला मोठेंच भूषण!! तसेंच, कधीं अतिलोभामुळें पोटें जाळण्यासाठीं, कधीं मोठ्या घराण्याशीं संबंध

व्हावा या बुद्धीनें, कधीं शुद्ध मूर्खत्वामुळें आईबापांनीं लहानपणीं गळ्यांत अडकविलेल्या कुरूप, खुनशी, भांडखोर, किंवा रोगी लोढण्याला कंटाळून जाऊन, व असलें भूत आपल्या विद्वत्तेस, आपल्या लौकिकास, आपल्या पगारास बिलकूल शोभत नाहीं, असें वाटूं लागून, जाड्या जाड्या पैसे कमाविणाऱ्या विद्वानांनीं, व इतर पैसेवाल्या फंदींनीं, किंवा भिकार नादिष्टांनीं देखील कधीं दुसरीं लग्नें करून, कधीं रांडांच्या घरीं पडलें राहून, कधीं बाटलाबाईच्या अंमलांत गुंगून जाऊन, आज बायकांच्या तंट्यामुळें संतापून जावें, उद्यां रोग भरल्यामुळें डॉक्टराच्या घरीं खेटे घालावे, आणि अब्रूस, द्रव्यास व शरीरसामर्थ्यास मुकावें व परवां गटारांत धुंद होऊन पडून 'छीथू' करून घ्यावें, अशामुळें देशोन्नतीचें काम तारायंत्रानें चालविल्यासारखें चालेल यांत संशय नाहीं! समंजस वाचकहो, हा बालविवाह नव्हे, हा आमच्या देशाला महा क्षयरोग लागला आहे; या भरतभूमीच्या तोंडाला कालिमा देणारा हा अपकीर्तीचा कज्जलकरंडक आहे. या आर्यांच्या, वीर्याच्या, आवेशाच्या, अभिमानाच्या, भारदस्तपणाच्या झऱ्याचा शोष करणारा हा अतिप्रखर आणि दुष्ट दानावल आहे. यासाठीं वृद्धतरुण देशबांधवहो, आपल्या ऐहिक सुखाला तीव्र दंश करणारा हा कालसर्प आपल्या सद्गुणाला कसपटाप्रमाणें उडवून लावणारा हा झंजावात—याच्या तडाक्यांतून सुटण्यास उपाय करण्याच्या कामीं उशीर लावण्यास आतां सवड नाहीं. तर धीर धरा, कंबरा बांधा, स्वतः विचार करा, लोकांस उपदेश करा, जागोजाग सभा भरवा, आणि थोड्या वर्षांच्या आंत या दुष्ट शत्रूस आपल्यामधून समूळ उपटाळून लावा.

[वर्ष १, अंक २३]

देशोन्नति

देशोन्नति ऊर्फ सुधारणा म्हणजे काय, या गोष्टीचा पोक्तपणें विचार करण्याचा काळ सांप्रत आला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण आजपर्यंतचा आमचा जो काळ गेला, तो सामान्यतः पाहतां बाल्यावस्थेंत गेला असें म्हटलें असतां चालेल. आज साऱ्या जगांत ज्या नव्या सुधारणेचा प्रकाश पडला आहे, व दिवसेंदिवस अधिकाधिक पडत चालला आहे, ती गेल्या पांचपन्नास वर्षांतल्या लोकांस अगदींच अपूर्व असल्यामुळें ते बिचारे अगदींच भांबावून गेल्यासारखे झाले. आमच्या पाश्चात्य आर्यबंधूंच्या अश्रुतपूर्व कलाकौशल्याच्या व विद्येच्या योगानें आम्हांस आमचे नामधारी जे अमेरिकन इंडियन लोक, त्यांच्यासारखेंच चकित करून सोडलें. वरील पातालवासी लोक जसे स्पेनच्या लोकांचीं आवजारें, बंदुका वगैरे पाहून त्यांस स्वर्गाहून आलेलीं माणसें समजूं लागले, त्याप्रमाणेंच आमची मंडळीही आपल्या राज्यकर्त्यांच्या रुतीनें आश्चर्यस्तब्ध होऊन 'इंग्रेजानें कुडींत जीव घालायाचा मात्र ठेविला आहे, बाकी सर्व कांहीं केलें आहे' असें म्हणूं लागली. कुणब्यामाळ्यांच्या व बायकापोरांच्या तोंडीं सुद्धां 'टोपीवाल्यानें केला कावा। आगीनगाडी घेते धांवा' अशीं आश्चर्यप्रेरित गीतें जाऊन बसलीं. तेव्हां आजपर्यंत इंग्रज लोकांविषयीं व त्यांच्या सुधारणेविषयीं आमच्या मनांत विलक्षण कल्पना बसून हे कोणी अमानुष सृष्टींतले प्राणि आहेत, व त्यांच्यापुढें आम्ही कोण 'कीटश्च कोटाय' कोठले क्षुद्र प्राणि आहों, अशा समजुती ज्या दृढ होऊन बसल्या त्या ठीकच!

पण अलीकडे आमचें आमच्या राज्यकर्त्यांशीं जें अधिकाधिक दळणवळण पडलें व विशेषतः इंग्रजी भाषेच्या ज्ञानामुळें त्यांच्या स्थितीचें यथार्थ स्वरूप आम्हांस समजण्यास जो मार्ग झाला, त्यावरून मागला बाऊ आतां दिवसानुदिवस कमी होत चालला; व इंग्रेज लोक हे आम्हांसारखींच माणसें आहेत, व त्यांस देवानें कांहीं दोन कान आमच्याहून अधिक दिले आहेत असें नाहीं, असें आम्हांस कळून येत चाललें आहे. आमच्यांत जसे बरेवाईट, शाहाणे, मूर्ख वगैरे लोक आहेत; व आमच्यांतले आचारविचार कांहीं निंद्य व कांहीं स्तुत्य असे आहेत, तसाच प्रकार इंग्रेज लोकांतलाही आहे, असें आतां सर्वांस कळूं लागलें आहे. यामुळेंच इंग्रेजांचें

सर्व प्रकारें अनुकरण करणें म्हणजे शहाणपणाची व सुखाची परमावधि असा जो प्रकार नुकता दृष्टीस पडत होता, व अद्यापिही क्वचित् दृष्टीस पडतो, तेंही मान आतां पुष्कळ कमीच आहे. शिवाय अलीकडे महाराष्ट्र भाषेचें व संस्कृताचें ज्ञानही लोकांत फैलावत चालल्यामुळें व पूर्वीच्या गोष्टींविषयीं थोडाबहुत विचार होऊं लागल्यामुळें, वरील इंग्रेजी तत्त्वज्ञानास बराच धक्का पोंचून, आम्ही केवळ रानटी नाहीं, असें दिवसेंदिवस आमच्या प्रत्ययास येत चाललें आहे. असो; तर एकंदरींत प्रस्तुत काळाचा हा महिमा आहे कीं, पूर्वीची सुधारणा व नवी सुधारणा या दोहोंचें यथार्थ स्वरूप कळण्याचा आज चांगला समय आला आहे.

तर आतां सुधारणा म्हणजे काय, व देशोन्नतीचें स्वरूप काय, याविषयीं शांतपणें विचार करूं. वरील दोनी शब्दांचा अर्थ राष्ट्राची उत्तम स्थिति हा होय, हें उघड आहे. आतां काय असलें म्हणजे राष्ट्र उत्तम अवस्थेंत आहे असें म्हणावयाचें, हें पाहूं.

वरील उत्तम स्थितीचें पहिलें लक्षण देशाभिमान होय, असें आम्ही समजतों. घनपदार्थांत जसें दार्ढ्य आढळतें, म्हणजे त्यांतील परमाणु परस्पर अत्यंत संलग्न असतात, त्याप्रमाणेंच राष्ट्रांतील लोकसमुदाय हा वरील अभिमानाच्या योगानें जितका जितका एकत्र जखडला गेला असेल, तितकी तितकी त्याची उन्नतावस्था समजली पाहिजे. ज्या देशांत आपण जन्मास आलों व जेथला आपणांस पहिल्यापासून सहवास जडला, तेथल्या गोष्टींवर आपलें प्रेम जडणें व त्यांविषयीं अभिमान वाटणें, हें अगदीं साहजिकच आहे. वास्तव अत्यंत अज्ञानावस्थेंतल्या राष्ट्रांतही देशाभिमानाची वृत्ति पराकाष्ठेची प्रबळ आढळते. आपल्या घरांत कोणी शिरून जर आपणांस लुटूं लागला तर तें जसें घरच्या मालकास पाहवणार नाहीं, त्याप्रमाणेंच आपल्या मुलखावर गनीम चालून आला असतां, त्याशीं सामनां करायाला उभें राहणें व त्याला माघारीं पिटून लावणें, ह्या गोष्टीही राष्ट्राच्या आद्यावस्थेंत अगदीं सहज असतात. परवां अफगाणिस्थानांत किंवा झुलू लोकांच्या मुलखांत कोणी डिमॉस्थेनीस किंवा सिसरो यास सभाग्रस्थानीं उभें राहून पांडित्य करावें लागलें नाहीं. प्रत्येक अफगाणाच्या व झुलूच्या अंगाला हा उपदेश जन्मतः खिळलेला, कीं आपल्या देशांत जो जबरदस्तीनें घुसायाला पाहील, त्याच्या अंगावर चालून जाऊन, त्याला जागच्या जागीं चीत तरी करावा, किंवा तें नच होईल तर निदान त्याला पिटून तरी बाहेर घालवावा. साऱ्या जगाच्या इतिहासांत हीच गोष्ट नजरेस येते. ग्रीक लोक अर्धेमुर्धे रानटी होते, तेव्हां प्राचीन पारसीक लोकांशीं त्यांनीं

असे घनघोर संग्राम केले कीं, अजूनपर्यंतही सारें जग त्यांचा वृत्तांत वाचून तोंडांत बोट घालून राहतें! केवढी पार्सदेशाच्या चक्रवर्तीची सत्ता, आणि ग्रीसदेशांतली बारीकसारीक संस्थानें म्हणजे काय सिंहमूषकन्यायानें सहज चिरडून टाकतां येण्याजोगीं! पण वीस लाख फौज व बारासें जहाजांचा तांडा या सर्वांचा अथेन्स व स्पार्टा या चिमुकल्या संस्थानांनीं पार धुव्वा उडवून दिला! याप्रमाणेंच रोमन लोकांची अव्वलची हकीकत. येवढा कार्थेजचा सरदार हानिबल्, कीं, त्यानें आल्पूसपर्वताच्या पहाडांवरून आपल्या शत्रूच्या मुलुखावर चढाई केली, व दोनचार लढायांत रोमची फौज अशी खची करून टाकली कीं, शहरच्या तटबंदीपुरतीही शिबंदी जाग्यावर राहिली नाहीं; पण धन्य रोमन लोक,—कीं एकजण तरी तसल्या भयंकर स्थितींत शत्रूच्या गोटांत तहाचें बोलणें लावायाला जावयाचा होता! तहाचें बोलणें लावणें तर दूरच, पण सेनेट सभेनें तावडतोब असा ठराव केला कीं, जो कोणी सभेंत तहाची गोष्ट बोलेल, त्यास मारून टाकावा! या वरील राष्ट्रांच्या आरंभींच्या हकिकती. पण पुढें तेथेंच काय चमत्कार दृष्टीस पडूं लागले पहा. ज्या ग्रीक लोकांच्या खातेरेत वीस लाख लष्कर नव्हतें, तेच पुढें असे बहाद्दर होऊन बसले कीं, डिमॉस्थेनीससारख्या अद्वितीय वक्त्यानें त्यांच्या कानींकपाळीं ओरडण्याची आपणाकडून पुरेवाट केली, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. त्याचप्रमाणें वर सांगितलेले दगडाच्या छातीचे जे रोमन लोक, त्यांच्याही सार्वभौम राज्यांत अशी बेबंदशाही माजली कीं, सैन्यांतील लोकांनीं आज एकाला बादशहा बनवावा, व उद्यां त्याच जागीं दुसरें बाहुलें उभें करावें! तर राष्ट्रांच्या अवस्थेंत कालेंकरून असे विलक्षण फेरफार झालेले आढळतात.

मागील निबंधांत देशोन्नतीचें पहिलें मोठें अंग देशाभिमान होय म्हणून सांगितलें, व राष्ट्रांच्या आद्यावस्थेंत वरील गुण किती पूर्णतेनें आढळतो, हेंही दाखविलें. आतां राष्ट्राच्या उत्तर दशेंत वरील गुणाचा ऱ्हास कसा होत जातो, याचा विचार करूं.

मागील खेपेस ग्रीस व रोम येथील लोकांचा आवेश पुढें कसा ढिला पडत गेला; हें सांगितलें. हाच प्रकार सर्व राष्ट्रांतून आढळतो. आमच्याच देशांत मुसलमानांच्या व मराठ्यांच्या इतिहासाकडे लक्ष्य पुरविलें असतां वरील गोष्टीची प्रचीति येईल. बाबरच्या वेळेस झाडाचे तुटलेले जे मोगल हिंदुस्थानांत येऊन धडकले, त्यांची

स्थिति कोणीकडे, आणि अवरंगजेबाच्या सरंजामी लष्करांतले तिस्मारखान (कीं ज्यांनीं धनाजीचें किंवा संताजीचें नांव ऐकलें कीं त्यांस कांपरें भरावें) ते कोणीकडे ! त्याप्रमाणेंच शिवाजीमहाराजांचे सिंहगड ओळकंबणारे व दिवसाढवळ्या सहा दिवस चैनीनें सुरत शहर लुटणारे पट्टे कोणीकडे, आणि रावबाजींच्या पळपुट्या लष्करांत ' ज्यासि मिळेना भाकर अर्धी । त्यासि बसाया घोडी जर्दी ! ' अशा वसुलाचे जे एकेक महा वीर होते, ते कोणीकडे ! आतां येवढें विलक्षण स्थित्यंतर दर-एक राष्ट्रांत कां आढळतें, याचा जर विचार केला, तर यास कारण संपत्ति व ऐष-आराम होय, हें कोणाच्याही लक्षांत येऊन चुकेल. सामान्यतः जगांतला अनुभव सर्वांस माहीत आहेच कीं, उन्हातान्हांत खपणाऱ्या कुणब्याची शरीरप्रकृति कशी धडधाकट असते, आणि बाळवाटी व तूपरोटीवाल्या मिजाशी मंडळीची आस्था कशी असते. आमच्या भाषेंत म्हण आहेच, कीं ' रानचा वारा आणि घरचा चारा बरोबर नाहीं. ' तर याच न्यायानें जें राष्ट्र आरंभीं भुकेबंगाल असतें व त्यास ऐष-आरामाची चट लागलेली नसते, तें शूर, बाणेदार, अल्पसंतुष्ट, नेकीचें अशा प्रकारचें असतें. त्यास शिवाजीसारखा किंवा बाबरासारखा एखादा मोहरा मिळाला कीं पुरे, तें लागलीच वावटळीसारखें किंवा वणव्यासारखें पसरत जातें ! पण कांहीं काळानें तीच स्थिति अगदीं बदलून जाते. ज्यास खायची भ्रांत असते, त्यास यथास्थित चम्मा मिळूं लागला, किंवा ज्याच्या हातास सोन्यारुप्याचा विटाळही झालेला नसतो, त्याच्या अंगावर रत्नें चमकूं लागलीं, म्हणजे मग पहिलें वारें गेलें ! पहिले बाजीरावसाहेब आपल्या परशुरामक्षेत्रांतल्या अळूच्या शाकेची व ताकभाताची ओळख विसरले नव्हते, तेव्हां वेळ पडल्यास हुरडा व लोटाभर पाणी येवढेंच त्यांस बस होत असे; व अशा सरंजामानिशीं त्यांनीं दाभाड्याची खोड जिरवली, सुभेदारसाहेबांस जेरीस आणलें, आणि दिल्लीपतीस आपल्या मुठींत वागवून नादीरशाहासारख्यास आल्या वाटेनें परत जावयास लाविलें ! पण तीच पुढें रावबाजींची मिजास काय वाढली, व तिचा परिणाम काय झाला तो पहा ! आपल्या पूर्वजांनीं येवढी थोर कमाई कशी केली, व आपल्या आजापणजांची मूळची काय स्थिति होती, ती त्या बेट्यांच्या कधीं स्वप्नींही वागली नाहीं. राज्य म्हणजे त्यांची कल्पना काय, तर ब्राह्मणभोजन, स्त्रियांचा आखाडा, व हवें त्यास लुटण्याची व ठार मारण्याची मुभा ! मग असले राजश्री लवकरच सारा बखेडा करून भागीरथीच्या तीरीं स्वस्थपणें स्नानसंध्या व पितृतर्पण करायास जाऊन बसले यांत नवल तें कोणतें !

तर राष्ट्रास उतरती कळा लागण्यास व देशाभिमान क्रमाक्रमानें विगलित होण्यास वर सांगितलेली अपार संपत्ति व तिचा उपभोग हींच कारणें होत. कोणत्याही राष्ट्रांत आरंभीं जे शौर्यादि सद्गुण असतात, त्यांच्या जोरावर त्यास संपत्तीचा लाभ होऊं लागतो. संपत्तीचा लोभ सुटून तिची उत्तरोत्तर समृद्धि होत चालली व ऐषआराम वाढला, कीं हळू हळू पहिली तरतरी कमी होत जाते; आणि तोच क्रम पुढें चालतां चालतां अशी अवस्था येऊन पोंचते कीं, आपला एकट्याचा तळीराम चांगला गार होतो आहे ना ? मग बुडेना देश, होईना परकी लोकांचा अंमल, जाईना आपली व आपल्या देशाची अब्रू, करा फितूर, मात्रागमनीपणा करा, कांहीं फिकीर नाहीं;— अशा प्रकारचे लाल देशांत निर्माण होतात; व हालोहाल देश सफाई बुडवितात. असले नराधम आमच्या देशांत होऊन गेल्यामुळें त्यांच्या कृतीनेंच आम्ही असल्या लाजीरवाण्या स्थितीस येऊन पोंचलों आहों, हें कोणासही सांगावयास नकोच ! रोमन लोकांत दंगेखोरांस टार्पीया नांवाच्या टेंकडीवरून कडेलोट करीत असत; तसलीच शिक्षा असल्या मातृगामी नरपशूंस पाहिजे ! पण लोक एकदां हतवीर्य, अभिमानशून्य, व पोंचट असे होऊं लागले म्हणजे मग त्यांच्या कृति पहिल्याच्या अगदीं उलट होऊं लागतात. हीच स्थिति हल्लीं आमच्या घरीं टळटळीत प्रत्ययास येत चालली आहे. ज्या शहरांत रामशास्त्र्यासारखे देहान्त प्रायश्चित्ताचा रोकडा जबाब तोंडावर सांगणारे, व चापाजी टिळेकरासारखे स्वामिभक्तयर्थ प्राण खर्चणारे पुरुषमाणे होऊन गेले, तेथें आजची हालहवाल काय आहे म्हणाल, तर लेडी फर्ग्युसन-बद्दल फुकाचे दोन अश्रु टाकायाचे तर ते सुद्धां On her Majesty's Service only, अशा राजमुद्रेचा परवाना जेव्हां हातांत पडेल, तेव्हां मंडळी टाकणार; नाहीं तर डायरेक्टरसाहेबांकडून थप्पड आली तर करतां काय, कीं साऱ्या मुलखांतली बदमाष जी सार्वजनिक सभा, तिच्यासारखे तुम्हीं चार चार करायाला लागलां तर आमच्या कामास पडायाचें नाहीं ! नुसत्या रडण्याच्या कामांत इतकी बहादुरी, पण असले रडतराव देशहिताच्या मर्दुमकीच्या कामांत तर कितीसा दम करतील तें दिसतेंच आहे ! इंग्रजी विद्येचा महिमा साऱ्या भूमंडलावर काय गाजतो आहे, तर तिचें सेवन म्हणजे वाघिणीचें दूध पिणें; पण या दुधावर पोससोसून येथें पाहावें तों निव्वळ मेषपात्र मंडळी मात्र निपजते आहे ! कौपरसाहेब आपल्या जन्मभूमीची थोरवी गातात, कीं तिचा वारा लागला कीं, गुलामांचे बंध मोकळे होतात;*

* Slaves cannot breath in England. They touch our country, and their shackles fall."

आणि इकडे वरील वारा पिऊन असले वीरभद्र निर्माण होतात कीं, कोणी चःकश्चित् टोपडा कां असेना, ते त्याला वंगलेच ! आमच्यांत कित्येक आडनांवी रावबहादुर तर इतके राजभक्त बनलेले आहेत, कीं सांजसकाळ एखाद्या तरी गौरकायापुढें लांगूलचालन केल्याखेरीज त्या ग्रामसिंहास तुकडा गोडच लागायाचा नाहीं. त्यांतून लोकहिताचें एखादें काम कोणीं उभारलें, आणि चालत्या गाड्याला खीळ घालण्याची संधी आली, कीं असली पर्वणी तर वरील खाशी मंडळी कधींच फुकट जाऊं द्यावयाची नाहीं. विश्रामबागेचा जीर्णोद्धार करून तेथें लायब्ररीचा समावेश करावा, असा कोणी संकल्प प्रगट केला कीं पुरे,–उठले एक रावसाहेब झक मारायाला ! जकातींच्या बाबतींत कोणीं उठावणी केली, कीं ती हाणून पाडायाला दुसरे गोंडस सभासद सज्ज होऊन बसलेलेच ! पण यांत नवल कसचें ? पंडितांनीं म्हटलेंच आहेः—

तें श्वान एक तुकड्यास्तव चार नाना ।
दावी धन्यास जठरार्थ कसें पहाना ॥

मग या श्वानांच्या गळ्यांतील पट्ट्यांवरून रा. सा., रा. ब., किंवा के. सी. आय. अशीं अक्षरें झळकत असलीं तरी श्वत्वाचा परिहार कसा होणार ? 'केसरी' राजास असल्या किताबतीची मुळींच पर्वा नाहीं. म्हटलें आहेः—

नाभिषेको न संस्कारः सिंहस्य क्रियते मृगैः ।
विक्रमार्जितराजस्य स्वयमेव मृगेंद्रता ॥

" सारे मृग मिळून सिंहास राज्याभिषेक करतात, किंवा इतर कांहीं संस्कार करतात असें नाहीं. तर त्याचें मृगेंद्रत्व केवळ त्याच्या नैसर्गिक पराक्रमावरूनच सिद्ध होतें ! "

गेल्या निबंधांत आमच्या देशांत देशाभिमानाचें वारें कितपतसें उरलें आहे हें दाखविलें. आतां आम्हांमध्यें वरील वृत्ति कशामुळें ऱ्हास पावली आहे, व ती कशानें जागृत होईल, याविषयीं कांहीं विचार आमच्या वाचकांस सादर करतों.

आमच्या देशाची गेल्या शंभर वर्षांत काय दुर्दशा उडाली, हिजविषयीं जो विचार करील त्याच्या लक्षांत ही गोष्ट सहज येईल कीं, इतक्या अवधींत आम्ही होतां होतां अगदींच निःसत्व होऊन गेलों. व्यक्तिभूत मनुष्यांत किंवा राष्ट्रांत एका

जातीचा पीळ असावा लागतो, तो क्रमाक्रमानें आमच्यांतून तूर्त अगदींच नाहींसा झाल्यासारखा झाला आहे. इतर कोणत्याही देशांतल्या मनुष्याच्या थोबाडींत दिली असतां तो उलट थोबाडींत दिल्यावांचून राहणार नाहीं; पण आमच्या येथें मात्र येशूख्रिस्तप्रणीत जें सूत्र कीं, कोणीं एका गालावर मारलें असतां दुसरा पुढें करावा, तें पूर्णपणें लागू पडतें! ही नीचावस्था दीर्घकालिक स्वस्थतेनें व आमच्या सरकारच्या काव्यानें आम्हांस प्राप्त झाली आहे यांत संशय नाहीं; पण या अभिमानशून्यतेला आणखीही बरींच कारणें झालीं आहेत; त्यांचा येथें उल्लेख करणें अवश्य आहे.

प्रथमतः ही एक मोठी गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, इकडील देशांतून देशाभिमान ही मनोवृत्तिच म्हणण्यासारखी माहीत नाहीं. रोम, ग्रीस, इंग्लंड, अमेरिका वगैरे ठिकाणीं स्वदेशप्रीति म्हणून एक अत्यंत प्रबळ मनोवृत्ति जशी आढळत असे व अद्याप आढळते, तसें एशिया खंडांतील कोणत्या देशांत कांहींच आढळत नाहीं. सन १८५७ सालीं एकदम साठ पलटणी उठून त्या स्वातंत्र्याचा झेंडा उभारतात, पण या झेंड्यांत आणि इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका यांतील बंडांत अतिशयित अंतर आहे. वरील तिन्ही देशांतील दंगे कराच्या बाबतीवरून झाले; आणि बंडें इ. स. १८०७ व १८५७ सालीं झालीं; त्यांस कारण देशाभिमान बिलकुल नव्हे, तर केवळ धर्माभिमान! 'काडतूस' या एका शब्दानें सारा बंगालइलाखा एका क्षणांत पेटून राहिला! बाकी इतकी काळी फौज जी एकाएकीं बिथरली, तिजपैकीं एका शिपायाचेही अंगीं ह्यांपूडन् किंवा वॉशिंग्टन् यांच्या अंगांतला आवेश संचरला असेल असें बिलकुल म्हणवत नाहीं. फार तर कशाला? सध्यांच आमची व करवीरस्थ आडनांवी 'बरव्या' राजश्रीची झुंज लागली आहे. हिचा परिणाम कांहींही होवो, त्याजविषयीं आम्ही बिलकुल फिकीर करीत नाहीं. खरा शूर आहे, तो लग्नकुंडली वर्तवून लढाईस जात नसतो; व 'पराभवोऽप्यूत्सव एव मानिनाम्' * हीच त्याची जयापजयाविषयीं उदासीनता असते. शत्रु दिसला कीं घुसून जावें येवढीच खबर तो ठेवीत असतो! ही आमची स्वतःची तयारी आहे; पण स्वातंत्र्यसूर्याचा केव्हांच अस्त होऊन पराधीनतांधकारांत फार दिवस चांचपडत पडलेल्या तदनुरूप सर्व मनोवृत्ति ज्यांच्या बनून राहिल्या, अशा जनसमूहाच्या सदरील प्रका-

* "मानी जे आहेत त्यांस युद्धांत पराभव होणें हेंही उत्सवप्रद होतें!"

रावर एकेक कोट्या ऐकाव्या, म्हणजे धन्य वाटते! त्यांचा कोटिक्रम येणेंप्रमाणेंः– कोल्हापुरचा महाराज! आपल्याला काय त्यांच्याशीं करायाचें आहे? हीं राजकीय प्रकरणें, यांत आपणांसारख्या गरीब वर्तमानपत्रकर्त्यांनीं कशाला पडावें? लष्करच्या भाकरी भाजण्यावांचून आपलें कांहीं अडलें आहे? शाळा चालवा, वर्तमानपत्रें चालवा, आणि सतरा हिसके पुणें–मुंबई, मुंबई–पुणें असे घाला, हजारों रुपये खर्च करा, लोकांपुढें भिक्षांदी मागा आणि शेवटीं ब्यांकच्या खटल्याप्रमाणें सारेंच ओंम् फस झालें, किंवा एखाद्याच्या अंगावर बलामत आली, म्हणजे पंचाईतच कीं नाहीं! स्वस्थ खाविंदचरणारविंदीं हरि हरि म्हणत बसायाचें सोडून या छोटेखानी मंडळीनें काय हा × × × × × उपद्व्याप आरंभिला आहे बरें? इ. इ. इ.! वरच्यासारखें पोक्त तत्त्वज्ञान आमच्या वाचकांपैकीं शेंकडों हजारों जणांनीं ऐकलें असेलच!–तर हीच स्थिति आजपर्यंत आमच्या देशांत चालत आली आहे. लोकांस अभिमानास चढवायाची बाजू कोणती? तर यज्ञोपवीत, गोब्राह्मण इत्यादि; स्वदेश, स्वातंत्र्य, जन्मभूमि या शब्दांत वरच्यासारखा प्रभाव प्राच्य देशांत प्रायः थोडाच आढळतो!

आमच्या देशांत जन्मभूमीचा अभिमान शिथिल होण्यास या राष्ट्राचें विस्तीर्णत्व व जातिभेद हीं दोन मोठीं कारणें झालीं आहेत. सिंधनदीकडचा मुलूख व त्रावणकोर, किंवा कोंकण आणि बंगाल हे प्रांत परस्परांच्या संबंधानें म्हटलें म्हणजे आम्ही व आमचे पातालवासी अमेरिकन यांच्यासारखेच होत. दोघांची बहुधा अगदींच फुटाफूट म्हटली असतां चालेल. विद्या, देशाचार, रीतरिवाज वगैरेच्या संबंधानें पाहतां असले परस्पर विप्रकृष्ट प्रांत म्हटले म्हणजे दोन भिन्न भिन्न देशच होत! मग अशांच्या मधें ऐक्य तें कितीसें उत्पन्न होणार? ही एक गोष्ट झाली. दुसरा प्रकार जातिभेदाचा. यानें तर या राष्ट्राची फूट अतिशयितच पाडली आहे. अठरापगड जातींस अठरा टोपकारांनीं गुंडाळून टाकलें, व साऱ्यांच्या हातीं सारखीच करवंटी दिली. पण लोकांचे अजून डोळे उघडत नाहींत. शेणवी म्हणतात आम्ही षट्कर्मी; ब्राह्मण म्हणतात तुम्ही त्रिकर्मी, आणि वस्तुतः पाहतां या भांडणारांमध्यें असे शेकडों सांपडतील कीं, ज्यांस एकाही कर्माची ओळख नाहीं! येऊन जाऊन कलहकर्मांत मात्र दोघे पटाईत! षट्कर्मांच्या व त्रिकर्माच्या वादास कंटाळून बिचारें ब्राह्मण्य परद्वीपस्थ झालें, आणि टेम्स व रेणा यांच्या तीराच्या आश्रयानें जाऊन राहिलें आहे, या गोष्टीची दोघांही पक्षकारांस शुद्ध नाहीं!

असो; तर वरील निरनिराळ्या कारणांनीं हा देश पूर्वोक्त मनोवृत्तीस बहुतेक अंशीं पारखा होऊन गेला आहे. आतां यास तोड काय याचा थोडा विचार करूं.

पहिली तोड ही कीं, ज्या पाश्चात्य लोकांनीं हा देश इतका काळ पावेतों पादाक्रांत करून टाकला आहे, त्यांच्यापासूनच ही गुरुकिल्ली आपणांस घेतली पाहिजे. त्यांचा इतिहास वाचून, त्यांचा सहवास करून, व त्यांच्या उलाढालींकडे सतत लक्ष पुरवून आम्ही किती गचाळ लोक झालों आहों, याची प्रचीति आपल्या ठिकाणीं बाणली पाहिजे. ती बाणली असतां लोहपरिसाच्या न्यायानें आमचे नादान लोकही कालें करून बाणेदार होतील असा संभव आहे. त्याप्रमाणेंच अलीकडे सारें भरतखंड एक राष्ट्र बनलें आहे, यास्तव कालयोगेंकरून या अठरा धातूंची ही चांगली मूस बनून सर्वांस साधारण जो देश, त्याविषयीं अभिमानवृत्ति स्फुरूं लागणें हेंही संभवनीय आहे. त्याप्रमाणेंच आतां, केवळ हास्यास्पद होऊन राहिलेला जो जातिभेद, त्याच्या संबंधाचा वेडगळपणाचा पीळही कमी कमी होत जाऊन, या देशांतील जाति देशबंधुत्वाच्या थोरल्या नात्यांत बारीकसारीक क्षुद्र भेदांची मातब्बरी तादृश धरणार नाहींत, व एकोप्यापासून सर्वांचें किती हित आहे हें समजूं लागतील, अशीही दिवसेंदिवस दृढतर आशा आहे.

[वर्ष २, अंक ९।१०।११.]

मुलाचें लग्न करणें हें बापाचें कर्तव्य आहे काय ?

आमच्या लोकांत ज्या अनेक वेड्या समजुतींचीं पाळें खोलवर गेलीं आहेत, व ज्यांमुळें आमच्या लोकांचें शारीरिक आणि मानसिक, राजकीय आणि सामाजिक, किंवा प्रापंचिक नुकसान होत आहे, त्यांपैकींच "बापानें मुलाचें लग्न केलेंच पाहिजे" ही वेडी समजूत होय. आम्हांस असें वाटतें कीं, मुलांच्या संबंधानें आईबापांचीं कर्तव्यकर्में काय, या प्रश्नाच्या विचाराकडे या देशांतील लोकांनीं आपलें मन ह्वें तितकें लाविलें नाहीं. असें झाल्यानें या देशांतील मातापितरें नसत्या जबाबदाऱ्या आपल्या डोक्यावर घेण्यास शिकलीं आहेत आणि त्या हातून ह्व्या तशा न उठल्यामुळें आपल्या आणि मुलांच्या नाशास कारण होतात. सामाजिक व्यवहार यथास्थित चालण्याला एका गोष्टीची पराकाष्ठेची जरूरी आहे ती ही कीं, प्रत्येक मनुष्यानें आपल्या पायांवर उभें राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एका मनुष्यानें दुसऱ्या मनुष्याला खायला घालून बसवून ठेविल्यानें पहिल्या मनुष्याला आपल्या श्रमाच्या फळाचा उपभोग घेतां येत नाहीं इतकेंच नाहीं, पण दुसऱ्याला श्रम न करितां आपला चरितार्थ करतां आल्यामुळें समाजांत आळसाची बढती झाली, इतकेंच नाहीं, तर त्यानें श्रम न करितां दुसऱ्याच्या प्राप्तीवर तोंड चालविलें यामुळें समाजाचे उत्पन्नविभागाचे जे नियम आहेत, त्यांप्रमाणें समाजांतील प्रत्येक मनुष्याच्या आळशीपणाबद्दल सर्वांना अंशतः उपासमार काढावी लागते. कारण, कोणत्याही राष्ट्रांत जें वार्षिक उत्पन्न होत असतें, तें त्यांतील उत्पादक श्रम करणाऱ्या लोकांच्या मानानें अनुत्पादक यांची संख्या जसजशी अधिकाधिक वाढत जाते, तसतशी उत्पादक वर्गांतील लोकांना उपाशी मरण्याची पाळी येते. आईबापांनीं मुलांचीं लग्नें आपल्या अंगावर घेतल्यानें या देशाचें द्रव्यदृष्टीनें देखील मोठें नुकसान होत आहे; व ही दुष्ट चाल नसती तर प्रत्येक मनुष्याला जितका सुखोपभोग घेतां आला असता, त्याचा एक दशांशही आतां मिळत नाहीं. मुलांस वाढविणें आणि त्यांचीं लग्नें करून देणें, हीं दोनही कामें बापानें आपल्या शिरावर घेतल्यामुळें त्याच्या हातून एकही चांगलें वठत नाहीं, यामुळें त्याला आणि मुलाला विपत्ति भोगण्याची पाळी येते. कल्पना करा कीं, एका गृहस्थास दोन मुली आणि तीन मुलगे आहेत, व त्याची वर्षाची प्राप्ति बाराशें रुपये आहे. आतां येवढ्या प्राप्तींत संसाराचा खर्च चाल-

वून मुलांच्या विद्येचा खर्च चालविणें, व हिंदुचालीप्रमाणें हुंडे वगैरे भरून मुलींचीं व मुलांचीं लग्नें करणें, हें किती कठिण आहे. येवढ्या खर्चाच्या पेंचांत आल्यामुळें त्याला आपल्या स्वतःच्या किंवा आपल्या बायकोच्या आरोग्यासाठीं किंवा आपल्या किंवा आपल्या बायकोच्या मनाच्या हौशी पुरविण्यासाठीं बाकी काय राहतें ? आमचे लोक जितक्या हलक्या प्रकारचें आणि नीरस अन्न खाऊन आपला साडेतीन हात देह वागवून नेतात त्या प्रतीचें हलकें अन्न पृथ्वीतील दुसरा कोणतीही राष्ट्रें खात नसतील. त्याप्रमाणेंच वापरण्याची गोष्ट. आमच्या इकडील कुणब्यास दोन लंगोट्या, एखादा पंचा, एक घोंगडें आणि जोडेभरडें पांचपन्नास हात मुंडासें झालें कीं झाली गर्दी. मध्यम प्राप्तीच्या लोकांची तरी कपड्यांची रेलचेल असते असें नाहीं. लोंकरीच्या कपड्याची भेट फार थोड्यांनाच होते. चार धोतरें, पांचचार सदरे नाहीं तर बंड्या, दोनतीन आंगरखे आणि एकदोन पागोटीं, ही आमच्या मिडलक्लासची म्हणजे मध्यम स्थितींतील लोकांच्या कपड्यांची पुंजी ! ! भातभाकरीवर कसा तरी जीव राखावा, व दोन जाडेभरडे मळकटसळकट कपडे वापरून शरीर झांकावें, यापलीकडे आमच्या लोकांची सुखोपभोगाची कल्पना जातच नाहीं. तर मग साधारण लोक इतकी यातायात करून व येवढा कवडीचुंबकपणा करून द्रव्यसंचय करितात त्याचें होतें तरी काय ? पैसा मिळूं लागल्यावर पहिला विचार स्वतःच्या हातांत एखादें जोडवें वगैरे ठोकून बायकोच्या अंगावरच्यांत थोडी भर टाकण्याचा किंवा एकदोन नवीन करून घालण्याचा. अशा रीतीनें पैशा दोन पैशांची जमाजम होती न होती आहे तों इकडे टंकसाळीचें काम जारीनें सुरू आहेच ! चारपांच वर्षांत एकदोन पोरें 'जयदत्त' करून पुढें उभीं ! तीं थोडीं मोठीं झालीं न झालीं तों नवीन नाणीं तयार ! पहिल्यांचीं मुंजीलग्नें होत आहेत नाहींत तों दुसऱ्यांचीं येऊन ठेपलीं ! मग पोरांच्या पोरांची काळजी ! या रीतीनें आजोबाला नात्वंडें पोसावीं लागत असल्याचीं उदाहरणें या देशांत विरळा आहेत असें नाहीं. या दुष्ट प्रचाराचें जूं आमच्या लोकांच्या मानेवर अतिशय जोरानें रगडत असल्यामुळें त्यांच्यामध्यें स्वसुखोपभोगाची जी हेळसांड माजली आहे, ती अत्यंत दूषणीय आहे इतकेंच नाहीं, तर ती देशाला शारीरिक आणि मानसिक दारिद्र्य येण्याचें आदिकारण होय. मुलांच्या लग्नांच्या फेऱ्यांत बाप पडल्यामुळें त्याला आपल्या मनाप्रमाणें कांहींच करितां येत नाहीं. राहण्याला चांगलें घर बांधणें किंवा भाड्यानें घेणें; सुखकारक लत्ताकपडा ठेवणें; चाहील तें पुस्तक, यंत्र किंवा कोणत्याही प्रकारची चीजवस्त घेणें; सारांश मनाच्या आवडीप्रमाणें

कोणतीही गोष्ट करण्यास हात सईल सोडितां येत नाहीं. दिवसभर मुलांचें कसें होईल, या काळजीनें मन एकसारखें व्यग्र असायचें. अशा स्थितीच्या मनुष्यानें देशकल्याणाच्या गोष्टी छातीवर घेऊन कशा कराव्या ? अशाच्या हातून एखादें धाडसाचें काम कसें निभणार ? नवीन कृति, नवीन शोध, नवीन युक्ति, असल्या संसारग्रस्तांच्या हातून कशा निघणार ? आमच्या लोकांतून देशाभिमान नष्ट झाला म्हणून सर्वजण रड गातात; पण तो कां नष्ट झाला याचा कोणीच शोध करीत नाहीं; आणि तो होत नाहीं तोंपर्यंत असली रड गाऊन काडीचा फायदा नाहीं. विपत्तींचें कारण जाणून घेऊन तें दूर करण्याची खटपट केल्याशिवाय ती नाहींशी होईल कशी !

[वर्ष २, अंक १०.]

चैन

चैन म्हणजे ऐश्वर्योपभोग होय. तेव्हां हें उघड आहे कीं, ज्याजवळ ऐश्वर्य असेल तो त्याचा उपभोग घेईल. परंतु आयापेक्षां जास्त खर्च न करितां, हांतरूण पाहून जो पाय पसरून आपल्या ऐश्वर्याचा उपभोक्ता होतो, त्याच्या त्या कृत्यास चैन म्हणत नाहींत. पण आपल्या वास्तविक योग्यतेपेक्षां जास्त व घराला कौल नसूनही बाहेर रिकामा डौल दाखविणाऱ्याच्या वर्तनाला चैन म्हणतात. म्हणजे एखादे ' अंगं गलितं पलितं मुंडं, दशनविहीनं जातं तुंडं ' असे वृद्धोबा जर चेहेरेपट्टी नीटनेटकी करून, आपल्या श्वेतकचांना कलप देऊन, बूटस्टाकिंग चढवून *घंटापथांतून चालले तर त्यांच्या या झोंकाला प्रतिष्ठितपणा किंवा साजे तें करणें असें न म्हणतां चैनच म्हणतील. तेव्हां यावरून हें उघड होतें कीं, आपल्या स्थितिरीतीव्यतिरिक्त जें वर्तन त्याचें नांव चैन.

आतां प्रत्येकानें आपल्या मिळकतीचा उपभोग घ्यावा हें खरें आहे, पण वाजवीपेक्षां फाजील घेतल्यापासून म्हणजे चैन केल्यापासून त्याचें पुष्कळ प्रकारें नुकसान होतें. तें कोणतें याचा अनुक्रमें थोडा उल्लेख करतों.

धडधडीत डोळ्यापुढें दिसणारें पहिलें नुकसान हें कीं, 'ज्याचा आयापेक्षां खर्च मोठा त्याचा होईल सदां तोटा.' आपल्या मिळकतीपेक्षां जास्त पैसे खर्चून चैन केली म्हणजे अर्थात् कर्जबाजारी व्हावें लागतें, व याप्रमाणें कर्जबाजारी झालें म्हणजे त्याची प्रतिष्ठा, अब्रू, पत वगैरे लोकांत कितपत राहील हें उघड दिसतें. तसेंच त्याचे आप्तवर्ग त्याला मानीत नाहींत. प्रत्यक्ष पुत्र देखील म्हणतो कीं, ' ऋणकर्ता पिता शत्रुः', तेव्हां चैनीपासून पहिलें नुकसान हें.

आतां दुसरा तोटा दुर्गुण जडणें हा होय. चैनी मनुष्य बहुधां व्यसनी असावयाचाच, आणि व्यसनापासून द्रव्यहानी, शारीरिक हानी, व कांहींकांपासून अब्रूहानी

* घंटापथ म्हणजे राजमार्ग [रहदारीचा रस्ता] पूर्वी राजमार्गातून नेहमीं हत्ती जात असत; त्या वेळेस त्यांच्या घंटेचा नेहमीं नाद त्या रस्त्यांत होत असेल, त्यावरून हें नांव पडलें आहे. हल्लीं गजेंद्रांचें दर्शन राजपथांत तर दुर्लभच. मग घंटारव कोठून ऐकण्यास यावयाला ? कदाचित् लांकडाची कापथांत गाडी ओढतांना कोणाच्या भाग्यानें झालें तर झालें.

ही होते. (' कांहींका ' हा शब्द योजण्याचें कारण उघडच आहे कीं, ज्याप्रमाणें राहु, आपलें मूळचें अकाळविकाळ राक्षसी रूप टाकून, अमृत वांटण्याचे वेळेस देवांच्या मंडळींत घुसला होता, त्याप्रमाणें कित्येक व्यसनें साखरावगुंठित होऊन प्रतिष्ठित कृत्यांमध्यें मोडूं लागलीं आहेत; तेव्हां त्यांजपासून अबूहानी होते असें म्हणणें म्हणजे मोठेंच धाडसाचें कृत्य होय. आतां हें खरें आहे कीं, वरील राहु-महाराजांच्या अमृतप्राशनाच्या ऐनवेळीं ज्याप्रमाणें चंद्रसूर्यांनें चुगली करून महा-विष्णूकरवीं त्याच्या या कापट्याचें त्यांना चांगलेंच बक्षिस दिलें, तसें जरी एखादे-वेळेस व्यसननिषेधक मंडळींच्या लेखणीच्या सपाट्यांत याही व्यसनांची फटफजीति होते खरी, तथापि त्यांचा प्रतिगदाधर शार्ङ्गदाधर विष्णूप्रमाणें प्रबळ नसल्यामुळें इसापनीतींतील वेषांतर केलेल्या कावळ्याप्रमाणें त्यांची फजीति होत नाहीं.) तसेंच चैन करावयास पैशाची तूट पडली म्हणजे चोरी, थापेबाजी किंवा अशाच तोडीची कांहीं तरी लफंगिरी करून पैशाची तूट भरून काढावी लागते; त्याच्या परिमार्जनार्थ असत्य बोलावें लागतें. सारांश, एका वाईट गोष्टीपासून वाईटच गोष्टी उत्पन्न होतात. चैनी मनुष्याच्या हृदयमंदिरांत दुर्गुणांचें कुटुंब वसती करूं लागतें व कांहीं दिवसांनीं तें स्वतांच त्याची मालकी सांगून त्यावर अंमल बजावूं लागतें.

आतां चैनीपासून तिसरा वाईट गुण ' उद्धटपणा ' हा होय. आपल्या वास्तविक योग्यतेपेक्षां जास्त ऐट ही उद्धटपणाची दर्शक होय. यामुळें नम्रता अंगीं राहत नाहीं व असली तरी दिसत नाहीं. पूर्वीचे राजेलोक ऋषींच्या आश्रमांत जावयाचें झाल्यास आपल्या अंगावरील सर्व राजकीय पोषाक उतरून साध्या वेषानें मुनिदर्शन घेत असत. (यास प्रत्यंतर शाकुंतल नाटकाचा पहिला अंक पहा.) या विनयसूचक वर्तनाची सांप्रत किती चहा आहे हें दिसतेंच आहे. गुरूच्या पुढें शिष्यानें खुशाल बूटस्टाकिंग्स चढवून त्याच्या ' करकर ' नादांत ऐटीनें प्राप्त व्हावें. मुलानें बापाच्या देखत इझिचेयरवर हातपाय पसरून खुशाल पडावें; देवळांत जातांना जोडा काढून ठेवण्याची तरी चाल होती, पण तुळशी बागेसारख्या देवळांत चरणसंपुष्टांना बराच मान मिळून त्यांचा निषेध बराच संपुष्टांत आला आहे, व देवाच्या उंबऱ्यापर्यंत तर त्यांचा रीघ झाला आहे. तेव्हां सारांश घ्यावयाचें काय कीं, आपापल्या योग्यतेप्रमाणें सर्वांनीं वागलें असतां नम्रता दिसून प्रतिष्ठाही वाढते. उद्यां जर स्टेशनवरील एखादा फालतु हमाल फर्स्टक्लासचें तिकिट काढून इन्स्पेक्टरशेजारीं किंवा सुपरिंटेंडेंटशेजारीं मांडी ठोकून बसला तर त्याचें करणें जितपत हास्यास्पद व त्याला हानिप्रद होणार

आहे, तितपतच वरील सर्व प्रकारचा उपयोग होणार ! चैन करूं नये असें आमचें मुळींच मत नाहीं. त्यापासून सुख होतें व मनुष्य सुशोभित दिसतें. पण हें सर्व केव्हां ? जर प्रत्येकानें आपल्या योग्यतेप्रमाणें ती केली तर. तिचा जर का अतिक्रम केला कीं सर्वांचाच अतिक्रम होतो. म्हणजे सुखाचा अतिक्रम झाला म्हणजे काय, तर दुःख, व शोभेचा अतिक्रम म्हणजे विशोभा. याचें उदाहरण प्रथम एका वृद्धाचें दाखविलेंच आहे.

[वर्ष २ अंक १५.]

स्त्रीदास्यविमोचन.



*"सृष्टिक्रमागत आलेल्या भारापलीकडे आपण होऊन एक देखील कण न लादणें, व असमतेला अन्याय न जोडणें हें मनुष्याचें कर्तव्यकर्म आहे."

शिरोलेख आणि त्याच्या खालचें अवतरण पाहून आमच्या वाचकांस आम्ही कांहीं तरी तारेंत आहों असें वाटण्याचा संभव आहे. स्त्रीदास्यविमोचन तें काय, सृष्टिक्रमागत आलेला भार कोणता आणि तो येथें कशाला आला, व असमतेला अन्याय न जोडणें म्हणजे काय–वगैरे साहजिक प्रश्न मनापुढें उभे राहणार आहेत, व त्यांच्या अपरिचितपणामुळें ते खुळेपणाचे उद्गारसे वाटणार आहेत. परंतु नवें राज्य काबीज केलें म्हणजे त्यांत जसें नवें सरकार स्थापावें लागतें, त्याप्रमाणें नवीन विचाराबरोबर नवीन तऱ्हेची भाषा लिहिणें भाग पडतें.

पूर्वीपासून आशिया खंडांतील सुधारलेल्या देशांत, ग्रीस देशांत, इताली देशांत, व एकुणिसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी वगैरे सुधारलेल्या अर्वाचिन युरोपखंडाच्या स्तंभांत देखील गुलामांचा व्यापार कायदेशिरपणें चालत असे; व गुलाम विकत घेऊन त्यांच्याकडून सेवा करविणें ही अनीति असें कोणीही मानीत नसे. पुढें विचार करतां करतां, व नफे तोटे पाहूं जातां असें दिसून आलें कीं, गुलामांचा व्यापार करण्यानें आफ्रिकेंतील जाड ओठांच्या हबशांचें सर्वस्वीं नुकसान होतें इतकेंच नाहीं, तर तो अमानुषव्यापार बड्या मेंदूंच्या, व छोट्या जबड्यांच्या गोऱ्या लोकांनाही तितकाच घातुक होतो. कारण ज्या गोष्टीमुळें आपण परक्याला पीडा करूं इच्छितों, ती गोष्ट आपणांस पीडा दिल्याशिवाय कधींही रहात नाहीं. मनुष्याचा हवा तो दुर्गुण घ्या; त्याच्यापासून त्याला आणि दुसऱ्याला सारखीच पीडा होते. बुद्धिमांद्यामुळें व वासनापरिभ्रमामुळें आपलें अहित आपणांस तत्काळ कळत नाहीं; पण विचारशील तिऱ्हाइताला तें उघड दिसत असतें. आत्महितासाठीं एका सुधारलेल्या राष्ट्रानें दुसऱ्या रानटी किंवा अर्धवट सुधारलेल्या राष्ट्रास

---

* The duty of man is to see that not a grain is imposed upon that load which Nature imposes; that injustice is not added to inequality.

Lay Sermons T. H. Huxley.

दास करणें जितकें अन्यायमूलक किंवा उभयपक्षांस अहितकारक आहे, तितकें, किंबहुना त्याहून अधिक, आम्हांतील पुरुषांनीं स्त्रियांस पारतंत्र्य देणें आणि त्यांना अज्ञानावस्थेंत चुडूं देणें हें त्यांचें त्यांना घातुक असून, त्यामुळें आमचेंही पराकाष्ठेचें नुकसान होत आहे. अलीकडे आफ्रिकेंतील हबशी लोक यूरोपाच्या बाजारांत विकले जात नाहींत, म्हणून त्यांच्यापासून यूरोपियन लोकांना मोठा त्रास होऊं लागला आहे, असें नाहीं. काकेशीअन लोकांचें पाऊल सुधारणेच्या कामांत एकदां पुढें पडलें आहे. आतां नीग्रो लोकांनीं हवी तितकी खटपट केली तरी त्यांना त्या कामांत हटवतां येणें नाहीं. शहाणपण मेंदूवर अवलंबून असतें; व सरासरीच्या मानानें पाहतां गोऱ्यांचा मेंदू हबशाहून अधिक भरतो, म्हणून हबशांच्या राष्ट्राला गोऱ्यांच्या राष्ट्रावर कधींही ताण करतां येणार नाहीं हें उघड आहे. वरील वाक्यांत राष्ट्र शब्द योजला आहे, त्याकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे; कारण गोऱ्यांची आणि हबशांची शर्यत लाविली तर सगळे हबशी सगळ्या गोऱ्यांच्या पाठीमागें राहतील किंवा सगळे गोरे सगळ्याच हबशांना मागें टाकतील असा अर्थ नाहीं. गोऱ्यांत काळे आणि काळ्यांत गोरे असा थोडाबहुत फरक होणार आहे; कारण अगदीं टाकाऊ गोरा देखील पहिल्या प्रतीच्या सिद्धयाला बुद्धिसामर्थ्यांत हटवील असें मानणें बऱ्याच धाडसाचें काम आहे. आफ्रिकेच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत शेंदोनशें मलिख अंबर निघण्याला कांहीं हरकत नाहीं. तात्पर्य काय कीं, सुधारणेच्या कामांत हबशी लोक गोऱ्या लोकांपेक्षां पुष्कळ पटीनें जरी मागें आहेत, तरी बुद्धिसामर्थ्याच्या मानानें दोघांचें वर्गीकरण केल्यास काळ्या गोऱ्यांची सळमिसळ झाल्याखेरीज राहणार नाहीं. असें जरी आहे, तरी राष्ट्रदृष्ट्या हबशी लोक गोऱ्या लोकांच्या मागें रहाणारच. हाच विचार स्त्रीपुरुषांस लागूं पडतो. सगळी स्त्रीजात पुरुषजातीपेक्षां लुस्कान आहे असें म्हणणें अप्रशस्त असून खोटें आहे. ताराबाई, आनंदीबाई, अहिल्याबाई, बायजाबाई, लक्ष्मीबाई, जन्नाबाई, राधाबाई—या सगळ्या बाया बुद्धीनें अगदीं शिळपट बायका पुरुषापेक्षांही शिळपट असें म्हणण्यास कोण धजेल ? एवढें खरें आहे कीं, स्त्रियांना पुरुषांप्रमाणें अगदीं मोकळेपणानें विद्या संपादन करूं दिलें तरी स्त्रीवर्ग या नात्यानें या पुरुषवर्गाच्या मागें राहतील यांत संशय नाहीं. आमचें म्हणणें इतकेंच आहे कीं, स्त्री कितीही शहाणी झाली तरी महामूर्ख पुरुषापेक्षां ती अधिक मूर्ख होय, असा लोकांचा जो ग्रह आहे, व ज्या ग्रहाला अनुसरून आमच्या लोकांत स्त्रियांचें सगळें स्वातंत्र्य नष्ट होऊन

जाऊन त्यांना पशुतुल्य मानण्याचा प्रघात पडला आहे, तो फारच वेडेपणाचा ग्रह आहे. स्त्रियांना विद्या देण्याच्या कामांत हवा तितका हात सईल सोडला, तरी त्यांच्यापासून आम्हां पुरुषांना भीति बाळगण्याचें फारसें कारण नाहीं. कारण कित्येक अबलाकनवाळूंच्या मताप्रमाणें स्त्रियांना विद्या आणि हक्क देण्यांत आम्हीं समता सोडून देऊन त्यांच्या संबंधानें विशेष अनुकूल असा थोडाबहुत पक्षपात जरी केला, तरी गर्भधारणाचें काम जोंपर्यंत त्यांच्याकडेच अविच्छिन्न राहील तोंपर्यंत त्या आम्हांला बागुलबोवासारख्या वाटण्याची गरज नाहीं. तसेंच बुचड्याखालच्या करटींत असणाऱ्या मेंदूवर भाषाज्ञान किंवा पदार्थविज्ञान यांचे हजार दोन हजार संस्कार झाल्यानेंही त्या आमच्या मृदु अशा रतिक्रीडासुखानुभवाच्या कामाला अगदीं नादान होतील असेंही मानवत नाहीं.

मागल्या निबंधांत इतकें दाखविलें आहे कीं, ज्याप्रमाणें काळ्या आणि गोऱ्या लोकांच्या मेंदूंत थोडीबहुत तफावत असते, त्याप्रमाणें स्त्रीपुरुषांच्या मेंदूंतही असते; व त्या मानानें पुरुषांची बुद्धि स्त्रियांपेक्षां अधिक असेल. परंतु येवढ्याच कारणावरून सर्व स्त्रीजातीला पुरुषजातीच्या दास्यांत गोंवून टाकणें हा मोठा अन्याय होय. प्रत्येकाला आपापल्या सामर्थ्याप्रमाणें आपलें कल्याण करून घेण्याचा मार्ग खुला असावा. सृष्टिक्रमागत आलेल्या कमीपणामुळें जे मागें पडतील ते पडोत; त्याला आमचा इलाज नाहीं; पण जेवढ्यांना पुढें सरसावण्याची हिंमत असेल तेवढ्यांना हरएक प्रकारचें साहाय्य दिलें पाहिजे. हा निष्पक्षपाताचा विचार झाला. पण कित्येक अबलाकनवाळू आहेत त्यांना येवढेंच बस होत नाहीं. स्त्रियांना पुरुषांच्या इतक्या समतेनें वागविणें हा देखील त्यांच्या दृष्टीनें अन्याय होय. स्त्रीपक्ष धरून भांडतां भांडतां ते दुसऱ्या थराला जाऊन पोहोंचतात. त्यांना असें वाटतें कीं, स्त्रिया या स्वभावतः पुरुषांपेक्षां बुद्धीनें वरचढ आहेत. मनोवेधक जें बाह्य सौंदर्य त्याचा तर त्यांनीं मक्ताच घेतला आहे; या बाबतींत पुरुषांना ब्र काढण्यास तिळभर देखील जागा नाहीं. त्याप्रमाणेंच सहनशीलता, विनय, नीतिमार्गावलंबन स्थिरप्रेम वगैरे गुणांत त्या पुरुषांपेक्षां श्रेष्ठ आहेत. पण आम्हांस असें वाटतें कीं, हा समज अगदीं खोटा आहे. लहान मुलीला एखादी गोष्ट सांगितली तर तिला ती लवकर कळते, किंवा कळल्यासारखी दिसते, याचें कारण इतकेंच आहे, कीं मुलां-

पेक्षां मुलींचीं डोकीं अधिक रिकामीं असतात, त्यामुळें एकाद्या नवीन गोष्टीचा त्यांत लवकर प्रवेश होतो. पुरुषांप्रमाणें मुलींना एकसारखें शिक्षण देण्याचा क्रम सुरू ठेविला तर मुली मुलांपेक्षां अधिक मट्ठ आहेत, असें आढळून आल्याशिवाय राहणार नाहीं. सृष्टीच्या उत्पत्तीपासून पोरांचें ओझें वाहण्याचें काम स्त्रियांकडे अविच्छिन्न राहिलेलें आहे; त्यामुळें त्यांच्या हाडामांसाचा बराच व्यय पोरांच्या पोषणाकडे होतो. या व्यसनापासून बापई मंडळी अजीबात निसटली आहे; व याच खर्चामुळें स्त्रियांच्या अंगीं पिढीजात दौर्बल्य आणि बुद्धिमांद्य आलें आहे. त्यामुळें त्या कांहीं केलें तरी बुद्धिमत्तेच्या कामांत पुरुषांच्या मागें राहणारच. स्वरूपाच्या संबंधानेंही पुरुषांपेक्षांही स्त्रींत विशेष खुमारी आहे असें आमच्यानें म्हणवत नाहीं. बारातेरा वर्षांच्या मुली आणि मुलगे यांच्या मोहकपणांत फारसा भेद असत नाहीं, हें कोणीही कबूल करील. पण पंचवीशीच्या सुमाराला स्त्रीचें पारडें अगदीं खालीं बसतें. या वयांत पुरुष ऐन जवानींत असल्यामुळें बळकट, रगदार, आणि सतेज दिसतो; तशी स्थिति नाहीं. दोन तीन मुलें होऊन जाऊन सर्वांगांत शिथिलता, रोगिष्ट पांढरेपणा, फाजील कृशता किंवा बाळसेदारपणा यांचा आविर्भाव होऊन निःशक्ततेचें साम्राज्य झाल्यासारखें दिसत असतें. या वयाउपरांत बायकांच्या अंगीं जो थोडाबहुत मोहकपणा दिसतो तो आणण्यासाठीं चांगलीं चांगलीं लुगडीं व तऱ्हेतऱ्हेचे दागिने यांचे आर्जव करावे लागतात. गाल बसून वर उचललेल्या नाकाची विद्रूपता छपविण्यास हजारपांचशें रुपयांची गठडी नाकांत लोंबत लाविल्याशिवाय परिणाम नाहीं. मानेच्या मंडक्यावर गळाभर टुशींचें आणि सरीच्या कंढारण्याचें दृढपण अगदीं आवश्यक होतें. हा बाह्य स्वरूपाच्या संबंधानें विचार झाला. विनय, सहनशीलता वगैरे गुण स्त्रियांच्या ठायीं पुरुषापेक्षां विशेष दिसतात, याचें कारण त्यांची फार दिवसांची दीनावस्था हेंच होय. सुलतानी अमलांत ज्या प्रकारचा विनय दिसून येतो, त्याच प्रकारचा विनय स्त्रियांच्या अंगीं असतो. सारांश, स्त्रियांच्या अंगीं तारीफ करण्याजोगे जे गुण दिसतात ते बहुतेक अंशीं त्यांच्या दास्याचे परिणाम होत. पूर्वीच्या लोकांप्रमाणें स्त्रिया म्हणजे पायांखालची धूळ हें मत जसें आम्हांस पसंत नाहीं, त्याचप्रमाणें अलीकडे त्यांची फाजील प्रशंसा करण्याचा जो प्रघात पडूं लागला आहे, तोही आम्हांस अप्रशस्त वाटतो. एज्युकेशनल कमिशन निघाल्यापासून एकदोन बायांच्या संबंधानें मोठेंच बंड माजलें आहे, व त्यांच्या प्रशंसकांनीं त्यांच्या गुणाची तुतारी वाजवून लंडनपर्यंत त्यांचा लौकिक पसरून

दिला आहे; अशा रुपेस त्या पात्र आहेत किंवा नाहींत, याचा आम्हांस मोठा संशय आहे. डॉक्टर हन्टर यांनीं प्रसन्न होऊन कोण्या स्त्रीला मुद्रावदान केलें, म्हणून केसरी समता सोडून तिच्या गुणाची टिमकी वाजवील असें नाहीं. स्त्रियांची उन्नति होणें ही गोष्ट केसरीला अत्यंत इष्ट आहे, व ती होण्याविषयीं तो आपल्याकडून होईल तितके परिश्रम करील; परंतु शुष्क गुणासाठीं एखादीला हरभऱ्याच्या झाडावर चढविण्याचें काम त्याच्यानें होणार नाहीं. असो; सध्यां स्त्रीशिक्षणाच्या संबंधानें दोन गोष्टींकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. पहिली गोष्ट शरीरपुष्टी, व दुसरी गोष्ट मनःपुष्टी. हूक्स्ले म्हणून ज्या निबंधकारापासून मागल्या निबंधांत छोटेसें अवतरण घेतलें आहे, त्यानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, पुरुषाप्रमाणें समाजांत "थोड्याबहुत तालीमबाज स्त्रिया दृष्टीस पडल्या तर मला मोठा आनंद होईल!" त्याच्या म्हणण्याचा झोंक इतकाच आहे कीं, स्त्रियांच्या शरीरपुष्टीकडे आपणांस प्रस्तुतपेक्षां विशेष लक्ष दिलें पाहिजे. स्त्रीशिक्षणाला आड येणाऱ्या कित्येक लोकांचें असें म्हणणें आहे कीं, जोंपर्यंत गर्भधारणा आणि शिशुसंगोपन हीं कामें स्त्रियांकडे राहतील तोंपर्यंत त्यांच्या स्थितींत फारसा बदल करतां येणार नाहीं. कबूल; पण आम्हांस असें वाटतें कीं, कालांतरानें फाजील संतानोत्पत्ति होऊं न देतां स्त्रीपुरुषांचा संयोग होऊं देण्याची युक्ति काढितां येईल. स्त्रियांच्या आरोग्यरक्षणाला आवश्य म्हणून जीं काय दोन तीन मुलें ठरतील तेवढीं तरुण वयांत करून घेतलीं म्हणजे पुढें टंकसाळ बंद ठेवण्याचा उपाय शोधून काढण्याकडे वैद्यशास्त्राचें मन लागलें आहे, व त्या कामांत त्यास लवकरच यश येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. असें झालें तर आतांप्रमाणें डझन किंवा दीड डझन अल्पायुषी मनुष्यप्राणी जगांत आणण्यापेक्षां आईबापांच्या जागीं खुंटास खुंट उभा करण्यापुरतीं दोनच सुदृढ पोरें झालीं तरी बस्स आहेत. आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं, स्त्री ही स्त्री आहे म्हणून तिच्या उन्नतीमध्यें आपण कोणत्याही प्रकारची आडकाठी आणतां कामा नये. स्त्रीपुरुषांना समान शिक्षण आणि समान स्वातंत्र्य द्या; आपण होऊन डावा उजवा हात करूं नका; असें करून जी व्यवस्था होईल ती होवो. कांहीं पुरुषांना शरीराच्या किंवा मनाच्या कमकुवततेमुळें स्त्रियांचीं कामें पत्करावीं लागलीं म्हणून लाज वाटतां कामा नये, किंवा कांहीं स्त्रियांनीं आपल्या बुद्धिसामर्थ्यानें पुरुषांचे धंदे आटपले, म्हणून त्याबद्दल त्यांच्याविषयीं मत्सर उत्पन्न होतां कामा नये. मनुष्यामनुष्यांच्या व्यवहारांत कोणाकडेही कोणत्याच गोष्टीचा मक्ता देतां

कामा नये; जेथें तेथें चढाओढ जारीनें सुरू असली पाहिजे. हें मत आजच सर्वांस ग्राह्य होईल असें नाहीं. तरी कालांतरानें याचा जय होणार अशी आमची पक्की खातरी आहे.

[वर्ष २ अंक ४४।४५.]

तंबाखू



अमंत्रमक्षरं नास्ति नास्ति मूलमनौषधम् ।
अयोग्यः पुरुषो नास्ति योजकस्तत्रदुर्लभः ॥

वरील शिरोलेख पाहून आमच्या वाचकांस बहुधा हंसें आल्यावांचून राहणार नाहीं. ते म्हणतील, " अहो तंबाखू ती काय, व तिच्याविषयीं हे लिहिणार तें काय ?" परंतु असा एक साधारण नियम आहे कीं, जी गोष्ट आपल्या नेहमींच्या सवईतली असते, तिजविषयीं आपण कधींही विचार करीत नाहीं, व तो करणेंही विशेष महत्त्वाचें वाटत नाहीं. शेंकडा नव्याण्णव लोकांस या वल्लीची खरी उत्पत्तिही माहीत नसेल. बहुतेकांचा समज असा आहे कीं, ही मूळची द्रोणागिरीची कन्या. परंतु वस्तुतः पाहतां आपल्या वापरण्याच्या इतर पदार्थांप्रमाणेंही ही परदेशिणच आहे. हिचें जन्मस्थान अमेरिका खंड, व हिचें मूळचें नांव निकोटयुनमटुबाकुम् असें आहे. १४९२ त कोलंबसानें अमेरिका खंड शोधून काढलें त्यावेळीं त्याच्या ही तेथें दृष्टीस पडली. व तिच्या गुणांस मोहित होऊन तो तिला आपल्या बरोबर युरोपखंडांत घेऊन गेला. तिच्या गुणाची तारीफ लवकरच चहूंकडे होऊन सर्वांची तिजवर प्रीति बसली, व युरोपियन लोकांच्या नेहमींच्या सांप्रदायाप्रमाणें ते तिला थोडक्यांत टचाँकू म्हणूं लागले. पुढें अशा गुणवतीचा लाभ हिंदूंसही व्हावा या बुद्धीनें वास्कोडीगामा यानें १४९८ व १५२५ च्या दरम्यान तिला हिंदुस्थानांत आणली. आमच्या लोकांस लवकरच असें आढळून आलें कीं, पाश्चात्यांस माहीत असलेल्या गुणांहून भिन्न गुण या वल्लींत आहेत. व तदनुसार ते तिचा उपयोग प्रसिद्ध असणाऱ्या तीन रीतीनें करूं लागले. व इंग्रजी वेडावांकडा उच्चार जरा सुधारून तीस तंबाखू म्हणूं लागले. " तमाखुपत्ररार्जेंद्र भज मा ज्ञानदायकम् " इत्यादि कित्येक सुभाषितांवरून ही वल्ली मूळची आपल्या देशांतीलच असावी असा कित्येकांचा समज आहे. परंतु हीं सुभाषितें बहुधां १४९८ वा नंतर झालीं असावीं, अशी कल्पना करणें हें, या वल्लीच्या निरनिराळ्या तीन ठिकाणच्या नांवांतील वर्णसाम्यामुळें, अधिक साहजिक दिसतें. इ. शकाच्या ६ व्या शतकापूर्वी आपल्यांतही तंबाखूसारखा कांहीं पदार्थ ओढण्यांत येत होता असें बाणभट्टकृत कादंबरींतील

" परिपीतधूप (धूम) वर्तिरुपस्पृश्य च गृहीतताम्बुलः " या वाक्यावरून स्पष्ट होतें; तथापि हा पदार्थ तंबाखूहून भिन्न असावा असें अनेक विद्वानांचें अनुमान आहे.

येथपर्यंत तंबाखूचा इतिहास झाला. आतां असा साहजिक प्रश्न उद्भवतो कीं, पंधराव्या शतकांत राज्य करणाऱ्या समकालीन जहानगीर व जेम्स या उभयतांच्या लेखांपासून तों तहत १८८१ डिसेंबरच्या " विविधज्ञानविस्तारांतील " " तंबाखू व तिचे परिणाम " या लेखापर्यंत या वल्लीच्या निषेधाविषयीं सारखी ओरड चालली असून, उत्तरोत्तर तिचा प्रसारच होत चालला याचें कारण काय ? आमच्या मतें याचें कारण फारसें खोल नसून तंबाखूच्या वाईट परिणामाचें अतिशयोक्तीनें काढलेलें चित्र हेंच या प्रसाराचें मूळबीज होय. हल्लीं वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या " सर्वही रोगांवर खात्रीलायक रामबाण औषधांच्या " जाहिरातीवर कितीकांचा भरंवसा बसतो हें सर्व लोकांस व विशेषतः डॉक्टर लोकांस चांगलें माहीत असेल. आमच्या नवीन आलेल्या " तारणसेना " नायकानें किती जरी कंठशोष करून आम्हांस सांगितलें कीं, " तूर्त पापाचें बिऱ्हाड काय तें हिंदुस्थानांतच आहे. हिंदुस्थानांतील लोक रात्रंदिवस पापसमुद्रांत डुंबत आहेत इत्यादि " तथापि क्षणभर हंशा उत्पन्न करण्यापलीकडे त्यांची मजल कोठपर्यंत पोंचणार ! तात्पर्य काय कीं, राज्याचा डोंगर केल्यानें डोंगरावर कोणाचा विश्वास बसत नाहींच, परंतु उलट राज्यावर असलेला मात्र नाहींसा होतो. " तंबाखूचा उपयोग करणारे सर्व लोक भ्रमिष्ट असतात, त्यांस कपाळदुखी तर कशी जडलेली असते, त्यांस झोंप तर कधीं येतच नाहीं, चित्तस्थिरतेची आणि त्यांची ओळखच नसते, त्यांच्या चेहऱ्यावर तजेल्याचें नांवही नको, कंडूचे तर ते केवळ जन्मस्थानच, त्यांच्या हातापायांस पेटके कसे ठेवल्याप्रमाणें, डोळ्यांची तर रात्रंदिवस आग, तोंडास कोण दुर्गंधी, अन्नपचनाशीं जसें कांहीं त्यांचें शत्रुत्व, घेरी त्यांची जिवश्य-कंठश्य मैत्रीण, त्यांच्या घशाशीं नेहमीं खवखव खिळलेली, नेत्रमांद्य तर आपलें यायचेंच," अशाच प्रकारचे दुसरे सिद्धांत ठोकून दिले म्हणजे अर्थातच त्यांच्या खरेपणाविषयीं संशय येतो. तंबाखूच्या सेवनानें कित्येक लोकांचा प्राणांतही झाला आहे, असें लिहिणें म्हणजे तिच्या सेवनास आमच्या मतें बळकटी आणणेंच होय. अन्नसेवनानेंही कित्येकांचा अंत झाला आहे म्हणून अन्नसेवनही वर्ज्यच काय ? अर्थात् नाहीं. असो. वरील अनुवादावरून कित्येक लोक आम्ही तंबाखूसेवनाचें केवळ मंडनच करीत आहों असें समजतील तर तें चुकीचें आहे. आम्ही जितकें या

सेवनाचें मंडन करीत आहों तितकेंच त्याचें खंडन करणार; म्हणजे एकाद्या पक्षकाराप्रमाणें आपलाच खरा व दुसऱ्याचा मात्र सर्वथैव खोटा हा प्रकार आम्हांस संमत नाहीं. तर दोहोंतील सत्यप्रतिज्ञेवर विश्वास ठेवून आम्ही सदरहू खटल्याचा निकाल करणार. आमच्या मतें तंबाखू केवळ त्याज्यही नाहीं व केवळ ग्राह्यही नाहीं. इतर सर्व पदार्थांप्रमाणें चांगलेवाईट हे दोनही परिणाम तिच्या अंगभूत आहेत व ते तिच्या उपयोगाच्या रीतीवर व मानावर अवलंबून आहेत. पांच पांच मिनिटांनीं तंबाखूचा बार भरल्यावांचून ज्यांचें चालतच नाहीं, व तोंडांत विडी असल्यावांचून ज्यांचें घोडें पुढें जातच नाहीं, अशांवर तंबाखूचे दुष्ट परिणाम होतील हें उघड आहे. त्याचप्रमाणें " एका दमांत खड्याला नेऊन भिडवणारे " बहादर व आगगाडीच्या इंजिनाप्रमाणें नाकांवाटे धुराचा सारखा धोत चालू ठेवणांतच प्रौढी मानणारे फंदी त्याच्या योगानें आपल्यास अपाय करून घेतात यांतही नवल नाहीं. या पदार्थाच्या सेवनाचे चांगले वाईट परिणाम होणें ते मनुष्याच्या प्रकृतीवरही अवलंबून आहे. आतां कोणत्या प्रकारच्या प्रकृतीस हें सेवन हितावह आहे व कोणत्यास अपायकारक आहे हें सांगणें फार दुर्घट आहे. आजपर्यंत अनेक वैद्यांनीं या विषयावर जे शोध केले आहेत त्यांवरून असा सिद्धांत निघतो कीं, पंचविशी उलटेपर्यंत या पदार्थांच्या सेवनापासून गुण नसून दोष मात्र आहे; व यावरून पाहतां हल्लीं विद्यार्थ्यांमध्येंही या सेवनाचा जो प्रकार आढळतो तो केवळ निंद्य होय व याविषयीं वेळेवरच योग्य उपाय न झाल्यास याचा अपायकारक प्रसार चहूंकडे होण्याची फार भीति आहे. आमचे समंजस विद्यार्थी या गोष्टीकडे लक्ष्य देतील अशी आशा आहे. परंतु त्यांनीं तसें नच केल्यास त्यांच्या रक्षकांनीं याजविषयीं खबरदारी घेणें फार आवश्यक आहे. त्यांचीं मुलें यद्यपि त्यांस नकळत चोरून काम चालवतात तथापि त्यांनीं याचा शोध करून हें आमच्या समजण्यांत आलें आहे असें दाखविण्यास त्यांस फारसे श्रम पडणार नाहींत. मुलांच्या लिहिण्याच्या टेबलांत व बिछान्याखालीं त्यांस ओढलेल्या बिड्यांचीं थोटकें सांपडतील. तंबाखू खाण्याचें तर सहज समजणार आहे. आतां पंचविशीपुढें ज्यांस तंबाखू सेवन अपायकारक नसेल त्यांनींही एक गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे. तंबाखू ओढणारांस अनुभवानें माहीत असेल कीं, चिलमीच्या खालील भागांत कांहीं तेलकट किटण सांचलेलें असतें हें वस्तुतः पाहतां तंबाखूंतील विष होय. याचा अंश पोटांत जाणें हें अपायकारक आहे. या विषाचा अंश तंबाखूच्या धुरांतही असतो, म्हणून धूर गिळून फार वेळ घशांत ठेवून

नाकपुड्यावाटें सोडून देणें हे स्वहितचिंतकांनीं सोडून दिलें पाहिजे. हा धूर जितका अधिक घ्यावा तितका विषाचा अंश अधिक जातो. म्हणून चिलमीपेक्षां विडी तर बरी आहेच. तथापि गुरुगुडी म्हणून प्रसिद्ध असणारें यंत्र विशेष प्रशस्त; विडीचा $\frac{1}{3}$ भाग राहिल्यावर ती ओढणें वाईट. तसेंच " सकिटण " चिलमीविषयीं. सदरील दोनी प्रसंगीं तंबाखूंतील विष अधिक पोटांत जातें. कित्येकांस भोजनोत्तर तंबाखू सेवन इष्ट असतें, कित्येकांस अनशोवपोटीं असतें. कित्येकांस थंड वेळीं असतें व दुसऱ्यास उष्णवेळीं असतें. कित्येकांस कधींही नसतें. या सेवनानें कित्येकांच्या विचारशक्तीस चेतना येते व कित्येकांची विचारशक्ति शिथिल पडते. याचा निकाल प्रत्येकानें अनुभवानेंच आपणाकरितां केला पाहिजे, त्याविषयीं प्रमाण देतां येत नाहीं. तंबाखूच्या प्रसिद्ध सेवनांच्या रीतींतील चांगली कोणची याचा निकाल तूर्त आम्ही करूं शकत नाहीं. तंबाखू खाणें हें प्रतिष्ठतेचें लक्षण आहे व ओढणें, त्यांतही विडी ओढणें, हें हलकटपणाचें आहे वगैरे उद्गार जे चहूंकडे ऐकण्यांत येतात त्याविषयीं आमचें इतकेंच मत आहे कीं, ते केवळ संवयीचे परिणाम होत. ज्यापासून ज्यास्त फायदा होईल तें चांगलें व तद्विरुद्ध तें वाईट हें मत आम्हांस ग्राह्य दिसतें. सरते शेवटीं आमच्या पंचविशीच्या आंतील मित्रांनीं वरील लेख वाचून तूर्त तंबाखूस रजा द्यावी असा इशारा करून तूर्त हा लेख संपवितों.

[वर्ष २ अंक ५०.]

चिमाबाईचें एमाबाईशीं सख्य होणार कसें ?

(समानशीलव्यसनेषु सख्यम्.)

" समानशीलव्यसनेषु सख्यम् " या अनुभवसिद्ध वाक्याकडे दुर्लक्ष करून अलीकडे नेटिव आणि युरोपिअन स्त्रियांत अन्योन्य मैत्री स्थापण्यासाठीं प्रयत्न चालू झाले आहेत. व तो हेतु तडीस जाण्यासाठीं कोणते उपाय केले पाहिजेत याबद्दल अनेक सूचना प्रसिद्ध होऊं लागल्या आहेत. जशी नेटिव व इंग्लिश मिस्टरांची मैत्री इष्ट आहे, तशी उभयतांच्या मिससांचीही आहे, हें कोणासही नाकबूल करतां येणार नाहीं. पण पंचाईत येवढीच आहे कीं या असंभवनीय गोष्टी घडवून आणाव्या कशा ? मनुष्याला कोणतीही गोष्ट अशक्य नाहीं, असा ग्रह बळकट धरून त्यानें कोणत्याही उद्योगास प्रवृत्त होण्याचा निश्चय केला तर त्यांत त्याला यश येण्याचा पुष्कळ संभव असतो, हें आम्ही कबूल करतों. पण कोणत्याही गोष्टीपासून नफातोटा पाहून मग तीस हात घालणें हा मनुष्याचा स्वाभाविक मनोधर्म आहे. मांडवलापेक्षां उत्पन्न अधिक पडलें पाहिजे. बुडता व्यापार कामाचा नाहीं. अडकीची कोंबडी आणि × × × × ही व्यवहारपद्धति कल्याणकारक नाहीं. कोणतीही अशक्य गोष्ट शक्य करून दाखविण्यानेंच मनुष्याचें कर्तृत्व सिद्ध होतें असें नाहीं. तें सिद्ध करून दाखविण्यास दुसरे अनेक मार्ग आहेत. ज्यांनीं नेटिव व युरोपिअन स्त्रियांचें सख्य—या भारतीय अर्वाच्य सुधारणेच्या एका शाखेवर आपलें हृदयसर्वस्व ठेविलें आहे, त्यांना त्यांच्या प्रिय विषयाचें माहात्म्य किती वाटत असेल हें आमच्यानें निश्चयानें सांगवणार नाहीं. परंतु आम्हांस येवढें सांगतां येईल कीं, हिंदुस्थानच्या सुधारणेबद्दल जीं साधनें आज उपलब्ध आहेत किंवा होत आहेत, त्यांपैकीं हें अगदीं कनिष्ठ प्रतीचें आहे इतकेंच नाहीं, तर तें अमलांत आणण्यही मोठ्या खर्चाचें आणि त्रासाचें काम आहे. ज्यांचें दर्शन स्वतःच्या दुर्गुणापलीकडे जात नाहीं. ज्ञानप्रकाशाच्या संबंधानें ज्याची स्थिति बऱ्याच अंशीं खद्योतासारखी आहे, ज्यांना कोणत्याही चांगल्या गोष्टींत सगळ्या समाजाचें पाऊल पुढें पडणेंहीच खरी सुधारणा हें समजत नाहीं, ज्यांना व्यक्तीस फायदेशीर व समाजास फायदेशीर अशा दोन प्रकारच्या गोष्टींतील भेदाभेद समजत नाहीं, ज्यांच्या अभिरुचि, ज्यांचीं मनें, ज्यांचे विचार, ज्यांचें आचरण, व ज्याचें रहाणेंसवरणें परकी-

यांच्या नित्यसंबंधामुळें तद्रूप होऊन गेलें आहे, व त्यामुळें प्रत्येक स्वकीय गोष्ट ज्यांना ओंगळ, गचाळ, किळसवाणी, मूढ किंवा रानटी वाटूं लागली आहे–अशांना मात्र चिमाबाईचें एमाबाईशीं सख्य झालें तरच हिंदुस्थानचें पाऊल पुढें पडणार आहे, नाहीं तर त्याला डिंकांत सांपडलेल्या पांखराप्रमाणें जेथल्या तेथेंच धडपडत रहावें लागेल, असें वाटत असेल. नेटिव युरोपियन पुरुषांतसुद्धां खरी जिवलग मैत्री होणें किती दुरापास्त आहे याविषयीं या पत्रांत एक बरीच निबंधमाला येऊन गेली आहे. युरोपिअन व नेटिव स्त्रियांचें सख्य होणें त्याहीपेक्षां दुस्तर आहे हें दाखविण्यास त्या निबंधमालेंत दिलेल्या सगळ्या अडचणी येथें लागू असून शिवाय दुसऱ्या अडचणी आहेत. त्या सर्वांचा येथें व्यवस्थितपणें विचार करतां येणार नाहीं. तथापि त्या अपरिहार्य आहेत असा आम्हां सरकारकृपासूर्याच्या अननुभूत-प्रसादरश्मींचा समज आहे ! या आमच्या समाजाची मोठीशी मातब्बरी नाहीं, तो पुष्कळ चुकीचा असण्याचा संभव आहे; व ज्यांना युरोपिअन गृहपद्धतीचा, युरोपिअन राज्यकारस्थानाचा, व युरोपिअन मैत्रीचा विशेष अनुभव आहे, अशांचे एतद्विषयक विचार अधिक पोक्त व विनचूक असून तदनुसार राष्ट्राची आचार-प्रवृत्ति होण्याचा विशेष संभव आहे ! यासाठीं अशांच्या मेंदूंतून जे तारे, व तोंडां-तून जीं मुक्ताफळें, पडतील तीं झेलण्यास आम्हीं सर्वदां एका पायावर उभें असलें पाहिजे ! थोड्या दिवसांपूर्वी आम्हीं दोन कालमें जिच्या गुणांचा पवाडा गाइला त्या आमच्या मद्रपुरस्थ लाडक्या आत्याबाईच्या निरडावलेल्या सिरस्टंकसाळेंतून अलीकडे ज्या विचारनाण्यांची धरांडी लागली आहे, व जी मद्रपुरस्थ टाईम्सपत्रांत आठवड्याच्या आठवड्यास मुद्रित व प्रकाशित होत आहे, तींत उमाएमांच्या सख्यासंबंधानें मौल्यवान् द्वादश सूचनांची एक कलमवार याद आली आहे; त्या सूचना अत्यंत वाचनीय आहेत म्हणून त्यांपैकीं जेवढ्या आठवतील तेवढ्या साऱ्या खालीं देतों:--

१ ज्या युरोपिअन स्त्रियांस व्हरन्युक्युलर भाषा येत असतील त्यांनीं नेटिव स्त्रियांशीं सख्य करण्यास प्रथम पुढें सरावें.

२ या दोनही जातींच्या स्त्रियांची मुलाखत ज्या घरांत चिटपांखरूं नसेल अशा ठिकाणीं व्हावी.

३ असलें घर एखादा नेटिव सद्गृहस्थ (सर टी. माधवरावासारखा !) नेटि-वांच्या भरवस्तींत भाडें न घेतां देईल.

४ या घरावरून पुरुषाचा (नेटिव किंवा युरोपिअन) वारासुद्धां वाहतां कामा नये; किंवा पुरुषांनीं बायकांचा विश्रंभालाप चोरून सुद्धां ऐकण्याचा प्रयत्न करतां कामा नये.

५ या विश्रंभालापांत धर्मविषयक वाद बिलकुल निघतां कामा नये.

६ चिमांनीं व एमांनीं प्रथम व्यावहारिक विषयावर बोलण्यास आरंभ करावा.

७ राजकीय विषयाला स्त्रियांनीं स्पर्श करूं नये.

८ बिसकुटें, फुटें, सोडावाटर, चहा (तुळशीचा सुद्धां) सगळ्यांनीं एकत्रसेवनाचा विचार मनांत सुद्धां आणूं नये.

९ उभयतांच्या हितगुजाच्या गोष्टी चालाव्या.

१० गार्णेबजावणें व खेळ खेळणें व्हावें.

११ कशीदा काढणें, शिवणकाम करणें, पाहिजे तर व्हावें.

१२ एकमेकांनीं एकमेकांस या खात्यांत आपापल्याकडून जीं बक्षिसीचीं व चातुर्याचीं कामें झालीं असतील तीं दाखवून रंजवावें.

वरील कलमवारी, मद्रासटाईम्स पुढें नसल्यामुळें, अक्षरशः बरोबर असेल अशी जबाबदारी आम्ही आपल्या शिरावर घेण्यास तयार नाहीं. तथापि तींत ज्या चुका झाल्या असतील त्यांबद्दल आत्याबाईनें आम्हांवर बेअब्रूची फिर्याद करावी, असें कांहीं लिहिलें गेलेलें नाहीं, अशी आम्हांस बहुतेक पक्की खातरी आहे ! दुसऱ्या एका प्रसंगीं याच आत्याबाईनें नेटिव लोक बाजारांत सौदा करण्यांत निरर्थक वेळ कसा घालवितात, याची तसबीर काढून त्यांस वेळाचें मोल समजत नसल्याबद्दल खूप दोष दिला आहे. सर टी. माधवरावासारख्या बुद्धिमान् राजकारणी पुरुषांनीं नोकरी सोडून माळ घेतल्यावर अशा प्रकारच्या विषयावर स्फुट लेख लिहिण्यांत आपला राहिलेला वेळ घालवावा, व तो खर्च करण्याचा याहून दुसरा प्रशस्त मार्ग नाहीं, हें त्यांच्या प्रसादानें लोकांस नुकतेंच समजलें आहे ! यापुढें ते त्यांचा कित्ता गिरवण्यास चुकले तर त्यांच्यासारखे बुद्धिमंत दुसरे कोणी नाहींत, असें निदान खुद्द राजेसाहेब किंवा त्यांचे भाट मुंबईचे सन्मार्गदीपिकाकर्ते तरी समजल्यावांचून राहणार नाहींत ! या पत्रानें सर टी. माधवराव हिंदुस्थानाला ग्ल्याडस्टनच्या जागीं आहेत असें सांगून टाकिलें म्हणून बरें झालें, नाहींतर लोक त्यांना एखाद्या टेंपूच्या शाळेंतील टाकाऊ विद्यार्थ्याप्रमाणें समजत राहते ! असो. आमचा मुख्य विषय

जो चिमाएमांचें किंवा रमाशार्लटांचें सख्य तो राजा सर टी. सारख्यांनीं हातीं धरला असल्यामुळें त्यांत हांशील किती आहे हें शांतपणें पाहिलें पाहिजे. हा शांतपणा वर्षाच्या अखेरच्या अंकांत कोठून आणावा ? शिवाय ज्या विषयावर लिहिण्यांत मडमांशीं गांठ तो बेताबेतानेंच वठविला पाहिजे ! नवीन वर्षाच्या नवीन दमांत या अवघड कामास हात घालूं म्हणजे कदाचित् चांगली फलप्राप्ति होईल.

कोणत्याही दोन व्यक्तींचें सख्य होण्यास अगोदर त्यांस समजेल व चांगली बोलतां येईल अशी साधारण भाषा पाहिजे. आमच्या बायांचें व इंग्लिशांच्या मडमांचें जें प्रेमरहस्य होणार तें कोणत्या भाषेंत ? राजा सर टी. माधवरावांचें असें म्हणणें आहे कीं इंग्लिश स्त्रियांनीं नेटिव भाषांचा अभ्यास करून त्यांच्या द्वारें नेटिव स्त्रियांशीं संभाषण करावें ! सूचना फार चांगली आहे ! पण अशक्य आहे येवढीच काय ती तिच्यांत गोम आहे ! बाकी अशी उमदी कल्पना भलत्यासलत्याला सुचायाची सुद्धां नाहीं ! कामाधामासंबंधानें सिव्हिल सर्व्हिसमधील बहुतेक साहेब-लोकांस एकेक देशभाषा येत असते. अशा भाषेंत त्यांना डिपार्टमेंटल परीक्षा द्यावी लागते. तथापि सुशिक्षित नेटिवांशीं नेटिव भाषेंत भाषण करणारे असे किती साहेब लोक आहेत ? निर्वाहच नाहीं म्हणून त्यांना एखाद्या नेटिव भाषेचें अगदीं तांत्रिक ज्ञान संपादावें लागतें ! जेवढें ज्या गोष्टींचें अगत्य त्या मानानें तिच्यावर परिश्रम. चाकरी कायम होऊन बढतीचीं द्वारें खुलीं होण्यापुरती देशी भाषेची तयारी. हेतु पुरा झाला कीं, तिला रामराम ! खालच्या प्रतीच्या नेटिव लोकांना इंग्रजीचा गंधही नसतो, व रेव्हिन्यू वगैरे खात्यांतील खालच्या खालच्या अधिकाऱ्यांचा असल्याच लोकांशीं पुष्कळ संबंध असतो यामुळें त्यांना त्यांची भाषा थोडी थोडी बोलावी लागते, व बोलण्याचा सराव असतो. वरिष्ठ युरोपियन अधिकाऱ्यांना नेटिवांतील हलक्या प्रतीच्या लोकांशीं वारंवार काम पडत नाहीं, व जर कदाचित् थोडेंसें पडलें तर तें त्यांना इंग्रजीच्या द्वारें, किंवा इंटरप्रीटरच्या (दुभाष्याच्या) साहाय्यानें एखाद्या देशी भाषेच्या द्वारें चालवून नेतां येतें. याप्रमाणें देशी भाषा शिकण्याचे श्रम टाळण्याकडे इंग्लिश लोकांच्या मनाचा स्वाभाविक कल असतो. आणि तसा तो असणें अगदीं स्वाभाविक आहे. कोणतीही परकी भाषा शिकणें हें मोठ्या मानसिक श्रमाचें काम आहे. मानसिक श्रमाचा बहुतेकांस कंटाळा असतो; कारण बहुतेकांचीं मनेंच हलकीं असतात ! येथें मनें हलकीं म्हणजे स्मरणशक्ति वगैरे जीं भाषेचें ज्ञान संपाद-

ण्यास लागणारीं बुद्धीचीं अंगें तीं समजलीं पाहिजेत. मानसिक श्रम म्हणजे मानसिक शक्तींचा खर्च. ज्यांच्यापाशीं पुंजी हलकी ते सढळ हातानें खर्च करण्यास कसे प्रवृत्त होणार ? झालेंच तर खर्चाच्या मानानें त्यांस उलट प्राप्ति पाहिजे. त्यांना मराठी, कानडी, द्रविडी किंवा गुजराथी भाषा शिकून फळ काय ? का यापैकीं कोणत्याही भाषेंत इंग्लिशांनीं वाचण्यासारखे ग्रंथ आहेत, कीं ती त्यांच्या राज्यकर्त्यांची भाषा आहे, कीं फ्रेंच भाषेप्रमाणें ती गोड असून सर्व युरोपभर समजण्यासारखी आहे, कीं आहे तरी काय ? उपायच नाहीं म्हणून ज्यांना एखाद्या देशी भाषेंत थोडेंसें रटप करावें लागतें तें तेवढें रडतकडत करतात. गरजेच्या पुढें ती वापरण्याचें किंवा तिचें विशेष ज्ञान संपादण्याचें त्यांना कांहींएक प्रयोजन किंवा हौस नसते.

देशी भाषा शिकण्याविषयीं इंग्रज लोकांचा जर असा दुसराग्रह, व तो स्वाभाविक आहे, तर त्यांच्या बायकांनीं त्या शिकून तयार व्हावें–ही सूचना मोठ्याच शहाणपणाची खरी आणि इतके श्रम त्यांच्या डोक्यावर लादावयाचे कशासाठीं तर नेटिव बायकांशीं त्यांना सख्य करतां यावें म्हणून ! अगोदर सख्य करण्याची केवढी हौस ! आणि ती पुरी करण्यासाठीं तिला रानटी नेटिवांच्या भाषा शिकण्याच्या श्रमाचें उत्तेजन ! आमच्या मतें सर टी. माधवरावांची ही सूचना अगदींच पोरकट आहे. कांहीं कांहीं कार्यसाधु पाद्री बायका व पोटभरू कांहीं मडमा देशी भाषा शिकल्या आहेत व शिकतील. पण जिला पाद्रीपणाचें किंवा गुर्विणीचें काम करायाचें नसेल अशी एकादी कलेक्टराची किंवा डिस्ट्रिक्ट जज्जाची मडम नेटिव स्त्रियांशीं सख्य करण्यासाठीं बाळमित्राची किंवा तसल्याच दुसऱ्या एखाद्या पुस्तकाची संथा घेत असेल, किंवा घेण्यास तयार असेल, असें आमच्यानें मानवत नाहीं. तें मानण्यास राजा सर टी. सारखाच एखादा उदारप्रकृति पुरुष पाहिजे ! भाषा साधारण झाल्याशिवाय सख्य होण्याचा संभव नाहीं. देशी भाषा इंग्रजी बायका शिकावयाच्या नाहींत, तेव्हां त्या सख्याचें साधन होऊं शकत नाहींत. अर्थात् तें होणें इष्ट असेल तर–आणि होणें इष्ट आहे याबद्दल कोणासच शंका नाहीं–आमच्या बायकांनीं इंग्रजी शिकावें हें ओघास आलें ! व तें त्या करूं लागल्या आहेत, व त्यांत त्यांना मदत होण्यासाठीं हायस्कुलें स्थापण्यांत येऊं लागलीं आहेत–हें पुढें इष्ट हेतु सिद्धीस जाईल अशी आशा उत्पन्न करणारें आहे. पण कोणत्याही दोन व्यक्तींत स्नेह होण्यास त्यांची भाषा एक असली पाहिजे

किंवा त्यांस एखादी साधारण भाषा येत असली पाहिजे–येवढीच अट असली तर आमचें मुलींचें हायस्कूल पाहून आम्हांस मोठी अडचण गेल्याबद्दल समाधान मानतां आलें असतें. पण सख्य ही मोठी भारी चीज आहे. ती एखाद्या दुसऱ्या खांबास ओंबकळून राहणारी नाहीं. तिला दहापांच खांबांचा नेट लागतो. समान भाषा, समानशील, समान धर्म, समान योग्यता, समान व्यसन, अथवा समान उद्योग, समान रीतीभाती, समान रूपें–असल्या अनेक समान गोष्टी लागतात. ज्या मानानें असल्या समान गोष्टींची संख्या कमीअधिक होत जाते त्या मानानें मैत्री किंवा सख्य क्षीण किंवा दृढ होत जातें. नेटिव व युरोपिअन स्त्रियांची मैत्री झाली पाहिजे म्हणून ज्यांचा आग्रह आहे त्यांना ती होणें किती कठिण आहे, हें समजत नसावें. नाहीं तर त्यांनीं येवढा आग्रह धरला नसता. दोन भिन्न प्रकृतींत असलेल्या समानत्वामुळें अन्योन्याचें अन्योन्यांकडे जें स्वाभाविक आकर्षण त्याचें, किंवा त्या आकर्षणानें त्यांच्या शरीरांचें आणि मनांचें जें वारंवार एके ठिकाणीं येणें त्याचें, नांव मैत्री किंवा सख्य. ज्या दोन व्यक्तींत किंवा वर्गांत मैत्री घडून यावी असें आपणांस वाटत असेल त्या दोहींस होईल तितकें समानरूप आणण्याविषयीं आपण प्रयत्न केला पाहिजे. साहेबलोकांच्या मडमांशीं आमच्या बायकांचा स्नेह जमायाला पाहिजे असेल तर मडमा आमच्या बायकांसारख्या झाल्या पाहिजेत. किंवा आमच्या बायका मडमांसारख्या झाल्या पाहिजेत. हरएक प्रकारें आमची स्थिति कमीपणाची आहे, तेव्हां आमच्या बायकांचीही तीच दशा. साहेबी मडमांनीं आमच्या स्त्रियांचें अनुकरण करणें म्हणजे उंच ठिकाणाहून खालीं उतरण्यासारखें आहे. आमच्या बायकांनीं मडमांचें अनुकरण करणें म्हणजे आंधेऱ्या दऱ्यांतून सूर्याच्या प्रभेनें माखलेल्या पर्वताच्या शिखरावर चढण्यासारखें आहे. तेव्हां जर आमच्या बायकांचें मडमांशीं सख्य व्हावयाला पाहिजे असेल तर त्यांनीं त्यांचें म्हणजे आमच्या अडाणी स्त्रियांनीं सुधारलेल्या इंग्रजी स्त्रियांचें अनुकरण केलें पाहिजे, हें उघड आहे! असल्या अभेद्य तर्कशास्त्राच्या जाळ्यांत सांपडून कित्येक आधुनिक विद्वानांनीं आपल्या चिमारमांस एमाशार्लटा बनाविण्याचें काम मोठ्या जारीनें सुरू केलें आहे! व्यवहारास लागणाऱ्या अत्यंत अवश्यक गोष्टींची अवहेलना करून कित्येकांनीं आपल्या मुलींच्या व बायकांच्या पाठीमागें इंग्रजी भाषेचें टुमणें लाविलें आहे! जणूं काय बाळंतपणांत, मुलांच्या दुखण्याबाण्यांत, गर्भारपणांत किंवा अशाच दुसऱ्या एखाद्या प्रापंचिक अडचणींत कापीचीं

पुस्तकें, रायल रीडरें, आणि मडमांशीं मारलेल्या गप्फाच उपयोगी पडणार आहेत ! कित्येक आपल्या बायकांवर गौन म्हणजे झगे चढवितात ! कित्येक कुंकू पुसवून डोक्यावर क्याप्स किंवा शिप्तरफ्यासन वेताच्या टोप्या घालवितात ! कित्येकांनीं आपल्या बायकांस ब्रेड (पाव) व बिस्कुटें (होरपळलेलें विलायती शंकरपाळें) तयार करण्यांत पटाईत केलें आहे ! कित्येकांच्या बायकांस लौंकरीच्या कामाशिवाय दुसरें कांहीं ठाऊक नाहीं ! कित्येक बायकांना सकाळीं चहा घेतल्याशिवाय परसाकडे होत नाहीं ! कित्येक बायकांची मोठी शिफारस काय ती पियानो वाजविण्याची माहिती !.

वरील प्रकार अजून फारसा माजला नाहीं. तरी लोकांची प्रवृत्ति हळूहळू तिकडे आहे. हिंदु गृहपद्धति पूर्णत्वास पोंचलेली आहे व सुधारणा करण्यास तींत अवकाश नाहीं–असें आमचें बिलकुल म्हणणें नाहीं. स्त्रियांस शिक्षण देऊं नये किंवा इंग्रजी शिकवूं नये असेंही आमचें म्हणणें नाहीं. चित्तास समाधान उत्पन्न करणाऱ्या ज्या गायनवादनादि कला आहेत त्यांचा अभ्यास अवकाशानुसार स्त्रियांकडून करविणें आम्हांस प्रशस्त वाटत नाहीं असेंही नाहीं. आम्हांस जें रुचत नाहीं तें हें आहे कीं, आमच्यापैकीं कित्येक हुच्चभाई, आपल्या आणि इंग्रजांच्या बायकांचें सख्य होणें बहुतेक असंभवनीय आहे हें न समजून, आपल्या बायकांकडून भलभलत्या गोष्टी करवून त्यांस बेजार करतात, व त्यांच्या टापूंत जे त्यांचे पिथ्थे असतात त्यांच्याकडूनही तसेंच करवतात । स्त्रियांना देववेल तितकें शिक्षण व स्वातंत्र्य देण्याविषयीं आम्हांस बिलकुल मत्सर नाहीं. पण युरोपियन लोकांच्या मडमांशीं त्यांचें सख्य होण्यासाठीं त्यांना मडमा बनविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांचा आम्हांस मोठा तिरस्कार आहे. आम्हांस व आमच्या स्त्रियांस साहेब आणि मडमा बनवायाचें नाहीं. आम्हांस व आमच्या स्त्रियांस आर्यत्व कायम ठेवून जितकी सुधारणा जेवढ्या झपाट्यानें करवेल तितकी तेवढ्या झपाट्यानें करावयाची आहे. अखेरपर्यंत होतां होईल तों हिंदु रहावयाचें असा आपला निश्चय पाहिजे. आपण किंवा आपल्या स्त्रिया–यांच्याकडून साहेब लोकांचें सीमेबाहेर अनुकरण होऊं लागलें तर आपली स्थिति बाट्यांप्रमाणें किंवा युरेजिअन लोकांप्रमाणें होईल. कोणताही देश, वर्ग किंवा व्यक्ति अनुकरणानें मोठी झाली नाहीं. परकीय वस्तु अशा रीतीनें घ्याव्या कीं त्या घेतां घेतां त्यांचा आणि आपला मिलाफ होऊन एक जीव व्हावा.

[वर्ष ५।६ अंक ५।१।१.]

आम्हां मनुष्यांस पाहिजे काय व तें मिळेल कशानें

जे आपणांस लोकाग्रणी समजतात त्यांनीं आपल्या चित्तांत वरील प्रश्न रात्रंदिवस वागवून तदनुसार वर्तन ठेविलें, तरच मनुष्यांची खरी सुधारणा होत जाईल. मनुष्यजातींचा इतिहास वाचतांना व राष्ट्रांच्या उठाठेवी करतांना पहिल्यापासून कोणत्या गोष्टींसाठीं मनुष्यांनीं आपल्या शारीरिक व मानसिक शक्तींचा उपयोग केला आहे हें ध्यानांत ठेविलें तर अतिशय जुना इतिहास संगतवार लागून सुगम होईल इतकेंच नाहीं, तर येथून पुढें राष्ट्रांचें जें वर्तन व्हावयाचें त्याला योग्य दिशा मिळेल. मनुष्य हा जीवकोटींतला एक अंश होय. जीवकोटींतल्या इतर अंशांत आणि यांत पुष्कळ साधारण धर्म आहेत, व जेथपर्यंत तो जीवकोटींत राहील तेथपर्यंत ते त्याला सोडणार नाहींत. सर्व प्राणिवर्गांस साधारण अशा दोन गोष्टी आहेत, त्या कोणत्या म्हणाल तर भूक व विषयवासना. भूक भागविल्यानें व्यक्तीचें संरक्षण होतें. भूक भागवून विषयवासना न भागविल्यास जाति लयास जाईल हें स्पष्ट आहे. भूक भागवून शरीरांत सामर्थ्य जमल्याशिवाय विषयवासनेचा प्रादुर्भाव व्हावयाचा नाहीं हेंही उघड आहे. प्राणिमात्रांच्या दुःखांत अत्यंत तीव्र दुःख भुकेचें, व त्याच्या खालोखाल विषयवासनेचें आहे, हें कोणीहि कबूल करील. भुकेच्या वेदना आमरण टिकतात; विषयवासनेच्या उतारवयांत कमी होऊन वृद्धापकाळीं अगदीं क्षीण होतात. भूकही वयाच्या मानानें कमी होत जाते हें सर्वानुभवसिद्ध आहे. शरीररक्षण जसजसें थोडक्या अन्नानें होऊं लागतें व कोठ्याची पचनशक्ति क्षीण होते, तसतशी भूक कमी होत जाते. वयपरत्वें जननकार्यें उरकण्यास स्त्रीपुरुषांचीं शरीरें जसजशीं असमर्थ होत जातात तसतशी विषयवासना मंदावत जाते हें स्वाभाविकच आहे. सारांश, प्राणिमात्रांचीं अत्यंत तीव्र दुःखें, भूक व विषयवासना यांच्यापासून उत्पन्न होतात, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कोणीं कितीहि वाकांडित्य केलें तरी या गोष्टी निर्विवाद राहिल्याच पाहिजेत. आतां भूक व विषयवासना ज्याप्रमाणें प्राणिमात्रांच्या अत्यंत तीव्र दुःखाला कारण होतात, त्याप्रमाणें त्यांचें अत्युत्कट सुखही त्यांवरच अवलंबून आहे. तीव्र भूक व विषयवासना यांस उत्तम रीतीनें भागवितां आल्यास जें समाधान होतें तें अद्वितीय व अवर्णनीय आहे, हें सत्यप्रिय व विचारी मनुष्यास कबूल केलें पाहिजे. रसनेंद्रिय व

जननेंद्रिय हीं प्राणिमात्रांच्या अत्यंत तीव्र दुःखाच्या व अत्यंत उत्कट सुखाच्या मुळाशीं आहेत हें एकदां पक्कें समजून आलें म्हणजे पुष्कळ निरर्थक वाद शिथिल होतात. या दोन इंद्रियांशिवाय आणखी कांहीं इंद्रियें आहेत, व तींही मनुष्यांच्या व इतर प्राण्यांच्या सुखदुःखास कमी अधिक कारण होतात, पण त्यांचें प्राबल्य वर निर्दिष्ट केलेल्या इंद्रियद्वयासारखें नाहीं. समाजस्थापना, राज्यव्यवस्था, नीत्यवलंबन, विवाहरूढि, शास्त्राभ्यास, यंत्रकलाप्रसार, पदार्थोत्पादन, धनसंचय, व्यापार वगैरे सर्व गोष्टींचा पाया पंचेंद्रियांपासून होणाऱ्या सुखदुःखांवर रचिला आहे, व तीं काढून घेतलीं तर तो ढासळून जाऊन समाजाचा लय होईल, हें प्रत्येकास कबूल केलें पाहिजे. इतिहासाच्या अवलोकनानें प्रथम नजरेस गोष्ट येते ती ही कीं, पृथ्वीवर निरनिराळ्या जातींच्या लोकांत जीं रणें झालीं, व अझून होत आहेत, त्यांचें मुख्य कारण भूक होय. भूक व इतर इंद्रियक्षुधा भागविण्यासाठीं मनुष्यजाती एकमेकींशीं लढतां लढतां इतका त्रास भोगतात, व इतक्या थकून जातात, कीं अखेरीस ज्यानें त्यानें दुसऱ्यास उपद्रव न होण्यासारखे श्रम करून स्वचरितार्थ करावा, व होतां होईल तों इतरांशीं सलोख्यानें वागावें-अशा प्रकारचा वर्तनक्रम त्यांच्यांत सुरू होतो, व असा वर्तनक्रम सुरू झाला म्हणजे रानटी स्थिति जाऊन सुधारणेस आरंभ झाला असें समजावें. दुसऱ्यास उपद्रव न होईल अशा प्रकारचे श्रम करून चरितार्थ करण्याची हौस, व दुसऱ्यास निरपेक्षबुद्धीनें सहाय्य देण्याची आवड, या दोन गुणांचा जसजसा अधिकाधिक प्रसार होत जातो, तसतशी राष्ट्राराष्ट्रांत, व एकाच राष्ट्रांतील स्त्रीपुरुषांत, आणि निरनिराळ्या स्थितींतील लोकांत, प्रीति वाढत जाऊन, मनुष्याच्या मनाला व शरीराला सुख व समाधान होणाऱ्या साधनांची वृद्धि होते. हीं साधनें कोणतीं आहेत हें वर थोडक्यांत सांगितलेंच आहे, पण कित्येकांचें असें म्हणणें पडतें कीं मनुष्यामनुष्यांत स्नेहसंबंध राहण्यास व मनुष्यसुखाची वृद्धि होण्यास, वर सांगितलेल्या गोष्टी पुरे होत नाहींत. त्यांच्या मदतीला धर्म आला पाहिजे. या पक्षाचे लोक धर्म या शब्दाची स्पष्ट व्याख्या कधींच देत नाहींत; यामुळें त्यांच्याशीं वाद करण्यास मोठी पंचाईत पडते. तथापि परमेश्वरस्तुति, सद्वर्तन, परोपकार, व आत्मोन्नति इतक्या गोष्टींचा धर्माच्या व्याख्येंत समावेश बहुशः करण्यांत येतो. यांपैकीं सद्वर्तन आणि परोपकार यांना धर्माशिवाय दुसरा आधार नाहीं असें म्हणण्यापेक्षां, या दोन गोष्टी आधीं सिद्ध होऊन धर्मांत गोंविल्या गेल्या, असें म्हणणें विचाराला व इतिहासाला जुळून आहे.

परमेश्वराविषयीं कृतज्ञताबुद्धि असल्यानें व त्याच्या स्वरूपाचें आकलन करून त्याचा स्तव करण्यांत मन व शरीर रममाण झाल्यानें आत्मोन्नति होते, व तो अनिर्वाच्य परमानंदांत गढून जातो. तथापि हा आनंद ज्याचा त्याजपाशीं रहात असल्यानें, व हा संपादण्यासाठीं ज्या साधनांचा उपयोग करावा लागतो, त्यांचा सांसारिक सुधारणांशीं म्हणण्यासारखा संबंध नसल्यामुळें तो यांच्यापासून दूर ठेवणें फार अगत्याचें आहे. सांसारिक विचार ऐहिकसुखविषयक असतात. धर्मविचारांपैकीं मुख्य मुख्य तरी आत्म्याचें पारमार्थिक सुख कशानें साधेल या दिशेस लागलेले असतात. ऐहिक व पारमार्थिक सुखांचे विषय व ते संपादण्याचीं साधनें अगदीं भिन्न असल्यामुळें एकमेकांचें एकमेकांशीं बहुशः पटत नाहीं, किंवा तीं परस्पराला उपरोधक असतात, असें म्हटलें तरी चालेल. तसेंच पारमार्थिक सुख साधण्याविषयींचे कित्येक विचार फार गूढ असल्यामुळें त्यांबद्दल बरेंच मतांतर असतें, व हें मतांतर ऐहिक दुष्ट वासनांचें साथी झालें म्हणजे जे कहर गुदरतात त्यांसारखें भयंकर असें दुसरें कांहीं नाहीं, हें प्रत्येक इतिहासज्ञ कबूल करील. आमच्या येथील विद्वच्छिरोमणि प्रसिद्ध रावबहादुर प्रोफेसर म. गो. रानडे हे इतिहासज्ञ आहेत. तथापि त्यांना वरील गोष्ट संमत नसावी असें त्यांच्या मुखावाटे वारंवार निघणाऱ्या उद्गारांवरून दिसतें. डेक्कन कॉलेजांत त्यांनीं केलेल्या भाषणाची हकीकत मागल्या अंकांत छापलेल्या एका मित्राच्या पत्रांत आहे, ती वाचकांच्या ध्यानांत असेलच. गेल्या रविवारीं प्रार्थनासमाजाच्या वार्षिक उत्सवास आरंभ झाला. त्या दिवशीं संध्याकाळीं प्रार्थनामंदिरांत माधवरावजींनीं जें भाषण केलें तें कॉलेजांतील भाषणाच्या नमुन्याचेंच होतें. भेद येवढाच कीं, मंदिरांत बोलत असतां ते थंडे होते. ठीकच आहे. अशा शांत व पवित्र ठिकाणीं गरमपणा काय कामाचा ? तुकाराम अत्यंत शांत व ईश्वरपरायण होता. जन्मास येऊन त्यानें आपल्या हयातींत जें केलें तें करण्याचा बोजा आजकाल प्रार्थनासमाजावर येऊन पडला आहे. तेव्हां त्याच्या घटकावयवांस शांत वृत्तीचा स्वीकार केलाच पाहिजे. आतां कोणास अशी शंका आली असेल कीं तुकारामाचें काम पुढें चालविण्याची जबाबदारी प्रार्थनासमाजावर येऊन पडली आहे, या आमच्या लिहिण्याचा अर्थ काय ? त्याचा अर्थ माधवाचार्यांनीं आपल्या ऐतिहासिक धर्मव्याख्यानांत स्पष्ट करून दाखविला होता. चारपांच हजार वर्षांपूर्वी आर्यलोकांनीं संख्येनें व सुधारणेनें बऱ्याच अंशांनीं आपल्या बरोबरीच्या अशा

हिंदुस्थानांतील घोंड भिल्ल प्रभृति हिंदुस्थानच्या मूळच्या रहिवाशांस जिंकून उत्तर हिंदुस्थानांत शुद्ध वैदिक धर्माची स्थापना केली, व रामराजानें त्या धर्माची पताका कपिवीरांच्या सहाय्यानें नैऋताधिपति लंकेश्वराच्या वाड्यापर्यंत नेऊन भिडविली, पुढें आर्यांत जे आपसांत तंटे लागले व ज्यांची हकीकत भारतांत दिली आहे. त्यांमुळें आर्यलोकांचें शौर्य, नीति व धर्म खालावत जाऊन पाखंड बौद्धधर्माचा स्थापक जो गौतम त्याला आपलें घोडें पुढें सरसावण्यास संधि सांपडली. पुष्कळ वर्षें हिंदुस्थानांत बौद्धमत प्रबल होऊन राहिल्यामुळें धर्मसंबंधीं अनेक मूढ विश्वास व आचार रूढ झाले. परंतु जगत्कल्याणकारी त्रिकालज्ञ परमेश्वराच्या रूपेनें शंकराचार्यांचा अवतार होऊन सनातन शैव धर्माची भरतखंडांत पुनः स्थापना झाली, व कनिष्ठ बौद्धांना देशाबाहेर पळ काढावा लागला. पुढें पुनः दैवगती फिरून बाहेरील रानटी लोकांच्या स्वाऱ्यांमुळें व देशांतल्या देशांत अनाचार व जातिभेद वाढून मूळचे अनार्य लोक पुढें सरसावल्यामुळें, हिंदुधर्मास पुनः मंदी आली. "परंतु धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे" या उक्तीचें जगद्बालक जगदात्म्यास स्मरण होऊन त्यानें तुळशीदास, कबीर, नानक, तुकाराम, रामदास—अशीं संतरत्नें जन्मास घातलीं, व त्यांच्या अद्वितीय ईश्वरपरायणतेमुळें हिंदुधर्माचें पुनः शोधन झालें. अलीकडे इंग्रजांच्या अमलामुळें त्या धर्मास जें मांद्य आलें आहे तें दूर करून त्यास पुनः तरतरी आणणें हें या शतकांत ब्राह्मसमाजादि समाजांनीं करावें, असा परमेश्वराचा संकेत दिसतो. हिंदुस्थानांत ज्या ज्या वेळेस आर्यधर्माची ग्लानि होईल त्या त्या वेळेस शंकराचार्य, तुकाराम, तुळसीदास, केशव चंद्रसेन व या इलाख्यांत प्रो.—व रा. ब.—यांसारख्या परात्पर संतविभूति निर्माण करून हिंदुधर्म ताजा ठेवावा व या रीतीनें या पंचवीस कोटी प्रजेच्या राष्ट्रास उन्नतपदाप्रत चढवावें, असा त्या सृष्टिनियंत्याचा हेतु असावा, हें उघड दिसतें.

येणेंप्रमाणें माधवरावजींच्या भाषणांतील सरासरी सारांश होता.

धर्माला ग्लानि आली म्हणजे त्याला तेजी येण्यासाठीं परमेश्वर शंकराचार्यांसारखे संसारविमुख व भक्तिपरायण पुरुष निर्माण करतो इतकेंच नाहीं, तर त्यांना व त्यांच्या अनुयायांना ऐहिक सुखांचा तिरस्कार व पाखंड्यांचें शासन करतां येण्यासाठीं विलक्षण धैर्य देतो. मदिना येथें देह ठेवणाऱ्या महंमदास लोकांकडून आपला आतोनात छळ करून घेण्यास, गौतमाला आपलें राज्य सोडण्यास,

ख्रिस्ताला सुळावर जाण्यास, साक्रेतिसाला विष पिण्यास, बेकेटला मारेकऱ्यांच्या शस्त्रास बळी पडण्यास, व ब्रूनोला क्याथोलिक लोकांकडून रोम येथें जाळून घेण्यास, ब्रह्मांडसुखचिंतक परमेश्वरानें जें विलक्षण धैर्य दिलें तें पुष्कळांस अवगत आहे, व निरनिराळ्या धर्मांच्या उन्नतीसाठीं युरोपांत व आशियाखंडांत ज्या लाखों अज्ञ लोकांनीं धर्मासाठीं प्राणांच्या आहुति दिल्या, त्यांच्यांत स्फुरण उत्पन्न करणारा तरी तोच ब्रह्मांडनियंता असला पाहिजे यांत संशय नाहीं, असें सर्वजण कबूल करतील. धर्मशोधक व्हावयाचें असल्यास असलेच लोक पाहिजेत, व तें घडवून आणायचें असल्यास परमेश्वर त्यांना जन्मास घालतो, किंवा स्फुरण देतो. कोणा पुढाऱ्यांच्या मतें परमेश्वर अशा लोकांच्या द्वारें धर्मसंबंधींच अघटित घटना घडवून आणतो, असें नाहीं; तर राज्यक्रांत्याही असल्यांकडूनच करवितो. येवढ्या बाबतींत मात्र आमचा आणि या पक्षाचा किंचित् मतभेद आहे. आमची अशी समजूत आहे कीं, ज्या वेळेस आपल्या जंतूंचें लक्ष धर्मशुद्धीकडे किंवा पारमार्थिक सुखाकडे लावायाचें असतें, त्या वेळेस जगन्नायक वर सांगितलेल्या प्रकारच्या विभूति निर्माण करतो; पण ज्या वेळेस त्याच्या मनांत त्याच्या जंतूंचें लक्ष ऐहिक सुखाकडे लागावें असें असतें, त्या वेळेस तो डिमास्थेनीज, पेरिक्लीज, फिलिप, आलेग्झांडर, हानिबाल, सीझर, हॅण्डेन, बेकन, टरगो, रूसो, फ्रेडरिक धी ग्रेट, पीटर धी ग्रेट, टॅमरलेन, शिवाजी, बाजीराव, ग्लाडस्टन, व लार्ड रिपन यांसारखीं, देशादेशाच्या स्थित्यनुमानाप्रमाणें जशासतशीं, माणसें देऊन आपला हेतु तडीस नेतो. धर्माविषयीं अत्युत्कट रति उत्पन्न होऊन ऐहिक सुखाविषयीं परमेश्वराची प्रजा ज्या वेळेस अगदीं उदासीन होते त्या वेळेस तो कपिल, कणाद, चार्वाक, भास्कराचार्य, ग्लालिलिओ, मिल्ल, स्पेन्सर, ड्रेपर, लेकी व टिंडाल यांसारखे तत्त्ववेत्ते, मानाजी, मल्हारजी, परशुरामभाऊ, नेलसन, नेपोलीअन व गार्डोन यांसारखे योद्धे व चाणक्य, नानाफडणिस, ग्लाडस्टन, बिस्मार्क, गीअर, व रिपन यांसारखे राजकारणी पुरुष जन्मास घालून आपला हेतु तडीस नेतो. रिपनसारख्याच्यानें किंवा पेरिक्लीजसारख्याच्यानें ऐहिक सुखसंबंधानें पांच वर्षांत जितक्या गोष्टी करवतील त्यांचा एक शतांशसुद्धां शंभर संतांच्यानें त्याच्या शंभरपट वेळांत होणार नाहीं. आणि तसें होणें बरोबरच आहे. कारण निरनिराळ्या कार्यांसाठीं परमेश्वर निरनिराळ्या प्रकारच्या माणसांची योजना करतो. ज्याप्रमाणें धर्मामुळें मोठमोठ्या घडामोडी होतात, त्याप्रमाणें दुसऱ्याही पुष्कळ कारणांनीं होतात. ग्रीस व इतली देशांचें जुनें

वैभव, फ्रान्स देशांतील बडी राज्यक्रांति, जर्मनी आणि रशिया यांचे जय, पेशव्यांचा प्रचंड राज्यविस्तार, अमेरिकन लोकांचें स्वातंत्र्य, व ज्यावरून सूर्य मावळत नाहीं असें इंग्रजांचें अफाट राज्य–यांचा धर्माशीं म्हणण्यासारख्या कांहींएक संबंध नाहीं. आजपर्यंत मनुष्यांनीं धर्माकडे पुष्कळ वेळ घालवून अत्यंत उज्ज्वल आत्मशुद्धि करून घेतली असें वाटून परमेश्वरानें आतां त्यांचें लक्ष पदार्थधर्माकडे लाविलें आहे, यासाठीं ऐहिक सुख पाहिजे असेल त्यांनीं राजनीति, पदार्थविज्ञान, नीतिप्रसार, विद्योत्तेजन, यंत्रकलाप्रसार व धनसंचय–या विषयांकडे आपलें तन मन धन लावावें.

[वर्ष ५, अंक २०]

सांप्रतच्या धामधुमीवर मि. कुंटे यांचें मजेचें चऱ्हाट

गेल्या आदित्यवारीं फडतरे यांचे वाड्यांत सदाशिव पेठ वार्डाची सभा भरली होती. सभेंत विवेचन होणाऱ्या विषयांपैकीं पहिला विषय त्या वार्डांत एक स्थायिक कमिटी नेमून, जो उमेदवार अखेरीस यशस्वी होईल त्यानें, या कमिटीच्या सल्ल्यानें चालावें असें ठरविण्याचा होता. सभा जमल्यावर असा ठराव करण्याची जेव्हां सूचना झाली, त्यावेळीं मि. कुंटे यांनीं जें संभाषण केलें त्याचा सारांश पुढें दिला आहे. या सारांशांत मि. कुंटे यांच्या भाषणांतील येतील तितके मुद्दे, त्यांचीच विचार-सरणी अवलंबून व त्यांचा आशय न सोडतां, देण्याचा प्रयत्न केला आहे; त्यांत कोठें गैरसमज झालेला कोणास आढळल्यास व तो आमच्या नजरेस त्यानें आणिल्यास, आम्ही आपला लेख सुधारून घेऊं.

कमिटी नेमा! कमिटी कशाला? कमिटी--कमिटी--कमिटी! कमिटी कसली आपल्या डोंबलाची नेमतां? इंग्लंडांत नाहीं कोठें कमिटी, अमेरिकेंत नाहीं कोठें कमिटी, जर्मनींत नाहीं कोठें कमिटी? आपलं राज्य चालवायचं आहे. आपला संसार चालवायचा आहे, आपल्यावर मोठी जोखीम आहे, आपल्या उरावर मोठा धोंडा येऊन पडला आहे. पहा एखादा धट्टाकट्टा मनुष्यन् या पाठीवर, त्याच्या मागं कमिटीचं टुम्णं कशाला पाहिजे? मीं कुठें आज येत होतो, मला कोठें इतकी खाज आहे, पण हा *भट माझ्या इथें आलान् मला म्हणाला चला किर्होन् ते तुम्हीं आपल नांवच प्रसिद्ध केलं आहेन् ते तुम्ही बोलान् म्हटलं बुवा चल; नाहीं तर मी कुठं या लफड्यांत पडतों आहें? मी आपला हा अस्सा क्यांडिडेट आहें. मी आपला हा इथें उभा राहणार; मग तुम्ही आपले घरीं त्या व्होटा जमवा, करा मला खंडोबान् बसवा नेऊन कमिटींत. हें सर्व नाटक आहे, त्याची पूर्वीपासून व्यवस्था आहेन् त्यांत वैदग्ध्य लागतन् ती ललितकलोत्सव मंडळी निघाली आहेन् तिचे पडदे फार चांगले आहेत. पण पूर्वी काय होते! तमाशे. त्याच्या झाल्या छकडी, न् छकडीचीं झालीं नाटकन् त्यांत आली सरस्वती आणि तिच्या माग गणपति त्याची ती सोंड न् वक्रतुंड. त्यांत इतिहास शिरला त्याची झाली तारा, त्यांत शिरला गाण; त्याची झाली रंगीनायकीण; तशी मुन्सिपालिटी! जस जस काम अवघड होत चालल

*रा० सा० मो० ना० भट.

आहे, तसतस आमच मनय् तिकड लागत आहे. पहिल्यांदा काय ? चार शेमडी-लेमडी पोरं धरून आणावीं, त्यांच्या डोक्यावर द्यावे टोप चढवून, अन् बसवावेत बोर्डावर; मग मागं कुटावे टाळ न् उडवावी राळ न् फोडावे मागच्यांनीं घसे. आतां एका एका पोराला लागतात चार चार वर्षें महिनत करायला; तो नाजूकच पाहिजे, तो गोंडसच पाहिजे, त्यान चांगल गायलय् पाहिजे, डोळेय् मारले पाहिजेत, तेव्हां मिळतात पैसे. तसे आमचे मुनिसिपल कमिशनर. तो "पोक्त" पाहिजेन् "विचारी" पाहिजेन् " बरावाईट " पाहिजेन् " सारासार, ग्राह्याग्राह्य अशा दोन्ही बाजूंकडे लक्ष पोंचवून न् दूरवर दृष्टि ठेवून " " सभ्य, सौम्य, उदार मनाचा व दिलदार असा असावा " *अन् तो देखणा असावान् तो ढब्बू असावा न् त्यानं आणखी आमच्या कमिटीचं य् ऐकावं ! अशानं कुठ होत आहे; उचल कावळा न् बशीव काकु-बाईच्या डोकीवर ! ! आपण नाहींरे बुवा ऐकायचे असल्या कमिटीच; ती कमिटी का चालणार आहे, का तिला कोणी येणार आहे, का तिला कोणी पुसणार आहे ? आपण आधींच सांगतों कीं पट्टीबिट्टी बिलकुल आपण देणार नाहीं; ती तुमची तुम्हींच द्या. कमिटी म्हणजे काय ? सेक्रेटरी, चिठ्या न् शिपाई. मी एक दिवशीं शोध केला कीं चिठ्या पोंचविल्यावर हा शिपाई करतो काय ? मला कोणीं सांगितलं कीं बसतो सेक्रेटरींच्या घरचीं भांडीं घाशीत. ती असली कमिटी कशाला ? न् का त्या कमिशनरचं डोकं उठवितां ? हा कमिशनर नेमला कीं आम्ही कचकावून निजणार न् ऐशी डाराडुर झोंप घेणार कीं कोणी मोठ्यानं ठंठणा बोंबलुं आमच्या कानाशीं तरी आम्ही जागे व्हायचे नाहीं. अन् कसली कपाळाची कमिटी नेमतां ?

तुम्हांला सांगूं पुण्यांत एक नवीन स्कूल निघाल आहे; इथें एक पंथ निघाला आहे. त्यास पुष्कळ दिवस मी एक नांव हुडकून काढीत आहे. तें मलाच अखेरीस सांपडलं. त्याचं नांव " रोमँटिक ". यांची सगळी धामधूम; यांनींच प्रश्न काढले; काय म्हणतात " कमिटीचे जमाखर्चाचें मान पाहतां दिवसानुदिवस उत्पन्न कमी कमी होत आहे; व खर्चाचें मान तेंच किंबहुना वाढतेंच आहे. सरासरीनें प्रत्येक व्यक्तीचे शिरावरील कराचा बोजा पाहिला तर मोठमोठ्या ठिकाणाजवळ आहे ". का लंडनजवळ आहे, का मुंबईजवळ आहे का नगराजवळ आहे, का वाईजवळ

*" पुण्यांतील मत देणारांस विनंति " नामक पत्रांतुन वाचुन.

आहे का भांबुरड्याजवळ आहे का आहे कुठे ? अन् दोन्ही तोंड कशी मिळवावी ? अरे का तुम्ही कधीं संसार केला आहेत का नाहीं. दादल्याला दहा रुपये मिळतात, दहा माणस घरांत असतात, मीठ आणतो, बाजरी आणतो, पोट भरतो; शिवाय दसऱ्याला लखपख धोतर नेसून चालला बाहेर ! अन् म्युनिसिपालिटीचा दीड-लाखाचा संसार चालवितां येत नाहीं ? अन् दोनही तोंड कशीं मिळवावीं म्हणून रडता ? लाज नाहीं वाटत ? शेंदोनशें येताहेत पांचचारशें जाताहेत, चाळाच आहे गाडा. असं डरून कुठं होतंय् ? लोकानं कळकळ कशी लागेल असं तोंडानं म्हणून कुठें कळकळ लागते ? आतां का म्यानेजिंग कमिटीनं केलं का पोलिस इन्स्पेक्टरानं केलं, आळंदीची पालखी गांवाबाहेरून दोन मैलांवरून जाते. कळत नाहीं म्युनिसि-पालिटीला कीं हजारों लोकानं तें हवं आहे, तें त्यानं आवडतं. पण आमचं सरकार कुठं आहे ? तें बसलं आहे लंडन शहरांत; त्यांची हवा बिघडते, गांवांत पटकी येते, वाखा होतो, महामारी होते. सरकारच डोकं फिरल; उचल आळंदीची पालखीन् ठेव पर्वतीच्या डोक्यावर. पुण्यांत वाखा येतो; अरे वाखा आला तर लष्करांत पळून काय होत य् ? एक रावबहादूर लष्करांत पळतो आहे, एक बंगला घेतो आहे; मला सांगतात सदाशिव पेठेची हवा बिघडली आहे न् बुधवारची चांगली आहे. मी खुशाल घरांत बसतो आहे, खिडक्या उघड्या टाकतो आहे, हवा खातो आहे, मला नाहीं कांहीं होत ? पुण्याची हवा बिघडली आहे; झाली थोडी थंड, म्हणून का पळून जाव ! कां सगळीं माणस मेलीं पुण्यातलीं ? ही जर हवा तुम्हाला सोसेना, तर माथेरानच्या लोकांनीं कुठें जावं ? तुम्हाला वाटत विलायतच्या लोकांना अधिक कळकळ आहे. तिथें लोक एकाहून एक असले ढ आहेत कीं चेयर्मनच्या लग्नाचा खर्च मुनिसिपालीटीवरच; मग तो आडिटर जेव्हां थप्पड मारतो, तेव्हां त्याला विचा-रतात कीं ह्या कालमांत नाहीं घालायाच ? तर मग कोणच्या कालमांत घालायच ? जस कांहीं घातल आहे ते रास्तच ! तुम्हाला वाटत तिकडचे लोक इथल्या सार-खेच रोमाँटिक् असतील. ते इंग्रज लोक फार शहाणे, ते मोठे धिमे आहेत. ते का कान्सर्व्हेटिव्ह न् लिबरल होऊन बसले आहेत ? इकडे एकाचे ग्लास खपेनासे होतात, तिकडे एकाच्या पेन्सिली खपेनाशा होतात; त्यांच्या जिवाला चुटपूट लागते, कोणी सांगितलें रशियाच नाक कापा म्हणजे झाला कान्सर्व्हेटिव्ह, कोणी सांगि-तल शांतता असूं द्या, झाला लिबरल. एकदा मुक्त्यार नेमून दिला कीं सात वर्षे खुशाल झोंप घेतो, त्याला तुमच्या कमिट्या नकोत, तुमचीं मतें नकोत कांहीं नको.

बिचारा थकून भागून आला कीं चालला क्लबांत. तिथें जाऊन ईझिचेयरवर पडून "बॉय, काफी लाव"; बस काफी पितो आहे, चिरूट ओढतो आहे, गप्पा मारतो आहे, तिथल्या पोरींशीं चावटपणा करतो आहे; संध्याकाळ झाली कीं चालला भीत भीत घरीं. नाहीं तर ती घरची बया रागावलेली असायची आणि खमकून अंगावर यायची. अशी त्या इंग्लंडची स्थिति. इकड पहाव तो सगळा रोमान्स आहे!! हा अभिनिवेश सोडून द्या. मार्केटचा खर्च कसा भागवावा? ते बाबा शास्त्रच निराळ आहे, अन् ते पैशाच शास्त्र आहेन्– ते आम्ही का आमच्या आजोबानीं कर्ज केलं तर फेडीत नाहीं म्हणतो? कर्ज ते केलं पाहिजे, ते चार पिढ्यावर वाटून दिल पाहिजे ते मागपुढें करून काय होते आहे? तो टाऊनहाल बांधायचा, तो मलमूत्रवाही गंधानाला बांधायचा! अरे कशाला बांधतां? का आतां हजार माणस झाली म्हणून मुनिसिपालटींत बसायला जागा नाहीं? ते उघड्यावर पडत आहेन् उन्हांत वाळून जात आहे; त्या लष्करांत पहा; तोंडाला लखपख, मागें नरकाचे नाले चालले आहेत. मला एकजण लागला गोडाउन्समध्यें न्यायला. इशीशीशीशीशी! नकोरे भाई हात जोडतो तुला. अन् आम्हाला का माहीत नाहीं. लंडनच्या गटारांत कोण घाण असते, कोण मोठमोठाले बोळे लोक नाकांत चोंदित असतात ते? तिकडून स्यानिटरी कमिशनरकडून थप्पड आली तर करताहेत थोडी थापाथापी, थोडी उडवा-उडवी, त्यावांचून कस होत आहे! अस यडगोळ केल्यावांचून कस होतय्? सक्तीनें देवी काढायचा कायदा हवा का? बेलाशक हवा, कां नको? तितके डोळे कमी फुरतील. शाळांची व्यवस्था काय करावी? काय झालं आहे काय? फार उत्तम आहे न् फार वाईट आहे. का सगळी पोर अभ्यासानें पिळून काढायची कीं काय? तो रावबहादूर माझ्या घरीं येतो न म्हणतो माझ्या मुलाला परीक्षेला पाठवा. अरे रावबहादुरा! का पोर मारायचं आहे का त्याचा जीव घ्यायचा आहे; त्याची तापानं दुर्दशा उडाली आहे न् याचा हट्ट त्याला परीक्षेला धाडायचा! माझ्या डोक्याशीं रात्रंदिवस टीकटीक. जा; धाड त्याला परीक्षेला, माझरे काय जात आहे? तूं रावबहादूर जाणेन् तुझा पोरगा जाणे. भले रोमाँटिक! आले पैशाच शास्त्र ते वाचून पोलिटिकल एकानमी असत कीं नाहीं; अन् घातला प्रश्न प्रत्यक्ष व परोक्ष कर. ते इंग्लिश लोक भले वस्ताद आहेत. होते लोकांजवळ पैसे खुळखुळत तेवढे घेतले काढून, मग सगळे भुकेबंगाल झाल्यावर बसवा जमिनीवर कर, घ्या मिठावर कर, त्यांना कळतय् प्रत्यक्षन् परोक्ष. यांच्याजवळ पैसे राहिले तर हे काय करणार चार

रांडा ठेवणार अन् आठ पोरी नाचविणार जशाच तसे. उत्पन्न कसं वाढेल, कर कसले पाहिजेत, कधीं केला होता विचार कीं पैशाला दोन कागद मिळत होते तेव्हां किती खपत होत न् आतां किती खपतात ! पाणी स्वस्ती करा. माझ्या आळींत चार विधवा आहेत त्या विहिरीचच कीरे पाणी प्यायचला लागल्या. कां ! कीं त्यांच्या जवळ मुनिसिपालिटींत पैसे पोंचवायला कोणी नाहीं. इकडे सहा महिने भरले कीं पाणी बंद; काकुबाईचा स्वैंपाक आडला. ही का कराची रीत ? बरे घरपट्टी नाहीं दिली म्हणून घरांतून नाहीं हांकून देत ! का कधीं भाडेकऱ्यांची रीत नाहीं माहीत; वेळ आहे, अडचण आहे, कोणी गांवाला जातो, विस्मरण होत म्हणून का आमच्यावर वारंट काढायच न् आमच टेबल बाहेर काढून लिलाव करायाचा ? कोणच्या गांवची रीत ? सगळेच कसे रोमाँटिक ! मतदार लोकांच्या शर्ती आम्ही ऐकू का नाहीं ? नाहींच ऐकणार ! काय मत देणारांची अक्कल न् उल्हास, राम्याच पोत रस्त्यावर पडत, गोंद्या उचलून चालला हणमंत्याच्या घराकडे. चाला वाटत आली मुनिसिपालिटी. " घेरे दादा चोक रुपाया न् दे माझ पोत सोडून. " अशी तर गत आपली, अन् कमिटी नेमता. आम्हाला म्हाताऱ्यांना कांहीं कळतच नाहीं कारे ? अरे मूर्खांनो, तुमचे कान उपटायला कोणी नाहीं म्हणून शेफारलात का ? दोन थोबाडींत दिल्याबांचून तुमच रोमान्स नाहीं बाहेर निघायच ! म्हाताऱ्याची कुचेष्टा मांडलींत का कमिट्या काढून अस म्हटल म्हणजे नाहीं गोड वाटत. माझी तरी काय गरज पडली आहे ? पण या भटानं माग घोटा लावला म्हणून इथपर्यंत तरी आलो. माझीन् तुमची संगत दहा पांच वर्षाची; घ्या मला संभाळून. तुम्ही तरी मला भावासारखे, मुलासारखे, बापासारखेच अहा. जे बर वाईट मला वाटल तें बोलून टाकल. नसल रुचत तर माफ करा. "

याप्रमाणें सारांशानें भाषण झाल्यावर सभेचें काम पुढें चाललें व पुढें सभा बरखास्त झाल्यावर भिन्न भिन्न मतें ऐकूं येऊं लागलीं तीं " यांना आतां कांहीं दिवसांनीं डोक्याला पलिस्तर मारावयाची वेळ येणार हो येणार ! " " तुम्हाला सांगितल नाहीं ? हे अभद्र राजश्री; कांहीं तरी मजा करणारच स्वारी. "

[वर्ष ५, अंक ४४.]

एक वृद्ध पोलिटिकल आत्याबाई

विशेष बुद्धीवांचून बुद्धिवान्, विशेष कर्तृत्वावांचून कर्तृत्ववान्, विशेष विद्येवांचून विद्वान्, व विशेष देशाभिमानावांचून देशाभिमानी ज्याला स्वतःस म्हणवून घ्यावयाची इच्छा असेल त्यानें पुढें दिलेला एका वृद्ध पोलिटिकल आत्याबाईचा इतिहास मनापासून वाचावा, व तदनुसार वर्तन करावें. ही आत्याबाई पांच चार मोठमोठ्या ठिकाणीं राजकीय संसार करून प्रस्तुत मद्रपुरीं सामाजिक सुधारणेच्या मालेचे माणि ओढीत बसली आहे!

ह्या आत्याबाईचा विद्याभ्यास मद्रास कॉलेजांत झाला. पहिल्यापासून हिची स्मरणशक्ति चांगली असल्यामुळें हिला इंग्रजी भाषा चांगली आली. त्यामुळें कॉलेजांतील गुरूंचें हिच्यावर चांगलें प्रेम असे. ही मुळापासून स्वभावानें नम्र, भित्री व आज्ञाधारक असल्यामुळें हिचा कोणाला फारसा राग येत नसे! हिच्या बरोबरीच्या विद्यार्थिनींत व हींत बरेंच अंतर दिसून आल्यामुळें ही मागें पुढें मोठेपणास चढेल, असें हिचे कॉलेजस्थ गुरु पहिल्यापासून म्हणत असत. कर्मधर्मसंयोगानें गुरूंच्या भविष्यानुरूप व आशीर्वादानुरूप हिला अनेक वर्षें बऱ्याच मोठेपणाचा अनुभव झाला; व हिच्यांत कांहीं नैसर्गिक विलक्षण ओज असतें तर हींस उतारवयांत 'हरी हरी' म्हणत पडावें न लागतां, मरेपर्यंत वाढणारी कीर्ति संपादितां आली असती! हिला प्रथम त्रावणकोरच्या एका राजपुत्राच्या शिक्षकाची जागा मिळाली. लहानपणापासून या राजपुत्राचें शिक्षण हिच्या हातांत आल्यामुळें हिला त्यास आपल्या मनाप्रमाणें वळण लावितां आलें. कालांतरानें हा राजपुत्र त्रावणकोरच्या गादीवर आल्यावर त्यानें आपल्या गुर्विणीवद्दल आपली कृतज्ञता दाखविण्यासाठीं हींस आपल्या दिवाणाची जागा दिली. बरेच दिवस या नवीन स्थितींत गुरुशिष्यांचा चांगला मित्रभाव होता; पण शिष्या जसजसा मोठा होत चालला, व राजपण त्याच्या अंगीं खिळूं लागलें, तसतसा त्याला डोईजड गुर्विणीच्या अधिकाराचा तिटकारा येऊं लागला, व अखेरीस उभयतांचा बेबनाव होऊन गुर्विणीस दिवाणपद सोडावें लागलें असें म्हणतात. फार दूरच्या इसमांच्या वर्तनाविषयीं आमची हकीकत आहे, यामुळें ती अगदीं बिनचूक आहेच असें आमच्यानें म्हणवत नाहीं. तथापि ठोकळ मानानें ती बरोबर आहे, असें घेऊन चालण्यास हरकत नाहीं. त्रावणकोरचा संसार आटपल्यावर श्रीमंत तुकोजीराव

होळकर ह्यांचें सूनपण आमच्या आत्याबाईनें पत्करिलें. इंदुरास खडतर सासूच्या धाकांत हिला बराच सासुरवास भोगावा लागला. श्री. तुकोजीरावांनीं हिला फक्त सुबोध अर्ज लिहिण्याकरितांच दरमहा तीन हजार रुपये देऊन ठेविलें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. येवढें वेतन देण्यांत काटकसरी होळकरांचें म्हणण्यासारखें नुकसान झालें, असें आमच्यानें म्हणवत नाहीं. कारण आमच्या आत्याबाईंत नांव घेण्याजोगे दोन गुण आहेत ते हे कीं, हिला ईंग्रजी भाषा फार उत्तम लिहितां व बोलतां येते; व कोणत्याही कामाची जबाबदारी हिच्या डोक्यावर नसली, व तिच्यापासून हिचें नुकसान होण्याचा संभव नसला, म्हणजे धिटाईचे लेख लिहिण्यास ही डगणारी नाहीं. "मला महाराजांची अशी आज्ञा आहे", "महाराजांच्या हुकुमावरून मी असें म्हणतों कीं," "सरकारानें मला असें लिहिण्यास सांगितलें आहे कीं"–असें ज्या लेखांत लिहितां येण्याजोगें असेल त्या लेखांत दहापांच खरमरीत शब्द घालण्यास ही आपल्या जिवाचा धडा करूं शकते! होळकरशाहींत असतां हिनें लिहिलेल्या अर्जांपैकीं आम्हीं कित्येक अर्ज पाहिले आहेत, व ते प्रशंसा करण्यासारखे आहेत. तथापि या दरबारांत हिचें प्रस्थ मुळींच माजलें नाहीं, असें म्हणण्यास हरकत नाहीं. महाराजांच्या संमतीनें दहापांच कोर्टाफिर्टीची मांडामांड मात्र काय ती हिनें केली; व येथल्या जाचास ही लवकर कंटाळली. याच वेळाच्या सुमारास आतां आनरेबल पण तेव्हां मि० दादाभाई नवरोजी यांच्या हाताखालीं बडोद्यास एखादी जागा मिळण्याबद्दल हिनें अर्ज केला होता असें म्हणतात! पण पुढें लवकरच हिचें नशीब फळफळलें! मल्हारराव दुष्कर्माबद्दल पदच्युत करून मद्रास येथें नजरकैदेंत ठेविल्यावर श्री. सयाजीराव महाराजांस बडोद्याची गादी प्राप्त झाली, व त्यांच्या अज्ञानपणांत त्या गादीचें सर्व काम ह्या आत्याबाईवर सोंपविण्यांत आलें. श्रीमंत सयाजीराव महाराजांचें लग्न, त्यांचा राज्याभिषेक वगैरे मोठमोठ्या प्रसंगीं हिनें युरोपियन भटांची फार उत्तम तर्तूद ठेविली, व नेटिवांस कोपरखळ्या दिल्या, असें सर्वांचें म्हणणें आहे, त्याचा आम्ही येथें विचार करीत बसत नाहीं. तथापि हिला बडोद्यांतून बाहेर काढण्यापूर्वी इतकें सांगितलें पाहिजे कीं, बडोद्याचे पैसे बाँबे ब्यांकेंत ठेवणें, राजाचे हक्क कमी होतील अशा प्रकारच्या राज्यपद्धतीचा मसुदा करणें, व कांटिंजेंटबद्दल बडोदा संस्थानाला पक्का चट्टा बसेल अशा प्रकारें त्याची वाट लावणें–वगैरे भेकडपणाच्या, व धन्याच्या कल्याणाकडे पुरेसें लक्ष न पुरविण्याच्या दोषांतून आम्हांस हिला मुक्त करतां येत नाहीं! आतां कदाचित्

आपल्या तर्फेनें ही असें म्हणेल कीं, माझा सरखा स्वामी इंग्रज, म्हणून त्याच्या मर्जीप्रमाणें वागणें हेंच माझ्या सौभाग्याला अवश्य होतें, आणि म्हणून मी तशी वागलें, यांत माझा अपराध काय ? माझ्या जागीं दुसरी कोणी देशमुखीण असती तर तीही तशीच वागती ! मग माझ्यावरच इतके कां इतराजी होतां ? त्यावर आम्ही हिला इतकेंच म्हणतों कीं, " बुढ्ढे आते, तुझ्यासारख्याच साऱ्या स्वहित-परायण पोलिटिकल आता आहेत असें नाहीं. तूं वागलीस तशीच केवळ न वागतीस तर तुझ्या अन्नावर पाणी आलेंच असतें असें नाहीं. थोडा देशाभिमान मनांत बाळगून ज्याचें प्रत्यक्ष मीठ खात होतीस त्याच्या हिताकडे धीरानें व शहाणपणानें पहातीस तर तुझें म्हणणें कोणी न ऐकतें असें नाहीं; पण जें जें आर्य त्याचा तुला कंटाळा ! जें जें आंग्लभौम त्याचें तुला कौतुक ! स्वोत्कर्ष हा तुझा धर्म ! तेव्हां बडोद्याचे व इतर ठिकाणचे लोक तुला शब्दांनीं ताडीत आहेत, यांत त्यांच्याकडे कांहींएक बोल नाहीं. " असो; सयाजीरावमहाराज वयांत येऊन अधिकारारूढ झाल्यावर लवकरच हिला प्रयाणपरवाना मिळाला, व तेव्हांपासून ही मद्रासेस पडून आहे. बडोदें हें हिच्या राजकीय कारकीर्दीची चिता किंवा थडगें झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं ! सर सालरजंग परलोकवासी झाल्यावर हिचा हैदराबादेस पुनर्जन्म होईल अशी कित्येकांस आशा होती, पण सुदैवानें हिंदुस्थान सरकाराला हिला तेथें न नेमण्याची इच्छा झाल्यामुळें, मोंगलाईच्या कडव्या राजधानीच्या कपाळीं हिचें खरें थडगें होण्याचें आलें नाहीं, ही मोठ्या समाधानाची गोष्ट होय ! और्ध्वदेहिकांतर्गत तिळांजळी वगैरे सर्व वस्तूंचा स्वीकार केल्यावर ही आपल्या रुग्णलोकांस परत आली, व तेव्हांपासून वेड्या न् वाकड्या कल्पनांनीं व लेखांनीं आपलें समाधान करून घेत आहे. गेल्या वर्षी हिनें एक भयंकर राजकीय भाकित केलें होतें, व तें हटकून घडून येईल अशा हिला मोठी उमेद होती. पण सुदैवानें तसें कांहीं न होतां सगळा प्रकार तिच्या म्हणण्याविरुद्ध चालला आहे व तो बहुतेक इंग्रजांस व नेटिवांस पसंत आहे !

हिरातचा किल्ला इंग्रजांनीं घेऊन त्यावर आपलें सैन्य ठेवावें, नाहीं तर तो रशियानें आपल्या घशांत टाकला, अशी एके दिवशीं सकाळीं तार येईल, अशी या आत्याबाईची कल्पना होती ! तसेंच, रशियाच्या धामधुमीमुळें हिंदुस्थानांत गडबड न व्हावी एतदर्थ नेटिव संस्थानिकांच्या फौजा कमी कराव्या, आरवांचीं हत्यारें काढून घ्यावीं,–असल्या असल्या देशाभिमानाच्या जंगी कल्पना हिनें आपल्या

भाकितांत ब्रिटिश सरकारास सुचविल्या होत्या! इलबर्ट बिलाचा घोंटाळा माजून राहिला होता तेव्हां ही वृद्धा नेटिवांविरुद्ध! त्या प्रसंगीं आमच्या कोल्हापूरच्या वृद्धेनें सुद्धां हिच्या बोळक्यांत शेण घातलें!

येणेंप्रमाणें आमच्या आत्याबाईचा राज्यप्रपंच झाला! आमच्या मतें राज्यप्रपंच नीट रीतीनें चालविण्यास लागणारे बहुतेक गुण हिच्या अंगीं नाहींत. हिला स्वतंत्रपणें नेटिव संस्थानाची, त्याचें नुकसान न होऊं देतां, व्यवस्था पहाण्याचें शहाणपण नाहीं. श्रेष्ठ सासूच्या हाताखालीं सांगितलेलें व पडेल तें काम नीट करण्यास लागणारे बहुतेक गुण हिच्या अंगीं आहेत. बाहेरील व्यवस्था पाहणाऱ्या पुरुषानें मिळवून आणलेल्या जिनसांची माजघरांत व चुलीपाशीं मांडामांड करण्यांत ही फार कुशल आहे! राजे लोक बाहेर निघूं लागले म्हणजे त्यांचे शिपाई देखणे असावेत, व पोषाख सुरेख असावेत, गाड्यांच्या चाकांत चरबी घातलेली असावी, गव्हर्नरास किंवा गव्हर्नर-जनरलास भेटल्याबरोबर मुजरा करून किंवा करतां करतां थ्येकहांड करावा, मग प्रकृति कशी काय म्हणून विचारावें, अनेक वेळां यूअर एक्सलन्सी, थ्यांक यू असें म्हणावें, स्मश्रु करविल्याशिवाय व झुलपें कातरून मिशांचे आणि कल्ल्यांचे केस जिकडल्या तिकडे नीट बसविल्याशिवाय नेटिवांनीं, व विशेषतः नेटिव संस्थानिकांनीं, साहेब लोकांच्या भेटीस जाऊं नये...असल्या विकट महत्त्वाच्या गोष्टींबद्दल लांबलचक प्रोग्राम (व्यवस्थापत्रकें किंवा कर्तव्यलेख) काढण्यांत, या आत्याबाईचें हातखंडे काम आहे. अशा प्रकारचे हिच्या हातचे एकदोन प्रोग्राम आम्हीं प्रत्यक्ष पाहिले आहेत, आणि म्हणूनच आम्हांस यासंबंधानें इतक्या खात्रीनें लिहितां चेत आहे. ही मद्रासेंत पडून राहिल्यापासून एका टोपण नांवाखालीं समाजसुधारणेवर स्फुट चुटके लिहित असते. या चुटक्यांत एकेकदां हिच्या मेंदूंतून जे जे तारे सुटतात, त्यांच्या दुःसह प्रभेनें वाचकांचे ज्ञानचक्षु दिपून जाऊन ते घाबरून जातात, व अशी अद्वितीय पुतळी परमेश्वरानें हिंदुस्थानांतच निर्माण केली म्हणून त्याचें स्तवन करूं लागतात! "आगगाडीच्या डब्यांत वाचल्यानें दृष्टि बिघडते", "वारंवार दूरदूरचे पदार्थ पाहिल्यानें दूरदूरचे पदार्थ स्पष्ट दिसूं लागतात", "यात्रेच्या जागीं गर्दी होऊन हगवण वगैरे रोगांच्या सांथी उत्पन्न होतात, यासाठीं यात्रेकरूंनीं रोज सकाळीं बारा तुळशीचीं व बारा बेलाचीं पानें घेऊन त्यांचा चहा करावा व त्यांत दूध साखर घालून तो घ्यावा म्हणजे प्रकृति

साफ राहील", "नदीच्या घांटावरून माणसें घसरून जाऊन नदीच्या पात्रांत दगावतात, यासाठीं घांटच्या तोंडाशीं लोखंडाचे कठडे घालावे, पात्रांत बुडणा-रांच्या सोईसाठीं एक लांबच्या लांब कांच घालून ठेवावी, किनाऱ्यावर आंकडया व दोऱ्या तयार ठेवाव्या, घांटावर एखादी समाध किंवा देऊळ असल्यास त्यावर बुडालेल्या मनुष्यास जीव आणण्यासाठीं काय उपाय करावे याच्याबद्दल जाहिरनामा लावून ठेवावा, पाण्यांत एखादें होडगें तयार ठेवावें, व जे बुडणारास तारतील त्यांस बक्षिसें व मानपत्रें द्यावीं," "चुलींत ओलीं लांकडें घातल्यानें डोळे दुखतात व नाकांतून पाणी वाहूं लागतें, यासाठीं कोरडीं लांकडें घालावीं, व त्यांच्याखालीं राख पडण्यासाठीं व खालून विस्तवास वारा लागण्यासाठीं भोंकदार पत्रा बसवावा," "तरुण ग्राजुएटांनीं राजकारणांत पडूं नये, तर तें वृद्ध आत्या-बाईसारख्यांसाठीं अस्पृष्ट राहूं द्यावें," "बर्डे पोट कित्येक प्रांतांत सौंदर्याचें किंवा गांभीर्याचें चिन्ह समजतात, पण ती चूक आहे; बर्डे पोट पुष्कळदां भविष्यन्मधु-मेहाचें पूर्वचिन्ह असतें," "बायकांनीं दांतवण लावूं नये, कारण त्यानें त्यांचे दांत काळे पडतात," "बायकांच्या चोळ्यांस खिसे किंवा कप्पे लावण्याची चाल पडणें फार अगत्याचें आहे!" वगैरे "नेटिव थिंकरच्या" ऊर्फ आमच्या वृद्ध आत्या-बाईच्या सामाजिक सुधारणाविषयक विचारांचें किंचित् दिग्दर्शन आज केलें आहे. त्याचा वाचकांस कंटाळा न आल्यास पुढें त्याचा विस्तार करूं.

[वर्ष ५, अंक ४५.]

कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे

कित्येक गोष्टी अशा आहेत कीं, त्या सर्वांस माहीत असतां व त्यांची अवश्यकता प्रत्येक दिवशीं सर्वांच्या अनुभवास येत असतां त्याबद्दल कोणी कोणाशीं बोलत नाहीं. याचें कारण असें आहे कीं, त्या गोष्टी पुरातन जनरूढीविरुद्ध आहेत. सर्व भयांमध्यें लोकापवादाचें भय मोठें प्रबल. यापुढें सुधारणेचा झेंडा लावणाऱ्या महावीरांच्या कंबरा बसतात. असें जरी आहे, तरी ज्या गोष्टींपासून सतत नुकसान होत आहे असें वाटतें, अशा, कोणी तरी (भीत भीत कां होईना) लोकांच्या विचारापुढें आणिल्याच पाहिजेत. ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्र, वैश्य हे चार वर्ण फार पुरातन आहेत याबद्दल कोणासही संशय येणार नाहीं. या चार वर्णांचा परस्परांशीं अन्नोदकव्यवहार होत असे इतकेंच नाहीं, तर ब्राह्मणांनीं क्षत्रियकुलांतील मुली करणें सशास्त्र असल्याबद्दल ग्रंथांतरीं अनेक आधार सांपडतील. तथापि प्रकृत प्रसंगीं या प्रश्नाशीं आम्हांस कांहीं एक करावयाचें नाहीं. याचा हा येथें स्फुट उल्लेख केला, याचें कारण इतकेंच कीं, ज्या वर्णांचा अलीकडे अन्नव्यवहार देखील बंद झाला, त्या वर्णांमध्यें पूर्वी परस्परविवाह सुद्धां होत असत. पण कालगत्या अनेक कारणांनीं या चार वर्णांचा हरएकप्रकारचा संबंध अलीकडे तुटला, व तो न होण्याविषयीं निषेधपरवाक्यें धर्मशास्त्रांत किंवा इतर ठिकाणीं सांपडतील. असो, झालें तें झालें. याबद्दल आमचें कांहीं म्हणणें नाहीं. पण देशस्थ, कोंकणस्थ आणि कऱ्हाडे यांच्यामध्यें अन्नव्यवहारादि सर्व गोष्टी चालू असतां विवाहनिषेध कसा झाला हा प्रश्न मोठा विचारार्ह आहे. या निषेधास कोठें शास्त्रांतरीं आधार सांपडेल असें आम्हांस वाटत नाहीं. कोणाच्या कोठें कांहीं पाहण्यांत आला असल्यास त्यांनीं कृपा करून आम्हांस कळवावा. कसेंही असो, हा निषेध दिवसेंदिवस फारच अहितकारक होत आहे हीं गोष्ट कोणाही निःपक्षपाती विचारी मनुष्याच्या लक्षांत आल्याखेरीज राहणार नाहीं. देशस्थ, कोंकणस्थ आणि कऱ्हाडे यांच्यामध्यें परस्परविवाहाची चाल पडल्यास अनेक प्रकारें हित होणार आहे. देशस्थ आणि कऱ्हाडे यांच्यांत कोठें कोठें लग्नें होतात, व त्यांबद्दल कोणी कोणास दोष देत नाहीं; असें असतां देशस्थ व कोंकणस्थ आणि कऱ्हाडे यांचेंच या बाबतींत कां पटूं नये ! हें मिथ्या बंड मोडून जाऊन या तिन्ही वर्गांचा परस्परांशीं लग्न-

संस्कार होण्यास खुला रस्ता पडावा असें पुष्कळांच्या मनांत आहे. पण पहावें तों धीर करून लोकांपुढें असें स्पष्ट म्हणून दाखविण्यास कोणीच हिय्या करीत नाहीं, ही मोठी दुःखाची गोष्ट होय !

'ज्याला मुलगी झाली, तो पापी' असा कित्येक लोकांत समज आहे, तो अगदींच भ्रांतिमूलक आहे असें आमच्यानें म्हणवत नाहीं. कारण बालविवाहाची चाल अजून सर्वत्र अमलांत असल्यामुळें वधूवरांची गांठ बांधणें सर्वथैव उभयतांच्या मातापितरांवर अवलंबून असतें. असें असल्यामुळें ज्या मनुष्यास ईश्वररूपेनें आपल्या पदरीं पडलेल्या मनुष्यांचें कल्याण करणें आपलें कर्तव्यकर्म आहे असें वाटतें, अशाला मुलगी होणें म्हणजे पाप नव्हें तर काय ? पाप पाप तें करतें काय ? पापी मनुष्याला तें सुख होऊं देत नाहीं. अमुक एका व्यक्तीचें बरें वाईट झाल्याबद्दल माझ्यावर जबाबदारी आहे, असें मानणाऱ्यास मुलगी चांगल्या ठिकाणीं पडून नांदूं लागेपर्यंत केवढी टोंचणी असते, हें येथें विशेष व्यक्त करण्याची गरज नाहीं. कऱ्हाड्यांची जात थोडी; यामुळें परस्परांना योग्य अशीं स्थळें मिळण्याची त्यांच्यांत फारच मारामार पडते. देशपरत्वें कालमानानें कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे यांना कित्येक गुण एकमेकांपासून शिकण्यासारखे व कित्येक अवगुण एकमेकांकडे पाहून टाकण्यासारखे आले आहेत. ही गोष्ट तडीस जाण्यास या तीन वर्गांचा परस्पर लग्नसंबंधच सुरू झाला पाहिजे. परोपकार, दातृत्व, औदार्य, या गुणांत कोंकणस्थांना देशस्थांचें अनुकरण करणें थोडेंसें अवश्य आहे असें म्हटल्यास फारसा बाध येईल असें वाटत नाहीं. देशस्थांनाही कोंकणस्थांपासून स्वच्छपणा, उद्योगीपणा, धाडसपणा, मितव्यय वगैरे गुण घेण्यास वाईट वाटूं नये. कऱ्हाडे साधारणपणें दोघांच्यामध्यें पडतील असें वाटतें. तथापि दोघांनाही कऱ्हाड्यांची टापटीप शिकणें जरूर आहे. तीन वर्गांचा लग्नसंबंध होत नसल्यामुळें कित्येक वेळीं केवळ अडचणीमुळें विवाहसंबंधानें बद्ध अशीं स्त्रीपुरुषांचीं अगदीं विसंगत जोडपीं दृष्टीस पडतात. थोरामोठ्यांच्या रूपसंपन्न कुलीन कन्या निर्द्रव्य, कुरूप, अक्षरशत्रू, अशा पुरुषांच्या पदरीं पडाव्या हें किती खेदकारक आहे बरें ? पण अशीं उदाहरणें थोडीं आहेत काय ? विद्यासंपन्न, रूपसंपन्न, द्रव्यसंपन्न, अशा कुलीन गृहस्थांस आईबापांनीं करून दिलेल्या वेड्यावांकड्या बायकांशीं आपलीं आयुष्यें कंठावीं लागत नाहींत काय ? त्याचप्रमाणें रूपवती आणि कुलीन मुली,

मूर्ख, रोगग्रस्त आणि निर्धन पुरुषांच्या पदरीं पडल्यामुळें कपाळास बोट लावून प्रारब्धास दोष लावितांना आपण पाहत नाहीं काय ?

अशी स्थिति आपल्या डोळ्यांपुढें असून विचार न करतां स्वस्थ बसणें हें आपणांस मोठें दूषणास्पद होय. वधूस अनुरूप वर मिळण्यास, ज्यांतून वर पसंत करावयाचा त्यांची संख्या मोठी पाहिजे. अनुरूपत्व फक्त वयाच्या किंवा पेशाच्याच संबंधानें पहावयाचें नाहीं. गुण, रूप, कुल, विद्या, स्वभाव इत्यादि संबंधानें सुद्धां अनुरूपत्वाचा विचार करणें फार जरूर आहे. यासाठीं कोंकणस्थ, देशस्थ, आणि कऱ्हाडे यांचीं परस्परांशीं जर लग्नें होऊं लागलीं तर केवढी मजा होईल !! एका मुलीचें लग्न करावयाचें असलें तर या तीन वर्गांतील मुलांतून वराची योजना करण्यास सांपडेल; पांचपंचवीस मुलांत मनास येण्याजोगा मुलगा सांपडण्याचा जो संभव आहे त्यापेक्षां शेंदोनशेंत तो अधिक आहे. असें झाल्यानें उभयतां स्त्री-पुरुषें सुखी होतील इतकेंच नाहीं, तर उभयपक्षीं मातापितरें निष्काळजी होतील व मुलाबाळांचें संगोपन चांगल्या रीतीनें होऊन पुढली पिढी सुखी होण्याचा संभव आहे. जसें मूळ तशी नक्कल. उभयतां मातापितरेंच विद्याशील, सद्गुणी आणि रूपसंपन्न असल्यावर दुर्गुणी व कुरूप संतति होण्याचा संभवच नाहीं. पण अशा प्रकारें स्वतः सुखानें राहून आईबापांस आनंद देणारी व देशास भूषणास्पद अशीं स्त्रीपुरुषांचीं द्वंद्वें कोंकणस्थ, देशस्थ आणि कऱ्हाडे हे त्रिवर्ग एकत्र केल्याशिवाय फार कोठून सांपडणार ?

बरेच दिवसांपासून देशस्थांची व कोंकणस्थांची असावी तशी मैत्री जमत नाहीं. इतिहासावरून कधीं कधीं दोघांमध्यें अधिकाराच्या संबंधानें तंटा झाल्याचें आढळून येतें. हें द्वैत मोडून टाकण्याविषयीं श्रीमंत पेशवे यांनीं स्वतः कऱ्हाडयांच्या आणि देशस्थांच्या मुली करून घेऊन खटपट केली होती. त्या वेळेचे महाविख्यात पण्डित वे. शा. संपन्न रामशास्त्रीबोवा यांचेंही मत तसेंच होतें. दुर्दैवानें पेशव्यांचें राज्य फार दिवस राहिलें नाहीं व त्यामुळें हें इष्ट कार्य सिद्धीस गेलें नाहीं, हें फार शोचनीय होय. पण सर्वजण मनावर घेतील तर ही गोष्ट तडीस जाणें अगदीं दुरापास्त आहे, असें आम्हांस वाटत नाहीं.

मागील निबंधांत या तीन शाखांच्या ब्राह्मणांमध्यें लग्नव्यवहार सुरू झाल्यापासून होणाऱ्या फायद्यांचें आम्हीं थोडेसें दिग्दर्शन करून शेवटीं असें सुचविलें आहे कीं,

या गोष्टीपासून शरीर दृढ होण्याचाही फार संभव आहे. तो कसा, हें आतां सांगितलें पाहिजे. सर्वांच्या पहाण्यांत आहेच कीं, मुलांची प्रकृति, शक्ति, स्वभाव, शरीर व मानसिक रचना हीं बहुधा आईबापांच्या प्रमाणेंच असतात. ह्यांपैकीं कांहीं गोष्टी बापाकडून व कांहीं आईकडून प्राप्त होतात. ही गोष्ट फार प्राचीनकाळापासून सर्वमान्य असल्यामुळें व 'प्रजामनुप्रजायसे' इत्यादि श्रुतिवाक्यांवरून व 'एतत् षाट्कौशिकं शरीरं त्रीणि मातृतस्त्रीणि पितृतः । अस्थिस्नायुमज्जानः पितृतः । त्वङ्मांसरुधिराणि मातृतः' इत्यादि गर्भोपनिषदांतील वाक्यांवरून निर्विवाद झाली आहे. ह्यावरून उघड आहे कीं, मातापितरांस जर कांहीं शारीरिक किंवा मानसिक विकार असतील तर ते विकार मुलांमध्यें देखील प्रकट होतील. आणखी असा एक नियम आहे कीं, आईबापांपैकीं एकास जर एखादा विकार असेल तर तो कदाचित् मुलांस प्राप्त होईल किंवा न होईल, परंतु जर तोच विकार दोघांमध्येंही असेल तर मुलांस हटकून प्राप्त झालाच असें समजावें. यावरून नवराबायकोची एकच प्रकृति नसणें किती अवश्यक आहे हें उघडच आहे; कारण दोघांचीही जर कदाचित् कफप्रकृतीच असेल तर मुलांना जन्मापासून अंतकालपर्यंत खोकला, दमा इ० कफविकार जडून राहतील; दोघांचीही वातुल प्रकृति असल्यास ती मुलांमध्यें फार वृद्धिंगत होईल, व उभयतांत पित्ताधिक्य असल्यास मुलांमध्यें पित्तप्रकोप अतोनात होईल. आईबापांपैकीं एकलाच जरी मूळव्याध, उन्माद किंवा कुष्टविकार असला तरी मुलांपैकीं एकाला तरी तो बहुधा प्राप्त झाल्यावांचून रहात नाहींच, मग ते विकार जर उभयतांना असतील तर काय दशा होईल ती सांगावयासच नको. एकाच घराण्यांतील मनुष्यांची प्रकृति बहुधा एकाच तऱ्हेची असते. कारण, ती एकाच मूळपुरुषाची संतति असल्यामुळें व त्यांचे आहारविहार बहुधा सारखे असल्यामुळें, मूळ पुरुषाच्याच प्रकृतीची प्रतिमा कमीजास्ती प्रमाणानें सर्वांत उतरलेली असते. मूळ प्रकृति, मूळ स्वभाव, व मूळ रचना यांचा वंशपरंपरेनें थोड्याबहुत प्रमाणानें चालू राहाण्याचा जो धर्म तो इतका स्थिर आहे कीं, हजारों पिढ्यांनंतर देखील तो आपलें अस्तित्व थोडेंसें तरी प्रकट केल्यावांचून रहात नाहीं. ही गोष्ट आमच्या विचारी पूर्वजांच्या मनांत पूर्णपणें बिंबली असल्यामुळें मनुयाज्ञवल्क्यादि स्मृतिकारांनीं लग्नाच्या बाबतींत पहिला नियम असा कठिण घालून ठेविला आहे कीं, ज्या स्त्रीशीं आपल्यास विवाह करावयाचा असेल ती आपल्याशीं सपिंड नसावी

एवढेंच नव्हे, तर ती आपल्या गोत्रांतील देखील नसावी. लग्नसंबंधीं इतर नियम कदाचित् टाकतां येतील, व कारणपरत्वें लोक त्यांचा अतिक्रम करितात, परंतु हा नियम अगदींच अलंघनीय आहे. पहा, कांहीं कांहीं प्रसंगीं आपल्या पूर्वजांचे विचार किती सूक्ष्म असत! जामदग्न्य गोत्रांचे जितके लोक आज आढळतात, तितके सारे जमदग्निऋषीच्या वंशांतले. हें द्वापार युगांतील नातें जें आजपर्यंत आम्ही पाळीत आलों आहों, तें या मन्वादिकांच्या कठिण वाक्यामुळें; व हा कठिण नियम वर सांगितलेल्या शारीरसंबंधी माहितीनें त्यांनीं स्थापिला आहे. असो, यावरून एवढेंच लक्षांत आणिलें पाहिजे कीं, एकाच प्रकृतीच्या वधूवरांची गांठ जेणेंकरून पडणार नाहीं, असा एक उपाय आपल्या समजुतीप्रमाणें पुरातन ऋषींनीं शोधून काढला. ज्याप्रमाणें एकाच घराण्यांतील मनुष्यांची प्रकृति बहुधा सारखी असते, त्याचप्रमाणें एकाच देशांतील लोकांच्या प्रकृतीमध्यें हवा, पाणी, आहार, विहार, यांच्या समानतेमुळें एक प्रकारचें साम्य असतें. उदाहरणार्थ, उत्तर हिंदुस्थानांतील भय्ये लोकांची तापट पित्तप्रकृति, कोंकणांतील लोकांची सौम्य व कफप्रकृति, मावळे लोकांची तीव्र व वातप्रकृति इ० तसेंच रत्नागिरीकडच्या कोंकणस्थांच्या बायकांचे घारे, पिंचके व अधू डोळे; कारवार प्रांतांतील फिकट चेहरे, इत्यादि उदाहरणांवरून तद्देशीय लोकांचें प्रकृतिवैलक्षण्य सिद्ध होतें. हें जर खरें आहे, तर एकाच कुलांतील लोकांचा परस्परविवाह झाल्यानें एकाच प्रकृतीचा मेळ मिळून ती प्रकृति संततीमध्यें विकोपास जाण्याचा जसा संभव असतो, तसेंच एकाच प्रांतांतील किंवा हवेंतील लोकांचे विवाहसंबंध शेंकडों वर्षें तेथल्या तेथेंच घडूं लागतील तर तद्देशीय लोकांचे वर सांगितलेले दोष किंवा विकार कधींही निर्मूळ व्हावयाचे नाहींत, एवढेंच नव्हे, तर ते उत्तरोत्तर वंशपरंपरेनें फार जोरानें वृद्धिंगत होत जातील; परंतु जर तेच विवाहसंबंध दुसऱ्या हवेंतील लोकांशीं होऊं लागले तर त्या त्या लोकांचे विचार व दोष वंशपरंपरेनें चालू न होतां कालांतरानें त्यांचा समूळ नाश होण्याचा संभव आहे. वर सांगितलेले दोष तद्देशीय लोकांचींच वतनें कां होऊन राहिलीं आहेत, याचें कारण विचारांतीं सहज लक्षांत येण्याजोगें आहे. कल्पना करा कीं, कांहीं शतकांपूर्वी ब्राह्मणांची एक टोळी कोंकणांत जाऊन राहिली, व दुसऱ्या एका टोळीनें देशांत वसाहत केली, त्यावेळेस दळणवळण कमी असल्यामुळें कोंकणांतील लोकांस देशांत किंवा देशावरील लोकांस कोंकणांत आपल्या मुली देणें फार कठीण पडे, व त्यामुळें त्यांना आपापल्यांतच विवाहसंबंध

करावे लागले. आतां जे लोक कोंकणांत जाऊन राहिले, त्यांचे प्रकृतीवर कांहीं पिढ्या लोटल्यावर तेथील हवा, पाणी, आहारविहार इत्यादिकांचा संस्कार घडून आला.

डोळ्यांचा अधूपणा हा ह्या परिणामांपैकींच. विवाहसंबंध तेथल्या तेथेंच होत असल्यामुळें, उभय स्त्रीपुरुषांमध्यें एकाच दोषाचा योग जमून येऊन तो दोष वंशपरंपरेनें वाढत जाऊन कांहीं पिढ्यांनंतर सर्वत्र कायम होऊन राहिला. असो; याप्रमाणें निरनिराळ्या प्रांतांतील लोकांच्या प्रकृतीमध्यें कांहीं तरी एक विशेष प्रकार कायमचाच होऊन राहतो. दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवण्याजोगी ही कीं, जरी एका प्रदेशांतील लोक पुढें कांहीं दिवसांनीं दुसऱ्या प्रदेशांत गेले तरी पुष्कळ वर्षांपर्यंत त्यांच्या मूळप्रकृतींत फरक पडत नाहीं. कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे असे जे तीन भेद आहेत, ते मूळारंभीं देशपरत्वें झाले आहेत, हें त्यांच्या नांवावरून उघड आहे. आरंभीं हे लोक ज्या ज्या प्रदेशांत होते त्या त्या प्रदेशाच्या स्थितीप्रमाणें त्यांच्या प्रकृतीमध्यें फरक उत्पन्न झाले आहेत, व जरी सांप्रत ह्या तिन्ही शाखा एकाच प्रदेशांत पसरल्या आहेत, तरी बारकाईनें पाहूं गेल्यास मूळारंभीं देशपरत्वें उत्पन्न झालेला भेद त्यांजमध्यें अद्यापि आढळतो; व ह्या दृश्य भेदावरून त्यांच्या प्रकृतीमध्येंही मूळारंभीं हवापाणी इत्यादि कारणांनीं उत्पन्न झालेला भेद अजून कायम असावा असें अनुमान करण्यास जागा आहे. हें जर खरें आहे, तर ह्या तिन्ही शाखांमध्यें परस्पर विवाहसंबंध सुरू केल्यानें शरीर सुदृढ होण्याचा किती संभव आहे बरें ? ही गोष्ट वाचकांच्या मनावर चांगली ठसण्याकरितां आम्ही येथें दोन प्रकारचीं उदाहरणें देतों. युरोपियन व हिंदु यांच्या शरीरसंबंधापासून जी युरेशियन नांवाची प्रजा झाली आहे, ती मूळच्या दोन्ही जातींपेक्षां फार सुदृढ आहे असें पुष्कळांचें म्हणणें आहे. ह्या उदाहरणावरून भिन्नजातीय म्हणजे भिन्न प्रकृतीच्या लोकांच्या संसर्गापासून जी संतति होते, ती सुदृढ असते, हें सिद्ध होतें. आतां याच्या उलट ज्या लोकांमध्यें जवळच्या आप्तप्रमाणें शरीरसंबंध करण्याची चाल आहे, त्या लोकांमध्यें अशा संबंधापासून जी संतति होते, ती फार क्षीण व अनेक घोर व्याधींनीं ग्रस्त असते, असें मुंबईतील पारशी लोकांमध्यें व मुसलमानांमध्यें पाहाण्यांत आलें आहे. मुंबईतील कांहीं श्रीमान् पारशी घराण्यांमध्यें भाचाला किंवा पुतण्याला देखील मुलगी देण्याचा परिपाठ आहे; व अशा ठिकाणीं जी संतति झाली आहे, तिजमध्यें मज्जातंतूचे किंवा मेंदूचे विकार फार विलक्षण नऱ्हेचे नेहमीं आढळण्यांत येतात, असें आम-

च्या एका स्नेही डाक्तराचें म्हणणें आहे. तसेंच शहरांतल्या शहरांतच जे शरीरसंबंध घडतात, त्यापासूनही क्षीणसंतति होते असें पाहण्यांत आहे. याचें कारण असें कीं शहरांतील हवा, पाणी, आहार, विहार कांहीं निराळ्याच तऱ्हेचे असतात, म्हणून तेथील लोकांची प्रकृति खेड्यांतील लोकांच्या प्रकृतीपासून भिन्न तऱ्हेची असते (म्हणजे शहरांतील लोकांच्या प्रकृतींमध्यें कांहीं तऱ्हेचे दोष उत्पन्न झाले असतात). हे दोष नेहमीं तेथल्या तेथेंच विवाहसंबंध केल्यानें संततीमध्यें वृद्धि पावतात. ह्या दोन्ही प्रकारच्या उदाहरणांवरून वरील नियम सिद्ध होतो, तो हा कीं, दोन्ही वधूवरांमध्यें एकच विकार बीजदशेमध्यें किंवा परिपक्वदशेमध्यें असल्यास तो वंशपरंपरेनें चालण्याचा फार संभव आहे, व तोच विकार एकांत असून दुसरा त्याजपासून मुक्त असून सुदृढ असल्यास त्यांची संतति बहुधा निर्दोष असते. ह्या नियमाचा उपयोग करून घेणें असल्यास कोंकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे यांच्यामध्यें परस्पर विवाहसंबंध सुरू करण्याविषयीं सर्वांनीं झटावें असें आमच्या देशबांधवांस आम्ही नम्रतेनें सुचवितों.

[वर्ष १, अंक २१.]

व्यायाम

प्रत्येक मनुष्यानें विशेषतः ज्या दोन गोष्टींकडे लक्ष दिलें पाहिजे त्या ह्याः मानसिक श्रम फार झाल्यानंतर मनाला विश्रांति देणें व शारीरिश्रम फार झाल्यानंतर शरीराला विश्रांति देणें. शरीर आणि मन यांचा परस्परांशीं फारच निकट संबंध आहे हें सांगण्यास नको. 'शरीर सुखी तर मन सुखी आणि मन सुखी तर शरीर सुखी' हा नियम प्रत्येकाच्या अनुभवांतला आहे, तरी याचें पुष्कळांकडून प्रत्येक दिवशीं उल्लंघन होत आहे. हें खरें आहे कीं, केवळ शरीरसामर्थ्यसंपादनाकडेच सामान्य लोकांस सर्व लक्ष पुरवितां येत नाहीं, व तसें करून फायदाही नाहीं. मोठमोठ्या तालीमबाजांच्या किंवा कसरतवाल्यांच्या हातून मानसिक श्रम होणें नाहीं; किंवा डोक्यास पाण्याच्या पट्ट्या लावून व पाय पातेल्यांत बुचकळून, एक डोळा उघडा ठेवून, एका डोळ्यानें झोंप घेत अभ्यास करणाऱ्या ऐग्लंदीय, शार्मण्य किंवा भारतीय तत्त्वशोधकाच्यानें नाथगारा नदीच्या दोन कांठीं पुरलेल्या खांबावर टाकलेल्या दोरीवरून दुचाकी गाडी चालविण्याचा किंवा त्याच दोरीवर उभें राहून धबधब्याकडे पहात पहात टेबलखुर्ची मांडून चहा करून पिण्याचा प्रयत्न कधींही होणें नाहीं. पराकाष्ठेचा शारीरश्रम व पराकाष्ठेचा मानसिक श्रम या दोन गोष्टी परस्परविरोधी आहेत. या दोहोंची एकाच व्यक्तिमात्रांत कधींही गांठ पडावयाची नाहीं; तथापि अतिशय शरीरश्रम करणाऱ्यास साधारण ज्ञान संपादण्याची अडचण नाहीं, व अतिशय मानसिक श्रम करणाऱ्या तत्त्ववेत्त्यास आरोग्यरक्षणापुरते शारीरश्रम करणें अवश्य आहे. या साधारण नियमाकडे जितकें लक्ष असावें तितकें लक्ष आमचे लोक देत नाहींत, ही मोठी शोचनीय गोष्ट होय. पूर्वीपासून सुखवस्तु लोकांस आमच्या देशांत शारीरश्रमाची चटक कमी असें म्हणण्यास फारसा बाध येईल असें वाटत नाहीं. श्रीमंतांस शारीरश्रम करणें म्हणजे कांहींसें नीच वाटे, व अजूनही वाटतें. पूर्वी नमस्कार घालणें, सायंकाळीं देवदर्शनास जाणें वगैरे फार स्तुत्य चाली होत्या, व त्यामुळें कांहीं व्यायाम होऊन नित्य नमस्कार घालणाऱ्यांची व देवदर्शनास जाणाऱ्यांची प्रकृति बरी राही. पण सारेच लोक असे कोठें करीत ! पुष्कळांचीं मनरंजन करण्याची तऱ्हा फारच वेगळी असे. नित्यव्यवसाय आटपल्यावर पुष्कळ लोक गंजिफा व बुद्धिबळें खेळण्यांत, किंवा सोंगट्यांचे डाव चालविण्यांत, सतारी वाजविण्यांत, तसेच फारच श्रीमंत जे असत ते नाचबैठकी वगैरे करण्यांत आपला काळ घालवीत.

असो, हे खेळ अगदीं पिटाळून लावावे, व त्यांचें नांवही काढूं नये; किंवा वाद्यनृत्य-संगीतादि कला अगदीं नाहींशा करून टाकाव्या असें आमचें म्हणणें नाहीं; तरी सर्व सुखास अवश्य जें आरोग्य तें असण्याची सर्वांनीं काळजी घेतली पाहिजे व सुदैवानें ज्यांस पोटासाठींच शरीर झिजवावें लागत नसेल, त्यांनीं अन्नपचन होऊन रक्तचलन चांगलें चालण्यासाठीं व्यायाम करणें अवश्य आहे.

हे वरील विचार निर्विवाद असतां, व त्यांजकडे योग्य लक्ष न दिल्यामुळें झालेले भयंकर परिणाम सर्वांच्या डोळ्यापुढें असतां, आरोग्यवर्धक शारीरश्रम करण्याची अभिरुचि लोकांस कशानें लागेल ही गोष्ट मोठी विचारार्ह आहे. गेल्या दोनतीन वर्षांत शारीरश्रमाकडे दुर्लक्ष केल्यामुळें आपल्या दीर्घ मानसिक श्रमानें संपादिलेल्या मोठमोठ्या पदव्यांचा थोडे दिवस देखील उपभोग न घेतां आपल्या मातापितरांस व प्रियपत्नीस दुःखार्णवांत टाकून कित्येक विद्वान् अकालीं स्वर्गस्थ झाले, ही केवढी दुःखाची गोष्ट!! मनुष्यास अनेक कारणांनीं मरण येतें ही गोष्ट जरी सर्वमान्य आहे, तरी क्षीण शरीरांवर व्याधींचा अंमल लवकर बसतो, व तशीं शरीरें तेव्हांच काळाच्या जबड्यांत पडतात, हें कोण विचारी पुरुष कबूल करणार नाहीं? महत्पदाची आकांक्षा असणें हें श्लाघ्य होय. पण दीर्घपरिश्रमसंपादित महत्पदाचा किंचित् कालपर्यंतही उपभोग घेतां येऊं नये हें किती शोचनीय! ही एक व्यवसायनिरति किती निंद्य? असो; अलीकडे निराळ्या तऱ्हेचें शिक्षण मिळूं लागल्या कारणानें नवीन पिढीच्या धर्मविचारांत मोठीच क्रांति होत आहे ही गोष्ट प्रत्येक विचारी मनुष्याच्या नजरेस येण्याजोगी आहे. सूर्यास प्रातःकाळीं नमस्कार घालण्याची किंवा सायंकाळीं देवदर्शनास जाण्याची चाल नवीन लोकांतन दिवसेंदिवस मुळींच जात चालली व तिच्या जागीं इंग्रजी रिवाजाप्रमाणें हवा खाण्यास जाण्याचा बराच प्रघात पडला आहे, व त्यांत दोष काढण्यासारखें कांहीं नाहीं; आणि या प्रघाताचा उत्तरोत्तर प्रसार होईल तितकें चांगलेंच. पण पायांनीं व्यायाम करण्यानें अल्पकाळांत जितकें हित व्हावें तितकें होत नाहीं. व्यायाम असा असावा कीं, तो थोडा काळ केला तरी अंगांत चांगली उष्णता उत्पन्न होऊन सर्व अवयव एकसारखे दृढ व्हावे. हा हेतु कांहीं अंशीं साधारण पळण्यानें तडीस जाईल. पण संध्याकाल झाला कीं रस्त्यारस्त्यानें आपलें सगळ्यांनीं पळत सुटावें हें कोणास आवडणार नाहीं. यासाठीं इंग्रज लोकांतील क्रिकेट कंपन्याप्रमाणें "खो खो" किंवा "विटीदांडू" किंवा "मुर्दुंगपाट्या" खेळण्यासाठीं

लहानमोठ्या लोकांनीं एकत्र जमण्याची चाल पाडली तर फार बरें होईल असें वाटतें. या खेळांनीं थोड्या वेळांत चांगली मेहनत होते व अंगांत हुशारी येते. निरनिराळ्या हुद्यांची मंडळी उच्चनीचत्वाचा भाव एकीकडे ठेवून एकत्र जमल्यानें त्यांच्यांत चांगली मैत्री होऊन प्रेमवृद्धि होण्याचा फार संभव आहे. तसेंच निरनिराळ्या खात्यांतील मंडळी एकत्र झाल्यानें सहज बोलतां बोलतां पुष्कळ गोष्टींचें ज्ञान होण्याचाही संभव आहे. अशा प्रकारचे खेळ खेळण्याच्या उद्देशानें एके ठिकाणीं आल्यामुळें एकांतच दोन कामें होतात. एकीकडे व्यायाम आणि एकीकडे मंडळी आणि अशापासून होणारे फायदे. इंग्लंद देशांत आणि युरोपांतील इतर देशांत शहरोंशहरीं काफी पिण्याचीं घरें झालीं आहेत, तेथें वर्गणी देऊन मोठमोठे विद्वान् ग्रंथकर्ते, कल्पक नाटक–आणि–कादंबरीकर्ते, समयानुरूप खुबीदार भाषणकर्ते, राज्यकार्यनिष्णात मोठमोठे राज्याधिकारी–अशा प्रकारची अनेक तऱ्हेची व लहानमोठ्या योग्यतेची मंडळी एकत्र जमते. असें जमण्याची चाल युरोपखंडांत अगदीं सर्वसाधारण आहे. तसेंच युरोपखंडांत मोठमोठ्या शहरांतून सार्वजनिक उद्यानें आणि विनोदस्थानें आहेत, त्या ठिकाणीं आनंदानें हवा खाण्यास व व्यायाम करण्यास स्त्रीपुरुषें निघतात, व संध्याकाळच्या दोन घटका दररोजची कर्मकटकट एकीकडे ठेवून सुखांत घालवितात. आमच्या देशांत स्त्रियांनीं अशा रीतीनें बाहेर पडणें कोणास आवडणार नाहीं, तरी सध्यां लोकांच्या विचारांत एकसारख्या होणाऱ्या फेरफारांवरून पाहतां स्त्रियांच्या संबंधानें जें होईल तें होवो; तरी पुरुषांनीं तरी शरीररक्षणाकडे विशेष लक्ष पुरवावें.

[वर्ष १, अंक १.]

परभाषेंतील शब्दांची योजना

आपली मराठी भाषा ही सध्यां बनत चालली आहे. वर्तमानपत्रें, सभा, मासिक-पुस्तकें, ग्रंथ, या सर्वांची अभिवृद्धि हीं भाषावृद्धीचीं कारणें होत; वास्तव हीं हल्लीं जारीनें चालू असल्यामुळें जसें झाड किंवा प्राण्यांचें शरीर वाढतें त्याप्रमाणें महाराष्ट्र भाषेची वाढ हल्लीं सुरू आहे. इंग्रजी विद्येचा अलीकडे फैलाव होऊं लागल्यापासून नवे नवे विचार आपल्या भाषेंतील शब्दांनीं व्यक्त करण्याचें अगत्य पडूं लागलें आहे. तेव्हां या संधीस हा एक मोठा विचार कर्तव्य आहे कीं, परकी भाषांतले शब्द आपल्या भाषेंत घ्यावेत कीं नाहींत; व जर घ्यावयाचे तर ते कोणत्या प्रमाणानें घेतले पाहिजेत, वगैरे.

या विषयाच्या संबंधानें कित्येकांची अशी समजूत झालेली दृष्टीस पडते, कीं परभाषांतले शब्द म्हणून बिलकुल मराठींत घेऊं नयें. इंग्रेजी, फारसी, आरबी, वगैरे सर्व शब्द काढून टाकून निवळ मराठी शब्द योजीत जावें. ही बुद्धि कशामुळें झाली आहे, हें कोणासही सहज समजेलच. अलीकडे आमच्या राष्ट्रांत देशाभिमानाची थोडीशी झुळूक सुटली आहे; यामुळें जुने आचारविचार चांगले, इंग्रेजी तऱ्हा बिलकुल उपयोगी नाहीं, स्वदेशी कापडच वापरायाचें वगैरे ग्रह जसे लोकांचे हळु-हळूं होत चालले आहेत, त्याप्रमाणेंच परभाषेंतील शब्दांवर कांहींजणांचा कटाक्ष दृष्टीस पडतो. आतां वस्तुतः पाहतां ही स्वभाषेविषयींची पूज्यबुद्धि सर्वथा अप्रशस्त म्हणतां येत नाहीं हें खरें; कां कीं, ही बुद्धि भाषादूषणावर अत्यंत मारक होय. ती हृदयांत न वसल्यामुळें आजपर्यंत पुष्कळ ग्रंथकारांनीं व वक्त्यांनीं परकी भाषेच्या पायीं आपल्या भाषेची विटंबना केली. मुंबईशाई मराठीचा प्रकार पाहिला, किंवा 'वेदार्थयत्ना' सारखा मासला पाहिला तर वरील प्रकार, किती हास्यास्पद व अनर्थकारक होय हें तेव्हांच लक्षांत येईल. ड्रायडन् नामक प्रख्यात ग्रंथकारानें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, "जर परकी शब्दांची देशभाषेवर फारच गर्दी करून सोडली, तर मूळभाषेस त्यांपासून साह्य व्हावें तें न होतां त्यांचाच जसा कांहीं मूळ शब्दांवर शिरजोरपणा दिसूं लागतो." * तर परभाषेंतून वाजवीपेक्षां फाजील शब्द

*"If too many foreign words are poured in upon us, it looks as if they were designed, not to assist the natives, but to conquer them."

घेतले म्हणजे येथें जसा इंग्रेजांनीं प्रकार केला तसा होऊं लागतो हें उघड आहे. पण या प्रतिबंधास तरी कांहीं मर्यादा अवश्य ठेवलीच पाहिजे. जेथें मूळ भाषेंत शब्दच नाहींत, तेथें परभाषीय शब्दांस निमंत्रण करणें जरूर आहे. उदाहरणार्थ, छापखान्याचाच कारखाना घ्या. यांतील परिभाषा अर्थातच सारी इंग्रेजी आहे. प्रूफ, स्टीक, प्रेसमन, पायका, प्रायमर, कंपाजिटर, करेक्टर वगैरे सर्व शब्द हे आगगाडीच्या किंवा तारायंत्राच्या परिभाषेप्रमाणें आमच्या भाषेंत रूढ झाल्यासारखेच आहेत. आतां कोणी भाषाभिमानी पुरुषानें उठून 'प्रूफ' च्या जागीं 'खर्डा,' 'करेक्टर'च्या जागीं 'शोधक' असें जरी कांहीं शब्दांतर केलें, तरी टैपांचे छप्पन्न प्रकार किंवा रेल्वे एंजिनांतील प्रत्येक भाग अथवा जहाजाच्या शंभर दोन्या इतक्यांस नांवें धुंडीत बसणें म्हणजे भगीरथ प्रयत्नच आहे! शिवाय हा प्रयत्न कितपत सिद्धीस जाईल याविषयीं आम्हांस शंकाच दिसते. संस्कृतांत जरी पाहिलें तरी कित्येक शब्द त्यांतही परभाषेंतलेच येऊन मिसळलेले आहेत. विशेषतः ज्योतिष ग्रंथांतील कित्येक पारिभाषिक शब्द ग्रीक भाषेंतून किंवा प्राचीन मिसरी भाषेंतून घेतल्यासारखे दिसतात. अर्वाचीन काळीं मोठ्या योग्यतेस चढलेली जी इंग्रजी भाषा तींत तर हजारों शब्द परभाषांतूनच आलेले आहेत. हें तर काय, पण ज्या भाषेनें वरील भाषेंत कांहीं ना कांहीं तरी साहित्य केलें नाहीं अशी बहुधा थोडकीच सांपडेल. तर यावरून काय समजायाचें, कीं परभाषांचा मिलाफ हा सर्व भाषांत व्हावयाचाच, व तो झाला असतां त्यांत कांहीं मोठें अनिष्ट आहे असेंही नाहीं. इतकें मात्र पाहिजे, कीं जेथें जरूर नाहीं तेथें वरील भेसळ होऊं देऊं नये; व परभाषांच्या संबंधानें देशभाषेच्या मूळ पद्धतीस म्हणजे वाक्यरचनेस वगैरे धक्का लागूं देऊं नये.

त्यांतून आरबी व फारसी शब्द हे तर आमच्या भाषेला अगदीं खिळूनच गेले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. लहानथोर, विद्वान् अविद्वान्, पुरुष बायका या सर्वांच्या तोंडीं जे शब्द आज पिढ्यान् पिढ्या घट्ट बसले आहेत ते आतां कांहीं केल्या निघायाचे नाहींत. शिवाय ते निघून हल्लीं निर्वाहही लागणार नाहीं. तेव्हां यासंबंधीं आग्रह धरला असतां तो केवळ मूर्खपणाचा दुराग्रह होणार आहे. हे शब्द व महाराष्ट्र भाषा या दोहोंचा जणों काय एकजीवच होऊन गेला आहे; तो इतका कीं त्यांचा परकेपणा अगदीं बुजून जाऊन ते मूळचे यवनी म्हणून ओळखण्याची सुद्धां पुष्कळ वेळां पंचाईत पडते. फार तर काय, पण येवढे सोवळे जे महाराष्ट्र

कवि त्यांनीं सुद्धां पुष्कळ ठिकाणीं त्यांचा प्रयोग केलेला आढळण्यांत येतो. तेव्हां आजपर्यंत जे जे आरबी व फारशी शब्द मराठी भाषेंत येऊन दाखल झाले आहेत त्यांच्या विषयीं सध्यां तर विचारच नाहीं. विचार करावयाचा झाला तर नवीन शब्दांविषयीं; पण यांसही प्रसंगविशेषीं आव्हान करणें अवश्य होईल. जेथें इंग्रजी शब्दास मराठींत किंवा संस्कृतांत प्रतिशब्द आढळणार नाहीं, तेथें वरील दोन भाषांचीच कधीं कधीं प्रार्थना करावी लागेल.

आतां इंग्रेजी शब्दांविषयीं विचार केला तर त्यांसही वरील गोष्टी पुष्कळ अंशीं लागूं पडतील. 'खुर्ची' जशी निवळ मराठी बनली आहे. तिजहून 'टेबल' कमी बनलें आहे असें नाहीं. 'अहमदनगर' या विशेषनामास जशी मराठी भाषेंतून सनद मिळाली आहे त्याप्रमाणेंच 'मालकमपेठे' सही मिळाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हें तर काय पण 'रांग' 'संत्री' 'पलटण' 'फरेट' 'कडाबान' 'काडतूस' वगैरे शब्द तर इतक्यांतच आमच्याशीं इतके लगट करून राहिले आहेत कीं, जणों काय त्यांची व आमची आज कितीका दिवसांची गट्टी बनून गेली आहे कोण जाणें! मोठ्या सोवळ्या आजीबाईलाही जसा आतां 'बटाटा' परका वाटेनासा झाला आहे, व 'तंबाखू' ची तर अलीकडे द्रोणागिरीपर्यंत परंपरा लागत आली आहे, त्याप्रमाणेंच शेकडों इंग्रेजी शब्द अलीकडे आमच्या भाषेंतील शब्दांबरोबर खुशाल वापरूं लागले आहेत. तर देशाचा उदीम वाढण्याकरितां ज्याप्रमाणें सर्व ठिकाणच्या व्यापाऱ्यांस व्यवहार करण्याची सारख्या देशांत मोकळीक असते, त्याप्रमाणेंच अर्थवाहक जे शब्द त्यांसही तशीच सदर परवानगी असली पाहिजे. ती असली असतां भाषेस शब्दप्राचुर्य, वैचित्र्य इत्यादि लाभच होणारे आहेत. इतकेंच मात्र कीं, ते भाषेवर शिरजोर होतां कामा नये, व भाषेची शिस्त त्यांच्या योगानें न बिघडेल अशी तजवीज ठेवली पाहिजे!

[वर्ष १, अंक ३१.]

देशभाषीय ग्रंथसंग्रहाची आवश्यकता

आपल्या देशभाषेंत ग्रंथसंग्रह विपुल असून ज्ञानप्राप्तीचें साधन सुलभ असणें ही गोष्ट केवढ्या महत्त्वाची आहे हें कोणासही सांगायास पाहिजे असें नाहीं. आपली देशभाषा म्हणजे जन्मभाषा, कां जी आपणांस केव्हां येऊं लागली याची सुद्धां आपणांस आठवण नसते. हींतच नानाविध विषयावर आयते ग्रंथ असणें हें किती उपयोगाचें आहे! वरील सोय म्हटली म्हणजे नूतन बालकास किंवा वत्सास उपजल्याबरोबर जशी स्तनपानाची सोय सृष्टिकर्त्यानें करून ठेवली आहे तशाच प्रकारची होय. पहा कीं, इंग्लंडांतील मुलास वाचतां येऊं लागलें कीं लागलींच त्यास मोठमोठ्या नामांकित इंग्रजी ग्रंथकरांचा परिचय करावयास सांपडतो, व नदींतून मोजेनें वहात जातां जातां जसें अफाट दर्यात नकळत जाऊन पडावें * त्याप्रमाणें विशेष आयास न पडतां त्यास सहज पुष्कळ ज्ञानाचा सांठा करून ठेवतां येतो. विलायतेंत होऊन गेलेल्या मोठमोठ्या ग्रंथकारांचीं चरित्रें वाचलीं असतां वरीलच प्रकार त्यांत आढळून येतो. जानसनचा बाप पुस्तकें विकण्याचा धंदा करीत असे, हीच गोष्ट त्या ग्रंथकाराचा पुढें उदय होण्यास उपयोगीं पडली. दुकानांत बसल्या बसल्या शेकडों पुस्तकें इकडून तिकडे चाळावीं हा नाद त्यास लागल्यामुळें त्यास दोन मोठे लाभ झाले; एक तर हा कीं, वाचण्याची गोडी लागली; आणि दुसरा हा कीं, सहजासहजीं बहुश्रुतपणाचा लाभ घडला. जान स्टुअर्ट मिल्ल यांच्या स्वरचित चरित्रांतही असेच उल्लेख आढळतात. गिबन् ह्यूम अशासारख्यांचे प्रचंड इतिहास व दुसरे पुष्कळ मोठमोठाले ग्रंथ त्यानें आठ दहा वर्षांच्या कोंवळ्या वयांत पार झोंकून दिले! शिवाय अलीकडे लोकशिक्षणाकडे विलायत सरकारचें पुष्कळ लक्ष लागल्यामुळें, व लोकांसही वरील गोष्टींचें अगत्य वाटूं लागल्यामुळें, लहान मुलांस व नवशिक्यांस विशेषेंकरून उपयोगी पडण्यासारखे सहस्रावधि ग्रंथ दरवर्षी त्या देशांत निर्माण होत आहेत. वरील सोईमुळें ज्यास नुसती अक्षरओळख होऊन चुकली आहे त्याससुद्धां कोणाची मदत म्हणण्यासारखी न लागतां पुष्कळ विष-

*कालिदासानें 'रघुवंशां'त रघुच्या संबंधानें म्हटलें आहे.

लिपेयथावद् ग्रहणेन वाङ्मयं
नदीमुखेनेव समुद्रमाविशत् ॥

यांचा परिचय करावयास सांपडतो. मागें विद्याध्ययन हें जसें गुरुमुखावांचून बहुधा अशक्यच होतें तशी आतां बिलकुल स्थिति नाहीं. ज्यास बरीच बुद्धि आहे असा मनुष्य सतत उद्योग जर करील तर केवळ स्वतःच्या परिश्रमानें त्यास मोठी विद्वत्ता संपादन करणें हें हल्लींच्या काळांत अत्यंत सुखकर झालें आहे, अशा प्रकारचीं अलीकडे युरोपांत पुष्कळ उदाहरणें घडून आलीं आहेत. कविता, कादंबऱ्या, इतिहास वगैरे सुगम व श्रमसाध्य विषय तर राहोतच, पण पदार्थविज्ञानाचीं निरनिराळीं अंगें जीं ज्योतिष, रसायन, दर्शनानुशासन इत्यादि अनेक शास्त्रें व अर्वाचीन काळीं शोध फार वाढल्यामुळें पूर्वी अज्ञात असलेलीं पुष्कळ शास्त्रें जीं नुकतीं नुकतीं निर्माण झालीं आहेत, या सर्वांचें सुद्धां बऱ्याच प्रकारचें ज्ञान, कोणाचीं आर्जवें न करतां, किंवा दीर्घ काल व परिश्रम न लागतां, हवें त्यास होण्याचा मार्ग अलीकडे होत चालला आहे. तेव्हां स्वभाषेंत ग्रंथरचना झाली असतां, व सुगम रीतीनें ती रचना होऊन स्वल्पमूल्यकग्रंथ वाचकांस उपलब्ध झाले असतां, एकंदर राष्ट्राची उन्नति होण्याचें केवढें जबरदस्त साधन झालें आहे बरें!

आतां आपल्या देशाकडे वळून वरील प्रकार येथें कितपतसा दृष्टीस पडतो, व कोणत्या प्रकारें आढळतो, तो पाहूं. हा विचार करायाचा म्हणजे अगोदर देशभाषांची स्थिति मनांत आणायास पाहिजे. या देशभाषा सुधारणेच्या पंथाला लागल्या, ही गोष्ट इंग्रजी अमदानींतच घडली हें सर्वांस महशूर आहेच. यापूर्वी त्यांस आळा म्हणून कोणताही नव्हता. रानझाडाप्रमाणें किंवा गिरिनदीप्रमाणें त्यांची स्वैरगति अकुंठित होती. पुढें इंग्रजी भाषेंत जशी आमची मंडळी पारंगत झाली, तशी अनुकरणाची त्यांच्या ठायीं स्वभावता प्रवृत्ति होऊन गद्यात्मक ग्रंथरचनेचा प्रकार सुरू झाला. गद्य हें पद्यापेक्षां भाषानियमन होण्यास विशेष अनुकूल होय. वास्तव आमच्या भाषेस छत्रे, जांभेकर, चिपळूणकर, ओक वगैरेंनीं हातीं धरतांच, तीस ठाकठिकी व व्यवस्थितपणा हा प्राप्त झाला. हा फेरफार किती फायद्याचा झाला, हें ज्यांस पाहणें असेल त्यानें हल्लींच्या ग्रंथाचें एकादें पान आणि जुन्या बखरींचा एकादा बंद हीं परस्परांशीं ताडून पाहावीं म्हणजे तेव्हांच खात्री होईल. आमच्या सरकारांचाही पहिल्यानें देशभाषांची अभिवृद्धि होऊन त्यांच्या द्वारें लोकांस ज्ञानप्राप्तीचा मार्ग खुला व्हावा याविषयीं मोठा कटाक्ष होता. हजारों रुपये खर्चून महाराष्ट्र भाषेचे दोन प्रचंड कोश त्यानें तयार करविले; कोणीं चांगला ग्रंथ

केला असतां त्यास आश्रय मिळण्याकरितां विद्याखातें व दक्षिणा प्रेज कमिटी हीं सिद्ध झालीं; तसेंच ग्रंथकर्तृत्व हें बढती होण्यास व मानमान्यतेसही कारणभूत होत असे, शिवाय दोन्ही विद्यालयांतून 'दक्षिणा फेलो' म्हणून ज्या जागा केल्या त्या तरी येवढ्याच करतां कीं, या 'फेलो' मंडळीनें आपलें इंग्रजी ज्ञान देशभाषेच्या द्वारें लोकांत प्रसृत करावें. तेव्हां या सर्व साधनांनीं मिळून हल्लीं मराठी भाषा इतक्या व्यवस्थितपणाला येऊन पोंचली आहे.

वर सांगितल्याप्रमाणें महाराष्ट्र भाषारूप भूमीची मशागत सध्यांच्या काळीं बऱ्याच प्रकारें झाली आहे हें खरें; पण अद्याप तींत पाश्चात्य भूमीप्रमाणें प्रचंड व विस्तीर्ण वृक्षांची वाढ होऊं लागली आहे असें नाहीं. ही वाढ होण्यास ज्या गोष्टींची आवश्यकता आहे त्यांचा सध्यां अभाव असल्यामुळें फार कालांतरानें वरील कार्य कदाचित् सिद्ध होईल. 'कदाचित्' शब्दाचा प्रयोग करण्याचें कारण असें कीं, मोठमोठे ग्रंथकार निपजणें व त्यांच्या हातून काव्य, नाटक, इतिहास, शास्त्रीय ग्रंथ वगैरे निर्माण होऊन लोकांच्या हातीं पडणें हें केवळ दैवायत्त होय. मोठा कुबेर जरी म्हणेल कीं मी कालिदासासारखा कवि निपजवीन, किंवा पाणिनीसारखा वैयाकरण उद्यास आणीन, तरी कांहीं होणार नाहीं. लाखों रुपये खर्च करून गारगोटीला तरतऱ्या पाडल्या म्हणून अगदीं सामान्य हिऱ्याची तरी तिला सर येईल काय? किंवा सामान्य हिऱ्यावर कितीही शिल्पप्रयोग केले म्हणून कोहिनूराची झाक त्यांत निष्पन्न होईल काय? कधीं होणार नाहीं. ईश्वराधीन जो गुण तो मनुष्याच्या प्रयत्नानें कसा साध्य होणार? तर ज्याप्रमाणें उत्कृष्ट पीक यावयाचें आहे तर अगोदर भूमीची सिद्धता व्हावी लागते, त्याप्रमाणें अलकिडे पांच पंचवीस वर्षांत मराठी भाषेचें स्वरूप नीटनेटकें होऊन ती उत्कृष्ट ग्रंथकारांच्या उपयोगी पडेशी झाली आहे हें ठकिच आहे. पण इतक्यानें कांहीं झालें असें नाहीं. हे नुसता पाया झाला आहे इतकें पराकाष्ठेनें म्हणतां येईल. कारागिरी काम त्यावर उठावायचें तें दूरच आहे. तें होऊन सारी इमारत जेव्हां पुरी होईल तेव्हां राहण्याची सोय झाली असें म्हणावयाचें.

असो; आतां या आमच्या देशभाषेंत हवा तसा ग्रंथसंग्रह होत जाण्यास कोणकोणत्या गोष्टींची जरूर आहे याविषयीं विचार केला पाहिजे.

कोणतीही भाषा परिपक्वदशेस येणें ही गोष्ट मुख्यतः पाहतां दैवाधीन आहे खरी. का कीं विशाल बुद्धि ही परमेश्वराचीच देणगी होय, ती कांहीं मनुष्याच्या हातची गोष्ट नव्हेः तरी लोकाश्रयावरही वरील कार्याची सिद्धि बऱ्याच प्रकारें अवलंबून राहते, ही गोष्ट कबूल करणें भाग आहे. ज्याप्रमाणें उत्तम बीं आहे, पण तें जर खडकावर पडलें तर त्यापासून कांहीं निष्पन्न व्हावयाचें नाहीं, त्याप्रमाणेंच मोठा होतकरू ग्रंथकार असला आणि त्यास जर ग्रंथकर्तृत्वाचीं साधनें नाहींत किंवा लोकाश्रय अथवा राजाश्रय नाहीं, तर त्याच्या गुणाचें काय चीज होणार? अर्थात् कांहीं होणार नाहीं. संस्कृतांत एक म्हण आहे कीं, " विनाश्रयं न शोभन्ते पंडिता वनिता लताः " (पंडित, वनिता व लता हीं तीन आश्रयावांचून शोभत नाहींत); ही म्हण सर्वथा खरी आहे. आतां अलीकडे मुद्रणादि साधनें झाल्यापासून पंडितांचें वरील परायत्तत्व पुष्कळ कमी झालें आहे खरें; पण तें तरी जेथें वाचकांची संख्या पुष्कळ वाढली आहे अशा देशांतूनच. नाहीं तर आमच्याच देशांत पहा. इंग्लंडांत शेक्सपियर, मिल्टन वगैरे सारी मंडळी चार चार आण्याला सुद्धां खरेदी करतां येते; येथें इतका स्वस्त अजून एकही मराठी किंवा संस्कृत कवि झाला नाहीं. हें तर काय, पण अद्याप त्यांचे ग्रंथ सगळे एकदा छापून सुद्धां निघाले नाहींत. शेंकडों ग्रंथ दरवर्षी फाटून तुटून जात आहेत किंवा वाण्याच्या दुकानीं निर्वाणपदवीस पावत आहेत! पण इतके पंडितशिरोमणि लोककल्याणकर्ते चोहोंकडे वावरत असतां त्यांची कोणी वास्तपुस्तही करीत नाहीं: लोकाभिरुचि व ग्रंथसमृद्धि या दोहोंचा अन्योन्याश्रय संबंध आहे; म्हणजे लोकांत ग्रंथाभिरुचि असली म्हणजे ग्रंथांच्या खपास उत्तेजन मिळण्यानें पुष्कळ ग्रंथ होऊं लागतात, आणि याचप्रमाणें लोकांत अभिरुचि उत्पन्न होणें हेंही पुष्कळ ग्रंथ निर्माण होऊन लोकांच्या हातीं पडण्यावरच आहे. जर पुस्तकेंच वाचावयास मिळालीं नाहींत तर त्यांची आवड उत्पन्न होणार कशी, व एक चांगलें व दुसरें वाईट ही निवडानिवड करण्याचें सामर्थ्य तरी लोकांत कसें येणार! तर वरील दोन गोष्टींचा याप्रमाणें परस्परसंबंध असल्यामुळें आमच्यासारख्या नूतन विद्याप्रविष्ट देशांत ग्रंथसंग्रह व्हावा कसा? लोकाभिरुचि नाहीं तर ग्रंथनिष्पत्ति व्हावयाची नाहीं, व ग्रंथसमृद्धि नाहीं तर लोकाभिरुचि उत्पन्न होणें नाहीं, या कचाटींतून पार कसें पडावें? ही कचाटी म्हटली म्हणजे दुष्काळांत शेतकऱ्यास जी पंचाईत पडते तिच्यासारखी आहे; तो बीं जमिनींत पेरून शतपट, सहस्रपट धान्य उत्पन्न करील खरें; पण तें बींच

अगोदर त्यानें कोठचें आणावें ? तें होणार मुळीं जमिनींतूनच. आतां या रुच्छांतून मुक्त होण्याचा एकच मार्ग आहे. तो कोणता हें धान्याच्या उदाहरणावरून लक्षांत येईलच. देशांतील सारें धान्य फन्ना होऊन शेतकरी जेव्हां उघडे पडतात, तेव्हां लोकोपजीविनार्थ सरकारास जशी तगाईची तजवीज करणें जरूर पडतें, त्याप्रमाणें सरस्वतीच्या दुर्भिक्षाच्या वेळींही राजा किंवा श्रीमान् लोक यांनीं केवळ लोकोपकारक बुद्धीनें प्रथमतः वाग्देवीची कृपा राष्ट्रावर होईल अशाविषयीं यत्न केला पाहिजे. तें होत नसेल तर विद्वान् लोकांनीं तरी निरपेक्षबुद्धीनें आपल्या देवतेची उपासना चालविली पाहिजे. ती अशी कीं, त्यांनीं स्वार्थसाधनाविषयीं विशेष लालसा न दाखवितां, किंबहुना केवळ निष्कामबुद्धि धारण करून लोकांत ज्ञानाचा व अभिरुचीचा प्रसार होण्याकरितां कायिक, वाचिक व मानसिक परिश्रम करावे. निदानपक्षीं, शेवटला उपाय म्हटला म्हणजे लोकांनीं तरी एकवट होऊन आपल्या स्वतःस सुधारण्याची खटपट करावी.

आतां वरील उपायचतुष्टयांपैकीं हल्लीं आम्हांस कोणते अनुकूल आहेत ते पाहूं. पहिला उपाय राजाश्रय. या उपायाची योग्यता किती आहे हें साऱ्या राष्ट्रांच्या इतिहासावरून कळून येण्यासारखेंच आहे. आमच्या देशांत विक्रमादित्य, भोज वगैरे नृपरत्नें होऊन गेलीं, तेव्हां त्यांच्या आश्रयानें या देशांत वाग्देवीचें येवढें भांडार बाहेर निघालें कीं, अद्यापवेतों तें ऐश्वर्य मात्र आमचें कायम राहिलें आहे. याप्रमाणेंच ग्रीस, रोम, इंग्लंड, फ्रान्स, इटाली वगैरे बहुतेक देशांत मोठमोठ्या प्रतापी राजांनीं विद्वज्जनांचा प्रतिपाळ व आदर करून आपली कीर्ति अजरामर करून सोडली आहे. हल्लीं सुद्धां आमच्या महाराणीसाहेबांच्या पदरीं टेनिसन नामेंकरून एक नामांकित कवि सालाचें तीनशें पौन्ड वेतन खात जवळ पडलेला आहेच. आतां हें वेतन त्याच्या इतर मिळकतीच्या पासंगालाही न पुरण्यासारखें आहे हें खरें; पण ती गोष्ट निराळी. ती येथें जमेस धरायाची नाहीं. तेव्हां एकंदरींत काय सिद्ध होतें कीं, आजपर्यंत होऊन गेलेल्या मोठमोठ्या राजांनीं विद्येचा उत्कर्ष करून आपल्या राष्ट्रास विद्वत्तेचा संस्कार लावला. आतां वरील सूत्र आमच्या शहाण्या व दयाळू सरकाराकडे लावून जर पाहिलें तर येवढें कबूल केलें पाहिजे खरें, कीं पहिल्या पहिल्यानें त्यांनीं या कामीं बरेंच लक्ष पुरविलें, व विद्वज्जनांचा परामर्ष बराच घेतला. पण अलीकडे जों पहावें तों तों पहिला मनु अगदींच फिरल्यासारखा दिसतो. आणि त्यांतून हल्लींचे विद्वन्मणि डायरेक्टरसाहेब विद्याखात्याचीं सूत्रें

हातांत वागवूं लागल्यापासून तर आमच्या महाराष्ट्रभाषेचें व महाराष्ट्रीय लोकांचें नशीबच उघडलें असें म्हटलें पाहिजे. ही मूर्ति या महान् अधिकारावर चढली तेव्हां यांजपासून एकंदर लोकांस अशी मोठी आशा लागली होती कीं, हे कामगार विद्याखात्यांत फार दिवस वहिवाटलेले आहेत, यांस येथील शिक्षणपद्धतीची व एकंदर लोकसमुदायाची स्वानुभवावरून चांगली माहिती आहे, व स्वभावानेंही ते पूर्वाश्रमीं असतांना दयाळूपणाबद्दल फार वाखाणलेले असत, तेव्हां हे बोवा आपली कारकीर्द माजी सर आलेक्झांडर ग्रांट यांच्याहूनही फार गाजवितील अशी पुष्कळ मंडळीची खातरजमा होती. पण म्हणतात ना, 'भरंवशाच्या म्हशीला * * * !' याप्रमाणें आमची स्थिति झाली. मेहेरबान चाटफील्ड साहेबांच्या येण्यापासून विद्याखात्याला अशी कळा येत चालली आहे कीं वाः ! या ऱ्हासकळेला नेक नामदार टेंपलसाहेबांच्या हातून मात्र बरीच मात्रा पोंचेल असें वाटलें होतें; पण या धर्मखात्याच्या कमनशिबानें व एकंदर देशाच्या नशिबानें तें बस्तान बिघडलें! साहेबबहादरांनीं आपल्या खात्याची व्यवस्था उत्तम रीतीची ठेवली आहे ही गोष्ट तर प्रसिद्धच आहे, तिजविषयीं आम्हांस बोलण्याचें येथें कारण नाहीं; पण प्रस्तुत विषयानुसार दोन तीन गोष्टी दाखल करतों. गरीब बिचाऱ्या गांवठी मास्तरांच्या हितार्थ माजी हावर्डसाहेबांनीं एक लहानसें 'शालापत्रक' म्हणून मासिक पुस्तक सुरू केलें होतें. आमच्या मेहेरबानांनीं एका जाडया विद्वानाच्या कुत्सित मताला मान देऊन तें खाडदिशीं सफा बुडवून टाकलें, आणि सरकारचा फायदा करून दाखविला ! सरकारानें फार दिवस मराठी ट्रान्सलेटर व दक्षिणा प्रैज कमिटीचे सेक्रेटरी हे दोन अधिकारी महाराष्ट्रग्रंथोत्तेजनार्थ ठेविले आहेत. आमच्या मेहेरबानांनीं हीं दोन्हीं आफिसें किती संपुष्टांत आणलीं आहेत हें पुष्कळांस माहीत असेलच ! साहेबांकडे तुम्ही कसलाही उत्कृष्ट ग्रंथ किंवा मासिक पुस्तक पाठवून द्या; मेहेरबानांचा शेरा छापीलः–'तुमच्या पुस्तकाची खात्याला जरूर नाहीं,' किंवा 'खात्याच्या खजिन्याला सध्यां तूट आली आहे,' तेंच 'उजळणीचें पहिलें पुस्तक' असूं द्या, किंवा गौरकायरुत 'शारीरशास्त्र' असूं द्या, कीं विद्याखात्याची गंगाजळी तुडुंब भरलेली! असले महासमर्थ विद्याप्रभु असल्यावर मग काय आनंद विचारावा!

वर ग्रंथोत्तेजनाचा पहिला उपाय जो राजाश्रय त्याविषयीं विचार झाला; म्हणजे आमच्या लोकांत विद्येचा प्रसार व्हावा एतदर्थ देशाच्या पैशापैकीं अर्धाच हजार

रुपये ज्यांच्या पोतडींत दरमहा जात आहेत त्या डायरेक्टर साहेबांच्या हातून वरील गोष्टींत कितीशी मदत होत आहे, तें सांगितलें. आतां दुसरा उपाय, विद्वज्जनांची औपकारिक बुद्धि, तिजविषयीं विचार करूं.

या दुसऱ्या उपायाची योग्यता वस्तुतः मागें सांगितलेल्या तिन्ही उपायांत अधिक आहे. कां कीं, राजांनीं ग्रंथोत्पत्तिसि उत्तेजन देणें, किंवा लोकाश्रयावर नवीन ग्रंथ निर्माण होणें, हे दोन्ही उपाय वस्तुतः पाहतां जसे असावे तसे नाहींत. राजांच्या संबंधानें तर विशेष सांगायाला नकोच; त्यांच्यापर्यंत विद्येचा रिघाव होऊन ते तींत प्रवीण होणें, व श्रीहर्ष किंवा शूद्रक यांच्याप्रमाणें ते स्वतः सरस्वतीच्या कृपेचें पात्र असणें, या गोष्टी केवढ्या दुरापास्त आहेत हें सांगायाला नकोच. तेव्हां सामान्यतः पाहतां जे स्वतः अनभिज्ञ त्यांच्या हातून वरील हेतु कितपतसा सिद्धीस जाणार? ते फार झाले तर आमच्या डायरेक्टरसाहेबांच्याप्रमाणें करणार. मे० चाटफील्ड साहेबांची वहिवाट अशी आहे कीं, कोणताही ग्रंथ आला कीं तो मराठी असला तर मराठी ट्रान्स्लेटरांकडे किंवा संस्कृत असला तर दक्षिण विद्यालयांतील संस्कृत विद्यागुरूंकडे पाठवून द्यावयाचा; मग वरील दोघां अधिकाऱ्यांचा त्या पुस्तकावर काय शेरा पडेल तो रामबाण! बरें, हा शेरा तरी ग्रंथकाराच्या दृष्टीस पडायाचा आहे काय? छे! शांतं पापम्! तो पडला 'कॉन्फिडेन्शियल;' तेव्हां डायरेक्टरसाहेबांच्या गोशांतून वरील सरस्वती कोठली बाहेर पडायाला!! तेव्हां वरील प्रथम उपाय म्हटला म्हणजे तो अशा वसुलाचा. भर्तृहरीनें सदरील प्रकरणीं आपला खासगत अनुभव येणेंप्रमाणें दाखल केला आहे :—

अभिज्ञास तों ग्रासिलें मत्सरानें धनाढ्य प्रभू व्यापिले दुर्मदानें।
शिरीं थोर मूर्खास अज्ञान ओझें जिरालें निजांगींच पांडित्य माझें॥

तसेंच तिसरा उपाय जो लोकाश्रय, त्यासही वरील आक्षेपच लागूं पडतो. कां कीं, एकंदर लोकसमुदाय म्हटला म्हणजे तो वरील प्रभूप्रमाणेंच जातीनें अनभिज्ञ; तेव्हां ग्रंथपरीक्षण जें व्हावयाचें तें अर्थात् नियुक्त अधिकाऱ्यांच्याकडूनच! म्हणजे पुनः डायरेक्टरसाहेबांच्या आफिसांतलीच व्यवस्था आली. आम्हीं यापूर्वी ग्रंथोत्तेजक मंडळीच्या संबंधानें जो मजकूर लिहिला आहे, त्यावरून या तिसऱ्या उपायाला कोणता धोका येतो हें वाचकांस कळून येणारें आहे. सदरील मंडळींचें काम दोघां रावबहादुरांकडे असल्यामळें प्लेटोच्या प्रजासत्ताक राज्याप्रमाणें जशी व्यवस्था

झाली, कीं कादंबरी, किंवा काव्य, अगर नाटक यांस सक्त मज्जाव; आणि दरवाजे खुले कोणाला, तर आश्वलायनांचें गृह्यसूत्र, स्वाध्याय, किंवा मुसलमानांचा इतिहास यांसारख्या पुस्तकांना; तसाच प्रकार वरील प्रसंगीं व्हावयाचा.

तेव्हां वरील दोन्ही उपाय हे दोषयुक्त होत. आतां सध्यां ज्याचें विवेचन करायाचें तो उपाय कसा आहे तो पहा! जे स्वतः विद्येंत निपुण व ग्रंथरचना करण्यांत कुशल, त्यांनीं राजाश्रयाची पर्वा न करतां व लोकांनीं आपल्या श्रमाचें मोल आपणास द्यावें ही क्षुद्रबुद्धि न धरतां जर लोकोपकारावर किंवा कीर्तीवरच मुख्यतः दृष्टि ठेवून आपल्या ठायीं जो परमेश्वरानें गुण ठेवला आहे, त्याचा आविर्भाव निरपेक्ष बुद्धीनें केला, तर किती उत्तम गोष्ट होणार आहे! आजपर्यंत सर्व देशांत जे महान् महान् ग्रंथकार होऊन गेले त्यांस त्यांच्या परिश्रमांबद्दल काय द्रव्यलाभ झाला बरें! वाल्मीकीनें आदिकाव्य निर्माण करून आज हजारों वर्षें लक्षावधि लोकांचें मनरंजन करून त्यांस सन्मार्गास लाविलें, याबद्दल कोणीं काय त्यास दिलें! पाणिनीनें अष्टाध्यायीची बिकट रचना करून येवढ्या अपरंपार गीर्वाणवाणीस सूत्रनिबद्ध करून टाकलें, व आपल्या देशबंधूंच्या वाणीस आज सहस्रावधि वर्षें परिपूत केलें, म्हणून त्याला कोणीं चांद बक्षीस दिला! आमच्या महाराष्ट्र कवींनीं महाराष्ट्रवाणींत रसपरिपाक ओतून देऊन असंख्य जनांस रंजविलें, व हजारों हरदासांच्या बिदाग्या चालविल्या म्हणून आपल्या ग्रंथांवर त्यांनीं कधीं हक्क ठेवला? सॉक्रेटीस यानें जन्मभर आथेन्सच्या लोकांस सदुपदेश केला, व प्लेटो, जिनोफन् यांच्यासारखे पट्टे तयार करून आपल्या देशाची कीर्ति अजरामर करून टाकली, तो कधीं कोणापुढें हात पसरायाला गेला होता? मिल्टननें येवढें महाकाव्य अंधावस्थेंत व विपत्तींत रचून आपल्या देशास अक्षय्य भूषण आणलें, त्याबद्दल त्यास एका किताबवाल्यानें निष्कयद्वारा काय दान केलें? तर दीडशें रुपये! तेव्हां वरच्यासारख्या सर्व उदाहरणांवरून ही गोष्ट सिद्ध आहे कीं, देशांत ग्रंथसंग्रह उत्तम रीतीचा होणें हें पूर्वोक्त थोर बुद्धीचा वास पंडितजनांच्या ठायीं असल्यावांचून कधीं व्हावयाचें नाहीं. अर्थसंग्रहाविषयीं लालस असणारी जी क्षुद्रबुद्धि तिच्या ठायीं ज्ञानाचा मोठासा सांठा राहणें, व तो उत्कृष्ट कृतींच्या रूपानें प्रगट होणें, या दोन्ही गोष्टी वस्तुतःच अशक्य म्हटल्या असतां चालेल. तर हल्लींच्या स्थितीला आमच्या देशांतील विद्वान् म्हणवून घेणारांनीं मुख्यतः वरील महात्मताच पतकरली पाहिजे. आपले देशबंधू अज्ञानदशेंत आहेत तर त्यांस तींतून काढणें हें आपलें कर्तव्य होय, असें समजून

जर ते सतत प्रयत्न करतील, व देशाच्या पैशानें आपण शहाणे झालों तर तो उपकार फेडणें आपणांस उचित होय, हें लक्षांत बागवून जर ते कांहीं उद्योग करतील, तरच कांहीं कार्यसिद्धि होणारी आहे. नाहीं तर आम्ही सरकारी काम अमुक अमुक तास करतों आणि त्याबद्दल आम्हांस इतकी इतकी मजुरी मिळते, तर याचे मानानें आमची सरस्वत्युपासनाही आम्हांस फलप्रद झाली पाहिजे म्हणून जर ते अडून बसतील, व नुसती देशहिताची यथेच्छ जल्पना करून हातानें कांहीं करणार नाहींत, तर आजपर्यंत जी तऱ्हा दृष्टीस पडत आली आहे तीच पुढें चालायाची! लोकांनीं विद्वान् मंडळीच्या नांवानें + + करीत असावें, व विद्वानांनीं लोकांस गुणपरीक्षा नाहीं म्हणून रिकाम्या हाका मारीत बसावें, येवढेंच काय तें होणार. खरोखरी पाहतां सरकारानें आज इतके दिवस अट्टाहास करून आम्हांस काय थोडकें शहाणें केलें आहे? इंग्रजी भाषेंतील सर्वस्व, आमच्या गीर्वाण भाषेंतील सारी संपत्ति, हव्या त्या विषयाची माहिती, या सर्व गोष्टी जशा काय आमच्या स्वाधीन करून दिल्या आहेत. यापेक्षां आणखी तें काय त्यांनीं करायाचें? त्यांतून प्राचीन विद्वज्जनांप्रमाणें आमची मंडळी दारिद्र्यानें व संसारचिंतेनें ग्रासलेली आहे असेंही केवळ नाहीं. पुष्कळांची स्थिति 'सुखं च मे शयनं च मे' यांतीलच आहे. पण आमच्या हातून कांहीं होतें आहे का? होतें आहे,—न्यूजपेपरें उलथीं पालथीं करावीं, गाड्याघोड्यांतून मिरवावें, पाश्चात्य प्रभूंच्या पुढें पुढें मिरवावें, कधीं कधीं एखाद्या सभेचे मजेखातर मेंबर, सेक्रेटरी वगैरे व्हावें,—त्यांतूनही पराकाष्ठाच झाली तर आकाशांतील प्रभूच्या नांवानें नेत्रनिमीलन करून उपासना करावी; आटपला कारभार! सारा देश दिवसेंदिवस बुडतो आहे, लोकांस आपली स्थिति काय आहे याची सुद्धां ओळख नाहीं, हें आमच्या युनिवर्सिटिपुत्रांपैकीं कितीकांच्या वरें उभ्या वर्षांत तरी कधीं मनांत येत असेल! तर ही स्थिति अत्यंत शोचनीय आहे. ही कधीं नाहींशी होईल, व आमच्या नव्या बांडांस आपल्यावरची जोखीम कधीं कळून येईल ती येवो; येईल तो दिवस खऱ्या सुधारणेचा पहिला समजावयाचा!

आतांपर्यंत या विषयाच्या दोन भागांविषयीं निरूपण केलें. आतां देशभाषेंत ग्रंथसंग्रह वाढण्याचा तिसरा उपाय जो लोकपरिश्रम, त्याविषयीं विचार करूं.

वरील उद्देश सिद्धीस जाण्याकरतां लोकांनीं खटपट जी करावयाची ती कोणत्या प्रकारची, ती आज सर्वांस माहीत झालीच आहे. ती ही कीं, लोकांनीं आपल्यां-

तच वर्गणी करून पैसा जमवावा, आणि त्यांतून उत्तम ग्रंथकारांस बक्षिसें देऊन त्यांच्या कृतींचा प्रसार करावा. उपाय चांगल्या रीतीनें अमलांत आल्यास त्यापासून पुष्कळ उपयोग होण्यासारखा आहे हें खरें; पण तसें होण्यास अनेक अडचणी आहेत; हल्लींच्या आमच्या स्थितीला तर वरील गोष्ट तडीस जाणें म्हणजे मोठींच पंचाईत आहे. हें असें कां हें पुष्कळांस सहज समजण्याजोगें आहे. तथापि विषयाच्या स्पष्टीकरणार्थ वरील अडचणी कोणत्या त्या येथें सांगतों.

पहिल्यानें मुळारंभीं अडचण म्हटली म्हणजे पैसा जुळण्याची. व्यवहारांत म्हण आहे कीं, सारीं सोगें येतात, पण पैशाचें सोंग येत नाहीं. या जगांत पैशावांचून तर क्षणभर चालत नाहीं; बसतां पैसा, उठतां पैसा, असा जिकडे तिकडे प्रकार आहे. तेव्हां नवीन ग्रंथ रचण्याची उमेद उत्पन्न होण्याजोगी रक्कम प्रथमतः ग्रंथकारास द्यावयाची, नंतर तो छापावयास जो खर्च लागेल तो सोसायाचा आणि त्याशिवाय ग्रंथोत्तेजनाच्या कारखान्याचा एरवींचा किरकोळ खर्च सतत चालवायाचा,—हें सर्व म्हटलें म्हणजे केवढें अचाट काम आहे बरें ? असल्या कामाला सामान्य रीतीनें चालण्यास निदान पांचपन्नास हजार रुपये तरी पाहिजेत. येवढ्या रकमेची काय जरूर आहे असें कोणास कदाचित् वाटेल; पण अंमळ विचार केला असतां वरील पन्नास तोडे हेही कांहीं नव्हत, अशी कोणाचीही खात्री होईल. पहा कीं, अशी मंडळी निघाली म्हणजे वर्षाच्या कांठीं दहापांच ग्रंथ तर निपजले पाहिजेत ! मग एकेका ग्रंथकाराची दक्षिणा—प्रेज कमिटीच्या धाऱ्याप्रमाणें संभावना करावयाची म्हटलें म्हणजे चार हजार रुपये उडाले. या चार तोड्यांनीं नुसतीं दहा पुस्तकें पैदा झालीं! पुढला विचार तीं छापण्याचा. आतां हीं पुस्तकें सर्वांच्या हातीं पडावीं असा जर विचार असेल, तर अर्थातच विद्याखात्यांतील पुस्तकांप्रमाणें प्रत्येकाच्या निदान दोन हजार, चार हजार तरी प्रती काढणें जरूर आहे. येवढें थोरलें प्रमाण धरल्याखेरीज पुस्तकाची किंमत कमी ठेवतां येणार नाहीं. तेव्हां हा छापण्याचा खर्च केवढा दांडगा झाला पहा ! पुस्तकें तयार होऊन बसलीं म्हणजे मग त्यांच्या व्यवस्थेचा विचार. ही व्यवस्था करण्यास अर्थातच कारकून, गडी वगैरे सर्व डीपोच्या आफिसाचा खर्च आला. तेव्हां एका वर्षांत दहापांच नवीं पुस्तकें निघून तीं लोकांस वाचायास मिळालीं, येवढ्या लहानशा कार्याच्या सिद्धीला खटाटोप केवढा थोरला करणें जरूर आहे हें पहा ! तेव्हां या मानानें पाहतां विलायतेतील मंडळ्यांप्रमाणें लाखों रुपये जेव्हां येथें खेळायाला लागतील तेव्हां पुस्तकांची

समृद्धि होऊन लोकांच्या मनरंजनाची व ज्ञानप्राप्तीची सोय होणार. तर पुनः मूळ-पदावर येऊन आम्ही आमच्या वाचकांस विचारतों कीं, येवढी लाखपन्नास हजारांची बडी रक्कम आमच्या देशांत जुळावी कशी ? आमचें सरकार, आमचे संस्थानिक, आमचे शेटसावकार, आमच्यांतली बडी बडी मंडळी, या सर्वांचा अशा कामीं कितपतसा भरंवसा धरतां येण्यासारखा आहे हें सर्वांस महशूर आहेच. छोटेखानी मंडळीनेंच येवढा विभू रचावा म्हटलें तर वारुळांतल्या मुंग्यांनीं मिसर देशांतल्यासारखे मनोरे रचावे हें म्हणण्यासारखेंच तें होय ! ज्या आम्हांमध्यें नुसतीं जेवणासारखीं कामेंही चार दिवस नेटानें चालवत नाहींत; व असेंही करतां माराकुटीनें चार पैसे गोळा झालेच, तर भिक्षागृहाचे ट्रस्टी किंवा ग्रंथोत्तेजक मंडळीचे सकडतार अशांसारखी खाशी मंडळी मिळायाला जेथें उशीर लागत नाहीं, तेथें ग्रंथोत्तेजनासारख्या भिकार कामानिमित्त वरच्यासारखा टोलेजंग फंड जुळणें म्हणजे ' अद्भुत वार्ता आणि कोल्हे गेले तीर्था ' यांतीलच प्रकार होय !

पण वरील सर्व अडचणी या जरी दुरापास्त होत तरी मुख्य अडचणी आहेत त्या आणखी निराळ्याच आहेत. त्या ह्या कीं, वरील लक्षसंख्या ही जुळली म्हणा, तरी ग्रंथकारांकडून जीं पुस्तकें येतील त्यांचें परीक्षण व शोधन जें करायाचें तें कोणीं करावें ? वरील दोन्हीं कामें जीं व्हावयाचीं त्यांचा सरसकट मक्ता एखाद्या रावबहादुरांकडे किंवा एखाद्या बड्या किताबवाल्याकडे देऊन टाकणें म्हणजे केवढी वेडगळपणाची गोष्ट होणार आहे हें कोणालाही स्पष्ट दिसणार आहे. नामदारीपर्यंत जरी कोणाची बडेजावी वाढली किंवा युनिवर्सिटीचीं सारीं सोनेरी पदकें जरी कोणीं झोडलीं, तरी ह्या त्या विषयावर मत ठोकून देण्यास किंवा पाहिजे तो ग्रंथ शोधण्यास तो लायक होईल काय ? तेव्हां अर्थातच सदरील काम वहिवाटण्यास एका सभेची योजना होणें जरूर आहे. ज्यास जो विषय चांगला अवगत असेल त्याच्याकडे तो नेमून देऊन सर्व सभा याप्रमाणें जुळवली पाहिजे. पण हें होणार कसें ? निरनिराळ्या विषयांत पारंगत अशी मंडळी आमच्या देशांत नाहींशी नाहीं; पण फुकाची बिगारी कोणीं करावी ? सरकारानें महिन्याची चंदी ठरवून देऊन मग पाठीवर चार कोरडे ओढले तरी चिंता नाहीं; सरकार मायबाप आहे, जें पाठीवर मारील तें पोटालाही देईल. पण प्राप्तीच्या नांवानें शून्य, आणि म्हणे फुकाची बिगार वळा; हें नाहीं बोवा कोणाला पतकरायाचें ! आमच्या जुन्या पेन्शनर मंडळीची कशी हालहवाल आढळते ती सर्वांस माहीत आहेच. कोणास

मानेवरचें जूं निघाल्यानेंच चैन पडेनासें होतें; तेव्हां मग म्हातारपणीं एखाद्या संस्थानांत डोकें घाल, किंवा एखादी महिनेमालीची मजुरी पतकर, हा प्रकार करायाचा. किंवा निदान दहा वाजतां लगबगीनें जेवून एकदां आपल्या जुन्या आफिसाचें तरी दर्शन घेऊन यावें व साहेबी बुटांचा प्रसाद कोणा भाग्यवानास मिळत असेल तर निदान नेत्रसुख तरी घ्यावें। एका इंग्रजी पुस्तकांत आम्हास अशी गोष्ट वाचल्याची आठवतें कीं, एक मनुष्य फार दिवस बिनभाड्याच्या घरांत होता. पुढें त्याचा मोक्षसमय येऊन मुदामजीची जशी द्वारकेस संभावना झाली त्याप्रमाणें जुना पोषाक पुनः मिळून स्वारीची बोळवणी केली. पण हे गृहस्थ आपल्या घरीं येऊन जों पाहतात तों त्यांस कसेंसेंच वाटूं लागलें ? हातापायांत वाळे, आणि तो कंबलकंचुक,–कीं जो अपयशाचें जणों पांघरूणच ! तें सर्व ऐश्वर्य घरीं कोठून मिळायाला ! शेवटीं बहादरानें केलें काय कीं पुनः मृच्छकटिकांतील शर्विलकाची कृति केली. केल्याबरोबर पुनः आपल्या जिवलग सवंगड्यांत जाऊन पडले, तेव्हां राजश्रींचा जीव खालीं पडला, आणि समाधान पावला ! तर ग्रामसिंहवृत्ति म्हणून म्हटलेली जी राजसेवा ती अलीकडे आमच्या इतकी अंगवळणी पडून गेली आहे कीं, धाग्याला धागा जोडून देऊन आम्ही पाहिजे तर पुनः ट्रान्स्लेटर होऊन ' मागून पुढून बापच नवरा ' या म्हणीला सार्थकता आणूं; पण उगीच फुकटाफुकट वर्षाच्या कांटीं चार पुस्तकें उलथींपालथीं करा म्हणून जर कोणी म्हणेल तर ही फिकीर नाहीं आपल्याला खपायाची ! 'चाकरी करून भाकरी खावी ' हें वरदानच मुळीं ब्रह्मदेवानें आम्हां हिंदूंना दिलेलें; मग त्यास हरताळ लावायाचा कीं काय ? छे, बापजन्मींही ही गोष्ट व्हावयाची नाहीं !–तेव्हां एतावता देशभाषेंत ग्रंथसमृद्धि होण्याची जी तिसरी तजवीज वर सांगितली ती निदान सध्यांच्या काळीं तरी वर सांगितल्याप्रमाणें असून नसून सारखीच आहे.

येथवर या विषयाचा तीन सदरांखालीं बराच ऊहापोह केला. आतां देशभाषांतून ग्रंथसमृद्धि होण्याचा आम्हांस एक निराळाच उपाय सुचला आहे त्याचा येथें विचार करून हा विषय आटपतों.

हा उपाय असा कीं, आमच्या नवीन विद्वानांनीं मुद्रणकर्माचें आधिपत्य आपणाकडे घ्यावें. आजपर्यंत या देशांतली पद्धति अशी चालत आली आहे कीं, इतर सर्व धंद्यांप्रमाणें छापखान्याचा धंदा हा अविद्वान् लोकच करीत आले आहेत.

इतर जसे उदरंभरि मंडळीचे उद्योग, त्यांतलेंच मुद्रणकर्म हेंही एक होऊन बसलें आहे. विद्वान् मंडळी आजपर्यंत सरकारी चाकऱ्यांत मुरून गेल्यामुळें, व राजसेवा ही आजपावेतों फलप्रदही बरीच असल्यामुळें, छापखान्याच्या वांटणीस मंडळी म्हणजे वरच्याच्या विरुद्ध वर्गातीलच आलेली आहे. शिवाय पाश्चात्य प्रभूंची सेवा म्हणजे मोठी प्रतिष्ठादायक व कामधंदा करून निर्वाह करणें म्हणजे हीन कर्म, अशीही समजूत आज दीर्घकाळ पावेतों लोकांच्या मनास खिळून राहिलेली आहे. तेव्हां या अनेक कारणांस्तव छापखान्यांचें काम आजपर्यंत अडाणी मंडळीच वहिवाटीत आली आहे. जें मुद्रणयंत्र अज्ञानाचा चुराडा करून टाकण्याविषयीं केवळ लोहयंत्रच, त्याची व्यवस्था कोणाकडे ? तर ज्यांस चार ओळींचा मजकूरही लिहितां यावा न यावा, किंबहुना ज्यांस सरासरी लिहितां वाचतां यावें, अशा मंडळीकडे. मग असली दुर्बळ मंडळी गोलंदाजी ती काय करणार ? व एकंदर राष्ट्रास गिळून बसलेला जो अज्ञानरूप महारिपु त्याचा विध्वंस कसा होणार ? तर हल्लींच्या काळीं आमच्या नूतन विद्वज्जनांस आम्ही वरील सूचना करतों. ती कालेंकरून अमलांत आली असतां वरील अद्भुत अस्त्राचा प्रभाव सर्वांस थक्क करून सोडील याविषयीं आम्हांस बिलकुल संशय नाहीं.

छापखान्याच्या कामावर विद्वान् मंडळीची देखरेख सुरू झाली असतां किती फायदे होतील ते पहा. एक तर काम चांगलें निघूं लागेल. चांगलें काम म्हणजे सुरेख छापणी आम्ही म्हणत नाहीं, तर शुद्ध व व्यवस्थित मजकूर असा आमचा अभिप्राय आहे. हल्लीं मोठमोठ्या छापखान्यांतून अशी व्यवस्था आढळते कीं, मालकाच्या गैरमाहितीमुळें शोधनाच्या कामावर शास्त्री वगैरे मंडळी ठेवावी लागते. या पराधीनतेमुळें किती अव्यवस्था होणारी आहे हें कोणाच्याही सहज लक्षांत येईलच. तर ज्या मंडळीच्या नजरेखालून इंग्रजी पुस्तकें नेहेमीं जावयाचीं व ज्यांस देशभाषेचें चांगलें ज्ञान झालेलें आहे, अशांचाच अधिकार सदरील कारखान्यांवर असला म्हणजे अनायासेंच विलायती नमुन्यावर पुस्तकें निघूं लागतील; म्हणजे व्याकरणाच्या संबंधाचे व व्यवस्थेचे वगैरे दोष सहज नाहींसे होणार आहेत. शिवाय अशा प्रकारच्या सुधारणांत अग्रगण्य जे पाश्चात्य देश, त्यांच्या संबंधाची वरील मंडळीस माहिती असल्यामुळें, व उत्तरोत्तर ती विशेष होत जाण्याचाही संभव, यामुळें अनेक प्रकारच्या सुधारणा नवीन सुरू होण्याचा मार्ग आहे हेंही स्पष्टच आहे. हें नुसत्या कामाच्या संबंधानें झालें. पण याहून अत्यंत महत्त्वाची एक गोष्ट सांगायाचीच आहे. ती ही कीं,

हल्लीं जी त्रिस्थळी यात्रा होत असते,—कीं पुस्तक मोठे श्रम करून रचावें एकानें, मग दुसऱ्याकडे जावें आणि मोठ्या मारामारीनें तें छापण्याचा योग आणावा, आणि मग येवढ्या भगीरथ प्रयत्नानें ग्रंथ निर्माण झाला म्हणजे मग नवऱ्यामुलीची वर योजना करतात त्याप्रमाणें त्याचा खप होण्याकरतां जोड्याचे टाके ढिले करावे, किंवा एका तिसऱ्याकडे तें विक्रयार्थ ठेवावें,—ही सारी पीडा वरील सोय झाल्यानें नाहींशी होणार आहे. जे विद्येचे भोक्ते तेच ग्रंथरचना करूं लागले म्हणजे वरील यातायात अर्थातच वांचणार आहे; किंवा निदान पक्षीं इतकें तरी होईल, कीं हल्लीं एखादें पुस्तक छापायास आलें असतां त्याविषयीं छापखान्याचा मालक जसा बुचकळ्यांत पडतो तसें तरी होणार नाहीं. चांगलासा ग्रंथ दिसल्यास त्याचा स्वीकार करतांना मनाची साशंकता राहणार नाहीं. असें झाल्यानें हळूहळू ग्रंथांच्या किंमती उतरून ते लोकांस सुलभतेनेंही घ्यावयास सांपडणार आहेत.

इंग्लंडांत हल्लीं जो ग्रंथसंग्रह येवढा होऊन प्रतिवर्षीं अपरिमित वाढतोच आहे, ही स्थिति अगदीं अलीकडची म्हणजे सरासरी शंभर वर्षांतली आहे. जॉन्सनच्या वेळेपर्यंत ग्रंथकार हे सरासरी उपाशीच मरत असत. जॉन्सनसारखा ग्रंथकार आणि 'न्यांबलर' सारखें निबंधपत्रक, पण त्याचे सारे ५०० अंक खपत असत. या एका गोष्टीवरून इंग्लिश भाषेंतील ग्रंथसंग्रह व इंग्लिश ग्रंथकारांची भरभराट या दोन्ही गोष्टी किती अलीकडच्या आहेत हें कोणाच्याही लक्षांत येईल. वरील गोष्ट आम्हांस मोठी उमेद आणण्यासारखी आहे. दुसरें असें कीं, वरील स्थित्यंतर जें झालें तें राजाश्रयानें किंवा बडे लोकांच्या औदार्यानें झालें असें नाहीं. त्याप्रमाणेंच प्रेजकमिट्या किंवा ग्रंथोत्तेजक मंडळ्या निघून त्यांनीं वरील श्रेय घेतलें असेंही पण नाहीं. तर फक्त 'बुकसेलर' म्हणजे पुस्तकविक्रीचा धंदा करणारे लोक यांच्या हातूनच हळूहळू वरील परमोत्कर्षाची अवस्था पूर्वोक्त राष्ट्रास प्राप्त झाली. या किताबवाल्यांनीं ग्रंथकारापासून पुस्तकांचा हक्क विकत घ्यावा आणि तीं छापून त्यांच्या विक्रीचा धंदा चालवावा अशी स्थिति होती, व ती अद्यापही चालत आहे. नवें पुस्तक झालें कीं त्याविषयीं वर्तमानपत्रांतून व मासिक पुस्तकांतून चर्चा चालू होते आणि त्याची जितपत योग्यता असेल तितक्या मानानें त्याची लोकांकडून संभावना होते. कदाचित् त्या वेळेच्या त्या वेळेस न झाली तरी कालेंकरून तरी होते. अशा क्रम चालतां चालतां हल्लीं अशी बहार आढळते कीं, अमुक अमुक पत्र ना, त्याच्या लाख प्रती दररोज उडतात व साऱ्या पृथ्वीवर रवाना होतात; अमुक अमुक मासिकपुस्तक तर

त्याला कोणीं चांगला निबंध लिहून पाठविला असतां त्याच्याकडे सबंध तोडा पाठविण्यांत येतो; आणि सबंध शेक्सपियर, मिल्टन् केवढ्याला ? तर आठ आण्यांला किंवा चार आण्यांला ! वॉल्टर स्कॉटच्या कादंबऱ्या लवकरच दोन दोन आण्यांला निघणार आहेत असें नुकतेंच जाहीर झालें आहे. नाहीं तर आमच्याकडे पहा. नुसते तुकारामाचे साडेचार हजार अभंग; आणि किंमत काय चार रुपये, आणि तीही पुनः स्वस्ताईची ! त्याप्रमाणेंच कालिदासाचा नुसता 'रघुवंश'; किंमत रुपये दोन ! हें तरी भाग्य दहापांच वर्षांतलेंच. त्यापूर्वी तर पंच काव्येंही सबंध पहायाला मिळायाची पंचाईत असे. अमक्या शास्त्र्यापाशीं अमका सर्ग आहे, तमक्यापाशीं तमका आहे, ही दैनावस्था !

तर आतां सरतेशेवटीं आमच्या विद्यापीठबांधवांस येवढीच सूचना पुनः करायाची कीं, त्यांच्यापैकीं कोणी जर मामलेदारकचेरींत पुस्तीवर बसायाचें सोडून देऊन किंवा विद्याधिपतींच्या बंगल्यावर जाऊन नामदेवाच्या पायरीपाशीं उभें राहून what do you want (कां आला ?) ही सलामी जी घ्यावयाची ती न घेतां वरील प्रकारें सरस्वतीची उपासना करण्याचें जर मनांत आणतील तर त्यापासून पुष्कळ चांगल्या गोष्टी होणार आहेत. ज्यांस आंग्लभौम व गीर्वाण या दोन्ही विद्या अनुकूल व अनेक शास्त्रांची माहिती, त्यांस ग्रंथरचना किती सुलभ हें सांगायाला नकोच; आणि त्यांतून मुद्रणव्यापाराचेंही स्वामित्व त्यांनीं पत्करल्यास किती अडचणी नाहींशा होणार आहेत, व लोकांत ज्ञानाचा प्रसार किती झपाट्यानें होणार आहे, हेंही वर दाखविलेंच आहे. तर हा आपल्या बंधूचा उपदेश आमची झगेवाली मंडळी चान्सेलरसाहेबांच्या हातून मिळालेल्या चर्मपत्राच्याबरोबर गुंडाळून ठेवून देणार नाहींत अशी उमेद बाळगून सरस्वतीच्या उपकरणांचा न्यास करतों.

वर्ष १, अंक ४२।४४।४५।४६.

उद्योगवृद्धि

आपल्या देशांत निरनिराळे उद्योगधंदे चालावे, व्यापार वाढावा, शेतकीची सुधारणा व्हावी, वगैरे विचार सर्व आधुनिक विद्वानांच्या मनांत घोळत आहेत; परंतु हे सर्व विचार सिद्धीस जाण्यास जे कांहीं गुण पाहिजेत ते बहुतेक आपणांत नाहींत, आणि ते अंगीं येण्याबद्दल प्रयत्नही आपण करीत नाहीं, ही आपणांस मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे. आजकाल अत्यंत भरभराटीस आलेले, विद्या, कलाकौशल्य व सुधारणा ह्यांत परम उन्नतीस पोंचलेले जितके देश आहेत, त्यांतील विद्वान् लोकांत व आपणांत भेद पाहिला तर तो मुख्यत्वेंकरून पुढील चार गोष्टींत दिसून येईलः–जिज्ञासा, शोधकपणा, उद्योग आणि धाडस. या चतुष्टयाचा आम्हांपैकीं बहुतेकांत अभाव आहे असें म्हणण्यास चिंता नाहीं. पाश्चिमात्य विद्वानांची जिज्ञासा, अथवा वस्तुमात्राचें ज्ञान होण्याविषयीं इच्छा, किती जबर आहे ह्याची आम्हांस कल्पनाही करितां येणार नाहीं. वातावरणाची उंची व व्यापकता किती आहे, त्याचे कोणते भागांत वारा किती जोरानें व कोणच्या दिशेनें वाहतो, कोणत्या भागांत किती थंडी आहे, व पृथ्वी, सूर्य, आणि तारागण या सर्वांमध्यें जें अगाध अंतर आहे तेथें उष्णमापकाचा पारा किती अंशांवर राहील; सूक्ष्मदर्शकासही अत्यंत अगोचर असे जे पदार्थांचे मूळ अविभाज्य परमाणु त्यांचें स्वरूप काय, आकार केवढा व त्या परस्परांमध्यें अंतर किती; इत्यादि अनेक प्रश्न त्यांच्या जिज्ञासेस साधारण होऊन गेले आहेत; व या प्रश्नांचीं उत्तरेंही देण्याविषयींच्या प्रयत्नांत अनेकांनीं आपल्या आयुष्याचे अमोलिक भाग खर्चिले आहेत.

या त्यांच्या जबर जिज्ञासेनुरूपच त्यांचा शोधकपणाही अवर्णनीय आणि आम्हांस कल्पनाबाह्य आहे. भूगर्भांत व महासागरांत मैल मैल खोल जाऊन तेथें सांपडणाऱ्या वस्तूंची परीक्षा करणें व त्यांचा संग्रह करणें; आकाशांतही विमानमार्गानें पांचसहा मैल वर चढून तेथील हवेचे नमुने आणून त्यांवर रसायनव्यापार करणें; नौकामार्गानें किंवा पादचारी होऊन पराकाष्ठेच्या दुर्गम प्रदेशांत प्रवास करून, जिवावरचीं संकटें सोसून तेथील रुमिकीटक, पशुपाषाण, वनस्पति इत्यादि सृष्टिजातांचें यथादृष्ट सूक्ष्म रीतीनें वर्णन करणें, इत्यादि सर्व गोष्टी पाश्चिमात्य विद्वानांत अगदीं साधारण होऊन गेल्या आहेत. शिवाय जिज्ञासा व शोधकपणा यांस उद्योग व धाडस यांचें जितकें पाठबळ असावें तितकें त्यांच्यांत पूर्णपणें आहे.

या चार गोष्टींमुळें गेल्या तीन शतकांत युरोपीय लोक जितक्या उन्नतीस आले आहेत तसें तितक्याच काळांत पूर्वी कोणतेंही राष्ट्र आलें नाहीं. आणि या चार गोष्टी द्रव्यप्राप्तिनिरपेक्ष स्वतंत्रतेनें शिकलेले तिकडील विद्वानांत वास करीत असल्याकारणानें चैनबाजी व आळस यांचा त्यांजवर फारसा परिणाम होत नाहीं; आणि तीं राष्ट्रें प्राचीन काळच्या रोम, ग्रीस, परशिया, व आपलें भरतखंड, यांप्रमाणें कांहीं वेळ भरभराटी अनुभवून पुढें काळाच्या दाढेंत सांपडतील असा संभव दिसत नाहीं.

आतां वरील गुणचतुष्टयाचा आमच्या आधुनिक विद्वान् मंडळींत किती अभाव आहे हें विशेष सांगावयास नकोच; तसें केल्यानें उगीच लेख मात्र वाढेल. परंतु ते अंगीं नसल्यानेंच केवळ आमचें पाऊल शास्त्रकलांमध्यें पुढें पडत नाहीं हें आज दाखविणें आहे.

अर्थशास्त्राच्या उपोद्घातांचेंही ज्यास यत्किंचित् ज्ञान आहे, त्यास माहीत असेलच कीं, सर्व कलाकौशल्यांचें प्रथम साधन सृष्टिजन्य पदार्थसंपत्ति हें होय. या संपत्तीवर शास्त्रप्रयोग करून त्यांचे गुणधर्म अवगत करून घेणें व तदनुसार कल्पना बसवून त्यांस व्यावहारिक उपयोगास लावणें एवढेंच मनुष्याचें काम आहे.

आपण ज्या प्रांतांत किंवा देशांत रहातों त्यामध्यें सृष्टिजन्य पदार्थसंपत्ति किती व कोणत्या प्रकारची आहे हें समजून घेणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे. परंतु हेंही काम आपण जोंवर अन्यदेशीयांवर सोंपवितों तोंवर आपला व्यापार, उद्योग किंवा वास्तविक सुधारणा होण्याची आशाच नको. जर आपणास सर्व देशपर्यटन करण्यास ऐपत, व फुरसत नसेल, तर शक्त्यनुसार जो कोणता भाग आपल्या दृष्टीस पडेल त्यांतच आपण आपला शोध चालविला पाहिजे. त्या भागांत असणाऱ्या सर्व प्रकारच्या जमिनीचे व मातीचे मासले मिळविणें, तेथील डोंगरांत व जमिनींत सांपडणारे जितके चमत्कारिक दगड वगैरे पदार्थ असतील त्यांचा, सर्व प्रकारच्या वनस्पतींचा, प्राण्यांचा व त्यांच्या अस्थिचर्मांचा संचय करणें, तेथील पिकांची उत्तम माहिती मिळविणें, हीं सर्व कृत्यें उद्योगी मनुष्याचे हातून सहज घडणारीं आहेत; व तीं नवीन विद्वानांनीं विशेषेंकरून हातीं घेतलीं पाहिजेत. इतकीं साधनें जवळ झाल्यावर शास्त्रप्रयोग करून त्यांचें गुणधर्मपरीक्षण करून घेणें हें कर्तव्य; व तिसरें, त्यांस व्यावहारिक उपयोगास लावण्याची खटपट.

वरती सांगितलेला संचय व शोध प्रत्येक सुजाण मनुष्याचे हातून होण्याजोगा आहे. परंतु आधुनिक विद्वानांस वृथा व्याख्यानांच्या, व स्वधर्मद्वेष, चेष्टा आणि

परदेशीयांचें निंद्य अनुकरण, यांच्या पलीकडे जाऊन, शांतपणें सृष्टिचमत्कार पहाणें, मानवजातीचे कल्याणाची आशा मनीं धरून सृष्टींतील द्रव्यांचा निरभिलाष शोध व संचय करणें ह्या गोष्टी अद्यापि कळूं लागल्या नाहींत.

ही सृष्टिजन्य संपत्ति जोंपर्यंत आपली आपणांस कळली नाहीं आणि तीवर शास्त्रप्रयोग झाले नाहींत, तोंपर्यंत उद्योगाचीं मूळ साधनेंच नाहींत, असें म्हणण्यास चिंता नाहीं; जोंपर्यंत आपलें भांडवल आपणांस माहीत नाहीं तोंपर्यंत व्यापार-वृद्धीची वृथा आशा बाळगून उपयोग तो काय ? आणि आपल्या देशाचे दारिद्र्या-बद्दल दुसऱ्यास दोष कां द्यावा ? वरील सूचना लक्षांत आणून आधुनिक विद्वान् कांहीं खटपट करितील अशी आमची उमेद आहे.

युरोपांतील जीं अतिशय सुधारलेलीं राष्ट्रें आहेत त्यांमध्यें व्यापाराची इतकी भरभराट कां, याबद्दल मागील निबंधांत एका कारणाचें विवेचन थोडक्यांत केलें आहे. त्या लेखांत लिहिलेल्या गोष्टींची पूर्ण परिस्फुटता पुढें करूं; परंतु व्यापार-वृद्धीचे दुसरे एका कारणाचा विचार करण्याचा आज आमचा विचार आहे. आमच्या लोकांत यात्रेखेरीज प्रवास करण्याची व देश पाहण्याची गोडी किती आहे, हें सर्वांस विदितच आहे. या कारणांमुळें ज्यांजवळ द्रव्यसाधन आहे त्यांसही इंग्लंड, फ्रान्स वगैरे देशांत व्यापार कोणत्या रीतीनें चालतो, त्याची बरोबर माहिती नाहीं, तथापि तिकडे उद्योग किती झपाट्यानें चालतो याची थोडी कल्पना मुंबई वगैरे ठिकाणीं गिरण्या स्थापन झाल्यापासून आम्हांस येत चाललली आहे. आमच्याच देशांतील कापूस, आमचेच थोडक्या वेतनांत तृप्ति मानणारे मजूरदार, इत्यादि अनेक गोष्टी आम्हांस अनुकूल असतां मँचेस्टरच्या व्यापाऱ्यांशीं आमची चालावी तशी चढाओढ चालत नाहीं याचें कारण काय असावें ? या प्रश्नाचा कोणीं विचार केला असतां त्यास सहज दिसून येईल कीं, तिकडील लोकांत असणारे दुसरेही कांहीं गुण आम्हांत उणे आहेत.

इंग्रज लोकांत जे अनेक धंदे व उद्योग सुरू आहेत, त्या सर्वांत यंत्रविद्येचा व शास्त्रज्ञानाचा होईल तितका उपयोग त्यांनीं करून घेतला आहे. हीं शास्त्रें, मीमांसा, न्याय, व्याकरणादि नव्हेत; हीं शास्त्रें पदार्थपरीक्षण, रसायन, भूगर्भ वगैरे होत. ह्या शास्त्रांचा त्या लोकांत इतका प्रचार आहे कीं, यःकश्चित् तिकडील शेतकऱ्यास

कामापुरतें त्यांचें ज्ञान असतें; आणि असण्याचें तरी कारण काय ? तिकडील लोकांत शास्त्रवेत्त्यांचें जितकें महत्त्व आहे तितकें कोणाचेंच नाहीं, असें म्हणण्यास चिंता नाहीं; व ह्या शास्त्रवेत्त्यांसही आपण संपादिलेल्या ज्ञानाचा प्रसार सर्वत्र व्हावा, अशी उत्कट इच्छा आहे. ज्यांनीं आपल्या लेखांनीं व शोधांनीं हल्लींच्या दिग्मंडळांत आपलें नांव गाजविलें, त्यांस लहान लहान मुलांस शास्त्राची गोडी लागून सुलभ रीतीनें ज्ञान मिळावें अशीं शास्त्रविषयांवर पुस्तकें लिहिण्यास किमपि शंका वाटत नाहीं. तसेंच दारिद्र्यस्थितीमुळें जन्मापासून कावाडकष्ट करण्याचें भाग पडल्यामुळें ज्ञानसंपादनास ज्यांस अवसर सांपडला नाहीं, अशा अडाणी लोकांसही त्यांच्याच सवडीप्रमाणें वेळींअवेळीं तदुपयुक्त विषयांवर व्याख्यानें देणें, किरकोळ धंद्यांतही शास्त्राचे महत्त्वाची त्यांस समजूत पाडून देणें, आणि तदनुसार त्यांस एखादी युक्ति दाखविणें, इत्यादि गोष्टींत त्यांस लज्जा किंवा मानहानि कोणतेही प्रकारें वाटत नाहीं; उलट गौरव आणि कृतकृत्यताच वाटते. मग तिकडील साधारण लोकांतही शास्त्रीय विषयांचें कामापुरतें ज्ञान आहे यांत नवल तें कोणतें ?

ही तिकडील विद्वान् लोकांची स्थिति झाली. आतां इकडील विद्वानांची स्थिति पाहूं. प्रथम इकडील विद्वानांत वर ज्यास शास्त्रसंज्ञा दिली आहे, त्याअर्थीं शास्त्रवेत्ते मुळींच नाहींत; इतकेंच नव्हे, तर शास्त्रविषयाचे वाचनावरून तरी, ज्यांस महत्त्व कळलें आहे अशांमध्येंही त्याविषयीं खरी अभिरुचि नाहीं. एका उदाहरणावरूनही याची कल्पना होण्याजोगी आहे. सरकारी इंग्रजी शाळांतून, जेथें मॅट्रिक्युलेशन परीक्षेपर्यंत अभ्यास चालतो, तेथें पदार्थविज्ञान, रसायन, ज्योतिष या विषयांचे अगदीं साधारण मूलतत्त्वांची समजूत विद्यार्थ्यांस पाडून देण्याकरितां थोडीं यंत्रें, कांहीं कांचपात्रें, व कांहीं रसायनें यांचा संग्रह असतो. ह्या वस्तूंचा योग्य उपयोग करून दाखविण्याचें काम बहुधा बी. ए. उपाधिधारकाकडे असतें. परंतु त्या वस्तूंचा या शाळांतून उपयोग किती होतो हें जर पाहिलें, तर बहुतेक ठिकाणीं तीं अकुशल लोकांच्या हस्तव्यापारांनीं नासूनफुटून गेलेलीं आढळतील; व कित्येक ठिकाणीं तर चिरकाल मोहोरबंद कुलुपांत राहिल्यानें केवळ सूर्यकिरणांसही तीं मुकलेलीं अशीं सांपडतील. मुलांस वरील विषय शिकविणें तें बहुधा तोंडीच चालतें व त्यांचा अभ्यास, म्हणजे ते विषय यथाशक्ति घोकून पाठ करणें, हा क्रम हल्लीं सुरू आहे. कॉलेजासारख्या ठिकाणींही दोनदोन तीनतीनशें रुपयांचीं दुर्भिणी वगैरे यंत्रें मोडून जातात व गाहाळ होतात, परंतु त्यांचा शोध वर्षेच्यावर्षे होत नाहीं; व भूगर्भशास्त्राचे महाप्रयासानें मिळ-

विलेले नमुन्यांची खिचडी होऊन त्या शास्त्राचे अज्ञानामुळें ते रस्त्यावरील खडीचे मोलाचे होऊन, त्यांचा त्याच कामीं उपयोग करण्याचा अधिकाऱ्यांच्या मनांत विचार येतो. अशी स्थिति पाहण्यास फार लांब जावयास नको. मग अशा विद्यालयांतून पसार होणारे मंडळींत शास्त्राची गोडी किती असेल ह्याचें सहजच अनुमान होतें. बहुतेकांचीं मनें अधिकाराच्या जागा मिळविण्याकडे, धनसंचयांत, इंद्रियगणांच्या विषयासक्ततेंत व निष्फळ गप्पा मारण्यांत, व फारच स्वदेशाभिमान चढला तर वाद-ग्रस्त विषयांचें अथवा स्वदेशनिरुष्टतेचें विवेचन करण्यांत अगदीं तल्लीन; व्यवहार-दृष्ट्या उपयोगाचीं कामें घडणें म्हणजे परम दुरापास्त. तसेंच पंडित व शास्त्री या शब्दांचा अगदींच संकोचित अर्थ करावा लागतो. ज्यानें आपलें आयुष्य, संस्कृत भाषेंतील प्राचीन ग्रंथ पठण करण्यांत अथवा त्यांचें चालन करण्यांत घालविलें व ज्यांचे आयुष्यांचें महाकृत्य म्हटलें म्हणजे त्या ग्रंथांवर स्वकपोलकल्पित कृप्ति बसविणें अथवा त्यांतच कोट्टिक्रम काढून दुसऱ्यास नडविणें, हें होय–अशा पूर्वीचे चालीच्या व अली-कडील विद्वानांस मात्र वरील संज्ञा लागूं पडतात. याप्रमाणें किती मौल्यवान् बुद्धीचा व उद्योगाचा निरर्थक व्यय होत आहे त्याचा वाचकांनींच विचार करावा व अशींच माणसें आपल्या भाराभर लेखांनीं दुढ्ढाचार्य होऊन बसतात व पुढील पिढीचे विद्या-र्थ्यांस अनुकार्य भासतात, हीही मोठी शोचनीय गोष्ट आहे.

आतां या संस्कृत शास्त्रांचे कचाट्यांतून सुटून, सत्प्रमाण, प्रयोगसिद्ध, सृष्टि-शास्त्राकडे अभिरुचिपूर्वक आमचें मन केव्हां लागेल तें लागो; परंतु तसें झाल्या-वांचून व्यापारवृद्धि वगैरे सर्व कल्पना लेखांत व व्याख्यानांतच राहण्याचा संभव दिसतो. नवीन विद्वानांतील ही उणीव दूर होण्याचा कांहीं तरी उपाय लवकर योजिला पाहिजे; व जागोजाग यंत्रसंग्रहालयें, पदार्थसंग्रहालयें, शास्त्रशिक्षण व कलाप्रयोग-शाला–यांची स्थापना झाल्याखेरीज वरील गोष्ट सिद्ध होईल असें वाटत नाहीं, इकडे आमचें सरकार लक्ष पुरवीत नाहींच; परंतु ज्या कांहीं थोड्या धनाढ्य सत्पुरुषांस आपल्या संपत्तीचा सद्व्यय करावासें वाटत असेल, त्यांनीं मुख्य मुख्य शहरीं तरी, जेथें आधुनिक विद्वानांचा व विद्यार्थ्यांचा बराच समाज असतो अशा ठिकाणीं, वरती सांगितलेल्या गोष्टींची स्थापना करण्याचें मनावर घ्यावें. तसें केल्यानें त्यांचें नांव चिरकाल राहील इतकेंच नव्हे, तर स्वदेशावरही त्यांचे महदुपकार होतील.

देशाची खरी उन्नति होण्यास व तेथील व्यापारधंदे उत्तम रीतीनें चालण्यास दोन प्रकारच्या मनुष्यांची फार अवश्यकता असते. पहिल्या प्रकारचीं मनुष्यें म्हटलीं म्हणजे सृष्टिशास्त्रांचे अभ्यासांत व शोधांत ज्यांचीं मनें इतकीं गढून गेलीं आहेत कीं त्यास त्यांतच परमानंद व कृतकृत्यता वाटून ऐहिक सुखें तुच्छ वाटूं लागतात, व ऐहिक दुःखांनीं त्यांच्या मनांचें स्वास्थ्य मोडत नाहीं; आणि त्यामुळें स्वाभाविक व व्यावहारिक अवश्यकता भागविण्याचे पलीकडे द्रव्यसंचय करणें त्यांस निरर्थक वाटतें व त्याचा ते कंटाळा करितात; तसेंच, आपल्या मागें आपली फारशी कीर्ति राहिली नाहीं तरी बेहेत्तर आहे, असें समजून ते तिची म्हणण्यासारखी पर्वाच बाळगीत नाहींत. दुसऱ्या प्रकारचीं मनुष्यें म्हणजे केवळ ह्यांच्या विरुद्ध होत. तीं अशीं कीं, ज्यांचा सर्व काळ द्रव्यप्राप्तीच्या विवंचनेंत जातो, ज्यांचा अभ्यास, विचार, शोध, कल्पना व कृति हीं सर्व केवळ अधिकाधिक द्रव्यप्राप्तीसाठीं असतात, व ज्यांस आपल्या आयुष्याची धन्यता त्यांतच वाटते. अशा दोनही प्रकारच्या मनुष्यांचें परस्परांशीं जुळत नाहीं. एकास दुसरा तुच्छ वाटत असतो, व प्रत्येक आपणांसच समाजाचा खरा हितकर्ता समजतो. परंतु समाजास दोनही प्रकारच्या मनुष्यांची अत्यंत गरज आहे, व त्यानें दोघांसही मान दिला पाहिजे. युरोपांतील व अमेरिकेंतील अतिशय सुधारलेले राष्ट्रांत दोनही प्रकारचे लोकांची मोठी संख्या आहे; तथापि पहिल्या प्रकारचे लोकांची मोठी संख्या सांप्रतकाळीं जर्मनी देशांत आढळते व दुसऱ्यांची अमेरिकेंतील संयुक्त राष्ट्रांत आढळते.

युरोपांत व अमेरिकेंत शास्त्रांचा उदय होऊन तीं इतकीं पूर्णतेस येण्यास मुख्य कारण पहिल्या प्रकारचे लोक होत. ग्यालिलिओसारख्यांनीं, मानहानि, बहिष्कार, व कारागृहवास सोसून, ज्योतिषशास्त्रावर विचार केला, रात्रंदिवस तारागणांचे अवलोकनानें अंधता प्राप्त झाली असतांही आपला छंद सोडिला नाहीं. रसायनशास्त्राचे कित्येक बिकट प्रयोग करीत असतां कोणीं आपले अवयव छिन्नभिन्न करून घेतले, कोणीं आपले डोळे फोडून घेतले, कोणी तर अगदीं प्राणासही मुकले, परंतु त्यांबद्दल त्यांनीं फारसा खेद मानिला नाहीं. विद्युच्छास्त्राचे प्रयोग करीत असतां कित्येक दोन दोन दिवस मूर्च्छित पडले व आकाशांतील विजेची परीक्षा करीत असतां एक मोठा धक्का बसून एका रशियन तत्त्वज्ञानें प्राण सोडिले. इकडील प्राचीन भाषांचा अभ्यास करण्यांत व त्यांपासून भाषाविज्ञानशास्त्राचे तत्त्वांची उपपत्ति करण्यांत कितीक जर्मन विद्वान् महाप्रयास करीत आहेत, याची वाचकांस कल्पनाही करितां

येणार नाहीं. याप्रमाणें पहिल्या प्रकारचे लोकांची प्राचीनकाळापासून आजपर्यंत युरोपांत निरंतर वृद्धि होत गेल्यानें त्यांमध्यें इतकीं शास्त्रें उत्कर्षास आलीं आहेत व त्यांविषयीं अद्यापिही मोठे शोध चालले आहेत.

आतां याप्रमाणें वरील शास्त्रें जों जों पूर्णतेस येत चाललीं तों तों त्यांमध्यें उद्योगही किती वाढला व व्यापारासही कसें उत्तेजन आलें, हें पुढील गोष्टीवरून उघड होईल.

युरोपांतील देशांत ज्या अनेक कला वास करीत आहेत, व ज्यांमुळेंच आज ते इतक्या भरभराटींत व सुखांत आहेत, त्या सर्व सृष्टिशास्त्रांचें पूर्ण अवलंबन करून चालल्या आहेत; आणि एक कला म्हटली म्हणजे ती एकाच शास्त्रावर अवलंबून असते असें नाहीं; ह्या गोष्टीची पूर्ण परिस्फुटता होण्यास वाचकांनीं त्या कला प्रत्यक्ष पाहिल्या पाहिजेत इतकेंच नव्हे, तर त्यांस शास्त्राभ्यासही पाहिजे. तथापि पुढील एका उदाहरणावरून कांहीं कल्पना करतां येईल. इंग्लिश लोकांचें स्वदेशीं स्वतंत्र राज्य असण्यास, हिंदुस्थान वगैरे ठिकाणीं त्यांचें राज्य स्थापन होण्यास व तें कायम रहाण्यास, व सर्व जगभर त्यांचा दरारा व त्यांचा व्यापार पसरण्यास मुख्य कारण पाहिलें तर त्यांचें नौकागमनकलेचें उत्तम ज्ञान होय. यावरून या कलेचे ज्ञानाची योग्यता वाचकांचे ध्यानांत येईल. आतां ह्या कलेस किती शास्त्रांची मदत आहे पहा. अफाट समुद्रांत, जेथें क्षितिजापर्यंत भोंवताली कोठेंही जमिनीचा तिलमात्र भाग दृष्टीस पडत नाहीं तेथें, चंद्र, सूर्य, ग्रह व नक्षत्रें आणि होकायंत्र यांवर काल व मार्ग दाखविण्याचें काम सर्वस्वीं पडतें, आणि मोठमोठ्या सफरींत सहा सहा महिने खलाशांस त्यांवर अवलंबून रहावें लागतें. आतां सूर्यचंद्रादिकांची एकाच जागची दैनंदिन व आयनिक गति बिनचूक निश्चित करणें किती कठिण आहे; व याप्रमाणें पृथ्वीवरील दोनही गोलार्धांतील सर्व ठिकाणची गति निश्चित करणें त्याहूनही किती प्रयासाचें आहे, व खलाशांचे उपयोगाकरितां ती वर्ष वर्ष आधीं ठरवून पंचांगें तयार करण्यास ज्योतिषाचें व गणिताचें किती ज्ञान पाहिजे, ह्याची वाचकांनींच कल्पना करावी. मग त्यास ग्यालिलिओ, न्यूटनप्रभृति ज्योतिषज्ञ व गणितज्ञ मंडळींचे श्रमाचें साफल्य व त्यांचे जगावर उपकार किती आहेत हें सहज लक्षांत येईल. परंतु ज्योतिष व गणित इतक्यांनींच काम होत नाहीं. होकायंत्रांतील मुख्य भाग जो लोहचुंबक त्याचीं टोकें सर्वत्र दक्षिणोत्तर नसतात; तीं भिन्न प्रदेशीं दक्षिणोत्तर रेषेशीं भिन्न भिन्न कोन करितात. शिवाय जहाजास लाविलेले लोखंडी पत्रे

वगैरे यांमुळें दिशापरत्वें त्यांवर भिन्न परिणाम होतात. त्यामुळें लोहचुंबकाकर्षण-शास्त्राची नौकागमनविद्येस फारच गरज पडते; म्हणून, हंबोल्टसारख्या ज्या तत्त्वज्ञानी अतिजिज्ञासुत्वानें लोहचुंबकाच्या समानाकर्षणाच्या वगैरे रेखा उभय गोलार्धांवर शोधून काढिल्या व त्यांचे नकाशे तयार केले त्यांचेही मनुष्यजातीवर केवढे उपकार असले पाहिजेत ! त्याप्रमाणेंच जहाजें मोठ्या वेगानें व मनुष्याच्या थोड्या श्रमानें चालविण्यासाठीं वाफेची योजना त्यांमध्यें झाली आहे; त्यामुळें उष्णतेच्या शास्त्राचें साहाय्य लागतें. जहाजें सुरक्षितपणें पोंचलीं कीं नाहीं वगैरे जाणण्याकरितां समुद्रतलगामी तारायंत्रें लागतात, त्यांमुळें आणि जहाजास आकाशांतील विजेपासून अपाय न व्हावा म्हणून, विद्युच्छास्त्राचीही चांगली मदत लागते. समुद्रांत भिन्न ठिकाणीं अनुकूल वारा केव्हां सुटतो व प्रतिकूल केव्हां सुटतो, तुफानाच्या जागा व वेळा कोणच्या, समुद्राचे भरती ओहोटीचे समय कोणते व मोठमोठे जलप्रवाह कोठें कोणत्या दिशेनें वाहतात, इत्यादि माहिती ही पूर्वीच भूवृत्तवर्णनशास्त्रावरून समजून घेतली पाहिजे, व तिचे नकाशे बाळगिले पाहिजेत. शिवाय या व दुसऱ्या ज्या शास्त्रांची मदत नौकागमनविद्येस लागते त्यांस उपयुक्त सर्व यंत्रें दुसऱ्या अनेक शास्त्रांचे मदतीनें तयार झालीं पाहिजेत. इतकी तयारी केल्यावर मग एक नौकागमनकला पूर्णपणें सिद्ध होते. त्याअर्थी या एका कलेमुळें कितीक धंदे व उद्योग निघाले असावे हें उघड आहे; व त्या सर्वांचे मुळाशीं कोण, तर ज्यांनीं सृष्टिशास्त्राचेच अभिरुचीनें व परमानंदानें सेवन केलें, आणि सुखाची, किंवा द्रव्याची, किंवा कधीं कधीं, आपल्या जीविताचीही फिकीर न करितां केवळ जिज्ञासेच्याच उत्तेजनानें अनेक शोध लाविले ते लोक होत. मनुष्य जातीवर त्यांचे अनंत उपकार झाले आहेत; आणि ज्यांनीं त्यांच्यासारखेंच आयुष्य क्रमण्याचा निश्चय केला आहे, त्यांस मागील शास्त्रवेत्त्यांचे उपकार स्मरून, आपण फार मान दिला पाहिजे व त्यांस व्यवहारांत कोणत्याही प्रकारें कमी न पडेल अशी व्यवस्था ठेविली पाहिजे. तशी व्यवस्था सर्व युरोपियन व अमेरिकन लोकांनीं व तेथील सरकारांनीं ठेविली आहे, व म्हणूनच सांप्रत त्यांची इतकी भरभराट होत चालली आहे. अशा प्रकारचे लोकही आपणांत नाहींत व ते असते तरी त्यांचा यथोचित मानही ठेवण्याची आम्हांत अद्यापि अक्कल नाहीं ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. याप्रमाणें एक प्रकारचे मनुष्यांचें वर्णन झालें.

मागील निबंधांत शास्त्राभ्यास आणि शोध यांतच केवळ निमग्न अशा लोकांपासून समाजाचा कसा फायदा होतो हें दाखविलें. परंतु लक्षपूर्वक थोडा विचार केला तर वाचकांच्या सहज लक्षांत येईल कीं, हा फायदा शास्त्रवेत्त्यांच्या हातून प्रत्यक्ष होत नाहीं; व तो न होण्याचीं दोन मुख्य कारणें आहेत. त्यांची व्यावहारिक गोष्टींविषयीं उदासीनता व दुसरें त्यांचें सामान्यतः दारिद्र्य.

जगांत व्यवहार कोणत्या रीतीनें चालतात, सामान्य लोकांत मानमान्यता कोणत्या रीतीनें वाढते, वरिष्ठांचीं व कनिष्ठांचीं मनें वळवून आपलें काम कसें साधून घ्यावें, लौकिक, आचारविचार यांचे अनुरोधानें कितपत वागलें पाहिजे, व्यवहारांत मोठ्या संकटाचीं स्थानें कोणतीं, इत्यादि गोष्टी शिकण्यांत, म्हणजे, जगाचा खरा अनुभव संपादन करण्यांत जो काळ इतर लोक खर्चितात, तो शास्त्रवेत्त्यांचा बहुधा अभ्यासांत जातो. याच अभ्यासामुळें वरील विषय त्यांस तुच्छ वाटूं लागतात; व आपल्या मानसिक शक्तींचा तिकडे उपयोग करणें यांत त्यांस एकप्रकारें हीनता वाटते. तथापि वरील गोष्टींचें ज्ञान मनुष्यास असल्यावांचून त्याची जगांत भरभराटी होऊं शकत नाहीं; व शास्त्रवेत्ते लोकांस साहजिकपणेंच दरिद्रस्थितींत समाधान वाटूं लागतें.

याप्रमाणें त्यांच्या मनाची स्थिति झाल्यावर त्यांचा द्रव्यप्राप्तीचा मार्गच खुंटला. द्रव्यप्राप्तीचें मुख्य साधन म्हटलें म्हणजे ज्ञान, व तदनुरूप श्रम. ज्यांनीं केवळ सृष्टिशास्त्रसंबंधींच ज्ञान संपादन केलें आहे, त्यांस त्या ज्ञानाचा व्यावहारिक लोकांस उपयोग करून देणें हाच काय तो द्रव्यप्राप्तीचा उपाय आहे, आणि तत्संबंधानें त्यांनीं श्रम केले पाहिजेत; परंतु जेव्हां सृष्टिशास्त्राचे निरनिराळे भागांवर भिन्नभिन्न प्रदेशीं अनेक शास्त्रवेत्ते परिश्रम करीत असतात आणि आपल्या नवीन शोधांस लेखद्वारा किंवा भाषणद्वारा प्रसिद्धि देण्यास सतत झटत असतात त्यावेळीं सर्वांचींच मनें परस्परांच्या शोधांचें भिन्न मार्गानें तत्त्वपरीक्षण करण्याकडे लागतात आणि तसें करीत असतां, झालेल्या शोधांचे परिणाम काय होतील, हें पाहाण्याकडे त्यांचें मन वळतें; व येणेंप्रमाणें पुनः अनेक शोधांच्या कल्पना त्यांपुढें उभ्या राहून त्यांचें मन व्यग्र करितात. अशा स्थितींत सदोदित असलेल्या शास्त्रवेत्त्यांचें लक्ष, बहुतकरून, कोणत्या शोधाचा कोणत्या कलेस उपयोग होईल, व तो होण्यास कोणती युक्ति काढावी, कशा प्रकारें यंत्र तयार करावें, इत्यादि गोष्टींकडे जात नाहीं; व गेलेंच तर ती युक्ति सिद्ध करण्याकडे, किंवा तें यंत्र सुरू करण्याकडे, आपला वेळ खर्च करण्याचें त्यांस योग्य वाटत नाहीं.

याप्रमाणें केवळ अभ्यास व शोध यांतच निरंतर गढून गेलेल्या अशा शास्त्रवेत्त्यांचे हातून समाजाचें प्रत्यक्ष हित बहुधा होत नाहीं. तथापि त्यांपासून अप्रत्यक्ष जो समाजाचा फायदा होतो त्यावर नजर देऊन, युरोप व अमेरिकेंतील अत्यंत सुधारलेल्या राष्ट्रांत त्यांच्या उत्तेजनासाठीं लोकांनीं व सरकारांनीं अनेक उपाय योजिले आहेत. आपल्या इकडे जशा युनिव्हर्सिट्या आहेत त्याप्रमाणेंच युरोप व अमेरिकेंतही आहेत; परंतु त्यांची रचना इकडच्यापेक्षां फार भिन्न आहे. इकडील युनिव्हर्सिटींत, ज्यांस शास्त्राची खरी आवड व गोडी आहे, अशा लोकांस स्वतंत्रपणें आपलें अध्ययन चालवून सुखानें रहतां यावें अशी कांहींच सोय नाहीं; आणि त्यामुळें तशा लोकांस उत्तेजन देतां येत नाहीं. म्हणून कालेजांत प्रोफेसर बनून राहिलेल्या आणि ऐषआरामांत काळ घालविणाऱ्या, किंवा विद्यार्थ्यांजवळ आपली अब्रू कशी बचावेल या विवंचनेंत असणाऱ्या अशा शिक्षकांसच विद्वान्, शास्त्रज्ञ व प्रोफेसर म्हणण्याची आम्हांवर पाळी आली. ही स्थिति वरती सांगितलेल्या देशांत नाहीं. ज्यांनीं आपल्या लेखांनीं, भाषणांनीं व कृतींनीं शास्त्रज्ञ ही पदवी मिळविली आहे, अशा लोकांसच तेथें युनिव्हर्सिटींतून नेमणुका करून दिलेल्या असतात, त्यांस त्यांच्या अध्ययनानुरूप शास्त्रीय विषयावर व्याख्यानें वगैरे देण्याचें माफक काम दिलेलें असतें, व यंत्रसामुग्री, पदार्थसंग्रह इत्यादि गोष्टींकरितां युनिव्हर्सिटींतून निराळें उत्पन्न करून दिलेलें असतें. त्यामुळें शास्त्रज्ञांस तिकडे अतिशय उत्तेजन येऊन दरसाल नव्या नव्या शोधांनीं शास्त्रीय विषयांची दिवसानुदिवस अधिकाधिक परिस्फुटता होत आहे, आणि शास्त्रवेत्त्यांनीं लिहिलेले अनेक लहान मोठे ग्रंथ लोकांच्या हातीं पडत आहेत. आमच्या इकडे वरील गोष्टींची उणीव असल्यामुळें शास्त्रसंबंधानें आम्हांमध्यें अद्यापि पूर्ववत् अंधार आहे; व त्या बाबतींत लोकांकडून कांहीं खटपट झाल्याखेरीज आमची दीनस्थिति दूर होण्याची आशा नाहीं. इंग्लंड, जर्मनी, अमेरिका वगैरे देशांत युनिव्हर्सिटींस जीं येवढालीं उत्पन्नें आहेत, तीं बहुधा श्रीमान् व समंजस लोकांकडून त्यांस मिळालेलीं आहेत; आणि आमच्याही श्रीमान् लोकांनीं त्यांचें अनुकरण केल्याखेरीज तिकडील युनिव्हर्सिटींचे हातून जसें लोकांचें हित होत आहे तसें इकडील युनिव्हर्सिटींचे हातून होणार नाहीं; व त्यांमध्यें सुधारणाही होणार नाहीं.

देशांत उद्योगधंद्याची बढती होण्यास दोन प्रकारच्या मनुष्यांची अवश्यकता असते, असें मागील एका अंकांत सांगितलेंच आहे; त्यांपैकीं एकप्रकारच्या मनुष्यांचें म्हणजे केवळ शास्त्रवेत्त्यांचें वर्णन गेल्या दोन अंकांत केलें; या अंकांत दुसऱ्या प्रकारच्या म्हणजे व्यवहारज्ञ व धनलुब्ध अशा लोकांची देशास आवश्यकता दाखविणें आहे.

इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी व अमेरिकेंतील संयुक्त राज्यें या देशांत उद्योगाचा इतका उत्कर्ष होण्यास व देश इतके संपत्तिमान होण्यास जीं कांहीं मुख्य कारणें आहेत, त्यांपैकीं त्या देशांत व्यवहारज्ञ व धनप्राप्तीकरितां महान् प्रयास करणारे अशा लोकांचें अत्यंत प्राचुर्य हें एक आहे. आमच्या देशांतही अशा प्रकारच्या मनुष्यांचा भरणा कमी आहे असें नाहीं; तथापि तिकडील लोकांत व आपणांत एकप्रकारचें महदंतर दृष्टीस पडतें. तिकडील लोकांत जो विलक्षण शोधकपणा व धाडस आहे त्याचें मागेंच वर्णन केलें; हे दोन गुण तिकडील व्यवहारज्ञ मंडळींतही पूर्णपणें वास करितात. व्यवहारांत श्रम करून उपजीवन करणारे जितके लोक आहेत, त्या सर्वांचे अंगीं कांहींना कांहीं तरी कसब असतें; परंतु या कसबाचा पूर्णपणें कसा उपयोग करून घ्यावा हें तिकडील लोकांसच खरें माहीत आहे. लोकांच्या नित्य व्यवहारांत किंवा मोठमोठ्या कारखान्यांतून ज्या अनेक गैरसोई किंवा अडचणी दृष्टीस पडतात, त्यांतून आपल्या कौशल्यानें किती दूर होण्याजोग्या आहेत, अशा प्रकारचा शोध प्रत्येकजण तिकडे करीत असतो; त्याचप्रमाणें अवलोकनांत जे जे पदार्थ येतात, त्यांमध्यें आपल्या कसबानें कोणती सुधारणा करितां येईल अथवा कोणती नवी तूम काढिली असतां आपण तयार केलेल्या वस्तु लोकांच्या नजरेंत विशेष भरतील किंवा त्यांस विशेष फायदेशीर होतील, हे विचार नेहमीं त्यांच्या डोक्यांत घोळत असतात. तिकडील कसबी व्यापारी लोकांचा असा सदोदित शोध सुरू असल्यानें दरसाल नवीन नवीन अनेक सुधारणा तिकडील सर्व पदार्थांत होत आहेत; आणि नवीन नवीन तऱ्हा प्रचारांत येत आहेत. एका महान् फ्रेंच तत्त्ववेत्त्यानें असें लिहिलें आहे कीं, अमेरिकेंत जीं जहाजें बांधितात तीं इंग्लंड किंवा फ्रान्स येथल्याप्रमाणें बळकट व टिकाऊ नसतात; व याचें कारण तिकडील लोकांस विचारिलें असतां ते असें उत्तर देतात कीं, आज आम्हीं बळकट व टिकाऊ जहाजें बांधिलीं आणि थोडक्याच दिवसांत जर जहाजांची कांहीं नवी तऱ्हा निघून तीच लोकांस विशेष सोईची व फायद्याची वाटूं लागली तर आमचे पैसे पाण्यांत

फुकट जाणार ! याचप्रमाणें बहुतेक यंत्रांची व दुसऱ्या पदार्थांची तिकडे स्थिति आहे; आणि उद्योगधंदा जारीनें चालून सर्वत्र वाढती सुधारणा आपल्या दृष्टीस पडते. परंतु याचें मुख्य कारण काय ! तर आपला धंदा बरा चालला आहे, मग उगीच अधिक खटपट करून जिवास दगदग कां या-अशा प्रकारचे समाधानवृत्तीचे विचार त्यांच्या मनांत कधींही येत नाहींत, हें होय.

शिवाय, तिकडील लोकांस एकंदरीनें विशेष शिक्षण मिळालेलें असतें आणि ज्यांनीं द्रव्यप्राप्तीकरतांच भिन्न भिन्न शास्त्रांचा अभ्यास केला आहे अशा लोकांचें त्यांस पुष्कळ साहाय्य असतें. कोठें कोणत्याही शास्त्रांत कांहीं नवीन शोध लागला कीं तें शास्त्र जाणणारे लोक होईल तितक्या जलदीनें तो व्यवहारांत कोठें कसा उपयोगांत आणितां येईल या खटपटीस लागतात; आणि कोणी कारागीर किंवा कसबी मनुष्य हातीं धरून कोणी एखादें यंत्र, कोणी औषध, कोणी दुसरें कांहीं-याप्रमाणें तयार करून प्रसिद्ध करितात; व त्यांचीं पेटंटें काढून त्यावर पैसे मिळवितात.

कोणी नवीन कल्पना काढूनही ती व्यवहारांत आणण्यास त्याजवळ पैसे नसतील तर पुढच्या आशेवर त्यास ते देण्यासही बिलकूल मागेंपुढें न पहाणारे लोक तिकडे आहेत; व या तिघांचा योग्य मिलाफ झाल्यानें कोणासही अडचण पडत नाहीं.

याप्रमाणें तिकडे जी घडामोड चालली आहे तिची आमच्या लोकांस कल्पनाही करितां यावयाची नाहीं, व तिचीं उदाहरणें द्यावीं तितकीं थोडींच. दूरध्वनिवाहक तारायंत्रें, विजेचे दिवे, आणि वाफेनें चालणारीं अनेक यंत्रें आमच्या लोकांस अलीकडे माहीत झालींच आहेत, परंतु या मोठ्या गोष्टी सोडून केवळ आम्हां हिंदु लोकांच्याच सोईकरितां त्या लोकांनीं कापड वगैरे जिनसांत किती तऱ्हा काढिल्या आहेत, इकडे वाचकांनीं लक्ष द्यावें. आमच्या शेतकऱ्यांचे ओबडधोबड नांगर पाहून त्यांच्या उपयोगी पडतील असे सुधारलेले नांगर विलायतेहून अलीकडे इकडे येऊं लागले आहेत, हें वाचकांपैकीं कित्येकांस माहीत असेलच. आतां ते असावे तितके स्वस्त अद्यापि नाहींत ही गोष्ट निराळी. पुण्यांत निघालेल्या रामपंचायतनाचे चित्रांचा चांगला खप होतो हें कळतांच अमेरिकेंतून रामपंचायतनाचीं पांचपन्नास हजार चित्रें आलीं; आतां आमच्या पुराणांत सांगितल्याप्रमाणें जरी रामादिकांचीं स्वरूपें नाहींत तरी कागदाची व रंगाची सफाई आणि त्यांची अत्यंत कमी किंमत हीं पाहून मनास आश्चर्य वाटतें. आम्ही भाविक व भोळे हिंदु कदाचित् आपल्या

देवाचें सकृद्दर्शनीं चित्र पाहून एखाद्या कापडाची खरेदी करूं म्हणून म्यांचेस्टरवाले आमचीं सर्व पुराणें चित्ररूपानें ताग्यावर उतरून देतील असा संभव दिसतो!

असो; याप्रमाणें तिकडील व्यावहारिक लोकांचा द्रव्यप्राप्तीचा मार्ग सांगितला, व त्या योगानें तिकडील लोकांचा कसा उत्कर्ष झाला हेंही दिग्दर्शित केलें. त्या लोकांहून आमच्या लोकांची किती निराळी स्थिति आहे हें सांगूं लागल्यास हा लेख फारच लांबेल; सबब तसें आम्ही करीत नाहीं; परंतु आमचे कारागीर व इतर लोक त्या लोकांचें योग्य अनुकरण करतील अशी आमची उमेद आहे. नाहीं तर विलायती वस्तूंचा इकडे किती प्रसार होईल हें सांगवत नाहीं. आमच्या घरांतील व्यवस्थेसंबंधीं अद्याप इंग्रज लोकांस बरेंच अज्ञान असल्यामुळें आणि आमची गायनकला, वैद्यकी वगैरेंची त्यांस अद्याप कल्पना नसल्यामुळें त्यांनीं अझून इकडे फारसा हात घातला नाहीं; नाहींतर आळसामुळें आमचे रहाट, जातीं, कुंचे वगैरे; आमच्या सतारी, विणे वगैरे; आणि कदाचित् मात्रा सुद्धां,—सर्व विलायतेहून व अमेरिकेहून सुधारून येण्याचें भय आहे; व त्यांचा प्रथम मुंबईसारख्या शहरीं प्रसार होऊन पुढें तीं सर्व हिंदुस्थान व्यापून आमच्या आधींच गांजलेल्या कारागीर वगैरे लोकांच्या अन्नावर पाणी आणितील कीं काय कोण जाणे!

[वर्ष २।३, अंक ५।२।१।३।१५.]

निजामास राज्याभिषेक.

इंग्रज लोकांची या देशांत छाप बसूं लागल्यावर नेटिवांचा तट सोडून इंग्रजांच्या छत्राखालीं ज्या संस्थानांनीं आश्रय घेतला त्यांत पहिलें संस्थान निजामशाही होय. या पक्षांतरास धूर्तता म्हणा, दूरदृष्टि म्हणा, किंवा दुसरें कांहीं म्हणा; येवढें खरें आहे कीं निजामाच्या घराण्यानें इंग्रजांशीं सर्वांअगोदर मैत्री केल्यामुळें मोंगलांकडे सर्वांत मोठें संस्थान राहिलें आहे. निजामांच्या पाठीमागून गायकवाड, शिंदे, होळकर वगैरेंचीं संस्थानें क्रमाक्रमानें इंग्रजांशीं स्नेह करीत गेलीं, व त्याप्रमाणें उतरत्या मानानें त्यांच्याकडे प्रांत व जहागिरी चालू आहेत. हीं संस्थानें निजामांचा कित्ता उचलून कांहीं वेळ झुंझत न राहतां इंग्रजांशीं एकदम मैत्री करतीं तर आतां आहेत त्यापेक्षां परिघानें मोठीं असतीं किंवा नाहीं याची चर्चा करीत बसणें म्हणजे अप्रासंगिक गोष्टींच्या विचारांत पडून प्रस्तुत विषयाकडे कानाडोळा करणें होय. तरी इतकें खरें आहे कीं सरते बाजी अखेरपर्यंत शस्त्राच्या लटपटी करीत राहिले म्हणूनच पुण्यांत इंग्रजांचा झेंडा लागला. तसें ते न करते तर पुणें व त्याच्या सभोंवतालचा बराच मुलूख ब्राह्मणी राज्याचा अनुभव घेत असता, व मराठी राज्यवृक्षाच्या दूरदूरच्या खांद्या अर्ध्यामुर्ध्या जिवंत असतां मूळ सोंट समूळ अंतर्धान पावल्यामुळें सध्यां जो सखेदाश्चर्य विस्मय उत्पन्न होतो, तो होताना. बाकी, पेशवाई ठार बुडून इंग्रजी झाली हें बरें झालें; किंवा पेशवाईची कांहीं शेंडी मागें राहती तर बरें होतें; अथवा इंग्रजांच्या आजूबाजूला कांहीं नेटिव संस्थानें भाड्याच्या गाड्याप्रमाणें आपले राज्यशकट ओढीत आहेत हें बरें, किंवा सगळ्या हिंदुस्थानभर इंग्रजांचें साम्राज्य झालें असतें तर बरें झालें असतें; असल्या मार्थेफिरवूं राज्यविषयक विचारांच्या जाळ्यांची गुंतागुंत सोडवीत बसण्यांत कांहीं हाशील नाहीं; निदान तसें करण्याचा हा प्रसंग नव्हे, व हें स्थलही नव्हे. तर मग कोणी असें म्हणतील कीं ही विनाकारण खाजवून खरूज काढलीत तरी कशासाठीं ? त्यावर आमचें उत्तर येवढेंच आहे कीं निजामसरकाराची व इंग्रजसरकाराची फार दिवसांची दोस्ती आहे ही गोष्ट वाचकांच्या नजरेस आणावी असें मनांत आल्याबरोबर तिच्याशीं खिळून असलेल्या या कल्पनाही डोळ्यापुढें उभ्या राहिल्या, व आमच्या नित्याच्या नियमांप्रमाणें वेळअवेळ न पाहतां त्या आम्हीं आपल्या वाचकांस सांगून टाकल्या. दिल्लीदरबाराला निजामसाहेब गेले नाहींत म्हणून सर सालरजंग यांजवर ज्या धूर्ततेचा

आरोप आला तिच्या प्रतिबिंबाचें प्रतिबिंब मुद्दां वरील ओळींत नाहीं. तथापि त्यांत मी अमुक पाहीनच, किंवा त्यांतून अमुक काढीनच असा कोणी हट्टच धरून बसला तर त्याला आमचा नाइलाज आहे, व या स्वातंत्र्यप्रचुर एकुणिसाव्या शतकांत ज्याला त्याला आपलें मत पाहिजे तसें भडकूं देण्याचा पूर्ण अधिकार आहे. असो.

कोणत्याही राज्याभिषेकाची हकीकत द्यावयाची म्हणजे मंडपवर्णनापासून तिला आरंभ करणें जरूर आहे. पण या महाराष्ट्र देशाला, निदान त्याच्या या भागाला तरी राज्याभिषेक कसे होतात हें अलीकडे बऱ्याच वर्षांत माहीत नसल्यामुळें, व विशेषेंकरून मुसलमानी राज्याभिषेक न पाहिल्यास फारफार वर्षें झालीं असल्यामुळें, त्याची रुचि त्यांवरून अगदीं उडाल्यासारखीच झाली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. शिवाय, जंगीजंगी इंग्रजी पत्रांनीं आज आठनआठ दिवस पुनः पुनः उष्टावून बेचव केलेली बातमी आम्हीं आपल्या ताटांत घेतली तर बहुशः ती आमच्या चिकित्साखोर वाचकांस आवडणार नाहीं अशी भीति वाटते. सबब तख्त कोठें मांडलें होतें व त्यावर कसलें कापड घातलें होतें, निजामाच्या डाव्या हातास कोण व उजव्या हातास कोण बसला होता, "मडमलोकांसाठीं" कशी व्यवस्था ठेविली होती, कोण आला त्या वेळेस किती तोफांची सरबत्ती झाली, व कोणत्या पलटणींनें कोणती चीज कुर्ते वाजविली वगैरे आमच्या दृष्टीनें इकडील वाचकांस उदासीन किंवा शिळ्या गोष्टी सांगत न बसतां हिंदुस्थानांतील सर्व लोकांनीं व मुख्यत्वेंकरून नेटिवराजांनीं ध्यानांत ठेवण्यासारखा लार्ड रिपन यांनीं निजामांस या उत्सवाच्या समयास जो सदुपदेश केला त्याचें अगदीं तुरळक तात्पर्य देतों.

"निजामसाहेब, या मंगलप्रसंगीं बादशाही राणीचा प्रतिनिधि या नात्यानें मला येथें येतां आलें ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. इंग्रजसरकारचा निजामाच्या घराण्याशीं फार दिवसांचा घरोबा, व हैद्राबादेंत पाऊल ठेवणारा पहिला गवर्नर-जनरल मीच-या दोन गोष्टींमुळें मला फार आनंद होत आहे. या समयास येण्याविषयीं आपण मला निमंत्रण केलें, व मीं तें आमच्या राणीविषयीं व राज्याविषयीं आपल्या अत्यंत भक्तीचें व्यंजक जाणून स्वीकारिलें, व त्याप्रमाणें निघून आलों. असो. अशा उत्सवाच्या प्रसंगीं या संस्थानाचा एक इमानी नोकर नसावा ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. आपल्या अल्प वयामुळें ज्याला या संस्थानाबद्दल अनेक तऱ्हेनें खस्त खावी लागली, ज्यानें मोठमोठ्या अडचणीस न जुमानतां या

संस्थानच्या सुधारणेसाठीं भगीरथ प्रयत्न केले, ज्यानें ऐन आणिबाणीच्या प्रसंगीं-सुद्धां आपल्या राजनिष्ठेस व प्रामाणिकपणास तिळभर देखील ढळूं दिलें नाहीं, ज्यानें आपल्या चातुर्यानें, बुद्धिमत्तेनें, व शहाणपणानें ब्रिटिशसरकाराशीं अप्रतिहत स्नेह राखून स्वामिकार्य साधण्याविषयीं अस्खलित दक्षता प्रकट केली, तो हिंदुस्थानांतील पहिल्या प्रतीचा राजकार्यधुरंधर आज नसल्यामुळें या शुभकार्यास गौणता असल्यासारखें मला वाटत आहे. सर सालरजंगाचा अनुभव व त्याची योग्यता काय सांगावी? मला एकदां असें वाटलें होतें कीं आपण वयांत येऊन मसनदीवर बसल्यावर तो दर्दी आपल्या बाजूस उभा राहून राज्यसुकाणु कसें धरावें, हें आपणांस दाखवील, व तारुण्यप्रभंजनाच्या वेगानें तें डळमळूं लागल्यास आपणही त्या अनुभविक सुकर्णधाराचें साहाय्य घ्याल. पण ईश्वरी नियम उलट असल्यामुळें सगळ्या राज्याचा भार आपल्या एकट्यावर येऊन पडला आहे. असो. सालरजंग गेला तरी त्यानें आरंभिलेलीं चांगलीं कामें त्याच्या मागें राहिलीं आहेत व आपली प्रधानमंडळी तीं अव्याहत पुढें चालवितील अशी मी अंतःकरणापासून आशा करितों. आतां आपणांस मला दोन उपदेशपर शब्द सांगावयाचे आहेत. आपण आपल्या संस्थानच्या खजिन्यावर सक्त नजर ठेवीत जा. संस्थानच्या पैशाच्या कामांत उधळपट्टी ही अगदीं उपयोगाची नाहीं. त्याच्या उधळपट्टीस सुरवात झाली कीं लोकांवर कराचा बोजा चढूं लागला; लोकांवर फाजील कर बसूं लागले कीं त्यांना अन्नान्नदशा आली, व त्यांना अन्नान्नदशा आली कीं त्यांचा व त्याबरोबर संस्थानाचा नाश येऊन ठेपला, असें समजावें. राष्ट्रीय खजिन्याची उधळपट्टी होऊं लागणें हें राष्ट्राच्या नाशाचें आदिकारण होय. याकरितां ती होऊं न देण्याविषयीं आपणांस अत्यंत जपलें पाहिजे. दुसरी गोष्ट न्यायाची. राज्यांतील न्यायाधीश स्वतंत्र, निर्भीड, व शुद्धशील असले पाहिजेत. न्यायाप्रमाणें सिंहासनाला दुसरा आधार नाहीं. ज्या राज्यांत न्याय होईनासा होतो तीं राज्यें बोलतां बोलतां लयास जातात. यासाठीं खालपासून वरपर्यंत न्यायदानाचें काम निर्मलतेनें चाललें पाहिजे. प्रजेवर जड करांचा बोजा न लादतां, तिला न्याय देऊन व विद्या देऊन संतुष्ट ठेवणें हींच राज्याची बळकटी. प्रजेचें सुख तेंच राजाचें सुख. प्रजेच्या असंतोषासारखें राजास दुसरें भय नाहीं. परमेश्वर ज्यांना राज्यपद देतो त्यांनीं रात्रंदिवस असें मनांत बागवावें कीं परमेश्वरकृपेनें आम्हांस जें राज्यपद प्राप्त झालें आहे तें ऐश्वर्याचा पोकळ गर्व करण्यासाठीं किंवा खोटा ताठा मिरविण्यासाठीं नव्हे;

नर औरस संततीप्रमाणें प्रजेचें पालन करून तिला सुखी राखण्यासाठीं व तद्वत ऐश्वर्याचा योग्य उपयोग करून त्याचें विमल यश विमलतर करण्यासाठीं होय. ज्यांना राज्यलक्ष्मी प्राप्त झाली आहे त्यांची मति दुर्वर्तनाकडे जाण्याचा फार संभव असतो. मिथ्या स्तुति करणाऱ्यांच्या नादीं लागून सन्मार्गापासून भ्रष्ट होण्याची, व व्यसनपंकांत गढून जाण्याची, फार भीति असते. यासाठीं आपल्यासारख्या राजेलोकांनीं फार विचारानें व खबरदारीनें वागलें पाहिजे. आपण सुमारें एक कोटी प्रजेचे स्वामी आहां. इतक्या मनुष्यांचें सुख किंवा दुःख केवळ आपल्या सद्वर्तनावर सर्वथैव अवलंबून आहे. वास्तव आपणांस फार पोंचानें वागलें पाहिजे प्रजेच्या कल्याणाखेरीज दुसऱ्या कशाचेंही चिंतन करूं नका; प्रजाकल्याण साधल्याशिवाय समाधान मानूं नका. आपलें वय लहान आहे; आपणांस राज्य कसें चालवावें याचा फारसा अनुभव नाहीं. म्हणून ज्या ज्या वेळेस आपणास कांहीं अडचण येईल त्या त्या वेळेस आपण निर्भीडपणें ब्रिटिशसरकार-पाशीं साहाय्य मागत जा, किंवा त्याचा सल्ला विचारीत जा. आपल्यास तो तें मोठ्या आनंदानें पाहिजे तेव्हां देत जाईल. नेटिव संस्थानांची सुधारणा होऊन त्यांतील प्रजा सुखी असाव्या हा ब्रिटिशसरकारचा फार हेतु आहे. नेटिव संस्थानांचें संगोपन करून त्यांची बळकटी राखणें हेंच आपणास अत्यंत हितकारक आहे अशी ब्रिटिश सरकारची अलीकडे खात्री झाली आहे. व तदनुसार त्यानें आपलें वर्तन ठेविलें आहे. याकरितां ज्या ज्या वेळेस आपणांस कांहीं पंचाईत पडेल त्या त्या वेळेस आपण मागाल तितकी मदत आम्ही मोठ्या आनंदानें व संतोषानें करीत जाऊं. सारांश, प्रजापालन हेंच राजांचें बिरुद असें जाणून तें साधण्याविषयीं अहर्निश खपत जा, व प्रतापशाली पूर्वजांच्या उज्वल कीर्तीकडे पुनः पुनः अवलोकन करून अशी वर्तणूक ठेवा कीं, त्यांच्याशीं आपला समागम झाल्यावर मागें लोकांनीं असें म्हणावें कीं, "अमूक अमुकाच्या कारकीर्दीत हें संस्थान इतकें पुढें सरसावलें;" या रीतीनें आपलें वर्तन होईल तर बादशाही राणीस फार समाधान होणार आहे. आपण तेजस्वी निघाल अशी तिची फार आशा आहे, ती आपण कुंठित करूं नका. याहून आतां कांहीं सांगणें राहिलें नाहीं. म्हणून मी आतां आपणांस राणीचा प्रतिनिधी या नात्यानें मसनदीवर बसवितों, व असें जाहीर करतों कीं, आजपासून या संस्थानचे आपण पूर्ण अधिकारी झालां. शेवटीं जगन्नियंत्यापाशीं माझें येवढेंच मागणें आहे कीं, त्यानें आपणांस दीर्घायुषी

करून आपल्याकडून आपल्या राजनिष्ठ व प्रेमपूर्ण प्रजेचें अधिकाधिक कल्याण करवावें, व या मंगलप्रसंगीं आपण धरलेल्या इच्छा इतक्या सफल कराव्या कीं पुढल्या पिढ्यांनीं हा राज्याभिषेकाचा दिवस या संस्थानाच्या इतिहासांत महान् स्थित्यंतराचा प्रथम दिवस मानावा."

या भाषणावर निजाम साहेबांनीं जें उत्तर वाचलें तें रीतीप्रमाणें माफक, नम्र, व चटकदार असें होतें. त्याचा आशय इतका कीं तुम्हीं केलेल्या उपदेशाप्रमाणें वागण्यास मी रात्रंदिवस झटेन.

लार्ड रिपन यांनीं उपदेश केला व तो निजामसाहेबांनीं ऐकला. निजामसाहेब होतकरू व बुद्धिमान आहेत असें सांगतात, म्हणून तदनुसार त्यांच्या हातून वर्तन घडो अशी आम्ही अंतःकरणपूर्वक आशा करतों. निजामसाहेब या उपदेशानें चांगले निघून मोंगलाईंतील प्रजा सुखी होणें अगर न होणें ही गोष्ट आलाहिदा. लार्ड रिपन यांचें मूळ भाषण इतकें मोहक, इतकें गंभीर, इतकें–आतां पुढें कोणता शब्द घालावा हेंच समजत नाहीं–आहे कीं तें वाचून खऱ्या सहृदयहृदयाच्या नेत्रांतून प्रेमाश्रु आल्यावांचून राहणार नाहींत. आम्हांस तर क्षणभर असें वाटलें कीं लार्ड रिपन यांनीं हा निजामास उपदेश केला नाहीं, तर आपल्या कोमल, न्यायी, व दयार्द्र मनाचें चित्र काढलें ! ज्यांच्या वचनांत व वर्तनांत ऐक्य असतें त्यांच्या सप्रेम उद्गारांहून मधुरतर अशी गोष्ट जगांत खचित नाहीं, आंग्लभूमीच्या पोटीं कांहीं असे पुत्र निपजतात म्हणूनच तिच्या राज्यावरून सूर्य कधीं मावळत नाहीं, व परचक्राचें वारें तिला ठाऊक नाहीं. ज्या शाळेंतून लार्ड रिपनसारखे शिष्य निघाले आहेत त्या शाळेचा अधिगुरु अत्यंत पूज्य ग्लाडस्टन कसा असावा याची, वाचकहो, तुम्हींच कल्पना करा आणि देशोन्नतीचें इंगित तत्काल उमजा.

[वर्ष ४, अंक ७.]

ज्वालामुखी पर्वत.

सृष्टिवैभव पाहण्याची ज्यास खरी गोडी आहे व ज्यानें सृष्टिव्यापारांचा विचार करण्यांत आपला बराच काळ घालविला आहे त्यास सहज कळून येईल कीं सृष्टींतील अनेक कार्यांशीं मानवी कृतींची तुलना केली असतां आमच्या मोठ्या आश्चर्यकारक कृतीही अगदीं क्षुल्लक दिसतात, व मानवी प्राण्यांस अद्यापि सृष्टीपासून पुष्कळ गोष्टी शिकून घेणें अवश्य आहे असें स्पष्ट सुचवितात. आमच्या साध्या डोळ्यास जें अगदीं अदृश्य अशा परमाणूंतही सृष्टीनें इतकें चातुर्य खर्चिलें आहे कीं सूक्ष्मदर्शकादि यंत्रांनीं हे परमाणु पाहिले असतां आमची मति अगदीं थक्क होऊन जाते. तसेंच भूकंप, ज्वालामुखी पर्वत इत्यादि सृष्टीचे प्रचंड व्यापार पाहिले असतांही मनुष्यास आपल्या अल्प शक्तित्वाचा खेद वाटतो. व या आकस्मित भव्य चमत्कारांचा विचार करितां त्याच्या मानसिक शक्ति स्तब्ध होऊन त्याचें अंतःकरण अगदीं भयाभीत होतें.

ज्वालामुखी पर्वतांतून वारंवार जे चमत्कार दृष्टीस पडतात त्यांचीं खरीं कारणें काय आहेत हें अद्यापि निश्चित झालें नाहीं. कारण हे चमत्कार सुरू असतां आसपास राहण्याचें किंवा जाण्याचें कोणाचेंही सामर्थ्य नाहीं. ह्या चमत्कारांचा मूळ उगम पृथ्वींत इतका खोल असतो कीं, त्या प्रदेशाची मनुष्यास अनुमानाखेरीज कांहींच माहिती नाहीं; व हीं अनुमानें वरील चमत्कार होऊन गेल्यावर मागील वस्तुस्थितीवरून केलेलीं असतात. पृथ्वीचा अंतर्भाग अत्यंत उष्ण आहे; तेथें सर्व पदार्थ प्रवाही स्थितींत आहेत; पृथ्वीच्या पृष्ठभागास आंतून मोठ्या भेगा असून त्यांतून पाणी पृथ्वीच्या अत्युष्ण भागांत प्रवेश करूं शकतें, इत्यादि प्रथम अनुमानें गृहीत करून, सांप्रतकाळीं ज्वालामुखी पर्वतांचीं आदिकारणें ठरविण्याचा तत्त्ववेत्त्यांनीं प्रयत्न केला आहे

आमच्या देशांत ज्वालामुखी पर्वत मुळींच नाहींत असें म्हणण्यास चिंता नाहीं. त्यामुळें वरील चमत्कार कोणाच्या प्रत्यक्ष दृष्टीस पडण्याचा बिलकुल संभव नाहीं; आणि आमच्या मराठी वाचकांस अशा चमत्कारांचें केवळ वर्णनही दुर्मिळ, अशा समजुतीनें पुढील थोडें वर्णन आम्ही देतों.

हे पर्वत बहुधा वाटोळे असून वरती वरती निमुळते होत गेलेले असतात. त्यांच्या शिखराच्या मध्यंतरीं एक खोल नळी असते, व ह्या नळीचा व्यास कोठें कोठें सात-

आठशें फूट पर्यंत आढळतो; ह्या नळ्यांची खोलीही पुष्कळच असते. भूगर्भांत कांहीं मोठा क्षोभ झाला असतां आसपासच्या ज्वालामुखी पर्वतांखालीं मेघगर्जनेसारखा मोठा ध्वनि होतो. नंतर एकाएकीं या पर्वतांच्या नळ्या उघडून त्यांतून धुराचे लोटचेलोट बाहेर पडूं लागतात; या धुरांत पाण्याची वाफ पुष्कळच आढळते व तिच्याबरोबर एकप्रकारची बारीक राख वरती उडून तिचा भोंवताली वर्षाव होऊं लागतो. हा धूर व ही राख हवा स्थिर असल्यास, आकाशांत हजार बाराशें फूट समोर उंच जाऊन पसरते, व त्या योगानें एखाद्या मोठ्या नारळाच्या झाडाप्रमाणें त्यांचा आकार दिसतो. पुढें ही राख फारच हलकी असल्यानें वाऱ्याच्या वरील प्रवाहाबरोबर वाहून, तिचे दूरपर्यंत पातळ किंवा जाड असे थर भूपृष्ठावर बसतात. अशी राख कधीं कधीं ४८ तासपर्यंत उडत असते; ज्वालामुखीच्या आसपास या वेळीं इतका काळोख पडतो कीं, आपल्या शेजारचा मनुष्य आपणास ओळखूं येत नाहीं. सूर्य व चंद्र ग्रस्तासाप्रमाणें अंधक व अस्पष्ट होतात. ही इतकी राख जमिनीवर बसण्यास निदान १५-२० दिवस लागतात, व याकाळीं वर सांगितल्याप्रमाणेंच बहुधा सर्वत्र अंधकपणा असतो. या राखेस चांगला वारा लागल्यास ती ७००–८०० किंवा अधिकही मैलपर्यंत उडून जाते. ही राख उडण्याची राहिल्यावर कांहीं वेळपर्यंत लहानमोठ्या दगडांचा वर्षाव होऊं लागतो. खंडी खंडी वजनाचे मोठे दगड आंतील जोरानें फेंकले जाऊन उंच उडून पर्वताच्या पायथ्याशीं येऊन पडतात. एक वेळ तर ५ खंडी वजनाचा ५०० घन-फुटांएवढा दगड कोटोपक्षी नांवाच्या ज्वालामुखींतून निघून नऊ मैलांवर येऊन पडला. ही दगडांची वृष्टि संपल्यावर पुढें लाव्हा, किंवा वितळलेला खडक, याचा मोठा प्रवाह वाहूं लागतो व त्याचा थर ज्वालामुखीच्या आसपास १० फुटांपासून तों ५०० फुटांपर्यंत जमिनीवर बसतो, व त्या प्रदेशाचें पूर्वीचें सर्व स्वरूप बदलून जातें.

मागल्या निबंधांत सांगितलेल्या अद्‌भुत व भयंकर सृष्टिव्यापारांपासून किती नासाडी व प्राणहानि होते, ह्याचा वाचकांनींच विचार करावा. कित्येक वेळां शहरेंचीं शहरें नुसत्या राखेमध्येंच गडप्प होऊन जातात, व त्यांचा मागमूस सुद्धां रहात नाहीं. याप्रमाणें व्हेसुव्हियस पर्वताच्या पायथ्याशीं पांपिई आणि हरक्युलेनियम म्हणून दोन शहरें होतीं तीं ख्रिस्तीशकाच्या पहिल्या शतकांत एकाएकीं केवळ राखेंत बुडून गेलीं! यापैकीं पांपिई शहर पुढें सोळाशें वर्षांनीं कांहीं शोधक लोकांस खणतां

खणतां सांपडलें; व तें त्यांनीं उकरून काढिलें तेव्हां त्यांतील इमारतींस वगैरे फारच थोडा धक्का लागला आहे असें त्यांस दिसून आलें; व आंत माणसें व जनावरें उभींचीं उभींच पुरलीं गेलीं होतीं, त्यांचे पुष्कळ सांगाडे.

या विषयावर या वेळीं (१८८३) लिहिण्याचें कारण कोणास सांगायास नको. सुमात्रा आणि जावा या बेटांमधील संडा नांवाचीं सामुद्रधुनी व जाव्हा बेट, या दोन ठिकाणीं या अग्निप्रलयानें जो भयंकर खेळ मांडिला आहे, त्याची कल्पनाही करणें आम्हांस अत्यंत दुर्घट आहे. वरतीं सांगितल्या ठिकाणीं ज्वालामुखीस प्रथम आरंभ २५ आगस्टला झाला, व त्या दिवसापासून आजपर्यंत या सृष्टिकोपानें अगदीं कहर चालविला आहे. २५ सावीच्या रात्रीं ज्वालामुखीची प्रथम भूगर्भात गर्जना होऊं लागली, परंतु तेथील लोकांस त्या वेळीं फारशी भीति वाटली नाहीं; पुढें थोडासा वेळ गेला नाहीं तोंच एकाएकीं राखेचा व तापून लाल झालेल्या दगडांचा मोठा वर्षाव सर्वत्र होऊं लागला. प्रातःकाळीं पाहतात तो संडा सामुद्रधुनीजवळील सर्व रस्ते, पूल वगैरे मोडून त्यांचा चुराडा झाला आहे, भोंवतालीं पांचशें मैलपर्यंत समुद्राच्या पर्वतप्राय कढत लाटा किनाऱ्यावर येऊन आपटूं लागल्या; जावाबेट तर जणूं काय समुद्रांत तळलें जात आहे असें भासूं लागलें, व त्यास पृथ्वी गिळून टाकिते कीं काय असें सर्वांस झालें. जावाबेटांत एकंदर ४५ ज्वालामुखी आहेत, त्यांपैकीं पंधरा सोळांनीं या वेळीं पेट घेतली होती. लाव्हाचे प्रवाह सर्वत्र वाहूं लागून त्यांनीं दऱ्याखोऱ्या भरून टाकिल्या. रात्रीच्या वेळीं कित्येक मैलपर्यंत तांबड्या लाल व तेजःपुंज अशा अग्निमय ढगांनीं सर्व आकाश व्यापून टाकिलें होतें. सकाळ होण्याच्या सुमारास ह्या ढगांचे अनेक तुकडे होऊन ते नाहींसे झाले; व नंतर पहातात तों ५० मैल लांबी रुंदीचा प्रदेश समुद्रांत नाहींसा झाला आहे, व तेथील माणसांचा, घरादारांचा किंवा पशुपक्ष्यांचा मागमूस सुद्धां उरला नाहीं. या गोष्टींत फारसें आश्चर्य मानावयास नको; कारण, त्यावेळीं कडंग नांवाच्या एका उंच ६५ मैल लांबीच्या पर्वतानें समुद्रांत खोल बुडी दिली होती; व त्याच्या जागीं समुद्राच्या पाण्यानें चहुंकडून प्रवेश करून खळखळाट करून सोडिला होता. तिसरे दिवशीं रात्रीं पापडयंग नांवाच्या ज्वालामुखीनें आपलें तोंड उघडिलें. या वेळीं तुफान वारा सुटून तो आपल्या प्रचंड वेगानें झाडें, छपरें, जनावरें व माणसें आकाशांत उंच झुगारून देऊं लागला. इतक्यांत एकाएकीं मोठा नाद होऊन वरील पर्वताचे सात तुकडे झाले व मध्यें लाव्हाचें मोठें तळें बनलें. हा लाव्हा आसमंतात पसरून

त्याचा जमिनीवर निदान ३०० फुटांपर्यंत जाडी थर झाला असावा असें अनुमान आहे. चवदा अगदीं नवीन ज्वालामुखी या वेळीं प्रकट होऊन त्यांनीं आपल्या भयंकर नाशकारक कृत्यास आरंभ केला. शहरेंचीं शहरें लाव्हाच्या प्रवाहांत बुडून गेलीं; मिराक व आणखी कांहीं बेटें समुद्रांत बुडून नाहींशीं झालीं; व १५–१६ अगदीं नवीन ज्वालामुखी बेटें या वेळीं पंचवीस तीस मैलांच्या प्रदेशांत एकदम उत्पन्न झालीं. या वेळीं भरतीच्या लाटा २७०० फुटांपर्यंत उंच चढत होत्या असेंही कळतें. आणि सुमारें लक्ष मनुष्यांच्या व अपरिमित पशुपक्षांच्या जीविताची या अग्निप्रलयांत अल्प काळांत हानि झाली.

अशा प्रकारचा भयंकर सृष्टिकोप अलीकडे फार दिवसांत कोणाच्या दृष्टीस पडला नव्हता, व पुढेंही बरेच दिवस कदाचित् दृष्टीस पडणार नाहीं. भूगर्भशास्त्राची ज्यास थोडी माहिती आहे त्यास, असे सृष्टिव्यापार भयंकर खरेच, परंतु सृष्टिक्रमांत यत्किंचितही अपूर्व वाटणार नाहींत. भूगर्भवेत्त्यांचें असें अनुमान आहे कीं पृथ्वीच्या बाल्यावस्थेंत अशा भयंकर क्रीडा ती नित्यशः करीत असे. आमचीं द्वीपें व महाद्वीपें अशाच क्रीडांनीं प्रथम उत्पन्न झालीं. अशाच खेळांनीं एकाच मोठ्या महाद्वीपाचे आफ्रिका व युरोप असे दोन तुकडे पडले; व आस्ट्रेलिया व एशिया यांचा संबंध तुटला; व एशियाच्या पायथ्याशीं एवढा मोठा द्वीपसमूह झाला. हे सृष्टीचे बाल्यावस्थेचे खेळ सांप्रत पुष्कळ प्रकारें कमी झाले आहेत; परंतु, बाल्यावस्थेंतील चंचल व कोपनस्वभाव ती अद्याप विसरली नाहीं; व तो विसरण्यास आणखी युगेंचीं युगें लोटलीं पाहिजेत.

अशा भयंकर सृष्टिव्यापारांचे भिन्न भिन्न स्वभावांवर भिन्न भिन्न परिणाम होतात. ज्यांच्या बुद्धींत विचारापेक्षां श्रद्धेचेंच विशेष प्राबल्य असतें, अशा भाविक धर्मभोळ्या लोकांस हे चमत्कार पापी लोकांस शिक्षा करण्याकरितां ईश्वरानें घडवून आणिले असावे, असें वाटून त्यांची श्रद्धा विशेष दृढता पावते. ज्यांमध्यें विचार व श्रद्धा यांचें समतोलन असतें, व ज्यांस ईश्वर परमन्यायी आहे असा मूळचाच भरंवसा असल्यानें, पुण्यवान् व पापी यांस समान दंड ईश्वरानें योजणें अशक्य वाटतें, ते मानवी बुद्धीचा कोतेपणा मनांत आणून आपल्या मनाचें समाधान करून घेतात. परंतु ज्यांच्या अंतःकरणांत विचारप्राबल्य असल्यानें, कोणतीही गोष्ट सयुक्तिक व विचारासिद्ध ठरल्यावांचून तींवर त्यांची श्रद्धा बसत नाहीं, व जे धर्माच्या मूलतत्त्वांचेंही पूर्ण परीक्षण केल्यावांचून ग्रहण करीत नाहींत, त्यांस ह्या चमत्कारांपासून

आकस्मिक होणाऱ्या प्राणहानीचा विचार करितां मोठा खेद वाटतो; आणि धार्मिक व अधार्मिक, अपराधी व अनपराधी, साधू व खल, यांची अशा प्रसंगीं साधारण आहुती झालेली पाहून, जगाचा कोणी खरोखरच नियामक असल्यास त्यामध्यें इतका अन्याय अथवा प्रमाद, अथवा निदान इतकें दौर्बल्य असावें, कीं त्याच्या हातून या क्रूर सृष्टिव्यापारांचा निरोध होऊं नये ही त्यांस मोठी असंभाव्य व शोचनीय गोष्ट भासते; व त्यांची प्रवृत्ति केव्हां केव्हां थोडी बहुत अनीश्वर-वादाकडे होते.

[वर्ष ३, अंक ३९।४०]

मुंबई इलाख्याचें कलाकौशल्य

कलकत्त्याच्या प्रदर्शनास मुंबई इलाख्यांतून ज्या वस्तु धाडल्या होत्या त्यांची यादी पाहिली म्हणजे आपल्याकडे कारागिरांस उत्तेजन न मिळाल्यामुळें त्यांचा किती लोप झाला आहे हें कोणाच्याही उघड नजरेस येईल. ज्या प्रांतांत पन्नास-पाऊणशें वर्षांपूर्वी आपणांस लागणारा बहुतेक माल तयार होत असे, तेथेंच आतां तो माल तयार करणारे दहापांच कारागीर मिळण्याचीही मारामार झाली आहे व जर कदाचित् एकाददुसरा सांपडलाच तर तो असा सांपडतो, कीं गिऱ्हाइकानें त्यास सामान आणून द्यावें, व मग तो एखादा जिन्नस तयार करून देणार. नाशिकास लांकडावर खोदींव काम केलेल्या इतक्या जुन्या इमारती आहेत, पण आजमित्तीस तेथें मला खोदींव काम येतें असें म्हणणारा मि. ग्रिफिथ साहेबांस काय तो एकच इसम भेटला. तसेंच जेथें पूर्वी कातडयाच्या ढाली करणारे शंभराच्या वर कारागीर होते, तेथें ती विद्या आज एका पितापुत्राखेरीज कोणासही ठाऊक नाहींशी झाली आहे! इतर धंद्यांचीही व्यवस्था याचप्रमाणें. म्हणजे कोठें दोन, कोठें चार, असे कारागीर अवशिष्ट आहेत; व आजपर्यंत चालू आहे तोच क्रम पुढें चालल्यास, आहेत तेही लवकरच नष्ट होतील. हल्लींच युरोपियन मालानें आपणांस किती ग्रासिलें आहे हें आपल्या इलाख्यांतून प्रदर्शनास नेटिव कारागिरीचे म्हणून जे पदार्थ धाडिले जातात, त्यांच्या यादीवरून कळून येईल. जोडे, पगड्या, बाव्या, बुगड्या, फुलें, टोपल्या, बोळकीं, मडकीं वगैरेंच्या कारखान्यावर कितीशा कारागिरांची उपजीविका होणार? ग्रिफिथ साहेबांनीं आपल्या क्याटलागांत मोठे म्हणून जे कारखाने सांगितले आहेत ते पुणें व नाशिक येथील तांबें व पितळेचे, व येवले वगैरे ठिकाणचे कापडाचे व रेशमाचे होत. या ठिकाणांहून देखील आतां पूर्वीप्रमाणें मोलाच्या व कारागिरीच्या जिनसा बाहेर पडत नाहींत. कारण असा चैनीचा माल घेण्यास पैसे कोणाजवळ आहेत? पूर्वीचे सरदार वगैरे मंडळी आतां नष्ट झाली, व नवीन मोठ्या पगाराच्या जागाही नेटिवांस मिळत नाहींत, तेव्हां अर्थातच अशा महाग वस्तु घेणारा नेटिवांत विरळाच सांपडतो. साहेबलोकांजवळ पैसा असतो; पण त्यांनीं इकडचा माल कां घ्यावा? शिवाय त्यांची रुचि निराळी व आमची निराळी; करितां एखाद्याचे मनांत जरी एखादी वस्तु घ्यावयाचें आलें तरी तो ती फक्त एक मासला म्हणून घेणार.

सारांश आमच्या घरांतील भांडींकुंडीं, आमच्या बायकांच्या लुगडींचोळ्या, व पोरांचीं खेळणीं वगैरे कांहीं जिनसा खेरीज करून आपल्या घरांत सर्व विलायत भरली आहे, व जे लोक पूर्वी कारागिरीवर पोट भरीत असत, त्यांस शेतकी करणें भाग पडून, जमीन थोडी व खाणारे पुष्कळ अशी अवस्था झाली आहे. आमच्या देशांतील जमीन किती जरी सुपीक असली तरी ह्या व्यवस्थेनें आपण लवकर भिकेस लागूं व लागलोंही आहों. नेटिव लोकांत हातानें अजून कोणकोणत्या जिनसा करतात हें गेल्या प्रदर्शनांत युरोपियन व्यापाऱ्यांच्या नजरेस आलें, व आतां जर आपण स्वस्थ बसलों तर इतर धंद्यांप्रमाणेंच आहेत तेही धंदे लवकरच नष्ट होतील. करितां सरकारास व विशेषतः लोकलफंड व म्युनिसिपल कमिट्यांस आमची अशी सूचना आहे कीं, त्यांणीं अशा वेळीं उगीच न बसतां आजमित्तीस त्यांच्या प्रांतांतून शिल्लक असलेले धंदे तरी ऊर्जित दशेस आणण्याची खटपट करावी. आमच्या कारागिरांस जर आहे त्यापेक्षां थोडी ज्यास्त अक्कल असती तर सरकारासही खटपट करण्याची देखील जरूर पडली नसती; पण त्याचा आज उपयोग काय? आजची स्थिति म्हटली म्हणजे कोणी तरी कारागिरांना नोकर ठेवून त्यांस लागतील ते जिन्नस व हत्यारें वगैरे पुरवून त्यांचा माल खपविला पाहिजे. हा उद्योग कितपत सफल होईल याचें उदाहरण रत्नागिरीची शिल्पशाळा होय. प्रथमतः ही शाळा क्राफर्ड-साहेबांनीं काढली. पुढें तिची एकदोनदां चलबिचल होऊन बरेच लोकांचे पैसे त्यांत गेले. व आतां ती रत्नागिरीच्या लोकलफंड कमिटीनें विकत घेतली आहे. या शाळेंत लाकडी काम चांगलें होतें व आज त्या शाळेंत एक स्टीमएंजिन व दुसरी मोठ्या कारखान्यास लागणारीं सर्व हत्यारें आहेत. गेल्या सालीं या शाळेंत एकंदर ५०००० चें सामान तयार झालें व शाळेचा व कारखान्याचा खर्च वजा जाऊन लोकलफंड कमिटीस कांहीं फायदा झाला. सध्यां या शाळेचें सामान पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट वगैरे ठिकाणीं जातें. दुसरें उदाहरण अहमदाबादचें होय. येथें लांकडावर खोदीव काम करण्याचा व्यापार अगदीं बंद पडण्याच्या बेतांत होता; पण कोणी मि० फारेस्ट नामक एका अमेरिकन मनुष्यानें तेथें ह्या कामाचा नवीन कारखाना काढला, तेव्हांपासून या व्यापारास आतां तेजी आली आहे. कारखान्यांतील व्यवस्थापक नेटिवच असून तेथील सर्व कारागीर नेटिवच आहेत, व सामान तयार झालें म्हणजे तें अमेरिकेंत जातें. आज या सामानाचा इतका खप आहे कीं अहमदाबादचे व आसपासचे चांगले खोदीव काम करणारे सर्व सुतार जरी या कारखान्यांत

कामास आहेत तरी अजूनही जास्त माणसांची जरूर आहे. या दोनही उदाहरणांवरून आमच्या स्थानिक कमिट्यांनीं काय केलें पाहिजे हें त्यांस समजून येईल. स्थानिक धंद्यांस उत्तेजन देणें ही कमिट्यांच्या कर्तव्यांपैकींच एक गोष्ट आहे, करितां आपआपल्या प्रांतांतून कोणकोणते धंदे चालतात, त्यांत कोणकोणत्या सुधारणा केल्या असतां तोच माल थोड्या श्रमानें व खर्चानें तयार करितां येईल व माल तयार झाल्यावर तो खपविण्यास काय तजविजी केल्या पाहिजेत वगैरे गोष्टींचा विचार करून प्रत्येक जिल्ह्यांतील स्थानिक कमिट्या जागोजाग रत्नागिरीच्या शिल्पशाळेप्रमाणें जर शाळा काढतील तर लवकर आहेत ते तरी धंदे ऊर्जित दशेस येतील. नाहींपेक्षां एकतर फारेस्ट साहेबाप्रमाणें एखादा परदेशस्थ येऊन फुकटफाकट आपली तुंबडी भरून घेईल किंवा प्रदर्शनानें हुशार झालेले इंग्रज व्यापारी विलायती जिनसा तयार करून बिनदिक्कत आमच्या घरांत घालतील. बरें सरकारानें इकडे लक्ष पुरवावें, म्हटलें तर त्यांचीं त्यांस कामें आटपतनाशीं झालीं आहेत. शिवाय त्यांनीं इतकी तसदी तरी कां म्हणून घ्यावी? करितां लोकलफंड व मुनसिपाल कमिट्या यांस आमची येवढीच सूचना आहे कीं इकडे त्यांणीं अवश्य लक्ष पुरवावें. एकदां असल्या धंद्यांपासून काय फायदा होतो तें लोकांच्या लक्षांत आलें म्हणजे मग पुढें कमिटीस विशेष खटपट पडणार नाहीं. कारण आमच्याकडे एकदां कांहीं किफायत होणारा धंदा निघाला कीं मग त्याचें अनुकरण करणारे पुष्कळ मिळतात. म्हणून स्थानिक कमिट्यांनीं एकदां हें काम हातीं घेऊन तें रूपास आणिलें म्हणजे मग इतर व्यापाऱ्यांकडून हवी तेवढी मदत मिळेल. किंबहुना प्रथम देखील मदत मिळण्याचा संभव आहे. स्थानिकस्वराज्याच्या आक्टानें स्थानिक कमिट्यांस जें कांहीं थोडें अधिक स्वातंत्र्य मिळालें आहे त्यानें वरील गोष्टी करण्यास पूर्वीपेक्षां आतां जास्त सवड झाली आहे हें येथें निराळें सांगावयास नकोच.

[वर्ष ४, अंक १२.]

शास्त्र व बायबल.



गेले पांच चार महिने सृष्टिशास्त्रवेत्त्यांमध्यें व श्रद्धालु बायबलभक्तांमध्यें एक मोठा वाद चालला आहे. हा वाद उपस्थित होण्याचें कारण असें कीं, धर्मसंबंधीं, इतिहाससंबंधीं, तत्त्वज्ञानसंबंधीं व इतर सर्व प्रकारच्या प्राचीनकाळच्या ग्रंथांचा युरोप खंडांत हल्लीं जीर्णोद्धार चालला आहे; व शास्त्रदृष्ट्या या ग्रंथांतील कोणते भाग सत्य आहेत, कोणते मिथ्या आहेत, मिथ्या समजुती प्रथम मनुष्याच्या मनांत उत्पन्न होण्याचें कारण काय, इत्यादि अनेक प्रश्नांचे शास्त्रवेत्ते, भाषावेत्ते, व इतिहासवेत्ते निर्भयपणें विवेचन करण्यास लागले आहेत. प्रत्येक मनुष्यास सामान्यतः आपण जो धर्म अनुसरतों त्यांतील आदिग्रंथ अत्यंत मौल्यवान् व ईश्वरप्रणीत असे भासतात; व दुसऱ्या सर्व धर्मांतील ग्रंथ कवितारूप, अतिशयोक्तीनें भरलेले, व कल्पनाजालांत सांपडलेल्या मानवी बुद्धीचे प्रलाप असे भासतात. आतां अशी समजूत होणें हें जरी स्वाभाविक आहे, तथापि ज्या कोणी शास्त्रांचा, भाषांचा, व इतिहासांचा अतिगहन अभ्यास मनःपूर्वक आरंभिला, त्यानें अशा प्रकारचे यादृच्छिक सर्व ग्रह सोडून, सर्व सत्य गोष्टींचें निर्दोष प्रतिबिंब आपले मनावर उमटेल, अशाकरितां तें मणिदर्पणाप्रमाणें अत्यंत निर्मल ठेविलें पाहिजे. अशा प्रकारच्या निर्मल व निःपक्षपाती मनाच्या लोकांची संख्या दिवसानुदिवस वाढतच चालली असल्यानें, युरोपांतील शास्त्रभाषादिवेत्ते केवळ आमच्याच धर्मांतील किंवा मुसलमान धर्मांतील गुणदोष, सत्यासत्यता, ईश्वरी किंवा मानवी निर्मातृत्व, इत्यादि गोष्टींचें विवेचन करून आमच्या सामान्य जनांच्या समजुतीविरुद्ध कित्येक वेळां अभिप्राय देतात, इतकेंच नव्हे तर ते आपलें शस्त्र बायबलावरही चालवून योग्य दिसेल तेथें त्या पवित्र ग्रंथाचीही फजिती उडविण्यास सोडीत नाहींत. आतां अशा शास्त्रवेत्त्यांचें व चालू धर्माच्या अभिमान्यांचें व प्रसारकांचें बहुधा पटत नाहीं, हें कोणासही सांगायास नको. तथापि सृष्टीचें खरें ज्ञान करून देणें हा एका प्रकारच्या लोकांचा प्रयत्न असल्यानें व नीति व ईश्वरपरायणता यांची वृद्धि करणें हा दुसऱ्या प्रकारच्या लोकांचा प्रयत्न असल्यानें, उभयतांही दुसऱ्याचे वाटेस न जातां आपलें कार्य साधेल अशा तऱ्हेनें वागत असतात. याच कारणामुळें धर्मप्रचारक व शास्त्रवेत्ते यांमध्यें मोठा कलह वाढावा असें जें आपणांस साहजिक वाटतें, तशी खरी स्थिति नाहीं. असले वाद

क्वचित् उत्पन्न होतात; व ते उत्पन्न होण्याचीं मुख्य कारणें परस्परांच्या लेखांची गैरसमजूत व दुरभिमान हीं होत. याच कारणांनीं प्रस्तुतचा वाद् उत्पन्न झाला आहे. कोणीं एका फ्रेंच ग्रंथकर्त्यानें बायबल हें ईश्वरप्रणीत नाहीं असें दाखविण्याकरितां विरुद्ध पक्षांतील प्रमुख प्रमुख लोकांच्या प्रमाणांचें खंडन करण्याचा प्रयत्न केला. या लोकांत मि. ग्ल्याडस्टन हे असल्यानें त्यांसही या ग्रंथकर्त्याच्या पेनाचे दोन फटकारे खावे लागले ते त्यांस सहन न होऊन त्यांनीं स्वमंडनाचा प्रयत्न केला. आतां मि. ग्ल्याड्स्टन ह्यांच्या जोडीचा राजकारस्थानी पुरुष विरळा हें जरी सत्य आहे, तथापि अलीकडे प्रपंचवृद्धि पावलेल्या शास्त्रीय विषयांत त्यांनीं हात न घालणें हेंच बरें. परंतु दुरभिमानानें म्हणा किंवा अतिशय श्रद्धालुत्वानें म्हणा, त्यांनीं आपलें मंडन करीत असतां आधुनिक शास्त्रांचा व बायबलाचा मेळ घालण्याचा प्रयत्न केला. मि. ग्ल्याड्स्टनसारखे गृहस्थ पुढें सरून आपल्या प्रयत्नास लागले हें पाहून सर्व शास्त्रवेत्त्यांस एकाएकीं धास्ती पडली कीं आतां शास्त्र व धर्म यांचा विसंगत जोडा जडून दोघांचेंही अहित व हाल होणार ! त्या सर्वांनीं आपआपलीं सर्व तीक्ष्ण हत्यारें घेऊन मि. ग्ल्याड्स्टनवर एकदम चाल केली. प्रो. हक्सले यांची सर्व शास्त्रीय लोकांत अत्यंत ख्याति आहे; यांनीं भूगर्भशास्त्र व प्राणिशास्त्र यांचा व बायबलांतील लेखांचा कांहींच मेळ पडत नाहीं असें दाखविलें. प्रो. म्याक्समुलर हे सर्व भाषाविदांचे अग्रणी आहेत. यांनीं संस्कृतादि अनेक भाषांतील ग्रंथांवरून असें दाखविलें कीं कांहीं एक प्रकारच्या पौराणिक कथा सर्व देशास लागू आहेत, बायबलांत जे विचार आढळतात ते तत्कालीन व त्याच्याहून प्राचीन काळच्या तत्त्ववेत्त्यांमध्यें अगदीं रूढ होऊन गेलेले होते. एका गणिती पदार्थविज्ञानवेत्त्यानें असें दाखविलें आहे कीं नोहाच्या जहाजाची व जलप्रलयाची जी गोष्ट बायबलांत सांगितली आहे, ती कोणा अल्पज्ञ कवीची बालिश कृति असली पाहिजे; कारण त्या गोष्टींत असें म्हटलें आहे कीं आकाश फाटून त्यांतून पाण्याचा प्रलयकालीन ओघ पृथ्वीवर येऊन आपटला. त्यानें सर्व पृथ्वी बुडवून टाकून सर्व जलचर, खेचर, व स्थलचर प्राण्यांचा संहार होण्याची वेळ येऊन ठेपली. त्यावेळीं नोहा हा मोठा धार्मिक असल्यानें त्यास ईश्वरानें एक तरी बांधण्याची प्रेरणा केली, व तींत आपलें कुटुंब व प्रत्येक जातीचे नर व मादी असे दोन दोन प्राणी घेऊन, बसण्याची आज्ञा केली; व एक वर्षभर ही तरी पाण्यांत तरंगत राहून शेवटीं आराराट पर्वताच्या शिखरास येऊन लागली. व तेथें सर्व उतरून प्रलयांतीं पुनः सर्व प्राणी

उत्पन्न झाले इ० यावर वरील शास्त्रवेत्त्यांचें असें म्हणणें आहे कीं ही सर्व गोष्ट अगदीं असंभवनीय आहे. कारण नोहानें बांधलेल्या तारवांत जगांतील कोट्यावधि प्राण्याचा एक एक जोडा मावला पाहिजे एवढेंच नव्हे, तर त्या सर्वांची एक वर्षाची बेगमी होईल इतका अन्नाचा पुरवठाही मावला पाहिजे. शिवाय एक वर्षभर मृगादि तृणाहारी पशु यांस व्याघ्रादि हिंस्र मांसाहारी पशूंपासून उपद्रव न होईं अशा प्रकारची योजना त्या तारवांत असली पाहिजे. इतकें करूनही काय उपयोग? कारण प्रत्येक जनावरास कांहीं विशिष्ट प्रकारचे हवेंत ठेविलें पाहिजे तर तें जगेल; शीतकटिबंधांतील प्राणी उष्णकटिबंधांत जगणें नाहीं; तेव्हां सर्वांसच आराराट पर्वतावर नेऊन सोडून कसें चालेल, व त्यांची वृद्धि कशी होईल? बरें, असें होईलसें समजलें तरी पर्वतावर उतरतांक्षणींच या सर्व पशूंनीं काय खावें? कोणी गवतावर उपजीविका करणार, कोणी फळांवर, कोणी मूळांवर व कोणी मांसावर, तेव्हां कित्येकांस अन्नावांचून व कित्येकांस हिंस्र पशूंच्या जाभाड्यांत सांपडून मरणें अवश्यच होणार. तेव्हां नोहानें असलें अजस्र तारूं बांधलें व त्यांत वरील सर्व तजवीजी केल्या, व संकटें टाळलीं इत्यादि गोष्टींवर कोणी श्रद्धा ठेवण्यापेक्षां लहान मुलांच्या चिमणी कावळ्यांच्या गोष्टीवर विश्वास ठेवणें बरें! असो, याप्रकारें मोठ्याचे हातून बायबलाच्या मंडनाचा प्रयत्न झाल्यानें, अनेक शास्त्रवेत्त्यांचे तीक्ष्ण प्रहार त्या ग्रंथास सोसावे लागत असून त्याचा सर्वत्र फजीता होत आहे. ही गोष्ट सर्व धर्माभिमानी लोकांनीं लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

[वर्ष ६, अंक ११.]

ललितकलांच्या उद्धारार्थ यत्न

चित्रकला.

मनुष्यजातीचे अंतःकरणांत चित्रकलेची प्रीति, बीजरूपानें तरी, सर्वत्र स्वभावसिद्ध वास करीत आहे यांत संशय नाहीं. जगांत असा एकही देश सांपडणें कठिण, मग तो किती रानटी कां असेना, कीं जेथील लोकांनीं प्राचीनकाळापासून या कलेचा आदर केला नाहीं व तिच्या आश्रयानें आपल्या अंतःकरणांतील प्रबल मनोवृत्तींस दृश्य स्वरूप दिलें नाहीं. अमेरिकाखंडांत अत्यंत रानटी स्थितींत आयुष्य घालविणाऱ्या अशा ज्या कित्येक मनुष्यजाति शोधक प्रवाशांच्या पूर्वी दृष्टीस पडत, त्यांनींही आपल्या अशिक्षित हातांनींच आपली ईश्वरभक्ति प्रकट करण्याकरितां आपणांस ईश्वररूप भासणाऱ्या चंद्रसूर्यांच्या प्रतिमा विशाळ खडकावर कोरलेल्या किंवा रंगविलेल्या असत, व त्या अद्याप कोठें कोठें नजरेस येतात. सुधारणेचा जेथें जेथें आजपर्यंत उत्कर्ष झाला, तेथें तेथें तिजबरोबर चित्रकलाही उत्कर्ष पावली. प्राचीनकाळीं ग्रीस, इटाली वगैरे देशांत सुधारणेनें जेव्हां प्रथम प्रादुर्भाव केला त्याचकाळीं त्या देशांत नामांकित चित्रकारही निपजले. हिंदुस्थान देशासही जोंवर संपत्ति व स्वराज्य यांनीं सोडिलें नव्हतें, तोंवर येथेंही स्त्रीपुरुष चित्रकलेचा व्यासंग करीत, असें आमच्या कवींच्या पुनः पुनः उल्लेखांवरून सिद्ध होतें. सुधारणेच्या कामांत जीं राष्ट्रें हल्लीं सर्वांत पुढें गेलीं आहेत, व सुधारणेचा मार्ग निरंतर आक्रमणें ह्यांतच ज्यांस परमहित वाटत आहे, अशा राष्ट्रांत चित्रकलाही अत्यंत उत्कर्ष पावली आहे, व तिजविषयीं अभिरुचि सर्वत्र पसरली आहे. याप्रमाणें ह्या मानवी अंतःकरणांत पेरिलेल्या बीजास सर्व देशांत अंकुर फुटले आहेत, परंतु जेथें जेथें संपत्ति, सुधारणा व उद्योग यांस ऊर्जित दशा प्राप्त झाली आहे, तेथें चित्रकलेसही पूर्णता येऊन तिचें लोक आदरानें सेवन करूं लागले आहेत.

चित्रकलेची प्रीति मनुष्याचे हृदयांत स्वभावसिद्ध वास करिते, यांत आपणांस फारसें आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. आनंद व समाधान यांनीं अंतःकरण भरून टाकणें व शोकदुःखांचा विसर पाडणें, हा या कलेचा एकांत गुण आहे; त्यामुळें तिजविषयीं जन कधींही निष्प्रेम असणार नाहीं. कित्येक समयीं सृष्टि इतकी रमणीय शोभा धारण करिते कीं हीच शोभा निरंतर रहावी असें वाटतें. कित्येक ठिकाणीं

इतके भव्य व सुंदर देखावे आपल्या दृष्टीस पडतात कीं अशा देखाव्यांतच आपलें सर्व आयुष्य जावें असें वाटतें. आपले कित्येक आप्त आपणांस इतके प्रिय असतात कीं यांचा समागम कधींही न सुटावा असें वाटतें. अनुपम सौंदर्यानें व अवर्णनीय लीलांनीं नयनांस व हृदयास मोहीत करणाऱ्या धन्य अंगनाजनाची क्वचित् गांठ पडल्यास असें वाटतें कीं त्यांपासून क्षणभरही दूर असूं नये. परंतु कोट्यावधि प्राण्यांत असा कोण भाग्यशाली आहे कीं ज्यानें मुहूर्तमात्राहून अधिक हीं सुखें अनुभविलीं आहेत ? किंवा हीं सुखें मला पुनः मिळतील काय, असा ज्याचे जीवास चटका लागला नाहीं ? याप्रमाणें वारंवार आपल्या मनीषा निष्फळ झाल्यानें आपणांस जो विषाद वाटतो, व कधीं कधीं निराशेनें सर्व जग शून्य भासून आयुष्याचा जो कंटाळा येतो, तो सर्व दूर करून मनास पुनः समाधान देण्यास चित्रकलेसारखें दुसरें साधन नाहीं. पुनः, आपण अनुभविलेल्या दृश्य सुखांचा इतरांस अंशतः तरी लाभ करून देण्यास हें एकच साधन आहे. तसेंच विशाळ बुद्धीच्या व कल्पनेच्या पुरुषांनीं निर्मिलेली मानासिक सृष्टि, तींतील विलक्षण घटना व अकल्पित प्रसंग हे सर्वसामान्य जनांत अतर्क्य असतांही त्यांच्या अंतःकरणावर त्यांचें प्रतिबिंब पाडण्यास चित्रकलेहून कोण अन्य समर्थ आहे ?

परंतु सुधारणेच्या परिवारांत येणाऱ्या इतर आनंददायक कलांइतकीच चित्रकलेची योग्यता आहे असें कोणीही समजूं नये. ती सुधारणेबरोबर उत्कर्ष पावते खरी; परंतु जगाचे इतिहासावरूच असें दिसतें कीं सुधारणेचें पुढें पाऊल पडण्यास पुष्कळ वेळां चित्रकलाच कारणीभूत झाली आहे. आपल्या मनांतील विचार प्रकट करण्यास प्रथम भाषा पाहिजे; परंतु ते विचार चिरस्थायी करण्यास लेखनपद्धतीची गरज आहे. प्राचीन ईजिप्तमधील लोक शब्दार्थबोधक चित्रें काढून आपले विचार लिहीत असत हें वाचकांस माहीत असेल. ह्याच चित्रांच्या अपभ्रंशापासून पुढें अक्षरें निघालीं, व सर्व युरोपियन मूळाक्षरें ईजिप्तच्या अक्षरांपासून निघालीं आहेत असें आधुनिक शोधक गृहस्थांचें मत आहे. यावरून असें दिसून येईल कीं चित्रकलेनें आरंभीं सुधारणेस फारच उत्तम मदत केली. तसेंच प्राचीन काळीं ज्या कोणी प्रथमतः तारागणाचें अवलोकन केलें असेल, व आकशांतील असंख्यात ताऱ्यांचे भाग करून त्यांस नांवें देण्याचा प्रयत्न केला असेल, त्यानेंही चित्रकलेचाच अवलंब केला, असें नक्षत्रादिकांचे व राशींचे नांवावरून उघड दिसतें; व तेव्हांपासून आजपर्यंत सर्व खगोल चित्रित झाला आहे. सांप्रतकाळची स्थिति पाहिली असतांही सुधारणेस चित्र-

कलेचें अत्यंत साहाय्य आहे असें सिद्ध होतें. मनुष्यास सृष्टपदार्थांचें खरें स्वरूप समजण्यापूर्वी, प्रथम त्यांचे ठिकाणीं मनास गोडी लागली पाहिजे; व सूक्ष्मदृष्टीनें त्याचें अवलोकन करण्याची संवय लागली पाहिजे, व या दोनही गोष्टी चित्रकलेच्या व्यासंगानें अथवा केवळ अभिरुचीनें मनुष्याचे अंगीं बहुधा प्राप्त होतात. शब्दमात्रांनीं ज्यांचें यथार्थ ज्ञान सुलभपणें देतां येत नाहीं, अशा शिल्पकलेच्या व वृक्षादि-शास्त्रांच्या, शिक्षणांत चित्रकलेचा किती उपयोग नित्यशः होत आहे, हें कोणास सांगावयास नको. सृष्टींतील नानाविध देखाव्यांचीं व कित्येक विलक्षण चमत्कारांचीं हुबेहूब काढलेलीं चित्रें दृष्टीस पडल्यानें, युरोपामध्यें आजकाल हजारों तरुण लोकांस वाटतं आहे कीं आपण हे देखावे व हे चमत्कार केव्हां पाहूं; व याच विचारानें त्यांचे मनांत देशांतरी प्रवास करण्याची उत्कट ईर्षा उत्पन्न होत आहे. अनेक देशांशीं दळणवळण असल्यानें, व त्या देशांतील हवापाण्याची माहिती असल्यानें, व प्रवासांत मिळालेल्या अशाच अनेक प्रकारच्या माहितीनें सुधारणेस किती बळकटी येते ह्याचा वाचकांस अनुभव असेलच.

असो. याप्रमाणें अनेक प्रमाणांवरून असें दिसून येईल कीं ह्या कलेची मनुष्यास साहजिकपणें जन्मापासूनच गोडी असते. तो ज्या स्थितींत व देशांत रहात असेल, तेथील सुधारणेच्या मानानें चित्रकलाही पूर्णतेस येते. परंतु तिचा उपयोग केवळ मनास आनंद देण्यापुरता किंवा मनाचा खेद घालविण्यापुरताच नाहीं; तर ती सुधारणेच्या उत्कर्षासही अनेक प्रकारें साधनीभूत होते. चित्रकलेचे महत्त्वाविषयीं व तिचे उद्धाराविषयीं आम्हांस जे विचार सुचले आहेत त्या सर्वांचा या निबंधांत समावेश करणें स्थलसंकोचास्तव शक्य नाहीं. त्याअर्थी पुढील निबंधावर विषय टाकणें जरूर आहे.

गेल्या निबंधांत चित्रकलेचें जें स्वरूप वर्णन केलें व तिचे जे उपयोग सांगितले तेवढ्यांवरून तिच्या खऱ्या महत्त्वाची वाचकांस कल्पना येणार नाहीं. समाजाच्या व व्यक्तीच्या अंतःकरणांत कोमल व श्रेष्ठ अशा मनोवृत्तींची स्फूर्ति होण्यास या कलेचा किती उपयोग होतो हें अद्याप सांगायाचें राहिलें आहे. पहा कीं या सृष्टिरूप रंग-भूमीवर अवतरणाऱ्या कोट्यावधि मानवी नटांपैकीं ज्यांचा भाग केवळ संपत्ति, आनंद, समाधान व निश्चिंतता यांनीं परिपूर्ण अशा आयुष्यक्रमाचें निदर्शन

करणें हा आहे असे दैववान् पुरुष फार विरळा आढळतात. बाकी राहिलेल्या सर्वांच्या नशिबीं, सकाळपासून संध्याकाळपर्यंत मानसिक किंवा शारीरिक कष्ट करावे, नित्यशः कुटुंबभरणाच्या चिंतेनें व्यग्र असावें, व जीवनार्थ कलहामध्यें आपलें मन इतकें संकुचित करून घ्यावें कीं त्यांत कोमल व श्रेष्ठ मनोवृत्तीचा प्रवेशच होऊं नये,—हा अनिष्ट भाग लिहिला आहे. याप्रमाणें मनुष्याची स्थिति असल्यानें तो स्वभावतः स्वहितास जितका लंपट असतो, तितकाच परहिताविषयीं उदासीन असतो. क्रूरता व कठोरता यांचा त्याच्या हृदयांत साहजिक प्रादुर्भाव होतो; व ललितकलादिकांपासून होणारीं, किंवा परोपकार, प्रीति, व पराक्रम यांपासून होणारीं, श्रेष्ठ सुखें अज्ञान व अव्यासंग यामुळें त्यास न रुचून, शारीरिक व पाशव उपभोगांत तो गर्क होऊन जातो, व अशानेंच आपण आपलें अत्यंत हित साधीत आहों, असें त्यास वाटत असतें. तथापि ही त्याची समजूत चुकीची आहे, हें जे आपणांस या श्रेष्ठ सुखांस पात्र करून घेतात त्यांच्या अनुभवावरून निःसंशय सिद्ध होतें व याच कारणामुळें सामान्य जनांत ही पात्रता कोणत्या रीतीनें आणावी, त्यांची स्वहितदृष्टि अंशतः तरी कशी लोपवावी, व पशुवृत्तीपासून त्यांचें मन मुहूर्तमात्र तरी दूर करून वरिष्ठ सुखांकडे कसें वळवावें, हा विचार आजकाल सर्व सुधारलेल्या देशांत राज्यकर्त्यांच्या व नीतिप्रसारकांच्या हृदयांत निरंतर घोळत आहे. उदाहरणार्थ, इंग्लंड देश जरी इतका समृद्ध व सुधारलेला आहे, तरी त्यांतील बहुतेक लोकांस उपजीविकेकरितां काचाडकष्ट करावे लागतात; त्यांस आपल्या उद्योगापलीकडे दुसरें कांहीं दिसेनासें होतें, व त्या उद्योगासंबंधानें पाहिलें असतां ज्याप्रमाणें ते यंत्रवत् दिसतात, त्याप्रमाणें त्यांची इतर वागणूक बहुधा पशुवत् असते. कारखान्यांतून घरीं आल्यावर दारू पिऊन मस्त व्हावें, त्या दारूचे अमलांत कुटुंबांतील माणसांस त्रास द्यावा, ग्राम्य व बीभत्स सुखांतच परमानंद मानावा, व धर्माचरण व विश्रांति यांकरितां राखून ठेवलेला दिवसही याच रीतीनें घालवावा, असा ज्यांचा अनुक्रम आहे, अशांची संख्या इंग्लंडांत थोडी नाहीं. अशा मनुष्यपशूंस त्यांच्या श्रेष्ठ स्वभावाची ओळख करून देण्यास, त्यांच्या हृदयांत श्रद्धा व नीति उत्पन्न करण्यास, व त्यांस वरिष्ठ सुखाची अभिरुचि लावून त्यांची ग्राम्यता व अज्ञान घालविण्यास, चित्रकला हें उत्तम व सुलभ साधन आहे, असा अलीकडे सर्वत्र समज होत चालला आहे. उपदेशाच्या पुस्तकांवर बायबलांतील मनोवेधक गोष्टी चित्रांनीं दाखविणें, लहानपणापासून चित्रकलेचा व्यासंग करून देणें, चित्रालयें सुटीचे व

सणाचे दिवशीं उघडीं ठेवणें, ज्ञानसंपादनाचे व नीतिविषयक सर्व ग्रंथ व पत्रें चित्रांनीं सुशोभित व सुलभ करणें, व त्यांच्या द्वारें बाह्यसृष्टिकडे मन वळेल, व जिज्ञासेची निरंतर प्रवृद्धि होईल, व आपणांस स्वतःचा कांहीं वेळ विसर पडून मानसिक शक्ति विस्तार पावतील, असे सर्व सुलभ उपाय करणें, सध्यांचे काळीं सुधारलेले राष्ट्रांत अत्यंत महत्त्वाचें मानिलें आहे.

[वर्ष ६, अंक १३।१४.]

प्रसिद्धीकरण

एखादी गोष्ट घडली कीं ती प्रसिद्ध करण्याची चाल प्राचीन काळापासून चालत आली आहे. ज्या वेळीं छापण्याची कला माहीत नव्हती, किंबहुना लेखनविद्येस शास्त्रीय स्वरूप आलें नव्हतें, त्यावेळीं घडलेली गोष्ट प्रसिद्ध करणें झाल्यास तोंडीं प्रसिद्ध करीत असत. लिपि बनली नव्हती, तेव्हां चित्ररूपानेंही जाहिरात देण्याची कोठें कोठें रीत असे. परंतु या चित्ररूप जाहिरातीचा स्पष्टार्थ कळणें फार अवघड असल्यामुळें तोंडीं जाहिरात देण्याची वहिवाट अधिक पडली. एखाद्या मोठ्या रस्त्याच्या कोपऱ्यावर, बाजाराच्या जागीं, अगर दुसऱ्या कोणत्या तरी प्रसिद्ध नाक्यावर उभें राहून मनुष्यानें टिमकी वगैरे वाजवून लोकांस आपल्या भोंवतीं जमवून त्यांच्यांत तोंडानें एखादी गोष्ट प्रसिद्ध करणें यांस आमच्यांत दौंडी पिटविणें म्हणतात. दौंडी पिटविण्याची रीत इकडे खेड्यापाड्यांतच काय, पण मोठ-मोठ्या शहरांतही अद्याप चालू आहे. आमच्या देशांत हा उद्घोषणाचा प्रकार अद्याप असल्याचें नवल नाहीं. सुधारणाशिखरास पोंचलेल्या इंग्लंड देशांतही तो अजून चालत आहे. हरवलेल्या मुलाचा तलास लावण्याची अगर पार्लमेंट भरविण्याची जाहिरात तिकडे अद्याप उद्घोषणद्वाराच दिली जाते. प्रसिद्धीकरणाची ही पूर्वीची रीत जरी आजला चालू आहे, तरी छापण्याच्या कलेचा उत्कर्ष होऊन वर्तमान-पत्रांचा अलीकडे फैलाव होऊं लागल्यापासून छापील जाहिरातींचा प्रचार अंमलांत येऊन तो आजला सर्वमान्य होऊन बसला आहे. जाहिराती छापून वर्तमानपत्रद्वारा प्रसिद्ध करण्याची रीत इंग्लंडादि देशांत व्यापाराच्या भरभराटीस कारणीभूत झाल्या-मुळें, ती व्यापाराच्या उत्कर्षास अत्यावश्यक होऊन राहिली आहे. जाहिरातींची मातब्बरी सुधारलेल्या देशांत इतकी असूनही आमच्या देशांतील व्यापारी लोकांस ती अद्याप समजूं लागली नाहीं. नुकत्या कोठें दहापांच वर्षांत आमच्या लोकांच्या जाहिराती फडकूं लागल्या आहेत. याचें कारण पाहूं गेलें असतां असें दिसून येतें कीं आमच्या लोकांस प्रसिद्धीकरणाचा इतिहास अव्वलपासून माहीत नाहीं, व यामुळें त्याचें खरें मोल त्यांस चांगलेसें कळूं लागलें नाहीं. वर्तमानपत्रांत कायमची जाहि-रात ठेवणाऱ्या आमच्या एका मित्राच्या सांगण्यावरून असें कळतें कीं, जर एखाद्या अंकांत त्याची जाहिरात येण्याचें कांहीं कारणानें राहिलें, तर त्या आठवड्यांत त्याचें

खाडदिशीं ३०–४० रुपयांचें नुकसान होतें. या एका उदाहरणावरूनच प्रसिद्धीकरणाचा उपयोग किती आहे हें सहज ध्यानांत येईल. तथापि आमच्या अज्ञान व्यापारी मंडळींच्या माहितीस्तव आज आम्ही इंग्लंडांतील प्रसिद्धीकरणाची हकीकत थोडक्यांत सांगतों. ती वाचून तरी ते त्या मार्गाचा स्वीकार करून आपला अधिक फायदा करून घेवोत!

छापखान्यासंबंधाच्या माहितीचा कोश तयार करण्यापूर्वी मि. सेल नांवाच्या गृहस्थानें प्रसिद्धीकरणाचा इतिहास मिळविण्यासाठीं एक वर्ष प्रवास केला, व तो प्रवास करीत असतां त्यास असें आढळून आलें कीं पहिली जाहिरात सन १६४८ च्या आक्टोबरच्या कोणी एका " मर्क्युरिअस इलेन्टिक्स " नांवाच्या पत्रांत आली. नंतर १० वर्षांनीं " पोलिटिकस " पत्रांत चिनी चहा अमुक ठिकाणीं मिळेल, अशा अर्थाची मोठी भपकेदार जाहिरात आली. अव्वल काळच्या जाहिराती बहुतेक खाण्याचा पदार्थ अगर भाड्याची गाडी या संबंधाच्या असत. पुढें पुढें, म्हणजे " उइल्यम् आफ् ऑरेंज् " याच्या वेळीं " वांटेड " (पाहिजेत) सदरांत येणाऱ्या जाहिरातींची चाल पडली. अठराव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं पोष्टाच्या डाक मारल्याच्या नोटिसा व प्रवासास निघणाऱ्या लोकांच्या " सोबत पाहिजे " अशा जाहिराती यांचा सुकाळ झाला. चालू शतकाच्या आरंभींची स्थिति पाहिली तर असें कळतें कीं त्यावेळचीं वर्तमानपत्रें लहान असून किंमतीनें भारी असत, व जाहिरातींवर त्यावेळीं जबर कर असतांही पत्रांत त्यांची गर्दी इतकी असे, कीं इतर मजकुरापेक्षां जाहिराती त्यांत फार असल्यामुळें, पुष्कळ जागा त्यांच्याच योगानें भरली जात असे. पूर्वी प्रत्येक जाहिरातीमागें ग्रेटब्रिटनमध्यें साडेतीन शिलिंग, व ऐर्लंडांत अडीच शिलिंग कर असे. दरसाल त्या कराचा वसूल जवळजवळ १,७५,००० पौंड म्हणजे साडेसतरा लाख रुपये होत असे. सन १८३३ सालीं दर निम्याहून अधिक कमी केले, व कांहीं वर्षें लोटल्यावर कमी दर केल्यानें जें नुकसान म्हणून कित्येक वर्षें सोसावें लागलें तें सर्व भरून आलें, इतकेंच नव्हे तर खजिन्यांत उत्तरोत्तर शिल्लक पडत चालली. उघडच आहे कीं जाहिरातींवरचा कर उतरल्याबरोबर त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली, व सुमारें १०–१२ वर्षांत पूर्वीच्या दुप्पट तिप्पट जाहिराती प्रत्येक पत्रांत येऊं लागल्या. हा कर १८५३ त जेव्हां अजीबात काढून टाकला तेव्हां जाहिरातींस जणु काय पूर आला, व सेल साहेबांनीं अलीकडील एका प्रसिद्ध दररोजच्या पत्रांतील जाहिराती जेव्हां मोजून पाहिल्या

तेव्हां त्या २,१७९ आहेत असें त्यांस कळून आलें. आजला जर पूर्वीचा भारी कर वसूल करण्याची मनाई नसती तर या एका पत्रांतील एका दिवसाच्या जाहिरातींचेंच उत्पन्न ३८१ पौंड व एकंदर उभ्या सालाचें११९, ९७३ पौन्ड झालें असतें! यावरून पहातां उघड होतें कीं तिकडील लोकांस प्रसिद्धीकरणाचा उपयोग चांगला ठाऊक असून ते त्या युक्तीपासून सवड होतांच अत्यंत फायदा करून घेण्यास अगदीं तयार असतात. हेंच पहाना, जाहिरातींवरील कराचा निर्बंध नाहींसा होतांच त्यांचा प्रत्येक पत्रांतून लोटच्यालोट येऊं लागला व त्यामुळें त्या त्या पत्रकारास आपल्या पत्राचा सांचा वाढविणें अर्थात् भाग पडलें. हा कर जरी बंद झाला होता तथापि पत्रांस लागणाऱ्या कागदावर दस्तुरी असल्यामुळें व दर पत्रामागें स्टांप असल्यामुळें जाहिराती देणारांस पत्रें घेण्याचें अवघड वाटत असे. या कारणानें जाहिराती जितक्या याव्या तितक्या येत नसत. स्टांपाचा दर अगदीं आरंभीं एक पेनी, म्हणजे ८ पै होता. तो १७५६ त दीड पेनी झाला; पुढें १७८९ त दोन पेन्स झाला; व असाच वाढत जातां जातां १८१५ व्या सालीं ४ पेन्स झाला! कांहीं काल गेल्यानंतर वाटर्लूची गडबड बंद होऊन जिकडे तिकडे शांतता झाली, तेव्हां स्टांपाच्या या जबर दराबद्दल सर्वत्र ओरड होऊन तो कमी करण्यांत आला, व १८३८ त पुनः पूर्ववत् एका पेनीवर येऊन बसला. पुढें १८५५ च्या जानेवारीपासून स्टांपाची अवश्यकता नाहीं, असें ठरलें तोंच त्या सालापासून वर्तमानपत्रांच्या खपास अतोनात जोर आला. करांचा बोजा असतांना टाइम्स पत्राचा जो केवळ ५००० प्रतींचा खप होत असे तो नुसता जाहिरातींवरचा कर बंद होतांच दसपटीनें अधिक होऊं लागला व एकंदर बोजा निघाल्यामुळें आजला, त्या पत्राच्या लाखों प्रती उडत आहेत! जाहिरातींचें मान कसकसें वाढत गेलें हें यावरून सहज कळून येईल. तथापि याहून स्पष्टपणें ध्यानांत यावें म्हणून मि० सेल यांनीं त्याचें संक्षेपानें स्वरूप दाखविलें आहे तें असेः—सन १८३२ तील मे महिन्यांत टाइम्स पत्राचीं फक्त ४ पानें असून १२१ जाहिरातींचे ५ कालम भरत. त्याच सालीं जूनच्या ३० वे तारखेस त्याचीं ८ पानें केलीं व तेव्हांपासून ६५७ जाहिरातींचे २४ कालम भरूं लागले. १८४४ त त्यांचीं १२ पृष्ठें झालीं व तेव्हांपासून १४०० जाहिराती येऊं लागून त्यांस ३८ कालम लागूं लागले. तेंच पत्र १८५५ सालीं १६ पृष्ठांचें होऊन २१२२ जाहिरातींनीं त्याचे ५५ कालम अडूं लागले. आणि पुढें दहा वर्षांनीं (ह्म. १८६५ त) तर टाइम्स पत्र २० पानांचें बनून, त्यांत

२५०० वर जाहिराती येऊं लागल्या व ७५ कालमही त्यांस पुरेनासे झाले ! वाचकहो ! येवढा जो विस्तार झाला तो काय प्रसिद्धीकरणापासून व्यापारी वगैरे मंडळीस फायदा होत असल्यावांचून ? जाहिरातीसारखें प्रसिद्धीकरणाचें दुसरें कोणतेंही साधन नाहीं हें खूप समजा. तुम्हांस जर बरकत पाहिजे असेल तर करा या साधनाचा उपयोग, न् सजवा टाइम्सप्रमाणें आपल्याकडचीं नेटिव पत्रें.

[वर्ष ६, अंक १८.]

ब्रह्मदेश.

ब्रह्मदेशासंबंधानें आजवर जो येवढा काथ्याकूट झाला व शेवटीं इंग्लिशांनीं जनरल प्रेण्डरगास्ट नांवाचा आपला एक शूर सेनापति पाठवून त्याजकडून थीबा राजास पदच्युत करविलें व त्याचें राज्य ब्रिटिश ब्रह्मदेशाशीं जोडून घेतलें, त्याची हकीगत आम्हीं यापूर्वी अनेक अंकांतून दिली आहे. ब्रह्मदेशाचा निम्मा भाग इंग्रजांच्या ताब्यांत असून तेवढ्यानें त्यांची तृप्तता न होतां उरलेला निम्मा म्हणजे उत्तरभाग, जो स्वतंत्र ब्रह्मदेश या नांवानें मोडत असे, तोही काबीज करण्याची त्यांस ज्याअर्थी बुद्धि झाली त्याअर्थी एकंदर ब्रह्मदेशांत कांहीं तरी विशेष असला पाहिजे असा सहजच लोकांचा तर्क होऊन त्या देशाविषयींची माहिती करून घेण्याची त्यांस इच्छा झाली असेल. मुंबईस मि० जस्टिस जार्डाइन् यांनीं नुकतीच व्याख्यानद्वारा ब्रह्मदेशाची हकीगत सांगितली, ती संक्षेपरूपानें येथें देऊन ती त्यांची इच्छा पुरवावी असा आम्हीं आज संकेत केला आहे. ती हकीगत येणेंप्रमाणें:—

प्राचीनकाळीं आपल्या या देशाप्रमाणेंच ब्रह्मदेशासही सुवर्णभूमि असें नांव पडलें होतें व तत्संबंधाच्या आख्यायिकाही पुष्कळ आहेत. ब्रह्मदेशाच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवतांच प्रवाशाच्या दृष्टीस अशा कांहीं चमत्कारिक गोष्टी पडतात कीं, तिहींकरून तो अगदीं विस्मयचकित होतो. चिनी लोकांचे ते हलकेसे बेताचे विणलेले गाडे पाहून त्याला मोठें नवल वाटतें. नंतर नद्यांतून होड्या व जहाजें चाललेलीं त्याच्या नजरेस पडतात. या जहाजांवरील दुमजले रंग देऊन, फुलझाडांच्या कुंड्या ठेवून, वगैरे प्रकारांनीं फार सुशोभित केलेले असतात. तेथील घरें बहुधा नदीकिनाऱ्याजवळ बांधलेलीं असायाचीं. तिकडे दगड दुर्मिळ असल्यामुळें घरें बांधण्याच्या कामीं सागाचा उपयोग फार करतात, व बहुतेक घरें चिनी धाटणीचीं असतात. राईच्या बाहेर पडल्यावर सुवर्णाचे घंटाकार कळस त्याच्या दृष्टीस पडतात. रंगून येथें जें एक देऊळ आहे त्याचा कळस तर २० मैल अंतरावरून दिसतो! समुद्रास भरती आली म्हणजे सुमारें १०० मैल लांबवर आंत पाणी शिरतें, यामुळें जमीन नेहमीं दलदलीत असते, व या कारणामुळें अशा जमिनीवर जेवढीं घरें आहेत तेवढीं लांकडांच्या तक्त्यांवर बांधलेलीं आहेत. या तक्त्यांखालून नेहमीं हवा व पाणी वहात असतात. पावसाळ्यांत या नदीतीरच्या लोकांस गांवांत जावयाचें

असलें म्हणजे होड्यांत बसून जावें लागतें. तिकडील बायकापोरांस देखील वल्हीं मारतां येतात. सुसरींचा अशा वेळीं उपद्रव फार; व कोणी कोणी असेंही म्हणतात कीं त्यांच्या भक्ष्यस्थानीं कदाचित् एखादें मूलबाळ पडेल या भीतीस्तव लोक घराखालीं लांकडांची तक्तपोशी घालतात. इंग्रजांचें राज्य होण्यापूर्वी या देशांत चांगले रस्ते मुळींच नव्हते. बहुतेक प्रदेश जलमय असल्यामुळें मला तर एकदां असें वाटलें होतें कीं तिकडे एकदोन इंजिनिअर नेऊन त्यांजकडून सर्व देशभर कालवे काढवावे!

समुद्रकिनाऱ्याशीं समांतर एक पर्वतांची रांग जाते. यांपैकीं एक पर्वत ८००० फूट उंच असून विश्रांतिस्थान होण्याला अगदीं योग्य आहे. आसपासचा प्रदेश जंगलमय आहे व या जंगलांतून प्रवास करणें मोठें दुर्घट होय. कारण प्रवास करणाऱ्याला ठिकठिकाणीं उतरावयास जागा, चांगले रस्ते, जागजागीं खाणावळी वगैरे ज्या कित्येक सोयी अवश्य लागतात त्या तिकडेस मुळींच नाहींत. या जंगलची वस्ती म्हटली म्हणजे कारेन जातीचे लोक, गेंडे, वाघ, व हरणें. हे कारेनलोक आपल्या झोंपड्या बांबूच्या बांधतात. गेंडे आदिकरून जंगली जनावरें इकडील जनावरांसारखींच आहेत.

ब्रह्मी लोक सर्प व पाल हीं मोठ्या आनंदानें खातात. एके प्रसंगीं मजपुढें अपिलाचा खटला चालला होता त्यावेळीं एका कारेन जातीच्या मनुष्याच्या जिनगीचा तक्ता वाचून पहातां ह्यांत सर्पाच्या लोणच्याचीं भांडीं लिहिलेलीं दृष्टीस पडलीं! हत्तीचाही तो मेल्यावर खाण्याकडे उपयोग करतात. कांसवें व त्यांचीं अंडीं हीं तर अगदीं सामान्य भक्ष्य होत.

मर्ग्वी नांवाचा जो एक बेटांचा समूह आहे त्यांत बहुतेक सालोनीज जातीच्या लोकांची वस्ती आहे. हे लोक मासे धरून विकण्याचा धंदा करतात. सन १८८१ मध्यें जी ब्रिटिश ब्रह्मदेशांत खानेसुमारी झाली तिजवरून कळतें कीं या लोकांची संख्या फक्त ८९४ आहे. उन्हाळ्यांत हे होड्यांतूनच राहतात; पावसाळ्यांत मात्र राहण्याकरितां लहान झोंपड्या बांधतात. हिंदुस्थानच्या प्रजेपैकीं कोणताही कर न देणारे लोक काय ते हेच आहेत असें सेन्सस रिपोर्टांत सांगितलें आहे. यांच्या मासळीच्या धंद्याला जेव्हां मंदी येते तेव्हां ते उपजीविकार्थ नाना प्रकारच्या युक्ति योजतात. एका डेप्युटी कमिशनरानें त्यांची एक युक्ति पाहिली होती ती अशी कीं, त्यांच्यापैकीं एकानें एक कुत्रा पैदा करून त्याला आपल्या होडींत घालून एका

निर्जन बेटांत सोडून दिलें व तो स्वतः परत आला. गांवांत असतां त्या कुत्र्याची खाण्याची खूप चंगळ होती; परंतु या निर्जन प्रदेशांत येऊन पडतांच त्याची दोन दिवस फार हलाखी झाली. त्यानें प्रथम भोंकून भोंकून व रडून पुष्कळ गोंधळ केला, पण काय उपयोग? उलट भुकेनें प्राण मात्र अधिक व्याकूळ झाले! प्रसंगीं युक्ति सुचणें साहजिक आहे; तेव्हां त्या कुत्र्यासही युक्ति सुचून तो उंदरांचीं व घुशींचीं बिळें धुंडूं लागला, व त्यास उंदीर, घुशी व केव्हां केव्हां ससेही थोड्या श्रमानें मिळूं लागले. अन्न घालायला तेथें कोणीच नाहीं असें पाहून त्यानें नित्य पारधीचाच क्रम सुरू ठेविला. याप्रमाणें सुमारें १५ दिवस लोटल्यावर त्या सालोनानें त्यास होडींत घालून परत आणिलें व त्यास आपलेजवळ ठेवून त्यास अन्न घालण्याचें बंद ठेविलें. हें पाहून कुत्र्यानें बेटांतील क्रम सुरू ठेविला व तो रोज जी पारध आणी त्याचा आयतांच या सालोनासही उपयोग होई!

ब्रिटिश ब्रह्मदेशाचें क्षेत्रफळ एकंदर ८७,००० चारस मैल आहे व लोकसंख्या ३,७३६,००० आहे. इतक्या लोकांपैकीं शेंकडा सुमारें ६२ लोक पेगू परगण्यांत रहातात. हा प्रांत फार सुपीक असून १८५२ तल्या लढाईनंतर इंग्रजांच्या ताब्यांत आला. याच्या अगोदर त्यांच्या ताब्यांत आलेले प्रांत काय ते आराकान व टेन्यासेरिम. हे दोनही प्रांत समुद्रकिनाऱ्यालगत आहेत. ब्रह्मदेशाची संपत्ति म्हटली म्हणजे सागवान व तांदूळ. पैकीं सागवानाचा व्यापार मुख्यतः मौलमीन बंदरीं चालतो व तांदूळांचा मात्र रंगून, आक्यब, बासीन वगैरे अनेक मोठमोठ्या बंदरीं चालतो. सागाला हल्लीं तेथें फार तेजी आली आहे, व जों जों नेटिव संस्थानांतील जंगल कमी होत जाईल व संस्थानिकांकडून सागाची लागवड बंद पडत जाईल तों तों तर अधिकच तेजी येईल. हिंदुस्थानच्या बादशाही राज्यांत जेवढीं बंदरें आहेत तेवढ्यांत रंगून बंदराचा तिसरा नंबर लागेल इतकें तें मोठें आहे. ब्रह्मदेशांतील निर्गत मालापैकीं शेंकडा ६८ चा निर्गम याच बंदराहून होतो! मुंबईच्या बंदरास जसा कापूस व गहूं त्याचप्रमाणें रंगून बंदरास तांदूळ होय. चीन आदिकरून बाहेर देशीं कापूसही या बंदराहून जातो व तो सुमारें १,९०,००० पौंड किमतीचा असतो. सन १८८० पासून पाहिलें असतां असें दिसून येतें कीं ब्रह्मदेशांतून दरसाल ८ कोट रुपयांचा माल बाहेर जातो व ७ कोटींचा आंत येतो. येणारा माल म्हटला म्हणजे रेशीम, कापूस, लोंकरी सामान, तेलें, यंत्रसामान, कोळसा, मेणबत्त्या, मीठ व चाकूकातऱ्या वगैरे धातूचे पदार्थ, रेशमी व कापसाचीं कापडें बहुतेक

मुंबईच्या गिरण्यांतून तयार झालेलीं येतात. ब्रह्मदेशांत बायका चिरूट तयार करतात; परंतु त्याजकरितां लागणारी तमाखू कोकोनदाहून आणावी लागते. नीळ व ऊंस यांची लागवड करण्याची तिकडे अलीकडे बरीच खटपट चालली आहे.

तिकडची जमीन जमाबंदीची तऱ्हा बहुतेक इकडच्यासारखीच आहे. जमीनदारांचा स्वतंत्र वर्ग अलीकडे होऊं लागला असून सावकार, व्यापारी व वकील यांची त्या वर्गांत जमा होऊं लागली आहे. कांहीं प्रांतांत तर अशा जमीनदारांची संख्या शेंकडा १६ पर्यंत गेली आहे ! हे लोक सरकारला जो रयतेकडून वसूल मिळतो त्याहीपेक्षां अधिक वसूल आपल्या कुळापासून खुशाल लाटतात.

बुद्धधर्मी लोकांची संख्या सर्वांत मोठी आहे; म्हणजे शेंकडा ८७ लोक बुद्धधर्मी आहेत. शेंकडा साडेचार मुसलमान, ४ बुद्धधर्माच्याही अगोदरचा धर्म स्वीकारलेले व उरलेले हिंदु व ख्रिस्ती असे आहेत. २०–२५ लक्ष लोक ब्रह्मी भाषा बोलतात. पांच लक्षांहून अधिक कारेन भाषा वापरतात, व चिनी भाषा बोलणारे १२,००० व बंगाली भाषेचे जवळ जवळ एक लाख लोक आहेत. शिवाय हिंदुस्थानी, तामील, तेलगू वगैरे भाषा बोलणारे निदान २५,००० तरी निघतील. हे परभाषी लोक बहुतेक मजुरीकरितां तिकडे गेले असावे; कारण मजूर लोकांची त्या देशांत फार वाण आहे. तांदुळाच्या हंगामांत प्रत्येक इसम रोज एक रुपया कमावतो म्हटलें तरी चालेल. परवांच्या लढाईच्या पूर्वी युरोपियन व अमेरिकन मिळून ११,००० वर लोक होते.

तलेन नांवाची फार प्राचीन काळची एक जात आहे. या जातीच्या लोकांची वस्ती ब्रह्मदेशांत आज २,००० वर्षें असून त्यांची भाषा एकाक्षरी आहे. तथापि इतर ब्रह्मी भाषांहून ती फार भिन्न आहे. हिंदुस्थानांतील बौद्धधर्मी लोक तिकडे गेल्यामुळें इकडील विद्या व सुधारणा यांचा तलेनलोकांत बराच प्रसार झाला आहे व त्यांच्या त्यापूर्वीच्या भाषेस बरेंच नवें स्वरूप प्राप्त झालें आहे. त्यांची लिपी बहुतेक संस्कृत लिपीप्रमाणेंच आहे. त्यांनीं बौद्धधर्माचा स्वीकार केला असून हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें त्यांचें आचरण आहे. त्यांचें धर्मशास्त्र बहुतेक मनूच्या पद्धतीवर आहे. पारिभाषिक शब्द मात्र पाली भाषेंतून घेतले आहेत.

ब्रह्मदेशांतील विद्वान् लोक म्हटले म्हणजे मठवासी संन्यासिवृंद. यांनींच पूर्वी न्यायासनावर बसून जज्जाप्रमाणें खटल्यांचे निकाल करावे. याच लोकांनीं पुढें निरनिराळ्या राजांच्या सांगण्यावरून त्या त्या वेळच्या चालीरीतींस अनुरूप अशा मूळ धर्मशास्त्राच्या निरनिराळ्या आवृत्ति काढिल्या. परंतु गेल्या शतकाच्या मध्याच्या सुमारास कोणी एका आलंप्रा नांवाच्या थीबा राजाच्या पूर्वजानें तलेन राज्यांचा विध्वंस करून एक मोठें नवीन राज्य स्थापन केलें. त्यावेळच्या रीतीभातींस योग्य असें सर्वसाधारण एक धर्मशास्त्र असणें अवश्य आहे असें त्यास वाटल्यावरून त्यानें हिंदुधर्मशास्त्राच्या आधारें एक धर्मशास्त्रग्रंथ तयार करविला; व हाच ग्रंथ आतां एकंदर ब्रह्मदेशांत सुरू आहे. हा बहुतेक पूर्वीच्या तलेन लोकांच्या ग्रंथावरून तयार केला असल्यामुळें याचीही पद्धति मनूच्या पद्धतीस अनुसरूनच आहे. तलेन लोकांनीं पूर्वीपासून बौद्धधर्माचा अवलंब केला असून तोच धर्म आतां सर्व ब्रह्मदेशभर आढळतो. ब्रह्मी लोक पूर्वी रानटी होते; तथापि बौद्धधर्म व हिंदु कायदा अथवा धर्मशास्त्र यांचा त्यांनीं स्वीकार केला असल्यामुळें त्यांच्यांत पुष्कळ सुधारणा झाली असें अनुमान करण्यास हरकत नाहीं. प्रोफेसर रेहाटसेक यांचें असें म्हणणें आहे कीं ब्रह्मी लोकांत जी सुधारणा झाली व ते लोक दुष्टाचे सुष्ट बनले हें केवळ बौद्धधर्मामुळें होय. आतां मूळ ब्रह्मी लोक कोठून आले हें जरी समजण्यासारखें नाहीं तरी मध्यएशियाच्या उच्च प्रदेशांहून ते मूळ आले असावे असें मानणें गैर होणार नाहीं.

ब्रह्मीलोकांची भाषा एकाक्षरी आहे व तिचा चिनीभाषेशीं कांहीं संबंध नाहीं. या भाषेंतील शब्दास संस्कृत किंवा इंग्रजी प्रमाणें विभक्त्यादि विकारबोधक प्रत्यय लागत नाहींत. लिंग, विभक्ति व काळ हीं दाखविणें झाल्यास तोच शब्द कमीअधिक स्वर देऊन उच्चारावा लागतो. ब्रह्मदेशांत एखादा परकी मनुष्य गेला असतां त्याला तेथील भाषा समजणें फार कठीण जातें. कारण त्याला अगोदर साध्या शब्दांचे सुद्धां निरनिराळे उच्चार घटवावे लागतात. ब्रह्मी भाषेचा आणखी एक विशेष असा आहे कीं प्रश्न करतेवेळीं ते लोक स्वर चढवीत नाहींत, क्रियापदाचे शेवटीं एक बारिक प्रत्यय जोडून ते प्रश्नार्थक वाक्याचा बोध देतात. तसेंच व्यक्तिविशेषाविषयीं बोलावयाचें असतां जातिबोधक शब्द त्यापुढें योजण्याची त्यांच्यांत चाल आहे—म्हणजे, 'दोन रुपये' असें म्हणावयाचें असतां ते लोक 'रुपये दोन चपटे पदार्थ' असें म्हणतात, किंवा 'तीन गाई' म्हणावयाचें असल्यास 'गाई तिनि प्राणी' असें म्हणतात.

ब्रह्मी लोकांत निरनिराळीं कुटुंबें करून राहण्याची चाल नाहीं. तथापि मुलास विभक्त व्हावयाचें असल्यास जिनगीचा वांटा मिळविण्यासाठीं आईबाप मरेपर्यंत त्यास थांबण्याची जरूर नाहीं. मुलाच्या मनांत लग्न करून निराळें रहावें असें आलें कीं बाप आपल्या जिनगीचा वांटा त्याला घेऊं देतो. त्यासंबंधानें बिलकुल अडचण पडत नाहीं. ब्रह्मी लोक स्वभावानें फार चांगले व आनंदी आहेत. कपट त्यांस बिलकुल ठाऊक नाहीं. मात्र इतकेंच कीं ते अमळ तलख असून त्यांस नियमनाचा फार तिटकारा आहे. स्वराज्याचे वेळीं पैशाचा संचय त्यांस करावासाच वाटत नसे. कारण जर एखाद्यानें एखादी हवेली उठविली किंवा दुसरी तशीच एखादी मोठी गोष्ट केली तर ती सधनतेची दर्शक मानली जाऊन राजास त्याजपासून मोठा कर वसूल करण्यास ती साधनीभूत होई. परंतु ही स्थिति आतां जाऊन कांहीं वर्षांनीं आपल्या द्रव्याला कांहीं एक भय नाहीं, असें लोकांस वाटूं लागलें म्हणजे ते अर्थ संचय करूं लागतील. हल्लीं म्हटलें म्हणजे ब्रह्मी गृहस्थास पैसा अनायासें चटकन मिळतो व त्याचा व्ययही पण चटकन् होतो. तांदळाची विक्री होऊन गांवांत पैसा आला कीं गांवकऱ्यांनीं तमासगिरांचे फड जमवून त्यांचे रोज तमाशे करवावे व त्यांस यथेच्छ बिदागी देऊन संतुष्ट करावें असा क्रम चालू आहे. या लोकांस शर्यत किंवा रेड्यांची टक्कर पाहण्याची व जुगार खेळण्याची फार हौस• अशा ठिकाणीं जाते वेळीं निरनिराळ्या रंगांचे रेशमी किंवा कापसाचे कपडे पांघरून व डोक्याला उत्तम खासा रेशमी रुमाल गुंडाळून जातात. ब्रह्मी लोकांस आपल्या लांबलचक केसांचा मोठा गर्व वाटतो. मनुष्य वृद्ध झाला कीं तो अधिक धार्मिक बनतो व मग तो आपल्या पैशाचा व्यय एखादें देवालय किंवा एखादा मठ बांधण्याकडे करतो व त्यानें असें कांहीं मोठें कृत्य केल्यावर तो सर्वत्र पूज्य होतो. प्रत्येक गांवाबाहेर एखादातरी मठ असावयाचाच. या देशांत जशी धर्मबुद्धि व जसें दातृत्व आहे तसें इतर कोणत्याही देशांत नाहीं म्हटलें तरी चालेल. इकडे कोणीही मनुष्य उपाशी मरत नाहीं. गरीब लोकांची तेव्हांच सोय होते.

पूर्वेकडील इतर देशांतल्या स्त्रियांपेक्षां ब्रह्म देशांतील स्त्रियांची स्थिति अधिक चांगली आहे. तेथल्या कायद्यानें मालमत्तेवर त्यांचा पुरुषाइतका हक्क चालतो. त्यांचीं लग्नें इकडल्यासारखीं आईबापांच्या हातून लहानपणींच होत नाहींत. त्या मोठेपणीं स्वतःच आपल्या पसंतीचा नवरा पाहून त्यास वरतात. लग्न झाल्यावर

एखाद्या बायकोस जर आपल्या नवऱ्याची गैरवर्तणूक दिसून आली तर तिला त्यापासून विभक्त राहाण्याची कोर्टाकडून परवानगी मिळवितां येते व जिनगीचा वांटा मागून घेतां येतो. बहुभार्यत्व जरी तिकडे सशास्त्र मानितात तरी तें लोकमता-विरुद्ध होय. ब्रह्मी स्त्रियांनीं हवा तो धंदा केला असतां चालतें. स्त्री विवाहित असो किंवा अविवाहित असो; तिनें वाटेल तो धंदा करावा. ब्रह्मदेशांतून प्रवास करून आलेल्या बहुतेक लोकांचा अभिप्राय असा आहे कीं तेथील स्त्रीजाति अत्यंत बुद्धि-मान् असून सद्वर्तनशील असते, ब्रह्मी बायका दिसण्यांत सुरेख असून स्वभावानें बऱ्याच चांगल्या असतात. सुरेख पोशाख करण्याची त्यांना पुष्कळ हौस असते व यावरून त्या मोहकताप्रिय असाव्यात असें उघड दिसतें. त्यांना डोकींत फुलें घालणें फार आवडतें व म्हणूनच बनावट फुलें तयार करण्याचा तिकडे बराच मोठा व्यापार चालतो. तिकडील एकंदर स्त्रिया तमाखू ओढतात व कानाच्या पाळीला मोठाली भोंकें पाडून त्यांत त्या आपले ओढण्याचे चिरूट खोचून ठेवितात. त्या आपल्या पतींची निवड अर्थात् स्वदेशीयांतूनच करितात. तथापि ब्रह्मी लोक स्वभावतः उधळे असतात हें त्यांस माहीत असल्यामुळें त्या या गोष्टीचा चांगला विचार करि-तात, व मग नाइलाजास्तव कोणी कोणी चिनी लोकांशीं विवाह करितात. कारण ते लोक बेताबातानें खर्च करणारे असून दारू किंवा जुगारांत पैसा उडविणारे नसतात. कित्येक लोकांचा असा समज आहे कीं चिनी पुरुष व ब्रह्मी बायका यांच्या संबंधापासून पुढें पुढें चांगली प्रजा होईल. ब्रह्मी लोकांत स्त्रियांचें जें वर्चस्व दृष्टीस पडतें त्याचें कारण पाहूं गेलें असतां असें दिसतें कीं, इकडल्याप्रमाणें औरस पुत्राचेंच तिकडे प्राधान्य नसून औरस कन्येचेंही प्राधान्य आहे. यामुळें उघडच तिकडील स्त्रीजातीस महत्त्व आलें आहे.

ब्रह्मदेशांत बहुतेककरून मठाधिपतींकडून मुलांस शिक्षण देण्यांत येतें. मठ हेच मुलांच्या शाळा होत. तेथील सरकारनें कांहीं शाळा घातल्या आहेत, पण मुलांची तिकडे फार कमी भरती असते. शाळेंत शिकणारीं एकंदर ८०,००० मुलें आहेत, परंतु त्यांपैकीं ६०,००० मठांत शिकणारीं आहेत. हल्लींच्या स्थितींत मठांतील शिक्षणच इकडील लोकांस योग्य आहे असें समजून तिकडच्या सरकारानें त्या पद्धतीस आश्रय दिला आहे. मठवासी संन्यासी गुरूंकडून मुलींस मुळींच शिक्षण देण्यांत येत नाहीं यामुळें शिक्षण मिळालेल्या मुलींची संख्या शेंकडा चार देखील सांपडणें मुष्कील आहे.

कारेन नांवाची जी जात आहे तिला वर आणण्याकरितां गेल्या शतकांत इटालिअन मिशनरींनीं पुष्कळ खटपट केली, व पुढें पहिल्या ब्रह्मी लढाईपासून अमेरिकन बाप्टे लोकांनीं तीस हातीं धरलें. याप्रकारें त्या जातीच्या लोकांची आजला बरीच सुधारणा झालेली दृष्टीस पडते. त्यांची भाषा सुरेख असून त्यांस गायनाची गोडी आहे. त्यांचे जे उपाध्ये असतात त्यांस ते तांदळाच्या रूपानें पगार देऊन बाळगतात. विद्यासंपादनासाठीं त्यांच्यांतील कांहीं लोक अमेरिकेसही गेलेले आहेत. मिशनरी लोकांनीं या लोकांस शिक्षण देऊन वर आणण्याचे जे आजवर परिश्रम केले ते तेथील सरकारास पूर्णपणें मान्य होऊन मिशनरी मंडळीकडेस सरकारनें विद्याखात्याची बरीच जबाबदारी सोंपविली आहे.

ब्रह्मदेशांत दारू पिणें, अफू खाणें व जुगार खेळणें हीं दुर्व्यसनें फार जारीनें चालतात. प्रत्येक वर्षी त्यांजपासून होणारे दुष्परिणाम नजरेस येत असून त्यांचा कांहीं प्रतिकार करितां येत नाहीं. व्यर्थ खेद मात्र होतो. कायद्याच्या योगानें त्यांचा जोर कमी करण्याविषयीं माजिस्ट्रेटांनीं पुष्कळ अक्कल खर्च करून पाहिली, परंतु कांहींएक त्याचा उपयोग झाला नाहीं. ब्रह्मी माणसाचें डोकें बरेंच हलकें असतें, कां कीं पेला झोकल्यावर तो तेव्हांच तेरीमेरीवर येतो व अगदीं विचारशून्य होऊन आपल्या दावेकऱ्यावर एकदम तरवार उपसून जातो. कित्येक ज्वानांस तर एखाद्यानें घर फोडणें किंवा दिवसाढवळ्या चोरी करणें हें मोठें शूरपणाचें कृत्य वाटतें. त्यांचा समज कीं तसें करणें म्हणजे केवळ खेळ होय. असला गुन्हा लढाईची धामधूम चालली असते त्यावेळीं खूपच माजतो. एकंदरीनें पहातां त्या लोकांत नीति व सुविचार यांची कमतरता दृष्टीस पडते. चांगलें खाणें व यथेच्छ करमणूक ह्या गोष्टी पैशावांचून चालत नसतात असें जाणून पैशाच्या तजविजीसाठीं ते मधून मधून शेजाऱ्यापाजाऱ्यास नाडतात.

त्यांच्या खेळकरमणुकीविषयीं मागें थोडासा उल्लेख केलाच आहे. येथें इतकेंच सांगितलें पाहिजे कीं त्यांच्यांत बोटींची शर्यत म्हणजे मोठा मौजेचा खेळ समजतात. अरुंद अशा होड्यांतून वीस वीस अगर तीस तीस इसम बसून त्यांची शर्यत लावायाची म्हणजे त्यांस अत्यानंद होतो. पण याहीपेक्षां रेड्यांची टक्कर त्यांस अधिक आवडते. नाटकें व तमाशे यांची तर त्यांना इतकी हौस असते कीं कोणी कोणी तर त्यांच्यासाठीं सगळी रात्रच्या रात्र बागेंत बसूनच काढतात!

[वर्ष ६, अंक २।१२।२३.]

शिल्पशाळा.

थोडक्याच दिवसांपूर्वी रा. ब. कीर्तने, बडोद्याचे नायब दिवाण, यांनीं शिल्पकलांच्या अभ्यासाकरितां व प्रसाराकरितां म्हणून बडोद्याचे महाराजांस केलेली एक सूचना आम्हीं आपले वाचकांस सारांशरूपानें सादर केली. या सूचनेविषयीं लिहितांना आम्हीं शेवटीं असें सांगितलें होतें कीं तिजाविषयीं आम्हीं आपले अभिप्राय मागाहून देऊं. युनिव्हर्सिटीचे गेले वार्षिक समारंभाचे वेळीं व्हाइसचान्सेलर, मि. पील, यांचें जें भाषण झालें त्याचाही सारांश आम्हीं आपले वाचकांस दिलाच आहे. या भाषणांतही मुख्य भाग म्हटला म्हणजे शिल्पकलांस ह्या देशांत ऊर्जित दशेस आणण्यास उपाययोजना कोणत्या प्रकारची करावी हा होता. या भाषणांत त्यांनीं कोणतीही विशेष योजना जरी सुचविली नाहीं, तथापि या विषयाकडे सरकारचें पूर्ण लक्ष लागलें आहे असें स्पष्टपणें दर्शित केलें. तेव्हां या विषयाची सामान्यजनांपुढें वाटाघाट करण्याचा, त्यांस या कृत्यांत संकटें कोणतीं आहेत तीं दाखविण्याचा, आणि सरकारानें असलें कृत्य हातीं धरिल्यास उद्योग, द्रव्य, व इतर प्रकारांनीं त्यांवर कोणत्या प्रकारची जबाबदारी येणार हें स्पष्ट करण्याचा, आतां प्रसंग आला; असें सहज वाचकांच्या ध्यानांत येईल. तेव्हां आतां या विषयाच्या ऊहापोहास लागणें आम्हांस उचित दिसतें.

शिल्पशाळा सर्वत्र स्थापन कराव्या हें सर्वांस ग्राह्य आहे; परंतु या शिल्पशाळांत शिकवावें काय, याचा पूर्ण विचार फारच थोड्यांनीं केला असेल. हल्लीं ज्या दोनचार शिल्पशाळा (किंवा वर्कशाप्स) आमच्या इलाख्यांत आहेत, त्यांत, सुतार व लोहार यांचीं कामें शिकवितात. परंतु असल्याच शिल्पशाळा सर्वत्र स्थापित झाल्यानें तादृश फायदा नाहीं हें सर्व लोक कबूल करतील. बरें, रा. ब. नायबदिवाण यांनींही या विषयाचा फारसा विचार केल्याचें दिसत नाहीं. ते म्हणतात रसायनविद्या व गतिशास्त्र यांचें विद्यार्थ्यांस सप्रयोग ज्ञान द्यावें म्हणजे इष्ट हेतु साध्य होईल. परंतु रसायनविद्येनें होणारीं कार्यें, अनंत आहेत, व त्यांवर उभारलेले उद्योगही अनेक आहेत; गतिशास्त्रासही हींच गोष्ट लागू. तेव्हां विलायतेहून जे या शास्त्रांचे प्रोफेसर आणायाचे त्यांनीं ह्या अनेक उद्योगांचें विद्यार्थ्यांस ज्ञान करून द्यावें कीं काय, व तसें करण्यास समर्थ असे प्रोफेसर तरी मिळतील कीं नाहीं

याचाच प्रथम संशय उत्पन्न होतो. बरें, असे प्रोफेसर मिळून चार वर्षांचे अल्पकाळांत त्यांनीं विद्यार्थ्यांस सर्वकलापारंगत करून दिलें तर आपलें कार्य कितपत साध्य होणार ? जे विद्यार्थी या शिल्पशाळांत अभ्यासास येतील ते मोठ्या धनाढ्य व्यापाऱ्यांचे मुलगे असतील असें क्वचितच म्हणतां येईल; गरीबगुरीबांचींच मुलें बहुधा या शिल्पगृहांत कलाकौशल्य शिकणार. ज्या उद्योगांचे कारखाने, बाल्यावस्थेंत किंवा अडाणी तऱ्हेचे, कसे कां होईनात, आधींच आमच्या देशांत नाहींत असल्या उद्योगांचे कारखाने इकडे काढणें, व ते काढून इतर देशांत जेथें ते पूर्ण दशेस आले आहेत, त्यांशीं चढाओढीस लागणें हें आमच्या गरीब शिल्पप्रवीण विद्यार्थ्यांस आज तरी शक्य दिसत नाहीं. शिवाय, ज्या मालाची इकडे विशेष जरूर आहे व ज्या मालाचा अन्य देशांहून आम्हांस पुरवठा होत असल्यानें आम्हीं बुडत आहों; असा माल प्रथम तयार करणें विशेष श्रेयस्कर आहे; तर उगीच अप्रयुक्त उद्योगांचें ज्ञान विद्यार्थ्यांस करून देण्यापेक्षां, वर सांगितलेल्या अडचणी न येतां उद्दिष्ट हेतु सिद्धीस जातील असे धंदे प्रथम ठरविले पाहिजेत. नायब दिवाण यांनीं तसें कांहींच न करितां, रसायनविद्या फार उत्तम, गतिशास्त्र फार महत्त्वाचें, उद्योग फार आवश्यक, शिल्पकला फार लाभकारी, असल्या पोकळ वाक्पांडित्यांतच फार जागा अडविली आहे, व विशेष उपयोगी कोणत्याही प्रकारचा निर्णय त्यांचे लिहिण्यांत झाला नाहीं असें आम्हांस वाटतें. यावरून असें दिसून येईल कीं, शिल्पशाळा काढून, त्यांचा सर्व खर्च अंगीकारण्यापूर्वी वर सांगितल्याप्रमाणें कोणच्या धंद्यांचें आपण विद्यार्थ्यांस ज्ञान करून द्यावयाचें हें ठरविणें अत्यावश्यक आहे; नाहीं तर विनाकारण एक नवें खातें काढून फायद्यावांचून खर्च वाढविण्याची मात्र ही युक्ति होईल; व अशा युक्त्या सरकारानें आजपर्यंत थोड्या काढिल्या असें नाहीं. तर सरकारास असें अविचाराचें कोणतेंही कृत्य करूं न देतां, या देशांत जे उद्योग निश्चितपणें भरभराटीस येतील, ज्यांची आवश्यकता देशास आहे, ज्यांचीं साधनें अल्पायासानें मिळतील, व ज्यांचे कारखाने अडाणी तऱ्हेचे, किंवा मोडकळीस आलेले, किंवा नवीन उत्पन्न होत असलेले, असे येथें थोडेबहुत तरी आढळतात, अशाच उद्योगांचें विशेष शिक्षण विद्यार्थ्यांस मिळण्याची आपणांपैकीं प्रत्येकानें सरकारास सूचना केली पाहिजे; व सर्वांची याप्रमाणें माहिती एकत्र जुळून जर योजना झाली तर आपलें उदाहरण सर्वांस अनुकरणीय होईल, व आपण सर्वांस युक्त मार्ग दाखवून दिल्याचें श्रेय आपणांस येईल. म्हणून याच उद्योगास आम्ही पुढें लागणार.

या विषयावरील पहिला लेख लिहून इतके दिवस झाले कीं त्या लेखांत आम्हीं काय म्हटलें आहे याची वाचकांस कदाचित् आठवणही नसेल. हा लेख या पत्राचे ९ फेब्रुआरीचे अंकांत आला आहे. त्या प्रसंगीं बडोद्याचे नायबदिवाण रा. ब. वि. ज. कीर्तने यांनीं बडोद्याचे महाराजांस सुचविलेल्या एका शिल्पशाळेच्या व्यवस्थेवर आम्ही टीका करीत होतों. रा. ब. कीर्तने यांच्या व्यवस्थेचें जें साधारण स्वरूप आहे त्याचें विवेचन करून आम्हीं त्या अंकांत अखेरीस असें लिहून ठेविलें आहे कीं " शिल्पशाळा काढून त्यांचा सर्व खर्च अंगीकारण्यापूर्वी कोणकोणत्या धंद्यांचें आपण विद्यार्थ्यांस ज्ञान करून द्यावयाचें हें ठरविणें अत्यावश्यक आहे; नाहीं तर एक विनाकारण नवें खातें काढून फायद्यावांचून खर्च वाढविण्याची मात्र ही युक्ति होईल व अशा युक्त्या सरकारानें आजपर्यंत थोड्या काढिल्या असें नाहीं. तर सरकारास असें अविचाराचें कोणतेंही कृत्य करूं न देतां, चा देशांत जे उद्योग निश्चितपणें भरभराटीस येतील, ज्यांची अवश्यकता देशास आहे, ज्यांचीं साधनें अल्पायासानें मिळतील, व ज्यांचे कारखाने अडाणी तऱ्हेचे किंवा मोडकळीस आलेले, किंवा नवीन उत्पन्न होत असलेले, असे येथें थोडेबहुत तरी आढळतात, अशाच उद्योगांचें विशेष शिक्षण विद्यार्थ्यांस देण्याची आपणांपैकीं प्रत्येकानें सरकारास सूचना केली पाहिजे. "

हा लेख लिहिल्यापासून आजपर्यंत शिल्पशाळेच्या रचनेबद्दल व तिच्या कर्तव्यांबद्दल निरनिराळ्या ठिकाणच्या लोकांनीं निरनिराळ्या सूचना केल्या आहेत व सरकारही ह्याच विषयाचा सध्यां विचार करीत आहे असें दिसतें. आजपर्यंत ज्या सूचना प्रसिद्ध झाल्या आहेत त्यांपैकीं एकींतही वर सांगितल्या प्रकारच्या उद्योगधंद्यांचा विचार झालेली आमच्या पहाण्यांत आली नाहीं. कोणाही निबंधकारानें आपण ज्या शहराकरितां शिल्पशाळा काढण्याचें सुचवीत आहों, तेथें सध्यां धंदे कोणते चालतात, किंवा निश्चितपणें कोणते फायदेशीर होतील, याचा आंकड्यासहित विचार केलेला दिसत नाहीं. अशा तऱ्हेचे निबंध प्रसिद्ध झाल्यानें एक मात्र अहित होत आहे तें असें कीं, कांहीं दिवसांपूर्वी शिल्पशाळांच्या स्थापनेनें देशाचें बरेंच हित होईल असें जें पुष्कळांस वाटत होतें, ती त्यांची श्रद्धा मात्र कमी होत आहे, व शिल्पशाळा काढून कांहींएक फायदा नाहीं असें सिद्ध करण्यास, वर्तमानपत्रांतून व सभांतून लेखकार व वक्ते तयार झाले आहेत. याप्रमाणें लोकांच्या मनाची स्थिति होऊं देणें कदापि इष्ट नाहीं; आपणांपैकीं प्रत्येकानें वर सांगितल्या प्रकारची माहिती मिळविली पाहिजे. कोणत्या धंद्यांचें शिक्षण द्यावयाचें हें ठरवून

नंतर त्यांत कोणत्या सुधारणा शक्य आहेत, त्या सुधारणा होण्यास कोणत्या प्रकारचें यांत्रिक, रसायन किंवा इतर ज्ञान कारागिरांस दिलें पाहिजे इत्यादि गोष्टी निश्चित केल्या पाहिजेत; व सरशेवटीं असे धंदे देशांत काढण्यास मालाचा पुरवठा कोठून होईल, किती भांडवलाची गरज लागेल व खपाचा काय अदमास होईल, याचें आपल्या सूचनेस टिपण जोडलें पाहिजे. प्रत्येक धंद्यासंबंधीं या प्रकारची माहिती मिळविणें कांहीं अंशीं अवघड आहे खरें, परंतु अशक्य नाहीं; व अशा प्रकारची ज्या थोड्या उद्योगांबद्दल माहिती मिळेल, तेवढ्यांचेंच प्रथम शिक्षण आरंभिल्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाहीं. कोणत्याही शिल्पशाळेविषयीं सूचना करणारानें इतक्या सर्व तयारीनें निबंध लिहिल्यास, त्यास शिल्पशाळांची कांहीं गरज नाहीं, असें म्हणणारांच्या सर्व हरकती दूर करितां येतील यांत आम्हांस बिलकुल संदेह वाटत नाहीं. या हरकती नाना प्रकारच्या आहेत. कोणी म्हणतात, शिल्पशाळेंत शिकण्यास योग्य असे विद्यार्थीच मिळणार नाहींत. कोणी म्हणतात आधीं कारखाने उत्पन्न झाले पाहिजेत व मागून शिल्पशाळा; नाहीं तर शिल्पशाळेंत तयार झालेल्या स्वतः निष्कांचन अशा विद्यार्थ्यांस कामावर ठेवणार कोण ? कित्येकांचें म्हणणें आज देशांत कारखाने न निघण्याचें कारण शिल्पज्ञान नाहीं हें नव्हे, तर देशांत भांडवलच नाहीं, व परकीयांनीं भांडवल दिल्यास त्यांचे लोकही आपल्या कारखान्यांत घुसणार व आपला फायदाही घेऊन जाणार. याहून इतर अपवादकांचें म्हणणें असें आहे कीं शिल्पशाळेंत विद्यार्थी काम शिकला, तर तो अत्युत्कृष्ट कारागीर होणार व त्याचा मालही अत्युत्कृष्ट तयार होणार, परंतु असा माल विकत घेण्यास उत्तम अभिरुचीचे पैसेवाले कोठें आहेत व गरीबगुरिबांस त्याचा काय उपयोग ? युरोपियनांच्याबरोबर टक्कर मारणारे कारागीर आमच्या लोकांत नाहींत काय ? पुष्कळ आहेत. उदाहरणार्थ, एक नागपुरास आहे, एक कोल्हापुरास आहे, एक दिल्लीस आहे, व आणखीही पुष्कळ ठिकाणीं एकेक, दोनदोन सांपडतील. परंतु त्या सर्वांस अन्नाची दुधात आहे, तेव्हां त्याच जातीचे आणखी तयार करून काय करावयाचें ! याप्रमाणें नानाविध अपवादकांस समर्पक उत्तरें देणें कोणास प्रथमदर्शनीं अवघड वाटेल; परंतु वर सांगितल्या प्रकारची माहिती मिळाल्यास तें अगदीं सोपें आहे असें आमचें मत आहे. परंतु सध्यां असें झालें आहे कीं जे लोक शिल्पशाळा असाव्या असें म्हणतात, व जे नकोत असे म्हणतात, ते उभयतांही वस्तुस्थितीचें अवलोकन केल्यावांचून व वरकरणी माहितीवर अवलंबून राहून शब्द-

प्रचुर आपलें वाग्जाल पसरितात, व उभयतांच्या अशा खटपटीनें सामान्य समाजाचें मन व्यग्र व अश्रद्ध झालें आहे.

कांहीं दिवसांपूर्वी ' धंदेशिक्षण ' या शिरोलेखाखालीं आम्हीं बरेच लेख लिहिले होते. धंदेशिक्षण अवश्य आहे याबद्दल आतां सरकारास किंवा लोकांस शंका उरली असेलसें वाटत नाहीं. परंतु हें धंदेशिक्षण कोणीं हातीं घ्यावें याबद्दल मात्र वाद अद्यापि मिटत नाहीं; तथापि सरकारानें हें काम हातीं घ्यावें हा उत्तम पक्ष असें बहुमत असावेंसें दिसतें. आतां सरकारानें हें काम हातीं घेतलें म्हणजे आपल्या ऐपतीप्रमाणें खर्च करून, धंदेशिक्षण जितकें वरिष्ठ प्रतीचें व व्यावहारिक उपयोगी करितां येईल तितकें करावें हें उचित आहे, हें स्पष्टच आहे. परंतु सध्यां सरकारची ऐपत किती आहे, धंदेशिक्षणाकडे सरकारास किती खर्च करितां येईल, इत्यादि गोष्टींचा मात्र विचार करितां सरकारच्या मतांत व लोकमतांत बराच फरक दिसतो. सरकारचें म्हणणें चालू असलेल्या शाळाखात्याचाही सध्यांचा खर्च आम्हांस चालवितां येणार नाहीं, तेव्हां धंदेशिक्षणास लागणारा मोठा खर्च आम्हीं कोठून करावा ? फार झालें तर आहे या खर्चांतच इकडे तिकडे काटकसर करून जी थोडी रक्कम मोकळी होईल, व तीपैकीं फायन्यान्स कमिटीच्या धाडींतून जी बचावेल ती आम्ही या सर्वमान्य कृत्याकडे लावूं; परंतु कित्येकांचें असें म्हणणें आहे कीं धंदेशिक्षणासारख्या कृत्याकडे अल्पव्यय करणें व मुळींच न करणें ह्या दोनही गोष्टींत फारशी तफावत नाहीं. करणें तर मोठाच खर्च केला पाहिजे; नाहीं तर मुळींच करूं नये हें बरें. थोड्या खर्चांचें थोडेंसें फळ येईल हें निर्विवाद आहे, परंतु त्या थोड्याशा फळाकरितां दुसरीकडे काटकसर करणें अर्थशास्त्रदृष्ट्या कितपत योग्य होईल, ह्याची मोठीच शंका आहे. असो; आतां सरकारचें जें मत अगदीं ठाम बनून गेलें, त्याविरुद्ध फारशी तकार करण्यांत कांहीं फायदा नाहीं, व सरकारानें, अमुक दिशेनें आम्ही या प्रयत्नास लागणार असें जर पक्कें ठरविलेंसें दिसेल तर, सरकार चूक करीत आहे, सरकार आंधळें आहे, दुराग्रही आहे इतकें म्हणून स्वस्थ बसणें इतकेंच लोकांचें कर्तव्य आहे असें नाहीं. सरकारास आपल्या मतास वळवावयाचे जितके मार्ग आहेत तितके प्रथम केले पाहिजेत व करावे हें अवश्य आहे खरें, परंतु सरकारची समजूत पडत नाहीं, व तें आपला दुराग्रह किंवा मिथ्याग्रह सोडीत नाहीं असें एकदां आपल्या दृष्टीस पडतांच पुढें आपलें कर्तव्य काय याचा लोकांनीं

पुनः एकवार विचार केलाच पाहिजे. आतां सरकारची समजूत घालण्याचे सर्व प्रयत्न व्यर्थ गेले अशी कल्पना करून, व इकडे तिकडे विनाकारण काटकसर करून सरकार धंदेशिक्षणास उत्तेजन देण्याचे बुद्धीनें पांचपन्नास हजार रुपये खर्च करण्याचा निश्चय करीत आहे असें लक्षांत ठेवून, नंतर लोकांचें कर्तव्य काय याचा विचार करण्याचा आमचा विचार आहे. या सर्व प्रस्तावनेवरून वाचकांच्या सहज लक्षांत येईल कीं पुढें आम्ही जी व्यवस्था सुचविणार आहों ती उत्तमपक्ष नव्हे, तर कनिष्ठपक्ष होय.

सरकारानें कांहीं एक रक्कम या कामीं लावण्याचा निश्चय केल्यास, प्रथमतः त्यास आपण असें सुचविलें पाहिजे कीं त्या रकमेचे लहान लहान भाग होऊन व्यय होणें अगदीं अप्रशस्त आहे. त्या रकमेनें जितका फायदा होईल तितका करून घेण्याची जर सरकारची इच्छा असेल तर तिचे जितके मोठे भाग होतील, व त्यांची एकवट होऊन एखाद्या सर्वोपयोगी उद्योगाकडे जितका ओघ वळेल तितका वळणें अवश्य आहे. उदाहरणार्थ, सरकारानें ५० हजार रुपये काढिल्यास त्यांचा सर्व इलाख्याभर दोनशें चारशें अशा रकमांनीं खर्च होईल तर तें आपणांस अनिष्ट गणिलें पाहिजे. परंतु जेथें अनेक धंदे नुकतेच डोकें वर काढीत आहेत, त्यांपैकीं कांहीं अज्ञानानें म्हणा, किंवा उत्तेजन नसल्यामुळें म्हणा, कधीं फायदेशीर व कधीं गैरफायदेशीर होत आहेत, व जे सरकारच्या मदतीनें व उत्तेजनानें स्थैर्य पावण्याचा संभव आहे, अशी जेथें स्थिति आली असेल, त्या ठिकाणीं मात्र त्या त्या उद्योगांच्या वृद्धीस अनुकूल असें जर सरकार उत्तेजन देईल, व सर्व इलाख्यांत मिळून पांचचार ठिकाणींच जर वरील ५० हजार रुपयांचा खर्च होईल तर त्यापासून त्या पैशाचा जितका फायदा येईल तितका दुसऱ्या तऱ्हेनें येणार नाहीं. हा विचार सरकारानें कोणतीही एक व्यवस्था अंगीकरण्यापूर्वी पूर्णपणें लक्षांत धरिला पाहिजे. हल्लीं विद्याखात्याचा कांहीं एक भाग धंदेशिक्षणाकडे जात आहे; उदाहरणार्थ, शेतकी क्लासाकडे व लहानसहान वर्कशॉप अथवा शिल्पशाळांकडे जो खर्च होतो तो धंदे-शिक्षणाकडेच होतो असें म्हणण्यास हरकत नाहीं; परंतु हा खर्च वर सांगितल्या प्रकारचा नसून विपरीत रीतीनें होत असल्यानें, सरकारास किंवा लोकांस कांहीं एक फायदा न होतां विनाकारण बूड मात्र येत आहे. तर ह्या गोष्टीकडे सरकारचे डोळे वळतील अशी आपण खटपट करणें अवश्य आहे.

[वर्ष ६, अंक ६।२७।४६.]

करविषयीं प्रथम संक्षिप्त विचार

प्रत्यक्ष आणि परोक्ष कर यांच्याविषयीं चर्चा करण्यापूर्वी करार्चे साधारण स्वरूप देणें बरें वाटल्यावरून प्रथम त्याच्याविषयीं संक्षिप्त विचार करितों. इंग्लिश लोकांत अर्थशास्त्राचा पहिला संगतवार ग्रंथ आडयाम स्मिथ यानें रचिला. करविषयीं विचार करीत असतां त्यानें तो घेण्याच्या संबंधानें मोठमोठे चार नियम घालून दिले आहेत, ते इतके चांगले आहेत कीं, त्या दिवसापासून आजपर्यंत कोणास कांहीं कराच्या संबंधानें लिहावयाचें झालें कीं, त्याचीं तीं चार सूत्रें प्रथम पुढें मांडून मग काय तें लिहावयाचें. आम्हींही सर्व अर्थशास्त्रयांच्या रूढीला अनुसरून आडयाम स्मिथ याच्या सूत्रांपासूनच आरंभ करितों.

१. प्रत्येक राज्यांतील प्रजेनें, जशी ज्याची ऐपत असेल, त्या त्या प्रमाणानें, राज्यखर्चाचा बोजा वाहवा; म्हणजे राजछत्राखालीं ज्याची मिळकत जसजशी कमी अधिक होत जाईल तसतसा कराचा कमी अधिक बोजा त्याजवर पडावा; आणि कर घेण्यामध्यें जी समता किंवा असमता होते ती याच नियमाच्या अनुसरणानें किंवा उल्लंघनानें होय.

२. प्रत्येक मनुष्याला जो कर द्यावयाचा असेल तो निश्चित असावा; उगीच पाहिजे तसा असूं नये. तो देण्याची वेळ, तो देण्याची रीती, तो किती द्यावयाचा तें मान, या सर्व गोष्टी देणाराला आणि इतरांना सुबोध आणि स्पष्ट अशा असाव्या. असें जेथें असत नाहीं, तेथें कर देणाराला कर गोळा करणाऱ्यापासून कमी अधिक त्रास सोसावा लागतो. हे कर गोळा करणारे कधीं कधीं आपल्याच अधिकारानें तो कर बेकायदेशीरपणें वाढवितात, किंवा कर देणाराला तुझ्यावरचा कर वाढवूं अशी भीति घालून मधल्यामध्यें लांच उपटतात. जे अधिकारी जात्या मगरूर किंवा लांचखाऊ नसतात, पण लोकप्रियही नसतात, त्यांच्या मगरूरपणाला आणि लांचखाऊपणाला कराच्या अनिश्चिततेमुळें उत्तेजन येतें. सर्व राष्ट्रांच्या अनुभवावरून असें सिद्ध झालें आहे कीं, कर बसविण्याच्या कामांत येवढीशी जरी अनिश्चितता असली तरी तिच्यापासून जो त्रास आणि जे घोटाळे होतात, तितका त्रास आणि तितके घोटाळे एखादे वेळीं कर जरी पराकाष्ठेच्या असमतेनें बसला गेला असला तरी त्या-

पासून होत नाहींत. वरील लिहिण्यांत अनिश्चितता आणि असमता यांतील भेद ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.

३. प्रत्येक कर अशा वेळीं किंवा अशा रीतीनें घ्यावा कीं, तो त्या वेळीं किंवा त्या रीतीनें घेतल्यास देणाराला तो फारच सोईकर पडेल. उदाहरणार्थ, जमिनीच्या सान्यावर किंवा घरभाड्यावर जो कर असतो, तो ज्या वेळेस हा सारा किंवा हें भाडें हीं दिलीं जातात, अशा वेळीं घेण्याचें ठरविलें तर तो देणाराला फार सोईचें पडतें; कारण, अशा वेळीं तो कोठून तरी पैदा करण्याची त्याची सवड झालेली असते. चैनीच्या पदार्थांवर जे कर बसतात ते परिणामीं त्या पदार्थांवर चैन उडविणारावरच पडतात. यासाठीं तसले कर ते पदार्थ तयार होऊन विक्रीस आल्यावर त्यांच्यावर बसवावे म्हणजे त्यांचा बोजा खाणारावर बेतानें पडतो, कारण ते पदार्थ घेण्याचा प्रसंग जसजसा त्याला पडत जातो, तसतसा थोडा थोडा तो तो कर देतो. शिवाय, असले पदार्थ घेणें किंवा न घेणें हें ज्याअर्थीं त्याच्या मर्जीवर अवलंबून असतें, व त्याबद्दल त्याच्यावर कोणाची जबरी नसते, त्याअर्थीं कराबद्दल जर त्याला त्रास झाला, तर त्याबद्दल जबाबदार त्याचा तोच होतो.

४. दुसरें, कर अशा रीतीनें बसवावा कीं, करामुळें सरकारी तिजोरींत जितका पैसा येत आहे त्याच्यापेक्षां फारच थोडा पैसा लोकांचे कशाबाहेर पडावा किंवा कशाबाहेर रहावा.

कधीं कधीं असें होतें कीं, करामुळें सरकारी खजिन्यांत जितका पैसा येतो, त्यापेक्षां फार फाजील पैसा लोकांच्या कशाबाहेर पडतो आणि कशाबाहेर राहतो. ही स्थिति चार प्रकारांनीं होते. प्रथम कर गोळा करण्यास पुष्कळ मनुष्यें लावावीं लागतात. त्या मनुष्याचा पगारच एखादे वेळीं कराच्या उत्पन्नाचा बहुतेक भाग खाऊन जातो; किंवा कर घेणारे लोक लांचखाऊ असल्यामुळें कराबरोबर किंवा त्याहून अधिक असें त्यांच्या लांचाचें ओझें कर देणारावर पडतें. पुनः एखादे वेळेस भलत्याच जिनसावर कर बसविल्यानें देशांतील अधिक फायद्याच्या उद्योगांतून भांडवल व श्रम काढून कमी फायद्याच्या उद्योगांत घालावे लागतात. तिसरा प्रकार असा होतो कीं, असम कर असल्यामुळें तो टाळण्याची लोकांस बुद्धि उत्पन्न होते, व तो टाळण्यासाठीं ते लबाडी करितात. ती केव्हां तरी उघाडीला येते. असें झालें म्हणजे त्यांची मालामिळकत जप्त होऊन आणखी त्यास सरकारास दंड द्यावा लागतो, व

अशानें ते अगदी धुळीस मिळतात. आतां त्यांच्या नाशानें त्यांचेंच नुकसान होतें असें नाहीं; त्यांच्याबरोबर त्यांच्या देशबांधवांचेंही होतें; कारण, त्यांनीं जमविलेलें भांडवल उत्पादक व्यापारांत न पडतां भलतीकडेच जाऊन पडतें. चवथा प्रकार असा होतो कीं, कर गोळा करणारे लोकांच्या वारंवार घरीं येतात, त्यामुळें त्यांना विनाकारण पुष्कळ त्रास, पीडा आणि जुलूम हीं सोसावीं लागतात, आणि कधीं कधीं तर या चोहोंपेक्षांही आणखी एक प्रकार घडतो तो असा कीं, कर टाळला जाऊं नये म्हणून व्यापारावर आणि कारखान्यावर ज्या प्रतिबंधक नियमांचें ओझें लादलेलें असतें, तें त्रासदायक आणि खर्चाचें असतें, इतकेंच नाहीं; तर त्यामुळें व्यापाराची किंवा कारखान्याची सुधारणा करण्याचे पंथांत अनेक अपरिहार्य अडथळे येतात.

वरील चार प्रकारांपैकीं शेवटल्या तिहींचा कांहीं विशेष विचार करण्याची गरज नाहीं; पण पहिल्याविषयीं मात्र तो करणें जरूर आहे. कारण या संबंधानें पुष्कळ लोकांच्या मनांत नाहीं नाहीं त्या तऱ्हेवाईक कल्पना बसून गेल्या आहेत. कराचा बोजा सारखा कशासाठीं पडावा ? कारण हाच प्रकार सर्व सरकारी बाबतींत असला पाहिजे. अमुक एक सरकाराला प्रिय किंवा आवडता, व दुसरा अप्रिय किंवा नावडता असा द्वैधीभाव असण्याचें कांहीं कारण नाहीं. शिवाय एकावर कर कमी करून दुसऱ्यावर तो अधिक केल्यानें ज्याच्यावर तो कमी केला जातो त्याला त्यापासून जो फायदा होतो, त्यापेक्षां ज्याच्यावर तो अधिक लादला जातो, त्याचें त्याच्यापासून जें नुकसान होतें, तें त्यापेक्षां अधिक असतें. यासाठीं सर्वांस सरकार असल्यापासून जो फायदा होत असेल त्या त्या मानानें त्यांनीं सरकारी खर्च चालवावा हें रास्त दिसतें. पण सरकारापासून कोणाला विशेष फायदा होतो ? ज्या ज्या प्रमाणानें संपत्ति अधिक असेल त्या त्या प्रमाणानें कर वाढवावा कीं काय ? सरकार मालमिळकत आणि शरीर यांचें संरक्षण करितें; यासाठीं गरीबगुरिबापासून थोरापर्यंत एकसारखा " डोईकर " बसवावा, किंवा जात्या दुर्बल जे आहेत त्यांना सरकारापासून विशेष फायदा म्हणून त्यांच्यावर अधिक बसवावा वगैरे प्रश्न मोठे मनोरंजक आहेत. आमच्या मनांत आज पुष्कळ मजल मारावयाची होती, पण विषयविस्तार आणि स्थलसंकोच यामुळें येथेंच आज थांबावें लागत आहे.

[वर्ष १, अंक २०.]

करासंबंधीं कित्येक गमतीचे प्रश्न

विसाव्या अंकांत करविषयीं संक्षिप्त विचार करीत असतां त्यासंबंधानें पहिला इंग्रजी अर्थशास्त्रवेत्ता जो आडयाम स्मिथ याचें काय म्हणणें होतें, तें सांगत असतां कराच्या संबंधानें सहजरीत्या कित्येक विलक्षण प्रश्न उद्भवतात हें दाखविलें. त्या प्रश्नांचें तेथें थोडक्यांत दिग्दर्शन केलेंच आहे. आज त्यांचा विशेष विचार करण्याचा हेतु आहे. अर्थशास्त्रांत पडणाऱ्या सर्व विषयांत कराचा विषय मोठ्याच महत्त्वाचा. कारण प्रजेच्या ऐहिक सुखाला अत्यावश्य जें सरकार, त्याचें कर हें जीवन होय. कराचा लोप झाला कीं, त्याजबरोबर सरकाराच्या अस्तित्वाचा लोप झालाच पाहिजे. कोणत्या रीतीनें व कोणत्या प्रमाणानें सरकारनें प्रजेपासून कर घेतल्यानें प्रजेचा अभ्युदय होतो, व कोणत्या उलट प्रकारानें ती भिकेला येते, सरकार आणि प्रजा या परस्परांचा अभ्युदय परस्परांवर कसा अवलंबून असतो; सरकाराच्यानें प्रजेच्या अभ्युदयास किती सहाय्य होणें शक्य आहे, व प्रजेच्या प्राप्तीचा कितवा वांटा सरकारानें घ्यावा; हे प्रश्न जसे गूढ तसे मनोरंजक आणि महत्त्वाचेही आहेत; यासाठीं बेताबेतानें त्यांचीं उत्तरें देण्याचा आपण प्रयत्न करूं.

सरकार ही सार्वजनिक किंवा सामाजिक व्यवस्था होय. म्हणजे सरकाराचें अस्तित्व प्रत्येकाच्या कल्याणाला एकसारखें अवश्य आहे. यासाठीं तें कायम रहावें म्हणून प्रत्येकानें कर दिलाच पाहिजे. आतां कोणी असें म्हणतील कीं सरकारापासून आम्हांला जितका फायदा व्हावा तितका होत नाहीं, यासाठीं आम्ही इतरांप्रमाणें कर देणार नाहीं. आमच्या मतें हें बोलणें गैरशिस्त आहे. न्यायाचा विचार करूं लागलों तर या जगांत कोठेंही पूर्ण न्याय मिळणें नाहीं. याकरितां जागोजाग थोडाबहुत जो अन्याय होत असेल त्याबद्दल राग धरून, कर देणें नाकबूल करणें, हा वेडेपणा होय. असें प्रत्येकजण करूं लागला—आणि प्रत्येकाला केव्हां तरी असें करण्याची पाळी येईल, कारण कधींना कधीं तरी प्रत्येकाच्या संबंधानें अधिकउणा अन्याय होतोच—तर थोडक्याच वेळांत राज्यव्यवस्था लयास जाऊन चोहोंकडे बंडाळी माजेल, व कोणाचेंच जीवित्व आणि वित्त सुस्थिर रहाणार नाहीं. सरकारापासून ज्या कोणास व्हावा तितका फायदा होत नसेल त्यानें त्याबद्दल रुसून जाऊन मी कमी कर देणार, किंवा मुळींच कर देणार नाहीं, असें म्हणूं नये;

तर ज्या कारणामुळें फायदा कमी होत असेल, तीं कारणें दूर करण्याचा प्रयत्न करून सर्वांस सारखा फायदा मिळण्याची खटपट झाली पाहिजे. सर्वांस सारखा फायदा याचा अर्थ इतकाच कीं, सरकारचीं जीं कर्तव्यकर्में आहेत, तीं सरकारनें सर्वांच्या संबंधानें एकसारखीं बजाविलीं पाहिजेत. एकाच्या संबंधानें तीं बरोबर बजवावयाचीं, व दुसऱ्याच्या संबंधानें तीं बजावण्यांत कुचराई करावयाची, हें उपयोगी नाहीं. असें सरकाराकडून होत असेल, तर त्याकडून तसें न होईल असें केलें पाहिजे. उदाहरणार्थ, वित्ताचें संरक्षण करणें हें सरकारच्या कर्तव्यकर्मांपैकीं एक होय. आतां असें जर होत असेल कीं गरीबाच्या वित्ताचें आणि मालमिळकतीचें संरक्षण होत नाहीं, व श्रीमंताच्या वित्ताचें मात्र होतें, तर मात्र गैरवाजवी गोष्ट खरी. तसेंच न्याय देणें हेंही सरकारचें कर्तव्यकर्म होय. तो न्याय श्रीमंतास मिळावा, व गरीबास मिळूं नये, असें मात्र होऊं नये. या संसारसमुद्रांत सरकार हें जहाजासारखें होय. राष्ट्रांतील सर्व लोक हे त्यांतील उतारू होत. तें बरें किंवा वाईट चालणें हें सर्वांच्या मेहनतीवर आणि चांगल्या वर्तणुकीवर अवलंबून आहे. जो कोणी याला भोंक पाडील तो आपल्याबरोबर सर्वांचाच नाश करून घेईल. दुसऱ्या पक्षीं, याची गति तीव्र होण्याचीं किंवा याला मजबुती आणण्याचीं जो कोणी साधनें शोधून काढील तो आपलें आणि बाकीच्यांचें एका कालींच हित करूं शकेल. यासाठीं प्रत्येकानें स्वशक्त्यनुसार हें सरकाररूपी जहाज सुरळीत चालण्याबद्दल खटपट केली पाहिजे.

कोणी असें म्हणतात कीं ज्याअर्थीं शरीरसंरक्षण करणें हें सरकारचें कर्तव्यकर्म आहे, त्याअर्थीं या बाबतींत प्रत्येक मनुष्याकर एकसारखा कर बसला पाहिजे. शरीररक्षणाबद्दल जो कर घ्यावयाचा, तो श्रीमंतापासून गरीबापर्यंत एकसारखा घेतला पाहिजे. कर पांच रुपये असला तर दरमहा सात रुपये मिळणाऱ्या शिपायापासून महिना ज्याची पन्नास हजार रुपये प्राप्ति आहे, त्याच्याकडून पांचच रुपये घेतले पाहिजेत; अधिक घेतां कामा नये. कारण सर्वांना आपला जीव एकसारखा प्यारा असतो; यासाठीं त्याच्या संरक्षणाबद्दल सर्वांनीं एकसारखी रक्कम दिली पाहिजे. हें बोलणें वरून फार सयुक्तिक दिसतें, परंतु थोडा विचार केला तर त्यांतील गोम तेव्हांच नजरेस येईल. ज्याचा जीव त्याला पराकाष्ठेचा प्यारा असतो ही गोष्ट खरी आहे, पण त्याचें संरक्षण करण्यासाठीं सरकारला सारखी मेहनत पडते

हें म्हणणें मात्र संशयास्पद आहे; कारण, जे श्रीमंत आहेत, ज्यांना हत्यारबंद चाकरमाणसें पदरीं बाळगण्याचें सामर्थ्य आहे, त्यांना आपल्या जीवसंरक्षणासाठीं सरकारावर फारसें अवलंबण्याची जरूरी नाहीं. दुसऱ्या पक्षीं जे अनाथ आहेत, जे रोगग्रस्त आहेत, ज्यांना नित्याचा चरितार्थ चालविण्याची देखील मारामार पडते, त्यांना आपल्या जीवरक्षणासाठीं सरकारच्या मदतीची फार जरूरी आहे. यासाठीं जे म्हणून अतिदरिद्री, पराकाष्ठेचें दुर्बल, व ज्यांना अन्नान्नगत झाली आहे, व सरकारानें आपली मदत काढून घेतली तर जे दुसऱ्यांच्या जुलुमामुळें चार दिवसांत दास्यत्वाच्या स्थितीस जाऊन मिळतील त्यांच्यावर जीवसंरक्षणाच्या कराचा बोजा फार पडला पाहिजे; व या स्थितींतून जों जों वर जाऊं, तों तों त्या कराचें ओझें कमी कमी होत गेलें पाहिजे. हाच विचार मनांत ठेवून कोणी राज्यकर्ता किंवा कर्ते कर बसवितील तर त्या देशाची किती शोचनीय स्थिति होईल! हें कांहीं कामाचें नाहीं. उच्च किंवा नीच कुलांत जन्मास येणें हें केवळ यादृच्छिक, प्रासंगिक, दैवयोगबद्ध होय. सृष्टींत अद्यापि जागोजाग सांपडणारी जी अनवस्था किंवा नैसर्गिक अन्यायपूर्ण दुष्ट स्थिति, तिचें दृढीकरण करणें हें अगदीं अनिष्ट होय. जगांत वाईट म्हणून जें कांहीं त्याचा उच्छेद करणें, हें आमचें पहिलें कर्तव्यकर्म. गरीबांवर ते गरीब आहेत, व त्यांच्या संरक्षणासाठीं सरकारास विशेष त्रास पडतो, म्हणून मोठा कर लादणें म्हणजे सृष्टींतील नैसर्गिक अन्यायाची व अनवस्थेची दृढता करणें होय. दुःखावर डाग देणें ही मोठी अनीति होय. यावरून गरीबांपासून शरीररक्षणाचा कर मोठा घ्यावा, असें पतिपादन करणारांचें म्हणणें खालीं पडतें, हें आमच्या वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. परंतु अधिकारमदानें अंध झालेले या गोष्टीचा बिलकुल विचार करीत नाहींत. स्वार्थरूपी जलाल विषानें त्यांच्या अंतःकरणांतील अनुकंपा, परोपकार, भूतदया, परदुःखदुखितत्वादि श्लाघनीय वृत्तींची रांगोळी करून टाकलेली असते. यासाठीं समजूतदार जे आहेत, मनुष्यमात्रावर ज्यांचें प्रेम आहे, लोकांची विपत्ति पाहून ज्यांच्या अंतःकरणाला द्रव सुटून वाईट वाटतें, अशांनीं आपल्या विचारांजनानें या अधिकारमदांधांचा मदवायु नाहींसा करण्याविषयीं अहर्निश झटलें पाहिजे. लेख बराच लांबला, यास्तव दुसऱ्या चमत्कारिक करांचा पुढें विचार करूं.

[वर्ष १, अंक २२.]

पाऊस

पदार्थवेत्त्यांचा असा एक साधारण सिद्धांत झाला आहे कीं, या जगांतील बहुतेक गोष्टींचें आदिकारण सूर्यनारायणाचे प्रखर किरण होत. पाऊस, वारा, दिनमान, झाडें, किंबहुना आपलें अस्तित्व हें सर्व याच तेजाचें पर्यवसान आहे. २० अंकांत सांगितल्याप्रमाणें पावसाचें प्रधान अंग जी वाफ तिचा आणि सूर्यकिरणांचा किती निकट संबंध असतो हें वाचकांचे लक्षांत आलेंच असेल. आपल्याला उन्हाळ्यामध्यें ज्या प्रखर किरणांपासून इतका त्रास होतो तेच किरण आपल्याकरितां समुद्रावरील वातावरणांत तेथील पाण्याच्या वाफेचा संचय करितात. पण इतक्यानेंच ते कांहीं उगीच बसत नाहींत. मागें सांगितलेंच आहे कीं, हा बाष्पसंचय वाऱ्याचे बरोबर समुद्रावरून जमिनीवर येतो. पण हे वारे येतात कोठून याचा विचार केला असतां, सहस्र किरणाचा आपल्याशीं किती संबंध आहे हें लक्षांत येईल. आतां हीं गोष्ट प्रत्येकाचे अनुभवास येण्याजोगी आहे कीं, कोणताही पदार्थ कांहीं कारणावांचून हलत नाहीं. या जगामध्यें असा एकही पदार्थ सांपडणार नाहीं कीं, जो आतां आपल्यापुढें होता व कांहीं कारण नसतां एकाएकीं येथून दोन कोसांवर जाऊन पडला. हीं जर गोष्ट खरी आहे तर असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो कीं, वातावरणामध्यें येवढा मोठा तीव्र वेग उत्पन्न होऊन जीं मोठीं वादळें उत्पन्न होतात व त्यामुळें हजारों रुपयांचें नुकसान होतें, तें कांहीं इसापनीतींतील काल्पनिक वायुदेवतेच्या श्वासोच्छ्वासानें नव्हे. दुसरी अशी शंका येते कीं, हीं आपली पृथ्वी जर वातावरणानें चोहोंकडून सारखी वेष्टिलेली आहे तर हा इतका वारा जातो तरी कोठें ? कित्येकांस हे प्रश्न अगदीं पोरकट वाटणार आहेत. " वारा कां वाहतो व कुठें वाहतो! चांगले प्रश्न! हे कां प्रश्न झाले! अहो वारा हा आपला सुरूच आहे, तो का आजचा कालचा आहे वाटतें, ते लागले चौकशी करण्यास ? तो आज हजारों वर्षे वाहतो आहे व असाच वाहणार. आपल्याला भूक कां लागते, विस्तवानें आंग कां भाजतें, दिवा कां जळतो, याचें काय उत्तर तेंच त्याचें. ह्या ह्या गोष्टी घडायच्याच. त्या काय आतां चौकशी करून फिरणार आहेत वाटतें. ह्या ह्या गोष्टी ईश्वरानें त्यांच्या नशिबींच लिहून ठेविल्या आहेत. सूर्यानें आपलें फिरावेंच, वाऱ्यानें वाहावेंच. याला काय कारण पाहिजे वाटतें ! " अशा तऱ्हेचा अर्थवाद करणारे म्हणजे

आपल्या इकडे नाहींत असें नाहीं. अशांस आम्ही इतकेंच सुचवितों कीं, अशा अर्थवादापासून कांहीं वरील प्रश्नाचा उलगडा होत नाहीं. वरील गोष्टी जरी ईश्वर-प्रणीत मानल्या तरी वारा वाहतो म्हणजे होतें काय हा प्रश्न जशाचा तसाच राहातो. ह्या गोष्टी आपल्या डोळ्यापुढें नेहमीं घडत असल्याकारणानें आपल्याला क्षुल्लकशा वाटतात, म्हणून खरोखरींच त्या तशा आहेत असें मानणें म्हणजे निवळ मूर्खपणा होय. आतां यांचीं कारणें आपल्याला कदाचित् कळत नसतील. म्हणून तीं नाहींत कीं काय ? पदार्थ वर फेंकला असतां खालीं पडतो हें प्रत्येकास माहीत आहे; पण याचें कारण जें गुरुत्वाकर्षण त्याचा पुरा थांग न्यूटनासच लागला. यावरून येवढें सिद्ध होतें कीं वरील प्रश्नांत हंसण्याजोगें कांहीं एक नाहीं. तर वारा म्हणजे काय व तो कशामुळें उत्पन्न होतो याचा विचार करूं.

हवा म्हणजे एक प्रकारचा वायु आहे व जेव्हां ही हवा इकडून तिकडे जाऊं लागते तेव्हां आपण त्यास वारा असें म्हणतों. तेव्हां वाऱ्याचें कारण शोधून काढणें म्हणजे हवा एकीकडून दुसरीकडे कां जाते याचें कारण शोधून काढणें होय. आतां चोहोंकडे जर हवा सारखीच असती तर ती एकीकडून दुसरीकडे जाण्याचें कारणच राहिलें नसतें; पण ज्याअर्थी ही गोष्ट नेहमीं प्रत्ययास येते, त्यावरून असें अनुमान करितां येतें कीं, हवेची कोठें तरी एके ठिकाणीं नेहमीं कमताई असते, व ती भरण्याकरितां दुसरीकडची हवा त्या ठिकाणीं जाते. या गोष्टीचा अनुभव पाहण्यास फार दूर जावयास नको. प्रत्येकास माहीतच आहे कीं, आपण जर विहिरींतून घागर भरून वर काढली तर विहिरीच्या पाण्यास कधींही खळगी पडत नाहीं. तर चोहोंकडलें पाणी त्या ठिकाणीं जाऊन पुनः पाण्याचा पृष्ठभाग सपाटचा सपाट होतो. त्याचप्रमाणें इकडे. हवेची जर कोठें कमताई पडली तर लागलीच सभोवारची हवा तेथें जाऊं लागते व असें होऊं लागलें म्हणजे आपण त्यास त्या दिशेकडे वारा वाहूं लागला असें म्हणतों.

हवा कांहीं पृथ्वी सोडून कोठें पळून जात नाहीं; मग अशी हवेची कमताई तरी कां पडावी हा दुसरा प्रश्न होय व ह्याही प्रश्नाचा उलगडा हल्लींच्या पदार्थवेत्त्यांनीं केला आहे. पृथ्वीच्या सर्व भागांवर सूर्याचे किरण कधींही पडत नाहींत. अर्धा भाग नेहमीं अंधारांतच असतो; व ज्या अर्ध्या भागावर प्रकाश असतो त्यांतही सूर्य डोक्यावर एकेच ठिकाणीं असतो. यावरून सूर्याची उष्णता चोहोंकडे सारखी

नसते, व त्यामुळें एकीकडची हवा जास्त तापेल. दुसरीकडची कमी व तिसऱ्या एकाद्या ठिकाणीं मुळींच तापणार नाहीं. आतां पदार्थशास्त्राचा असा एक नियम आहे कीं पदार्थ तापविल्यानें हलके होतात. पाणी इतकें जड आहे कीं, तें नुसतें हवेंत कधींही राहत नाहीं. पण त्याचीच उष्णतेनें वाफ झाली कीं तें लगेच वर चढतें. तसेंच एखादे ठिकाणची हवा जास्त तापली म्हणजे ती सभोंवारच्या हवेपेक्षां हलकी होऊन वर जाऊं लागते, व असें झालें म्हणजे सभोंवतालची हवा तेथें येऊं लागते. जसजशी एके ठिकाणची हवा अधिक किंवा कमी तापून वर जाऊं लागते, त्याप्रमाणें बाहेरची हवा अधिक किंवा कमी जोरानें तेथें येऊन भरते व लहान-मोठे वारे सुटतात. पृथ्वीवर अतिशय ऊष्णता होण्याचीं ठिकाणें म्हणजे रेताड प्रदेश होत, या ठिकाणीं जेव्हां सूर्य असतो तेव्हां तेथील हवा अतिशय तापते, व त्यामुळें फारच मोठे वारे सुटतात, ते इतके कीं ८००–९०० कोसांवरील सुद्धां हवा तेथें येते. मग तिच्याबरोबर सहजच समुद्रावरील वाफ जमिनीवर येते, व जमीन इतर प्रदेशापेक्षां गार असल्याकारणानें तेथें तिचें पाणी होतें. रेताड प्रदेशांचा आपणांस येवढा मोठा उपयोग होतो हें सरुद्दर्शनीं असंभाव्यसें वाटेल, पण थोडा विचार केला असतां ही शंका दूर होणारी आहे. वरील विवेचनावरून इतकें ध्यानांत येणार आहे कीं, सूर्याचे किरण केवळ पाण्याची वाफ करून रहात नाहींत तर दुसरे एके ठिकाणची हवा हलकी करून वारे उत्पन्न करितात व त्यानेंच समुद्रावरील पृथ्वीवर येऊन पाऊस पडतो. हें एक पावसाचें प्रधान कारण झालें. इतर कारणांचा विचार पुढें करूं.

[वर्ष १, अंक २०।२३.]

मि. ब्राईट यांचे हिंदुस्थानाविषयीं विचार.

राडिकल लोक म्हणजे राजकारणी विचारांत सर्वांत पुढें गेलेले लोक होत; जेथें कांहीं वाईट प्रकार दिसेल तेथें त्याचा एकदम समूळ उच्छेद करून टाकावा असें यांचें बहुधा मत असतें; व तसेंच जी एखादी गोष्ट चांगली अशी विचारानें ठरेल, ती एकदम अमलांत आणावी असा यांचा कल असतो. हे राडिकल लोक न्याय व शांतता यांचे परमभक्त आहेत, व स्वातंत्र्य आणि लोकसत्ता जितकी वाढेल तितकी वाढविण्याकडे यांचे सदोदित प्रयत्न चाललेले असतात. मि. ब्राईट व मि० शांबरलेन हे राडिकल लोकांचे पुढारी आहेत. हे दोनही गृहस्थ, व विशेषतः मि० ब्राईट, हे इतके प्रसिद्ध आहेत कीं त्याविषयीं आज आम्ही विशेष माहिती देत बसत नाहीं. मि० ब्राईट यांनीं हिंदुस्थानाचा पक्ष धरून गेल्या वीसपंचवीस वर्षांत पार्लमेंटांत व बाहेर आमच्या तर्फेनें बोलण्याची कधींहि संधि गमावली नाहीं. पतित लोकांच्या उद्धारार्थ आपलें अनुपम वक्तृत्व खर्ची घालण्याचा त्यांनीं निश्चयच केलेला दिसतो. आमच्या मुखत्यारांनीं आपला इंग्लंडास चेण्याचा हेतु काय व आपणांवर आपल्या देशबांधवांनीं कोणती कामगिरी सोंपविली आहे हें बर्मिंग्हाममध्यें एक मोठी टोलेजंग सभा भरवून तेथें विदित केलें. त्या सभेचे मि. ब्राईट हे अध्यक्ष असल्यानें त्यांनीं जें शेवटीं भाषण केलें तें इतकें सुरस व मनोवेधक आहे कीं तें आमच्या वाचकांस सारांशरूपानें तरी वाचावयास मिळावें असें आम्हांस वाटलें; म्हणूनच तो सारांश आम्हीं पुढें दिला आहे.

मि. ब्राईट हे भाषण करण्यास उठतांच टाळ्यांचा एकच गजर होऊन गेला, व तो थांबल्यावर त्यांनीं येणेंप्रमाणें भाषणास सुरवात केली:-

आज आपण ज्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नाचा विचार करण्यास येथें जमलों आहों, तितक्या महत्त्वाचा प्रश्न गेल्या तीस वर्षांत या टाउनहालांत निघाला नसेल. ह्या हिंदुस्थानच्या मुखत्यार मंडळीनें आपली कामगिरी उत्तम प्रकारें बजाविली असें माझें मत आहे. त्यांनीं आज आपणां हजारों लोकांपुढें, आपल्या कोट्यावधि बांधवांची काय विनंति आहे ती सादर केली. ही मंडळी जरी हिंदुस्थानच्या अगणित प्रजेनें आपले मुखत्यार करून पाठविलेली नाहीं, तथापि ज्या हजारों लोकांनीं आम्हीं स्थापन केलेल्या शाळांतून, कॉलेजांतून, युनिव्हर्सिटींतून अभ्यास केला व

विद्या संपादन केली, त्या विद्वान् लोकांचे हे मुखत्यार आहेत. आज आपण जे हजारों लोक एथें जमलों आहों, ते सामान्यतः इंग्लंडांतील लोकांचे निदर्शक आहों असें म्हणण्यास हरकत नाहीं; व त्या आम्हांपुढें व जे कोणी या देशांत योग्य असेल तेंच करणारे, व सयुक्तिक असेल त्याचेंच ग्रहण करणारे लोक असतील त्यांपुढें, हिंदुस्थानच्या अगाणित प्रजेची काय विज्ञाप्ति आहे ती सांगण्याकरितां हे गृहस्थ येथें आले आहेत. हिंदुस्थान देश ज्यांनीं जिंकला व हस्तगत करून घेतला, ते लोक जरी आपण नाहीं, तरी त्यांचेच आपण वंशज आहों; व हिंदुस्थानचें राज्य उत्तम प्रकारें चालण्याविषयीं तर आपले प्रयत्न नाहींतच, पण तें कसें तरी चालविण्याची आम्हीं सोय केली आहे. खरोखर आज हे हिंदुस्थानचे लोक ज्या स्थितींत आहेत त्या स्थितींत त्यांस कांहींसें हिणावल्यासारखें वाटणार आहे. मी जर त्यांच्या स्थितींत असतों तर मला खचितच तसें वाटलें असतें. कारण हिंदुस्थानच्या कोट्यावधि प्रजेचें गाऱ्हाणें तुम्ही ऐका, तिची तुम्ही दाद लावा, तिच्या हक्कांचा विचार करा, म्हणून आम्हां अल्पजनांपुढें त्यांस नम्रपणें सांगावें लागत आहे. असो, आपण आपलें कर्तव्य करीत आहों. येवढें तरी त्यांस समाधान आहे.

हिंदुस्थानची प्रजा किती आहे हें तुम्हांस माहीत नसेल. फ्रान्सचें राज्य, जर्मनीचें राज्य, आस्त्रियाचें राज्य व रशियाचें राज्य, हीं चार राज्यें जरी एकत्र केलीं तरी हिंदुस्थानच्या प्रजेइतकी त्यांची प्रजासंख्या होणार नाहीं. इतक्या प्रजेच्या तर्फेनें हे गृहस्थ आपणांकडे येऊन इतकेंच मागतात कीं आम्हांस न्याय द्या, आमच्या हक्कांचा विचार करा. जगांत असें एकही राज्य नाहीं कीं ज्यास हें मागणें गैरशिस्त वाटेल; परंतु हस्तगत झालेल्या राष्ट्रांस इतकेंही दिल्याचीं उदाहरणें कोठें आहेत ? इंग्लंड आणि हिंदुस्थान यांचा ज्या विलक्षण प्रकारानें संबंध जडला तो प्रकार मी येथें सांगत बसत नाहीं; तो प्रकार आपण विसरून गेलों तर बरें. मी येथें एका अमेरिकन कवीनें जें म्हटलें आहे तेंच म्हणतों: विश्वासघात, तंटेबखेडे, खून व लुटालूट, यांची आंगावर शहारे आणणारी गोष्ट, म्हणजे जीस लोक इतिहास म्हणतात, तसली गोष्ट मी तुम्हांपुढें सांगत बसत नाहीं, ती आपण विसरून जाऊं. पुढें तरी आपल्या हातून असला प्रकार न व्हावा येवढीच आज आपणांस काळजी घेतली पाहिजे.

हिंदुस्थानांत आज जे लोक राज्यकारभार चालवीत आहेत, त्यांत दोन प्रकार आहेत. एक म्हणतात "आम्हीं तरवारीनें देश पैदा केला, व तो तरवारीच्याच

जोरावर चालविणार." या लोकांस अद्याप असें कळत नाहीं कीं ही तरवार एखादे वेळीं हातच्या हातीं मोडून जाईल; व हिंदुस्थानचें राज्य तरवारीनेंच चालवायाचें म्हटलें तर तरवार जाईल मोडून व राज्यही पण गमावेल. दुसऱ्या प्रकारचे लोक यांहून समंजस आहेत व त्यांचे माझे विचार जुळतात. त्यांस हिंदुस्थानचें राज्य उत्तम प्रकारें चालविण्याची आपणांवर जबाबदारी आहे असें वाटतें, व ही जबाबदारी नीट बजावून मागील आपल्या अघोर कृत्यांचा लोकांस विसर पाडावा असा त्यांचा विचार आहे. हिंदुस्थानास जितकें स्वातंत्र्य व आपल्या सुधारणेचीं जितकीं फळें देतां येतील तितकीं देण्यास मी तर तयार आहें; तर आतां या उभयपक्षांत कोणास आपण आश्रय द्यावयाचा याचा विचार करा. मला वाटतें या दुसऱ्या पक्षास अनुकूल अशी सामान्यतः या देशाची वर्तणूक आहे. लार्ड मेयो, लार्ड नार्थब्रूक, लार्ड रिपन व लार्ड डफरिन या सर्वांनीं हिंदुस्थानची खरी कळकळ मनांत बाळगिली व खरें हित साधण्याचा प्रयत्न केला व चालविला आहे, यांत संशय नाहीं. परंतु या थोर पुरुषांच्या प्रयत्नांस मोठें विघ्न म्हटलें म्हणजे हिंदुस्थानांत अधिकारी म्हणून, व्यापारी म्हणून, प्लयांटर म्हणून राहणारे आमचेच लोक होत. या लोकांस मोठ्या विद्वान् व हुषार नेटिवांसही आपल्या बरोबरीनें वागविल्यास खपत नाहीं. हिंदु प्रजेस स्वातंत्र्य दिल्यास व उदारपणें वागविल्यास यांचें पित्त खवळतें, हा सर्वसाधारण नियम होय. यास अपवादक असे कांहीं लोक आहेत यांत शंका नाहीं. ही सिव्हिल सार्विसची मंडळी आपण उपस्थित केली ही मोठी चूकच समजली पाहिजे; तिच्या योगें मोठमोठ्या जागांचा इंग्लंडच्या लोकांस सर्व मक्ताच दिल्यासारखें झालें आहे. हे आमचे सिव्हिल सर्व्हंट अल्प वयांत मोठ्या हुद्यांच्या व जबाबदारीच्या जागांवर नेमले जातात. त्या वयांत या देशांत त्यांस कोणी कदापि अशा जागांवर नेमणार नाहीं. त्यांस आधींच बराच पुष्कळ पगार मिळतो, व वरचेवर त्यांची बढती होते; व साधारण मध्य वयांत पेन्शन मिळवून ते परत स्वदेशीं येतात. ही मंडळी विशेष शहाणपणानें वागते म्हणा, किंवा हिंदुस्थानच्या हवापाण्याचा गुण म्हणा, हे लोक पेन्शन घेऊन जेव्हां परत येतात, तेव्हां धष्टपुष्ट, तांबडेलाल व चांगले गुटगुटीत असतात. सर्व जन्म ज्यानें इंग्लंडांत घालविला, ते लोक त्यांच्याइतके सदृढ नाहींत; व त्यांस मध्य वयांत आमरणांत कोणी पेन्शनही देणार नाहीं. हे तरुण लोक हिंदुस्थानांत मोठमोठ्या पगारावर गेले म्हणज त्यांस वाटूं लागतें कीं आपण देश जिंकणारे लोक आहों, ही आपण जिंकलेली प्रजा होय. जगाचे इतिहासांत पराधीन व दुर्बल

लोकांस ज्या प्रकारचा न्याय मिळाल्याचें लिहिलें आहे तसला न्याय यांस दिला व तितकी उदारता यांस दाखविली म्हणजे बस आहे. ही गोष्ट बराबर आहे काय, हें आपणांस ठरवावयाचें आहे. मला वाटतें ज्यावेळीं आपण शाळा व कालेजें व युनिव्हर्सिट्या स्थापन केल्या, व नेटिव्हांस हवी तितकी व पाहिजे ती विद्या शिकण्यास उत्तेजन दिलें त्याचवेळीं इंग्लंडाची हिंदुस्थानाशीं कशी वागणूक असावी हें आपण ठरविलें. हिंदुस्थानांत जे असंख्य लोक आहेत त्यांत हल्लीं शेंकडों विद्वान्, विचारी, हुशार लोक आहेत. ते कोणत्या प्रकारें आपली भाषा परकी असूनही बोलतात हें आतां तुम्हीं ऐकिलेंच. त्यांमध्यें लेखकार आहेत, वर्तमानपत्रकार आहेत, त्यांनीं सभा स्थापन केल्या आहेत, व आमच्या सर्व राज्यकारस्थानांत त्यांचा पूर्ण प्रवेश आहे. त्यांस असेंही कळत आहे कीं हिंदुस्थानांत ज्या प्रकारचें राज्य इंग्रजांनीं चालविलें आहे, तसलें राज्य एक दिवसही इंग्लंडांतील लोकांस सहन व्हावयाचें नाहीं. त्या लोकांमध्यें इतका विद्येचा प्रसार झाला असतां, त्यांचे विचार इतके दूरवर गेले असतां, राणीचा जाहीरनामा त्यांच्या डोळ्यापुढें असतां, त्यांस अद्याप दास्यत्वानें वागविण्याजी जी पद्धत सुरू आहे, अद्याप शरीराच्या काळ्यागोऱ्या रंगावरून जी लहानमोठ्या जागांची व्यवस्था होत आहे, ती आपणांस योग्य आहे काय ? इकडील रेंग्याडोक्या मनुष्य, ज्यास येथें कोणी विचारीत नाहीं, तो हिंदुस्थानांत जडूज्याची जागा उपटतो, व हिंदुस्थानांत विद्वान्, सुशील व वाकबगार असे प्रख्यात जरी कायदे जाणणारे लोक असले तरी त्यांस ती जागा मिळत नाहीं ! हीच गोष्ट सर्व खात्यांत लागू आहे; परंतु आपण याचा विचार करीत नाहीं. हे लोक अगदीं तरुण असतां नौकरीवर लागणार नाहींत; मध्य वय होतांच पेन्शन घेऊन परत येण्याची त्यांची इच्छा असणारच नाहीं; व पगारही पण आमच्या सारखा जबरदस्त घेणार नाहींत; परंतु ह्या गोष्टींचा कोण विचार करतो ? तर आतां आपण असें ठरवून टाकिलें पाहिजे कीं इंग्लंडच्या लोकांस खुशालपणें चरण्याकरितांच हिंदुस्थान देश आपण बाळगायाचा नाहीं. इंग्लंडच्या कोणत्याही वसाहतीच्या देशांत असला राज्यकारभार एक दिवस टिकणार नाहीं. त्या देशांत ज्या प्रकारचे हक्क आपण आपल्या बांधवांस दिले आहेत तसे हक्क हिंदुस्थानच्या प्रजेस देण्याचा आतां वेळ आला आहे. जर कोणी असें म्हणेल कीं, आहे ही व्यवस्था काय वाईट आहे ? आपल्या लोकांस द्रव्य व कीर्ति मिळविण्याची चांगली सोय ती कां बुडवितां ? आपण इतके बलाढ्य आहोंत त्याचा

नाहीं तर फायदा काय? त्यास उत्तर इतकेंच कीं राजकारणी पुरुषानें केवळ तूर्तचा फायदा पाहूनच स्वस्थ राहतां कामा नये. त्यानें दूरवर विचार केला पाहिजे. असा विचार जर दोनशें वर्षांपूर्वी आमच्या पूर्वजांनीं केला असता तर आज आयर्लंड चा देशास जें एक शल्य होऊन बसलें आहे, तें झालें नसतें. जर आपणांस आपली अब्रू राखायाची असेल, जर आपल्या अंगास दुसरें एक शल्य लावून घ्यायाचें नसेल, तर आपण आपली हिंदुस्थानाशीं वागणूक सुधारली पाहिजे, आपण हिंदुस्थानच्या बुद्धिवान् लोकांस मोठमोठ्या जागा दिल्या पाहिजेत; व प्रसंगीं हिंदुस्थानांत उत्तम राज्यव्यवस्था राहूनही आपला हात आपणास राज्यकारभारांतून काढितां आल्यास तसें करण्यास तयार असलें पाहिजे. असा आज आपणां सर्वांचा निश्चय झाल्यास आपण आपल्या कर्तव्यास जागलों असें होईल.

[वर्ष ६, अंक १.]

शास्त्राभ्यास

शास्त्रें दोन प्रकारचीं आहेत; कांहीं शास्त्रांचा व्यवहारास लवकर उपयोग करून घेतां येतो; व कांहीं व्यवहाराच्या अगदींच निरुपयोगी असतात, किंवा त्यांचा उपयोग झालाच तर तो फारच अप्रत्यक्षपणें होतो. आमच्या प्राचीन आर्य पूर्वजांनीं ज्या शास्त्रांमध्यें मुख्यत्वें करून परिश्रम केले, तीं बहुतेक व्यवहारास अनुपयोगी अशीं होतीं, व युरोपांतही गेल्या तीनचार शतकांपूर्वी ज्या शास्त्रांचा शोध किंवा अभ्यास चालत असे, तीं अशाच प्रकारचीं होतीं. अशा प्रकारच्या शास्त्रांमध्यें आमच्या प्राचीन वेदांतादि शास्त्रांचा आम्ही समावेश करितों; व हीं शास्त्रें प्राचीन लोकांत व अर्वाचीन वयोवृद्धांत किती प्रिय आहेत, याचें प्रमाण पहाण्यास फारसें दूर जावयास नको. ज्ञानेश्वरीसारखे वेदांतपर ग्रंथ मोठ्या भक्तीनें ऐकणारे, त्या ग्रंथांतील सूत्रांचा पूर्वीच्या पद्धतीस अनुसरून मोठ्या तल्लीनतेनें ऊहापोह करणारे व आत्मा म्हणजे काय, मन म्हणजे काय, त्यांचा संयोग कोणत्या प्रकारचा असतो, त्यांची व्याप्ति कोठवर असते, इत्यादि अनिर्णेय प्रश्नांची नित्यशः चर्चा करणारे पुरुष व स्त्रिया आम्हांस आजमितीसही पुष्कळ सांपडतील. अशा प्रकारच्या प्रश्नांचा ज्या शास्त्रांत विचार केलेला असतो, तीं व्यवहारांत फारच थोडीं उपयोगी पडतील हें अगदीं उघड आहे; व त्यांचा आजपर्यंत जो मुख्य परिणाम दिसून येत आहे तो हा कीं मनुष्यांस ऐहिक सुखाविषयीं विरक्त करावें, त्यांमध्यें व्यावहारिक जनांचा तिरस्कार उत्पन्न करावा, व ज्यांच्या बुद्धिबलानें अनेक जनहिताचीं कार्यें व्हावयाचीं अशा विशालबुद्धीच्या लोकांस वेदांतछंदानें कांहींसें भ्रमिष्ट करून टाकावें.

वरतीं सांगितलेल्या शास्त्रांस बुद्धिव्यय थोडा लागतो असें कोणी समजूं नये. उलट ज्यांनीं या शास्त्रांत मूळ प्रयत्न केले, ते विलक्षण तीक्ष्ण बुद्धीचे लोक असले पाहिजेत असें आमचें मत आहे, व त्यांचा आधुनिक पाश्चिमात्य कोणत्याही शास्त्राच्या मूलतत्वशोधनाकडे विनियोग झाला असता तर आज आपण आश्चर्यभरित झालों असतों, असे ग्रंथ कदाचित् त्यांनीं निर्माण केले असते. परंतु त्यांच्या बुद्धीचा त्यांनीं वेदांतासारख्या ऊषरभूमीस पुनः पुनः कर्षणानें विलक्षण मार्दव आणून, तिजपासून असंदिग्ध सिद्धांतरूप फलप्राप्ति करून घेण्यांत विनियोग केला ही मोठी शोचनीय गोष्ट होय. अशा प्रकारें कांहीं कालपर्यंत मनुष्याचे मनानें, ऐहिक सुखांचा

तिरस्कार करून, अति गूढ व अप्रमेय विषयांच्या पाठीस लागून आपल्या सर्व मौल्यवान् शक्तींचा तिकडेच उपयोग केल्याचीं प्रत्येक समाजांत व देशांत उदाहरणें सांपडतात. हा काळ युरोपचे इतिहासांत 'मिडूल् एजेस' या नांवानें प्रसिद्ध आहे; व आमच्या देशांतील हा काळ आतांशीं कोठें जात चालला आहे. मनुष्याच्या मनाची या गूढ विषयांकडे प्रवृत्ति होण्याचीं अनेक कारणें आहेत; परंतु त्या सर्वांत मुख्य म्हटलें म्हणजे ती समाजास्थिति होय, कीं जींत अन्नवस्त्रादि शारीरिक अवश्यकता पूर्ण होण्यास फारसे कष्ट लागत नाहींत, जातिभेदानें प्रत्येक स्वस्थितीस खिळल्यानें, त्याच्या मनांत ऐहिक उत्कर्षाची इच्छाच रहात नाहीं, व जींत धर्मज्ञानाखेरीज इतर विषयांत विद्वान् लोकांचें सामान्य जनांस साहाय्य लागत नाहीं. परंतु स्वतःच्या अज्ञानामुळें बुद्धिपरिश्रम कोणीं कोणत्याही दिशेनें केल्यास त्याजबद्दल साहजिक पूज्यबुद्धि व उदार दातृत्व मात्र वास करीत असतें. आमच्या समाजाची कांहीं वर्षांपूर्वीं अशी स्थिति होती, हें दाखविणें सुलभ आहे, व विवाहादि मंगलकार्यांच्या अंतीं शास्त्रीपंडितांस निमंत्रण करून त्यांची संभावना करणें हें त्या समाजस्थितीचेंच दर्शक आहे; कारण या विद्वान् पंडितांचा व्यावहारिक उपयोग नसल्यानें त्यांची संभावना करण्याचा प्रसंग येणेंच कठीण. परंतु ती समाजस्थिति आतां राहिली नाहीं. अनुपयोगी शास्त्रांत उत्तम परिशीलन करून केवळ संभावनाद्वारें उदारनिर्वाह चालविण्याचे दिवस गेले. ज्या शास्त्रांचें किंवा विद्येचें ज्ञान आतां लोक चहातात तीं शास्त्रें निराळीं होत. ज्यांस आपल्या ज्ञानानें लोकांस अधिक ज्ञानी व सुखी करितां येईल, ज्यांची विद्या लोकांचें नित्यशः समक्षपरोक्ष उपयोगी पडेल, ज्यांचीं कलाकौशल्यें या दरिद्र देशेस पोंचलेल्या देशास अन्नवस्त्रादि मिळवून देतील, त्यांच्याबद्दल आज आम्हांस पूज्यता वाटत आहे, व त्यांच्याच नित्य संगतीकरितां आज आम्हीं कितीही द्रव्य खर्चिलें तरी त्याचें आम्हांस जड वाटणार नाहीं. हा व्यवहारांत उपयोगी पडणारीं, कलाकौशल्याचा पाया घालणारीं, व उद्योगी मनुष्यास व्यवसाय पुरविणारीं शास्त्रें पदार्थविज्ञानादि होत. या शास्त्रांचा युरोपांत प्रवेश झाल्यापासून आज पावेतों त्या खंडाचा सुधारणेंत, संपत्तींत, सदाचारांत, व उद्योगांत सारखा उत्कर्ष होत आला आहे. याच शास्त्रांच्या प्रसारानें अमेरिकेंत संपत्तीस जणूं काय ऊत येत आहे; व त्या दोनही खंडांस मनुष्यजातीचें खरें कृतयुग अथवा सुवर्णयुग पुढें येणार आहे असें वाटूं लागलें आहे, व त्याचीं चिन्हें आज कांहींशीं दिसूं लागलीं आहेत. जगाच्या एका भागाची याप्रमाणें संतत अभिवृद्धि चालली

असतां आमच्या लोकांनीं आपलें अज्ञान अद्याप सोडूं नये, अन्य राष्ट्रांशीं मित्रत्व जोडण्यास विघ्नभूत असे आपले धार्मिक व सामाजिक दुराग्रह अद्याप इष्ट मानावे, द्रव्यादि व्यवहारसाधनाचा उपयोग अत्यंत त्याज्य असमंजस कृत्यांकडे करून, महत्त्वाच्या गोष्टीविषयीं निरंतर अनास्था धरावी, हें सर्व आमच्या परम उपहास्यतेस कारण होत आहे. आमच्या लोकांचे डोळे केव्हां उघडतील ?

आमची सांप्रतची स्थिति कोणत्या प्रकारची आहे, हें कोणास सांगायास नको. पूर्वी जेथें लोकांस अन्नवस्त्राची कधींच दृदात नसल्यानें त्यांमध्यें निरंतर संतोष व समाधानवृत्ति वास करीत असे, तेथें आतां त्याच अन्नवस्त्राची दुर्मिळता होऊन, लोक अगदीं कंगाल स्थितीस येऊन पोंचले आहेत; पूर्वी जेथें स्वराज्य असल्यानें देशाची समृद्धि देशांतच खेळत असे, तेथें आतां परराष्ट्रीयांचा अंमल झाल्यानें अनेक परदेशीय लोकांस उत्तम प्रकारें पोसण्याची जबाबदारी या देशावर पडून, एतद्देशीयांचें त्यायोगें नानाप्रकारचें नुकसान होत आहे; जेथें पूर्वी लक्षावधि लोक हस्तकौशल्यानें आपला निर्वाह करीत असत, तेथें आतां दहापांच कारागिरांचाही केवळ हस्तकौशल्यानें चरितार्थ चालण्याचें कठीण झालें आहे; आणि याप्रमाणें पूर्ण दरिद्रावस्थेचीं जितकीं चिन्हें आहेत तितकीं सांप्रत या देशांत सर्वत्र आविर्भूत झालीं आहेत.

ही शोचनीय स्थिति या देशास येण्याचीं प्रमुख कारणें म्हटलीं म्हणजे प्रथम सर्वत्र साधारण सुरक्षितता असल्यानें लोकसंख्येंत जी सारखी भर पडत चालली आहे ती; दुसरें देशाच्या उत्पन्नाच्या मानानें सरकारचा खर्च नसल्यानें, कोणत्याही प्रकारचीं सार्वजनिक कामें करण्यास अन्यदेशाचें कर्ज काढावें लागतें, व त्या कर्जाच्या व्याजाचा बोजा चिरकाल या देशावर बसत आहे तो; तिसरें, एतद्देशीयांच्या बुद्धीचा सरकारी कामांत जितका उपयोग करून घ्यावा तितका न घेतल्यानें व त्या बुद्धीची इतर देशहिताच्या कामांकडेही प्रवृत्ति न झाल्यानें, राज्यप्रकरणीं परराष्ट्रीयांस दरसाल द्यावें लागणारें जबर वेतन; चवथें, या देशांतील लोकांस अन्नपाण्याखेरीज, आपल्या व आपल्या देशाच्या इतर अनेक अवश्यकता स्वतः परिपूर्ण करण्याचें सामर्थ्य किंवा गुण अंगीं नसल्यानें, अन्यदेशीय लोक त्या पुरवितात, त्यांचें वेतन.

वरतीं दाखविलेल्या कारणांपैकीं पहिलें तर अगदीं अनिवार आहे, असें कोणीही कबूल करील; बाकीच्यांचा थोडाबहुत प्रतिकार करणें आमच्या स्वाधीन आहे. सरकारचीं मोठ्या जबाबदारीचीं कामें देखील करण्यास आम्ही योग्य आहों, व तीं आम्ही बऱ्याच कमी वेतनावर करूं असें सरकारच्या आपण पूर्णपणें दृष्टीस आणिल्यास व तीं कामें करण्याचा एतद्देशीयत्वानें आम्हांस विशेष हक्क आहे, असेंही सरकारच्या वारंवार लक्षांत आपण आणून दिल्यास, वरील दुसऱ्या व तिसऱ्या कारणांचा थोडा तरी प्रतिकार होण्याचा संभव आहे; परंतु सरकारचीं सर्व कामें आपल्या हातीं घेतल्यानेंच केवळ या देशाच्या सर्व बुद्धिमान् लोकांस व्यवसाय सांपडेल असें नाहीं. अमेरिकेसारख्या स्वतंत्र व लोकसत्ताक राज्यांची, किंवा इतर कोणत्याही राज्याची स्थिति पाहिली तर असें दिसून येईल कीं, केवळ राज्यकारभार चालविण्यास देशांतील बुद्धिमत्तेचा फार थोडा अंश लागतो; बहुत अंशीं त्या बुद्धीचा व्यय स्वतंत्र व्यवसायाकडे केला पाहिजे व म्हणूनच आमच्या सांप्रतच्या स्थितींत तसें होणें विशेषेंकरून अवश्यक आहे. आपण स्वतंत्र उद्योगाच्या मार्गे लागलों, व हा उद्योग आपल्या व आपल्या देशाच्या अवश्यकता पूर्ण करण्याकडे लाविला तर या देशाच्या दारिद्र्याच्या चवथ्या कारणाचा आपणास कदाचित् समूळ उच्छेद करितां येईल. व आमच्या राष्ट्रीय बुद्धीचा या दिशेनें प्रवाह वाहणें अत्यंत इष्ट आहे.

याप्रमाणें कलाकौशल्यामध्यें आमच्या लोकांनीं होतील तितके प्रयत्न केले पाहिजेत, हें आम्ही आज पहिल्यानेंच दाखवितों असें नाहीं; हें आम्ही व इतरांनीं पुष्कळ वेळां अनेक रीतीनें दाखविलें आहे. परंतु आज आमच्या देशाची अशी कांहीं चमत्कारिक स्थिति झाली आहे कीं इकडे कलाकौशल्य सुरू करण्यास लागणारीं साधनेंच कोणास दिसत नाहींत.

युरोपियन कौशल्याचीं बारीकसारीक कामेंही पाहिलीं असतां, तीं कशीं तयार करितात, तीं तयार करण्याचीं यंत्रादि कोणतीं साधनें आहेत, व कोणते पदार्थांचा त्यांत उपयोग होतो, इत्यादि सर्व गोष्टींबद्दल आम्ही पूर्णपणें अज्ञान असल्यानें प्रत्येक कौशल्याचा पदार्थ पाहून केवळ आश्चर्य मानावें, परंतु तो आपणांस तयार करितां येईल कीं नाहीं, तीं साधनें दुर्लभ आहेत कीं काय, हें आम्हांस मुळींच कळूं नये, ही केवढी लज्जेची गोष्ट आहे! या बाबतींत विशेष दुःखाची गोष्ट ही कीं, ज्यांनीं आर्वाचीन पाश्चिमात्य शास्त्रांचा अभ्यास करून डिग्र्या मिळविल्या, व ज्यांनीं त्या

शास्त्रांचें नांवही ऐकिलें नाहीं, त्या उभयतांमध्येंही या बाबतींत सारखाच अंधार आहे; व यामुळें ज्यांची उद्योगाकडे विशेष प्रवृत्ति व ज्यांस स्वश्रमावांचून उपजीविकेचें दुसरें साधनच नाहीं त्यांस विद्वान् म्हणविणाऱ्या लोकांपासून वक्तृत्वश्रवणावांचून दुसरा कांहीं फायदाच होत नाहीं, व म्हणूनच व्यापारी लोकांत, किंवा गरीबगुरीब श्रमोपजीवी लोकांत, आधुनिक विद्वानांची फारशी चहा नसते; व हे दोन प्रकारचे लोक परस्परांपासून इतके विलग रहातात कीं परस्परांस परस्परांची यत्किंचित्ही माहिती नसते. ही अनिष्ट स्थिति दूर करण्याचा आमच्या विद्वान् लोकांनीं प्रयत्न केला पाहिजे; ज्या ज्ञानाचा व्यवहारांत विशेष उपयोग असेल, ज्यापासून देशांतील लोकांस अन्नास लावणारी एखादी कला आपणांस देशांत आणितां येईल, किंवा देशांत चालू असलेली एखादी कला सुधारतां येईल, त्या ज्ञानाकडे आपणांस विशेष लक्ष दिलें पाहिजे. तसें करण्यांतच आपलें कर्तव्यकर्म, आपली थोरवी व आपल्या देशाचें हित आहे असें आपण मनांत बाळगिलें पाहिजे.

वरतीं सांगितल्या प्रकारचा अभ्यास हल्लीं सरकारानें स्थापित केलेल्या शाळांतून किंवा कालेजांतून होत नाहीं ही गोष्ट खरी आहे, परंतु कोणीही मनुष्य आपलें सर्व आयुष्य कालेजांत घालवितो असें नाहीं; कालेजांत कांहीं दिवस कालक्रमण करून डिग्री संपादन झाल्यावर, व कोठें निर्वाहापुरतें द्रव्य मिळूं लागल्यावर, आपण आतां कृतकृत्य झालों, आतां आपलें कोणतेंही कर्तव्य उरलें नाहीं, अशी कोणी आपली समजूत होऊं देऊं नये; आधुनिक लोकांत ही अत्यंत मूर्खपणाची समजूत वास करीत असल्यानेंच त्यांचें महत्त्व कमी झालें आहे, व ते आजन्म अप्रसिद्ध राहतात. वर सांगितलेली समजूत टाकून देऊन शास्त्रावलोकन, शोधकपणा, व उद्योग, हे जर गुण आमचे विद्वान् लोक अंगीं धरतील, तर ते लोकप्रिय व लोकहितकारी होतील यांत संशय नाहीं; व ईश्वरानें दिलेल्या बुद्धिमत्तेचा आपण सद्व्यय केला, हा विचार त्यांस नेहमीं समाधान देईल.

[वर्ष ४, अंक १४।१६.]

स्वातंत्र्य



प्राचीनकाळीं आर्य म्हणून कोणी मोठे बुद्धिवान् व शूर लोक होते; त्यांपासून आम्हां हिंदूंची उत्पत्ति आहे, असा अर्वाचीन इतिहासकारांचा सिद्धांत आहे. या आर्यलोकांबद्दल आम्हांत सांप्रतकाळीं इतकी पूज्यबुद्धि आहे कीं जेव्हां जेव्हां आम्ही आपल्या स्वतःच्या संबंधानें, किंवा आपल्या स्त्रियांसंबंधानें, अथवा देशासंबंधानें अभिमानानें बोलतों त्या त्या वेळीं आम्ही आपणांस आर्य असें म्हणवितों. आर्यजन, आर्यमहिला, आर्यावर्त, आर्यभगिनी इत्यादि शब्द सांप्रत जितके प्रचारांत आहेत, तितके पूर्वी कोणत्याही काळीं असतील कीं नाहीं याचा संशयच आहे. आम्ही आपल्या आर्यपूर्वजांना इतका सन्मान कां देतों याचीं कारणें उघडच आहेत. ज्या भाषेच्या माधुर्यापुढें व रसालतेपुढें इतर सर्व प्राचीन व अर्वाचीन भाषा अगदीं फिक्या पडतात, आर्यावर्तातील हल्लींच्या तज्जन्य भाषा पूर्णावस्थेस आणण्यास जीवांचून आम्हांस दुसरें साधनच नाहीं, अशी संस्कृत भाषा आम्हांस त्यांपासून मिळाली. अति प्राचीन काळच्या अत्यंत दुरुपलब्ध इतिहासाचा थांग लावण्यास, व तत्कालीन मानवी स्थितीचें अनुमान करण्यास, ज्यांवांचून दुसरा मार्ग नाहीं, असे वेदही त्यांपासून आपणास मिळाले. तत्त्वज्ञान संपादन करण्याच्या प्रयत्नांत आपल्या सर्व मानसिक शक्तींचा निरंतर प्रयोग करून त्यांनीं बुद्धीस इतकी तीक्ष्णता आणिली, कीं तीस विचारबाह्य व अलभ्य कांहींच उरलें नाहीं; व त्या बुद्धीचे आतां आम्ही स्वभावतः वारस झालों आहों. याप्रमाणेंच आर्यलोकांपासून आपणांस दुसऱ्या अनेक गोष्टी प्राप्त झाल्या आहेत, व त्यांबद्दल आपण त्यांचे फार आभारी आहों, व आपणांस त्यांबद्दल जी पूज्यबुद्धि वाटते तीही योग्य आहे.

परंतु राजकारणीं आर्यलोकांनीं आपल्या विशाल बुद्धीचा जितका उपयोग करावा तितका केला नाहीं असें दिसतें; व त्या बाबतींत आमची बुद्धि अद्याप आकुंचित राहिली आहे. स्वातंत्र्य व त्याची योग्यता हीं त्यांच्या कधीं लक्षांतच आलीं नाहींत; किंवा हीं लक्षांत येण्याचा त्यांस कधीं प्रसंगच आला नाहीं; निदान स्वातंत्र्याची कल्पना त्यांपासून आम्हांस मिळाली नाहीं. ही कल्पना आम्हांस पाश्चात्य लोकांपासून प्राप्त झाली. स्वधर्माचा अभिमान बाळगून त्यासाठीं प्रसंगीं प्राणत्याग करणें, जुलमी व दुष्ट राजांचें पारिपत्य करून स्वराज्य स्थापन करणें, इत्यादि गोष्टींचीं उदाहरणें आमच्या इतिहासांत सांपडतात; परंतु आमच्या लोकांनीं केवळ

राजकीय स्वातंत्र्याकरितां निकरानें लढाया केल्याचीं उदाहरणें आमच्या इतिहासांत क्वचितच आढळतील. या बाबतींत युरोपियन लोकांमध्यें व आह्मांमध्यें जमीन-अस्मानाचें अंतर आहे. राजकीय स्वातंत्र्याची गोडी दोन हजार वर्षांपूर्वी ग्रीक व रोमन लोकांमध्यें दृष्टीस पडते. गेल्या चारशें वर्षांत युरोपांत जीं बंडें झालीं, त्यांतील बहुतेकांचा मूळ उद्देश नष्ट स्वातंत्र्याची पुनः प्राप्ति हा होता. युरोपियन राष्ट्रांतील लोकांस केवळ स्वातंत्र्य हा शब्दच इतका प्रिय झाला आहे कीं कोणी त्याविषयीं अपमानानें बोलल्यास त्यांचीं मनें खवळून जातात. स्वातंत्र्याचा अपहार होतो असें पाहिल्याबरोबर उदार मनाचे लोक सर्व ऐहिक वैभव व सुखें यांची परवा न बाळगून तत्संरक्षणार्थ आपले प्राणही खर्ची घालण्यास तयार होतात; व त्यांस लोकांचें साहाय्य मिळण्यास क्षणभरही उशीर लागत नाहीं. युरोपांतील लोक मूर्तिपूजक नाहींत, तथापि त्यांच्या देशांत स्वातंत्र्यदेवतेच्या मूर्तीची मोठमोठ्या मंदिरांत स्थापना केलेली आढळते. ईश्वरस्तुतीहूनही अधिक भक्तिपर व गहिंवर आणणाऱ्या अशा स्तुतिपाठांचा घोष युरोपांत वारंवार ऐकूं येतो. युरोपांतील आदिकवि होमरपासून तो व्हिक्टर ह्युगो आदि अर्वाचीन कवींपावेतों, स्वातंत्र्याधिदेवीची ज्यानें प्रेमपूर्वक स्तुति व माहात्म्य गाईलें नाहीं असा कवीही सांपडणें कठीण. स्वातंत्र्य हें ऐहिक सर्व सुखांचें आदि साधन. यावांचून मनुष्याच्या मनाचा व चित्तवृत्तींचा विकास होणें नाहीं, शास्त्रीय व धर्मसंबंधीं तत्त्वशोधनांत त्याच्या बुद्धीची अस्खलित गति होणार नाहीं, जुलमी राजांच्या पारिपत्यास लागणारी निःस्पृहता, आवेश व वीर्य त्याच्या हृदयांत उत्पन्न होणार नाहींत, इत्यादि गोष्टी इतिहासादि ग्रंथांत आणि काव्यांत वाचिल्यानें, व महान्महान् वक्त्यांच्या संभाषणांतून, बालपणापासून, नित्यशः कानीं पडल्यानें त्यांच्या अंतःकरणाचा तसाच दृढ ग्रह झाला आहे.

युरोपियन लोकांमध्यें स्वातंत्र्याची इतकी अभिरुचि असल्यानें त्यांचे वास्तविक किती फायदे झाले आहेत, व आम्हांमध्यें अद्याप स्वातंत्र्याची खरी कल्पनाही नसल्यानें आमचे किती तोटे झाले आहेत, हें कोणास सांगावयास नको. युरोपांतील बहुतेक राष्ट्रें स्वतंत्र असून स्वराज्य अनुभवीत आहेत, व त्यांची दिवसानुदिवस लोकसत्ताक राज्याकडे प्रवृत्ति आहे; आमचा हतभाग्य देश परचक्रें सोशीत सोशीत, आतां एका सुधारलेल्या जबरदस्त राष्ट्राच्या कचाट्यांत सांपडला आहे, व त्यांतून मुक्त होण्याची आशाही अनिश्चित दूर कालावर अवलंबून आहे. युरोपांतील राष्ट्रांत कलाकौशल्य व उद्योग दिवसानुदिवस उत्कर्ष पावून मानवी सुखांत भर पाडीत

आहे; आमचा देश पूर्वीचीं कलाकौशल्यें विसरत जाऊन व त्यास उद्योगाचा मार्ग न दिसून, तो एकसारखा दारिद्र्यदर्शेत निमग्न होत आहे आणि प्रत्येक सुखसाधनाकरितां खिन्नपणें राज्यकर्त्यांच्या व इतर राष्ट्रांच्या तोंडाकडे पहात आहे.

जेव्हां स्वातंत्र्याचें माहात्म्य आमच्या लोकांस कळूं लागेल, स्वातंत्र्याची खरी अभिरुचि लागून तें राखण्याची किंवा मिळविण्याची त्यांस उत्कट इच्छा उत्पन्न होईल, हल्लीं जीं अत्युच्च देवालयें आहेत त्यांहूनही उंच अशीं स्वातंत्र्याधिदेवतेचीं मंदिरें जेव्हां उभारलीं जातील, व तिच्या गंभीर स्तुतिपाठांत इतर सर्व स्तुतिपाठांचे घोष अगदीं अश्राव्य होतील, असा सुदिन ह्या देशास जेव्हां प्राप्त होईल तेव्हां मात्र स्वराज्य अनुभविण्यास आम्ही पात्र होऊं असें आम्हांस वाटतें.

वर्ष ४, अंक १.

रा. ब. केरो लक्ष्मण छत्रे कैलासवासी झाले

ही दुःखप्रद वार्ता लोकांत प्रथम प्रसिद्ध करण्याचें दुर्घट काम आम्हांवर येऊन पडलें नाहीं हें कांहीं अंशीं आमचें भाग्यच होय असें आम्ही समजतों; कारण ज्या आमचा या महात्म्याशीं शिष्यत्वाचा अनेक वर्षांचा निकट संबंध होता, व त्यामुळें ज्या आम्हांस या अलौकिक पुरुषाची खरी योग्यता ठाऊक झाली होती, त्या आम्हांस दुःखभरांत आमच्या अत्यंत प्रिय व पूज्य गुरूविषयीं मृत्युलेख लिहवताना, केरोपंतांनीं देह टाकल्यास आज सात दिवस झाले तरी त्यांच्यासंबंधानें आम्हांस पहिल्या दिवसाप्रमाणें वाईट वाटत आहे, व त्यामुळें या थोर पुरुषाविषयीं आमच्या मनांत जें लिहावयाचें आहे, किंवा जें लिहावयाला पाहिजे आहे तें कागदावर नीटनेटकें पडेल असें आम्हांस वाटत नाहीं. तथापि पत्रकर्त्याच्या नात्यानें सर्व दुःख क्षणभर गिळून टाकून याप्रसंगीं दोन शब्द लिहिणें हें कर्तव्यकर्म होय, असें समजून या आमच्या परलोकवासी प्रियगुरूविषयीं चार ओळी लिहितों.

अलिबाग तालुक्यांत नागांव येथें सन १८२४ त केरोपंतांचा जन्म झाला. त्यांचे वडील ते लहान असतांच वारल्यामुळें त्यांचें संगोपन करून त्यांना शाळेंत घालण्याचें काम त्यांच्या चुलत्याच्या अंगावर पडलें. गणितविद्येंत केरोपंतांचा जो एवढा लौकिक झाला त्याचीं पूर्वचिन्हें ते एल्फिन्स्टन कॉलेजांत विद्यार्थी असतांनाच स्पष्ट दिसूं लागलीं होतीं. पूर्वी या देशांत इंग्लंडाहून जे प्रोफेसर येत ते आतांच्या प्रोफेसरांहून अगदीं निराळ्या तऱ्हेचे असत. त्यांच्या तोडीचा नाहीं म्हणण्यास या इलाख्यांत काय तो एकच प्रोफेसर आहे. प्रिन्सिपाल वड्र्सवर्थ यांच्याप्रमाणें विद्याव्यासंगांत सतत गढून असणारे व आपल्याप्रमाणें आपल्या शिष्यांचीं मनें विद्योपार्जनाकडे लावण्यासाठीं अंतःकरणपूर्वक रात्रंदिवस झटणारे त्या काळचे प्रोफेसर असत. अशा प्रकारच्या आरलेबार नांवाच्या एका प्रोफेसरापाशीं केरोपंतांनीं गणितशास्त्राच्या मूलतत्त्वांचा अभ्यास केला. त्यांची बुद्धि जात्या पराकाष्ठेची तीव्र असल्यामुळें व तिचा विकास होण्यास आरलेबारसारख्या गुरूचें साहाय्य मिळाल्यामुळें थोड्या दिवसांत शुद्ध व मिश्र गणितांत केरोपंतास चांगली प्रवीणता आली, व ज्योतिषादि पदार्थविज्ञानाच्या अवघड शास्त्रांत पुढें त्यांनीं जी असाधारण कीर्ति संपादिली, तिचा आरलेबारच्या हाताखालीं बळकट पाया घातला गेला. या खंबीर

पायावर टोलेजंग इमारत चढावितां येण्याजोगी केरोपंतांची नैसर्गिक बुद्धिमत्ता असल्यामुळें, व तिला अनुकूल अशा बाह्य गोष्टींचें साहाय्य होत गेल्यामुळें, हा अमोलिक हिरा अज्ञातस्थानीं पडून वायां गेला नाहीं, हें आम्हां महाराष्ट्रीयांचें महत् भाग्य होय. कारण जगाची प्रस्तुत स्थिति इतकी शोचनीय आहे कीं, ऐहिक सुखांत परम श्रेष्ठ अशा स्वातंत्र्यसुखाचा ज्या देशांस प्रत्यहीं अनुभव घडत आहे, ज्या ठिकाणीं विद्योपार्जन, यंत्रकला, व व्यापार यांस उत्तम प्रकारचा राजाश्रय व लोकाश्रय मिळत आहे, व ज्या ठिकाणीं मानवी सुखवृद्धीचें आदिकारण जो शास्त्रप्रसार त्यास हरएक प्रकारचें उत्तेजन मिळत आहे, अशा देशांतही पिढ्यांच्या पिढ्या लोटल्या तरी केरोपंतांसारखा मोहरा पैदा होत नाहीं ! असें असतां या हतभाग्य देशांत हा देदीप्यमान् विद्वन्मणि उदयास आला हें आमचें केवढें नशीब ! तेजोनिधि भगवान् सूर्यनारायण आपल्या तेजानें मंडलांतील दूरदूरच्या तेजोहीन ग्रहांस प्रकाशित करतो, त्याप्रमाणें केरोपंतांसारख्या अद्वितीय विद्वन्मुकुटमणीच्या तेजानें अनेक लोकांच्या अज्ञानतिमिराचें निर्मूलन होऊन ते स्वतः प्रकाशित होतात इतकेंच नाहीं, तर परप्रकाशप्रकाशित शुक्रचंद्राप्रमाणें आपणांहून भिन्न अशा लोकांच्या अज्ञानतिमिराचा विध्वंस करूं लागतात. मानवी सुधारणा केवळ अशा प्रकारच्या तेजःपरंपरेवर सर्वथा अवलंबून आहे; आणि म्हणूनच केरोपंतांसारखा जगाचा मार्गदर्शक दीप मालवला म्हणजे लोकांस आपला अगदीं जवळचा संबंधी गेल्यासारखें होऊन अनावर दुःख होतें.

केरोपंतांनीं कुलाबा येथील वेधशाळेंत नोकरी धरल्यापासून त्यांची उत्तरोत्तर बढती कशी होत गेली, व त्यांनीं कोणकोणत्या जागीं काम केल्यावर त्यांना डेक्कन कालेजांत प्रोफेसर नेमिलें हें येथें सांगत बसण्याची गरज राहिली नाहीं. कारण गेल्या आठवड्यांत प्रसिद्ध झालेल्या **ज्ञानप्रकाशादि** येथील वर्तमानपत्रांच्या लेखांत यासंबंधाची कच्ची हकीकत पूर्णत्वानें दिली आहे, व या ठिकाणीं ती फिरून देणें निरुपयोगी व कंटाळवाणें होणार आहे. आमच्या मतें केरोपंतांच्या ठायीं सर्वांनीं ध्यानांत ठेवण्यासारखे व अनुकरण करण्यासारखे दोन गुण होते. ते कोणते म्हणाल तर, अनुपमेय विद्याव्यासंग व स्वभावसौजन्य हे होत. कदाचित् दुसरा गुण पहिल्याचा परिणामही असेल. तें कसेंही असो; आम्हांस केरोपंतांविषयीं जी पूज्यबुद्धि उत्पन्न झाली, तिचें कारण त्यांच्या अंगचे हे दोन गुण होते, व आम्हांस

खात्रीनें असें वाटतें कीं त्यांच्या पाठीमागें त्यांचें नांव अनेक वर्षें राहाण्यास हेच गुण कारण होतील. मानसिक श्रमापेक्षां शारीर श्रम लक्षपटीनें सोपे असल्यामुळें, व विद्यानंदापेक्षां विषयोपभोगाकडे, शेंकडा नव्याण्णव लोकांच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति असल्यामुळें केवळ निरपेक्षबुद्धीनें सारा जन्म विद्याव्यासंगांत घालविणारा व विद्यानंदांत पूर्ण सामाधान मानून विषयसुखांत लुब्ध न होणारा ऋषि, कोटी दोन कोटी मनुष्यांत एखादाच निपजतो. केरोपंतांप्रमाणें ज्यांना विद्येचें वेड लागलेलें असतें त्यांचा इंद्रियसुखाचा मोह तुटलेला असतो इतकेंच नाहीं, तर त्यांना लौकिकाचीही पर्वा नसते. ते जे परिश्रम करीत असतात त्यांबद्दल लोकांनीं आपणांस मान द्यावा; किंवा त्यांपासून आपणांस द्रव्यप्राप्ति व्हावी, ही गोष्ट त्यांच्या मनांत कधींच वागत नाहीं. प्लेटो, आरिस्टाटल, आरकीमेडीस, केप्लर, ग्यालीलिओ, कोपरनिकस, न्यूटन, टिंडाल, जूल, पाणिनी, कणाद, भास्कराचार्य यांसारख्या जगद्वितकर्त्या विद्याव्यसनी पुरुषांस आपापल्या विषयांत गर्क होऊन राहणें, व आपल्या शोधांनीं मनुष्यमात्राच्या सुखवृद्धीचा अभिलाष धरणें, याहून कांहींही इष्ट नसतें. असे पुरुष ज्या विषयांच्या मागें लागलेले असतात त्यांत गुंग होऊन गेले म्हणजे त्यांस कशाचेंही भान रहात नाहीं. या गोष्टीची प्रतीति केरोपंतांच्या आचरणांत आम्हांस अनेक वेळां आली होती. एकदां एक कठिण उदाहरण त्यांच्या मनांत पांच दिवस घोळत होतें. त्या पांच दिवसांत त्यांना अन्नाची चव समजली नाहीं किंवा स्वस्थपणें त्यांचा डोळा लागला नाहीं. रात्रंदिवस डोळ्यापुढें ब्राकेटस ! सहावे दिवशीं सकाळीं एकाएकीं उदाहरण सुटल्याबरोबर त्यांना जो अवर्णनीय आनंद झाला त्याची हकीकत सांगतांना सुद्धां त्यांचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून येत व त्यांचा कंठ गहिंवरानें दाटून जाई. सूर्यावरील ठिपके आणि पाऊस यांच्यांत कांहीं कार्यकारणाचा संबंध असेल असें वाटल्यावरून तो सिद्ध करण्यासाठीं मी तीनचार वर्षें एकसारखी खटपट करीत होतों. व तींत जरी मला हवें तसें यश आलें नाहीं, तरी ती चाललीं असतां मला जें गणित करावें लागलें तें दुसऱ्या विषयांच्या संबंधानें फार उपयोगी पडलें असें ते आम्हांस वारवार सांगत. नानांचीं अखेरचीं वर्षें एक मोठा विलक्षण शोध करण्याकडे लागलीं होतीं. त्यांच्या मनांत असें सिद्ध करावयाचें होतें कीं आमच्या या भूगोलावर जी जमीन आहे, ती दुसरा एखादा ग्रह या भूगोलाच्या आकर्षणांत सांपडून याच्यावर तो जोरानें आपटल्यामुळें झालेल्या त्याच्या छकलांपासून झाली असावी. नाना आणखी कांहीं दिवस वांचते व त्यांच्यानें ही कल्पना पूर्णपणें सिद्ध होती, तर त्यांची

कीर्ति सर्व सुधारलेल्या राष्ट्रांत अजरामर होती यांत बिलकुल संशय नाहीं. पण आमच्या कमनशिबामुळें तो मान या देशास मिळण्याची आशा आतां राहिली नाहीं. कारण ज्या क्षणीं सर्वघ्न निर्घृण कालानें पाश लावून त्यांचें प्राणहरण केलें त्याच क्षणीं असें गूढ प्रमेय सिद्ध करण्यास लागणारी सामुग्रीही आमच्यांतून समग्र काढून नेली असें आम्हांस वाटतें. त्यांचा बहुश्रुतपणा, त्यांची शोधकता, त्यांचा अनुभव, हातीं धरलेल्या विषयाचा पिच्छा पुरविण्याविषयीं त्यांची दक्षता, त्यांची विद्वत्ता व त्यांची वेधशाळा या सर्वांचा त्यांच्याबरोबरच अंत झाला असें म्हणण्यास हरकत नाहीं! शिव! शिव! खऱ्या विद्वानांची या देशांत केवढी दुर्मिलता ही! केरोपंतांनीं आरंभिलेले शोध पुढें चालविण्यासारखा चालू पिढींत एक मनुष्य सुद्धां आमच्या डोळ्यापुढें दिसत नाहीं! जिकडे पहावें तिकडे पोकळ विद्वेला, मिथ्या देशाभिमानाला, व लज्जास्पद अधिकारवर्गाला पूर आल्यासारखा दिसतो. अधिकारमदानें बेफाम होऊन नानाप्रकारें लोकांस पीडा देणारे, किंवा स्वोन्नतीसाठीं श्वानाप्रमाणें श्रेष्ठ युरोपियन अधिकाऱ्यांचे हातपाय चाटणारे आमच्यांतील मोठमोठ्या हुद्यावरचे जुने सरकारी नौकर, नवीन छोटेखानी हापापलेले विद्वान पोटाला मिळविण्यांत, व दोन पैसे मिळाल्यास कालेजचे विद्येसाठीं केलेलें कर्जपाणी फेडूनं बाकीची माया ब्यांकेंत टाकण्यांत किंवा बायको बाहेर पडली म्हणजे ती अक्कडबाज दिसावी म्हणून तिला दोन दागिने करून देण्यासाठीं ती तिकडे लावण्यांत सदा दंग! रहातां राहिलीं कांहीं म्हातारीं खोडें; त्यांना तुमच्या विद्याबुद्धीची आणि देशोन्नतीची कल्पनासुद्धां नाहीं! ही आमच्या लोकांची प्रस्तुतची स्थिति! केरोपंतांसारखा दुसरा विद्याव्यसनी पुरुष होण्यास निदान शंपन्नास वर्षें तरी लोटलीं पाहिजेत यांत बिलकुल संशय नाहीं.

केरोपंत सर्वकाळ विद्याव्यसनांत गढून गेले असल्यामुळें व त्यांचें बहुतेक आयुष्य आकाशस्थ ताऱ्यांच्या समागमांत गेल्यामुळें ऐहिक सुखांचा जणुं काय त्यांना पूर्ण विसरच पडला आहे कीं काय असें दिसे. खरेंच आहे; योग्यांच्या समाधिसुखाप्रमाणें अत्यंत मधुर विद्यासुखाचा ज्याला नित्यशः अनुभव त्याला विषयसुखांचा नाद कोठून असणार? व विषयसुखांवरून ज्याचें मन उडालें त्याची वृत्ति क्रोध, मद, मत्सर, अहंकार इत्यादि दूषित मनोविकारांनीं कलुषित कोठून होणार? वयाच्या मानानें केरोपंत जुन्या पिढींत गणले जात. पण जुन्या पिढींतील लोकांचीं धर्मसंबंधीं किंवा समाजसंबंधीं दुराग्रहाचीं मतें त्यांना कधींही शिवलीं नाहींत. पदार्थविज्ञानशास्त्रांत

जो पट्टीचा विद्वान् झाला, व जड सृष्टीच्या गूढ तत्त्वापासून मानसिक सृष्टीच्या अत्यंत गहन तत्त्वांपर्यंत खेळणाऱ्या कार्यकारणाचें व सामर्थ्याचें ज्याला आकलन झालें आहे त्याची धर्मविषयक व समाजाविषयक मतें विशिष्ट देशाचाराच्या किंवा रीतरिवाजांच्या पाशांत जखडून रहात नाहींत, हें सार्वत्रिक अनुभवावरून आतां पूर्णपणें सिद्ध झालें आहे. केरोपंतांच्या विचारांत, स्वभावांत, आणि वागणुकींत असें एक चमत्कारिक स्वरूप दृष्टीस पडे कीं त्यामुळें ते जुन्यांस व नव्यांस, लहानांस व थोरांस, श्रीमंतांस व गरीबांस, समाजधर्मानुयायांस व वैदिकधर्मानुयायांस एकसारखे प्रिय होत. त्यांचा पोषाख, त्यांचें राहणें, बोलणें, सारांश, त्यांचें हरएक करणें अगदीं साधेपणाचें असे. ज्यांच्या अंगीं खरी विद्वत्ता नाहीं किंवा मोठेपणा नाहीं त्यांना असें वाटत असतें कीं आपल्याहून खालच्या प्रतीच्या लोकांत आपण मिसळलों तर त्यांच्या संसर्गानें आपली योग्यता कमी होईल, व या भीतीनें ते त्यांच्यापासून नेहमीं दूर राहातात, व 'आपण मोठे आहों' असें आपण आपल्याशीं मानून आपलें समाधान करून घेत असतात! केरोपंतांचें वर्तन अगदीं निराळ्या तऱ्हेचें असें. आपलें जें ज्ञान आहे तें ज्ञानोदधींतील एका अंबुकणाइतकें सुद्धां नाहीं अशी त्यांची समजूत असल्यामुळें, साक्रेतिसाप्रमाणें त्यांच्या वृत्तींत पराकाष्ठेची लीनता असे. चार वर्षांच्या मुलापासून एम. ए. च्या विद्यार्थ्यांपर्यंत कोणीं कसलीही शंका काढली तरी ते तिचें समाधान करण्यास नेहमीं तत्पर असत. विद्यार्थ्यांस धमकावणी दाखवून अथवा अळंटळं करून वेळ मारून नेणें हें काम ज्ञानाची वृथा घमंडी बाळगणाऱ्या गांवठी पंतोजीबोवांचें व युनिव्हर्सिटीचा छाप मिळाल्याबरोबर पुस्तकास सोडाचिठी देऊन एस्पिट व सौंगट्या यांस उदार आश्रय देणाऱ्या ग्राजुएटांचें! केरोपंतांच्या शिकविण्यांत लटपट म्हणून कधीं असायाची नाहीं. अगोदर गणित किंवा पदार्थविज्ञान यांत अर्थशास्त्राप्रमाणें किंवा नीतिशास्त्राप्रमाणें कांकणभरसुद्धां लटपट खपण्याची सवड नसते. तशांत नानांसारखा अनुभविक, कुशाग्रबुद्धि, व बहुश्रुत शिक्षक भेटल्यावर शिकणारांच्या पोटांत गुदगुल्या होत यांत नवल नाहीं. सर्व विद्यार्थ्यांवर पोटच्या मुलाप्रमाणें त्यांची ममता असे, व ते वर्गांत बसले म्हणजे त्यांना आपण आपल्या मुलाबाळांत बसलों आहों असें वाटे. सत्य भाषण व सत्य आचरण हें त्यांना फार प्रिय असे. गरीबगुरिबांस मदत करण्याविषयीं त्यांना मागें सारणारा अलीकडील विद्वानांत तर आम्हांस कोणी दिसत नाहीं. अनाथ विद्यार्थी त्यांच्या घरून पराङ्मुख कधींच गेला नाहीं. क्षमा हा त्यांच्या अंगीं अलीकडील

मंडळींत सहसा न सांपडणारा गुण पूर्णपणें वास करीत होता. स्वार्थासाठीं लोकांपुढें तोंड वेंगाडण्याचा त्यांना मोठा तिरस्कार असे. कांहीं विशेष कारणांशिवाय त्यांच्या मनाची आनंदवृत्ति कधींही ढळत नसे. वाचकहो, या महात्म्याचें खरें स्वरूप शब्दांनीं व्यक्त करणें दुरापास्त आहे. नाना पेन्शन घेऊन कालेजांतून बाहेर पडले, त्या दिवशीं त्यांच्या पायांवर डोकीं ठेवून त्यांना कडकडून भेटतांना गहिंवर न सावरल्यामुळें ज्या आम्हांस विलक्षण रडूं कोसळलें, त्या आम्हांस व त्या दिवशीं कालेजांत येण्यास घर सोडल्यापासून रडूनरडून ज्यांचे डोळे सुजून गेले होते त्या नानांस गुरुशिष्यांमधील खऱ्या प्रेमाचा प्रत्यक्ष अनुभव झाला, व भाण्डारकर, आक्सनाम, चाटफील्ड, पील वगैरे प्रेक्षक प्रोफेसर मंडळींस त्यांचें स्पष्ट स्वरूप दिसून आलें.

असलें अद्वितीय मनुष्यरत्न गेल्या बुधवारीं पुण्यांतून नाहींसें झालें त्यामुळें सारें पुणें शोकानें हळहळलें यांत नवल तें कोणतें ? हें दुःखकारक वर्तमान जों जों अधिकाधिक पसरत जाईल तों तों महाराष्ट्र देशाच्या प्रत्येक भागांतून दुःखोद्गार बाहेर पडतील. पुण्याच्या लोकांनीं दुकानें बंद केलीं, शाळांना सुट्या दिल्या, न्यायाच्या कचेऱ्या बंद केल्या, व या अप्रतिम पुरुषाच्या सदा हंसतमुखाचें शेवटचें अवलोकन करण्यासाठीं नागरिकांचे थवेच्या थवे स्मशानापर्यंत गेले यांत आश्चर्य करण्यासारखें कांहीं झालें नाहीं. अध्ययन व अध्यापन हा ज्यांचा व्यासंग, परोपकार हा ज्यांचा व्यवसाय, व मानवजातीचें सुखवर्धन यांतच ज्यांचें समाधान व जीवितसाफल्य अशा थोर पुरुषांविषयीं लोकांना कृतज्ञता उत्पन्न होणें हें अगदीं साहजिक आहे. केरोपंतांसारखी कष्टरहित जीवितयात्रा फार थोड्यांना घडते. संतति, संपत्ति, सद्विद्या, सद्गुण व सत्कीर्ति यांच्या प्राप्तीपासून होणारें समाधान सतत उपभोगून शरीरधर्माप्रमाणें साठीच्या सुमारास शक्ति क्षीण होऊं लागल्याबरोबर देहावसान होऊन या कष्टमय जगांतून बाहेर पडणें थोड्यांच्याच कपाळीं असतें. नाना आणखी कांहीं दिवस जगते तर त्यांना शरीरयातना मात्र सोसाव्या लागत्या. कारण अलीकडे त्यांचीं सर्व बाह्येंद्रियें क्षीण होऊन गेलीं होतीं. डोळ्यानें दिसेनासें व कानानें ऐकवेनासें झालें होतें. दांत पडल्यास फार वर्षें झाल्यामुळें वर्णोच्चार स्पष्ट होत नसे, इतकेंच, नाहीं तर खाल्लेलें अन्नही नीट पचेनासें झाल्यामुळें फार त्रास होई. पायांस मोठमोठ्या भेगा पडल्या असल्यामुळें ते जमिनीवर टेंकण्याची मुष्कील पडे. अशा स्थितींत जगिंत रहाण्यापेक्षां मरणें हेंच बरें. ते गेले यांतच त्यांचें सोन्यापेक्षां पिवळें झालें. ते विचारी असल्यामुळें त्यांना मरणाची भीति बिलकुल

वाटत नसे. ते मरण्यास पूर्णपणें सिद्ध झाले असल्यामुळें मरतांना त्यांच्या अंतःकरणाची अणुमात्र देखील चलबिचल झाली नाहीं. ज्या जगांत अनेक वर्षें घालविलीं, व शेंकडों मायापाश जोडले, त्याचा शेवटचा निरोप घेतांना इतकी शांत व समाधानवृत्ति फार थोड्यांच्या ठायीं दिसण्यांत येते. नानांचें शरीर पंचत्वाप्रत पावल्यानें ते तर सुखीच झाले, पण त्यांच्या देहावसानाबरोबर आम्हां महाराष्ट्रीयांत जें चांगलें म्हणून आहे त्या सर्वांचा लोप झाला व पुण्याचें वैभव आणि महाराष्ट्र देशाचा अभिमान धुळीस मिळाला असें आम्हांस वाटतें. असो; परमेश्वरापाशीं आमची चेवढीच प्रार्थना आहे कीं केरोपंतांचें उदाहरण डोळ्यापुढें ठेवून त्यांच्याप्रमाणें वर्तन करणारे अनेक लोक या भरतभूमींत निपजोत; परोपकार, सद्गुण आणि विद्याव्यासंग यांत केरोपंतांसही मागें हटवून या महाराष्ट्रभूमीस जगांतील सुधारलेल्या इतर राष्ट्रांच्या बरोबरीस आणोत; आणि सत्कृत्यें करून मनुष्यजातीला सुखी करून ब्रह्मांडनिर्मात्री जी चिच्छक्ति ती संतुष्ट राखोत.

वर्ष ६, अंक ९.

आधीं कोण ? राजकीय कीं सामाजिक ?

गेल्या सोमवारीं मुंबई येथील 'स्टूडंट्स लिटररी ॲण्ड सायन्टिफिक सोसायटी' पुढें आनरेबल का. त्रिं. तेलंग यांनीं "राजकीय सुधारणा आधीं कीं सामाजिक सुधारणा आधीं ?" या विषयावर व्याख्यान दिलें. हा विषय आमच्या कानांत दुम दुमूं लागल्यास बरेच दिवस झाले. ज्या इंग्रज लोकांस आमची राजकीय धडपड रुचत नाहीं, त्यांचा आम्हांस नेहमीं उपदेश चाललेला असतो कीं, "आर्यलोकाग्रणींनो, राजकीय प्रकरणांत इतक्यांत तुम्ही पडूं नका, अगोदर आपली गृहस्थिति सुधारा, आमच्यापाशीं राजकीय हक्कांसाठीं मागणें घालण्यापूर्वी आपल्या बायकांस, आपल्या मुलींस, आपल्या बहिणींस गृहदास्यांतून सोडवा. ब्राह्मणक्षत्रियादि जातिभेद लयास न्या, स्त्रीशिक्षणाचा परिपाठ घाला, गतभर्तृकांच्या पुनर्विवाहास यथेच्छ संमति द्या, एकवीस बावीस वर्षेपर्यंत मुली अविवाहित ठेवून त्यांच्याकडून पितृगृहीं असतां विद्याभ्यास करवा, इ. इ. हें जोंपर्यंत तुमच्यानें झालें नाहीं तोंपर्यंत राजकीय स्वातंत्र्य भोगण्यास तुम्ही पात्र झालां असें होणार नाहीं. दाराच्या आंत तुम्हांला बादशाही अम्मल गाजवायला पाहिजे व दाराच्या बाहेर जिकडे तिकडे लोकसत्ता झळकली पाहिजे, ही असंभवनीय गोष्ट कधींही होणार नाहीं. तर तुमच्या हिंमतीचा ओघ प्रथम गृहसुधारणेकडे लागूं द्या. " क्षुद्रदृष्टि इंग्रजांनीं आम्हांस असा उपदेश करावा हें त्यांना योग्यच आहे. आम्हीं मात्र तो कितपत अनुसरावा हें विचारणीय आहे. मि. मलबारी यांनीं शिशुपरिणय व असंमतवैधव्य या दोन विषयांवर आपल्या टांकानें आणि ओठानें हुल्लड करून देण्यास आरंभ केल्यापासून या विषयाकडे बऱ्याच लोकांचें चित्त वेधलें आहे. वर दिलेला मायावी उपदेश आमचे नाना फडणीस सर आक्लंड कालव्हिन यांनीं मि. मलबारी यांच्या टिप्पणांस उत्तर देतांना केला. कालव्हिनसाहेब जाड बुडाचें ढेल पडल्यामुळें त्यांच्या लेखावर नेटिव प्रेसाकडून बरीच टीका झाली. पण या पंधरवड्यांत या वादानें पुनः उचल खाण्यास मि. वर्डसवर्थ यांनीं मि. मलबारीस धाडलेलें पत्र कारण झालें ! त्यांनीं त्या पत्रांत आम्हांस वरील प्रकारचा उपदेश करणाऱ्या इंग्रजांची खाशी खरड काढून टाकिली आहे, व विशेषतः पाद्री लोकांवर चांगलाच चाबूक ओढिला आहे ! त्यांच्या पत्रांतील मुख्य आशय असा आहे कीं, सामाजिक सुधारणेसाठीं अगदीं जीव सोडण्याची गरज नाहीं; राजकीय सुधारणा होत चालली म्हणजे तिच्या कधीं

बरोबर, कधीं किंचित् पाठीमागून, सामाजिक सुधारणा होत जाते. हाच सिद्धांत काशिनाथपंतांनीं आपल्या व्याख्यानांत विशेष खुलाशानें सिद्ध करून दाखविला आहे. काशिनाथपंतांची वाक्शैली, विचारसरणी, कोटिक्रम, वाचनव्याप्ति, व विनय– यांविषयीं येथें पुनरुक्ति केली पाहिजे असें नाहीं. त्यांच्या अंगचे हे गुण सर्वत्र प्रसिद्ध झाले आहेत. यांचें भाषण जिभेला जसें द्राक्ष तसें कानाला लागतें! तें ऐकतांना मंजुळ शब्द करीत वाहणाऱ्या स्वच्छ जलप्रवाहाची आठवण होते! त्यांच्या प्रतिपक्ष्यांनासुद्धां त्यांचें बोलणें लक्ष देऊन ऐकावेंसें वाटतें. सोमवारच्या व्याख्यानांत हे गुण विशेष प्रतिबिंबित झाले होते असें ज्यांनीं तें खुद्द ऐकिलें आहे त्यांचें मत आहे. हें समग्र व्याख्यान टाइम्सपत्रांत प्रसिद्ध झालें आहे. त्यानें त्यांतील अगदीं बारीक खिळ्यांचे तनि कालम भरून गेले आहेत. त्यांतील रस मराठी वाचकांस उतरून द्यावयाचा म्हटलें तर साऱ्याचें यथास्थित भाषांतर केलें पाहिजे. तें करीत बसलों तर दोन चार आठवडे दुसऱ्या मजकुरास निरोप द्यावा लागणार! बरें, इतकें करूनही त्यांच्या श्रोत्यांस जें समाधान व जो आनंद तें ऐकल्यापासून वाटला असेल त्याच्या निम्मा भाषांतर वाचण्यानें आमच्या वाचकांस होईल किंवा नाहीं याचा संशय आहे. शिवाय त्या व्याख्यानांत इंग्लंडच्या इतिहासांतील कित्येक महत्त्वाच्या गोष्टींचा व कार्यांचा जो उल्लेख केला आहे तो आमच्या इंग्रजी न जाणणाऱ्या वाचकांस सुबोध होण्याची पंचाईत आहे. सबब त्या व्याख्यानाचें नीरस तात्पर्य देण्याशिवाय दुसरा इलाज नाहीं. आज चेवढें करून पुढल्या खेपेस आम्हांस जें त्याच्या संबंधानें म्हणावयाचें आहे तें म्हणूं. मि. तेलंग म्हणालेः—

ज्यांची गृहस्थिति सुधारली नाहीं त्यांची राजकीय स्थिति सुधारायाची नाहीं असें ज्यांचें म्हणणें आहे त्यांचा असा भाव आहे काय कीं अमुक प्रकारची देशांतील लोकांची गृहस्थिति असली म्हणजे अमुक प्रकारची संतोष मानण्यासारखी राजकीय सुधारणा व्हावयाचीच नाहीं, किंवा अमुक प्रकारच्या गृहस्थितींत लोकांचें पाऊल राजकीय कामांत पुढें पडायाचेंच नाहीं. असा जर त्यांचा भाव असेल तर तो मोठ्या चुकीचा आहे, कारण एक तर गृहसुधारणा आणि राजकीय सुधारणा यांचें फारकत कोठें होतें हें दाखविणें अत्यंत दुरापास्त आहे. कोंब्याच्या जाळ्याप्रमाणें यांच्या पदरांची एकांत एक इतकी गुंतागुंत होऊन गेलेली आहे कीं दिसण्यांत जरी ते दोन प्रकारचे धागे दिसतात तरी उलगडायालाच बसलें तर त्यांच्यांतील भेद दाखविण्याची मुष्कील पडेल. लोकशिक्षण, समुद्रपर्यटण, शिशुपरिणय

यांपैकीं कोणत्याही विषयाला शुद्ध सामाजिक किंवा शुद्ध राजकीय म्हणतां येणार नाहीं. तथापि वादासाठीं सामाजिक आणि राजकीय हा समंजस भेद आहे असें मानिलें तरी तेवढ्यानें सामाजिक अथवा गृहसंबंधीं सुधारणा झाल्याखेरीज राजकीय सुधारणा व्हायाची नाहीं, व ती करण्याचा प्रयत्न करूं नये असें कशावरून सिद्ध होतें ? बरें, हाही सिद्धांत खरा आहे असें घेऊन चाललें तरी हिंदु लोकांचीं कुटुंबें गुलामवाडे आहेत असें सिद्ध करण्यास काय आधार आहे ? जुलूम करणारे जाणूनबुजून जुलूम करीत असले, व ज्यांच्यावर तो होत असेल त्यांना तो आपणावर होत आहे असें वाटत असलें, तर एकाला जुलमी व दुसऱ्याला गुलाम अशा संज्ञा देणें न्याय्य आहे. पण आमच्या घरीं अगदीं उलट स्थिति आहे. साहेब लोक ज्यांना गुलाम म्हणतात त्या स्वामिनी आहेत व ज्यांना ते स्वामी म्हणतात ते त्यांचे बंदे गुलाम आहेत ! बायकांच्या पायांत आम्हीं बिडी घातली आहे असें नाहीं, तर त्या आम्हांस सव्वा मणाच्या जड बिडीसारख्या होऊन गेल्यामुळें आमचे पाय हालेनातसे झाले आहेत. अथवा आम्ही बायकांचे किंवा बायका आमच्या गुलाम हाच वाद बरोबर नाहीं. आम्ही–आमच्या बायका–आमच्या बहिणी–मुली–मुलें–आम्ही सारे केस पिकलेल्या अनादिसिद्ध पुराण लोकरूढिरूप जगदंबेचे अतिलीन गुलाम आहों ! तिचें उग्र स्वरूप डोळे उघडून न्याहाळण्याचें धैर्य आम्हांस होत नाहीं ! ही महिषासुरमथनी भारलेल्या जंतूंप्रमाणें आम्हांस वागवीत आहे व आम्ही वागत आहों ! तेव्हां आम्ही आपल्या बायकांस गुलामांप्रमाणें वागवितों, हा साहेब लोकांकडून आम्हांवर होत असलेला आरोप माझ्या मतें अगदीं निराधार आहे ! आतां दुसरा प्रश्न असा आहे कीं, अमुक प्रकारची गृहस्थिति असली तरच अमुक प्रकारची राजकीय स्थिति प्राप्त होईल, नाहींतर व्हावयाची नाहीं–हें जें कित्येकांचें म्हणणें आहे तें इतिहासावरून सिद्ध होत नाहीं. शिवाजीनें मराठ्यांच्या राज्याची स्थापना केली; पेशव्यांनीं गंगेंत व सिंधूंत दक्षणी तट्टें नाहवून अटकेस भगवा झेंडा फडकविला, तो काय हायस्कुलांत जाऊन चवथी इयत्ता शिकणाऱ्या मुलींच्या जीवावर ? शिवाजी, महादजी शिंदा, थोरला बाजीराव–हे काय पंचविसावे वर्षी लग्न केलेल्या मुलींच्या पोटीं झाले होते ? त्यावेळेस शूद्रब्राह्मणांचीं तोंडें काय एके ठिकाणीं होत ? का त्यावेळेस सती हा शब्द कोणाला ऐकूनसुद्धां ठाऊक नव्हता ? कांहीं नाहीं. आतांपेक्षां त्या वेळची गृहस्थिति विशेष चांगली होती असें मानण्यास कांहीं आधार नाहीं. शिवाजीच्या पूर्वीचा काळ घेतला तरी

तेंच दिसून येईल. सातव्या शतकांतील हर्षवर्धन आणि पुलकेशी राजांच्या कारकीर्दीविषयीं जी माहिती उपलब्ध आहे तीवरून त्यावेळेस ह्या देशाची राजकीय स्थिति जरी समाधान मानण्यासारखी होती तरी त्यावेळच्या लोकांची गृहस्थिति आतांपेक्षां विशेष बरी होती, असें मानण्यास कांहीं आधार नाहीं. आतां कोणी असें म्हणतील कीं हें हिंदुस्थानचें उदाहरण कांहीं कामाचें नाहीं. येथला खरा इतिहास सांपडण्याचें साधन नाहीं; सबब ज्या देशाचा खरा इतिहास उपलब्ध आहे त्याचें उदाहरण घेतलें पाहिजे. कबूल आहे. अशा प्रकारचा इतिहास इंग्लंडच्या इतिहासाहून दुसरा कोणता आहे ? पण त्या इतिहासावरून मुद्दां देशांतील लोकांची अमुक प्रकारची गृहस्थिति असेल तरच अमुक प्रकारची राजकीय स्थिति असूं शकते, हें जें कित्येकांचें म्हणणें आहे तें सिद्ध होत नाहीं. सतराव्या शतकांत राजकीय संबंधानें इंग्लिश लोकांचें पाऊल पुष्कळच पुढें पडलें. ट्यूडर घराण्यांतील राजेराण्यांचा जारी अंमल संपल्यावरोबर हक्क मागण्याची जी टाकी लोकांनीं एकदां हातीं धरली ती शंभर वर्षेपर्यंत खालीं ठेविली नाहीं. राजांचें वर्चस्व कमी करून लोकांचे हक्क निश्चित करण्यासाठीं एका राजाला कंठस्नान घालावें लागलें, व एकाला पदच्युत करून त्याच्या जागीं परदेशचा इसम आणून बसवावा लागला ! राजकीयसंबंधानें इंग्लिश लोकांनीं सतराव्या शतकांत इतका झपाटा मारिला तरी त्याला साजणारी त्यावेळेस किंवा आतां त्यांची गृहस्थिति नाहीं हें ज्यांनीं मेकाले, मिल्ल वगैरेंचे ग्रंथ पाहिले आहेत, इंग्लंडची सफर केली आहे, किंवा दुसऱ्या कोणत्याही रीतीनें इंग्लिश समाजाचें ज्ञान करून घेतलें आहे त्यांना दिसून येईल. आतां आमच्या बायका जशा अक्षरशत्रु आहेत तशा इंग्लंडच्या १७ व्या शतकांत होत्या. आतां आम्हांत जशीं कांहीं सामाजिक लफडीं आहेत, तशीं इंग्लंडांतही आहेत. इंग्लंडची गृहस्थिति आमच्याहून फार चांगली आहे हें अगदीं मान्य आहे, पण ती असावी तशी नाहीं हें निर्विवाद आहे. सारांश, काय कीं गृहस्थितीचा राजकीय स्थितीशीं सार्वत्रिक व सर्वकालिक समवाय संबंध लावणें नीट नाहीं.—येथें व्याख्यानाचा पूर्वार्ध झाला.

उत्तरार्ध

मागल्या निबंधांत शिरोलेखांत नमूद केलेल्या विषयाच्या संबंधानें आ. काशिनाथपंत तेलंग यांच्या व्याख्यानाच्या पूर्वार्धाचा सारांश दिला. यांत उत्तरार्धाचा देऊन अवकाश राहिल्यास विषयासंबंधानें आमचा अभिप्राय द्यावयाचा.

अमुक देशांत अमुक प्रकारची सामाजिक स्थिति असली म्हणजे त्या देशांत अमुक प्रकारची राजकीय स्थिति असलीच पाहिजे असें जें कित्येकांचें म्हणणें आहे तें चुकीचें आहे हें दाखविण्यासाठीं आतांपर्यंत कांहीं ठळक ठळक अशीं सम प्रमाणें दाखविलीं. आतां वरील माझें मत व्यस्त प्रमाणांनीं सिद्ध करून दाखवितों. तारतम्यदृष्टीनें पाहिलें असतां ज्या मार्गानें कार्यशकटाच्या चक्रांस कमींत कमी घर्षण होईल अशानें तो नेण्यांत मनुष्याचा फायदा आहे, हें कोणीही कबूल करील. ज्या रस्त्यावर खाचखळगे नाहींत, ज्यावरील मुरूम दाबून बसविलेला आहे, ज्यानें प्रवास केला असतां भामट्यांची भीति नाहीं, व जो नेहमींच्या रहदारीचा आहे, अशानें जाणें अत्यंत श्रेयस्कर आहे. हिंदुस्थानासारख्या महाद्वीपतुल्य देशांत सामाजिक सुधारणा लवकर घडून आणणें अत्यंत दुरापास्त आहे; व पूर्वीची स्थिति आज असती तर राजकीय सुधारणाही सामाजिक सुधारणेपेक्षां अधिक सुलभ झाली नसती. देशाच्या निरनिराळ्या भागांवर जर स्वतंत्र राजे राज्य करीत असते तर सर्वांचे राजकीय विचार एकसारखे होऊन सर्वांनीं एकमेकांशीं सलोख्यानें वागण्यास आरंभ होऊं लागण्यापूर्वी पुष्कळ वर्षे लोटलीं असतीं. परंतु ईश्वरेच्छेनें या विस्तीर्ण भरतभूमीवर इंग्रजांसारख्या अत्यंत सुधारलेल्या व उद्योगी लोकांचें दृढ साम्राज्य झालें असल्यामुळें, राष्ट्राराष्ट्रांतील चुरस नाहींसा झाल्यासारखा होऊन सगळे प्रांत एका दावणींत गोंवले गेले आहेत, यामुळें राजकीय प्रकरणांत तरी त्यांचा एकमेकांशीं फारसा बेबनाव होण्याचा संभव राहिला नाहीं. राजकीय दृष्ट्या सर्वांच्या कपाळीं सारखें दास्य आलें आहे, व त्यांतून पार पडण्याची सगळ्यांची सारखी इच्छा आहे. यासंबंधानें फारसा मतभेद नाहीं. यासंबंधानें एकी होण्याचा बराच संभव आहे, हें थोड्या दिवसांपूर्वी येथें भरलेल्या राष्ट्रीय सभेवरून स्पष्ट दिसून आलें. राजकीय विषयांच्या संबंधानें आमचा एकोपा होऊन आमचें पाऊल लवकर पुढें पडेल असें मानण्यास जीं अनेक कारणें आहेत त्यांपैकीं मुख्य कारण असें आहे कीं या कामीं आम्हांस जिंकणाऱ्या आमच्या राज्यकर्त्यांकडूनच

पुष्कळ साहाय्य होण्याची आशा आहे. इंग्लंडदेश स्वातंत्र्याचें माहेरघर होऊन बसलें असल्यामुळें इंग्लिश लोकांना आपल्या प्रजेस स्वातंत्र्यदानाची जशी इच्छा आहे तशी युरोपांतील दुसऱ्या कोणत्याही राष्ट्रास नाहीं, हें निर्विवाद आहे! आमच्या देशांतील सुधारकांस दोन अवघड किल्ले सर करावयाचे आहेत; एक राजकीय स्वातंत्र्याचा व दुसरा सामाजिक स्वातंत्र्याचा. दिसण्यांत सध्यां दोनही अभेद्य दिसत आहेत. पण सुधारकचमूच्या कुशल अग्रणींनीं सूक्ष्म विचाराच्या दूरदर्शक यंत्रानें जी टेहळणी केली आहे, तीवरून त्यांना असें दिसून आलें आहे कीं पहिला हल्ला राजकीय स्वातंत्र्यगडावर केला असतां तो विशेष फायदेशीर होणार आहे. कारण या दुर्गाच्या तटावर रक्षणासाठीं ठेवलेल्या शिपायांत सुधारकांना अनुकूल अशी कांहीं मित्रमंडळी आहे. या घरभेद्या मंडळींच्या साहाय्यानें आमचें थोडक्या वर्षांत बरेंच हित होण्याची आशा आहे! आम्हीं निकराची चाल केली असतां त्यांच्याकडून योग्य प्रसंगीं तटाचे दरवाजे उघडले जाऊन ते आम्हांस आंत घेतील असें मानण्यास बराच आधार आहे. या राजकीय दुर्गाच्या उलट असलेल्या दुर्गाच्या संबंधानें अशा प्रकारची आंतून मदत होण्याची मुळींच आशा नाहीं. या दुर्गाच्या कोटांत आम्हांस अनुकूल असा एकही इसम नाहीं, त्यामुळें तो सर करण्यास आम्हांस बरींच वर्षें खटपट केली पाहिजे. पांचपन्नास वर्षें त्याला वेढा घालून जेव्हां बसावें, व आंत अन्नपाणी जाण्याच्या साऱ्या वाटा मजबूद रीतीनें अडवाव्या, व आंतील बिरांस भुकेनें व तान्हेनें जेरीस आणावें, तेव्हां कोठें त्यांच्याकडून तहाचें निशाण लागलें तर लागेल. तसें होईपर्यंत आमची सर्व धामधूम फुकट जाणार आहे. पहिला किल्ला घेणें सुसाध्य आहे; दुसरा घेणें असाध्य तर नाहींच पण कष्टसाध्य किंवा दुःसाध्य आहे. पहिला सर करण्यांत केलेले श्रम फारसे व्यर्थ जाण्याचा संभव नाहीं; दुसरा घेण्यासाठीं केलेल्या श्रमांचें फळ लवकर येण्याची आशा नाहीं. पहिल्यावर स्वारी करण्याविषयीं साऱ्यांना सारखी उत्सुकता आहे; दुसऱ्याच्या तटावर गोळ्या सोडण्यास साऱ्यांचा हात सारखा वहात नाहीं. शिवाय, जर सुदैवानें सुधारक सेनेस पहिला घेतां आला तर त्याच्या उंच तटावर उभें राहून दुसरा सर करण्यास तिला बिलकूल श्रम पडणार नाहींत. कारण कोणत्याही कारणांसाठीं मनुष्यांना एकदां, एकदिलानें वागण्याची, श्रम सोसण्याची, दुसऱ्यासाठीं स्वहिताचा त्याग करण्याची व स्वातंत्र्य आणि मोठेपण संपादण्याची चटक लागली, म्हणजे ती चटक त्यांना प्रथम जीं कामें अशक्यशीं वाटलेलीं असतात तींसुद्धां सहज करून टाकण्यास समर्थ

करते. थोरला बाजीराव व थोरला माधवराव यांच्या कारकीर्दीत मराठ्यांच्या तरवारीचा पराक्रम बराच दूरपर्यंत जाऊन थडकल्यावर गृहस्थिति सुधारण्याकडे त्यांचें लक्ष सहजपणें लागलें, व ती होण्यास आरंभही झाला होता. प्रसिद्ध ब्राह्मणवीर परशुरामभाऊ पटवर्धन यांची कन्या तरुणपणीं गतभर्तृका झाली होती. तिचा पुनर्विवाह करून तिला पुनः सनाथ करावें असा त्यांचा बेत होता, व त्या कामास अनुकूल अशीं त्यांनीं बऱ्याच शास्त्री लोकांचीं मतें गोळा केलीं होतीं हें सर्वांस ऐकून तरी ठाऊक असेलच. परशुरामभाऊंच्या विचारास जे प्रतिकूल होते त्यांनीं मोठ्या नम्रतेनें त्यांचें मन वळवून त्यांच्याकडून तो विवाह होऊं दिला नाहीं ही गोष्ट निराळी. पण भाऊंच्या मनांत तो करण्याचा एकदां संकल्प झाला, व त्यांच्या म्हणण्यास पुष्कळ शास्त्र्यांचा रुकारही पडला. यावरून राजकीय स्थिति सुधारली असतां गृहस्थितिही सुधारण्यास कसा आरंभ होतो, हें सर्वांच्या लक्षांत येणार आहे. तसेंच, जिवबादादाशीं पेशवे ज्या रीतीनें वर्तन करीत ती रीत, सवाई माधवरावांचा विवाह झाला तेव्हां मराठ्यांना आणि मुसलमानांना एके ठिकाणीं झालेली मेजवानी, बाळाजी बाजीरावानें देशस्थ कन्येशीं केलेला विवाह, या व असल्या दुसऱ्या अनेक गोष्टींवरून माझा फार दिवसांपूर्वी झालेला जो समज–कीं पेशव्यांचें राज्य आणखी कांहीं वर्षें चालतें तर ज्या सामाजिक सुधारणांसाठीं प्रस्तुत आम्हांस व आमच्या राज्यकर्त्यांस इतका त्रास पडत आहे त्या त्या राज्यांत तेव्हांच घडून येत्या–तो अलीकडे दृढ झाला आहे. दुसरी आणखी एक लक्षांत ठेवण्याजोगी गोष्ट अशी आहे कीं राजकीय प्रकरणीं वादांत तर्काचें बरेंच प्राबल्य चालतें, सामाजिक किंवा धार्मिक वादांत तो अगदीं कुंठित होतो. पहिल्या वादांत बुद्धीवर प्रहार होत असतात; दुसऱ्या वादांत मनोविकार दुखविले जातात. बुद्धि अथवा विचारशक्ति मनोविकारांहून अधिक शांत व कमी दुराग्रही असल्यामुळें तिला तत्त्वाचा बोध लवकर होतो व तो एकदां झाला म्हणजे तदनुसार वर्तन करण्यास मनुष्यमात्र फारसा कचरत नाहीं. मनोविकारांची तशी गोष्ट नाहीं. वादानें ते अधिकच चेकळतात, व अगदीं अंध होऊन जातात. यासाठीं होतां होईल तों त्यांना कोणीही डिवचूं नये. त्यांना जागच्याजागीं थंडे होऊं द्यावे. त्यांच्यांतली गर्मी नाहींशी झाली कीं, ते निःशक्त होऊन अखेरीस कापराप्रमाणें उडून जातात. त्यांचा नाश लवकर करावयाचा असेल तर त्यांना सुशिक्षणाचा किडा लावावा; म्हणजे थोड्या वर्षांत त्यांचें पीठ होऊन त्यांचा इमला ढांसळतो. वर्तमानपत्रें लोकशिक्षणाचीं बलवत्तर

साधनें आहेत हें मी प्रांजलपणें कबूल करतों. राजकीय वादास त्यांच्याप्रमाणें दुसऱ्या कोणाकडूनही साहाय्य होत नाहीं. तथापि त्यांनीं होतां होईल तों सामाजिक विषयांच्या वाटाघाटींत किंवा धर्मवादांत पडूं नये, असें माझें मत आहे. वर्तमानपत्रांत असल्या विषयांची चर्चा होऊं लागल्यानें लोकांचे दुराग्रह अधिकाधिक बळकट होत जातात व त्या मानानें सामाजिक सुधारणेचें काम दुष्कर होत जातें. राजकीय विषयांची तशी गोष्ट नाहीं. त्यांत फारसा मतभेद असत नाहीं; निदान इंग्रजांच्या अमलाखालीं सर्वांस एकच स्थिति प्राप्त झालेल्या आम्हां हिंदुस्थानांतील लोकांत तो होण्याचा संभव नसल्यामुळें पारशी, मुसलमान, मराठे, गुजराथी, शिंदी, बंगाली, मद्राशी वगैरेंचीं राजकीय मतें सारखीं पडतात. कित्येकदां अशा संबंधानें आम्हांत जें मतसाम्य दिसतें त्याविषयीं आमच्या राज्यकर्त्यांस मोठा आचंबा वाटून ते त्याबद्दल नानातऱ्हेचे कुतर्क करतात. पण ते त्याविषयीं नीट विचार करतील तर तसें साम्य दिसणें हेंच स्वाभाविक आहे, असें त्यांच्यापैकीं जे विचारी असतील अशांच्या तरी लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. सामाजिक सुधारणेकडे मुळींच लक्ष देऊं नये असें माझें म्हणणें नाहीं. कांहींनीं तिकडेही लक्ष दिलें पाहिजे, व तें त्यांच्याकडून दिलें जात आहे, हें स्त्रीशिक्षणास, पुनर्विवाहास, बालविवाहनिषेधास, जातिभेदाभेदास, व यासारख्या इतर गोष्टींस उत्तेजन येण्यासाठीं जे प्रयत्न चालले आहेत, व त्यांना जें थोडेंथोडें फळ येऊं लागलें आहे, त्यावरून दिसून येईल. तथापि सर्वांनींच या मार्गाकडे वळण्याची गरज नाहीं. आ. रा. ब. म. गो. रानडे यांच्यासारखी बुद्धिमत्ता फारच थोड्यांच्या अंगीं असते. यामुळें सर्व कामें सारख्या रीतीनें उठवणारा त्यांच्यासारखा पुरुष फारच विरळा असतो. बहुतेक लोकांचें बुद्धिसामर्थ्य फार माफक असतें, यामुळें त्याचा व्यय फार जपून केला पाहिजे. सध्यांच्या आमच्या देशस्थितींत विद्वान् लोकांच्या बुद्धिसामर्थ्याचा बराच भाग राजकीय सुधारणेकडे व कांहीं मात्र सामाजिक सुधारणेकडे लागला पाहिजे, असा माझा एकंदरींत ग्रह झाला आहे.

[वर्ष ६, अंक ९।१० .]

ज्याचा त्याचा ब्राह्मणांवर कटाक्ष !

अलीकडे असें झालें आहे कीं, ज्यानें उठावें त्यानें ब्राह्मणांवर हत्यार धरावें. विश्वासघातकी, राजद्रोही, आपमतलबी, कपटी, कारस्थानी, अट्टलचोर म्हणजे ब्राह्मण ! ! ठीकच आहे; "पिंजऱ्यामध्यें व्याघ्र सांपडे, बायकामुलें मारिती खडे". त्यांचें राज्य नष्ट होऊन ते धुळीस मिळाले आहेत, तेव्हां आतां त्यांना कोणी कांहीं म्हटलें तरी चालण्याजोगें आहे. ते राज्यसुखाचा अनुभव घेत असतां, व सर्व जातींवर त्यांचा पगडा चालू असतां अशीं दूषणें त्यांस कोणाच्यानें देववलीं असतीं काय ! अधिकाराचा महिमा मोठा विलक्षण आहे. अधिकारारूढ भेकड, नीच, दुष्ट आणि लोभी मनुष्यास देखील शूर, कुलीन, दयाळू आणि उदार अशीं विशेषणें प्राप्त होतात; आणि अधिकारभ्रष्ट कितीही मोठा असला तरी तो यःकश्चित् वाटूं लागतो. ही जनरूढि जो नेहमीं मनांत बाळगील, त्याला ब्राह्मणांवर येणारीं दूषणें पाहून आचंबा वाटणार नाहीं. हें सर्व जरी स्वाभाविक आहे तरी स्वभावाला कांहीं औषध नाहीं असें म्हणून स्वस्थ बसतां कामा नये. आजपर्यंत हीं दूषणें बिनबोलतां ऐकून घेतल्यानें आमचा आमच्यावरच वाईट परिणाम होऊं लागला आहे. अन्य हिंदु जाती किंवा अन्यद्वीपस्थ लोकांनीं ब्राह्मणांचा हेवा करावा ही गोष्ट संभवनीय आहे; पण ब्राह्मणाब्राह्मणांनींच एकमेकांचीं उणीं बाहेर काढण्यास प्रवृत्त व्हावें हें किती विलक्षण ! ! इतकेंच नाहीं, अलीकडे ज्याचा त्यालाच वीट येऊं लागला आहे. ज्याप्रमाणें एखाद्या शहाण्या मनुष्याला चारचौघां चटोर थट्टेखोरांनीं वेडा वेडा म्हणून चोहोंकडून वेढून टाकिलें असतां त्या बिचाऱ्याची भ्रांति नष्ट होऊन तो आपणास वेडा समजूं लागतो, व खरोखरींच वेडावून जातो, त्याप्रमाणेंच पाजी म्हणून घेतां घेतां ब्राह्मणांला ब्राह्मण पाजी वाटूं लागले इतकेंच नाहीं, तर कित्येकांना आपल्या ब्राह्मण जन्माचाच धिःकार वाटूं लागून, आपण शार्मण्य किंवा आंग्लभौम मातापितरांच्या उदरीं आलों असतों तर मोठी बहार झाली असती, अशी निंद्य व असंभवनीय कल्पना कित्येकांच्या शुष्क अंतःकरणांत वास करूं लागली आहे ! ही मुळासुद्धां आतांच उपटून टाकण्याचा प्रयत्न केला नाहीं, तर हिचा लवकरच मोठा वृक्ष बनून जाऊन त्याच्या विषतुल्य कटु फलांचा उपभोग पुढल्या पिढ्यांना घ्यावा लागेल ! ब्राह्मणांमध्यें इतर जातींपेक्षां किंवा इतर लोकांपेक्षां एखादा वाईट गुण अधिक असेल, पण यामुळें ते अशा सार्वजनिक निंदेस

आणि तिरस्कारास पात्र झाले आहेत असें आम्हांस बिलकूल वाटत नाहीं. सर्व जातीप्रमाणें व सर्व लोकांप्रमाणेंच ब्राह्मण लोक होत. त्यांना जें वर्चस्व प्राप्त झालें तें त्यांच्या करामतीमुळें. आपल्यासभोंवतीं धर्मसंबंधीं आणि व्यवहारसंबंधीं ज्या शेंकडों उलथापालथी नित्य घडून येत आहेत, व विचार न करणाऱ्यांस आकस्मिक आणि निष्कारण वाटतात, त्यांचेंच आपण चांगल्या रीतीनें पर्यालोचन केलें तर आपणांस असें दिसून येईल कीं, आरंभापासून आजतारखेपर्यंत सृष्टींत घडून आलेल्या गोष्टी परस्परांशीं कार्यकारणसंबंधानें गच्च खिळून गेल्या आहेत. ब्राह्मणांना आजपर्यंत जें वर्चस्व मिळालें तें दोन प्रकारचें; पहिलें धर्मसंबंधीं, दुसरें राज्यसंबंधीं. प्रथम, धर्मसंबंधानें त्यांनीं आपला जो अम्मल चालविला त्याबद्दल ते दोषास पात्र आहेत कीं काय हें पाहूं. मागचा पुढचा विचार न करितां सरुद्धर्शनीं आपल्या धर्मामुळेंच आपणांस ह्वेंतसें वागतां येत नाहीं, यामुळें संतापून जाऊन हिंदुधर्माची सर्वथैव विटंबना करण्यास निघालेले जाडे विद्वान् दुर्दैवानें आजकाल या देशांत कित्येक सोमवत्या घालण्यापुरते सांपडतील!! या तापट व दांडग्या बाट्यांच्या विचाराचें आणि सूक्ष्म व शांत ऐतिहासिक दृष्टीनें वस्तूंचें पर्यवलोकन करून निर्माण झालेल्या विवेकांचें सापामुंगसाच्या वांकड्याप्रमाणें हाडवैर आहे. अमुकएक वेळीं अमुकएक वर्णाचें वर्चस्व कां झालें, तें पुष्कळ वर्षें कां चाललें, त्याचा ऱ्हास होण्यास काय कारणें झालीं, त्या ऱ्हासाचा इतर वस्तूंवर काय परिणाम झाला, वगैरे गोष्टींची चर्चा विचारानें करून त्यांतील कार्यकारणाचे दावें शोधून काढणें हा एक प्रकार; व आपणांस मनमानेल त्याप्रमाणें वागण्यास सांपडत नाहीं, यासाठीं वस्तुस्थितीवर गागणें हा दुसरा गांवढळ प्रकार. इतर जातींवर असलेल्या ब्राह्मणांच्या वर्चस्वाची तर काय कथा! ज्यांना युरोपखंडाचा इतिहास यत्किंचित् माहीत असेल, त्यांना इतालीच्या पोपांनी सर्व युरोपखंड एका करांगुलीवर कसें धरिलें होतें हें माहीत असेल. युरोपांत ख्रिस्ती धर्माचा प्रसार करणाऱ्यांस रोमन लोकांपासून व रोमन लोकांचा ऱ्हास होण्यास कारणभूत जे उत्तरयुरोपांतील मूळचे जर्मनी शाखेचे व्हान्डाल, गाथ्स, व्हिसीगाथ्स वगैरे रानटी लोक त्यांपासून किती त्रास व पीडा सोसावी लागली, व ती सगळी त्यांनीं न जुमानतां आपल्या इष्ट रुत्यावर नजर देऊन व अनेक हाल सोसून बेताबेतानें आपला छाप कसा बसविला, हें फार फार ध्यानांत ठेवण्याजोगें आहे. ज्यांस शहाणपण व सामर्थ्य आहे, त्यांना दुसऱ्यावर आपलें वर्चस्व बसवावेंसें वाटतें, व त्यांस तें बसविताहीं येतें. असें होतें म्हणून ज्यांस दुस-

ऱ्याच्या वर्चस्वापासून भोगावें लागतें त्यांनीं त्यांवर विनाकारण शिव्या हस्डण्यांत कांहीं हंशील नाहीं, किंवा पोकळ संतापून जाण्यांत कांहीं फायदा नाहीं. अशानें वर्चस्वाचा पेंच सुटतो असें नाहीं; पेंच सुटण्यास योग्य उपाय म्हटला म्हणजे ज्यांना त्या पेंचानें रग लागली असेल त्यांनीं शहाणपण शिकावें आणि सामर्थ्य संपादावें, व दिवसाउजेडीं त्यांच्याशीं दोन हात मारून व त्यांच्यावर चढ करून त्यांच्या हातून निसटून जावें ! हा कोणाच्याही जुलमांतून सुटून जाण्याचा राजमार्ग. बायकांप्रमाणें टिपें गाळणें, किंवा मूर्खाप्रमाणें शिव्या देणें, याच्या योगानें काडीची देखील निष्पत्ति होत नाहीं. ज्यांस ब्राह्मणांचें धर्मवर्चस्व रुचत नसेल, ज्यांना ब्राह्मणधर्म संमत नसेल, त्यांनीं खुशालपणें नवे धर्म स्थापावेत, व त्यांचें अनुकरण करावें; ब्राह्मणधर्माला शिव्या दिल्यानें तो ज्यांना आवडत आहे ते तो सोडतील असा अर्थ नाहीं, मात्र पोकळ तोंडाच्या वटवटीचा परिणाम इतकाच व्हावयाचा कीं, दोघेही बळकट वर्दळीला येऊन उभयतांत रणें पडावयाचीं, दोघांच्याही संसारसुखाची होळी व्हावयाची ! ! युरोपखंडांत रोमिश पोपांचें बंड फार माजून जाऊन क्याथोलिक धर्मांत ज्या वेळेस पराकाष्ठेची बजबजपुरी होऊन गेली त्यावेळेस ल्युथरप्रभृति नवीन पंथांच्या मंडळीनें जुन्या धर्माच्या नांवानें व्यर्थ खडे फोडण्याचा क्रम न चालवितां, त्यांस योग्य वाटणाऱ्या मतांप्रमाणें नवीन धर्माची संस्थापना करण्याचा निश्चय करून तसा घाट घडवून आणण्यासाठीं जीव देण्यास देखील तयार होऊन इष्ट हेतु तडीस नेण्यास आपली कंबर बांधली, व दुसऱ्याची मनवळणी केली.

मागल्या अंकांत ब्राह्मणांच्या धर्मसंबंधीं वर्चस्वाविषयीं बहुतेक लिहिण्यांत आलें. तथापि त्या बाबतीचा विचार करीत असतां एक गोष्ट सांगावयाची राहिली ती अशी कीं, ब्राह्मणधर्माचा सार्वजनिक प्रसार करण्यासाठीं ब्राह्मण लोकांनीं जे उपाय योजिले ते इतर धर्मप्रसारकांच्या उपायांप्रमाणें राक्षसी नव्हते. ख्रिस्तभक्तांनीं लिहिलेलें कोणतेंही धर्मपुस्तक घ्या; त्यांत महंमदी धर्माला दहापांच ठिकाणीं दोष दिला नाहीं असें व्हावयाचेंच नाहीं. एका हातांत कुराण आणि एका हातांत तलवार धरून मुसलमानांनीं इस्लामाचा झेंडा जिकडे तिकडे लाविला ही गोष्ट जगत्प्रसिद्ध आहे, व कोणीही सत्याभिमानी तिच्यावर पांघरूण घालणार नाहीं. परंतु पृथ्वीवरील सर्व मनुष्यें आकाशांतील बापाचीं लेंकरें, असें पढविणाऱ्या ख्रिस्ती धर्मांत जेव्हां दुफळी झाली, तेव्हां क्याथोलिक बाळांनीं प्रॉटेस्टंट बाळांची जी कत्तल उडविली, तिचा इतिहास वाचून

ख्रिस्ती धर्माविषयींच अश्रद्धा आणि निरस्कार उत्पन्न होतात इतकेंच नाहीं, तर धर्मत्व मनुष्याच्या अकलेच्या बाहेर आहे, व तें आपणांस गवसलें असें म्हणणारे सर्वच महामूर्ख, असा बुद्धीचा घट निग्रह होतो. हें एक असूं द्या; ख्रिस्ती लोकांनीं यहुदी लोकांचा तरी किती छळ केला? राजानिष्ठा प्रदर्शित करण्यासाठीं आलेल्या यहुदी लोकांच्या माना कापून त्यांच्या रक्ताचे टिळे कित्येक इंग्रजी राजांनीं आपल्या राज्याभिषेकाच्या दिवशीं आपल्या कपाळास लाविले, या गोष्टी इतिहासांत प्रसिद्ध आहेत. अजून तरी रोमन क्याथोलिक आणि प्रॉटेस्टंट ग्रंथांत केवढा वाद सुरू आहे? परवां परवांपर्यंत क्याथोलिक लोकांना इंग्रजी पार्लमेंट सभेंत बसण्याची परवानगी नव्हती. राज्यांतील मोठमोठ्या हुद्यांच्या जागा क्याथोलिक लोकांस न मिळण्याबद्दल केलेल्या कायद्यांचीं जुनीं भेंडुळें इंग्रजी दप्तरांत अजून सांपडतील. पण हें सिद्ध करण्यास फार दूर जाण्यास नलगे. आपले सध्यांचे गव्हर्नर जनरल लार्ड रिपनसाहेब क्याथोलिक शाखेचे आहेत. इंग्रजी कायद्याप्रमाणें इंग्लंडचा राजा अथवा राणी प्रॉटेस्टंट धर्मानुयायी पाहिजे. या नियमाला अनुसरून इंग्लंडच्या राजाचें प्रतिनिधित्व ज्याच्याकडे येईल तोही प्रॉटेस्टंट धर्माचा पाहिजे असा सहज प्रश्न लार्ड रिपन यांस हिंदुस्थानचें प्रतिनिधित्व मिळाल्यावर खरोखरीच निघाला, व मि. ग्लाडस्टन यांस प्राटेस्टंट धर्माभिमान्यांनीं चोहोंकडून कावकाव करून सोडिलें, पण त्या हुषार, पोक्त, दूरदृष्टि व शहाण्या म्हातान्यानें या वितंडवाद्यांचीं तोंडें कशीं तरी दाबून धरिलीं! इंग्लंडासारख्या सुधारलेल्या देशांत एकुणिसाव्या शतकाच्या शेवटल्या पंचविशींतिला हा धर्माचा प्रकार!! असा एखादा धर्मतंटा पूर्वेकडील लोकांत झाला तर बायबलभक्त पूर्वात्यांच्या डोक्यावर रानटीपणाचें खापर फोडितात, हें पाहून कोणास आश्चर्य वाटणार नाहीं? आम्हांस असें वाटतें कीं, धर्मसंबंधानें सगळेच एकसारखे अंध आहेत, किंवा सगळेच धर्म मृगजलाप्रमाणें ज्याला त्याला चकवितात. कांहींही असो, येवढी गोष्ट खरी आहे कीं, इतर धर्माप्रमाणें ब्राह्मणधर्म गळेकापू नाहीं, व बरगड्यांत खंजीर खुपसून त्यामुळें झालेल्या भोंकांत वेदाच्या पुस्तकाला खिडकी करून देण्याची खटपट त्यानें कधीं केल्याबद्दल आम्हीं ऐकिलें नाहीं. आपला धर्म पवित्र व शुद्ध व इतर धर्माच्या लोकांच्या अंगिकारानें त्याची पूती कमी होते अशी आमची समजूत. असें असल्यावर दुसऱ्याची हत्या करून त्याच्या गळ्यांत याचें लोढणें अडकविण्याचें काम आम्हांस कसें मानवणार? यावरून एक गोष्ट सिद्ध झाली; ती ही कीं, ब्राह्मणांनीं धर्मवर्चस्व मिळविलें तें लोकांच्या माना कापून नव्हे, तर शुद्ध

मन वळवणीनें, व कोणतीही मतें लोकांत पसरण्याचा येवढाच योग्य मार्ग दिसतो. यासाठीं केवळ सामोपचारानें संपादिलेल्या धर्मसत्तेबद्दल ब्राह्मणांस दोष देणाऱ्यांचें वायफळ बोलणें आम्हांस अगदीं ऐकावेंसें वाटत नाहीं.

दुसरें एक राजकीय वर्चस्वाच्या संबंधानें ब्राह्मण लोकांवर मोठें किटाळ येत असतें. यासंबंधानें एकदोन शब्द लिहून हा लेख पुरा करावा असा आमचा हेतु आहे. ब्राह्मणांचें मुख्य काम म्हटलें म्हणजे वेद घोकण्याचें व श्राद्धें झोंडण्याचें, त्या लबाडांनीं तें सगळें टाकून विद्येचें यच्चावत भांडार आपल्याखालीं घालून दिलें. दुसऱ्या जातींस अज्ञानाच्या आंधारांत-चांचपत ठेंचा खाण्यास लाविलें, व नाहीं नाहीं तीं कपटें करून मराठ्यांकडून राजसत्ता हिरावून घेतली, व सरतेशेवटीं ती आपणांस व त्यांस नाहींशी करून तिसऱ्याच्याच घरांत नेऊन घातली, असा दोष वारंवार नेहमीं ब्राह्मणांवर घेतो; व त्याच्या शाबिदीबद्दल ब्राह्मणद्वेषी परदेशियांनीं व एतद्देशीयांनीं अतोनात खटपट केली आहे!! यांतून ब्राह्मणांची सुटका करणें तर कित्येकांस दुरापास्त दिसतें! पण ब्राह्मणांनीं असें केलें हें निदान आम्हांस तरी स्वाभाविक दिसतें. असें ते न करिते तर मात्र त्यांनीं मनुष्यस्वभावाला आणि इतिहासशास्त्राला मोठाच बट्टा आणिला असता. शहाणपण अंगीं असल्यावर त्यापासून आपलें हित करून घेण्याचा कोण प्रयत्न करीत नाहीं? एकाच्या अज्ञानाचा फायदा दुसऱ्यास मिळाला नाहीं असें कोठें झालें आहे? धर्माची किल्ली एकदां हातीं सांपडून लोकांचीं मनें वश करून घेतां आल्यावर धर्माधिकाऱ्यांनीं हरएक प्रकारचा अम्मल त्यांच्यावर चालविण्याची खटपट केल्याचीं उदाहरणें प्रत्येक देशाच्या इतिहासांत सांपडतात. या साधारण नियमास ब्राह्मणच कोठून अपवाद होतील? अझूनपर्यंत तरी "बळी तो कानपिळी" अशी जगाची राहटी आहे. असें नसतें तर पृथ्वीवरील सगळेच देश आज स्वतंत्र असते. पण दुर्दैवानें असें नाहीं. धर्मांत, व्यवहारांत आणि राज्याधिकारांत सर्वांचें एकमेकांशीं एकसारखें कदन चाललें आहे. बडा मासा छोट्या माशास गिळण्याचा सदां प्रयत्न करीत असतो. यासाठीं पूर्वी सांगितल्याप्रमाणें बड्या माशाच्या नांवानें वृथा रड गात बसून कांहीं फायदा नाहीं. त्याची भीति नाहींशी करण्यास एकच तरणोपाय; आणि तो छोट्या मंडळीनें कट करून बड्यांशीं सामना करण्याचा. सुदैवानें सर्व वर्णांस समदृष्टीनें वागविणारें अत्यंत कनवाळू सरकार आम्हांस मिळालें आहे; तसेंच नशीबानें त्याचाही थोडा डोळा ब्राह्मणांवर आहे, यासाठीं ब्राह्मणांचा अभ्युदय न साहणाऱ्यांस आमची

सूचना आहे कीं, त्यांनीं ब्राह्मणांच्या वर्चस्वाचें जूं झुगारून देण्याचा हा अमोलिक प्रसंग दवडूं नये! इतकेंच परमेश्वराच्या रुपेनें न होवो कीं, दोन बोक्यांच्या तंट्यांत सगळाच खवा भांडण मिटविणाऱ्या कार्यसाधु वानराच्या तोंडांत पडावा!! पण सध्यां आम्हांत ज्या फळ्या होऊं लागल्या आहेत, त्यांवरून सगळ्या जाती मोडून जाऊन त्यांच्या दोन होतीलसें वाटतें. एक इंग्रजी ब्राह्मण सगळे आंग्ल-भौम शाखेचे; दुसरी जात पहिल्या जातीच्या अंकित—सगळ्या भारतीय जातींच्या मिश्रणानें झालेली, हाच परिणाम खास होईल असें निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. पण हा किंवा दुसरा कोणता तरी होईपर्यंत ब्राह्मण, त्यांतही कोंकणस्थ, ज्यांनीं राज्यें मिळविलीं, व घालविलीं व ज्यांबद्दल त्यांना दुःखाचा चटका लागणें अगदीं साहजिक आहे—असे ब्राह्मण, आपलें सरकार किंवा इतर जाती कांहींही करोत; पूर्वापार आपणाकडे चालत आलेलें वर्चस्व सोडतांना फडफड केल्याशिवाय राहणार नाहींत.

[वर्ष १ अंक ११, १२.]

भारतीय शास्त्रकलांचें पुनरुज्जीवन

आमच्या हिंदू शास्त्रांचा व कलाकौशल्यांचा असा कांहीं स्वभाव आहे कीं, राजे-रजवाडे व श्रीमंत लोक यांनीं त्यांस उदार आश्रय दिल्यावांचून तीं भरभराटीस यावयाचीं नाहींत. ह्याचें कारण तीं प्रथम ज्या वेळेस उत्पन्न झालीं व पूर्णदशेस येत चाललीं त्या वेळेस देशांमध्यें राजसत्ता अतिशय प्रबल असल्यामुळें सर्व संपत्ति एकत्र जमत असे; व राजे लोक आणि सरदार यांजकडून मात्र विद्वान् व कुशल लोकांची संभावना होत असे. दुसरें, आमचीं सर्व कलाकौशल्यें हस्तप्रधान असल्या-कारणानें त्यांपासून सर्व लोकांचे पुरवठ्यास येईल इतका मालही उत्पन्न होत नसे. आमचीं शास्त्रें व कला हीं नेहमीं बापापासून मुलास किंवा गुरूपासून चेल्यास प्राप्त होत असत, परंतु तीं शिकविण्याच्या हल्लीं सुधारलेल्या देशांत आहेत तशा शाळा आपल्या देशांत पूर्वी कधींही नव्हत्या. शिवाय त्या कालीं छापखाने, आगगाड्या, तारायंत्रें किंवा पोष्टआफिसें व अशाच प्रकारचीं सर्व ठिकाणीं बातम्या पसरणारीं साधनें नव्हतीं. आमच्या पूर्वजांनीं शास्त्रकलाविषयांवर लोकभाषेंत मुळींच ग्रंथ रचिले नाहींत. जर कोणास प्रसिद्ध ग्रंथकार होण्याची इच्छा उत्पन्न झालीच तर तो संस्कृतांत ग्रंथरचना करी. त्यामुळें कलाकौशल्याच्या संबंधाची लेखी माहिती मिळावयाचीं काय तीं ठिकाणें म्हटलीं म्हणजे कारागिरांच्या घरचीं जुनीं पातार्डी मात्र होत. शास्त्रविषयांवर ग्रंथ संस्कृत भाषेंत लिहिलेले असल्यानें ते साधारण लोकांस व कनिष्ठ जातीयांस दुर्बोध झाले इतकेंच नव्हे, परंतु ते ग्रंथ महापंडितांसही दुर्बोध होऊन गेले आहेत. यांच्या परिभाषांमध्यें घोंटाळा होऊन त्यापासून अनेक मतें व अनेक पंथ उद्भवले आहेत. ही गोष्ट स्पष्ट करण्यास फारसें लांब जावयास नको. आमचें संगीतशास्त्र पहा. ह्या विषयावरील महान महान संस्कृत ग्रंथ अत्यंत दुरुपलब्ध झाले आहेत इतकेंच नव्हें, तर ते जाणणारेही नाहींसे होत चालले आहेत. हीच गोष्ट बहुतेक अंशीं आमच्या वैद्यशास्त्रास, ज्योतिषशास्त्रास व न्यायमीमांसादि शास्त्रांसही लागू आहे.

शास्त्रकलाकौशल्यें व जातिभेद यांचा परस्परांवर मोठा परिणाम झालेला दृष्टीस पडतो. जातिभेदापासून भिन्न भिन्न धंदे त्या त्या जातीकडे ठरून गेले. आमच्या जातींची ब्राह्मणापासून तो चांडालापर्यंत प्रतवारी लावण्याचा प्रयत्न धर्मशास्त्रकारांनीं केला आहे. जातीजातीमध्येंही श्रेष्ठ कनिष्ठ भाव मनांत दृढ धरून व्यवहारांत वाग-

ण्याची चाल आहे. या गोष्टीमुळें जेव्हां कोणत्याही एका जातीनें एखादा धंदा पतकरिला जातो त्यावेळेस त्या जातीहून श्रेष्ठ जातीय लोकांच्या मनांत त्या धंद्याविषयीं हीनत्व उत्पन्न होतें; व तो धंदा ते लोक कधींही पतकरीत नाहींत. या गोष्टीचे संबंधानें लोकांच्या विचारांत दिवसानुदिवस फरक पडत चालला आहे खरा, परंतु तो अद्यापि अत्यंत कमी आहे हें सर्वांस मान्य केलें पाहिजे. विशेषेंकरून शास्त्रकलांचा ज्या वेळेस हिंदुस्थानांत प्रादुर्भाव झाला त्या वेळीं लोकांची समजूत पूर्णपणें वरती सांगितल्याप्रमाणें होती. या समजुतीमुळें जेव्हां एखादा धंदा एखादें जातीचे हातीं लागे तेव्हां त्यावर त्या जातीचें पूर्णपणें प्रभुत्व होत असे; व याप्रमाणें सर्व धंदे भिन्न जातींमध्यें वांटून दिल्यासारखे होऊन गेले आहेत, व त्यांचा प्रसार त्या जातींच्या पलीकडे होत नाहीं. धंद्या धंद्यामध्यें चढाओढ होऊन, प्रत्येकानें आपणास अत्यंत योग्य व अतिशय फायदेशीर असा धंदा अंगीकारणें ही व्यवस्था आपल्या पूर्वजांस मुळींच माहीत नव्हती व आम्हांसही अद्यापि नीट कळूं लागली नाहीं. ह्याप्रमाणें जातिभेदापासून स्वतंत्र वंशपरंपरागत धंदे होऊन बसले हें सिद्ध झालें; परंतु कधीं कधीं याच्या उलटही स्थिति घडून आली. म्हणजे कांहीं लोकांनीं एखादी कल्पना काढावी व त्या कल्पनेचा उपयोग दुसऱ्यांस होऊं नये, व तिचा सर्व लाभ आपणासच व्हावा, या बुद्धीनें तें कौशल्य अगदीं गुप्तपणें, स्वतंत्रपणें चालवावें; पुढें ती विद्या मुलांस दाखवून द्यावी व याप्रमाणें भिन्न भिन्न जातींचाही स्वहितदृष्टीनें निकट संबंध होऊन एक निराळीच जात बनावी. वरील रीतीनें कित्येक कला ज्या गांवच्या त्या गांवी, ज्या जातीच्या त्या जातींत, ज्या कुलांतील त्या कुलांत, व कधीं कधीं तर ज्या मनुष्याच्या त्या मनुष्याजवळ रहात गेल्या. आतां याप्रमाणें सर्व शास्त्रें व कला यांची स्थिति झाली असल्याकारणानें त्यांस भरभराटीस आणण्याकरितां ज्यांस तीं शास्त्रें व त्या कला अवगत आहेत, त्यांस आपण सर्व प्रकारें मदत केली पाहिजे. त्या शास्त्रकला उपयोगी असल्यास त्यांचा प्रसार करण्यासाठीं आपण स्वदेशहितबुद्धीनें झटलें पाहिजे. ह्याप्रमाणें आपण केल्यास आपल्या पूर्वजांनीं आपणावर जे कांहीं थोडेबहुत उपकार केले आहेत ते आपण फेडिल्यासारखे होतील, व आपल्या देशास उदयकाल आणण्याचा एक मार्ग आपण खुला केल्यासारखें होईल. आतां कोणत्या शास्त्रकला आपणास अत्यंत महत्त्वाच्या आहेत व त्यांस आश्रय कोणत्या रीतीनें द्यावा ह्याचा विचार पुढच्या अंकीं करूं.

हिंदूंच्या शास्त्रकलांस उत्तेजन देण्याविषयीं लोकांस सूचना करण्यापूर्वी आपल्या देशांत त्यांचा हल्लीं ऱ्हास होत चालला आहे असें दाखविलें पाहिजे; व हें काम सोपें आहे. पूर्वी ज्या वेळीं हिंदू किंवा मुसलमान राजे आपणांवर राज्य करीत होते, त्या वेळीं इकडील शास्त्रकलांस साहजीकच उत्तेजन मिळत असे. त्या वेळचे राजे व त्यांच्या पदरचे सरदार यांच्या रीतिभाती व अभिरुचि अगदीं स्वदेशीय असल्याकारणानें त्यांनीं सर्व प्रकारच्या कारागिरांस व शास्त्रवेत्त्यांस आश्रय द्यावा, त्यांनीं उत्पन्न केलेले पदार्थ मोठ्या खुषीनें विकत घ्यावे. अब्दुल फझलकृत 'ऐन् अकबारीं'त लिहिलें आहे कीं, दिल्लीच्या मोगल बादशहांनीं हिंदुस्थानचे कोणच्याही भागांतून कारागीर आला असतां त्यास आपल्या पदरीं ठेवावें. ह्या कारागिरांस वार्षिक नेमणूक असे, व त्यांस रोजचा शिधाही मिळत जाई. त्यामुळें आपला माल बाजारांत केव्हां जाईल, व आपले पैसे कसे उगवतील, याविषयीं त्यांस घाई किंवा काळजी बिलकुल नसे. कारागीर म्हातारे झाले किंवा कांहीं अपघातानें काम करण्यास अयोग्य झाले तरी त्यांची नेमणूक कायम राहत असे; व त्यांच्या मरणानंतर त्यांचे मुलगे कारागीर असतील तर त्यांजकडे ती नेमणूक जाई. याप्रमाणें जेव्हां एखादें उत्कृष्ट काम तयार होई, त्यावेळीं तें राजे, सरदार, व श्रीमंत लोक यांजकडे पाठविलें जाई, व कारागिरांची मानमान्यता होऊन त्यांची नेमणूक वाढे. याप्रमाणें जीं उत्कृष्ट कामें तयार होत, त्यांचा नजराणे वगैरे पाठविण्याचे प्रसंगीं उपयोग होत असे. हिंदू राज्यांतही सर्वत्र याचप्रमाणें स्थिति होती. अपराध्यास शिक्षा देणें इतकेंच आपलें कर्तव्यकर्म, असें त्या वेळच्या नीतिशास्त्राचें मत नव्हतें; तर हरएक प्रकारच्या गुणी पुरुषांस आश्रय देणें हेंही राजनीतींत अवश्य कर्तव्य मानिलें होतें. भोजराजाबद्दल ज्या अनेक कथा आपल्या कानीं पडतात, त्या सर्व हिंदू राजांस लागू आहेत; त्यांतील अतिशयोक्ति मात्र आपण वगळली पाहिजे; व याप्रमाणें कित्येक कला हिंदुस्थानांत अनुपम पूर्णतेस येऊन पोंचल्या.

परंतु ज्या वेळीं इंग्रजसरकारचा सर्व हिंदुस्थानभर अम्मल सुरू झाला, त्या वेळीं एकामागून एक अनेक हिंदू राजे व त्यांच्या पदरचे सरदार विलयास गेले; व जे थोडे मागें राहिले त्यांस श्रेष्ठ राजाचें अनुकरण करावेंसें वाटूं लागलें. आमच्या हिंदुस्थान देशाचा झोटिंग बादशाहीपासून व रानटी स्थितीपासून उद्धार करण्यास ज्या लोकांस ईश्वरानें पाठविलें, ते लोक केवळ बाह्य वर्णानेंच आम्हांहून भिन्न नाहींत. कांहीं थोड्या मनुष्यधर्मांखेरीज त्यांत व आपणांत साम्य सांपडण्याचेंही

कठिण. त्यांचे पोषाख, त्यांच्या रीतिभाती, त्यांच्या अभिरुचि, त्यांचीं शास्त्रें, त्यांच्या कला, व त्यांचें अन्नही आपल्यापेक्षां फार भिन्न आहे. आमच्या शास्त्र-कलांचा या लोकांस उपयोग होईना, व तीं आश्रयदात्यांवांचून हल्लीं सर्व लयास जात आहेत. त्यामुळें आमचे कारागीर लोक आपआपले धंदे सोडून कोणी शेत-करी होत आहेत, व कोणी सरकारी नौकर होऊं इच्छित आहेत, व सर्वांसच दैन्य-दशेनें गांठिलें आहे! परंतु इंग्लंडांतील कारागिरांचे धंद्यांस तेजी येत आहे. राज्य-क्रांतीचा दुसरा परिणाम असा झाला आहे कीं, लोकांस स्वदेशी हातकाम तुच्छ वाटून, इंग्लिश यांत्रिक कामाची गोडी लागत चालली आहे, व बोलण्याचालण्यांत व दिसण्यांत आपण राज्यकर्त्यांच्या जितकें जवळ येऊं तितकें उत्तम, असा सर्वांचा कल दिसतो. अडाणी लोक व अडाणी स्त्रिया यांखेरीज कारांगिरांस आश्रयदाता उरला नाहीं. जेथें जेथें इंग्रजी राज्य होतें तेथें हा प्रकार दृष्टीस पडत आहे. अयोध्याप्रांत इंग्रज-सरकारचे ताब्यांत येण्याचे पूर्वी तेथें अनेक प्रकारच्या कारागिरांचें उपजीवन होत असे; परंतु हल्लीं तो प्रांत अगदीं दरिद्री व उदास भासतो. बऱ्हाणपूर हें पूर्वी रेशमाचे व कलाबतूचे कामांकरितां फार प्रसिद्ध होतें; परंतु त्यासही इंग्रजी अमलाखालीं दीन दशा येत चालली आहे. याप्रमाणें जें जें संस्थान इंग्रजांचे हातीं लागतें, तें तें भिकेस मिळून त्यांतील कारागीर देशोधडीस लागतात, ज्याप्रमाणें सर्व ठिकाणीं पोलीस व न्यायाचीं कोर्टें सरकार स्थापन करीत आहे, त्याप्रमाणेंच दारिद्र्याचीही सर्व ठिकाणीं प्रवृति होत आहे. जो तो थोडक्यांत जितका डामडौल होईल तितका करावा, किंवा साधेपणांत डौल मारावा, असें मनांत धरून कलाकौशल्याची हेळसांड करीत आहे. ह्या शोचनीय स्थितीपासून आपल्या देशांतील शास्त्रकलांचा ऱ्हास होत आहे, हें सर्वांचे लक्षांत येईल, व देशप्रीति बाळगणारास त्यांच्या पुनरुज्जीवनाचा कांहीं उपाय आहे कीं नाहीं अशी चिंता उत्पन्न होईल यांत संशय नाहीं.

केसरीसारख्या अल्प पत्रांत एकाच खेपेस ह्या इतक्या महत्त्वाच्या विषयाचें समग्र विवेचन होणें अशक्य आहे; याकरितां हा विषय येथेंच थांबवून पुढच्या अंकीं पुनः हातीं घेऊं.

[वर्ष १ अंक, १६।१७.]

हिंदुस्थानचें कलाकौशल्य.

प्राचीन काळापासून हिंदुस्थानाची कलाकौशल्याबद्दल सर्वत्र ख्याति आहे. परंतु आमच्या प्राचीन कलाकौशल्यास अलीकडे उतारकळा लागली आहे; व हिंदुस्थानांत सर्वत्र कलाकौशल्य कोणत्या रीतीनें वाढवावें, याविषयीं लोकांस चिंता उत्पन्न झाली आहे. इंग्रजी राज्यांत स्वदेशीय कलाकौशल्यास याप्रमाणें निकृष्ट दशा कां यावी, व हल्लीं जें कलाकौशल्य सर्वांस अवश्यक भासूं लागलें आहे, तें कोणत्या प्रकारचें, या विषयाचा विचार करण्याचें आम्हीं योजिलें आहे.

हिंदुस्थानांत ज्यावेळीं एकसत्ताक अनियंत्रित राज्यें होतीं, व ज्यावेळीं धर्माचा विशेष अम्मल चालत असे, त्यावेळीं अन्नवस्त्रापुरतें मिळालें म्हणजे त्यांतच तृप्त होणारे, अशांची देशांत विशेष संख्या होती. जमीन चांगली सुपीक असल्यानें, व धान्य बाहेरदेशीं जाण्यास त्यावेळीं साधनें फारशीं नसल्यानें, अन्नाची कधीं कोणास बहुधा दुर्धात पडत नसे. शिवाय हा बहुतेक सर्व देश उष्णकटिबंधांत असल्यानें वस्त्राचीही, वर्षाचा बहुतेक भाग, लोकांस फारशी आवश्यकता भासत नसे, व अद्यापही वाटत नाहीं. अन्नवस्त्राची पुरती बेगमी झाल्यावर, द्रव्याचा फारसा लोभ लोकांस रहात नसे; व द्रव्य अधिक मिळविण्याची संधि आल्यास, त्या द्रव्याचा उपयोग बहुधा धर्मकृत्यांत व्हावयाचा. जातिभेदामुळें प्रत्येकाचा धंदा व त्याची समाजांत पदवी ठरून गेली असल्यानें, आपल्या पदवीच्या पलीकडे जाण्याचें साहस करण्याची बुद्धि क्वचितच कोणांत उत्पन्न होई. व त्या पदवीच्या मानानें प्रत्येकाच्या सर्व आवश्यकता ठरून गेल्यासारख्याच असत. त्या अवश्यकता पूर्ण झाल्यावर बाकी द्रव्याचा उपयोग करण्याचा मार्ग म्हटला म्हणजे धर्म मात्र होय; त्यामुळें देवालयें बांधणें, अन्नछत्रें स्थापन करणें, इत्यादि अनेक धर्मकृत्यांत लोकांचा बराच खर्च होत असे. गयेस विष्णुपदावर आपल्या पितरांचे पिंड पडून त्यांस अक्षय्य स्वर्गसुख मिळावें, या हेतूनें, अनेक वर्षें सतत श्रम करून संचय केलेल्या द्रव्याची एका दिवसांत गयावळांच्या पायांवर अद्यापिही कशी आहुति होत आहे, याचा विचार केला असतां पूर्वी यांचें किती माहात्म्य असेल, याचा अदमास वाचकांस सहज होईल.

असो; वरतीं सांगितल्या प्रकारची समाधानवृत्ति व धर्मनिष्ठता आमच्या लोकांत प्राचीनकाळीं वागत असल्यानें, कलाकौशल्यास ज्यांच्या संपत्तीपासून आश्रय

व उत्तेजन मिळावयाचें, असे लोक फार थोडे असत. राजेलोक, त्यांच्या पदरचे सरदार, व खालच्या व मध्यम प्रतीच्या लोकांत जे कांहीं ऐषआरामी लोक असत ते–याखेरीज कलाकौशल्याचे भोक्ते, त्यावेळीं नव्हते. याप्रमाणें ग्राहकांचा वर्ग लहान असल्यानें, त्यांच्या अवश्यकता पूर्ण करण्यास फारसा माल लागत नसे; परंतु जातिभेदामुळें कोणताही उद्योग करणारांची एक जातच बनून जाई. व ती जों जों वाढत जाई तों तों कारागिरांची संख्या अधिक व काम थोडें, हा प्रकार सर्वत्र घडून येई. असें झाल्यानें आपलें काम जितक्या थोड्या श्रमानें होईल तितकें करण्याकडे किंवा तें जितकें स्वस्त दरानें विकतां येईल तितकें करण्याकडे, कारागिरांची साहजिकच प्रवृत्ति नव्हती. अधिक द्रव्य मिळविण्यास पुष्कळ माल तयार करून फारसा उपयोग नव्हता; थोडाच तयार करून त्यांत आपलें कसब जितकें दृष्टीस पाडितां येईल, तितकें पाडावें, व नंतर तो पदार्थ राजेरजवाडे, सरदार किंवा श्रीमंत लोक यांस नजर करावा, व नांवलौकिक व द्रव्य मिळवावें, हा सर्व कारागिरांचा प्रयत्न असे. अद्याप ज्या थोड्या कला आमच्यांत जिवंत आहेत, त्यांची स्थिति अवलोकन केली असतां, किंवा प्राचीन कौशल्याचे जे नमुने आज उपलब्ध आहेत ते पाहिले असतां, अथवा कलाकौशल्यासंबंधानें आम्हांत अद्याप ज्या दंतकथा ऐकूं येतात त्यांचा विचार केला असतां, वरतीं सांगितलेल्या गोष्टी सिद्ध करण्यास प्रत्यंतरें नकोत. केवळ हस्तकौशल्यानें अत्यंत सूक्ष्म असा कापसाचा धागा काढून त्याची मलमल तयार करणें; हस्तिदंताच्या लहानशा तुकड्यावर नजर न ठरे इतकें बारीक खोदीव काम करणें, रेशीम व कलाबतू यांचा नाना तऱ्हेनें संयोग करून भरगच्ची पोशाख तयार करणें इत्यादि गोष्टींमध्यें आमच्या कारागिरांचा हात अद्याप कोणी धरूं शकणार नाहीं.

असो, याप्रमाणें आम्हांमध्यें जें प्राचीन काळीं कलाकौशल्य उत्पन्न झालें, व जें अद्यापही अगदीं लोप पावलें नाहीं, त्याचा उद्देश कौशल्याचे पदार्थ सोप्या रीतीनें तयार होऊन ते सर्वांस सुलभ व्हावे हा नव्हता; जे पदार्थ तयार करणें त्यांतच कांहीं विलक्षण करामत दाखवावी, किंवा त्यांनाच अत्यंत उत्कृष्ट दर्शेस आणावें, एवढाच त्या कलाकौशल्याचा उद्देश असे. व ही स्थिति सामाजिक स्थितीस अनुसरूनच झाली.

आतां या आमच्या कलाकौशल्यास इंग्रजी राज्यांत उतार कळा कां लागली असावी याचा विचार करूं.

मागील अंकांत आमच्या देशांत प्राचीनकाळापासून कोणत्या प्रकारचें कलाकौशल्य उत्पन्न झालें व पूर्णतेला आलें हें दाखविलें. या अंकांत त्या कलाकौशल्यावर इंग्रजी राज्याचे काय परिणाम झाले आहेत याचा विचार करणें आहे.

आमच्या सांप्रतच्या सामाजिक स्थितीवर इंग्रजी राज्याचे व विद्येचे जे परिणाम झाले आहेत व होत आहेत, त्यांचें गतवर्षीच्या कांहीं अंकांत बरेंच विवेचन केलें आहे. ते परिणाम लक्षांत ठेविले असतां, आमच्या कलाकौशल्याची हल्लीं जी स्थिति दृष्टीस पडत आहे तिजबद्दल कोणासही आश्चर्य वाटणार नाहीं. कलाकौशल्याचे या देशांत आश्रयदाते, म्हटलें म्हणजे राजेरजवाडे, सरदार व श्रीमंत लोक हे होत. या तिघांचाही इंग्रजी राज्यामुळें बहुतेक लोप होत चालला आहे, असें कोणीही कबूल करील. पूर्वी जेव्हां हिंदुस्थानांत हिंदूंचें किंवा मुसलमानांचें राज्य होतें त्या वेळीं मोठमोठ्या हुद्यांच्या सर्व जागा एतद्देशीयांकडे असल्यानें इकडील कलाकौशल्यास किती आश्रय असेल हें उघडच आहे. परंतु हल्लीं हिंदुस्थानचा बहुतेक भाग इंग्रज सरकाराकडे असल्यानें मोठमोठ्या हुद्याच्या सर्व जागांवर साहेबलोकांची नेमणूक होत आहे. हे लोक, रीतीभातीमध्यें, अभिरुचीमध्यें, व शारीरिक व मानसिक अवश्यकतांमध्यें, आम्हां लोकांहून किती भिन्न आहेत हें प्रत्येकास माहीत आहेच. या लोकांस आमच्या कलाकौशल्याचे पदार्थ पसंत पडणें किंवा उपयुक्त होणें अशक्य आहे व त्यांजकडून या कलाकौशल्यास आश्रय मिळत नाहीं, हें स्वाभाविकच आहे.

आतां इंग्रजी राज्याची ज्यावेळीं इकडे स्थापना झाली, तेव्हांपासून आमचे पूर्वीचे सरदारलोक व श्रीमंत यांस स्वस्थ बसून राहण्याचा प्रसंग आला, व प्रथमतः द्रव्यसंग्रह जवळ असल्यानें, या निरुद्योगी लोकांची चैनबाजीकडे व विषयासक्ततेकडे साहजिकच प्रवृत्ति होऊन, त्यांचें द्रव्य लवकरच विलयास गेलें; व त्यांकडून प्राचीन कलाकौशल्यास जो आश्रय मिळावयाचा तो बहुतेक नाहींसा झाला.

आतां इंग्रजी राज्यांत इंग्रजी विद्या शिकून व सरकारांत अंमलदारीच्या जागा मिळवून अलीकडे बरेच लोक साधारणपणें श्रीमंत झाले आहेत; त्याचप्रमाणें इंग्रजी मालाचा किंवा इतर व्यापार करूनही बरेच लोक हल्लीं श्रीमंत झाले आहेत, परंतु इंग्रजी विद्येनें व इंग्रजांच्या सहवासानें या लोकांची स्वदेशी मालाविषयीं अभिरुचि बहुतेक नाहींशी झाली आहे; व या मालाची त्यांस आवश्यकता तर बहुधा नसतेच.

इंग्रजांच्या अनुकरणाची हल्ली सर्वसाधारण लोकांस जी हौस वाटत आहे तिजबद्दल आम्हीं बरेच वेळां लिहिलें आहे. या हौसेमुळें बहुतेक आधुनिक विद्वानांच्या घरीं स्वदेशीय कौशल्याच्या वस्तू सांपडणें कठिण; इंग्रजी कौशल्याच्या मात्र हव्या तितक्या मिळतील.

याप्रमाणें एतद्देशीय शिल्पकारांचीं बहुतेक गिऱ्हाईकें नाहींतशीं होत गेल्यानें त्यांच्या कौशल्यास उतारकळा येणें स्वाभाविकच आहे. तथापि आपल्या कौशल्याचे पदार्थ स्वस्त करून सर्वांस सुलभ करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला असता, तर त्यांस इतकी हीनता आजच आली नसती, परंतु ही गोष्ट त्यांच्या आजपर्यंतच्या विचारसरणीच्या बाहेरची असल्यानें त्यांच्या हातून ती होऊं शकत नाहीं. व म्हणूनच इकडील कौशल्य दिवसानुदिवस लोप पावत चाललें आहे.

इंग्रजी राज्य स्थापन झाल्यापासून इंग्रजी माल इकडे पुष्कळसा येऊं लागला. हा माल बहुतेक सर्व यंत्रांवर तयार होत असल्यानें, तो त्याच जातीच्या इकडील मालापेक्षां बराच स्वस्त, व दिसण्यांत सफाईदार, असा असतो. स्वस्त असल्यानें गरीबगुरीबांसही तो विकत घेण्यास जड पडत नाहीं; सफाईदार असल्यानें तो सर्वांच्या मनांत भरतो; व इंग्रजी अनुकरणाची हौस वाटत असल्यानें, हा इंग्रजी मालच बहुतेकांस अवश्य वाटूं लागला आहे. या सर्व कारणांमुळें इंग्रजी मालाचा आज जितका खप आमच्या देशांत चालला आहे, तितका स्वराज्यांत स्वदेशीय पदार्थांचा कधींहि झाला नसेल. विचाराअंतीं असें दिसून येतें कीं, हवा, पाणी, अन्न व राहण्याचें ठिकाण, या चार गोष्टी खेरीज करून, इंग्रजी विद्या शिकलेले, व शहरांत राहणारे, अशा लोकांच्या सर्व अवश्यकता प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें इंग्रजांच्या, किंवा दुसऱ्या युरोपियन लोकांच्या कलाकौशल्यानें पूर्ण होत आहेत. त्यामुळें आमच्या लोकांस हल्ली जो कांहीं उद्योग उरला आहे तो येवढाच कीं शेतकी करून धान्य उत्पन्न करावें, (व तें इंग्लंड वगैरे देशांत पाठवून तेथें आम्हांकरितां कलाकौशल्य चालविणाऱ्या लोकांस पोंचतें करावें) किंवा सुतार, लोहार, शिंपी इत्यादिकांच्या उद्योगांत शिरावें; हे उद्योग मात्र आतां आमच्या लोकांस उरले आहेत. बाकी सर्व एकामागून एक नष्ट होत आहेत. ही स्थिति कोणासही इष्ट वाटत असेल असें आम्हांस वाटत नाहीं. आमच्या बहुतेक सर्व अवश्यकता परराष्ट्रीयांनीं पूर्ण कराव्या, व आम्हीं सर्व प्रकारें त्यांवर अवलंबून रहावें, हें आमच्या देशास अत्यंत लज्जास्पद आहे. ह्या एका गोष्टीवरून आम्हांतील अनेक अवगुणांचें एकदम आविष्करण होतें. आमचा विल-

क्षण आळस; आमची स्वाहितसाधनमात्रबुद्धि; परोपकाराचा आणि देशहिताचा, व त्याचप्रमाणें दूरदृष्टीचा आम्हांतील पूर्ण अभाव; शिवाय जिज्ञासा, उद्योग, धाडस इत्यादि जे गुण युरोपिअन लोकांमध्यें विशेषेंकरून आढळतात, त्या सर्वांची आम्हांमध्यें कमतरता; हे आमचे सर्व अवगुण, कलाकौशल्याच्या संबंधानें आम्हांत जें पारतंत्र्य दिसत आहे, त्यामुळें आज सर्व जगाच्या दृष्टिगोचर होत आहेत.

[वर्ष ४, अंक १०।११]

आमचीं धर्मकृत्यें व रितीभाती.

इंग्रजी विद्येचा, व सामान्यतः विद्येचा, प्रसार या देशांत झाल्यापासून, इंग्रजांचा व दुसऱ्या युरोपियन लोकांचा या देशांत विशेष संचार होऊं लागल्यापासून, व आमच्या विचारसरणींत, इंग्रजी ग्रंथांच्या परिशीलनानें बदल झाल्यापासून, आमच्या अनेक धर्मकृत्यांसंबंधानें व रितीभातीसंबंधानें आमच्या मनांत साहजिकच तिरस्कार उत्पन्न झाला आहे. हा तिरस्कार विशेषेंकरून आमच्या मनांत वागूं लागण्याचें कारण विशेष सुधारलेल्या राष्ट्रांशीं संघट्टन होय. इंग्रज लोक येथें आले म्हणजे साहजिक जिज्ञासेनें ते आमच्या रितीभाती, धर्म, इतिहास यांबद्दल शोध करूं लागतात. ही माहिती कांहीं अंशीं त्यांस स्वतःच्या अवलोकनानें मिळते, परंतु ती पूर्णपणें मिळण्यास त्यांस इंग्रजी शिकलेल्या लोकांचें साहाय्य घ्यावें लागतें. कोणीही मनुष्य आपल्या परिचित लोकांमध्यें आहे, तोंपर्यंत त्यास आपल्या आचरणाचा किंवा विचारपद्धतीचा मूर्खपणा किंवा असमंजसपणा कळून येत नाहीं; त्याचप्रमाणें मनुष्य आपल्याच समाजांत वागत आहे, व आपल्या समाजाच्या रितीभाती अनुसरत आहे, तोंपर्यंत त्यास त्या रितीभातींचा असमंजसपणा किंवा रानटीपणा लक्षांत येत नाहीं. परंतु भिन्नदेशीय व धर्माचे व रितीभातीचे लोकांशीं त्यांचें संघट्टण झाल्यास तो असमंजसपणा त्याच्या ताबडतोब लक्षांत येतो. याप्रमाणें आमच्या लोकांची स्थिति झाली. इंग्रज लोक विशेष सुधारलेले आहेत अशी त्यांचे ग्रंथ वाचून ज्याची समजूत झाली आहे, व ज्यास त्यांच्या देशांत इकडच्या प्रमाणेंच कांहीं चाली आहेत कीं नाहींत हें माहीत नाहीं, त्यास इंग्रज लोकांस आपल्या रितीभाती सांगण्याचा प्रसंग आला असतां, त्या लोकांच्या पदोपदीं साश्चर्य व सोपहास प्रश्नांचें उत्तर देण्याचें भाग पडलें असतां, व त्यांच्या प्रश्नांनीं, ज्या मार्गानें पूर्वी त्याची विचारशक्ति कधीं गेली नसेल, त्या मार्गाकडे ती वळली असतां, अशा मनुष्याचे मनास ही माहिती देतांना किती खेद व संकोच वाटत असेल, याची वाचकांनींच कल्पना करावी. व त्यांतून आपण ज्या लोकांस माहिती देत आहों, ते केवळ शोध करून स्वस्थ बसणारे नव्हेत, तर आपली सर्व माहिती ग्रंथरूपानें किंवा इतर मार्गानें जगापुढें आणण्यास सदोदित उद्युक्त असतात, हा विचार आपल्या मनांत आला असतां, आतां आपल्या असमंजस चाली सर्व जगापुढें येणार व आपल्या

देशाचा सर्वत्र उपहास होऊन तो रानटी ठरणार हेंही पण आपल्या मनांत वागूं लागतें. या प्रमाणें स्थिति प्रत्येक सुजाण मनुष्याची होणें साहजिक आहे कीं नाहीं, याचा ज्याचा त्यानेंच विचार करावा. पहा कीं कोणी बेळगांव, धारवाड जिल्ह्यांतील मनुष्य इकडे येऊन तो तिकडील लिंगाईत वगैरे लोकांच्या रितीभाती सांगत असतां किंवा तिकडील नाटकें वगैरेंचें वर्णन देत असतां, आपण त्यास नानातऱ्हेचे प्रश्न विचारून बेजार करितों; आपण त्या लोकांचा वाटेल तितका उपहास करितों; व सरतेशेवटीं त्यांस रानटी ठरवितों. हीच गोष्ट युरोपिअन लोकांनीं आमच्या रितीभाती पाहिल्या व ऐकिल्या म्हणजे त्यांची होत असेल, हें उघड आहे.

इंग्लिश लोकांचे दुराचार काय असतील, त्यांची आम्हांस माहिती नाहीं; परंतु त्यांचे पुष्कळ गुण घेण्याजोगे आहेत, यांत संशय नाहीं; शिवाय ते विशेष सुधारलेले असून, येथील राज्यकर्ते आहेत, या कारणांमुळें त्या लोकांच्या अनुकरणाची इकडे बरीच प्रवृत्ति झाली आहे, हें आम्हीं अनेक प्रसंगीं दाखविलें आहे. त्या लोकांचा आम्हांविषयीं जितका चांगला ग्रह होईल तितका करून घेणें हें अत्यंत इष्ट आहे, हें कोणीही कबूल करील. या सर्व कारणांमुळें आमच्या अनेक धर्मकृत्यांचा व रितीभातींचा आम्हांस तिरस्कार आला आहे, व त्या केव्हां सुटतील याविषयीं आम्हीं कांहींसे अधीरही झालों आहों, व स्वतः तरी होईल तितकें त्यांपासून अलिप्त राहावें असें आम्हांस वाटूं लागलें आहे.

आतां आमच्या धर्मकृत्यांपेक्षां तिरस्काराहं कोणतीं व आमच्या रितीभातींपेक्षां उपहासास्पद कोणत्या, याविषयीं विशेष परिस्फुटता करण्याची अवश्यकता नाहीं; सामान्यतः ज्यांस विद्येचा संस्कार झाला आहे, व ज्यांची विचारशक्ति थोडीबहुत प्रज्वलित झाली आहे, त्यांस त्या कळूं लागल्या आहेत. आतां आधुनिक विचारशील लोकांनीं आपली व आपल्या देशाची अब्रू राखण्याकरितां या त्याज्य कृत्यांबद्दल व चालींबद्दल दोन प्रकारची खटपट सुरू केली आहे; व त्या दोहोंबद्दल मात्र विचार करणें अवश्य आहे. हा विचार करितांना आपले अभिमानाचे किंवा दुराग्रहाचे विचार एकीकडे ठेविले पाहिजेत.

चारपांच वर्षांमागें हिराबागेंतील व्याख्यानमालेंत एक दिवस मूर्तिपूजेचा विषय प्रसंगवशात् निघून, त्यासंबंधानें दोन बड्या रावबहादुरांमध्यें सर्व लोकांसमक्ष मोठा

ऐकण्यासारखा वादविवाद झाला. हा वादविवाद अद्याप पुष्कळांच्या स्मरणांत असेल. लोकहितवादी रावबहादुरांनीं हिंदुधर्माचा बाह्यात्कारी पक्ष घेऊन असें दाखविण्याचा प्रयत्न केला कीं, हिंदु लोकांत आज जे मूर्तिबद्ध देव पूज्य मानिले आहेत, ते प्रथमतः मनुष्यांमध्यें पूज्य व प्रसंशसनीय मानिलेल्या सद्गुणांच्या निदर्शक मूर्ति होत. त्यांनीं उदाहरणार्थ गणपति घेतला होता. संस्कृत कवींनीं सांगितलेल्या लक्षणांवरून व त्यांनीं दिलेल्या वर्णनावरून "गणपति" हा ज्ञानाची प्रतिमा असावा, असें रावबहादुरांनीं प्रतिपादन केलें, व गणपतीच्या स्वरूपावरून हें आपलें म्हणणें सयुक्तिक आहे असें दाखविण्याचा प्रयत्न केला. गणपतीची मूर्ति सर्वांगास शेंदूर लावून लालभडक केलेली असते. आतां तांबडा रंग हा आमच्या लोकांत प्रीतिदर्शक आहे; व प्रीति व तांबडेपणा या दोहोंस संस्कृतांत एकच शब्द (राग) आढळतो. आतां ज्ञानाचा हा एक गुण आहे कीं त्याच्या योगानें मनुष्यास प्राणिमात्राबद्दल प्रीति उत्पन्न होते. व जो केवळ ज्ञान-मूर्तीच मानिला त्याचे अंगीं ही रक्तता नखशिखांत वास करितांना दाखविली असतां, तें यथायोग्यच होणार आहे. तसेंच ज्ञानसंपादन हें केवळ मानसिक प्रयासाचें काम आहे; निदान ज्यावेळीं वरील ज्ञानमूर्तीची कल्पना निघाली त्यावेळीं तरी तसें होतें. व ज्यानें आपला सर्व काळ ज्ञानप्राप्तींत घालविला, त्यास तुंदिलत्व प्राप्त होणें साहजिकच आहे, याचप्रमाणें रावबहादुरांनीं गणपतीचे शुंडाग्राबद्दल, त्याचे मूषकवाहनत्वाबद्दल, व मोदकप्रियतेबद्दलही मोठ्या कोटिक्रमानें सार्थकत्व दाखविलें.

प्रतिपक्षी समाजवाल्या रावबहादुरांस ही विचारसरणी न आवडून, व हिंदू देवतांच्या मूलप्रादुर्भावांत दाखविलेली थोडीशी सयुक्तिकता असह्य होऊन, त्यांनीं आपल्याही बुद्धीस थोडें चांचल्य आणिलें व कोटिक्रमास आरंभ केला. त्यांच्या मतें गणपति ही देवता ज्ञानाची तर नव्हेच, पण खादाडपणाची म्हटल्यास चालेल. अत्यशनानें ज्यास प्रचंडोदरत्व प्राप्त झालें आहे, चार हातांशिवाय ज्यास शुंडादंडाची गरज लागली आहे, ज्याच्या रात्रंदिवस भक्षित्वामुळें व हस्तपादादि चलनाक्षमतेमुळें मूषकगण भोंतालीं जमला आहे, असा देव खादाडपणाचीच मूर्ति मानल्यास सयुक्तिक आहे, असें त्यांनीं दाखविलें. आतां ही कोटि त्यांनीं ख्रिस्तीधर्मप्रसारकांपासून घेतली असेल, (व तसें करण्यास प्रार्थनासमाजिकांस हरकतहि नाहीं.) असो.

नुकता वसंतोत्सव गेला त्या संबंधानें बालसमवायांत संभाषण करीत असतां, कोणी प्रसिद्ध बड्या माणसानें असें सांगितलें कीं, होळी व धुलवड ह्या दोन गोष्टी पूर्वी आमच्या पूर्वजांनीं जेव्हां सुरू केल्या, त्यावेळीं त्यांचा उद्देश मुनिसिपालिटी व

स्यानिटरी डिपार्टमेंट (आरोग्यरक्षक खातें) यांचें खातें एक दोन दिवसांत आटपून टाकावें हा होता; म्हणजे वर्षांत सांचलेल्या सर्व केरकचऱ्याची एकसमयावच्छेदें-करून हुताशनी देवीचे मुखांत आहुति करावी, व दुसरे दिवशीं घरादारांतील व रस्त्यांतील अमंगळ व दुर्गंधिप्रवाही पदार्थांस प्रत्यक्ष सूर्यकिरणांत आणून त्यांचें बाष्पीकरण करावें, व याप्रमाणें सर्वत्र स्वच्छता झाल्यावर आरोग्यवर्धक व्यायाम घेऊन आनंदानें दुसऱ्या वर्षाची प्रतीक्षा करावी. या आमच्या धर्मसंबद्ध चालसिंबंधानें प्रा. समाजिष्टांची उलट कोटी आमच्या अद्याप ऐकिवांत आली नाहीं; परंतु वरच्याप्रमाणें मौजेची असेल हें उघड आहे. असो.

आतां वर सांगितल्याप्रमाणें उभयपक्षांच्याही बोलण्यावरून, व वादपद्धतीवरून असें दिसून येतें कीं, वर सांगितल्या प्रकारच्या रितीभाती व धर्मकृत्यें सांप्रत सुधारलेल्या काळांत चालत असणें अप्रयोजक दिसतें. उभयतांच्याही मतें हीं कृत्यें सांप्रतकाळीं बंद होणें इष्ट आहे असें, प्रत्यक्ष जरी नाहीं तथापि अप्रत्यक्षपणें तरी, सिद्ध होतें. परंतु वर सांगितल्याप्रमाणें जे लोक त्या कृत्यांचें मंडन करितांना दिसतात, ते मात्र पुष्कळ अंशीं चुकतात, असें आमचें मत आहे. कारण सांप्रत ज्या असमंजस चाली आम्हांत सुरू आहेत त्या केव्हां तरी प्राचीनकाळीं सयुक्तिक होत्या किंवा नाहीं, हा मुळींच प्रश्न नाहीं. प्रश्न असा आहे कीं आम्हीं जें त्यांचें हल्लीं अनुसरण करीत आहों तें आम्हांस योग्य आहे काय ? आमच्या देवतांची प्रारंभीं जेव्हां आमच्या पूर्वजांस कल्पना आली, व त्यांनीं त्यांच्या जेव्हां प्रतिमा घडविल्या, त्यावेळीं मूर्तिमंत सद्गुण आपल्या डोळ्यांपुढें रहावे, हा कदाचित् त्यांचा उद्देश असेल; तसेंच शिमग्याचा उत्सव स्थापित करितांना त्यांचा आरोग्यसंरक्षण हा उद्देश असेल; परंतु हेच उद्देश मनांत बाळगून, व त्यांची उपयुक्तता ओळखून, गेल्या हजारपांचशें वर्षांत कोणीं आचरण केलें आहे काय ? व सध्यां आपण करित आहों काय ? या प्रश्नांचें उत्तर प्रत्यक्षप्रमाणांवरूनच दिलें पाहिजे, व तें देणें अवघडही नाहीं. आमच्या पूर्वजांनीं ह्या चाली अमलांत आणतांना जे उपयोग मनांत आणिले तेच जर आमच्या मनांत वागते, व आमच्या सांप्रतच्या स्थितीस लागू पडते, तर आज हे प्रश्नच उद्भवले नसते; परंतु ते उद्भवून, त्यांच्या मंडनार्थ वरच्यासारखीं कारणें आमचे विद्वान लोक दाखवितात, यावरूनच आमचें आचरण पूर्णपणें सयुक्तिक नाहीं, असें स्पष्ट होतें.

वर सांगितल्या प्रकारचा वादविवाद केवळ ऐतिहासिक दृष्ट्या केल्यास त्यांत फारशी दोष ठेवण्यास जागा नाहीं; परंतु सांप्रतकाळीं आमचें आचरण सयुक्तिक आहे व आपण करितों तें उपहासास्पद नाहीं असें जर कोणी स्वदेशाभिमानी लोकांच्या मनांत भरवून देण्याचा प्रयत्न करील, तर तो मात्र निष्फळ होईल इतकेंच नव्हे, तर त्याचा उलट मात्र परिणाम होईल. कारण, आमच्या सर्व चाली प्रथमतः ज्यावेळीं रूढि पावल्या, त्यावेळीं त्या मोठ्या कल्पकतेनें व विचारानें योजिल्या होत्या, असें जरी कबूल केलें तरी, त्यांत फार प्राचीन काळच्या आमच्या पूर्वजांचें मात्र शहाणपण दिसतें; परंतु त्याचे मूळ हेतु विसरून, आज हजारों वर्षें ज्या आम्हीं त्या रूढीचें पशुवत् आचरण केलें व करीत आहों, त्या आमचें केवळ विचारशून्यत्व मात्र दिसून येतें. व याप्रमाणें पूर्वजांची थोरवी गाऊन त्यांत आपला हजारों वर्षांचा मूर्खपणा कबूल करणें हें कोणीही स्वदेशाभिमानी भूषण मानीत असेल, असें आम्हांस वाटत नाहीं. कोणतीही चाल किंवा धर्मकृत्य सांप्रतकाळीं सयुक्तिक व हितावह आहे, किंवा मूर्खत्वाचें व अहितकारक आहे, हें आज आपणांस पूर्ण विचारानें ठरविलें पाहिजे. व त्यावर त्याचा अंगीकार किंवा परित्याग अवलंबून ठेविला पाहिजे; तसें आपण न केल्यास त्यानें आपण आपला असमंजसपणा मात्र प्रकट करितों, व सुधारलेल्या राष्ट्रांत उपहासास्पद होतों.

[वर्ष ४ अंक १२।१३.]

राज्यतृष्णा

पर्वताच्या रुंद व उंच बाजूपासून निघणारा पाण्याचा प्रवाह किती जोराचा असतो, हें सर्वांस माहीत असेलच. या कड्यावरून त्या कड्यावर त्या कड्यावरून या कड्यावर वेगानें आपटत उतरणाऱ्या असल्या प्रवाहाला आडविणें किंवा बांध घालणें याहून अधिक कठीण असें दुसरें काम नाहीं. उतरणीवर असतां पाण्याला इतका जोर असतो कीं जें आडवें येईल त्यास तें आपल्या धारेबरोबर वाहून नेण्यास सोडीत नाहीं. कित्येक ठिकाणीं या प्रवाही द्रव्याच्या अंगीं इतकें सामर्थ्य येतें कीं, त्यामुळें तें अत्यंत कठीण अशा काळ्या ठिक्कर पाषाणांस आपल्या जबरदस्त आघातानें विदारून रस्ता काढीत निघून जातें. आपणांस जागोजाग वाळूचीं जीं विस्तीर्ण मैदानें दिसतात तीं असल्या प्रवाहांच्या आघातानें झालेलीं असतात, असें तत्त्ववेत्त्यांचें म्हणणें आहे. सारांश, काय कीं पाण्याच्या ओघाला जोंपर्यंत उतार सांपडत असतो तोंपर्यंत त्याच्या अंगीं विलक्षण जोर असतो. तो एकदां सपाटीवर येऊन ठेपला, व रुंदावूं लागला, म्हणजे मात्र त्याची गति कमी होऊं लागते. त्याला धरणें आणि बांध बांधणें शक्य वाटूं लागतें, त्यांतून पाट आणि कालवे फोडून काढून देणें संभवनीय होतें, व त्याच्या पाठीवर लाकडाच्या खोगरांत बसून इकडून तिकडे व तिकडून इकडे जाण्यायेण्यास व माल वाहण्यास सांपडूं लागतें.

राज्यतृष्णाही उच्छृंखल वारिप्रवाहाप्रमाणेंच अनावर आहे. राष्ट्रें हिच्या धारेला एकदां लागलीं म्हणजे कोणीकडे जातील हें सांगतां येत नाहीं. कोणत्याही राष्ट्राच्या अंतःकरणांत राज्यें काबीज करण्याची इच्छा एकदां बळावली, म्हणजे तें कोठें थांबेल याचा निश्चय होणें नाहीं. आज एक, उद्यां दुसरा, परवां तिसरा याप्रमाणें एका पाठीमागून एक अनेक देश त्याच्या झपाट्यांत सांपडून वाळुपणास मिळतात! त्याच्या विजयगतीला आवरून धरण्याचें सामर्थ्य फार थोड्यांच्या अंगीं असतें. पुष्कळ वेळपर्यंत असें होतें कीं ज्याप्रमाणें लहानसहान ओढे व नाले मध्यस्थित नदीच्या मोठ्या पात्राला मिळून त्याचा प्रवाह फुगवीत जातात, त्याप्रमाणें एखाद्या रानटी जातीनें विजयासाठीं प्रस्थान ठेविलें कीं तिच्या मदतीला दुसऱ्या जाती येतात, व साऱ्या मिळून जिकडे मऊ व उतार प्रदेश सांपडेल तिकडे आपला झेंडा लावीत सुटतात. अखेरीस नदीच्या पात्राप्रमाणेंच त्यांचीही स्थिति होते. जोरानें वाहून आणलेल्या वाळूनें, गाळानें व मळानें पुढें पुढें पात्र भरून आल्यामुळें तिची गति मंदावते,

व आसपासच्या प्रदेशास खणून किंवा वाहून नेण्याचें तिचें सामर्थ्य अगदीं शिथिल पडतें. विजयाच्या पाठीमागें लागलेल्या लोकांनाही जिंकलेल्या मुलखांचा अफाट पसारा झेंपेनासा होऊन शेवटीं आपली गति मंद करावी लागते. या लिहिण्याचें सत्यत्व जो थोडासा विचार करील त्याच्या लक्षांत येण्याजोगें आहे. आर्यलोक झाले, परशिअन लोक झाले, ग्रीकलोक झाले, रोमनलोक झाले, आरबलोक झाले, फ्रेंचलोक झाले, इंग्लिशलोक झाले—पाहिजे त्या विजयी राष्ट्राच्या इतिहासाकडे अगदीं जुजबी नजर टाकली, तरी वर लिहिलेल्या लेखाचें सत्यत्व प्रत्ययास येणार आहे. ज्याप्रमाणें रानटी जनावरांचे कळप भक्ष्याच्या शोधार्थ स्थानांतरें करीत असतात, त्याप्रमाणें भुकावलेल्या मनुष्यजाति पोटाची खळी भरण्यासाठीं जिकडे वाट सांपडेल तिकडे चाल करीत सुटतात. पण रानटी पशूंत व मनुष्यांत एक मोठा भेद आहे तो हा कीं रानटी पशूंस भूक भागविण्याशिवाय दुसरी कसलीही इच्छा नसते; पण मनुष्याचें तसें नाहीं. त्याची भूक भागली तरी तो स्वस्थ बसावाचा नाहीं. पोटाची खळी भरून गेली म्हणजे अधिकारभोगाची उत्कट इच्छा त्यास उत्पन्न होते. व या इच्छेच्या भोवऱ्यांत तो एकदां सांपडला म्हणजे त्याला शांत स्थिति केव्हां येईल हें सांगणें मोठ्या मुष्किलीचें आहे.

इंग्लिशलोक सतराव्या शतकाच्या आरंभापासून पोटासाठीं व अधिकारभोगेच्छा भागविण्यासाठीं पृथ्वीच्या प्रत्येक भागांत आपल्या लोकांच्या वसाहती स्थापित आहेत, व राज्यें काबीज करीत आहेत, उत्तर अमेरिका, आस्त्रेलिआ, हिंदुस्थान, व आफ्रिका हीं सारीं आंग्लभौमांनीं कमीअधिक व्यापून टाकलीं आहेत. अद्यापि त्यांची राज्यतृष्णा भागल्याचीं चिन्हें दिसत नाहींत. " इतका मुलूख काबीज केला म्हणजे पुरे " असें विजयशाली देशाला कधींच वाटत नाहीं. ज्या वेळेस त्याच्या महत्त्वाकांक्षेवर बाहेरून जास्त दडपण पडेल, त्याच वेळेस तिचा जोर कमी होतो. या घटकेस इंग्लंडांत असे अनेक राज्यकारणी पुरुष आहेत कीं ज्यांना इंग्लंडानें नेहमीं राज्य वाढवीतच जावें असें सर्वदां वाटत असतें. हिंदुस्थानावरची चिकाटी शाबूत रहाण्यासाठीं अफगाणिस्थान व इजिप्त या देशांवर आपला शह असला पाहिजे असें वाटून तो हेतु तडीस नेण्यासाठीं किती पैशाचा व मनुष्यांचा खराबा ते करीत आहेत, हें सर्वांस ठाऊक आहे. ग्लाडस्टन, ब्राइट, शांबरलेन, वगैरे दूरदर्शी लोकांवर अविचारी लोक तुटून पडून त्यांची फजिती उडविण्यासाठीं टपून बसले आहेत. ईजिप्तदेशावर आपला वरचष्मा राखण्यासाठीं त्यांना गार्डनला नुकताच बळी

द्यावा लागला, व आणखी किती शूर लोक खर्ची पडणार आहेत, हें सांगतां येत नाहीं. राज्यविस्तार मोठा झाला, म्हणजे तंट्यांचीं कारणें कोठें ना कोठें तरी नेहमीं उद्भवणारच. प्रत्येक तंट्यांत यश मिळवून आपली छाप बसविणें फार श्रमाचें आणि खर्चाचें आहे. पण राज्याचा दरारा कमी न होऊं देण्यासाठीं ते श्रम आणि तो खर्च करावा लागतो. खर्च अधिक होऊं लागला कीं प्रजेवर करांचा बोजा लादणें भाग पडतें. घरची प्रजा कर देण्यास नाखुष आहे असें दिसून आल्यावर जिंकिलेल्या प्रजेवर तो लादण्याची साहजिक बुद्धि होते. येणेंप्रमाणें जुलूमानें जुलूम व अन्यायानें अन्याय वाढत जाऊन शेवटीं सगळा डोला डळमळूं लागतो, व बहुतेकदां तो कोसळून पडतो. इंग्लंडांपेक्षांही रशियाची राज्यतृष्णा फारच उत्कट असावी असें दिसतें. या त्याच्या तृष्णेपासून आम्हांस थोड्या वर्षांच्या आंत फार पीडा होणार आहे असें मानण्यास अलीकडे पुष्कळ आधार मिळत चालला आहे; व या भावी त्रासाचें यथार्थ स्वरूप लक्षांत आणून त्याच्या निरसनार्थ आम्हीं आपल्या राज्यकर्त्यांच्या साहाय्यानें आतांपासून प्रयत्न चालविला नाहीं तर आमच्यावर पुढें मागें दारुण प्रसंग खास गुदरणार आहे असें दिसतें. पुढल्या खेपेस रशियांत हिंदुस्थानसंबंधानें काय काय कारस्थानें चाललीं आहेत, हें सांगण्याचें वचन देऊन आठ दिवसांची रजा घेतों.

[वर्ष ५, अंक ७.]

जनरल गॉर्डन.

कोणत्याही महापुरुषाचें चरित्र वाचलें असतां मनोरंजनाचा व सुशिक्षणाचा अंशतः तरी लाभ होतोच होतो. करितां इजिप्तमध्यें ज्यानें पराक्रम करून वाहवा मिळविली, व एकंदर राष्ट्रांस मान्ना डोलविण्यास लाविलें, पण दैवदुर्गतीनें ज्याचा परवां नुकताच खारटूमच्या दंग्यांत अंत झाला, अशा त्या शूर जनरल गॉर्डनाचें चरित्र देण्याचा आज आम्हीं विचार केला आहे. चालू शतकांत जे कित्येक मोठमोठे वीर होऊन गेले त्यांपैकींच गॉर्डन हा एक होय. तेव्हां असा जंगी " वीर बाका " चरित्रनायक असल्यामुळें, किंवा गेल्या वर्ष दीड वर्षांत आमच्या हिंदुस्थानांतील लोकांस त्याचें नांव बरेंच ठाऊक झालें असल्यामुळें, आमच्या वाचकांस आजचें चरित्रसार केवळ नीरस वाटणार नाहीं.

चार्ल्स जॉर्ज गॉर्डन हा वुल्विच येथें सन १८३३ त जन्मला. याचा बाप व आजा हे दोघे मोठे शूर शिपाई होते, व त्या दोघांनींही जनरलचा किताब मिळविला होता. बीज तसा अंकुर,–तेव्हां हाही त्यांजप्रमाणें जनरलपर्यंत गेला. याचा सर्व विद्याभ्यास रॉयल मिलिटरी आकेडमींत झाला. १८५२ सालीं याला प्रथम लेफ्टिनंट केला. पुढें क्रिमियन वॉर सुरू होतांच यानें आपण होऊन मी तिकडे जातों असें व्हालंटिअर केलें, व तिकडे गेल्यावर सिबास्टोपोलच्या किल्ल्यासमोर मोठ्या निकारानें लढत असतां याला गोळी लागली. हाच याचा पहिला वार होय. संग्रामाचा बखेडा आटपल्यानंतर तह होऊन सर्वत्र शांतता झाली तेव्हां रशिया, टर्की, व आर्मेनिया यांच्या परस्पर सरहद्दी ठरविण्याकरितां एक कमिशन नेमलें गेलें. त्यांत याला असिस्टंट इंग्लिश कमिशनर केलें होतें. नंतर १८६० त चीन देशाशीं लढाई सुरू झाली तेव्हां ब्रिटिश सैन्याबरोबर हा तिकडे गेला. चीनचें इंग्लंड व फ्रान्स या उभयतांशीं युद्ध चाललें असतां एकाएकीं देशांतल्या देशांत भयंकर बंड उद्भवण्याची चाहूल दिसली, तेव्हां इंग्लिशांशीं वैरभाव असतांही त्यानें त्यांजपाशीं मदत मागितली. इंग्लिशांनींही मोठ्या उदार अंतःकरणानें ती देण्याचें कबूल करून चिनी फौजेचें आधिपत्य घेण्यास गॉर्डन याची योजना केली. या गब्रूनें बंडवाल्यांची हां हां म्हणतां खोड मोडली.

अडचणीही थोड्या होत्या असें नाहीं, तथापि त्या सर्वांतून तो मोठ्या शहामतीनें पार पडला. परकीय व भिन्नजातीय आणि अर्धवट सुधारलेल्या लोकांशीं कसें वागावें याची त्याला गुरुकिल्ली साधल्याचें या प्रसंगीं उत्तम दिसून आलें. यानें बंडवाल्यांच्या अंगावर जावयाचें तें नुसती एक छोटी स्वारांची टोळी घेऊन जावयाचें. स्वतःजवळ शस्त्र ना बिस्त्र, एक लवचिक वेताची छडी तेवढी असावयाची! संकट किंवा मरण म्हणजे कःपदार्थ असें त्यास वाटे! असें याचें जंगी धाडस पाहून कित्येक ब्रिटिश लोक तर केवळ थक्क होऊन जाऊन त्यांची त्या अवतारी पुरुषाची देवाप्रमाणें आराधना करण्याची बुद्धि दृढतर झाली! चीनच्या स्वारींत त्याला काय ती एक जखम लागली, पण ती फार जबर होती. तींतून एकीकडे रक्तस्राव चालला असतांही या पट्ट्यानें मूर्छा येऊन पडेपर्यंत सारखें हुकूम सोडण्याचें काम सुरू ठेविलें होतें! याचा येवढा मोठा पराक्रम पाहून चीनसरकारानें त्याला दोन तीन मोठ्या पदव्या दिल्या, व कांहीं नजराणे दिले, व शिवाय त्याजकडे बक्षीस म्हणून वीस हजार पौंडांचे तोडे पाठवून दिले. हे तोडे यानें त्याच पावलीं परत लावून दिले. पैशाचा लोभ त्याला बिलकुल नसे. उत्तम सेनापतीस द्रव्याचा अभिलाष मुळींच असतां कामा नये; आणि तो याच्यांत नव्हता यामुळें याजवर हवा तसा विश्वास टाकतां येई, आणि म्हणूनच याचा उत्कृष्ट जनरल असा चोहोंकडे लौकिक झाला. ब्रिटिश सरकारानेंहि त्याचा पराक्रम पाहून तो परत गेल्यावर त्यास लेफ्टिनेंट-कर्नल हा किताब दिला. १८७१ सालीं याला ड्यान्यूबच्या युरोपिअन कमिशनाचा इंग्लिश मेंबर करून पाठविलें. तेथें असतां ७३ च्या सेप्टेंबरांत याला न्युबार पाछाच्या मार्फत खेदिवाची तार आली तेव्हां लागलींच ड्यान्यूबची जागा सोडून तो केरोस चालता झाला. यावेळीं इस्मायल् पाछा हा खेदीव होता. बेकर पाछाकडे गुलामांचा व्यापार बंद करणें, दळणवळणाची सुरेखशी रीत सुरू करणें वगैरे ज्या कित्येक गोष्टी सोंपविल्या होत्या त्यांतून एकही सिद्धीस न गेल्यामुळें त्याच्या जागीं याची नेमणूक करून त्या सिद्धीस न्याव्या, असा विचार करून खेदीवानें यास सालीना काय घ्याल म्हणून विचारलें, व बेकरपाछास १०००० पौंड देत होतों, म्हणून सांगितलें. यानें आपण गव्हरनर असलों तरी आपल्याला २००० पौंड बस्स आहेत असें सांगितलें! याप्रमाणें ईजिप्तमध्यें गॉर्डन यानें येवढ्या पगारावर चिनांतल्याहूनही अधिक जोखमीचें काम हातीं धरलें. तीन वर्षांत यानें शत्रूंस मित्र केलें, अव्यवस्था मोडून टाकिली, व पूर्वी जीं छावणीचीं तीनच दूर दूर ठाणीं होतीं त्यांचे

जागीं ५० पासून १०० मैलांवर एकेक अशीं पुष्कळ ठाणीं बसविलीं. पण याचा गुलामगिरी बंद करण्याचा जो मुख्य उद्देश त्याला तिकडील गव्हरनर व इतर कामदार प्रतिकूल होते. हेंच काय पण खुद्द खेदीव व प्रधानमंडळी हे देखील गुलामगिरीच्या बाबतींत मुळींच मन घालीनात. असें झालें तेव्हां ७६ च्या अखेरीस गॉर्डन यानें एकदम आपल्या जागेचा राजीनामा दिला. खेदीव यास गॉर्डन याचा मोठा अभिमान वाटत असे, व माझ्या सर्व कामदारांत उत्तम असा काय तो एक गॉर्डनच असें तो नेहमीं म्हणत असे. त्यास यानें राजीनामा दिला हें ऐकून मोठें वाईट वाटलें. गुलामगिरी समूळ नाहींशी करण्याच्या कामांत होईल तितकी आम्ही मदत करूं, व त्या कामासंबंधानें ज्या म्हणून आपणांस नडी येत असतील त्या सर्व दूर करूं, व हवातर आपल्या म्हणण्याप्रमाणें हमीदाखल सौडनचा सगळा प्रांत आपल्या ताब्यांत देतों, पण आपण पुनः एकवार आपल्या पूर्वीच्या जागीं येऊन कारभार पहावा, अशी खेदिवांनीं विनंति केल्यावरून गॉर्डन साहेब पुनः परत आले. अशा प्रकारें सगळें सौडन, व आणखी एकदोन प्रांत मिळून एकंदर २०० चौरस मैल मुलखाचा गॉर्डन हा गव्हरनर जनरल झाला. गुलामगिरी बंद करण्याच्या कामांत मख्खी काय ती सौडन प्रांतांत होती, आणि म्हणूनच यानें तो प्रांत अगोदर हस्तगत करून घेतला. यामुळें त्याला अतोनात हर्ष होऊन पुष्कळ उमेदही आली, आणि आतां गुलामगिरी म्हणजे काय बिशाद आहे असें त्यास वाटूं लागलें. गॉर्डन यानें दुसरीं सगळीं कामें गुंडाळून ठेविलीं, व फक्त गुलामगिरीचा पिच्छा पुरविला. सांडणीवर बसून त्यानें जिल्होजिल्हीं जावें व गुलामांचा व्यापार करणाऱ्यांचा पुरता पाठलाग करून त्यांस योग्य शासन करावें, आणि त्यांजकडून तो धंदा बंद करवावा. याची विलक्षण चलाखी बघून व्यापारी मंडळींची पांचावर धारण बसे, व ते त्याच्यापुढें थरथरा कांपत. येणेंप्रमाणें केरो व कान्स्टयांटिनोपल या दोन ठिकाणाशीं चालू असलेला व्यापार तर त्यानें अगदीं पार बसवून सोडला. याशिवाय त्यानें खेदीवाकडून गुलामांचा व्यापार आजपासून बंद आहे व गुलामगिरी खुद्द ईजिप्तांत सात वर्षांनीं व सौडनांत बारा वर्षांनीं बंद राहील असें आज्ञापत्र काढविलें होतें. यामुळें तर त्याचा मार्ग फारच सुलभ झाला. पण इतक्या अवकाशांत त्याला दुसरीकडे बघण्यास बिलकुल फुरसत सांपडली नाहीं, यामुळें त्याच्या प्रांतांतील वसुलाची अगदीं अव्यवस्था होऊन गेली होती.

सन १८७७ सालीं गॉर्डनसाहेब गुलामगिरी बंद करण्याच्या कामांत सारखे गढून गेले असल्यामुळें त्यांच्या मुलखांत एकच दंगा होऊन गेला. बजेटांत पुष्कळ तूट आली, करांचा वसूल होईना, लोकांत चळवळ सुरू झाली व क्रित्येक ठिकाणीं दंगेधोपेही होऊं लागले. एका प्रांतांत तर अगदीं खरोखरीचें बंडच झालें ! तेव्हां अशा प्रसंगीं गॉर्डन यास आपलें आवडतें काम बाजूस ठेवून दंग्याच्या जागीं जाणें भाग पडलें. पण त्याचा इतका कांहीं दरारा होता, व लोकांचा त्याजवर भरंवसाही इतका होता कीं, तो तेथें जातांच बंडवाले त्यास शरण आले आणि जिकडे तिकडे शांतता झाली. याचा धीटपणा किती विलक्षण होता व याच्या शब्दाला मान किती होता, याविषयीं असें सांगतात कीं बंडवाल्यांचें किती कां हजार सैन्य असेना, त्यांच्या कंपूत या गब्रूनें कोणालाही बरोबर न घेतां बेधडक एकटें शिरावें, व केवळ आपल्या शब्दांवर त्यांस वश करून परत यावें ! अशा प्रकारें पुनः सर्वत्र शांतता झाल्यावर तीन वर्षेपर्यंत गुलामगिरी बंद करण्याच्या कामीं याचे यत्न सुरू होते, तथापि यानें आपल्या मुलखांत कोणत्याही प्रकारची अव्यवस्था म्हणून होऊं दिली नाहीं. इतकें झाल्यावर, खेदिवास भेटून आणखी कांहीं गोष्टींत त्याजकडून सुधारणा करवावी, या हेतूनें गॉर्डन केरोस गेला. पण तेथें जाऊन पहातो तों इस्मायल पाछाला काढून टाकून त्याच्या मुलानें गादी बळकाविली होती, यामुळें याचा बेत तसाच राहिला. पुढें याला प्रायव्हेट सेक्रेटरीची जागा दिली. परंतु याच्यासारख्या खंबीर मनाच्या पुरुषास असली जागा काय कामाची ? आपण या जागेस नालायक आहोंत असें त्यानें त्यालाच वाटून त्यानें ती सोडून दिली. नंतर यास चीन देशांत जावें लागलें. तेथें जाऊन चीननें रशियाशीं लढाई करावी किंवा न करावी हें ठरवावयाचें होतें. तेथलें दरबार लढाईच्या पक्षाचें होतें, याचा एक लीहंगू चांग म्हणून मित्र होता. त्याचें मात्र लढाई न करावी असें मत होतें. चालाही संग्राम न करावा असेंच वाटत असल्यामुळें यानें आपल्या मित्राप्रमाणेंच आपला अभिप्राय कळविला. तेव्हां अर्थात त्या प्रश्नाचा निकाल होऊन संग्राम टळला व सर्वत्र स्वस्थता झाली. नंतर इंग्लंडास परत जाऊन गॉर्डन यानें थोडे दिवस विश्रांति घेतली. याची विश्रांतीची कल्पना मोठी विलक्षण असे. एकदां सहज त्यानें बोलून दाखविलें होतें कीं अकरा वाजेपावेतों निजायाला सांपडावें, बाहेर कधीं जेवायला जाण्याचा प्रसंग येऊं नये, व दररोज ऑइस्टरांची (म्हणजे शुक्तिगत जंतूंची) चंगळ असावी. दुसरीकडे जेवायला न जाण्याचा तर यानें निर्धारच

केला होता. एकदां खुद्द प्रिन्स आफ् वेल्स यांनीं मेजवानीला बोलाविलें असून, या खप्पीनें मला बरोबर नऊ वाजतां निजावें लागतें, मी येणार नाहीं, असें साफ सांगून पाठविलें ! पुढें कांहीं राजकारणावरून यांस बेल्जमच्या राजानें निमंत्रण केलें, व हे तेथें जातात तों इंग्लंडहून त्यास तार गेली कीं, आपण ताबडतोब निघून यावें. या वेळीं गॉर्डन ब्रुसेल्स येथें होता. तार पोंचतांच स्वारी तडक निघाली ती लंडनास येऊन दाखल झाली, व येथेंही विलंब न लावतां पुनः एकवार ईजिप्तास गेली. यावेळीं त्यास खारटुमास पाठविलें. गॉर्डन यास आपण विजयी होणार अशी चांगली खात्री होती. सन १८८४ च्या जानेवारींत १८ व्या तारखेस हा लंडन येथून निघाला. त्याला पोंचवायाला इंग्लंडांतील मोठमोठे मुत्सद्दी आले होते. हेंच काय पण याची कपड्यांची ब्याग अर्ल ग्रन्थानव्हिल यांनीं हातीं धरली होती, याचें तिकीट काढायला डयूक आफ केंब्रिज, व गाडींत प्रवेश करतांना डब्याचें दार ओढून धरायाला लॉर्ड हार्टिंगटन, अशी जाडी जाडी मंडळी आली होती. अशा थाटानें गॉर्डनची रवानगी झाली. तेथें गेल्यावर गॉर्डन यास फौजेची वगैरे कांहीं कुमक हवीशी वाटल्यावरून त्यानें इंग्लंडांत लिहून कळविलें. इंग्लिश सरकारानें त्यास सवड नाहीं म्हणून सांगून परत बोलाविलें. पण गॉर्डन यास आपल्या जागीं त्याच्या खात्रीचा झेबर म्हणून एक सरदार होता, त्यास तरी धाडून दिल्याशिवाय परत जातां येईना. तेव्हां अर्थात् त्यास तसेच दिवस काढावे लागले. इकडे महादीनें बराच दंगा उसळून दिला. तथापि खारटूमाचा चांगला बंदोबस्त करून गॉर्डन यानें पुष्कळ टिकाव धरला, व शत्रूला दाद दिली नाहीं. इंग्लंडानें जरी मदत केली नाहीं, तरी न डगमगतां यानें तेथलीच कांहीं फौज ठेविली, व तिच्या जोरावर शत्रूचा डाव साधूं दिला नाहीं. परकी फौज यालाच म्हणून वचकून होती. दुसरा जर एखादा जनरल असता तर कधींच ती शत्रूला जाऊन मिळती. इंग्लिश सरकारच्या म्हणण्याप्रमाणें सौंन सोडून दिलें तर मोठें अधमपणाचें कृत्य होईल, असें त्यास वाटून त्यानें इंग्लंडचें ऐकिलें नाहीं. खारटूमचें संरक्षण त्यानें फार शिताफीनें केलें होतें. महादी आंत प्रवेश व्हावा म्हणून खूप खटपट करीत होता, व बहुतेक निराश झाला होता. पण इतक्यांत खारटूममध्यें त्याला अनुकूल असलेली जी कांहीं मंडळी होती तिनें त्याच्या सैन्यास वाट खुली करून देऊन आपण त्यास येऊन मिळाले. गॉर्डन पाछा काय दंगा आहे म्हणून नित्याप्रमाणें अशस्त्रपाणि बाहेर येऊन पहातो, तों शत्रूच्या सैन्यांतून एकाएकीं एक गोळा येऊन लागतांच तो ठार होऊन पडला. याप्रमाणें त्या शूर जनरल गॉर्डनचा अंत झाला !

ज्या गृहस्थाचा जातेवेळीं मोठा बडेजाव केला त्या गृहस्थाला त्याच्या स्वदेशीयांनीं प्रसंगीं परदेशांत शत्रूच्या गराड्यांत कुमकेशिवाय सोडून दिलें, हें कांहीं चांगलें झालें नाहीं. ज्यांच्या सद्वर्तनाचा व सच्छीलतेचा जगभर डंका वाजत आहे, त्या इंग्लिश लोकांनीं आपल्याचपैकीं एकाचा अशा प्रकारचा अंत घडवून आणला, यामुळें त्यांना मोठें लांछन आलें आहे व तें घालविण्याकरितां आतां मागाहून त्यांची खटपट सुरू आहे. देव करो आणि अशानें तरी त्यांचें लांछन जावो!

[वर्ष ५, अंक ८.]

सभास्थापन.

सभास्थापन करण्याचा मूळ उद्देश म्हटला म्हणजे, कांहीं लोकांनीं एकत्र जमून कोणत्याही एका मतास किंवा कृत्यास आपलें प्रसिद्धपणें अनुमोदन देणें, हा होय. ज्याप्रमाणें कोणाही एका व्यक्तीस आपल्या हिताहिताचा स्वतः विचार करून त्याप्रमाणें वागण्याचा स्वाभाविक अधिकार आहे व असला पाहिजे; त्याप्रमाणेंच सर्वसाधारण कामांकरितां सर्वांनीं एकत्र होऊन, आपल्या हिताहिताचा विचार करण्याचाही सर्वांस स्वाभाविकच हक्क आहे व तो देणें सरकारास अवश्य आहे. परंतु सभास्थानापासून फायदा होण्यास कोणत्याही मतास किंवा कृत्यास एकत्र जमलेल्या लोकांचें केवळ अनुमोदन असूनच उपयोग नाहीं; त्या सर्वांनीं असाही करार केला पाहिजे कीं आमच्यानें होईल तितक्या प्रकारें आम्ही या मताचें अनुसरण करूं, व त्याचा प्रसार व वृद्धि होण्याचीही खटपट करूं; किंवा सर्वांनुमतें एखादें कृत्य जर करण्याची अवश्यकता किंवा इष्टता भासत असेल, तर तें सफळ होण्यास सर्वांनीं आपआपलें साहाय्य देऊन त्याच्या सफलतेकरितां प्रयत्नही केले पाहिजेत. याप्रमाणें अनुमोदन, अंगीकार व प्रयत्न ह्या तीनही गोष्टी एकत्र झाल्यावांचून सभांचा तादृश फायदा होत नाहीं; व आमच्या समाजांत तो न होण्याचें कारणही हेंच आहे, हें पुढील उदाहरणांवरून सिद्ध होईल.

गेल्या पांचसात वर्षांत आम्हांतील पुष्कळ अर्थशास्त्रपंडितांनीं स्वदेशी माल वापरण्यांत व त्यास उत्तेजन देण्यांत स्वदेशाचा फायदा आहे, असें अनेक सबळ कारणांनीं दाखविलें आहे, व त्यास अनेकांनीं अनुमोदनही दिलें आहे; परंतु त्याप्रमाणें आचरण करणारे आम्हांत किती सांपडतील हें मात्र पाहूं गेलें असतां, असा प्राणी आपणांस क्वचित्च आढळेल. ज्याअर्थीं स्वदेशी माल वापरण्यांत व्यक्तिमात्रहिताचा व सामाजिक हिताचा कांहीं अंशीं विरोध आहे हें सर्वांस कबूल केलें पाहिजे, त्याअर्थीं ह्या मताचा व्यवहारांत अंगीकार करणारे थोडे, यांत नवल नाहीं; परंतु जेथें समाजाचें व व्यक्तीचेंही हित आहे, अशा मतांचाही स्वीकार करणें आम्हांतील पुष्कळांस अवघड वाटतें ही गोष्ट मात्र आश्चर्यकारक वाटेल. बालविवाह करूं नये, लग्नकार्यांत हल्लीं होत असलेला वृथा खर्च नसावा, इत्यादि अनेक मतें हल्लीं लोकांस मान्य होत चाललीं आहेत; तथापि त्यांचें अनुसरण करणारे फारच थोडे आहेत. अशीच स्थिति उद्योगवृद्धि, व्यापारोत्तेजन, वगैरे दुसऱ्या मतांची होय.

याप्रमाणें आमच्या सभांची स्थिति होण्याचें एक कारण मागेंच दर्शविलें आहे; तें हें कीं राजकारणावांचून इतर सभा एकाएकीं उत्पन्न झाल्यास त्यांपासून बहुधा फायदा होत नाहीं; व तो फायदा करून घेणेंच असेल तर त्यास अत्यंत प्रयास लागतात. आमच्या देशांतील सभास्थापन करणारांचा मूळ उद्देशच असा दिसतो कीं, कोणत्याही एका मतासंबंधानें वाटाघाट मात्र व्हावी. सभास्थापकांनीं त्या मताचा प्रसार कोणत्या रीतीनें होईल; त्याचें अनुकरण करण्यास लोकांस कोणत्या अडचणी येतात, व त्या दूर कोणत्या रीतीनें होतील, या विषयांचा विचार करावा; परंतु तो कोणत्याही सभांत होतांना क्वचित्च दृष्टीस पडतो. ज्या वेळीं विषयविवेचन येवढाच हेतु सभास्थापकांच्या मनांत असतो, त्यावेळीं अनुमोदनावांचून अधिक फळ येणें अशक्यच आहे.

सुधारलेल्या राष्ट्रांत सभास्थापनाचे हेतु याहून फार भिन्न असतात. त्या देशांत सभा स्थापन करणें म्हणजे बाजारबुणगे गोळा करून त्यापुढें ठरलेल्या दिवशीं व्याख्यानें झोडणें येवढाच सभस्थापकांचा हेतु नसतो. प्रथमतः कोणतेंही मत सर्व लोकांस मान्य होऊन त्याचा प्रसार व्हावा असें कांहीं लोकांच्या मनांत आल्यावर ते लोक आपली एक सभा स्थापित करितात. व ही सभा केवळ व्यवहारदृष्ट्या स्थापिलेली असते. अशा सभांत आरंभीं विषयाचें विवेचन व महत्त्व यांवर भाषणें होतात. परंतु त्या मतासंबंधानें व्यवहारदृष्ट्या काय काय केलें पाहिजे याचा विचार मुख्य असतो; व मताच्या प्रचारासाठीं अमुक गोष्टी करावयाच्या असा ठराव केल्यावांचून सभाविसर्जन होत नाहीं. त्या मताचे अभिमानी लोक आपलीं नांवें गुप्त ठेवीत नाहींत, उलट तीं जितकीं प्रसिद्धीस येतील तितकीं आणण्याचा त्यांचा उद्देश असतो; व त्याकरितां ते वर्तमानपत्रकारांचीं नेहमीं मदत घेतात. अशा सभांत एकाच मताचे अनेक लोक एकत्र झाल्याकारणानें, प्रत्येकाची विचारसरणी इतरांस कळून त्या मतास पुष्कळ बळकटी येते; निरनिराळ्या स्वभावाचे लोक एकत्र आल्यानें, मतप्रसाराचे जे मार्ग सर्वमान्य होतात तें बहुधा सिद्धीस जाण्यासारखेच असतात; अशा सभांत अनेक लोकांची परस्परांशीं ओळख होऊन, त्यांस मतप्रसाराच्या कामांत उत्साह व उत्तेजन येतें.

याप्रमाणें एकेच ठिकाणीं सभास्थापन करून युरोपियन लोक स्वस्थ रहात नाहींत. कोणत्याही एका ठिकाणीं आपणांस थोडी बळकटी आली असें पाहिल्याबरोबर, इतर ठिकाणीं आपल्या मताचे अनुयायी जेथें जेथें असतील, तेथें तेथें

आपल्या सभेच्या शाखा स्थापित करण्याचा ते प्रयत्न करितात. अशा शाखा मुख्य मुख्य ठिकाणीं स्थापित झाल्यावर सर्व सभांच्या विचारानें काम चालावें, सर्वांस सुचलेल्या साधनांचा विचार व्हावा, व याप्रमाणें सर्वांस बळकटी येऊन, मताचा प्रसार विशेष जारीनें व्हावा, म्हणून प्रत्येक शाखेच्या मुखत्यारांची अखेरीस एक सभा स्थापित होते; व या स्थितीला सभा येईपर्यंत मूळ सभास्थापक आपला दीर्घ प्रयत्न सोडीत नाहींत.

अशा तऱ्हेच्या सभा आमच्यांत अद्यापि मुळींच नाहींत; व एखादी असलीच तर ती बहुधा युरोपियन लोकांनीं स्थापिलेली असायाची. परंतु अशा सभा युरोपियन लोकांत हमेश दृष्टीस पडतात; व इल्बर्टबिलाविरुद्ध युरेजिअन व अंग्लो-इंडियन लोकांनीं जी चळवळ करून सोडिली होती ती अशा प्रकारच्या सभा-स्थापनापासूनच झाली हें बहुधा सर्वांस माहीत असेलच. अशा सभा प्रथम आपणांस राजकारणींच स्थापिल्या पाहिजेत. त्यांचें स्थापन करणें हें आमच्या आधुनिक विद्वानांचें पहिलें कर्तव्यकर्म आहे; व कोणीही मनापासून श्रम केल्यास त्यास तें अगदीं दुरापास्त होईल असें आम्हांस वाटत नाहीं. अशा सभांच्या मदतीनें पुढें उद्योगवृद्धीच्या व व्यापारोत्तेजनाच्या सभांचें स्थापन करणें अवघड जाणार नाहीं.

[वर्ष ३, अंक ५१.]

संतति व संपत्ति.

जगांत प्रस्तुत कालीं जी विपत्ति दृष्टीस पडते तिचा तीन चतुर्थांश भाग फाजील प्रजोत्पादनापासून उत्पन्न होतो असें विचारांतीं खचित दिसून येईल. घराण्यांतील लहानसहान तंट्याबखेड्यांपासून तों राष्ट्राराष्ट्रांमधील मोठमोठ्या लढायांपर्यंत सर्व भांडणाचें आदिकरण संततीची अपरिमित वृद्धि होय. अन्तर्दृष्टि करून ज्यानें त्यानें आपल्यापासून विचार करण्यास आरंभ केला, व हळू हळू अधिकाधिक प्रदेशावर दृष्टि टाकली, तर त्याला असें दिसून येईल कीं, मनुष्यमात्राच्या अंगीं कामवासना जितकी उत्कट आहे तितकी नसती, तर त्यास जीं दुःखें आणि ज्या यातना भोगाव्या लागत आहेत त्यांपैकीं पुष्कळ टळल्या असत्या. पदार्थविज्ञानादि अनेक उपयुक्त शास्त्रांचा प्रसार होण्यासही प्रजोत्पादन हेंच कारण होय, व प्रजोत्पादनापासून मनुष्यजातीचें मुळींच हित झालें नाहीं असें आमचें म्हणणें नाहीं. आमचें इतकेंच म्हणणें आहे कीं फाजील प्रजोत्पादनानें हितापेक्षां अहित फार झालें आहे व थोड्या वर्षांत या विपदुगमाकडे पृथ्वीवरील सुधारलेल्या हरएक राष्ट्रांतील विचारशील, शास्त्रनिपुण, आणि सानुकंप पुरुषांचे डोळे न लागतील, तर उपयुक्त शास्त्रविद्यांच्या प्रसारापासून विशेष फायदा न होतां मनुष्यजातीची स्थिति उत्तरोत्तर शोचनीय होत जाईल, यांत संशय नाहीं. आर्यलोकांची फाटाफूट होऊन त्यांच्या शाखा यूरोप आणि आशियाखंडांत पसरल्या, व त्यांपैकीं एक हिंदुस्थानांत येऊन आधुनिक भारतीय प्रजेचें पूर्वजत्व आपणाकडे घेती झाली, याचें कारण काय तर वाढलेल्या प्रजेचें पोट भरण्याची अवश्यकता. ग्रीक लोकांनीं इराणावर स्वाऱ्या केल्या, एशिआ मायनरमध्यें वसाहती केल्या, व सिंधुनदीपर्यंत आपल्या वीर्याचा आणि पराक्रमाचा दर्प आणून भिडविला याचें कारण तरी प्रजावृद्धिच होय. पुढें रोमची पादशाही प्रबल होऊन तिनें इजिप्त, ग्रीस, फ्रान्स, जर्मनी व इंग्लंड वगैरे देशांस जिंकून जिकडे तिकडे रोमन अंमल चालू केला, यालाही प्रजावृद्धीहून दुसरें कारण नाहीं. या इतलीच्या अवाढव्य वैभवास धक्का बसण्यास व अखेरीस त्याचा चुराडा होण्यासही सैबेरीआ, रशिआ, व उत्तर जर्मनी यांतील व्हांडाल, गाथ्स, सिथिअन्स, व हून्स (हूण) वगैरे हापापलेल्या रानटी लोकांची भूकच कारण झाली. फ्रेडरिक धी ग्रेटनें ज्या मोठमोठ्या लढाया मारल्या त्या सायलेशिआ प्रांताची सुपीक जमीन उपटून आपल्या प्रजेची भूक भागविण्यासाठींच होत. १८ व्या

शतकाच्या अखेरीस नेपोलीअन बादशहानें यूरोप खंडांत जो भयंकर मनुष्यहोम मांडिला त्याला फ्रेंच लोकांची अन्नान्नदशा कारण झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं. पृथ्वीच्या सर्व भागांत इंग्लिश लोकांच्या वसाहती होण्यास, व हिंदुस्थानचें राज्य त्यांच्या हातीं जाण्यास इंग्लंडांत प्रजावृद्धि फार होऊन तिचा त्या लहान बेटांत होणाऱ्या उत्पन्नावर नीट चरितार्थ चालेना, हेंच कारण होय. फार कशाला, सध्यां (१८८३) फ्रान्स व चीन या देशांत लढाई होण्याचा जो प्रसंग दिसत आहे, त्याच्या मुळाला देखील ही पोटाची खळी आहे. ज्यांना अर्वाचीन सुधारणांची घमंडी वाटत असेल त्यांना आमचा येवढाच प्रश्न आहे कीं तुमच्या या सुधारणांपासून पृथ्वीवर जितकी प्रजा आहे तितकीचा सुखानें जर चरितार्थ चालत नाहीं तर त्यांचा काय उपयोग! आयर्लंडांत पोट भरेनासें झाल्यामुळें प्रत्येक वर्षीं लाखों ऐरिश लोकांस चरितार्थाच्या सोईसाठीं स्वदेश सोडून अमेरिकेंत किंवा पृथ्वीच्या दुसऱ्या एखाद्या ओसाड प्रदेशावर जावें लागत आहे, ही गोष्ट मनांत आली म्हणजे ज्या सुधारणांबद्दल अलीकडे इतकी वल्गना होत असते, त्यांचें कांहींच गौरव वाटत नाहीं. एकंदरींत स्थूल दृष्टीनें, सृष्टीचें अवलोकन केलें तर असें दिसून येईल कीं जीवकोटींतील हरएक प्राणिवर्गाच्या अंगीं प्रजोत्पादनाची बुद्धि स्वभावसिद्ध होऊन गेली असल्यामुळें जेथें तेथें उदरपोषणासाठीं मारामारी चालली आहे. 'अत्तुं वांछति शांभवो गणपतेराखुं क्षुधार्तः फणिः' इत्यादि जुन्या वाक्यांकडे नजर फेंकली असतां सर्व सृष्टीभर हा "जीवनार्थ कलह" कशा वेगानें चालला आहे, हें तेव्हांच ध्यानांत येणार आहे. प्रत्येक वरचा प्राणिवर्ग खालच्या बहुतेक प्राणिवर्गास आपलें भक्ष्य करितो. व सर्वांत श्रेष्ठ प्राणिवर्ग जो मनुष्यवर्ग त्याच्या दाढांतून कोणताही जीव मी सुटून जाईन म्हणेल तर घडणें नाहीं. भुकेच्या झपाट्यांत मनुष्यांनीं घोडीं पाहिलीं नाहींत, कुत्रीं पाहिलीं नाहींत, पोरें देखील नाहींत! जठराग्नीचा दाह शमन करण्यासाठीं त्यांनीं उदरकुंडांत हवें तें हव्य घालण्याला मागें पुढें पाहिलें नाहीं! आपल्या लोकांत म्हणण्याची चाल आहे कीं द्विपादांत शिडी आणि चतुष्पादांत घडवंची यांशिवाय चिनी लोकांच्या आहारास कांहीं एक वर्ज्य नाहीं. या अतिशयोक्तीचा अर्थ इतकाच कीं त्या देशांत लोकसंख्या मनस्वी वाढल्यामुळें त्यांच्या उपजीविकेला दुसऱ्या लोकांना अभक्ष्य अशा पुष्कळ गोष्टी चालतात. सारांश, पृथ्वीवरील ९।१० कोटी लोकांना पोटासाठीं साऱ्या जन्मभर सक्तमजुरी करावी लागून अखेरीस देहांत शिक्षा भोगावी लागते! ही मनुष्यजातीची शोच्य स्थिति पाहून अत्यंत उदसीन व खिन्न झालेल्या एका आधुनिक नाट्याचार्यानें-

–विश्व असे हा तुरुंग मोठा प्राणिमात्र कैदी। पदार्थधर्मांचिया शृंखला त्या न कुणी भेदी॥ असे जे उद्गार काढिले आहेत ते किती सत्य आहेत याचा वाचकांनींच विचार करावा. संतति आणि संपत्ति या युगलानें सर्व वसुंधरेस बेजार करून सोडलें आहे. गेल्या दुष्काळांत साठ लक्ष लोक मृत्यूच्या जबड्यांत पडले! येवढ्या मनुष्य-हानीनें युरोपांतील एखादा लहानसा देश निर्जन होऊन ठार ओसाड पडला असता! हिंदुस्थानांत ज्या स्त्रीपुरुषांकडे मातापितृत्व आलेलें असतें त्यांपैकीं तीन चतुर्थांशाला निदान एक द्वितीयांशाला तरी, तो अधिकार प्राप्त होण्यापूर्वी शिशुमुखावलोकनाची इच्छा झालेली असते असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं; निदान स्त्रियांना तरी एकमेकींकडे पाहून ही संतानचिंता अगदीं अल्पवयांत लागते हें सर्वांस माहीत आहे. तेव्हां प्रस्तुत कालीं संततीची विशेष वृद्धि झाल्यापासून ज्या पीडा होत आहेत त्यांत आम्ही स्वेच्छेनेंच जाऊन पडतों, किंवा त्या आम्हांस पीडा अशा वाटत नाहींत असें मानिलें पाहिजे. याच प्रश्नाची दुसरी एक बाजू राहिली ती ही कीं स्त्रीपुरुषाला अपत्यप्राप्तीची कांक्षा नसतां केवळ वयपरत्वें अनुभवलेल्या विषयसुखाचा स्वाभाविक धर्मांप्रमाणें परिणाम घडून येऊन कांहीं संतति नको असतां अस्तित्वांत येते. तेव्हां दोनही बाजूंनीं असाच क्रम चालला तर जगाची किती दुःखमय स्थिति होईल व ती टाळण्यास काय उपाय करावे याचा विचार करून अमलांत आणणें यांतच मनुष्यपण आहे.

समाप्त

REFBK-0022583

ग्रं. सं. 2243

कै. हरि नारायण आपटेकृत कादंबऱ्या

	किं. रु.	आ.
ऐतिहासिक		
१ उषःकाल (अडीचशें वर्षांपूर्वीचा महाराष्ट्र) ...	३	०
२ गड आला, पण सिंह गेला !!!	०	८
३ रूपनगरची राजकन्या	१	१२
४ चंद्रगुप्त (पंचवीसशें वर्षांपूर्वीचें हिंदुस्थान) ...	१	४
५ वज्राघात!	२	४
६ सूर्योदय	२	४
७ केवळ स्वराज्यासाठीं	२	४
८ सूर्यग्रहण	२	४
९ म्हैसूरचा वाघ	१	४
१० कालकूट	०	१२
११ मध्याह्न	२	०
सामाजिक		
१ आजकालच्या गोष्टी (मधली स्थिति) ...	२	४
२ पण लक्षांत कोण घेतो ?	२	८
३ जग हें असें आहे !	२	०
४ मी	२	८
५ यशवंतराव खरे	२	०
६ गणपतराव (अपूर्ण)	१	०
७ मायेचा बाजार	२	४
८ भयंकर दिव्य	३	०
९ कर्मयोग (अपूर्ण)	१	१२
१० आजच (अपूर्ण)	१	८
संक्षिप्त कादंबऱ्या		
१ मी	०	८
२ केवळ स्वराज्यासाठीं	०	८
३ सूर्योदय	०	८
४ उषःकाल	०	८
नाटकें, निबंध		
१ संगीत संत सखूबाई (सचित्र)	१	०
२ मराठी वाङ्मयाचा अभ्यास	०	८

वरील किंमतीशिवाय टपालखर्च वेगळा पडेल.

— आर्यभूषण मुद्रणालय, पुणें नं. २

किंमतीसह निबंध - पुस्तक हमारे

१९४०